# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०७/ २०१७** **दिनांक २५.०७.२०१७**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २५.०७.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २०९४/ २०१७, दिनांक १७ जुलै, २०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक २५.०७.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य ०४. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य ०६. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली व आजचे सभेत बाहेरील संस्थांना अनुदान देणेबाबतच्या विषयांवर चर्चा होणार नाही. सदरहू विषय पुढे ढकलणेत येतील, असे मा.अध्यक्ष महोदय यांनी सुचविले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग- सदस्य व मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे- सदस्य यांनी दूध्वनीद्वारे कळविले होते. तसेच मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या, मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य यांनी कोणतीही पुर्व सुचना न देता सभेसाठी अनुपस्थित होते.

याची नोंद घेऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १५.०६.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५२२** दरम्यानचे कालावधीमध्ये व्यवस्थापन समितीच्या दोन सभा रद्द झालेल्या असल्यामुळे दिनांक १५.०६.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तामधील निर्णयांवर कार्यवाही करणेस विलंब होऊ नये, याकरीता या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात येऊन, मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व समिती सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली होती, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.४६६-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, जनहित याचिका क्र.२५/ २०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे साहेब यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली. तसेच या अहवालामधील एम मध्ये नमुद केलेप्रमाणे येसगाव येथे संस्थानमार्फत बांधणेत आलेले भक्तनिवास तातडीने संस्थानचे नावावर करणेची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- विधी अधिकारी)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, जनहित याचिका क्र.२५/ २०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे साहेब यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली. तसेच या अहवालामधील एम मध्ये नमुद केलेप्रमाणे येसगाव येथे संस्थानमार्फत बांधणेत आलेले भक्तनिवास तातडीने संस्थानचे नावावर करणेकामी समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे यांचे सहकार्याने कार्यवाही सुरु करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी/ प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**(२) निर्णय क्र.५१५-**

व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय झाल्यानंतर, त्याची अंमलबजावणी सुरु असताना, समिती सदस्यांनी हस्तक्षेप करु नये, समिती सदस्यांचे त्याबाबत काही म्हणणे असल्यास, त्यांनी पुढील व्यवस्थापन समिती सभेमध्ये मांडावे, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अधिकारी कक्ष)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**व्यवस्थापन समिती सभेमध्ये अतिक्रमण काढणे अथवा अशा स्वरुपाचे निर्णय झाल्यानंतर, त्याची अंमलबजावणी सुरु असताना, प्रशासनास पुर्ण स्वातंत्र्य देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- कार्यकारी अधिकारी कक्ष)

---

**विषय नं.०२** **दिनांक २०.०६.२०१७ रोजी झालेल्या झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५२३** दरम्यानचे कालावधीमध्ये व्यवस्थापन समितीच्या दोन सभा रद्द झालेल्या असल्यामुळे दिनांक ०७.०७.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात येऊन, त्यामधील निर्णयांवर तातडीने कार्यवाही होणेसाठी मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व समिती सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली होती, त्याची नोंद घेण्यात घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील नोंद घेण्यात आलेल्या खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील फोटोग्राफी व शुटींग कक्षातील लाईव्ह दर्शन व इतर उपकरणांकरीता ॲल्युमिनीअम पार्टीशन करणेकामी उघडणेत आलेल्या दरपत्रकांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-** अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्त व्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** मा. व्यवस्थापन सिमतीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५९४ अन्वये सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील व्हीडीओ शुटींग व फोटोग्राफी कक्षामधील उपकरणांकरीता ११X१२X१२ फुटाचे ॲल्युमिनीअम पार्टीशन व दोन टनाचे ०२ नग एअर कंडीशनर विहीत पध्दतीने खरेदी करुन बसविणेस तसेच त्याकामी येणा-या एकत्रित रु.२,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली असून, सदर निर्णयानुसार इकडील विभागामार्फत ॲल्युमिनीअम पार्टीशन करुन मिळणेबाबत सीसीटीव्ही विभाग यांनी दि.०३/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

**प्रस्तावः-** उपरोक्त प्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील व्हीडीओ शुटींग व फोटोग्राफी कक्षामधील उपकरणांकरीता ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेकामी दर्शन रांग व्यवस्थापन कार्यप्रणालीचे ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये केबीन करणे कामाचे मंजूर दरानुसार रक्कम रु.६६,१८८/- मात्रचे अपेक्षीत खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस दि.२८/०४/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेणेत आली आहे. त्यानुसार इकडील जा.नं.८६१/२०१७ दि.१८/०५/२०१७ अन्वये कोटेशन मागविणेत आले आहे. याकामी खालीलप्रमाणे ०४ कोटेशन प्राप्त झाले आहे.

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नांव, पत्ता | आवक क्र. दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मारुती ग्लास इंचिंग ॲण्ड ॲल्यु. श्रीरामपूर | ४५७१/२४-०५-२०१७ |
| ०२ | यशश्री ॲल्यु. ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव | ४५७०/२४-०५-२०१७ |
| ०३ | रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | ४५७२/२४-०५-२०१७ |
| ०४ | श्री दुर्गा ग्लास ॲण्ड हार्डवेअर, नाशिक | ४७१९/२५-०५-२०१७ |

विषयांकीत कामासाठी वरील प्रमाणे प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन दि.३०/०५/२०१७ रोजी मा.खरेदी समितीसमोर उघडणेत आले असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Description Of Work | Qty. / Unit | Maruti Glass Etching & Aluminium, Shrirampur | | Yashashri Aluminium & Glass Centre, Kopargaon | | Ravindra Rubber Products Fabrication, Shrirampur | | Shri Durga Glass & Hardware, Nashik | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| 01 | Providing and fixing in position powder coated extruded alluminium partition. | 24.89 Sqm | 2691.0 | 66978.99 | 1670.0 | 41566.30 | 2259.6 | 56241.44 | 2151.0 | 53538.39 |
| 02 | Providing & fixing in position single shuttered all. extruded powder coating door. | 3.83 Sqm | 3229.0 | 12367.07 | 2050.0 | 7851.50 | 4842.0 | 18544.86 | 2841.0 | 10881.03 |
| 03 | Providing & fixing Tubular door closer of heavy duty having I.S. Mark. | 02 Nos. | 2000.0 | 4000.0 | 1500.0 | 3000.0 | 1100.0 | 2200.0 | 1800.0 | 3600.0 |
| | Total (Rs.): | | | 83,346.06 | | 52417.80 | | 76986.3 | | 68019.42 |
| | Vat :13.5% | | | - | | 7,076.40 | | - | | - |
| | **Total Amount (Rs.):** | | | 83,346.06 | | **59,494.20** | | 76,986.10 | | 68,019.42 |
| | **Remarks:** | | | | | **Lowest** | | | | |

उपरोक्त तपशिलातील ठेकेदार यशश्री अल्यु. ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांचे दर निम्नतम असून, त्यांचेकडून विषयांकीत काम करुन घेणेकामी रक्कम रु.५९,४९४/- मात्र इतका खर्च येईल.

तरी सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील व्हीडीओ शुटींग व फोटोग्राफी कक्षामधील उपकरणांकरीता ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेकामी ठेकेदार यशश्री अल्युमिनीअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांचे निम्नतम दरानुसार येणारे रु.५९,४९४/- मात्रचे खर्चास तसेच याकामी त्यांना कार्यादेश देणेकरीता मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा. उपसमिती सभेचे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावित कामीचे निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडील फोटोग्राफी व शुटींग कक्षातील लाईव्ह दर्शन व इतर उपकरणांकरीता ॲल्युमिनीअम पार्टीशन करणेकामी यशश्री अल्यु. ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **साईबाबा भक्तनिवास व द्वारावती भक्तनिवास विभागाकरीता प्रिंटेड बेडशिट उशीकव्हरसह खरेदीकामी ई-निविदेतील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

साईबाबा भक्तनिवास व व्दारावती भक्तनिवास विभागांकरीता प्रिंटेड बेडशिट उशी कव्हसहखरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.४२,२४,०००/- (अक्षरी रु. बेचाळीस लाख चोविस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर सदर प्रिंटेड बेडशिट उशी कव्हसह खरेदीकामीमहाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती.

सदरचे खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त सोळा ई-निविदा- तांत्रिक निविदा दि.०३.०४.२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडल्या असता,त्यामध्ये अकरा निविदा पात्र तर पाचनिविदा अपात्र ठरलेल्या होत्या.

पात्र अकरा निविदाधारकांच्या व्यापारी निविदा (Commercial Bid) दि.३०.०५.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. त्याचा ऑनलाईन प्राप्त तुलनात्मक तक्ता सोबत सादर केलेला आहे.

सोबतच्या तुलनात्मक तक्त्यातील अनं.१ व अ.नं.२ प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह प्राप्त झालेले ई निविदा न्युनतम दर गडद व अधोरेखित केलेले आहेत. सदरचे ई-निविदेतील दर हे बेडशीट व उशीकव्हरसह आहेत. मागीलवर्षी ५४"X९०" साईजचे प्रिंटेड बेडशिट प्रती नग रु.१६८/- व उशी कव्हर "१८X२८" साईजचे प्रतीनग रु.३५/- या न्युनतम दराने स्वतंत्र खरेदी केलेले होते. तसेच मागील वर्षी १००"X९०" साईजचे बेडशीट खरेदी केलेले नाहीत.

सदर खरेदीकामी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी निविदा सादर केली होती तथापि त्यांचे न्युनतम नाहीत. मात्र मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी तांत्रिक निविदेतील दिलेले दि२२.०२.२०१७ रोजीचे पत्रात सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतूद क्रं.५.१७ परिशिष्ठ २० नुसार एकूण खरेदीच्या ३०% खरेदी L1 दराने यंत्रमाग महामंडळासाठी राखीव ठेवण्याची विनंती केली आहे.

शासनाचे सुधारीत नियमावलीतील ५.१७ मध्ये-" शासनाचे अंगीकृत व्यवसाय अंतर्गत नमुद असलेली महामंडळे/उपक्रमांनी त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूसाठी निविदेत सहभाग घेतल्यास त्यांच्यासाठी एकूण खरेदीच्या ३० टक्के खरेदी एल-१ दराने राखीव ठेवण्यात यावी. अशा महामंडळे/उपक्रमांची यादी व त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची यादी (परिशिष्ठ २०) मध्ये देण्यात आली आहे." अशी तरतूद आहे.

तथापि परिशिष्ठ २० मध्ये अ.नं. ६ - महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून खरेदी करावयाच्या राखीव वस्तुंमध्ये मिलचे कापड, लॉग क्लॉथ, चादरी, पडद्याचे कापड, टॉवेल्स, हॉस्पिटलसाठीचे कापड, साडया, टेरिकॉटचे कापड, कॅलिको कापड, गादीपाट व सुती अथवा वुलन चादरी, हॉस्पिटल क्लॉथ क 1,2,4,6,7 आणि 8, नॅपकिन्स हॉस्पिटल व गणवेशाचे कापड या वस्तूंचा समावेश आहे. या राखीव ठेवलेल्या वस्तूंमध्ये बेडशिट व उशीकव्हरचा उल्लेख नाही. त्यामुळे सदर बेडशिट व उशीकव्हर एकूण खरेदीच्या ३० टक्के खरेदी एल-१ दराने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून खरेदीसाठी राखीव ठेवता येणार नाही, असे मत आहे.

याकामी अंदाजे खर्च रक्कम रु.४२,२४,०००/- ला मान्यता घेतलेली असून न्युनतम दराने खरेदीसाठी रक्कम रु.२१,०९,८५०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सोबत जोडलेले प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह खरेदीकामीचे तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखित केलेले न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर

**साईबाबा भक्तनिवास व द्वारावती भक्तनिवास विभागाकरीता प्रिंटेड बेडशिट उशीकव्हरसह खरेदीकामी निम्नतम दरधारक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित नसल्याने सदरहू विषय पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)

---

०३ **द्वारावती भक्तनिवास विभागाकरीता प्लॅस्टीक व इतर साहित्य खरेदीकामीचे ई-निविदेमधील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

संस्थानचे व्दारावती भक्तनिवास विभागाकरीता प्लॅस्टिक व इतर साहित्य खरेदी कामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२३.०२.२०१७ ते दि.१४.०३.२०१७ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. तथापि मुदतीचे शेवटचे तारखेला ,दि.१४.०३.२०१७ रोजी याकामी फक्त १ निविदा प्राप्त झाल्यामुळे, खरेदी नियमावलीनुसार ८ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली होती. मुदतवाढीनंतरचे मुदतीत याकामी ५ ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदर ऑनलाईन प्राप्त पाच ई-निविदेतील तांत्रिक निविदा दि.०३.०४.२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडल्या असता त्यामध्ये तीन निविदा पात्र तर दोन निविदा अपात्र ठरलेल्या होत्या.

पात्र तीन निविदाधारकांच्या व्यापारी निविदा (Commercial Bid) दि.१९.०५.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. त्याचा ऑनलाईन तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे–

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty (Nos) | CLASSIC STATIONERS, CO. | Asian Sales Corporation | M/s R.T Karachiwala |
|---|---|---|---|---|---|
| | | | Rate | Rate | Rate |
| 1.00 | प्लॅस्टिक बादली अनब्रेकेबल (१७लि) नामांकित कंपनी | 400.00 | **135.00** | **135.00** | 281.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2.00 | प्लॅस्टिक बादलीअनब्रेकेबल (०३ लि) नामांकित कंपनी | 400.00 | **37.00** | 48.00 | 69.00 |
| 3.00 | प्लॅस्टिक मगअनब्रेकेबल (०१ लि.) नामांकित कंपनी | 500.00 | 21.00 | **18.00** | 47.00 |
| 4.00 | प्लॅस्टिकआंघोळीचा स्टुल जम्बो अनब्रेकेबल १३ इंच लांब×१३ इंच रुंद×८ इंच उंच नामांकितकंपनी | 350.00 | 215.00 | **165.00** | 0.00 |
| 5.00 | प्लॅस्टिकडस्टबीन झाकनासह अनब्रेकेबल१० इंचलांब ×१० इंच रुंद×१७ इंच उंच नामांकित कंपनी | 350.00 | **165.00** | 190.00 | 0.00 |
| 6.00 | प्लॅस्टिक ट्रेअनब्रेकेबल १५ इंच लांब×११ इंच रुंद×१ इंच उंच नामांकित कंपनी | 350.00 | **89.00** | 156.00 | 0.00 |
| 7.00 | बाथमॅट (पायपुसणी) ०१ फुट रुंद×१.६ फुट लांब नामांकित कंपनी | 500.00 | 190.00 | **49.00** | 135.00 |
| 8.00 | डोअरमॅट (कापडी पायपुसणी) ०२ फुट रुंद×०१.६ फुट लांब नामांकित कंपर्न | 500.00 | 145.00 | **105.00** | 122.00 |
| 9.00 | कुलुपे (डबल लॉक)०६ लिव्हर ०३ चावीसह नामांकित कंपनी | 350.00 | 159.00 | **48.00** | 90.00 |
| 10.00 | गेटसमोरील पायरीखालील रबरी मॅट ३९ इंच रुंद×५५ इंच लांब नामांकित कंपनी | 40.00 | 1248.00 | **1240.00** | 0.00 |
| 11.00 | प्लॅस्टिकखुर्ची एसी रुमसाठी अनब्रेकेबल २१ इंच लांब×१६ इंच रुंद×३० इंच उंच नामांकितकंपनी | 180.00 | 588.00 | **505.00** | 0.00 |
| 12.00 | प्लॅस्टिकाफ्रेम अनब्रेकेबल आरसे २४" X १८" नामांकित कंपनी | 350.00 | **388.00** | 390.00 | 0.00 |
| 13.00 | सिरॅमिका जग १.५ लिटर क्षमता नामांकित कंपनी | 350.00 | **150.00** | 1650.00 | 0.00 |
| 14.00 | स्टील ग्लास २५०मि लि नामांकितकंपनी | 400.00 | 66.00 | 28.00 | **20.00** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर गडद व अधोरेखित केलेले आहेत. तसेच सदर Items साठी नमुनेही मागविण्यात आलेले आहेत.

सदर तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. ४,५,६,१०,११,१२ व १३ या सात Items साठी दोनच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत. तथापि शासनाचे सुधारीत खरेदी नियमावलीतील ४.४.३.१ मध्ये रुपये दहा लाखांपेक्षा कमी रकमेची निविदा असल्यास फक्त एकदाच मुदतवाढ देण्यात यावी, अशी तरतूद आहे.

सदर तरतूद विचारात घेता ही खरेदी दहा लाखापेक्षा कमी असल्यामुळे तुलनात्मक तक्त्यातील सदर सात Items चे न्युनतम दरधारकांस पुरवठा आदेश देणेबाबत हरकत नाही, असे मत आहे.

वरील खरेदी करण्यात येत असलेले Items ची खरेदी यापुर्वी खरेदी विभागाकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे या खरेदीबाबतचे मागील खरेदीचे दर उपलब्ध नाहीत.

याकामी व्दारावती भक्तनिवास विभागाने अंदाजे खर्च रक्कम रु.९,४०,२५०/- ला मान्यता घेतलेली असून न्युनतम दराने खरेदीसाठी रक्कम रु.६,५५,०५०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. १ ते १४ Items चे न्युनतम दरांबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर.

**द्वारावती भक्तनिवास विभागाकरीता प्लॅस्टीक व इतर साहित्य खरेदीकामी निम्नतम दरधारक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित नसल्याने सदरहू विषय पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी)

---

०४ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय येथे नवीन सेंट्रल प्लांट उभारणीसाठी कन्सल्टंटची नेमणूक करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २८२ अन्वये श्री साईनाथ रुग्णालय येथे नविन सेंट्रल ए.सी. प्लांट तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलचे सेट्रल ए.सी. बायबॅक करुन नविन ए.सी. प्लांट उभारणी करणेकामी तांत्रिक आराखडा व अंदाजे खर्चाचा प्रस्ताव तयार करणेसाठी जाहीरातीव्दारे कन्सल्टंटची नेमणूक करणेस मान्यता मिळालेली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर तिसरे वेळेस ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती.

यात ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडकरीता दिनांक २८/०४/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक ते कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्यामुळ प्रती दिनांक ०९/०५/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ई-निविदेत देण्यात आली होती. या मुदतीत खालील कन्सल्टंट कंपन्या यांच्याई-निविदाच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये संस्थानकडे प्राप्त झालेल्या आहेत :

| अ.नं. | ईनिविदाधारकांचे नांव | अ.नं. | ईनिविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| १. | Apurva Service Consultants, Thane | २. | Czar Consultants, Mumbai |
| ३. | Siddhivinayak MEP Consultants, Pune | ४. | Dynamic Projects Pvt. Ltd., Kolkata |
| ५. | A2S Consulting Engineers, New Delhi | | |

उपरोक्त प्राप्त झालेले ५ कोटेशन दिनांक ३०/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत :

| अ.नं. | कन्स्लटंट कंपनीचे नांव | एकूण % दर |
|---|---|---|
| १. | Apurva Service Consultants, Thane | ३.०० |
| २. | Czar Consultants, Mumbai | ४.०० |
| ३. | Siddhivinayak MEP Consultants, Pune | ४.०० |
| **४.** | **Dynamic Projects Pvt. Ltd., Kolkata** | **२.२५** |
| ५. | A2S Consulting Engineers, New Delhi | ५.७५ |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मे. डायनामिक प्रोजेक्टस् प्रा. लि., कोलकता यांचे प्रस्तुतकामी २.२५ % रकमेचे दर निम्नतम आहेत. सदर दराबाबत चर्चा/वाटाघाटी होणेकामी मा. उप-समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करुन पुढील कार्यवाही करता येईल.

तरी श्री साईनाथ रुग्णालय येथे नविन सेंट्रल ए.सी. प्लांट तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलचे सेट्रल ए.सी. बायबॅक करुन नविन ए.सी. प्लांट उभारणी करणेकामी तांत्रिक आराखडा व अंदाजे खर्चाचा प्रस्ताव तयार करणेसाठी कन्सल्टंटची नेमणूक करणेकामी मे. डायलामिक प्रोजेक्टस् प्रा. लि., कोलकता यांनी दिलेले रुपये २.२५ % मात्रचे दरामध्ये चर्चा / वाटाघाटी करुन पुढील कार्यवाही करणेसाठी मा. स्थानिक उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर .

**श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय येथे नवीन सेंट्रल प्लांट उभारणीसाठी कन्सल्टंटची नेमणूक करणेकामी निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय येथे नवीन सेंट्रल प्लांट उभारणीसाठी कन्सल्टंटची नेमणूक करणेकामी मे. डायनामिक प्रोजेक्टस् प्रा. लि., कोलकता यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०५ **संस्थानचे विविध विभागातील जुने झालेले ए.सी. बायबॅक करुन नवीन ए.सी. खरेदी करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३०२ अन्वये संस्थानचे विविध विभागातील जुने झालेले ३३ नग ए.सी. बायबॅक करुन नविन ५० नग ए.सी. खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये २४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडकरीता दिनांक ०९/०५/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक ते कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती दिनांक १८/०५/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ई-निविदेत देण्यात आली होती.

उपरोक्त मुदतीत खालील पुरवठादार यांच्या तांत्रिक ई-निविदाच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये संस्थानकडे प्राप्त झालेल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Kailas Refrigeration Works, Mumbai | 3. | Sugandha Aircon & Refrigeration Co., Aurangabad |
| 2. | Heramb Enterprises, Jalgaon | 4. | Cool Breeze, Pune |

वरील प्राप्त ४ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ३०/०५/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आलेले आहेत. त्यातील VAT, TIN, PAN, कंपनीचा वार्षिक उलाढाल, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी. रकमेचा डी.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील चारही तांत्रिक निविदा पात्र झाल्या होत्या. या पात्र झालेल्या निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक ०७/०६/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून, त्यात खालीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहेत :

**1) Kailas Refrigeration Works, Mumbai**

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per AC) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply, Installation & Commissioning of New Split Wall Mounted Air Conditioners, Capacity 2 Ton, Three Star, Single Phase, Rotary Compressor, Copper Condenser, Copper Piping with Out Door Unit, Extra M.S. Stand, Gas – 410a | 50 | 43,000/- | 21,50,000/- |
| 2. | By-Back Price of Exiting Wall Mounted Split Air Conditioners, Capacity 2 Ton, Make Voltas | 33 | 3,500/- | 1,15,500/- |
| | | | **Total Rs (1-2):** | **20,34,500/-** |

**2) Heramb Enterprises, Jalgaon**

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per AC) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply, Installation & Commissioning of New Split Wall Mounted Air Conditioners, Capacity 2 Ton, Three Star, Single Phase, Rotary Compressor, Copper Condenser, Copper Piping with Out Door Unit, Extra M.S. Stand, Gas – 410a | 50 | 37,500/- | 18,75,000/- |
| 2. | By-Back Price of Exiting Wall Mounted Split Air Conditioners, Capacity 2 Ton, Make Voltas | 33 | 7,000/- | 2,31,000/- |
| | | | **Total Rs (1-2) :** | **16,44,000/-** |

**3) Sugandha Aircon & Refrigeration Co., Aurangabad**

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per AC) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply, Installation & Commissioning of New Split Wall Mounted Air Conditioners, Capacity 2 Ton, Three Star, Single Phase, Rotary Compressor, Copper Condenser, Copper Piping with Out Door Unit, Extra M.S. Stand, Gas – 410a | 50 | 46,700/- | 23,35,000/- |
| 2. | By-Back Price of Exiting Wall Mounted Split Air Conditioners, Capacity 2 Ton, Make Voltas | 33 | 4,300/- | 1,41,900/- |
| | | | **Total Rs (1-2) :** | **21,93,100/-** |

**4) Cool Breeze, Pune**

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per AC) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply, Installation & Commissioning of New Split Wall Mounted Air Conditioners, Capacity 2 Ton, Three Star, Single Phase, Rotary Compressor, Copper Condenser, Copper Piping with Out Door Unit, Extra M.S. Stand, Gas – 410a | 50 | 38,890/- | 19,44,500/- |
| 2. | By-Back Price of Exiting Wall Mounted Split Air Conditioners, Capacity 2 Ton, Make Voltas | 33 | 4,120/- | 1,35,960/- |
| | | | **Total Rs (1-2) :** | **18,08,540/-** |

उपरोक्त आर्थिक (Financial) बीडमधील तक्त्यानुसार मे. हेरंब एंटरप्रायजेस, जळगांव यांचे नविन ५० नग ए.सी. खरेदीकामी प्रती नग रुपये ३७,५००/- प्रमाणे रुपये १८,७५,०००/- मात्रचे रकमेतून ३३ नग जुने ए.सी. बायबॅक करणेकरीता प्रती नग रुपये ७,०००/- प्रमाणे २,३१,०००/- मात्रची रक्कम वजा जाता, उर्वरित रक्कम रुपये १६,४४,०००/- मात्रचे दर निम्नतम आहेत. सदर दरांबाबत मा. उप-समितीचे सभेमध्ये चर्चा / वाटाघाटी होणे आवश्यक आहे.

तरी श्री संस्थानचे विविध विभागातील जुने झालेले ३३ नग ए.सी. बायबॅक करुन नविन ५० नग ए.सी. खरेदी करणेकामी प्राप्त व पात्र झालेल्या ई-निविदेपैकी निम्नतम दरधारक मे. हेरंब एंटरप्रायजेस, जळगांव यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**संस्थानचे विविध विभागातील जुने झालेले ए.सी. बायबॅक करुन नवीन ए.सी. खरेदी करणेकामी निम्नतम दरधारक मे. हेरंब एंटरप्रायजेस, जळगांव आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमिती सभेने त्यांचेबरोबर दरांवर चर्चा केली असता, त्यांनी रु.१६ लाख अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागातील जुने झालेले ए.सी. बायबॅक करुन नवीन ए.सी. खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक मे. हेरंब एंटरप्रायजेस, जळगांव यांनी चर्चेअंती देऊ केलेले रु१६ लाख अंतीम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०६ **श्री साईआश्रम भक्तनिवास येथील इमारतीचे तळमजल्यावरील बाहेरील बाजुचे खिडक्यांना सुरक्षिततेकरीता लोखंडी जाळी बसविणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयान्वये श्री साईआश्रम भक्तनिवास येथील इमारतीचे तळमजल्यावरील बाहेरील बाजुचे खिडक्यांना सुरक्षिततेकरीता लोखंडी जाळी बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये ४,०८,३५२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडकरीता दिनांक ०९/०५/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक ते कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्यामुळ प्रती दिनांक १८/०५/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ई-निविदेत देण्यात आली होती.

उपरोक्त मुदतीत खालील फॅब्रिकेटर्स यांच्या तांत्रिक ई-निविदाच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये संस्थानकडे प्राप्त झालेल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| १. | मे. अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद | ३. | मे. सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी |
| २. | मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर | ४. | मे. व्दारका फॅब्रिकेटर्स, नाशिक |

वरील प्राप्त ४ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ३०/०५/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आलेले आहेत. त्यातील VAT, TIN, PAN, कंपनीचा वार्षिक उलाढाल, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी. रकमेचा डी.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील चारही तांत्रिक निविदा पात्र झाल्या होत्या. या पात्र झालेल्या निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक ०७/०६/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून, त्यात पुढीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहेत:

१) मे. अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per AC) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | M.S. Angle : Size – 35 x 35 x 5 mm | 3406 Kgs. | 72/- | 2,45,232/- |
| 2. | M.S. Flat : Size – 35 x 5 mm | 850 Kgs. | 72/- | 61,200/- |
| 3. | M.S. Square Jali : Size – 25 x 25 x 3 mm, Height 4” | 1992 kgs. | 90/- | 1,79,280/- |
| 4. | Colour : Asian Paint – Ivory | 50 Ltrs. | 400/- | 20,000/- |
| | | | **Total Rs :** | **5,05,712/-** |

२) मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per AC) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | M.S. Angle : Size – 35 x 35 x 5 mm | 3406 Kgs. | 63/- | 2,14,578/- |
| 2. | M.S. Flat : Size – 35 x 5 mm | 850 Kgs. | 62/- | 52,700/- |
| 3. | M.S. Square Jali : Size – 25 x 25 x 3 mm, Height 4” | 1992 kgs. | 60/- | 1,19,520/- |
| 4. | Colour : Asian Paint – Ivory | 50 Ltrs. | 250/- | 12,500/- |
| | | | **Total Rs :** | **3,99,298/-** |

३) मे. सुपर फॅब्रिकेशन अॅण्ड फर्निचर्स, साकुरी

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per AC) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | M.S. Angle : Size – 35 x 35 x 5 mm | 3406 Kgs. | 63/- | 2,14,578/- |
| 2. | M.S. Flat : Size – 35 x 5 mm | 850 Kgs. | 63/- | 53,550/- |
| 3. | M.S. Square Jali : Size – 25 x 25 x 3 mm, Height 4” | 1992 kgs. | 69/- | 1,37,448/- |
| 4. | Colour : Asian Paint – Ivory | 50 Ltrs. | 380/- | 19,000/- |
| | | | **Total Rs :** | **4,24,576/-** |

४) मे. व्दारका फॅब्रिकेटर्स, नाशिक

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per AC) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | M.S. Angle : Size – 35 x 35 x 5 mm | 3406 Kgs. | 99/- | 3,37,194/- |
| 2. | M.S. Flat : Size – 35 x 5 mm | 850 Kgs. | 99/- | 84,150/- |
| 3. | M.S. Square Jali : Size – 25 x 25 x 3 mm, Height 4” | 1992 kgs. | 139/- | 2,76,888/- |
| 4. | Colour : Asian Paint – Ivory | 50 Ltrs. | 759/- | 37,950/- |
| | | | **Total Rs :** | **7,36,182/-** |

उपरोक्त आर्थिक (Financial) बीडमधील तक्त्यानुसार मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांचे लोखंडी जाळी बनवून, नियोजित ठिकाणी बसविणेकामी रुपये ३,९९,२९८/- मात्रचे दर निम्नतम आहेत. सदर दरांबाबत मा. उप-समितीचे सभेमध्ये चर्चा/ वाटाघाटी होणे आवश्यक आहे.

तरी श्री साईआश्रम भक्तनिवास येथील इमारतीचे तळमजल्यावरील बाहेरील बाजुचे खिडक्यांना सुरक्षिततेकरीता लोखंडी जाळी बसविणेकामी प्राप्त व पात्र झालेल्या ई-निविदेपैकी निम्नतम दरधारक मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईआश्रम भक्तनिवास येथील इमारतीचे तळमजल्यावरील बाहेरील बाजुचे खिडक्यांना सुरक्षिततेकरीता लोखंडी जाळी बसविणेकामी मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**०७ श्री साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्ड तयार करणेकरीता स्टेनलेस स्टीलचे रॅक बनविणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदेबाबत.**

साईभक्तांचे सुविधेकरीता मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २२/१२/२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषयावरील निर्णय क्र. ९६६ अन्वये संस्थान परिसरामध्ये बनविणेत आलेली चप्पल स्टॅण्ड आकर्षक करणेत यावे. तसेच जा.नं. एसएसएस/वशी-काअ/२१४७/२०१६ दिनांक २ सप्टेंबर, २०१६ चे परिपत्रक दिनांक ३१ ऑगष्ट, १ व २ सप्टेंबर, २०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी मा. कार्यकारी अधिकारी व उप-कार्यकारी अधिकारी यांचे समवेत मंदिर परिसरात व संस्थानचे इतर विभागांमध्ये घेतलेल्या राऊंडमध्ये गेट नं. १,२ व ४ इत्यादी ठिकाणी मल्टी स्टोअर चप्पल स्टॅन्ड तयार करणेबाबत सूचविण्यात आले आहे.

वरील सूचनेनुसार मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८६९ अन्वये साईभक्तांच्या सुविधेसाठी गेट नं. १ जवळ व १६ गुंठे परिसरात प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे चप्पल स्टॅन्डची उभारणी करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयानुसार जागा निश्चित करुन, ७' X ५' साईजचे ४५ नग स्टेनलेस स्टीलचे रॅक खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडकरीता दिनांक १६/०५/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक ते कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती दिनांक २०/०५/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ई-निविदेत देण्यात आली होती.

उपरोक्त मुदतीत खालील पुरवठादार यांच्या तांत्रिक ईनिविदाच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये संस्थानकडे प्राप्त झालेल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| १. | मे. अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद | ३. | मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर |
| २. | मे. रत्ना इंजिनिअर्स, पुणे | ४. | मे. सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी |

वरील प्राप्त ४ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ३०/०५/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आलेले आहेत. त्यातील VAT, TIN, PAN, कंपनीचा वार्षिक उलाढाल, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी. रकमेचा डी.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील चारही तांत्रिक निविदा पात्र झाल्या होत्या. या पात्र झालेल्या निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक ०७/०६/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून, त्यात पुढीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहेत :

१) मे. अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per AC) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | S.S. 202 Angle : Size – 25 x 25 x 3 mm | 482 Kgs. | 198/- | 95,436/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2. | S.S. 202 Square Pipe : Size – 16 x 16 x 2 mm | 1699 Kgs. | 198/- | 3,36,402/- |
| 3. | S.S. 202 Round Bar : Size – 8 mm | 2000 kgs. | 198/- | 3,96,000/- |
| | | | **Total Rs :** | **8,27,838/-** |

२) मे. रत्ना इंजिनिअर्स, पुणे

| **Sr. No.** | **Description** | **Qty** | **Rate (Per AC) Rs.** | **Total Amount Rs.** |
|---|---|---|---|---|
| 1. | S.S. 202 Angle : Size – 25 x 25 x 3 mm | 482 Kgs. | 230/- | 1,10,860/- |
| 2. | S.S. 202 Square Pipe : Size – 16 x 16 x 2 mm | 1699 Kgs. | 230/- | 3,90,770/- |
| 3. | S.S. 202 Round Bar : Size – 8 mm | 2000 kgs. | 230/- | 4,60,000/- |
| | | | **Total Rs :** | **9,61,630/-** |

३) मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर

| **Sr. No.** | **Description** | **Qty** | **Rate (Per AC) Rs.** | **Total Amount Rs.** |
|---|---|---|---|---|
| 1. | S.S. 202 Angle : Size – 25 x 25 x 3 mm | 482 Kgs. | 185/- | 89,170/- |
| 2. | S.S. 202 Square Pipe : Size – 16 x 16 x 2 mm | 1699 Kgs. | 193/- | 3,27,907/- |
| 3. | S.S. 202 Round Bar : Size – 8 mm | 2000 kgs. | 178/- | 3,56,000/- |
| | | | **Total Rs :** | **7,73,077/-** |

४) मे. सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर्स, साकुरी

| **Sr. No.** | **Description** | **Qty** | **Rate (Per AC) Rs.** | **Total Amount Rs.** |
|---|---|---|---|---|
| 1. | S.S. 202 Angle : Size – 25 x 25 x 3 mm | 482 Kgs. | 205/- | 98,810/- |
| 2. | S.S. 202 Square Pipe : Size – 16 x 16 x 2 mm | 1699 Kgs. | 210/- | 3,56,790/- |
| 3. | S.S. 202 Round Bar : Size – 8 mm | 2000 kgs. | 165/- | 3,30,000/-- |
| | | | **Total Rs :** | **7,85,600/-** |

उपरोक्त आर्थिक (Financial) बीडमधील तक्त्यानुसार मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांचे आवश्यक साईजचे स्टेनलेस स्टीलचे चप्पल स्टॅण्ड बनविणेकामी रुपये ७,७३,०७७/- मात्रचे दर निम्नतम आहेत. सदर दरांबाबत मा. उप-समितीचे सभेमध्ये चर्चा/ वाटाघाटी होणे आवश्यक आहे.

तरी श्री साईभक्तांचे सुविधेकरीता गेट नं. १ चे आतील बाजुने तसेच १६ गुंठे परिसरात स्टेनलेस स्टीलचे चप्पल स्टॅण्ड तयार करुन बसविणेकामी प्राप्त व पात्र झालेल्या ई-निविदेपैकी निम्नतम दरधारक मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**श्री साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्ड तयार करणेकरीता स्टेनलेस स्टीलचे रॅक बनविणेकामी निम्नतम दरधारक मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेकरीता उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दरांवर चर्चा केली असता, त्यांनी रु.७,५०,०००/- अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्ड तयार करणेकरीता स्टेनलेस स्टीलचे रॅक बनविणेकामी मे. प्रेस व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांनी देऊ केलेले रु.७,५०,०००/- अंतीम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०८ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक सन २०१७-१८ या वर्षाकरीता आवश्यक असणारी औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुगणालयाकरिता वार्षिक सन २०१७ – २०१८ या वर्षाकरिता लागणारे औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदी करणेकामी प्रस्ताव दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अंदाजे रक्कम रु.५५,९१,९१,८३६.२२ चा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.०५ यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त प्रस्ताव सन २०१६- २०१७ या वर्षासाठी औषधे/ सर्जिकल खरेदीबाबतचा होता, परंतु सन २०१६- २०१७ चा कालावधी संपुष्टात आलेला असून या आर्थिक वर्षामध्ये औषधे/ सर्जिकल साहित्यांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता वेळोवेळी अतिरिक्त खरेदीस मान्यता देण्यात आलेली होती. त्यामुळे सन २०१६- २०१७ साठी वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य On Consignment Material खरेदी करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव रद्द करणेत यावा.

या प्रस्तावामध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य On Consignment Material खरेदीकामी नमूद केलेली कार्यपध्दती सन २०१७-२०१८ या वर्षाच्या खरेदीसाठी राबविण्यात यावी व फक्त उत्पादकांकडूनच औषधे खरेदी करण्यात यावी, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

सदरहू औषध खरेदीची प्रक्रिया राबविणेसाठी वेळोवेळी, आवश्यकतेनुसार रुग्णालय उपसमितीने संस्थान रुग्णालयांसाठी आवश्यक असलेली वार्षिक औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी करतेवेळी गुणवत्ता व दर यांचा विचार करुन, रुग्णांच्या सोयीचे दृष्टीने नामांकित कंपनीची औषधे खरेदी करावी, असे ठरले.

वरील ठरावास अनुसरुन दि.१३/०३/२०१७ रोजीचे मंजूर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२४/०३/२०१७ ते १५/०४/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या, त्यानुसार २५/०३/२०१७ रोजीचे ई – मेलव्दारे ३७३ कंपन्यांना व २६८ डिस्ट्रीब्युटरला यांना ई – निविदा भरणेकामी अवगत करण्यात आले होते. तसेच दि. २४/०३/२०१७ रोजीचे परिपत्रकान्वये श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील डॉक्टर / तंत्रज्ञ यांना आपणाकडे येणारे कंपनीचे प्रतिनिधीयांना ई – निविदा भरणेकामी सांगण्यात यावे असे कळविले होते. त्यानुसार प्रि – बिड मिटींग दि. २९/०३/२०१७ रोजी ठेवण्यात आली होती. प्रि – बिड मिटींगमध्ये पुरवठाधारकांनी उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन करुन दि. ०४/०४/२०१७ रोजी अपलोड करण्यात आले होते. परंतु, ब-याच निविदाधारकांनी दूरध्वनीवरुन सदरहू ई-निविदेस मुदतवाढ मिळणेकामी विनंती केल्यामुळे तसेच काही निविदाधारकांनी ई-मेल पत्राव्दारे दि.१४ व १५/०४/२०१७ रोजी सरकारी सुट्टी असल्यामुळे निविदा भरण्यास अडचणी येत असल्यामुळे कमीत - कमी १ आठवडयाची मुदतवाढ मिळावी असे कळविले होते. त्यानुसार, दि. १५/०४/२०१७ पर्यंत १६ पार्टकरिता ८९ ऑनलाईन निविदा प्राप्त झाल्या होत्या. खरेदीकामी जास्तीत – जास्त प्रतिसाद मिळणेकामी पहिल्यांदा दि. २४/०४/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार १२६ ऑनलाईन ई – निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार दि. २४/०४/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दुस-यांदा दि. ०१/०५/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यास अनुसरुन १४८ ऑनलाईन ई – निविदा प्राप्त झाल्या आहेत. तसेच तांत्रिक सिलबंद निविदा (Hard Copy) दि.०५/०५/२०१७ पर्यंत स्वीकारणेस मुदतवाढ देण्यात आली होती.

दि. ११/०५/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे मा. विश्वस्त मंडळातील सदस्य,मा. कार्यकारी अधिकारी सो., मा. उपकार्यकारी अधिकारी सो., मा. मुख्यलेखाधिकारी सो., मा. प्रशासकीय अधिकारी सो. तसेच उपस्थित पुरवठाधारकांचे समक्ष प्राप्त झालेल्या १४८ तांत्रिक ऑनलाईन ई – निविदा उघण्यात आलेल्या आहेत.

प्राप्त झालेल्या तांत्रिक ऑनलाईन ई – निविदा वित्त विभागाचे व्यवस्थापक व त्यांचे कर्मचारी, यांचेकडून तांत्रिक बाबींचे कागदपत्र तपासणी करुन घेण्यात्त आले आहेत. तदनंतर संस्थान विभागाचे अंतर्गत लेखापरिक्षक कर्मचारी यांचेकडून सदर तसेच तांत्रिक बाबीं तपासून घेण्यात्त आल्या होत्या. तसेच संस्थानचे वरिष्ठ अधिकारी यांनी देखील तांत्रिक बाबींचे कागदपत्रऔषध भांडार विभागात येऊन तपासणी केली आहे.

**वरीलप्रमाणे तांत्रिक बाबींची तपासणी केलेल्या बाबींचा तसेच १६ पार्टकरिता प्राप्त झालेल्या १४८ ऑनलाईन ई – निविदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| Sr. No. | Name of Item | Teder Received | Tender Accept | Tender Reject |
|---|---|---|---|---|
| **Part A** | | | | |
| 1 | Tablets | 10 | 6 | 4 |
| 2 | Injection | 19 | 13 | 6 |
| 3 | Lab. Chemicals | 13 | 8 | 5 |
| 4 | CDL | 18 | 14 | 4 |
| 5 | X-ray, CT, MRI | 04 | 04 | 0 |
| 6 | Miscellaneous | 07 | 04 | 3 |
| 7 | Ayurvedic & Homeopathic Medicines | 07 | 07 | 0 |
| 8 | Catgut & Suture Material | 06 | 05 | 1 |
| 9 | Liquid Orals (Syrup) | 05 | 03 | 2 |
| 10 | Ointment | 04 | 03 | 1 |
| 11 | Eye, Ear & Nasal Drops | 05 | 01 | 4 |
| 12 | OTM | 23 | 18 | 5 |
| 13 | Dialysis Unit | 04 | 2 | 2 |
| 14 | Dental | 1 | 0 | 1 |
| 15 | Neuro | 1 | 0 | 1 |
| **Part B** | | | | |
| 16 | On Consignment | 21 | 12 | 9 |
| **Total** | | **148** | **100** | **48** |

त्यानुसार पात्र ऑनलाईन १०० कमर्शिअल ई – निविदा दि. ०७/०६/२०१७ रोजी खरेदी समिती व मा. विश्वस्त मंडळातील सदस्य, मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.उपकार्यकारी अधिकारी सो., मा.मुख्यलेखाधिकारी सो., मा. प्रशासकीय अधिकारी सो., तसेच उपस्थित पुरवठाधारकांचे समक्ष उघण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्राप्त निविदाधारकांचा दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यामधील एकूण १६ पार्टमधील ३०३६ आयटम पैकी ५२९ आयटमकरिता ०३ व ०३ पेक्षा जास्त दर प्राप्त झाले आहेत. तसेच ४१४ आयटमकरिता ०२ निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहेत. व ७२० आयटमकरिता ०१ निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहे. उर्वरित १३७३ आयटमकरिता कुठल्याच निविदाधारकांचे दर प्राप्त झाले नाहीत.

**त्या आयटमचा तपशिल खालीलप्रमाणे :-**

| Part "A" | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Medicine Details** | **Total Item** | **Nil Tender** | **Total Amt. in Rs.** | **1 Tender** | **Total Amt. in Rs.** | **2 Tender** | **Total Amt. in Rs.** | **3 or More tender** | **Total Amt. in Rs.** | **Sanction Amt. in Rs.** |
| 1 | Tablets | 291 | 189 | 11948192.85 | 73 | 8146152.39 | 23 | 3273201.27 | 6 | 3417124.31 | 26784670.82 |
| 2 | Injection | 246 | 104 | 16479730.16 | 74 | 38236623.31 | 46 | 40509426.55 | 22 | 23462827.02 | 118688607.04 |
| 3 | Liquid Orals (Syrup) | 61 | 54 | 5270705.32 | 7 | 1179429.10 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 6450134.42 |
| 4 | Ointment | 51 | 42 | 837157.83 | 9 | 392331.98 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 1229489.81 |
| 5 | Eye, Ear & Nasal Drops | 42 | 40 | 7340245.09 | 2 | 3557385.56 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 10897630.65 |
| 6 | Lab. Chemicals | 381 | 217 | 23578790.07 | 64 | 17606165.32 | 21 | 2131380.95 | 79 | 14707036.81 | 58023373.15 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | O.T.& Other Surgical Material | 598 | 211 | 17841886.38 | 172 | 20762022.61 | 113 | 28904341.28 | 102 | 35359920.22 | 102868170.50 |
| 8 | CDL | 400 | 108 | 26662314.15 | 123 | 25896784.98 | 81 | 30015984.75 | 88 | 45238967.85 | 127814051.73 |
| 9 | Neuro O.T. Surgical Material | 36 | 36 | 2755856.06 | | | | | | | 2755856.06 |
| 10 | Dialysis Unit | 10 | 3 | 53886.53 | 1 | 235462.50 | 4 | 506535.18 | 2 | 726775.35 | 1522659.55 |
| 11 | Miscellaneous | 128 | 114 | 12210054.46 | 14 | 3043693.04 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 15253747.50 |
| 12 | Dental Material | 43 | 43 | 647164.77 | | | | | | | 647164.77 |
| 13 | X-ray, CT, MRI | 14 | 3 | 964779.60 | 7 | 11015652.56 | 4 | 17892954.68 | 0 | 0.00 | 29873386.84 |
| 14 | Catgut & Suture Material | 213 | 3 | 333325.88 | 25 | 7412219.28 | 41 | 45336900.73 | 144 | 38320126.74 | 91402572.63 |
| 15 | Ayurvedic & Homeopathic Medicines | 232 | 34 | 1368633.40 | 99 | 1333088.45 | 58 | 1219481.67 | 41 | 793840.04 | 4715043.56 |
| | | 10 | 0 | 0.00 | 10 | 63236.25 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 63236.25 |
| | **Total** | **2756** | **1201** | **128292722.54** | **680** | **138880247.34** | **391** | **169790207.06** | **484** | **162026618.34** | **598989795.28** |
| | **Part "B"** | | | | | | | | | | |
| 1 | On Consignment | 280 | 172 | | 40 | | 23 | | 45 | | 100000000.00 |
| | | | | | | | | | | **Total Amt. Part "A" + "B" -** | **698989795.28** |
| | | | | | | | | | | **Less 20%** | **559191836.22** |

१) Part- B– मधील सर्व प्रकारच्या Guide wire (Coronary) याची किंमत व त्याचा दैनंदिन खप पाहता त्या Part– A मधील खरेदी प्रक्रियेनुसार खरेदी केल्यास दैनंदिन Cardiac O .T. मध्ये शस्त्रक्रिया करतांना रुग्णांना लवकरात– लवकर उपलब्ध करुन देण्यास मदत होईल. त्याचा मागील वर्षातील खप बघता त्याची नगांची संख्याठरवून पुरवठा आदेश देण्यात येऊ शकतो.

२) O. T. & Other Material मध्ये M/s. Ascent Meditech Ltd., Mumbai यांचे कमर्शिअल बाबींच्या तुलनात्मक तक्त्यामध्ये त्यांचे नावाऐवजी M/s. BSN Medical Pvt. Ltd., यांचे नावाने भरल्याचे दिसते. परंतु, सदरबाबत M/s. Ascent Meditech Ltd., Mumbai यांना विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नजर चुकीने असे झाले असून दिलेले दर हे M/s. Ascent Meditech Ltd., Mumbai यांचेच आहे. तेंव्हा तुलनात्मक तक्यात ते घेण्यात आले आहेत.

३) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस– २०१४ / प्र.क्र. ८२ भाग – III उद्योग – ४, दि. ०१/१२/२०१६ अन्वये प्रकरण ४ मधील मुद्या क्र. ४.४.३.१ –निविदा कालावधीस मुदतवाढ :-

ब) दोन निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-) २० % ते (+) १० % तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. या किंमत श्रेणीमध्ये (Price Band) किंमती न आल्यास फेरनिविदा काढावी. ब-याच ठिकाणी वास्तविक किंमत हि अगोदर ठरलेल्या किंमतीच्या फारच कमी आहे. जर सदर सर्व औषधे निम्नत्तम दराने खरेदी केल्यास संस्थानला कुठलेही आर्थिक नुकसान होणार नाही त्यामुळे ज्या ठिकणी वास्तविक किंमत हि अगोदर ठरलेल्या किंमतीच्या कमी आहे अशा सर्व औषधे/ सर्जिकल साहित्य निम्नत्तम दराने खरेदी करता येईल असे नम्र मत आहे.

त्यानुसार पार्ट A व B मिळून ४१४ आयटमकरिता रुग्णालयाची गरज पाहता वापरणा-या सबंधित डॉक्टरा समक्ष निम्नत्तम दरासाठी निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील निर्णय घेता येईल.

**<u>विभागाचा अभिप्राय-</u>** वरीलप्रमाणे दोन किंवा त्यापेक्षा जास्त प्राप्त निविदाधारकांमधील प्राप्त निम्नत्तम दर निविदाधारकांशी चर्चा वाटाघाटी केल्यास बाजारभावापेक्षा कमी दराने मटेरियल प्राप्त होऊन संस्थानचा जास्तीत– जास्त आर्थिक फायदा होऊन खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता निर्माण होईल.

तरी प्राप्त निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करतानी सबंधित वापरणारे तंत्रज्ञ /डॉक्टर यांना समक्ष बोलावून पुढील निर्णय घेण्यासाठी सादर करण्यास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक सन २०१७-१८ या वर्षाकरीता आवश्यक असणारी औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदी करणेसाठी, रुग्णांच्या सोयीचे दृष्टीने जेनेरीक औषधे खरेदी न करता फक्त नामांकित कंपन्यांची ब्रँण्डेड औषधे खरेदी करण्यात यावी, तसेच यासाठी पुढील उपसमिती सभेसमोर कंपनीनिहाय निम्नतम दरांच्या आयटम्सची यादी तयार करुन संबंधीतांनाचर्चेसाठी बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**परंतु सदरहू इतिवृत्तास पुष्टी देत असताना, जनरीक औषधांना शासन प्रोत्साहीत करत असल्यामुळे संस्थानसाठीही जनरीक औषधे खरेदी करायला हवीत, त्यामध्ये ज्या जनरीक औषधांचा पुर्वानुभव खराब आहेत, अशी औषधे वगळणेत यावीत असे समितीचे मत झाले. याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत स्वतंत्र औषध दुकान चालू करणेसाठी कार्यवाही सुरु करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०९ **संस्थानचे दोन्ही रुगणालयांकरीता नविन संगणकीय प्रणाली व त्यास सुसंगत लागणारे हार्डवेअर खरेदी करणेची प्रक्रीया व संपुर्ण प्रकल्प शासन नियुक्त, अधिकृत कन्सल्टंन्सी कंपनीमार्फत होणेकामी, निम्नत्तम दरधारकास मा.उपसमितीचे सभेसमोर आमंत्रित करुन त्यांचेशी दराबाबत वाटाघाटी करुन निश्चित झालेल्या दराप्रमाणे त्यांना कार्यादेश देणेबाबत.**

महाराष्ट्र शासनाचा दि.01/07/2014 रोजीचा GAD- मातंस 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH) Mantralaya, Mumbai- 400032 अध्यादेशानुसार महाराष्ट्र शासनाने दि.01/07/2014 ते दि. 30/06/2017 या कालावधीसाठी खालील कंन्सल्टंन्सी एजन्सींची नियुक्ती करण्यात आलेली आहे–

1) M/s Accenture, 2) M/s Deloitte
3) M/s Ernst & Young, 4) M/s KPMG,
5) M/s PwC

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नविन संगणकीय प्रणाली व त्यास सुसंगत लागणारे हार्डवेअर खरेदी करणेची प्रक्रीया व संपुर्ण प्रकल्प शासननियुक्त अधिकृत कन्सल्टंन्सी कंपनीमार्फत होणेकामी, उपरोक्त नमुद कंपन्यांना सिलबंद पाकिटातील दर स्विकारणेकामी व त्यांचे सादरीकरण पाहणेकामी त्यांना दि 15/06/2017 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर आमंत्रित करण्यात आलेले होते.

त्यानुसार दि. 15/06/2017 रोजीचे सभेमध्ये M/s KPMG, M/s PwC व M/s Deloitte या शासन नियुक्त 3 कंन्सल्टंन्सी एजन्सींनी उपस्थिती दर्शविलेली असून, त्यांनी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर त्यांचे सादरीकरण दाखविलेले आहे.

सदर सभेत सादरीकरण दरम्यान मा.अध्यक्ष महोदय यांनी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधींना हॉस्पिटलकरीता TELEMEDICINE यासुविधेची सध्या आवश्यकता नसलेबाबत निर्देशीत केलेले आहे. तसेच, हॉस्पिटलचे मा.वैद्यकीय संचालक यांनी हॉस्पिटलच्या सॉफ्टवेअर करीता सध्या आवश्यक असणारे Modules बाबतकंपनीचे प्रतिनिधींना माहिती दिलेली आहे.

उपरोक्त उपस्थित असलेल्या 3 कंपन्यांचे प्राप्त झालेले सिलबंद दरपत्रके दि.15/06/2017 रोजीचे सभेमध्ये उघडण्यात आलेले असून, त्याचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात आलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.नं | कंपनीचे नावे | प्राप्त झालेले सिलबंद दरपत्रका बाबतचा तपशिल | समितीचे सभेसमोर उघडण्यात आलेल्या सिलबंद दरपत्रकातील दर (सर्वकर व OPE सहीत) |
|---|---|---|---|
| **1.** | M/s Deloitte | आ. क्र. - 1359<br>दिनांक – 15/06/2017 | 1,78,99,750/- |

| | | | |
|---|---|---|---|
| **2.** | M/s KPMG | आ. क्र. - 1360<br>दिनांक - 15/06/2017 | 63,42,500/- |
| 3. | M/s PwC | आ. क्र. - 1361<br>दिनांक - 15/06/2017 | **49,86,975/-** |

उपरोक्त नमुद तक्त्यातील 3 कंपन्यांचे दरांपैकी M/s PwC या कंपनीचे दरनिम्नत्तम असून त्यांचे दर रक्कम रु. 49,86,975**/-** **(**सर्वकर व OPE सहीत) मात्र इतके प्राप्त झालेलेआहे.

**मागणी–** दि.15/06/2017 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये पारित झालेल्या निर्णयाप्रमाणे, निम्नत्तमदरधारक M/s PwC या कंन्सल्टंन्सी कंपनीस त्यांनी सादर केलेल्या दरांबाबत वाटाघाटी करणेकामी त्यांना मा. उपसमितीचे सभेसमोर बोलविण्यात येऊन, वाटाघाटी नंतर निश्चित झालेले दरानुसार सदर कंन्सल्टंन्सी कंपनीची नियुक्ती करणेस तसेच, त्यांचे कडून दोन्ही हॉस्पिटलकरीता HMIS, PACS यासंगणकीय प्रणाली व त्यास अनुषंगीक लागणारे संगणके, संगणकीय साहित्यांची खरेदी व सदरची सर्व यंत्रणा कार्यान्वित करून घेणेकामी**,** त्यांना कंन्सल्टंन्सी कामाबाबतचा कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- तरी, दि.15/06/2017 रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये पारित झालेल्या निर्णयाप्रमाणे, निम्नत्तमदरधारक M/s PwC या कंन्सल्टंन्सी कंपनीस त्यांनी सादर केलेल्या दरांबाबत वाटाघाटी करणेकामी त्यांना मा. उपसमितीचे सभेसमोर बोलविण्यात येऊन, वाटाघाटी नंतर निश्चित झालेले दरानुसार सदर कंन्सल्टंन्सी कंपनीची नियुक्ती करणेस तसेच, त्यांचे कडून दोन्ही हॉस्पिटलकरीता HMIS, PACS या संगणकीय प्रणाली व त्यास अनुषंगीक लागणारे संगणके, संगणकीय साहित्यांची खरेदी व सदरची सर्व यंत्रणा कार्यान्वित करून घेणेकामी, त्यांना कंन्सल्टंन्सी कामाबाबतचा कार्यादेश देणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास, आपली मान्यता असावी.

**संस्थानचे दोन्ही रुगणालयांकरीता नविन संगणकीय प्रणाली व त्यास सुसंगत लागणारे हार्डवेअर खरेदी करणेची प्रक्रीया व संपुर्ण प्रकल्प शासन नियुक्त अधिकृत कन्सल्टंन्सी कंपनीमार्फत होणेकामी निम्नतम दरधारक M/s PwC या कंन्सल्टंन्सी कंपनीचे प्रतिनिधी उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमिती सभेने त्यांचेशी दरकमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करण्यास असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दोन्ही रुगणालयांकरीता नविन संगणकीय प्रणाली व त्यास सुसंगत लागणारे हार्डवेअर खरेदी करणेची प्रक्रीया व संपुर्ण प्रकल्प शासन नियुक्त अधिकृत कन्सल्टंन्सी कंपनीमार्फत होणेकामी प्राप्त झालेले दर जादा असल्याने याकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

१० **साईभक्तांना मार्गदशनाकरीता संस्थानचे संकेतस्थळ** www.sai.org.in **हया वेबसाईटचे नुतनीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी निम्नतम निविदाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी-सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-**

०१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६५

०२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४५

**प्रास्ताविक:-** साईभक्तांना मार्गदर्शनाकरीता संस्थानमार्फत www.sai.org.in हि वेबसाईट विकसीत करुन कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. अधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन वेबसाईटचे अद्यायावतीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेस मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन,निर्णय क्र.८६५ अन्वये, वेबसाईटचे नुतनीकरण तसेच मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.१४.०२.२०१७ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, दि.२३.०२.२०१७ ते दि.२५.०३.२०१७ या कालावधीमध्ये सदरकामी ई-निविदा प्रसिद्ध करणेत आलेली होती. सदर कालावधीमध्ये एकुण १६ निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त

निविदांच्या ऑनलाईन तांत्रिक निविदा व बंद लिफाफे दि०३.०४.२०१७ रोजी मा. खरेदी समिती समोर उघडणेत आलेल्या आहेत. निविदेमध्ये नमुद केलेप्रमाणे १६ निविदाधारकांपैकी १२ निविदाधारकांनी याबाबतचे तांत्रिक सादरीकरण मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर केलेले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४५ अन्वये, प्राप्त झालेल्या ई-निविदांपैकी तांत्रिक बाबींमध्ये पात्र व सादरीकरणामध्ये किमान ७० गुण प्राप्त केलेल्या निविदाधाराकांच्या वाणिज्यीक ई-निविदा उघडण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त निर्देशान्वये, प्राप्त झालेल्या निविदाधारकांपैकी एकूण १२ पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यीक निविदा मा.खरेदी समितीचे दि.१७.०६.२०१७ रोजी उघडणेत आलेल्या आहेत. उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Company Name | Amount |
|---|---|---|
| 01 | Center For Research And Industrial Staff Performance (CRISP) | 63,85,477.00 |
| 02 | Cronj IT Tec hnoligiesPvt Ltd, Bangalore | 1,10,00,000.00 |
| 03 | Solaram Engg. Project Pvt Ltd, New Delhi | 22,80,000.00 |
| 04 | Vidya Online Services Pvt Ltd , Pune | 1,30,00,000.00 |
| **05** | **Web Werks, Mumbai** | **17,16,000.00** |
| 06 | Pinnacle Teleservices Pvt. Ltd, Nagpur | 1,49,00,000.00 |
| 07 | Cyfuture India Pvt Ltd, Noida | 72,05,235.00 |
| 08 | Bharati Web Private Limited, Nagpur | 5,01,11,111.00 |
| 09 | YTR Technologise, Vishakhapatnam | 39,00,000.00 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.०५ M/S Web Werks, Mumbai यांचे दर हे रक्कम रुपये १७,१६,०००/- मात्र निम्नत्तम आहेत. सबब, साईभक्तांना मार्गदर्शनाकरीता संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in ह्या वेबसाईटचे नुतनीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी निम्नतम दरधारक असलेले निविदाधारक M/S Web Werks, Mumbaiयांचे दर मान्य करणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.उपसमितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:-प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे साईभक्तांना मार्गदर्शनाकरीता संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in ह्या वेबसाईटचेनुतनीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी उघडणेत आलेल्या वाणिज्यीक निविदाधारकांपैकी निम्नतम दरधारक असलेले निविदाधारक M/S Web Werks, Mumbai यांचे दर रक्कम रुपये १७,१६,०००/- मात्र मान्य करणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.उपसमितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी,हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- उपरोक्त नमुद केलेप्रमाणे साईभक्तांना मार्गदर्शनाकरीता संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in ह्या वेबसाईटचे नुतनीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी उघडणेत आलेल्या वाणिज्यीक निविदाधारकांपैकी निम्नतम दरधारक असलेले निविदाधारक M/S Web Werks, Mumbai यांचे दर रक्कम रुपये १७,१६,०००/- मात्र मान्य करणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.उपसमितीचे सभेसमोर सविनय सादर.

**साईभक्तांना मार्गदशनाकरीता संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in हया वेबसाईटचे नुतनीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी निम्नतम दरधारक M/S Web Werks, Mumbai हे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी रु. १७,००,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना मार्गदशनाकरीता संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in हया वेबसाईटचे नुतनीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी M/S Web Werks, Mumbai यांचे रु. १७,००,०००/- अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**११ व्दारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास व साठवण तलाव परिसरात ओपन जिम (खुली व्यायामशाळा) सुरु करणेबाबतचा तुलनात्मक तक्ता.**

दि.28/04/2017 रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.337 अन्वये, द्वारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास व साठवण तलाव परिसरात ओपन जिम (खुली व्यायामशाळा) तयार करणेकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन ई निवीदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.13,08,375/- मात्र खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

मागणी- द्वारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास व साठवण तलाव परिसरात ओपन जिम (खुली व्यायामशाळा) तयार करणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन तसेच ई निवीदा शासनाचे वेबसाईटवर प्रसिध्द करुन दि.05/06/2017 अखेर एकुण 14 ई निवीदा ऑनलाईन दाखल झालेल्या होत्या. ऑनलाईन स्कॅन केलेले कागदपत्रांचे तांत्रीक लिफाफे सादर करण्याची मुदत दि.10/06/2017 पर्यंत संपलेली असुन एकुण 13 तांत्रीक लिफाफे प्राप्त झालेली होती. प्राप्त झालेल्या ई निवीदांचे तांत्रिक लिफाफे दि.13/06/2017 रोजीच्या खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले असुन श्री साई समर्थ कृषी सेवा केंद्र यांचा तांत्रीक लिफाफा इकडील कार्यालयास प्राप्त न झाल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे

तसेच पात्र तांत्रीक ई निवीदाधारकांचे कमर्शियल बिड दि.17/06/2017 रोजीच्या मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेली असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अं.नं. | टेंडरधारकाचे नाव | एकुण दर |
|---|---|---|
| 01 | Guineas Sports | रु. 8,64,000/- |
| 02 | Uday creations Pvt.Ltd. | रु. 8,46,450/- |
| 03 | D.S. Engineering Body Master Pvt.Ltd. | रु. 8,49,669/- |
| 04 | M/S Khalsa exports Pvt.Ltd. | रु. 8,43,630/- |
| 05 | Sansun Industries Pvt.Ltd. | रु. 16,74,165/- |
| 06 | Divya Fibre products & out Door gym equipment | रु. 8,61,300/- |
| 07 | Arihant Industrial co.ltd | रु. 22,63,211/- |
| 08 | Meera Steel Fabrication & Fibers | रु. 8,95,047/- |
| 09 | Royal play equipment | रु. 9,40,395/- |
| **10** | **Kranti Industries** | **रु. 6,99,999/-** |
| 11 | Infinity Industries | रु. 8,78,100/- |
| 12 | Dhanraj fibro- tech | रु. 11,82,300/- |
| 13 | Shripad garden play equipments | रु. 8,50,722/- |

विभागाचा अभिप्राय- द्वारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास व साठवण तलाव परिसरात ओपन जिम (खुली व्यायामशाळा) तयार करणेकामी अ.नं. 10 क्रांती इंडस्ट्रीज, नाशिक यांचे एकुण दर रु.6,99,999/- (सहा लाख नव्यान्नव हजार नऊशे नव्यान्नव) मात्र सर्वात न्युनत्तम प्राप्त दरझालेला असल्याने त्यांना कार्यादेश देणेस व त्यांचेकडुन द्वारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास व साठवण तलाव परिसरात ओपन जिम (खुली व्यायामशाळा) तयार करणेकामी साहीत्य खरेदी करुन बसविणेस मान्यता मिळावी ही विनंती.

**व्दारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास व साठवण तलाव परिसरात ओपन जिम (खुली व्यायामशाळा) सुरु करणेकामी निम्नतम दरधारक क्रांती इंडस्ट्रीज, नाशिक आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेकरीता उपस्थित होते, उपसमिती सभेने त्यांचेबरोबर दरांवर चर्चा केली असता, त्यांनी रु.६,८०,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती इमारत समोरील बागेत, साई आश्रम भक्तनिवास व साठवण तलाव परिसरात ओपन जिम (खुली व्यायामशाळा) सुरु करणेकामी क्रांती इंडस्ट्रीज, नाशिक यांचे रु.६,८०,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**१२ ISO ऑडीटर श्री.केशव मुर्ती यांचे सुचनेनुसार श्री साई आश्रम भक्तनिवास येथे फलक तयार करणेकामी उघडण्यात आलेल्या वाणिज्यीक दरपत्रकांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत नि.क्र.२०७ खालीलप्रमाणे समंत करणेत आला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, ISO ऑडीटर श्री केशव मुर्ती यांचे सूचनेनुसार श्री साई आश्रम भक्तनिवास येथे प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे फलक विहीत पध्दतीने तयार करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.४४,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:-** ISO ऑडीटर श्री. केशव मुर्ती व त्यांचे प्रतिनिधी यांनी दि.१९/०१/२०१७ रोजी ISO मानांकन नूतनीकरण कामी श्री साई आश्रम भक्तनिवास व परिसराची पाहणी केली असता, आपत्कालीन मार्गाकडे जाण्यासाठी फलक लावावा तसेच परिसरात वाहनांचे वेग मर्यादेबाबत बोर्ड लावण्यात यावे, अशा सूचना करण्यात आल्या होत्या.

**प्रस्ताव:-** सदरहुकामी येणारे रु.४४,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी व सदरचे कामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून बोर्ड तयार करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र. २०७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.त्यानुसार इकडील जा.क्र.५०६/२०१७ दि.२७/०४/२०१७ रोजीचे पत्रान्वये फोमशिट बोर्ड व **Speed Limit** बोर्ड तयार करणेचे सिलबंद कोटेशन मागविण्यात आले होते. सदरहूकामी ०३ पूरवठादार यांनी कोटेशन सादर केलेले आहे.

सदरहू प्राप्त झालेले दरपत्रक मा. खरेदी समितीचे दि. १७/०६/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आले

| कामाचा तपशिल | परिमाण एकक | पुरवठादारांचे नांव | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सोमवंशी एम.जी., राहाता | | साई आर्टस्, कोपरगांव | | स्मिता इंडस्ट्रीज नांदेड | |
| | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| Way to Emergency Exit आशयाचे फोम शिट व व्हिनायल प्रिंटींग बोर्ड साईज- २'X १' -६"X ५० नग | १५० चौ.फुट | ६२/- | ९३००/- | ७०/- | १०,५००/- | २३३.३३ | ३५,०००/- |
| Speed Limit बोर्ड 4mm जाडीचे ACP शिटवर ३ M रेडिअम व M.S Angle चे स्ट्रक्चरमध्ये बोर्ड तयार करणे (१० फुट उंचीचे) | १० नग | ४४००/- | ४४,०००/- | ४०००/- | ४०,०००/- | ५५००/- | ५५,०००/- |
| **एकूण रक्कम** | | | ५३,३००/- | | ५०,५००/- | | ९०,०००/- |
| **शेरा** | | | | | **निम्नतम** | | |

पूरवठादार यांनी देऊ केलेल्या दरांचे वर नमूद तुलनात्मक तपशिलानुसार पूरवठादार साई आर्टस् , कोपरगांव यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे साई आर्टस्, कोपरगांव यांचे निम्नतम दर स्विकारुन त्यांचेकडून फोमशिट बोर्ड व रेडीअम मध्ये Speed Limit बोर्ड तयार करणेकामी येणा-या रु.५०,५००/- मात्रचे खर्चास व याकामी त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ISO ऑडीटर श्री.केशव मुर्ती यांचे सुचनेनुसार साई आश्रम भक्तनिवास येथे फलक तयार करणेकामी साई आर्टस्, कोपरगांव यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

१३ **श्री साई आश्रम भक्तनिवास येथे मेन्टेनन्सकामी फ्लॅश डोअर्स व हार्डवेअर मटेरीअल खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यिक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या. खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तमालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत नि.क्र.४६ खालीलप्रमाणे समंत करणेत आला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईआश्रम भक्तनिवास इमारतीतील काही रुमचे बाथरुम/ टॉयलेटला बसविणेचे काम विभागांतर्गत करुन घेणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:-** श्री साई आश्रम भक्तनिवास येथे एकूण १२ इमारती असून प्रत्येक इमारतीमध्ये १२८ खोल्या आहे. अशा एकूण १५३६ रुम्स आहे. प्रत्येक खोल्यांमध्ये स्वतंत्र टॉयलेट व बाथरुमची व्यवस्था करण्यात आली असून दैनंदिन वापरामुळे काही रुमचे टॉयलेट/बाथरुमचे दरवाजे खराब झालेले आहेत. साई आश्रम विभागाचे दि.२१/१२/२०१६ रोजीचे पत्रानुसार टॉयलेट बाथरुमचे एकूण १२३ दरवाजे खराब झाले आहेत असे कळविले होते.

**प्रस्ताव:-**उपरोक्त विषयांकीतकामी खालील तपशिलाप्रमाणे मटेरीअलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | मटेरियल तपशिल | परिमाण / एकक |
|---|---|---|
| ०१ | वॉटरप्रुफ फ्लश डोअर ( जाडी – ३० mm) (पाईनवूड)<br>साईज – २८''X८०'' (कं.- अॅकर, सेंच्युरी, ग्रीन, डयुरीयन) | १२५ नग |
| ०२ | बिजागिरी (एस.एस.) – ४'' | ३७० नग |
| ०३ | ताडी पट्टी ( एस.एस) | १२५ नग |
| ०४ | हॅन्डल – ४'' (एस.एस.) | १२५ नग |

उपरोक्त तपशिलानुसार सदरहू दरवाजे व हार्डवेअर मटेरियल खरेदी करणेकामी रक्कम रु.२,८९,३००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी व सदरचे साहित्य विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र. ४६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात होती. पुरवठादार यांना ई-निविदा अपलोड करण्याकरीता अंतिम मूदत दि.०२/०६/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करणेची अंतिम मूदतीत ०३ ई-निविदा अपलोड झालेल्या आहेत.

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक निविदा मा. खरेदी समितीचे दि.०७/०६/२०१७ सभेपुढे उघडणेत आल्या असून पुरवठादार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार खालील तीनही पुरवठादार पात्र झाले आहेत.

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव/ गांव |
|---|---|
| ०१ | युनियन ट्रेडींग, नाशिक |
| ०२ | प्रसाद प्लायवूड अॅण्ड हार्डवेअर, राहाता |
| ०३ | सुमंगल प्लायवूड, कोपरगांव |

उपरोक्त ०३ पात्रताधारक पुरवठादार यांनी सादर केलेला ई- निविदांचा लिफाफा क्र. ०२ (वाणिज्यीक निविदा) दि.१७/०६/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | युनियन ट्रेडींग, नाशिक | ३,९३,०८५/- | -- |
| ०२ | प्रसाद प्लायवूड अॅण्ड हार्डवेअर, राहाता | २,७८,२००/- | -- |
| ०३ | सुमंगल प्लायवूड, कोपरगांव | **२,७३,३०३/-** | **निम्नतम** |

उपरोक्त तपशिलानुसार ०३ निविदाधारकांपैकी पुरवठादार सुमंगल प्लायवूड, कोपरगांव यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे पुरवठादार यांना पुरवठा आदेश देणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास येथे मेन्टेनन्सकामी फ्लॅश डोअर्स व हार्डवेअर मटेरीअल खरेदी करणेकामी सुमंगल प्लायवूड, कोपरगांव यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१४ **मंदिर परिसरातील गेट नं.१ व २ चे ठिकाणी साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्ड तयार करणेकामी उघडणेत आलेल्या वाणिज्यीक प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

अधिनियमाचे कलम – १७ मधील पोटकलम (१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.८६९ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे सुविधेसाठी गेट नं.१ जवळ व १६ गुंठे परिसरात समिति सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे, यांचे मार्गदर्शनाखाली जागेची निश्चीती करण्यात येऊन प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे चप्पल स्टॅण्डची उभारणी करणेत यावी असे ठरले तसेच याकामी सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावनाः-** दि.१० व ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी मंदिर परिसरात घेतलेल्या राऊंडमध्ये गेट नं.१ येथील चप्पल स्टॅण्ड अपुरे पडत असल्याकारणाने सदरचे चप्पल स्टॅण्ड गेट नं.१ शेजारी कम्पाऊंडचे आतील बाजूने करणेबाबत तसेच दोन्ही चप्पल स्टॅण्ड सुशोभित करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

**प्रस्तावः-** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार मंदिर परिसराचे गेट नं. १ जवळ आतील बाजुने व गेट नं. २ जवळ १६ आर जागेत टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणेकामी तसेच साईड बंदिस्त करणेकामी अॅरेकॉन पॅनलचे शिट बसविणे याकामासाठी अंदाजे रक्कम रु. १०,१९,६२३/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली आहे. गेट नं.२ जवळील मोकळया जागेत टेन्साईल फॅब्रीकचे शेड उभारणेकामी ठेकेदार यांना कार्यादेश देणेत आलेला असून, ठेकेदार यांनी कामास सुरुवात केली आहे. या जागेत गेट नं.२ करीता चप्पल स्टॅण्डसाठी शेड उभारणे ऐवजी मंगल कार्यालयाचे पश्चिम बाजूकडील केशव मंदिर येथील मोकळया जागेत चप्पल स्टॅण्डकरीता शेड उभारणे सोयीस्कर होईल, असे मत आहे. त्यानुसार इकडील दि.०९/०५/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये फेर निविदा (द्वितिय) मागविणेकामी मान्यता घेणेत येवुन दि.०८/०६/२०१७ पर्यंत ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर मुदतीत एकुण खालील ३ पुरवठाधारकांनी निविदा अपलोड केल्या होत्या .त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापूर | ५८६९ | ०८/०६/२०१७ |
| २. | देवगीरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद | ५९३१ | ०९/०६/२२१७ |
| ३. | सागर सुभाष शिंदे, उंदिरगांव, ता. श्रीरामपूर | ६०१५ | १०/०६/२०१७ |

उपरोक्त प्राप्त ई-निविदांचे तांत्रिक माहितीचा लिफाफा दि१३/०६/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आलेले आहेत. उघडणेत आलेल्या टेक्नीकल बीड मधील कागदपत्रांची छाननी केली असून, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| ०१ | साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापूर | पात्र |
| ०२ | देवगीरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद | पात्र |
| ०३ | सागर सुभाष शिंदे, उंदिरगांव, ता. श्रीरामपूर | पात्र |

उपरोक्त पात्र निविदाधारकांचे वाणिज्यीक लिफाफे (Commercial Bid) दि.१७/०६/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापूर | ९,६१,७९९.५१ | **निम्नतम** |
| ०२ | देवगीरी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., औरंगाबाद | १०,१२,६०९.१० | -- |
| ०३ | सागर सुभाष शिंदे, उंदिरगांव, ता. श्रीरामपूर | १२,७१,२६३.९२ | -- |

तरी मंदिर परिसरातील गेट नं.१ व गेट नं.०२ ऐवजी केशव मंदिर येथील मोकळ्या जागेत साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्ड तयार करणेकामी ठेकेदार साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापूर यांचे निम्नतम दरानुसार येणारे रक्कम रु.९,६१,८००/- मात्रचे खर्चास तसेच याकामी त्यांना कार्यादेश देणेकरीता मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा. उपसमिती सभेत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील गेट नं.१ व २ चे ठिकाणी साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्ड तयार करणेकामी साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापूर यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

**विषय नं.०३** **(अ) दिनांक ०७.०७.२०१७ रोजी झालेल्या झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५२४** **(अ)** दरम्यानचे कालावधीमध्ये व्यवस्थापन समितीच्या दोन सभा रद्द झालेल्या असल्यामुळे दिनांक ०७.०७.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्तामधील निर्णयांवर कार्यवाही करणेस विलंब होऊ नये, याकरीता या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात येऊन, मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व समिती सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली होती, त्याची नोंद घेण्यात घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील नोंद घेण्यात आलेल्या खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **साईप्रसाद निवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकरीता क्वायर फोम मॅट्रेस (प्रोटेक्टसह) खरेदीकामी व फायबर पिलो आणि पिलो कव्हर खरेदी स्थगित ठेवणेबाबत.**

साईप्रसाद निवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान विभागांकरीता क्वायर फोम मॅट्रेस (प्रोटेक्टरसह), फायबर पिलो व पिलो कव्हर खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,०२,८५,०००/- (अक्षरी रु. एक कोटी दोन लाख पंचाऐंशी हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर सदर खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती.

सदरचे खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त तेरा ई-निविदा - तांत्रिक निविदा दि.०३.०४.२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडल्या असता, त्यामध्ये आठ निविदा पात्र तर पाच निविदा अपात्र ठरलेल्या होत्या.
पात्र आठ निविदाधारकांच्या व्यापारी निविदा (Commercial Bid) दि.०७.०६.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. त्याचा ऑनलाईन प्राप्त तुलनात्मक तक्ता सोबत सादर केलेला आहे.

सोबतच्या तुलनात्मक तक्त्यातील अनं.१ ते ३ साठी प्राप्त झालेले ई निविदा न्युनतम दर गडद व अधोरेखित केलेले आहेत.

सन २०११ साठी २,००० नग ७२"X३६" साईजचे क्वायर मॅट्रेस प्रती नग रु.२,८७५/- दराने खरेदी केलेले होते. परंतु सदर मॅट्रेसचे व सध्याचे मॅट्रेसचे स्पेसिफिकेशनमध्ये थोडा फरक आहे.

सदर खरेदीकामी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी निविदा सादर केली होती तथापि त्यांचे दर न्युनतम नाहीत. मात्र मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी तांत्रिक निविदेसोबत दिलेले दि२२.०२.२०१७ रोजीचे पत्रात सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतूद क्रं.५.१७ परिशिष्ठ २० नुसार एकूण खरेदीच्या ३०% खरेदी L1 दराने यंत्रमाग महामंडळासाठी राखीव ठेवण्याची विनंती केली आहे.

शासनाचे सुधारीत नियमावलीतील ५.१७ मध्ये-" शासनाचे अंगीकृत व्यवसाय अंतर्गत नमुद असलेली महामंडळे/उपक्रमांनी त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूसाठी निविदेत सहभाग घेतल्यास त्यांच्यासाठी एकूण खरेदीच्या ३० टक्के खरेदी एल-१ दराने राखीव ठेवण्यात यावी. अशा महामंडळे/उपक्रमांची यादी व त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची यादी (परिशिष्ठ २०) मध्ये देण्यात आली आहे." अशी तरतूद आहे.

तथापि परिशिष्ठ २० मध्ये अ.नं. ६ - महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून खरेदी करावयाच्या राखीव वस्तुंमध्ये मिलचे कापड, लॉंग क्लॉथ, चादरी, पडद्याचे कापड, टॉवेल्स, हॉस्पिटलसाठीचे कापड, साडया, टेरिकॉटचे कापड, कॅलिको कापड, गादीपाट व सुती अथवा वुलन चादरी, हॉस्पिटल क्लॉथ क 1,2,4,6,7 आणि 8, नॅपकिन्स हॉस्पिटल व गणवेशाचे कापड या वस्तूंचा समावेश आहे. या राखीव ठेवलेल्या वस्तूंमध्ये क्वायर फोम मॅट्रेस (प्रोटेक्टरसह), फायबर पिलो व पिलो कव्हरचा उल्लेख नाही. त्यामुळे सदर क्वायर फोम मॅट्रेस (प्रोटेक्टरसह), फायबर पिलो व पिलो कव्हर एकूण खरेदीच्या ३० टक्के खरेदी एल-१ दराने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून खरेदीसाठी राखीव ठेवता येणार नाही, असे मत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०२.२०१७ रोजी झालेल्या सभेत शिर्डी बसस्थानकातील संस्थान मालकीच्या दोन मजल्यांचा वापर कशासाठी करता येईल हे प्रत्यक्ष पाहणी करून निश्चित करावयाचे आहे. त्यामुळे या निर्णयानुसार सदर दोन मजल्याकरीता खरेदी विभागामार्फत सुरू असलेली विषयांकित साहित्याची खरेदी प्रक्रिया तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करणेबाबत प्रशासकिय अधिकारी, साईप्रसाद निवासस्थान विभाग यांनी कळविले होते.

तथापि मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांनी दिनांक१७.०६.२०१७ रोजी झालेले चर्चेत १० हॉल व १४ रुम्स साठी क्वायर फोम मॅट्रेस, फायबर पिलो व पिलो कव्हर खरेदी करणेबाबत निर्देश दिले होते. सदर निर्देशांस अनुसरुन प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान यांनी खालील तक्त्यातील अ.नं.४ मध्ये नमुद केलेप्रमाणे साहित्य खरेदी करणेबाबत दिनांक २६.०६.२०१७ रोजीचे पत्राने कळविले आहे.

**परिशिष्ठ अ**

| अ.नं | तपशील | साईबाबा भक्तनिवासस्थान मागणी | साईप्रसाद निवासस्थान मागणी | एकुण मागणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | Coir Foam Mattress With Waterproof Protecter | २,००० नग | १५९ नग | २,१५९ नग | |
| २ | Fiber Pillows | - | ३०० नग | ३०० नग | |
| ३ | Pillow Cover (Printed) | - | १,००० नग | १,००० नग | |

**परिशिष्ठ ब**

| Sr.No | Description | No.of Qty | Kontak Comforts Pvt Ltd | M B TRADING COMPANY | NILKAMAL LTD | MAHARSHTRA STATE POWERLOOMS CORPORATION LTD. | Godrej & Boyce mfg. co. ltd | VICTORY MATTRESSES PVT LTD | Sri Venkateswara Coir Products Pvt Ltd | SABOO DECOPRIDE PRIVATE LIMITED |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | Coir Foam Mattress with Waterproof Protector 6'x3' 1829 mm x915 mm (72" x 36") (As per technical specifications mentioned in our Tender Document) | 2250 Nos | **2826.00** | 4365.00 | 4985.00 | 6219.00 | 6356.00 | 3546.00 | 3050.00 | 2999.00 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **2** | FIBRE PILLOWS 610 mm x 410 mm (24"x16") (+ - 5 mm) (As per technical specifications mentioned in our Tender Document) | 300 Nos | 176.00 | 522.00 | 283.00 | 249.00 | 375.00 | 180.00 | **125.00** | 195.00 |
| **3** | PILLOW COVERS (PRINTED) 18"x27", 100% Cotton, with Interlock (As per technical specifications mentioned in our Tender Document) | 1000 Nos | 79.00 | 72.00 | 85.00 | 52.00 | 341.00 | 140.00 | **37.00** | 50.00 |

तरी वरीलप्रमाणे परिशिष्ठ अ मधील कॉलम नं.५ मध्ये नमुद केलेले साहित्य खरेदीसाठी परिशिष्ठ ब मधील तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखित केलेले न्युनतम दरांबाबत उचित निर्णय होणेस सदरचा विषय मा.स्थानिक उप समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**साईप्रसाद निवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकरीता क्वायर फोम मॅट्रेस (प्रोटेक्टसह) व फायबर पिलो आणि पिलो कव्हर खरेदीकामीचे निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दरांबाबत चर्चा केली असता, त्यांनी जी.एस.टी. लागू झालेली असल्यामुळे दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईप्रसाद निवासस्थान व साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकरीता क्वायर फोम मॅट्रेस (प्रोटेक्टसह) खरेदीकामी व फायबर पिलो आणि पिलो कव्हर खरेदी करणेकामी प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०२ **साईबाबा भक्तनिवास व द्वारावती भक्तनिवास विभागाकरीता प्रिंटेड बेडशिट उशीकव्हरसह खरेदीकामी ई-निविदेतील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

साईबाबा भक्तनिवास व व्दारावती भक्तनिवास विभागांकरीता प्रिंटेड बेडशिट उशी कव्हरसहखरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.४२,२४,०००/- (अक्षरी रु. बेचाळीस लाख चोविस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर सदर प्रिंटेड बेडशिट उशी कव्हरसह खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती.

सदरचे खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त सोळा ई-निविदा- तांत्रिक निविदा दि.०३.०४.२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडल्या असता, त्यामध्ये अकरा निविदा पात्र तर पाचनिविदा अपात्र ठरलेल्या होत्या. पात्र अकरा निविदाधारकांच्या व्यापारी निविदा (Commercial Bid) दि.३०.०५.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. त्याचा ऑनलाईन प्राप्त तुलनात्मक तक्ता सोबत सादर केलेला आहे.

सोबतच्या तुलनात्मक तक्त्यातील अनं.१ व अ.नं.२ प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह प्राप्त झालेले ई निविदा न्युनतम दर गडद व अधोरेखित केलेले आहेत. सदरचे ई-निविदेतील दर हे बेडशीट व उशीकव्हरसह

आहेत. मागीलवर्षी ५४"X९०" साईजचे प्रिंटेड बेडशिट प्रती नग रु.१६८/- व उशी कव्हर "१८X२८" साईजचे प्रतीनग रु.३५/- या न्युनतम दराने स्वतंत्र खरेदी केलेले होते. तसेच मागील वर्षी १००"X९०" साईजचे बेडशीट खरेदी केलेले नाहीत.

सदर खरेदीकामी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी निविदा सादर केली होती. तथापि त्यांचे न्युनतम नाहीत. मात्र मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी तांत्रिक निविदेतील दिलेले दि२२.०२.२०१७ रोजीचे पत्रात सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतूद क्रं.५.१७ परिशिष्ठ २० नुसार एकूण खरेदीच्या ३०% खरेदी L1 दराने यंत्रमाग महामंडळासाठी राखीव ठेवण्याची विनंती केली आहे.

शासनाचे सुधारीत नियमावलीतील ५.१७ मध्ये-" शासनाचे अंगीकृत व्यवसाय अंतर्गत नमुद असलेली महामंडळे/उपक्रमांनी त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूसाठी निविदेत सहभाग घेतल्यास त्यांच्यासाठी एकूण खरेदीच्या ३० टक्के खरेदी एल-१ दराने राखीव ठेवण्यात यावी. अशा महामंडळे/उपक्रमांची यादी व त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची यादी (परिशिष्ठ २०) मध्ये देण्यात आली आहे." अशी तरतूद आहे.

तथापि परिशिष्ठ २० मध्ये अ.नं. ६ - महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून खरेदी करावयाच्या राखीव वस्तुंमध्ये मिलचे कापड, लॉंग क्लॉथ, चादरी, पडद्याचे कापड, टॉवेल्स, हॉस्पिटलसाठीचे कापड, साडया, टेरिकॉटचे कापड, कॅलिको कापड, गादीपाट व सुती अथवा वुलन चादरी, हॉस्पिटल क्लॉथ क 1,2,4,6,7 आणि 8, नॅपकिन्स हॉस्पिटल व गणवेशाचे कापड या वस्तूंचा समावेश आहे. या राखीव ठेवलेल्या वस्तूंमध्ये बेडशिट व उशीकव्हरचा उल्लेख नाही. त्यामुळे सदर बेडशिट व उशीकव्हर एकूण खरेदीच्या ३० टक्के खरेदी एल-१ दरानेमहाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून खरेदीसाठी राखीव ठेवता येणार नाही, असे मत आहे.

याकामी अंदाजे खर्च रक्कम रु.४२,२४,०००/- ला मान्यता घेतलेली असून न्युनतम दराने खरेदीसाठी रक्कम रु.२१,०९,८५०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सोबत जोडलेले प्रिंटेड बेडशीट उशीकव्हरसह खरेदीकामीचे तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखित केलेले न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर

**साईबाबा भक्तनिवास व द्वारावती भक्तनिवास विभागाकरीता प्रिंटेड बेडशिट उशीकव्हरसह खरेदीकामीचे निम्नतम दरधारक बांठीया एन्टरप्रायजेस यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दरांबाबत चर्चा केली असता, त्यांनी जी.एस.टी. लागू झालेली असल्यामुळे दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवास व द्वारावती भक्तनिवास विभागाकरीता प्रिंटेड बेडशिट उशीकव्हरसह खरेदी करणेकामी बांठीया एन्टरप्रायजेस यांचे एकत्रित रु.२१,०९,८५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**०३ द्वारावती भक्तनिवास विभागाकरीता प्लॅस्टीक व इतर साहित्य खरेदीकामीचे ई-निविदेमधील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

संस्थानचे व्दारावती भक्तनिवास विभागाकरीता प्लॅस्टिक व इतर साहित्य खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२३.०२.२०१७ ते दि.१४.०३.२०१७ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. तथापि मुदतीचे शेवटचे तारखेला, दि.१४.०३.२०१७ रोजी याकामी फक्त १ निविदा प्राप्त झाल्यामुळे, खरेदी नियमावलीनुसार ८ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली होती. मुदतवाढीनंतरचे मुदतीत याकामी ५ ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदर ऑनलाईन प्राप्त पाच ई-निविदेतील तांत्रिक निविदा दि.०३.०४.२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेत उघडल्या असता त्यामध्ये तीन निविदा पात्र तर दोन निविदा अपात्र ठरलेल्या होत्या.

पात्र तीन निविदाधारकांच्या व्यापारी निविदा (Commercial Bid) दि.१९.०५.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. त्याचा ऑनलाईन तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे–

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | CLASSIC STATIONERS, CO. | Asian Sales Corporation | M/s R.T Karachiwala |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate |
| 1.00 | प्लॅस्टिक बादली अनब्रेकेबल (१७लि) नामांकित कंपनी | 400.00 | Nos | **135.00** | **135.00** | 281.00 |
| 2.00 | प्लॅस्टिक बादलीअनब्रेकेबल (०३ लि) नामांकित कंपनी | 400.00 | Nos | **37.00** | 48.00 | 69.00 |
| 3.00 | प्लॅस्टिक मगअनब्रेकेबल (०१ लि.) नामांकित कंपनी | 500.00 | Nos | 21.00 | **18.00** | 47.00 |
| 4.00 | प्लॅस्टिकआंघोळीचा स्टुल जम्बो अनब्रेकेबल१३ इंच लांब × १३ इंच रुंद×८ इंच उंच नामांकितकंपनी | 350.00 | Nos | 215.00 | **165.00** | 0.00 |
| 5.00 | प्लॅस्टिकडस्टबीन झाकनासह अनब्रेकेबल१० इंच लांब × १० इंच रुंद × १७ इंच उंच नामांकित कंपनी | 350.00 | Nos | **165.00** | 190.00 | 0.00 |
| 6.00 | प्लॅस्टिक ट्रेअनब्रेकेबल १५ इंच लांब ×११ इंच रुंद × १ इंच उंच नामांकित कंपनी | 350.00 | Nos | **89.00** | 156.00 | 0.00 |
| 7.00 | बाथमॅट (पायपुसणी) ०१ फुट रुंद×१.६ फुट लांब नामांकित कंपनी | 500.00 | Nos | 190.00 | **49.00** | 135.00 |
| 8.00 | डोअरमॅट (कापडी पायपुसणी) ०२ फुट रुंद×०१.६ फुट लांब नामांकित कंपर्न | 500.00 | Nos | 145.00 | **105.00** | 122.00 |
| 9.00 | कुलुपे (डबल लॉक)०६ लिव्हर ०३ चावीसह नामांकित कंपनी | 350.00 | Nos | 159.00 | **48.00** | 90.00 |
| 10.00 | गेटसमोरील पायरीखालील रबरी मॅट ३९ इंच रुंद × ५५ इंच लांब नामांकित कंपनी | 40.00 | Nos | 1248.00 | **1240.00** | 0.00 |
| 11.00 | प्लॅस्टिकखुर्ची एसी रुमसाठी अनब्रेकेबल २१ इंच लांब×१६ इंच रुंद×३० इंच उंच नामांकितकंपनी | 180.00 | Nos | 588.00 | **505.00** | 0.00 |
| 12.00 | प्लॅस्टिक फ्रेम अनब्रेकेबल आरसे २४" X १८" नामांकित कंपनी | 350.00 | Nos | **388.00** | 390.00 | 0.00 |
| 13.00 | सिरॅमिका जग १.५लिटर क्षमता नामांकित कंपनी | 350.00 | Nos | **150.00** | 1650.00 | 0.00 |
| 14.00 | स्टील ग्लास २५०मि लि नामांकित कंपनी | 400.00 | Nos | 66.00 | 28.00 | **20.00** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर गडद व अधोरेखित केलेले आहेत. तसेच सदर Items साठी नमुनेही मागविण्यात आलेले आहेत.

सदर तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. ४,५,६,१०,११,१२ व १३ या सात Items साठी दोनच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत. तथापि शासनाचे सुधारीत खरेदी नियमावलीतील ४.४.३.१ मध्ये रुपये दहा लाखांपेक्षा कमी रकमेची निविदा असल्यास फक्त एकदाच मुदतवाढ देण्यात यावी, अशी तरतूद आहे.

सदर तरतूद विचारात घेता ही खरेदी दहा लाखापेक्षा कमी असल्यामुळे तुलनात्मक तक्त्यातील सदर सात Items चे न्युनतम दरधारकांस पुरवठा आदेश देणेबाबत हरकत नाही, असे मत आहे.

वरील खरेदी करण्यात येत असलेले Items ची खरेदी यापुर्वी खरेदी विभागाकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे या खरेदीबाबतचे मागील खरेदीचे दर उपलब्ध नाहीत.

याकामी व्दारावती भक्तनिवास विभागाने अंदाजे खर्च रक्कम रु.९,४०,२५०/- ला मान्यता घेतलेली असून न्युनतम दराने खरेदीसाठी रक्कम रु.६,५५,०५०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. १ ते १४ Items चे न्युनतम दरांबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर.

**द्वारावती भक्तनिवास विभागाकरीता प्लॅस्टीक व इतर साहित्य खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक पुरवठाधारकांना आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत आले होते. परंतु उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी एकही पुरवठाधारक उपस्थित नव्हते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास विभागाकरीता प्लॅस्टीक व इतर साहित्य खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांनापुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०४ **श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील सर्व्हे नं.१४८ मधील जागेत नवीन इमारतीचे बांधकामासाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन याप्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** नि.क्र.८९० दि.३०/११/२०१६

**प्रस्तावना**: मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे बैठकीतील निर्णयानुसार विषयांकीत प्रकल्पाचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेकामी दि.११/०३/२०१७ अखेर ऑनलाईन Request for proposal मागविण्यात आलेले आहेत. या कामासाठी इच्छुक आर्कीटेक्चरल कन्सल्टंट यांचे शंका निवारणार्थ दि२८/०२/२०१७ रोजी निविदापुर्व (Pre-bid meeting) बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरचे बैठकीत आर्किटेक्चरल कन्सल्टंट कंपन्यांचे प्रतिनिधींनी विचारलेल्या शंकांचा समावेश करून Common set of deviationsइकडील जा. क्र.६०९४/२०१७ दि.०२/०३/२०१७ अन्वये www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. विषयांकीत कामासाठी ऑनलाईन Request for proposal सादर करण्याची मुदत दि.११/०३/२०१७ अखेर होती. सदरहू ई-प्रस्ताव मागविणेचे अनुषंगाने वास्तुकला परिषद (Council of Architecture) चे रजिस्ट्रार, श्री. ओबेराय यांनी दि.०३/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्चरल सेवा घेणेसाठी Architects Act, 1972 and Rules and Regulationsनुसार अवलंबवयाची कार्यपध्दती माहितीसाठी पाठविलेली आहे. याकामी खालील एकुण १४ इच्छुक आर्कीटिक्ट यांनी ऑनलाईन Request for proposal सादर केले होते.

| Sr. No. | Name of Firm |
|---|---|
| 01. | Mukesh Sharma & Associates, Aurangabad |
| 02. | Design Associates INC, Noida (U.P.) |
| 03. | Nandapurkar& Associates, Mumbai |
| 04. | CP & DS Associates, Ghaziabad |
| 05. | Creative Circle, Nagpur |
| 06. | Architects United, Pune |
| 07. | A.K.A. Consultants (India) Pvt. Ltd., Indore |
| 08. | L.J. Purani And Associates, Ahmadabad |
| 09. | SushilDeshmukh And Associates, Aurangabad |
| 10. | Om Sai Consultants, Ahmednagar |
| 11. | Kicons Limited, Pune |
| 12. | SEMAC Consultants Pvt. Ltd., Secunderabad |
| 13. | M.B. Malewar Designs Pvt. Ltd., Nagpur |
| 14. | Archimedes, Bangaluru |

उपरोक्त आर्कीटिक्ट यांनी सादर केलेले Request for proposal मधिल तांत्रिक माहितीचा लिफाफा क्र.१ (Technicalbid) दि.११/०४/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आले असून, त्यांची छाननी केली असता, त्यातील पात्रतेचे निकष पूर्ण करणारे आर्किटेक्ट यांचे RFPचा लिफाफा क्र.०२ (Commercial bid) दि.१७/०६/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडणेत आला असून, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Firm | Rate of Fees (%) |
|---|---|---|
| 01. | Creative Circle, Nagpur | 2.62% |
| 02. | Kicons Limited, Pune | 3.50% |
| 03. | SushilDeshmukh And Associates, Aurangabad | 1.65% |
| 04. | L.J. Purani And Associates, Ahmadabad | 3.24% |
| **05.** | **Design Associates INC, Noida (U.P.)** | **1.50%** |
| 06. | Architects United, Pune | 3.50% |
| 07. | A.K.A. Consultants (India) Pvt. Ltd., Indore | 2.85% |

**प्रस्ताव:** तरी श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील सर्व्हे नं.१४८ मधील जागेत नविन इमारतीचे बांधकामासाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेकामी वरीलप्रमाणे प्राप्त दरापैकी अ.नं.०५ चे Design Associates INC, Noida (U.P.) यांनी देऊ केलेले प्रकल्प किमतीवर 1.50% फी + प्रचलित दराने देय होणारा सर्व्हिस टॅक्स हे दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेकरीता मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा. उपसमिती सभेचे निर्णयार्थ सादर.

**श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील सर्व्हे नं.१४८ मधील जागेत नवीन इमारतीचे बांधकामासाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक Design Associates INC, Noida (U.P.) यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चेसाठी उपस्थित होते. त्यानी चर्चेअंती प्रकल्प किमतीवर १.३०% मात्र रकमेवर काम करणेस सहमती दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील सर्व्हे नं.१४८ मधील जागेत नवीन इमारतीचे बांधकामासाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेकामी Design Associates INC, Noida (U.P.) यांचे प्रकल्प किमतीवर १.३०% मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०५ **श्री साई मंदिरात गायल्या जाणाऱ्या आरत्या व मंत्रोपच्चार पठणाचे पेन ड्राईव्ह निर्मितीचे कार्यादेश पारित करणेबाबत.**

**अधिनियम तरतुद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७. नं ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक:-** मा. व्यवस्थापन समिती दि. ०९.०३.२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.१७४ अन्वये श्री साईमंदिरात गायल्या जाणा-या आरत्या व मंत्रोपचार पठणाचे पेनड्राईव्ह साईभक्तांना उपलब्ध करुन देणेकामी अंदाजे रु. २,७५,०००/- खर्चास मान्यता मिळालेली आहे.

दि.३०.०५.२०१७ रोजीचे खेरदी समिती सभेपुढे प्राप्त ०३ दरपत्रके उघडण्यात येऊन, त्यांचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अं.नं. | दरपत्रकधारकांचे नाव | निर्मिती संख्या | **08 G.B.** पेनड्राईव्ह | **16 G.B.** पेनड्राईव्ह | एकूण निर्मिती खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे. क्लासिक स्टेशनरीज, कंपनी, मुंबई | २५० नग | **३५०/-** | **४५०/-** | २,००,०००/- | निम्नत्तम दर |
| ०२ | मे. अटलांटा ई सोल्यूशन, मुंबई | २५० नग | ४१०/- | ५२०/- | २,३२,५००/- | -- |
| ०३ | मे.परमेश्वर स्टेशनरी, मुंबई | २५० नग | ४७५/- | ५५५/- | २,५७,५००/- | -- |

**मागणी:-** श्री साई मंदिरात गायल्या जाणा-या आरत्या व मंत्रोपचार पठणाचे पेनड्राईव्ह साईभक्तांना श्री साई समाधी शताब्दी वर्षा निमित्त पेन ड्राईव्हमध्ये उपलब्ध करुन देणेबाबत संस्थानचा मानस आहे.

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई छाननी करुन अनुमान:-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** उपरोक्त दरपत्रकांचे तुलनात्मक तक्त्यानुसार निम्नत्तम दरधारक मे. क्लासिक स्टेशनरीज, कंपनी, मंबई यांना पेन ड्राईव्ह निर्मिती कामाचा कार्यादेश पारित करणेस, रक्कम रु.२,००,० ००/- (अक्षरी रु. दोन लाख मात्र) खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावितकामीचे निम्नतम दरधारक मे. क्लासिक स्टेशनरीज कंपनी, मुंबई यांना आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी बोलविणेत आले होते. परंतु ते उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित राहू शकले नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई मंदिरात गायल्या जाणाऱ्या आरत्या व मंत्रोपच्चार पठणाचे पेन ड्राईव्हची निर्मिती करणेकामी मे. क्लासिक स्टेशनरीज कंपनी, मुंबई यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

०६ **श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपात्या)/ पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं १४.(भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे .

**प्रास्तविक**:- मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२४८ नूसार, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये स्वामी नारायण पोळी (चपाती)/पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३८,०७,४९३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार विहीत वेळेत प्राप्त झालेले तांत्रिक कोटेशन मा.खरेदी समिती दि.०७/०६/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आलेली आहे. त्यानूसार पात्र झालेले निविदाधारकांचे दरपत्रक मा.खरेदी समिती दि.१७/०६/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आलेले असून, त्यात खालीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | संख्या तपशिल | दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा.संस्था, नाशिक यांचे दर | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांचे दर | श्री साई प्रयाग केटरर्स ॲण्ड सप्लायर्स, शिर्डी यांचे दर |
|---|---|---|---|---|---|
| १. | स्वामी नारायण चपाती तयार करुन देणेकामी प्रति क्विं. सर्व करांसहीत दर (कोरडा गहु आटा+मैदा) | **प्रति ०१ क्विंटल आटा करीता** | **रु.८९०/-** | रु.१३४५/- | रु.११९९/- |
| २. | पुरी तयार करुन देणेकामी प्रति क्विं. सर्व करांसहीत दर (कोरडा गहु आटा+मैदा) | | रु.८९०/- | रु.१०४५/- | **रु.७४९/-** |
| | **दरपत्रकानूसार चपाती व पुरी तयार करणेकामी एकत्रित रक्कम रुपये =** | | **१७८०/-** | २३९०/- | १९४८/- |

**मागणी:-** उपरोक्त प्रास्तविक मधील दराचे तुलनात्मक तक्त्यानूसार, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोनामध्ये १) मनुष्यबळाव्दारे चपाती तयार करणेकामी दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांचे सर्व करांसहीत दर प्रती कोरडा गहु आटा+मैदा आटा करीता रु.८९०/- व २) मनुष्यबळाव्दारे पुरी तयार करुन देणेकामी श्री साई प्रयाग केटरर्स ॲण्ड सप्लायर्स, शिर्डी यांचे सर्व करांसहीत दर प्रती कोरडा गहु आटा+मैदा आटा करीता रु.७४९/- असे निम्नतम दर आलेले आहेत.

परंतू वर तक्तयात दर्शविलेप्रमाणे चपाती व पुरी तयार करणेकामी या दोन्ही कामाचे एकत्रित रक्कम लक्षात घेता, निम्नतम दरधारक दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा.संस्था, नाशिक हे आहेत.

श्री साई प्रसादालयात प्रसादभोजनात येणारी पुरी ही बंद करणेत आलेली असून, मोठयाप्रमाणात सुट्टयांमधील, उत्सवामधील गर्दीचे काळात अथवा चपाती मशिनमध्ये तांत्रिक बिघाड झाला तरच

प्रसादभोजनामध्ये चपाती तयार करणेकामी उपलब्ध असलेल्या चपाती ठेकेदारामार्फतच त्वरीत पुरी तयार करण्यात येते. मात्र पुरी तयार करणेकामी दुसरा ठेकेदार नियुक्त केल्यास ऐन गर्दीचे वेळी अथवा चपाती मशिनमध्ये बिघाड झाला तरच त्यास बोलवावे लागेल, ऐनवेळी पुरी तयार करणारे ठेकेदारास मनुष्यबळ मिळणे, त्याने काम सुरु करणे हया बाबींमुळे भक्तांना प्रसादभोजना सेवा पुरविणेस विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे चपाती व पुरी तयार करणे ही दोन्ही कामे एका निविदाधारकास देणे योग्य राहील. असे नम्र मत आहे.

**संस्थारन अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये मनुष्यबळाव्दरे तयार करणेत येणारी स्वामी नारायण पोळी (चपाती) व पुरी तयार करणे या दोन्ही कामासाठी एकत्रित आलेल्या निम्नतम दरधारक ठेकेदारास कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामधील स्वामी नारायण पोळी (चपात्या)/ पुरी मनुष्यबळाव्दारे तयार करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील स्वामी नारायण पोळी (चपात्या) तयार करणेकामीचे निम्नतम दरधारक दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा. संस्था, नाशिक व पुरी तयार करणेकामीचे निम्नतम दरधारक श्री साई प्रयाग केटरर्स ॲण्ड सप्लायर्स, शिर्डी यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. चर्चेअंती समितीने दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा. संस्था, नाशिक यांना, त्यांनी दिलेल्या निम्नतम दराचे विवरण (कर्मचारी वेतन+ सर्व्हीस टॅक्स इ.) सादर करणेस सांगितले.**

**यावेळी उपसमिती सभेस अशी माहिती मिळाली की, दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा. संस्था, नाशिक यांचे सध्या प्रसादालयामध्ये स्वामी नारायण पोळी तयार करणेचे काम सुरु असून, त्यांचे काम समाधानकारक नाही. त्यांच्या कामाबाबत अनेक तक्रारी आहेत, त्याचेकडील कर्मचाऱ्यांनी मध्यंतरी काम बंद केले होते व या बातम्या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यामुळे संस्थानची बदनामी झालेली आहे. याकरीता सदरहू संस्थेस नोटीस दिलेली आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामधील स्वामी नारायण पोळी (चपात्या) व पुरी तयार करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील चपाती बनविणेकामीचे निम्नतम दरधारक दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा. संस्था, नाशिक, यांनी दिलेल्या प्रति क्विंटल आटा रु.८९०/- मात्र तसेच पुरी तयार करणेकामीचे निम्नतम दरधारक श्री साई प्रयाग केटरर्स ॲण्ड सप्लायर्स, शिर्डी यांनी दिलेल्या प्रति क्विंटल आटा रु.७४९/- मात्र मध्ये कर्मचाऱ्यांचे वेतनासाठी किती रक्कम व सर्व्हीस टॅक्स वगैरेसाठी किती रक्कम वापरणार, याबाबतचे विवरण लेखी स्वरुपात घेण्यात यावे, त्यानंतर प्रस्तावितकामी कार्यादेश देणेबाबतचा निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- श्री साई प्रसादालय विभागप्रमुख)

---

०७ **समाधी मंदिर ए.सी. प्लांट यंत्रणेचे सन २०१७-१८ या एक वर्षाचे कालावधीकरीता CAMC देणेकरीता उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

श्री साईभक्तांना उष्णतेचा, सफोकेशनचा त्रास होऊ नये याकरीता समाधी गाभारा, झुंबर गाभारा, नंदी गाभारा, स्टेज गाभारा, भुयारी दर्शन रांग तसेच म्युझियम हॉल या सर्व ठिकाणी एकूण १८१ टन क्षमतेचे रुपये ८६,००,०००/- (अक्षरी रुपये शहाऐंशी लाख) मात्र किंमतीचे एकूण १२ सेंट्रल ए.सी. प्लांट देणगीदार साईभक्त यांचेमार्फत बसवून कार्यरत करणेत आलेले आहेत. सदर यंत्रणा दिनांक २८/०३/२०१५ रोजी कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

वरील सर्व यंत्रणेचा वारंटीचा कालावधी एक वर्षाचा होता, त्याची मुदत एप्रिल २०१६ अखेर संपलेली होती. माहे एप्रिल २०१६ ते आजपावेता सदर प्लॅन्टची दुरुस्ती व देखभाल विभागाअंतर्गत करण्यात येत आहे. विभागाअंतर्गत प्लॅन्टची दुरुस्ती व देखभाल करतांना अनेक अडचणी येत आहेत. सदर यंत्रणेत बिघाड झाल्यास तातडीने दुरुस्त करणेकामी लागणारे स्पेअरपार्ट त्वरीत उपलब्ध होत नव्हते. जर स्पेअर्स उपलब्ध नसतील तर सेंट्रल ए.सी. दुरुस्ती कामांत अडचणी निर्माण होईल. यासाठी सदर यंत्रणेची पुढील एक वर्षाकरीता CAMC देणे आवश्यक आहे. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २००

अन्वये समाधी मंदिरातील सर्व सेंट्रल एसी. यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या एक वर्षाचे कालावधीकरीता CAMC देणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या रुपये ६,०२,४८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

वरील मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात दुसरे वेळेस अपलोड करण्यात आली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडकरीता दिनांक १९/०५/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक ते कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्यामुळ प्रती दिनांक २९/०५/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ई-निविदेत देण्यात आली होती.

उपरोक्त मुदतीत खालील पुरवठादार/ कंत्राटदार यांच्या तांत्रिक ई-निविदाच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये संस्थानकडे प्राप्त झालेल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Kailas Refrigeration Work, Mumbai | 3. | Shree Venkateshwara Trunkey Project Soluation Pvt. Ltd., Pune |
| 2. | Classic Cool Air Conditioning, Pune | 4. | A.J. Enterprises & Electrical Pvt. Ltd., Panvel |

वरील प्राप्त ४ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ०७/०६/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्यातील VAT, TIN, PAN, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या पुरवठा आदेशासह कामांची यादी, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी. रकमेचा डी.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील चारही तांत्रिक निविदा पात्र झाल्या आहेत. या पात्र झालेल्या निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक १७/०६/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आल्या, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत :

| Sr. No. | Description | Kailas Refrigeration Work, Mumbai | Classic Cool Air Conditioning, Pune | Shree Venkateshwara Trunkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | A.J. Enterprises & Electrical Pvt. Ltd., Panvel |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Comprehensive Annual Maintenance Contract for Samadhi Mandir & Premies Central A.C. Plant. | 4,90,000/- | 7,50,000/- | **3,99,999/-** | 7,15,000/- |

उपरोक्त आर्थिक (Financial) बीडमधील तक्त्यानुसार मे.श्री वेंकटेश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट सोल्युशन प्रा. लि., पुणे यांचे रुपये ३,९९,९९९/- मात्रचे दर निम्नतम आहेत. सदर दरांबाबत मा. उप-समितीचे सभेमध्ये चर्चा / वाटाघाटी होणे आवश्यक आहे.

तरी समाधी मंदिर एसी. प्लांट यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या एक वर्षाचे कालावधीकरीता CAMC देणेकरीता निम्नतम दरधारक मे. श्री वेंकटेश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट सोल्युशन प्रा. लि., पुणे यांचेशी चर्चा / वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

**तरी समाधी मंदिर एसी. प्लांट यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या एक वर्षाचे कालावधीकरीता CAMC देणेकरीता राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.श्री वेंकटेश्वरा ट्रंकी प्रोजेक्ट सोल्युशन प्रा. लि., पुणे यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. त्यांनी दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर एसी. प्लांट यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या एक वर्षाचे कालावधीकरीता CAMC देणेकरीता मे.श्री वेकंटेश्वरा टूंकी प्रोजेक्ट सोल्युशन प्रा. लि., पुणे यांचे एकत्रित रु.३,९९,९९९/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०८ **LED TV खरेदी करणेकरीता व जुने/ खराब झालेले TV/ LCD TV बायबॅक करणेकरीता मागविण्यात आलेल्या ई-निविदेतील प्राप्त वाणिज्यीक तुलनात्मक तक्तयातील निम्नतम दरधारकांचे दरास अनुसरुन वाढीव खर्चास मान्यता मिळणेस व निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद–** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६ - १७(१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–** दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा. उपसमितीचे सभेतील विषय क्र.४१, निर्णय क्र. ४१.

**प्रास्ताविक–** श्री साईभक्तांना मंदिर परिसरात, दर्शनरांगेत तसेच संस्थान परिसरात श्रीं चे लाईव्ह दर्शन सुलभतेने होणेकरीता संस्थानचे विविध ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे वेगवेगळया साईजचे एकुण २३३ नग LED TV खरेदीकरीता अंदाजे रक्कम रु.१,४०,७३,८३०/- + All Taxes मात्रचे खर्चास तसेच जुने व खराब झालेले CRT TV व LED/LCD/PLAZMA टिव्ही बायबॅक करणेत करणेस व बायबॅक होत नसतील तस त्यांची स्क्रॅप म्हणुन विहीत पद्धतीने विक्री करणेस कामी दि. २५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ४१, निर्णय क्र. ४१ नुसार मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन LED TV खरेदी करणेकरीता व जुने/खराब झालेले TV/LCD TV Buyback करणेकरीता दि. ०४/०४/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि. २५/०५/२०१७ ते दि. २२/०६/२०१७ अखेर जाहिरात प्रसिद्ध करुन ई-निवीदा मागविणेत आलेल्या आहेत. सदर ई-निवीदांतील प्राप्त झालेले तांत्रिक (Technical Bid) लिफाफे दि.३०/०५/२०१७ रोजी खरेदीचे समितीपुढे उघडण्यात आलेले असुन त्यांचे वाणिज्यक (Commercial Bid) लिफाफे दि.१७/०६/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेले आहेत. त्याबाबतचा तांत्रिक व वाणिज्यक तपशील खालीलप्रमाणे –

**अ) तांत्रिक (Technical Bid) पात्रतेबाबत गोषवारा –**

| अ.नं. | नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| 1. | Antrax Technologies Pvt.Ltd, Banlore | पात्र |
| 2. | Nidhi (I) Industries Gwalior | पात्र |
| 3. | Swati Safesecure Equipments Pvt. Ltd, Chembur (W) | अपात्र (Annual Turnover 50 लाखांपेक्षा कमी आहे. |
| 4. | Alpha Digital, Mumbai | पात्र |
| 5. | R.D, Data Systems, Nasik | पात्र |
| 6. | Orno Computers Pvt. Ltd., Mumbai | अपात्र (Financial Netwoth व Black Listed Certificate सादर केलेले नाही) |
| 7. | Laser Telesystems (P).Ltd, Mumbai | पात्र |
| 8. | H.K. Enterprise, Nagpur | पात्र |
| 9. | D.C. Infotech, Mumbai | पात्र |

**ब) वाणिज्यक (Commercial Bid) तुलनात्मक तक्ता–**

| अ.नं. | निवीदाधारकाचे नाव व पत्ता | ई-निवीदेतील प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | Antrax Technologies Pvt.Ltd, Banlore | ३,२३,८४,०३६.०० | |
| 2. | Nidhi (I) Industries Gwalior | २,९८,०३,२९०.०० | |
| 3. | Alpha Digital, Mumbai | ३,३८,००,४४५.०० | |

| | | | |
|---|---|---|---|
| 4. | R.D, Data Systems, Nasik | २,४५,५४,२०५.०० | **निम्नतम दर आहेत** |
| 5. | Laser Telesystems (P).Ltd, Mumbai | ३,३९,४३,२६९.०० | |
| 6. | H.K. Enterprise, Nagpur | ४,२६,६३,९६०.०० | |
| 7. | D.C. Infotech, Mumbai | ३,४४,५९,९५०.०० | |

सबब, श्री साईभक्तांना मंदिर परिसरात, दर्शनरांगेत तसेच संस्थान परिसरात श्रीं चे लाईव्ह दर्शन सुलभतेने होणेकरीता २३३ नग LED TV खरेदी करणेकरीता व जुने/खराब झालेले TV/LCD TV Buyback करणेकरीता इंटरनेटद्वारे प्राप्त दरापैकी २०% कमी दराने येणारे अंदाजे रक्कम रु.१,४०,७३,८३०/- + All Taxes मात्रचे खर्चास उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा. उपसमितीचे सभेतील विषय क्र.४१, निर्णय क्र. ४१ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. परंतु, सदर ई-निवीदांचे प्री-बीड मध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन दि.१७/०६/२०१७ रोजी उघडणेत आलेल्या ऑनलाईन प्राप्त वाणिज्यक लिफाफ्यामध्ये (Commercial Bid) रक्कम रु. २,४५,५४,२०५/- मात्र (अक्षरी रक्कम रु. दोन कोटी पंचेचाळीस लाख चोपन्न हजार दोनशे पाच) २०% रक्कम वजा जाता इतके निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे मंजुर खर्चाची रक्कम कमी होत आहे.

तरी, सदर ई-निवीदांतील वाणिज्यक तुलनात्मक तक्त्यातील निम्नतम प्राप्त दर रक्कम रु. २,४५,५४,२०५/- मात्र हे मंजुर खर्चाचे रक्कमेपेक्षा जास्त असल्याने रक्कम रु.१,४०,७३,७८०/- + All Taxes (मंजुर खर्चाची रक्कम) + रक्कम रु. १,०४,८०,३७५/- (अतिरीक्त वाढीव खर्चाची रक्कम) अशा एकत्रित रक्कम रु.२,४५,५४,२०५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस्तव व सदर ई-निवीदांतील निम्नतम दरधारकास चर्चा/ वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेच्या शिफारसीकरीता सदरचा प्रस्ताव मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर करत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** - तांत्रिक व आर्थिक.

**मागणी–** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे श्री साईभक्तांना मंदिर परिसरात, दर्शनरांगेत तसेच संस्थान परिसरात श्रीं चे लाईव्ह दर्शन सुलभतेने होणेकरीता २३३ नग LED TV खरेदी करणेकरीता व जुने/खराब झालेले TV/LCD TV Buyback करणेकरीता मागविणेत आलेल्या सदर ई-निवीदांतील वाणिज्यक तुलनात्मक तक्त्यातील निम्नतम प्राप्त दर रक्कम रु. २,४५,५४,२०५/- मात्र हे मंजुर खर्चाचे रक्कमेपेक्षा जास्त असल्याने रक्कम रु.१,४०,७३,७८०/- + All Taxes (मंजुर खर्चाची रक्कम) + रक्कम रु. १,०४,८०,३७५/- (अतिरीक्त वाढीव खर्चाची रक्कम) अशा एकत्रित रक्कम रु.२,४५,५४,२०५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस्तव व सदर ई-निवीदांतील निम्नतम दरधारकास चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेच्या शिफारसीकरीता सदरचा प्रस्ताव मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सविनय सादर.

**नवीन LED TV खरेदी करणे व जुने/ खराब झालेले TV/ LCD TV बायबॅक करणेकरीता राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक R.D. Data Systems, Nasik यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. त्यांनी जी.एस.टी.चे दर वाढल्यामुळे ई-निविदेमध्ये दिलेले दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन LED TV खरेदी करणे व जुने/ खराब झालेले TV/ LCD TV बायबॅक करणेकामी R.D. Data Systems, Nasik यांचे एकत्रित रु.२,४५,५४,२०५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच याकामी मंजूर रकमेपेक्षा येणाऱ्या जादा खर्चासही मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल प्रमुख)

---

०९ **मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे वाढविणेकामी प्राप्त ई-निविदेतील वाणिज्यीक तुलनात्मक तक्तयातील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद –** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५५ (घ) भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरूस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** दि.०९/१०/२०१६ रोजीचे मा. उपसमितीचे सभेतील विषय क्र.१७, निर्णय क्र. ७०४.

**प्रास्ताविक -** मंदिर सुरक्षेच्या दृष्टीने १६ नग सीसीटीव्ही कॅमेरे, ०१ नग NVR व इतर अनुषंगीक साहित्य खरेदीकरीता रक्कम रु. ४,४३,८००/- + Tax मात्र अंदाजे खर्चास दि. ०९/१०/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. १७, निर्णय क्र. ७०४ नुसार मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन सीसीटीव्ही कॅमेरे, ०१ नग NVR व इतर अनुषंगीक साहित्य खरेदीकामी दि. ११/०४/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि. ०८/०५/२०१७ ते दि. २५/०५/२०१७ अखेर जाहिरात प्रसिद्ध करुन ई-निवीदा मागविणेत आलेल्या आहेत. सदर ई-निवीदांतील प्राप्त झालेले तांत्रिक (Technical Bid) लिफाफे दि.०७/०६/२०१७ रोजी खरेदीचे समितीपुढे उघडण्यात आलेले असुन त्यांचे वाणिज्यक (Commercial Bid) लिफाफे दि.१७/०६/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेले आहेत. त्याबाबतचा तांत्रिक व वाणिज्यक तपशील खालीलप्रमाणे –

**अ) तांत्रिक (Technical Bid) पात्रतेबाबत गोषवारा–**

| अ.नं. | नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| 1. | Intelligent Integration N Aatomation, Mumbai | पात्र |
| 2. | Amrapali Photo stadio, Phaltan | पात्र |
| 3. | Alliance Enterprises, Nashik | पात्र |
| 4. | Samrt Solution, Sangamner | पात्र |
| 5. | Shargee, Mumbai | पात्र |
| 6. | Software Technology Services, Delhi | पात्र |
| 7. | Ansers, Aajay Nupur Services Pvt. Ltd, Mumbai | पात्र |
| 8. | Ruchi Infosystems Consultancy Pvt. Ltd. Thane | पात्र |
| 9. | Kiran Enterprises, Ahmadnagar | पात्र |
| 10. | Protocol One IT Labs Pvt. Ltd, Mumbai | पात्र |
| 11. | Progility Technologies Pvt.Ltd, Pune | पात्र |
| 12. | Shakuntala Enterprises, Jalgoan | पात्र |
| 13 | Sujata Computers Pvt.Ltd, Pune | पात्र |
| 14. | Emergency Electronic Security (I) Pvt. Ltd, Mumbai | पात्र |
| 15. | Swati Safesecure Equipments Pvt. Ltd, Mumbai | पात्र |
| 16. | Concept Equipments, Mumbai | पात्र |
| 17. | Aurionpro Solutions Limited, Mumbai | पात्र |

**ब) वाणिज्यक (Commercial Bid) तुलनात्मक तक्ता–**

| अ.नं. | निवीदाधारकाचे नाव व पत्ता | ई-निवीदेतील प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1. | Intelligent Integration N Aatomation, Mumbai | 2,82,989.71 | |
| 2. | Amrapali Photo stadio, Phaltan | 3,84,500.00 | |
| 3. | Alliance Enterprises, Nashik | 11,54,200.00 | |
| 4. | Samrt Solution, Sangamner | 5,63,750.00 | |
| 5. | Shargee, Mumbai | 3,97,490.00 | |
| 6. | Software Technology Services, Delhi | 8,05,470.00 | |
| 7. | Ansers, Aajay Nupur Services Pvt. Ltd, Mumbai | 2,96,360.00 | |
| 8. | Ruchi Infosystems Consultancy Pvt. Ltd. Thane | **2,02,900.00** | **निम्नतम दर आहेत** |
| 9. | Kiran Enterprises, Ahmadnagar | 2,13,549.28 | |
| 10. | Protocol One IT Labs Pvt. Ltd, Mumbai | 2,99,342.00 | |
| 11. | Progility Technologies Pvt.Ltd, Pune | 3,30,600.00 | |
| 12. | Shakuntala Enterprises, Jalgoan | 2,99,017.00 | |
| 13 | Sujata Computers Pvt.Ltd, Pune | 3,69,940.48 | |
| 14. | Emergency Electronic Security (I) Pvt. Ltd, Mumbai | 3,01,000.00 | |

| | | | |
|---|---|---|---|
| 15. | Swati Safesecure Equipments Pvt. Ltd, Mumbai | 3,80,418.25 | |
| 16. | Concept Equipments, Mumbai | 5,01,432.00 | |
| 17. | Aurionpro Solutions Limited, Mumbai | 4,50,008.00 | |

तरी, उपरोक्त वाणिज्यक तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. ८ मधील मे. रुची इन्फोसिस्टीम्स कंन्सलटन्सी प्रा.लि., ठाणे यांचे दर रक्कम रु.२,०२,९००/- मात्र निम्नतम असल्याने मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे वाढविणेकामी १६ नग सीसीटीव्ही कॅमेरे, ०१ नग NVR व इतर अनुषंगीक साहित्य खरेदीकामी करणेकरीता मे. रुची इन्फोसिस्टीम्स कंन्सलटन्सी प्रा.लि., ठाणे यांना पुरवठा आदेश देणेच्या शिफारसीकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सविनय सादर करत आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान - तांत्रिक व आर्थिक.

मागणी– उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे वाढविणेकामी १६ नग सीसीटीव्ही कॅमेरे, ०१ नग NVR व इतर अनुषंगीक साहित्य खरेदी करणेकरीता मागविणेत आलेल्या ई-निवीदांतील प्राप्त वाणिज्यक तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. ८ मधील मे.रुची इन्फोसिस्टीम्स कंन्सलटन्सी प्रा.लि., ठाणे, यांचे दर रक्कम रु. २,०२,९००/- मात्र निम्नतम असल्याने मे. रुची इन्फोसिस्टीम्स कंन्सलटन्सी प्रा.लि., ठाणे, यांना पुरवठा आदेश देणेच्या शिफारसीकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सविनय सादर.

**मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे वाढविणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.रुची इन्फोसिस्टीम्स कंन्सलटन्सी प्रा.लि., ठाणे यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी उपस्थित होते. त्यांनी जी.एस.टी. च्या दरामध्ये वाढ झालेली असल्यामुळे, दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे वाढविणेकामी मे.रुची इन्फोसिस्टीम्स कंन्सलटन्सी प्रा.लि., ठाणे यांचे एकत्रित रु.२,०२,९००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल प्रमुख)

---

**१० श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्स करीता बल्ब खरेदी करणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर 01 विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 3700/2006, दि.15/03/2006 अन्वये मे.बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन एक झेनॉन लाईट सोर्स (Model- Luxtec LX 300) सर्व करांसहीत एकुण रु. 2,86,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आला आहे.सदर लाईट सोर्सचा बल्ब खराब झालेले आहे.सदर बल्ब खरेदी करणेकामी सदर प्रस्तावावर मा. व्य. समितीच्या दि. 27/03/2017 चे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र. 18 व निर्णय क्र. 251 अन्वये सविस्तर चर्चा होउन, सदर बल्ब विविध पुरवठा धारकांकडुन कोटेशन मागणी करुन खरेदी करणेस आणि त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. 47,250/- चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार खालील पुरवठा धारकांकानाSSH/SSBH/WS/BME/51/2017 दि. 10/04/2017 अन्वये पत्र पाठवुन कोटेशनची मागणी करण्यात आली होती.

1. M/s. B.L.Lifesciences Pvt. Ltd., Mumbai.
2. M/s. Genuine Electricals, Mumbai.
3. M/s. B Brawn Medical (I) Pvt Ltd., Thane
4. M/s. Service One, Thane
5. M/s. Aallianse Medical Systems, Mumbai
6. M/s. Explore Medical Technologies, New Delhi.
7. M/s. Metro Electricals, Tamil Nadu.
8. M/s. Sowcarpet, Chennai
9. M/s. Lub Dub Technologies, Chennai

10. M/s. Hitesh Electric Co., Gujrat
11. M/s. Medevice Healthcare LLP, Pune
12. M/s. Amit Mishra, Mumbai

तसेच इतर तीन पुरवठाधारंकाना ई- मेल द्वारे कोटेशन मागणी करणेत आली होती.

वरीलपैकी दि. 20/04/2017 अखेरीस खालीलप्रमाणे पुरवठाधारकांकडुन कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

1) M/s. B.L.Lifesciences Pvt. Ltd., Mumbai.
2) M/s. Service One, Thane
3) M/s. Explore Medical Technologies, New Delhi.
4) M/s. Lub Dub Technologies, Chennai
5) M/s. Medevice Healthcare LLP, Pune
6) M/s. Jez Heath Care Bangalore
7) M/s. Hitesh Electric Co., Gujrat यांचे कोटेशन दि. २१/०४/२०१६ रोजी प्राप्त झालेले होते.

त्यानुसार प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन उघडणेस मंजुर टिपणी दि. २२/०४/२०१७ अन्वये मान्यता घेणेत आली असुन सदर कोटेशन दि. ०६/०५/२०१७ रोजी मा. खरेदी समिती सभेसमोर समक्ष उघडणेत आले असुन पुरवठाधारकांनी दिलला दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| Sr. No | Name of Company | Make | Rate Per (Incl of all Taxes) | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. B.L.Lifesciences Pvt. Ltd., Mumbai. | Except MLX | 47,250.00 | 47,250.00 |
| 2 | M/s. Service One, Thane | Cermax | 50,557.50 | 50,557.50 |
| 3 | M/s. Explore Medical Technologies, New Delhi | Luxtec | **28,125.00** | **28,125.00** |
| 4 | M/s. Lub Dub Technologies, Chennai | Excelitas | 37,985.00 | 37,985.00 |
| 5 | M/s.Medevice Healthcare LLP, Pune | Cermax | 38,646.75 | 38,646.75 |
| 6 | M/s. Jez Heath Care Bangalore | - | 28,825.00 | 28,825.00 |
| 7 | M/s. Hitesh Electric Co., Gujrat | Cermax | 31,500.00 | 31,500.00 |

तरी निम्नतम दर धारक M/s. Explore Medical Technologies, New Delhi यांचे बरोबर चर्चा विनिमय करून त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या रक्कम रू. 28,125/- (अक्षरी रू. अठ्ठावीस हजार एकशे पंचवीस मात्र) चे खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा. व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

**श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्स करीता बल्ब खरेदी करणेकामीचे निम्नतम दरधारक M/s. Explore Medical Technologies, New Delhi यांना दरांबाबत चर्चा करणेसाठी आजचे उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते. परंतु सभेसमोर ते अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्स करीता बल्ब खरेदी करणेकामीचे यांचे एकत्रित रु.२८,१२५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**११ श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे कामी उघडणेत आलेल्या वाणीज्यीक प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय**: मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४२८ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई – निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच मंडपाची वारंवार आवश्यकता भासते याकरीता संस्थानला आवश्यक असेल त्या त्या ठिकाणी फोल्डींग मंडप खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले"*

**प्रस्तावना**: श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे तर्फे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शनिवार दि.०८ जुलै, २०१७ ते सोमवार दि.१० जुलै, २०१७ अखेर श्री गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात, ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेटींग, स्टेज, कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्त करावयाचे मंडप व्यवस्थेत जुने प्रसादालय येथे नवीन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम प्रस्तावीत असल्याने, या भागातील जुन्या इमारती पाडावयाच्या असल्याने व मंदिर परिसर पूर्व बाजूकडील मोकळया जागेत टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणेकामी कार्यवाही सुरु असल्याने सदरहू ठिकाणी करणेत येणारी मंडप व्यवस्थेचा तसेच मंदिर परिसरात दैनंदिन कार्यक्रमासाठी कायम स्वरुपी स्टेज तयार करणेत आले असल्याने, स्टेजच्या खर्चाचा समावेश प्रस्तावात करणेत आलेला नाही.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.४,०९,१९०/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.२४/०६/२०१७ पर्यंत ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर मुदतीत एकुण ५ खालील मंडप ठेकेदारांनी ऑनलाईन ई - निविदा अपलोड केल्या होत्या .

| अ.न. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| १. | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर |
| २. | साई कृपा टेन्ट हाऊस, बेलापूर |
| ३. | विजय मंडप साऊंड सर्व्हीस, औरंगाबाद |
| ४. | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड |
| ५. | न्यु जगदंबा मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, वावी, ता. सिन्नर |

उपरोक्त अपलोड करणेत आलेल्या ई-निविदा दि.२८/०६/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आलेले आहेत. उघडणेत आलेल्या ई– निविदांमध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता सर्व ठेकेदार पात्र आहे. वरील पात्र ई– निविदाधारकांचे वाणिज्यीक लिफाफे (Commercial Bid) त्याच दिवशी उघडणेत आले असून, त्यांचे दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | साई कृपा टेन्ट हाऊस, बेलापूर | **४,४६,९८६/-** | **निम्नतम** |
| २. | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड | ४,५८,४३३/- | -- |
| ३. | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर | ४,९६,६४१/- | -- |
| ४. | न्यु जगदंबा मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, वावी, ता. सिन्नर | ५,२४,५९२/- | -- |
| ५. | विजय मंडप साऊंड सर्व्हीस, औरंगाबाद | ५,५५,१८४/- | -- |

**प्रस्ताव**:- तरी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्त श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी मंडप ठेकेदार साई कृपा टेंन्ट हाऊस, बेलापूर यांचे निम्नतम दरानुसार येणारे रक्कम रु.४,४६,९८६/- मात्रचे खर्चास तसेच याकामी त्यांना कार्यादेश देणेस तसेच उत्सव काळात ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्ताने साईभक्तांचे सुविधेकरिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील निम्नतम दरधारक साई कृपा टेन्ट हाऊस, बेलापूर यांना दरांबाबत चर्चा करणेसाठी आजचे उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते. त्यांनी सभेसमोर चर्चेअंती रु.४,२५,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्ताने साईभक्तांचे सुविधेकरिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी साई कृपा टेन्ट हाऊस, बेलापूर यांचे एकत्रित रु.४,२५,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१२ **सन २०१७ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व्यवस्था करणेकामी उघडणेत आलेल्या वाणीज्यीक प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३९८ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, सन २०१७ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५,२९,३३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावना**: श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शनिवार दि.०८ जुलै २०१७ ते दि.१० जुलै २०१७ अखेर श्रींचा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. साईभक्तांचे पावसापासून संरक्षण व्हावे म्हणून दि.०१/०७/२०१७ ते ३०/०९/२०१७ अखेर ९२ दिवस मंदिर परिसरात विविध ठिकाणी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणेत येतात. सदर मंडपाचा वापर गुरुपौर्णिमा उत्सवात साईभक्तांसाठी होतो. पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे पावसापासून संरक्षण होणेकामी मंदिर परिसरात मंडप उभारणी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार सन २०१७ मधिल पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व्यवस्था करणे कामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.२४/०६/२०१७ पर्यंत ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर मुदतीत खालील ५ मंडप ठेकेदारांनी ऑनलाईन ई - निविदा अपलोड केल्या होत्या .

| अ.न. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| १. | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर |
| २. | साई कृपा टेन्ट हाऊस, बेलापूर |
| ३. | विजय मंडप साऊंड सर्व्हीस, औरंगाबाद |
| ४. | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड |
| ५. | न्यु जगदंबा मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, वावी, ता. सिन्नर |

उपरोक्त अपलोड करणेत आलेल्या ई-निविदा दि.२८/०६/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आलेले आहेत. उघडणेत आलेल्या ई– निविदांमध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता सर्व ठेकेदार पात्र आहे. वरील पात्र ई– निविदाधारकांचे वाणिज्यीक लिफाफे (Commercial Bid) त्याच दिवशी उघडणेत आले असून, त्यांचे दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर | **७,७६,८६५/-** | **निम्नतम** |
| २. | साई कृपा टेन्ट हाऊस, बेलापूर | ७,९८,४०१/- | -- |
| ३. | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, मनमाड | ८,०३,०२२/- | -- |
| ४. | न्यु जगदंबा मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, वावी, ता. सिन्नर | ८,८४,५४५/- | -- |
| ५. | विजय मंडप साऊंड सर्व्हीस, औरंगाबाद | १३,६१,४७५/- | -- |

**प्रस्ताव:-** तरी सन २०१७ मधिल पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व्यवस्था करणे कामी मंडप ठेकेदार न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर, ता. राहुरी यांचे निम्नतम दरानुसार येणारे रक्कम रु.७,७६,८६५/- मात्रचे खर्चास व याकामी त्यांना कार्यादेश देणेस तसेच पावसाळयाच्या कालावधीत ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**सन २०१७ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व्यवस्था करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील निम्नतम दरधारक न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांना दरांबाबत चर्चा करणेसाठी आजचे उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते. सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. परंतु दुरध्वनीद्वारे त्यांनी रु.७,५०,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांचे एकत्रित रु.७,५०,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा व अंतीम दर त्यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे तसेच या कालावधीमध्ये ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप अथवा इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**१३ संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्ता क्र.०५ चे उर्वरीत कामाबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१(२) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

*"...पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-*

*(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."*

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :**

१. नि. क्र. २६३ दि. २४/०४/२००६
२. नि. क्र. १६ (ब) दि.१०/०१/२०१०
३.नि. क्र.५३४ दि.०४/०७/२०१०
४.नि. क्र.१७३ (०७) दि.१९/०२/२०१२
५.नि. क्र.७४६ (फ) दि.१५/०९/२०१२
६. नि. क्र.५४३ दि.२६/०७/२०१३
६. नि. क्र.१८४ दि.१५/०३/२०१४
७. नि. क्र.४८० दि.१२/०६/२०१४
८. नि. क्र.३४३ दि.०८/१०/२०१५
९. नि. क्र.६४४ दि.१९/०९/२०१६
१०. नि.क्र.२५९ दि.२७/०३/२०१७

**मा. शासन निर्णय:**

१. क्र. सासंवि-२००६/८७६/का.सोळा दि.०४/०९/२०१४ (अन्वये रु.८८ कोटी खर्चास मान्यता)
२. क्र.सासंवि-२००६/८७६/प्र.क्र.१३१/का.१६ दि.०८/०६/२०१७ (अन्वये रु.३०.७५ कोटी खर्चास मान्यता)

**प्रस्ताविक:** शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरून शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी ०५ रस्त्यांची कामे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे / मुंबई यांचेमार्फत जुन, २०१२ मध्ये विकसीत करणेत आले आहे. तसेच सदर प्रकल्पातील उर्वरीत ०६ रस्त्यांचे कामासाठी संस्थानमार्फत ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांना रु३३,८३,२६,१९९/- मध्ये देणेत आले होते. सदरहू ०६ रस्त्यांपैकी ठेकेदार रोमन टारमॅट लि., यांनी ०४ रस्त्यांची कामे पुर्ण केली असून, रस्ता क्र.९ चा लक्ष्मीनगर भाग व रस्ता क्र.९अ या रस्त्यांची भूसंपादन करुन संस्थानकडे शिर्डी नगरपंचायतीमार्फत हस्तांतरीत करणेची कार्यवाही अद्यापही पूर्ण झालेली नसल्याने सदरचे काम ठेकेदार यांना करता आले नाही. सदर प्रकल्पासाठी भुसंपादनासह आजपावेतो रु.७०,०७,८४,४९९/- मात्र इतका खर्च झालेला आहे.

या प्रकल्पातील रस्ता क्र.५ या रस्त्यांचे सुरु असलेल्या कामास लगतच्या मालमत्ताधारकांनी घेतलेल्या हरकतींचे नगरपंचायतीकडून निवारण न झाल्याने व न्यायालयीन बाबींमुळे ठेकेदार यांना वाढीव मुदतीतही सदर काम पुर्ण करता आले नाही. सदर रस्त्याचे एकुण १८०० मी.पैकी सुमारे ९०० मी. काम पुर्ण आहे. उर्वरीत सुमारे ९०० मी. अंतरातील खडीकरण काम पुर्ण असुन डांबरीकरण बाकी आहे. सदरचे काम पूर्ण करुन घेणेकामी ई-निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.२५९ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

त्यानुसार रस्ता क्र.०५ चे उर्वरीत कामासाठी ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन दि.०८/०६/२०१७ अखेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. सदरहू कामी एकुण ०६ ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या होत्या. प्राप्त ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.१३/०६/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडणेत आला असून, त्यांची छाननी अहवालामध्ये सहाही ठेकेदार पात्र होत आहे. पात्र ठेकेदारांचे निविदेचा लिफाफा क्र.०२ (Commercal bid) दि.२८/०६/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Bidder | Quted Amount | Remark |
|---|---|---|---|
| 01. | **M/s. Amol Construction & Co., Devlali Pravara** | **1,42,62,655.90** | **L-1** |
| 02. | M/s. N. K. Gade, Sangamner | 1,49,18,632.50 | |
| 03. | S. K. Yewale, Sangamner | 1,50,83,681.30 | |
| 04. | R. K. Sawant, Nashik | 1,67,72,360/- | |
| 05. | S. S. Constructions, Nashik | 1,66,89,211.40 | |
| 06. | M/s. C. T. Dighe, Sangamner | 1,51,10,109.90 | |

**प्रस्ताव:** वरीलप्रमाणे रस्ता क्र.०५ चे उर्वरीत कामासाठी प्राप्त झालेले दरामध्ये ठेकेदार M/s. Amol Construction & Co., Devlali Pravara यांनी देऊ केलेले दर निम्नतम (L-1) स्वरुपाचे (रु.1,42,62,655.90) आहेत. तरी त्यांचे दर स्विकरणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्ता क्र.०५ चे उर्वरीत काम करुन घेणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील निम्नतम दरधारक M/s. Amol Construction & Co., Devlali Pravara यांना दरांबाबत चर्चा करणेसाठी आजचे उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते. परंतु सभेसमोर चर्चेसाठी ते अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्ता क्र.०५ चे उर्वरीत काम करुन घेणेकामी M/s. Amol Construction & Co., Devlali Pravara यांचे एकत्रित रु.१,४२,६२,६५५.९० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१४ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुगणालयाकरिता वार्षिक सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता लागणारे औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदीकामी चर्चा वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता वार्षिक सन २०१७ – २०१८ या वर्षाकरिता लागणारे औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदी करणेकामी प्रस्ताव दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अंदाजे रक्कम रु.५५,९१,९१,८३६.२२ चा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.०५ यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त प्रस्ताव सन २०१६- २०१७ या वर्षासाठी औषधे/ सर्जिकल खरेदीबाबतचा होता, परंतु सन २०१६- २०१७ चा कालावधी संपुष्टात आलेला असून या आर्थिक वर्षामध्ये औषधे/ सर्जिकल साहित्यांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता वेळोवेळी अतिरिक्त खरेदीस मान्यता देण्यात आलेली होती. त्यामुळे सन २०१६- २०१७ साठी वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य On Consignment Material खरेदी करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव रद्द करणेत यावा.

या प्रस्तावामध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य On Consignment Material खरेदीकामी नमूद केलेली कार्यपध्दती सन २०१७-२०१८ या वर्षाच्या खरेदीसाठी राबविण्यात यावी व फक्त उत्पादकांकडूनच औषधे खरेदी करण्यात यावी, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

सदरहू औषध खरेदीची प्रक्रिया राबविणेसाठी वेळोवेळी, आवश्यकतेनुसार रुग्णालय उपसमितीने संस्थान रुग्णालयांसाठी आवश्यक असलेली वार्षिक औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी करतेवेळी गुणवत्ता व दर यांचा विचार करुन, रुग्णांच्या सोयीचे दृष्टीने नामांकित कंपनीची औषधे खरेदी करावी, असे ठरले.

वरील ठरावास अनुसरुन दि.१३/०३/२०१७ रोजीचे मंजूर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२४/०३/२०१७ ते १५/०४/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या, त्यानुसार २५/०३/२०१७ रोजीचे ई– मेलव्दारे ३७३ कंपन्यांना व २६८ डिस्ट्रीब्युटरला यांना ई – निविदा भरणेकामी अवगत करण्यात आले होते. तसेच दि. २४/०३/२०१७ रोजीचे परिपत्रकान्वये श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील डॉक्टर / तंत्रज्ञ यांना आपणाकडे येणारे कंपनीचे प्रतिनिधी यांना ई– निविदा भरणेकामी सांगण्यात यावे असे कळविले होते. त्यानुसार प्रि – बिड मिटींग दि. २९/०३/२०१७ रोजी ठेवण्यात आली होती. प्रि – बिड मिटींगमध्ये पुरवठाधारकांनी उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन करुन दि. ०४/०४/२०१७ रोजी अपलोड करण्यात आले होते.

परंतु, ब-याच निविदाधारकांनी दूरध्वनीवरुन सदरहू ई-निविदेस मुदतवाढ मिळणेकामी विनंती केल्यामुळे तसेच काही निविदाधारकांनी ई-मेल पत्राव्दारे दि.१४ व १५/०४/२०१७ रोजी सरकारी सुट्टी असल्यामुळे निविदा भरण्यास अडचणी येत असल्यामुळे कमीत- कमी १ आठवडयाची मुदतवाढ मिळावी असे कळविले होते. त्यानुसार, दि. १५/०४/२०१७ पर्यंत १६ पार्टकरिता ८९ ऑनलाईन निविदा प्राप्त झाल्या होत्या. खरेदीकामी जास्तीत– जास्त प्रतिसाद मिळणेकामी पहिल्यांदा दि. २४/०४/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार १२६ ऑनलाईन ई – निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार दि. २४/०४/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दुस-यांदा दि. ०१/०५/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यास अनुसरुन १४८ ऑनलाईन ई – निविदा प्राप्त झाल्या आहेत. तसेच तांत्रिक सिलबंद निविदा (Hard Copy) दि.०५/०५/२०१७ पर्यंत स्वीकारणेस मुदतवाढ देण्यात आली होती.

दि. ११/०५/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे मा. विश्वस्त मंडळातील सदस्य, मा. कार्यकारी अधिकारी सो., मा. उपकार्यकारी अधिकारी सो., मा. मुख्यलेखाधिकारी सो., मा. प्रशासकीय अधिकारी सो. तसेच उपस्थित पुरवठाधारकांचे समक्ष प्राप्त झालेल्या १४८ तांत्रिक ऑनलाईन ई – निविदा उघण्यात आलेल्या आहेत.

प्राप्त झालेल्या तांत्रिक ऑनलाईन ई – निविदा वित्त विभागाचे व्यवस्थापक व त्यांचे कर्मचारी, यांचेकडून तांत्रिक बाबींचे कागदपत्र तपासणी करुन घेण्यत्त आले आहेत. तदनंतर संस्थान विभागाचे अंतर्गत लेखापरिक्षक कर्मचारी यांचेकडून सदर तसेच तांत्रिक बाबीं तपासून घेण्यात्त आल्या होत्या. तसेच संस्थानचे वरिष्ठ अधिकारी यांनी देखील तांत्रिक बाबींचे कागदपत्र औषध भांडार विभागात येऊन तपासणी केली आहे

वरीलप्रमाणे तांत्रिक बाबींची तपासणी केलेल्या बाबींचा तसेच १६ पार्टकरिता प्राप्त झालेल्या १४८ ऑनलाईन ई – निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **Sr. No.** | **Name of Item** | **Teder Received** | **Tender Accept** | **Tender Reject** |
|---|---|---|---|---|
| **Part A** | | | | |
| 1 | Tablets | 10 | 6 | 4 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | Injection | 19 | 13 | 6 |
| 3 | Lab. Chemicals | 13 | 8 | 5 |
| 4 | CDL | 18 | 14 | 4 |
| 5 | X-ray, CT, MRI | 04 | 04 | 0 |
| 6 | Miscellaneous | 07 | 04 | 3 |
| 7 | Ayurvedic & Homeopathic Medicines | 07 | 07 | 0 |
| 8 | Catgut & Suture Material | 06 | 05 | 1 |
| 9 | Liquid Orals (Syrup) | 05 | 03 | 2 |
| 10 | Ointment | 04 | 03 | 1 |
| 11 | Eye, Ear & Nasal Drops | 05 | 01 | 4 |
| 12 | OTM | 23 | 18 | 5 |
| 13 | Dialysis Unit | 04 | 2 | 2 |
| 14 | Dental | 1 | 0 | 1 |
| 15 | Neuro | 1 | 0 | 1 |
| **Part B** | | | | |
| 16 | On Consignment | 21 | 12 | 9 |
| | **Total** | **148** | **100** | **48** |

त्यानुसार पात्र ऑनलाईन १०० कमर्शिअल ई – निविदा दि. ०७/०६/२०१७ रोजी खरेदी समिती व मा.विश्वस्त मंडळातील सदस्य, मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.उपकार्यकारी अधिकारी सो., मा.मुख्यलेखाधिकारी सो., मा. प्रशासकीय अधिकारी सो., तसेच उपस्थित पुरवठाधारकांचे समक्ष उघण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्राप्त निविदाधारकांचा दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यामधील एकूण १६ पार्टमधील ३०३६ आयटम पैकी ५२९ आयटमकरिता ०३ व ०३ पेक्षा जास्त दर प्राप्त झाले आहेत. तसेच ४१४ आयटमकरिता ०२ निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहेत. व ७२० आयटमकरिता ०१ निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहे. उर्वरित १३७३ आयटमकरिता कुठल्याच निविदाधारकांचे दर प्राप्त झाले नाहीत.

**त्या आयटमचा तपशिल खालीलप्रमाणे:-**

| **Part "A"** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr.No.** | **Medicine Details** | **Total Item** | **Nil Tender** | **Total Amt. in Rs.** | **1 Tender** | **Total Amt. in Rs.** | **2 Tender** | **Total Amt. in Rs.** | **3 or More tender** | **Total Amt. in Rs.** | **Sanction Amt. in Rs.** |
| 1 | Tablets | 291 | 189 | 11948192.85 | 73 | 8146152.39 | 23 | 3273201.27 | 6 | 3417124.31 | 26784670.82 |
| 2 | Injection | 246 | 104 | 16479730.16 | 74 | 38236623.31 | 46 | 40509426.55 | 22 | 23462827.02 | 118688607.04 |
| 3 | Liquid Orals (Syrup) | 61 | 54 | 5270705.32 | 7 | 1179429.10 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 6450134.42 |
| 4 | Ointment | 51 | 42 | 837157.83 | 9 | 392331.98 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 1229489.81 |
| 5 | Eye, Ear & Nasal Drops | 42 | 40 | 7340245.09 | 2 | 3557385.56 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 10897630.65 |
| 6 | Lab. Chemicals | 381 | 217 | 23578790.07 | 64 | 17606165.32 | 21 | 2131380.95 | 79 | 14707036.81 | 58023373.15 |
| 7 | O.T.& Other Surgical Material | 598 | 211 | 17841886.38 | 172 | 20762022.61 | 113 | 28904341.28 | 102 | 35359920.22 | 102868170.50 |
| 8 | CDL | 400 | 108 | 26662314.15 | 123 | 25896784.98 | 81 | 30015984.75 | 88 | 45238967.85 | 127814051.73 |
| 9 | Neuro O.T. Surgical Material | 36 | 36 | 2755856.06 | | | | | | | 2755856.06 |
| 10 | Dialysis Unit | 10 | 3 | 53886.53 | 1 | 235462.50 | 4 | 506535.18 | 2 | 726775.35 | 1522659.55 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 11 | Miscellaneous | 128 | 114 | 12210054.46 | 14 | 3043693.04 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 15253747.50 |
| 12 | Dental Material | 43 | 43 | 647164.77 | | | | | | | 647164.77 |
| 13 | X-ray, CT, MRI | 14 | 3 | 964779.60 | 7 | 11015652.56 | 4 | 17892954.68 | 0 | 0.00 | 29873386.84 |
| 14 | Catgut & Suture Material | 213 | 3 | 333325.88 | 25 | 7412219.28 | 41 | 45336900.73 | 144 | 38320126.74 | 91402572.63 |
| 15 | Ayurvedic & Homeopathic Medicines | 232 | 34 | 1368633.40 | 99 | 1333088.45 | 58 | 1219481.67 | 41 | 793840.04 | 4715043.56 |
| | | 10 | 0 | 0.00 | 10 | 63236.25 | 0 | 0.00 | 0 | 0.00 | 63236.25 |
| | **Total** | **2756** | **1201** | **128292722.54** | **680** | **138880247.34** | **391** | **169790207.06** | **484** | **162026618.34** | **598989795.28** |
| | **Part "B"** | | | | | | | | | | |
| 1 | On Consignment | 280 | 172 | | 40 | | 23 | | 45 | | 100000000.00 |
| | | | | | | | | | | **Total Amt. Part "A" + "B" -** | **698989795.28** |
| | | | | | | | | | | **Less 20%** | **559191836.22** |

१) Part- B– मधील सर्व प्रकारच्या Guide wire (Coronary) याची किंमत व त्याचा दैनंदिन खप पाहता त्या Part– A मधील खरेदी प्रक्रियेनुसार खरेदी केल्यास दैनंदिन Cardiac O.T. मध्ये शस्त्रक्रिया करतांना रुग्णांना लवकरात– लवकर उपलब्ध करुन देण्यास मदत होईल. त्याचा मागील वर्षातील खप बघता त्याची नगांची संख्याठरवून पुरवठा आदेश देण्यात येऊ शकतो.

२) O. T. & Other Material मध्ये M/s. Ascent Meditech Ltd., Mumbai यांचे कमर्शिअल बाबींच्या तुलनात्मक तक्त्यामध्ये त्यांचे नावाऐवजी M/s. BSN Medical Pvt. Ltd., यांचे नावाने भरल्याचे दिसते. परंतु, सदरबाबत M/s. Ascent Meditech Ltd., Mumbai यांना विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नजर चुकीने असे झाले असून दिलेले दर हे M/s. Ascent Meditech Ltd., Mumbai यांचेच आहे. तेंव्हा तुलनात्मक तक्यात ते घेण्यात आले आहेत.

**शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र. ८२ भाग – III उद्योग– ४, दि. ०१/१२/२०१६ अन्वये प्रकरण ४ मधील मुद्या क्र. ४.४.३.१ – निविदा कालावधीस मुदतवाढ:-**

**ब)** दोन निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-) २० **%** ते (+) १० % तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. या किंमत श्रेणीमध्ये **(**Price Band**)** किंमती न आल्यास फेरनिविदा काढावी. ब-याच ठिकाणी वास्तविक किंमत ही आगोदर ठरलेल्या किंमतीच्या फारच कमी आहे. जर सदर सर्व औषधे निम्नत्तम दराने खरेदी केल्यास संस्थानला कुठलेही आर्थिक नुकसान होणार नाही त्यामुळे ज्या ठिकाणी वास्तविक किंमत ही अगोदर ठरविलेल्या किंमतीच्या कमी आहे अशा सर्व औषधे/ सर्जिकल साहित्य निम्नत्तम दराने खरेदी करता येईल असे नम्र मत आहे.

त्यानुसार पार्ट A व B मिळून ४१४ आयटमकरीता रूग्णालयाची गरज पाहता वापरणा-या संबंधित डॉक्टरांसमक्ष निम्नत्तम दरासाठी निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी करून पुढील निर्णय घेता येईल.

वरीलप्रमाणे दोन किंवा किंवा त्यापेक्षा जास्त प्राप्त निविदाधारकांमधील निम्नत्तम दर निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी केल्यास बाजारभावापेक्षा कमी दराने मटेरिअल प्राप्त होऊन संस्थानला जास्तीत –जास्त आर्थिक फायदा होऊन खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता निर्माण होईल.

त्यानुसार दि. २०/०६/२०१७ चे मा. उपसमिती सभेपुढे चर्चा/वाटाघाटी करताना खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाकरीता वार्षिक सन २०१७-१८ या वर्षाकरीता आवश्यक असणारी औषधे/सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदी करणेसाठी रूग्णांच्या सोयीचे दृष्टीने जेनेरिक औषधे खरेदी न करता फक्त नामांकित कंपन्यांची औषधे खरेदी करणेत यावी तसेच यासाठी पुढील उपसमिती सभेसमोर कंपनीनिहाय निम्नत्तम दर असलेल्या Item ची यादी तयार करून संबंधितांना चर्चेसाठी बोलविणेत यावे अशी या उपसमितीची शिफारस करण्यात आलेली आहे."

**विभागाचा अभिप्राय:-** वरीलप्रमाणे निम्नत्तम दराने नामांकित कंपनीची औषधे/सर्जिकल साहित्य खरेदी केल्यास रूग्णांच्या दृष्टीने फायदयाचे होईल असे नम्र मत आहे.

त्यानुसार पार्ट A करीता ४१७ आयटम व पार्ट B (On Consignment) साठी २८ आयटम करीता एकुण ४० निविदाधारकांना तसेच संस्थान नियमावलीप्रमाणे १९ आयटमचे (+) १०% ते (+) २५% असणारे दर पाहता त्यासाठी निविदाधारकांना समक्ष बोलावून अगोदर ठरलेली अंदाजित किंमतीच्या (+) १०% च्या आत किंमत येण्यासाठी चर्चा / वाटाघाटी करून निर्णय घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करण्यासाठी सविनय सादर.

**प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक आजचे सभेसमोर उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी चर्चेअंती खालील प्रमाणे अंतीम दर देऊ केले.**

**Part-A**

**Supplier List for Medicine & Surgical Material 2017-18. (Negotiation Item)**

| Sr. No. | Name of Supplier | Item Head | Total Amt. in Rs. | Discount | Total Amt. in Rs. after Negotiation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 M India Limited, Pune | CDL | 16800525.00 | 1% | 1663719.75 |
| | 3 M India Limited, Pune | OTM | 2392185.00 | 1% | 2368263.15 |
| 2 | Abbott Healthcare Pvt. Ltd., Mumbai | CDL | 556500.00 | Per Item Rs. 92.8571 | 550000.00 |
| 3 | Abhinav Health Care Products Pvt Ltd., Mumbai | Ayur | 151130.00 | 1% | 149618.70 |
| 4 | Alere Medical Pvt. Ltd., Haryana | Lab Chem | 2638104.46 | 1.50% | 2598532.89 |
| 5 | Alpa Laboratories Ltd., Indore (M.P.) | Inj | 4485378.28 | 1.5% & Negotiation Item - Estimated Rate Final | 4403503.07 |
| 6 | Anjani Pharmacetucials, Raisen (M.P.) | Ayur | 66651.25 | 1% | 65984.74 |
| 7 | Ascent Meditech Limited, Mumbai (BSN MEDICAL INDIA PVT LTD ) | OTM | 2890500.00 | 1% | 2861595.00 |
| 8 | Atlantic Pharmaceuticals, Mumbai | Dialysis | 74800.00 | Not Given | 74800.00 |
| 9 | B L Lifesciences Pvt Ltd., New Delhi | CDL | 32281737.50 | 1.30% | 31862074.91 |
| | B L Lifesciences Pvt Ltd., New Delhi | OTM | 4324378.30 | Not Given | 4324378.30 |
| 10 | B.Braun Medical India Pvt Ltd., Mumbai | Dialysis | 35000.00 | Not Given | 35000.00 |
| | B.Braun Medical India Pvt. Ltd., Mumbai | Suture | 2196508.80 | Not Given | 2196508.80 |
| 11 | Becton Dickinson India Pvt. Ltd., Mumbai | OTM | 429344.00 | 1% | 425050.56 |
| 12 | Boston Scientific India Pvt Ltd., Gurgaon | CDL | 4504976.68 | 2% | 4414877.15 |
| 13 | Capro Labs Exports India Pvt Ltd.,Bangalore | Ayur | 41500.00 | Not Given | |
| 14 | Covidien Healthcare India Pvt. Ltd., Mumbai | Suture | 10985915.79 | 1% & Negotiation Item - Estimated Rate Final | 10864824.63 |
| | Covidien Healthcare India Pvt. Ltd., Mumbai | OTM | 551355.00 | 2% | 540327.90 |
| 15 | Dabur India Limited, New Delhi | Ayur | 18166.00 | 0.5% & Negotiation Item - Estimated Rate Final | 18075.17 |
| 16 | Datt Mediproducts Pvt Ltd., New Delhi | OTM | 275857.05 | 2% | 270339.91 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 17 | Edwards Lifesciences (India) Private Limited, Mumbai | CDL | 674160.00 | Not Given | 674160.00 |
| 18 | Emcure Pharmaceuticals Ltd, Pune | tab | 1976181.40 | 1% | 1956419.59 |
| | Emcure Pharmaceuticals Ltd., Pune | Inj | 9331381.40 | 1% | 9238067.59 |
| 19 | Fresenius Medical Care India Pvt. Ltd., New Delhi | Dialysis | 546320.00 | 2% | 535393.60 |
| 20 | Fujifilm India Pvt Ltd., Chennai | Xray | 14185500.00 | 3% & Given Donation - 1 printer + 1 CR System + 8 Cassettes + 3 year Warranty Except Cassettes | 13759935.00 |
| 21 | Hindustan Syringes And Medical Devices Ltd., Haryana | OTM | 697117.15 | Not Given | 697117.15 |
| 22 | India Medtronic Pvt Ltd., Mumbai | CDL | 7966999.00 | Not Given | 7966999.00 |
| 23 | Inducare Pharma Pvt.Ltd., Pune | Ayur | 681120.00 | 0.5% | 677714.40 |
| 24 | J Mitra And Co Pvt. Ltd., New Delhi | Lab Chem | 107539.00 | Not Given | 107539.00 |
| 25 | Johnson And Johnson Private Limited, Mumbai | Suture | 3624392.00 | Not Given | 3624392.00 |
| | Johnson And Johnson Private Limited, Mumbai | CDL | 40000.00 | Not Given | 40000.00 |
| | Johnson And Johnson Private Limited, Mumbai | OTM | 64837.50 | Not Given | 64837.50 |
| 26 | Lotus Surgicals Pvt Ltd., Mumbai | Suture | 6389493.80 | 3% | 6197808.99 |
| 27 | Meril Diagnostics Pvt. Ltd.,Vapi | Lab Chem | 2145863.71 | 0.5% | 2135134.40 |
| 28 | Meril Endo Surgery Pvt. Ltd., Mumbai | Suture | 7930823.00 | 0.5% | 7891168.89 |
| 29 | MRK Healthcare Pvt. Ltd., Mumbai | OTM | 11629595.58 | 0.5% | 11571447.60 |
| 30 | Neon Laboratories Limited, Mumbai | Inj | 925840.70 | Not Given | 925840.70 |
| 31 | Oyster Medisafe Pvt. Ltd., Telngana | OTM | 4580274.50 | 2% | 4488669.01 |
| 32 | Poly Medicure Ltd., Delhi | OTM | 79874.82 | 1% & Negotiation Item - Estimated Rate Final | 4149482.35 |
| 33 | Raman And Weil Pvt Ltd., Mumbai | OTM | 1493100.00 | 2% | 1463238.00 |
| 34 | Romsons Scientific And Surgical Industries Pvt. Ltd., New Delhi | CDL | 1029773.10 | 1% | 1019475.37 |
| | Romsons Scientific And Surgical Industries Pvt. Ltd., New Delhi | OTM | 2355975.32 | 1% | 2332415.57 |
| 35 | Smiths Medical India Pvt Ltd., Mumbai | CDL | 1900000.00 | 1% | 1881000.00 |
| | Smiths Medical India Pvt Ltd., Mumbai | OTM | 355950.30 | 1% | 352390.80 |
| 36 | Terumo India Pvt. Ltd., Haryana | CDL | 4113910.00 | Not Given | 4113910.00 |
| 37 | Themis Medicare Limited, Mumbai | Inj | 1788711.95 | 0.5% | 1779768.39 |
| 38 | Trivitron Healthcare Pvt.Ltd., Mumbai | Lab Chem | 186348.75 | Not Given | 186348.75 |
| 39 | Tulip Diagnostics Pvt Ltd., Goa | Lab Chem | 1923745.40 | 1% & Negotiation Item - Estimated Rate Final | 1802447.95 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Tulip Diagnostics Pvt Ltd., Goa (Bioshields Division) | OTM | 3597674.00 | 1% | 3561697.26 |
| | **Total Amt. in Rs.** | | **178023015.49** | | **164882293.47** |

## Part-B

| Sr. No. | Tender Sr. No. | Name of Item | Qty. | Rate Per in Rs. | Rate per in Rs. After Negotiation |
|---|---|---|---|---|---|
| | | **Name of Supplier : Abbott Healthcare Pvt. Ltd.,Mumbai** | | | |
| 1 | 27 | SPECIALITY WIRES (0.014") | 1 | 4505.0000 | 4500.0000 |
| 2 | 27 | SPECIALITY WIRES (0.014") | 1 | 4505.0000 | 4500.0000 |
| 3 | 32 | PERIPHERAL ANGIOPLASTY WIRES (0.014" & 0.018") | 1 | 3972.5000 | 3972.5000 |
| 4 | 32 | PERIPHERAL ANGIOPLASTY WIRES (0.014" & 0.018") | 1 | 3972.5000 | 3972.5000 |
| | | **Name of Supplier : Boston Scientific India Pvt Ltd., Gurgaon** | | | |
| 1 | 4 | RENAL STENT (ALL SIZE) (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 21200.0000 | 20000.0000 |
| 2 | 5 | PERIPHERAL ANGIOPLASTY STENT (ALL SIZE) (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 21200.0000 | 21200.0000 |
| 3 | 5 | PERIPHERAL ANGIOPLASTY STENT (ALL SIZE) (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 21200.0000 | 21200.0000 |
| 4 | 6 | CAROTID STENT (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 33920.0000 | 33920.0000 |
| 5 | 8 | NYLON PERIPHERAL BALLOON (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 12720.0000 | 12720.0000 |
| 6 | 11 | PERIPHERAL BALLOON (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 10600.0000 | 10000.0000 |
| 7 | 13 | MAXI LD BALLOON ALL SIZE | 1 | 10600.0000 | 10600.0000 |
| 8 | 26 | WORK HOARSE WIRES (0.014") | 1 | 2383.9400 | 2383.9400 |
| 9 | 26 | WORK HOARSE WIRES (0.014") | 1 | 2383.9400 | 2383.9400 |
| 10 | 28 | EXTRA SUPPORT WIRES (0.014") | 1 | 2383.9400 | 2383.9400 |
| 11 | 28 | EXTRA SUPPORT WIRES (0.014") | 1 | 2383.9400 | 2383.9400 |
| 12 | 28 | EXTRA SUPPORT WIRES (0.014") | 1 | 2383.9400 | 2383.9400 |
| 13 | 28 | EXTRA SUPPORT WIRES (0.014") | 1 | 2383.9400 | 2383.9400 |
| 14 | 28 | EXTRA SUPPORT WIRES (0.014") | 1 | 2383.9400 | 2383.9400 |
| 15 | 29 | CTO WIRES (0.014") | 1 | 2383.9400 | 2383.9400 |
| 16 | 38 | CAROTID FILTER | 1 | 41128.0000 | 41128.0000 |
| | | **Name of Supplier : India Medtronic Pvt Ltd., Mumbai** | | | |
| 1 | 43 | CONDUIT VALVE PULMONARY & AORTIC (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 98000.0000 | 98000.0000 |
| | | **Name of Supplier : Meril Life Sciences India Private Limited, Mumbai** | | | |
| 1 | 21 | ASD DEVICE SET (MENTIONED ACCESSORIES) | 1 | 42000.0000 | 42000.0000 |
| 2 | 21 | ASD DEVICE SET (MENTIONED ACCESSORIES) | 1 | 12000.0000 | 12000.0000 |
| | 21 | | | **54000.0000** | **54000.0000** |
| 3 | 23 | PDA DEVICE SET (MENTIONED ACCESSORIES) | 1 | 35000.0000 | 30000.0000 |
| 4 | 23 | PDA DEVICE SET (MENTIONED ACCESSORIES) | 1 | 12000.0000 | 12000.0000 |
| | 23 | | | **47000.0000** | **42000.0000** |
| | | **Name of Supplier : Sahajanand Medical Technologies Pvt. Ltd., Surat** | | | |
| 1 | 1 | BARE METAL STENT (ALL SIZE) (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 4768.9400 | 4768.9400 |
| 2 | 2 | DRUG COATING STENT (ALL SIZE) (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 7418.9400 | 7418.9400 |
| 3 | 3 | COBALT CHRONIUM STENT (ALL SIZE) (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 4768.9400 | 4768.9400 |
| 4 | 7 | NC BALLOON (ALL SIZE) (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 3402.6000 | 3300.0000 |
| 5 | 12 | PTCA BALLOON (ALL SIZE) MONORAIL (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 3402.6000 | 3300.0000 |
| | | **Name of Supplier : St Jude Medical India Pvt Ltd., Mumbai** | | | |
| 1 | 41 | HEART VALVE TISSUE AORTIC (ALL TYPE) (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 59000.0000 | 58000.0000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 41 | HEART VALVE TISSUE AORTIC (ALL TYPE) (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 59000.0000 | 58000.0000 |
| 3 | 42 | HEART VALVE TISSUE MITRAL (ALL TYPE) (CE MARK / USFDA / INDIAN FDA / DCGI Approved only.) | 1 | 59000.0000 | 58000.0000 |
| 4 | 54 | ANNULOPLASTY RING MITRAL (TRICUSPID) (ALL SIZE) | 1 | 32000.0000 | 31000.0000 |
| 5 | 25 | PERMANENT PACEMAKER (ALL TYPE) USFDA APPROVED ONLY | 1 | 42000.0000 | 42000.0000 |
| 6 | 25 | PERMANENT PACEMAKER (ALL TYPE) USFDA APPROVED ONLY | 1 | 45000.0000 | 45000.0000 |
| 7 | 25 | PERMANENT PACEMAKER (ALL TYPE) USFDA APPROVED ONLY | 1 | 67000.0000 | 67000.0000 |
| | | **Name of Supplier : Stryker India Pvt.Ltd., Haryana** | | | |
| 1 | 56 | TKR SET *(Rates should be quote with all contents / accessories for complete set.)* | 1 | 1908.0000 | 1159.0000 |
| 2 | 56 | TKR SET *(Rates should be quote with all contents / accessories for complete set.)* | 1 | 11554.0000 | 10805.0000 |
| 3 | 56 | TKR SET *(Rates should be quote with all contents / accessories for complete set.)* | 1 | 16454.0000 | 15705.0000 |
| 4 | 56 | TKR SET *(Rates should be quote with all contents / accessories for complete set.)* | 1 | 19080.0000 | 18331.0000 |
| | | | | **48996.0000** | **46000.0000** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता वार्षिक सन २०१७–२०१८ या वर्षाकरिता लागणारे औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदीकामी निम्नतम पुरवठाधारकांनी उपरोक्त प्रमाणे देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन संबधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, तसेच जी औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material करीता तीन पेक्षा कमी निवीदा प्राप्त झाल्या आहे अथवा तीन पेक्षा कमी पुरवठा धारक प्राप्त ठरलेले आहे, अशा औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material करीता फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

१५ **सन २०१७-१८ गाईचे शुद्ध तुप, टोण्ड गाय दुध व पेपर पिशवी खरेदी फेर ई-निविदांचे तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचे Commercial Bid उघडणेबाबत.**

सन २०१७-१८ वर्षासाठी गाईचे शुद्ध तुप आणि किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी ग्रुपवाईज फेर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| ग्रुप | तपशिल |
|---|---|
| A | हरभरा व इतर किराणामाल |
| B | मसाले |
| C | ड्राय फ्रुट्स |
| D | पत्रावळ व द्रोण |
| E | चहा पावडर व कॉफी |
| F | खाद्यतेल |
| G | गहु, तांदुळ |
| H | टोण्ड गाय दुध |
| I | पेपर पिशवी |

उपरोक्त ग्रुपमधील टोण्ड गाय दुध व पेपर पिशवी, तसेच गाईचे शुद्ध तुप या Items ची तातडीची गरज असल्याने या निविदांचे Commercial Bid उघडून अंतिम निर्णयहोणे गरजेचे आहे. सदर ई-निविदांतील तांत्रिक निविदा दिनांक २८.०६.२०१७ रोजी उघडण्यात येऊन कागदपत्रांची छाननी करण्यात आली आहे. यामधील निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे –

**अ) ग्रुप H,H1,H2 – टोण्ड गाय दुध**

१. गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पा. सह. सह.दुध. उत्पादक संघ मर्यादित, कोपरगाव
२. व्ही.एम.डिस्ट्रिब्युटर्स, नाशिक
३. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगांव

४. प्रभात डेअरी प्रा.लि., रांजणखोल

वरीलपैकी अ.नं.१ ते ३ निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले आहेत.

**ब) गाईचे शुद्ध तुप**

१. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी
२. स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला
३. क्वालिटी लिमीटेड, दिल्ली
४. प्रभात डेअरी लि., रांजणखोल
५. कर्नाल मिल्क फुड्स लि., कर्नाल (हरियाणा)
६. पुणे जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ, कात्रज
७. फेबल फुड प्रॉडक्ट्स, मुंबई

वरीलपैकी अ.नं.१ ते २ निविदाधारक तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरले आहेत. तर अ.नं. ३ क्वालिटी लिमीटेड, दिल्ली यांनी Vat Clearence Certificate A.Y.2015-16 जोडले आहे. मागील निविदेचे वेळेस ऑनलाईन Vat Clearence Certificate A.Y.2016-17 जोडले आहे. म्हणुन त्यांची निविदा पात्र ठरली आहे.

**क) ग्रुप I – पेपर पिशवी**

१. हरिओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापुर
२. विजय अदमाने,

वरीलपैकी अ.नं.१ यांची एकच निविदा पात्र ठरली आहे.

महाराष्ट्र शासनाचे नवीन खरेदी नियमावलीतील नियम क्र. ४.४.३.१ मध्ये "कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतरदेखील) ३ निविदापेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल, अशा प्रसंगी किंमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल." अशी तरतूद आहे.

1) CT Scanमशिन 12 वर्षापासून नियमित वापरात असल्यामुळे त्याची नेहमी नियमित व तातडीची दुरूस्ती व देखभाल करणे अत्यावश्यक असते. यापुढील काळात मशिन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मध्ये नसल्यास व CT Scan मशिनची जर दुरूस्ती व देखभाल वेळेत न झाल्यामुळे मशिन नादुरुस्त होउन काही महागडे स्पेअर पार्टस् (उदा. एक्स-रे टयुब -किंमत-रु.46 लाख, डिटेक्टर मॉडयुल -रु.60 लाख, ई-बॉक्स-रु.17 लाख इ.) बदलणे आवश्यक असतील अशा वेळी सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्चे खर्चास मान्यता घेणेकरीता प्रत्येक वेळी विविध पार्टस्करीता वेगवेगळे स्वतंत्र प्रस्ताव आवश्यकतेनुसार वेळावेळी सादर करणे प्रस्तावित पद्धतीनुसार आवश्यक राहील.तसेच त्यास मान्यता मिळून कंपनीस कार्यादेश किंवा पुरवठा आदेश देउन प्रत्यक्षात मशिनची दुरूस्ती करणेस अधिक कालावधी लागू शकतो. दरम्यानच्या मशिन नादुरूस्त असण्याच्या कालावधीमध्ये अत्यवस्थ रूग्णांना अत्यावश्यक सेवा देणे शक्य होणार नाही.
2) तसेच सदर प्रकारे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केलेले नसताना मशिन्सची दुरूस्ती करणेस संस्थानला वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रकमेपेक्षा (सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्चा) अधिक खर्च येउ शकतो.
3) तसेच सध्या नवीन CT Scan मशिन खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू असुन सध्याRetender इतपर्यंत झालेली आहे.नवीन मशिन खरेदीस अंदाजे सहाते आठमहिन्यांचा कालावधी लागु शकतो. तो पर्यतच्या काळात उपलब्ध मशिन व्यवस्थित कार्यान्वीत राहणे कामी कंपनीकडे सध्याचे मशिनचे नवीन मशिन खरेदी होईपर्यंत प्रतिमाह दराने CMC करणे संयुक्तीक राहीलअसे नम्र मत आहे

तरी CT Scan मशीनचे मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा.ली. मुंबई यांचेकडे दि17/07/2017 ते दि.16/07/2018 या कालावधीसाठी प्रतिमाह दराने कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिसकॉन्ट्रॅक्ट करीता करणे कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करुन दर निश्चित करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण खर्चास मान्यता असावी.

**सी.टी.स्कॅन (64 Slice) मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी सदरहू मशिनची उत्पादक कंपनी मे.सिमेन्स लि., मुंबई यांचे प्रतिनिधी दरांवर चर्चा/ वाटाघाटी करणेसाठी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी सी.टी.स्कॅन (64 Slice) मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी दर दिल्यानंतर जी.एस.टी. दरामध्ये वाढ झालेली आहे, सदरहू वाढीव रक्कम मिळावी, अशी सभेस विनंती केली. परंतु जी.एस.टी. ची वाढीव रक्कम देता येणार नाही, असे उपसमितीने त्यांना सांगितले. यानंतर विस्तृत चर्चेअंती त्यांनीसी.टी.स्कॅन (64 Slice) मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी जी.एस.टी.सह एकत्रित रु.५८,००,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयासाठी नवीन सी.टी.स्कॅन (64 Slice) मशिन खरेदीसाठीची ई-निविदा प्रक्रिया अंतीम टप्प्यामध्ये असून, नवीन मशिन कार्यान्वीत होईपर्यंत, जुन्या सी.टी.स्कॅन मशिनचे, मे.सिमेन्स लि., मुंबई यांचे जी.एस.टी.सह एकत्रित रु.५८,००,०००/- मात्र अंतीम वार्षिक दर स्विकारणेत यावे. परंतु सी.टी.स्कॅन (64 Slice) मशिनची टयुब बदलण्याची आवश्यकता भासल्यासच त्यांना पुर्ण रक्कम आदा करावी, अन्यथा प्रति माह दराने त्यांचेबरोबर वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेत यावे व याप्रमाणे अंतीम दर मे.सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून लेखी स्वरुपात घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०८ **एम.आर.आय.मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणेबाबत .**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** 1) पृ. क्र. 356, समितीची कर्तव्ये व अधिकार, 17 (2) झ
2) पृ. क्र. 359, विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग, 21 (1) क

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** एम.आर.आय.मशिन खरेदी, दि.14/10/2006,विषय क्र.13, निर्णय क्र.860

**प्रस्ताविक:** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागाकरीता वरील संदर्भीय पुरवठा आदेशान्वये मे. सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडून MagnetomAvantoमशीन एकुण रू. 5,05,00,000/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आलेआहे. सदरचे मशिन दि. 1/06/07 रोजी कार्यान्वित करण्यात आलेले आहे. कंपनीने मशीनकरीता दिलेला दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 31/05/2009 रोजी संपला आहे. सदर मशिनची दि. 31/03/2017 ची घसारा वजा किंमत रू.15,99,656/- इतकी आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी झालेला ठराव, कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट आणि कंपनीस दिलेल्या पुरवठा आदेशातील अटीनुसार पुढील कालावधीतील दुरूस्ती व देखभालीकरीता वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे

'मशिनचा वॉरंटी कालावधी दोन वर्षाचा असून तो संपुष्टात आल्यानंतर कंपनीकडे CMC कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात यावे. तसेच याकामी कंपनीस पहिल्या वर्षी 20 लाख रूपये व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षास 20 लाख अधिक 5 टक्के याप्रमाणे दरवर्षी 5 टक्के वाढ करून सदर CMC साठी आगाऊ रक्कम देण्यात यावी आणि सर्व्हीस टॅक्स वेगळा देण्यात यावा असे ठरले आहे.

वरील अटीनुसार आजपावेतो मे. सिमेन्स हेल्थकेअर मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करीता करणेत आलेला खर्च, मशिनचे दुरूस्ती करीता कंपनीने वापरलेल्या स्पेअर पार्टस् ची अंदाजे किंमत आणि सदर मशिनवर आजपावेतो तपासणी करणेत आलेल्या पेशंटची संख्या इ. वर्षनिहाय माहीती खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Period | CAMC Amount Incl. of all Taxes in Rs. | Approx. Cost of SpareParts in Rs.(replaced by Company in CAMC) | Total No. of Patients Done |
|---|---|---|---|---|
| 1 | 01/06/2009 to 31/05/2010 | 22,06,000/- | 31,000,00/- | 5,530 |
| 2 | 01/06/2010 to 31/05/2011 | 23,16,300/- | 10,000,00/- | 10,673 |
| 3 | 01/06/2011 to 31/05/2012 | 24,32,115/- | 13,000,00/- | 11,694 |
| 4 | 01/06/2012 to 31/05/2013 | 26,04,008/- | 43,11,222/- | 13,050 |
| 5 | 01/06/2013 to31/05/2014 | 27,31,486/- | 23,62,500/- | 13,449 |
| 6 | 01/06/2014 to31/05/2015 | 28,68,060/- | 4,75,605.31/- | 13,244 |
| 7 | 01/06/2015 to31/05/2016 | 30,11,464/- | 80,18,000/- | 11,826 |
| 8 | 01/06/2016 to31/05/2017 | 32,36,332/- | 47,03,000/- | 13,508 |
| **Total Amount in Rs.** | | **2,14,05,765** | **2,55,68,099.67** | **92,974** |

सदर कालावधीत कंपनीचे इंजिनिअर वर्षातून 4 नियमित भेटी देणार असून जेव्हा जेव्हा मशिन नादुरूस्त होईल तेव्हा तेव्हा येऊन दुरुस्ती व देखभाल आणि आवश्यकतेनुसार सॉफ्टवेअर/हार्डवेअर सेफ्टी अपडेट करणार आहेत. वरील कॉन्ट्रक्टमध्ये मशिनचे हेलीयम गॅस रिफीलींग व कोल्ड हेड यासारख्या महागडया पार्टसह सर्व

स्पेअर पार्टचा तसेच मशिनसोबत पुरविण्यात आलेल्या यु.पी.एस, चिलर प्लांट यांची देखील सर्व स्पेअर पार्टसह दुरूस्ती व देखभाल करत आहेत. परंतु यु.पी.एस. बॅटरीज या कंझ्युमेबल्स असल्यामुळे समाविष्ट नाहीत.

**मागणी:** मे. सिमेन्स हेल्थकेअर मुंबई यांनी पत्र क्र West/H IM/MRI/Mar`17/4345/R1 Dtd. 25/04/2017 (रूग्णालये प्राप्त दि.12/05/2017) अन्वये दि.01/06/2017 ते दि.31/05/2018 या कालावधीसाठी MRI मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता कंपनीने मुळ रकमेत करारनाम्यानुसार 2.66% इतकी वाढ करून अधिक टॅक्स असे सर्व करांसहीत एकुण रु 32,93,150/- (अक्षरी रु. बत्तीस लाख त्र्यान्नव हजार एकशे पन्नास मात्र) इतक्या रक्कमेचा CMC करीता करारनामा पाठविला आहे आणि एकुण रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

| Sr. No. | Period Form | Amount (RS) | VAT +Service Tax + Swachh Bharat Cess + KrushiVikasCess | % Increase | Total Contract Price (RS) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 01 Jun 2016 to 31 May -2017 | 28,14,202/- | 3,78,787.83/- | 5.0% | 32,36,332/- |
| 02 | 01 Jun 2017 to 31 May -2018 | 28,89,234/- | 4,03,916/- | 2.60% | 32,93,150/- |

शासन निर्देशानुसार सर्व सेवा दरांवर कृषी विकास सेस हा नवीन टॅक्स 0.5% इतका लागु झाल्यामुळे CMC च्या एकुण रकमेत वाढ झाली आहे.

मशीन खरेदी करतेवेळी कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट नुसार-कंपनीने 98% अपटाईम दिला असून मशिन दुरूस्ती करीता जर कंपनीमुळे एका वेळेस एकूण 5 दिवसांपेक्षा अधिक काळ लागला तर प्रतिदिवस रू.7500/-इतका दंड संस्थान कंपनीस आकारते.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरील संस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल . कंपनीने मागील वर्षी 4 नियमीत भेटी व तातडीच्या दुरुस्ती व देखभालीकरीता एकुण 34 वेळा भेटी देउन संपूर्ण एक वर्षांत अंदाजे रु. 47,03,000/- इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट बदलले आहेत (संदर्भ:परीशिष्ट "अ"). सदर स्पेअर पार्टची साठा रजिष्टरवर नोंद घेण्यात आलेली आहे. वापरलेले जुने स्पेअर पार्ट कंपनीस गेट पास अन्वये परत करणेत आले आहेत.

एम.आर.आय.मशिन नियमित वापरात असून दररोज अंदाजे 37 रूग्णांची तपासणी करण्यात येते. यानुसार सदर मशीनवर दरवर्षी अंदाजे 13508 पेशंटचे एम.आर.आय. स्कॅन होत आहे. (संदर्भ:परीशिष्ट "ब") त्याकरीता सदरचे मशीन नेहमी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

दि.12/01/2014 रोजी मानवीय चुकीमुळे ऑक्सीजन सिंलेडर एम.आर.आय. मशिनवर आदळुन चिकटले होते. सदर अपघातामुळे मशिनचे काही स्पेअर पार्ट (Funnel, Funnel lower, Rubber seal &Avanto Set of design ring) तुटलेले आहेत. सदर पार्टस हेमानवीय चुकीमुळे खराब झालेले असल्यामुळे कंपनी CMC मध्ये बदलुन देणार नाही असे कंपनीने कळविले आहे. नवीन स्पेअर पार्ट करीता कंपनीने पत्र क्र. HIM-EST-012014-014, Dt.14/01/2014 अन्वये सर्व करांसहीत एकुण रू.23,34,173/- इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. परंतु मा.वैद्यकिय संचालक, रेडीओलॉजिस्ट, कंपनी सर्व्हीस मॅनेजर श्री. पटेल यांचे सोबत दि. 03/02/2014 रोजी झालेल्या प्रत्यक्ष चर्चेअंती, सदर स्पेअर पार्ट तुटलेले असुन परंतु त्यामुळे मशिन बंद पडलेले नाही त्यामुळे सदर स्पेअर पार्ट बदलणेत आलेले नाहीत असा निर्णय घेणेत आला. तसेच सदर स्पेअर पार्ट कंपनीकडुन मोफत बदलुन मिळणेकरीता इकडील पत्र क्र. 1164, दि.27/02/2014 अन्वये विनंती करण्यात आली आहे.

सदर CAMC करीता रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असून मशिन खरेदी करते वेळेस झालेल्या ॲग्रीमेंटनुसार कंपनीने सदर रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** सद्यस्थितीत मशिन व्यवस्थित काम देत आहे. सदर मशिनची दि. 31/03/2017 ची घसारा वजा किंमत रू.15,99,656/- इतकी आहे. पुढील काळात ते व्यवस्थित कार्यान्वित राहणे कामी तसेच मागील आठ वर्षात कंपनीस अदा केलेली रक्कम व त्यांनी केलेला अंदाजे खर्च या बाबींचा विचार करता संस्थानला सद्यस्थितीत मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे फायदेशीर राहील. कारण जसजसे मशिन जुने होत जाते तसतसे दुरूस्तीचा खर्च देखील वाढत जातो.

सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टबाबत खालील बाबींचा विचार होणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

1) MRI मशिन 10 वर्षापासून नियमित वापरात असल्यामुळे त्याची नेहमी नियमित व तातडीची दुरूस्ती व देखभाल करणे अत्यावश्यक असते. यापुढील काळात मशिन वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मध्ये

नसल्यास व एम.आर.आय. मशिनची जर दुरूस्ती व देखभाल वेळेत न झाल्यामुळे मशिन नादुरुस्त होउन काही महागडे स्पेअर पार्टस् (उदा. हेलीयम गॅस रिफीलींग व कोल्ड हेड, यु.पी.एस. व चिलर प्लॉट) बदलणे आवश्यक असतील अशा वेळी सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्चे खर्चास मान्यता घेणेकरीता विविध पार्टस्करीता वेगवेगळे स्वतंत्र प्रस्तावमा. व्यवस्थापन समितीसमोर आवश्यकतेनुसार वेळावेळी सादर करणे प्रस्तावित पद्धतीनुसार आवश्यक राहील. दुरूस्तीस अंदाजे तीनमहिन्यांचा किंवा अनिश्चित कालावधी लागू शकतो. दरम्यानच्या मशिन नादुरूस्त असण्याच्या कालावधीमध्ये अत्यवस्थ रूग्णांना अत्यावश्यक सेवा देणे शक्य होणार नाही.

2) तसेच सदर प्रकारे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट केलेले नसताना मशिन्सची दुरूस्ती करणेस (सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टस्सह) संस्थानला वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टच्या रकमेपेक्षा अधिक खर्च येउ शकतो.

3) तसेच सध्या नवीन एम.आर.आय. मशिन खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू असुन सध्या Retender इतपर्यंत झालेली आहे.नवीन मशिन खरेदीस अंदाजे सहा ते आठ महिन्यांचा कालावधी लागु शकतो. तो पर्यतच्या काळात उपलब्ध मशिन व्यवस्थित कार्यान्वीत राहणेकामी कंपनीकडे सध्याचे मशिनचे नवीन मशिन खरेदी होईपर्यंत प्रतिमाह दराने CMC करणे संयुक्तीक राहील असे नम्र मत आहे

तरी MRI मशीनचे मे.सिमेन्स हेल्थकेअर प्रा. लि.मुंबई यांचेक्डे दि. 01/06/2017 ते दि.31/05/2018 या कालावधीसाठी प्रतिमाह दराने कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिसकॉन्ट्रॅक्ट करीता करणे कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करुन दर निश्चित करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण खर्चास मान्यता असावी.

**एम.आर.आय.मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणेकामी सदरहू मशिनची उत्पादक कंपनी मे.सिमेन्स लि., मुंबई यांचे प्रतिनिधी दरांवर चर्चा वाटाघाटी करणेसाठी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी एम.आर.आय.मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी दर दिल्यानंतर जी.एस.टी. दरामध्ये वाढ झालेली आहे, सदरहू वाढीव रक्कम मिळावी, अशी सभेस विनंती केली. परंतु जी.एस.टी. ची वाढीव रक्कम देता येणार नाही, असे उपसमितीने त्यांना सांगितले. यानंतर विस्तृत चर्चेअंती त्यांनी एम.आर.आय.मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी जी.एस.टी.सह एकत्रित रु.३३,००,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, एम.आर.आय.मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणेकामी मे.सिमेन्स लि., मुंबई यांचे जी.एस.टी.सह एकत्रित रु.३३,००,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच मे.सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून अंतीम दर लेखी स्वरुपात घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**०९. श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता जुने कॅथलॅब मशिन बायबॅक करुन नविन कॅथलॅब मशिन खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाने दि.०६/०१/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये नविन कॅथलॅब मशिनची मागणी केलेली आहे. सध्या कॅथलॅब विभागात सिमेन्स कंपनीचे मॉडेल AXIOM Artis dFC हे एक कॅथलॅब मशिन असून सदर मशिन सन २००५ मध्ये मे.सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून रक्कम रु.२,९७,५७,००६/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले आहे. सदर मशिनवर सध्या कॅथलॅब प्रोसीजर चालु आहेत, परंतु सध्या मशिनचे ब्रेकडाऊन वाढलेले आहेत, तसेच मशिन दुरुस्तीकामी येणारा वार्षिक खर्च हा घसारा किंमतीच्या दुप्पट होत आहे. त्यामुळे बायोमेडीकल विभागाने जुने मशिन बायबॅक करुन नविन अदयावत तंत्रज्ञान असलेले मशिन खरेदी करणेबाबत शिफारस केलेली आहे, कारण बाजारात सध्या जुन्या मॉडेलच्या मशिनपेक्षा अधिक उच्च प्रकारच्या तपासणीच्या सुविधा असलेले मशिन उपलब्ध झालेले आहे, त्यामुळे अधिक अचुक निदान होते. तसेच मे. सिमेन्स लि., मुंबई यांनी देखील पत्राव्दारे कळविले आहे की, सन २०१७ पर्यंत सदर मशिनचे स्पेअर पार्टस पुरवठा व सर्व्हीस देणार आहे. जुन्या कॅथलॅब मशिनची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु.१४,६६,२५६/- इतकी आहे.

कॅथलॅब विभागाकरीता नविन कॅथलॅब मशिन खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दि.१३/०१/२०१६ रोजीचे दरपत्रकानुसार रक्कम रु.४,७०,००,०००/- (अक्षरी रु. चार कोटी सत्तर लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित असून जुन्या मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे मशिन बायबॅक करणेकामी शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

त्यास अनुसरुन जुने कॅथलॅब मशिन बायबॅक करुन नविन कॅथलॅब मशिन विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.४,७०,००,०००/- (अक्षरी रु. चार कोटी सत्तर लाख मात्र) चे खर्चास, तसेच जुन्या मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव दि.१६/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात आला होता, त्यास निर्णय क्र.५५७ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच १५ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते, निविदा विक्रीची मुदत दि.०२/०१/२०१७ ते दि.१६/०१/२०१७ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१९/०१/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ऑनलाईन ०१ निविदा प्राप्त झाली होती.

तथापि "शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग- ४ दि.३० ऑक्टोबर २०१५ – प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील – निविदा कालावधीस मुदतवाढ" अन्वये जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदर ई-निविदेस दि.१७/०१/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२३/०१/२०१७ पर्यंत प्रथम एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन दोन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत, म्हणजेच सदरचे खरेदीकामी एकुण तीन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Shimadzu Medical (India) Pvt.Ltd., Mumbai | 23/01/2017 |
| 2 | M/s. Siemens Ltd., Mumbai | 25/01/2017 |
| 3 | M/s. Philips Electronics India Limited, Mumbai | 28/01/2017 |

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या तीन तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१७/०२/२०१७ रोजीचे मा. उपसमितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे. प्राप्त तांत्रिक ई-निविदेतील Specification बायोमेडिकल विभागाकडून तपासून घेण्यात आलेले असून सदर तांत्रिक बाबींचा तक्ता कॅथलॅब विभागाकडे पाठविण्यात आलेला होता, परंतु सदरहू तक्त्यावर स्पष्ट अभिप्राय दिलेला नसल्यामुळे सदरहू तक्त्यावर उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी पुन्हा कॅथलॅब विभागाकडे पाठविण्यास सांगितले, त्यानुसार वापर करणा-या डॉक्टरांचा अभिप्राय घेण्यासाठी सदरहू तक्ता दि.१५/०४/२०१७ रोजी कॅथलॅब विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यावर कॅथलॅब विभागातील डॉक्टरांनी खालीलप्रमाणे अभिप्राय कळविलेले आहेत-

| S.No. | Name of Doctor | Recommendation |
|---|---|---|
| 1 | Dr.Manohar Shinde | We will be needing High End Cathlab with all possible accessories like Radiation quards ceiling mounted, table mounted, sound system between console & Lab, Haemodynamics lab with Slave. |
| 2 | Dr.Omkar Thopte | We need state of art high end Cathlab with DSA, Stent boost, Haemodynamic system with slave monitor, LED overhead lights, Radiation shields, sound system between console & lab. (1) Shimadzu (2) Philips (3) Siemens |
| 3 | Dr.Girish Kale | We need Cathlab Machine with latest technology, having lesser radiation to operators, with clear stent (Stent boost), DSA, Haemodynamic Monitors, Radiation shield, sound system between console & lab. |
| 4 | Dr.Mukund Bajaj | We need Cathlab Machine with DSA, Stent boost, Haemodynamic System with Slave Monitor, Sound system between console & lab. |
| 5 | Dr.Deorao Thenge | We will have another with Cathlab with updated software and hardware along with updated hardware. |

| | | |
|---|---|---|
| 6 | Dr.Tanay Padgaonkar | We need Cathlab Machine with high end & latest technology having DSA, Stent boost, Haemodynamic monitoring system, Slave Monitors & Sound system, Radiation shields. |

उपरोक्त खरेदीकामी पात्र असलेल्या ०३ कमर्शियल ई-निविदा दि.०७/०६/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे संबंधित निविदाधारकांचे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांनी देऊ केलेल्या तुलनात्मक दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Cathlab Machine | Suppliers | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Description of Item/ work | M/s. Philips India Ltd.,Mumbai | | | | M/s. Siemens Healthcare Pvt. Ltd.,Mumbai | | | | M/s. Shimadzu Medical India Pvt. Ltd.,Mumbai | | | |
| | | **Basic Cost in INR** | **Cost in INR (Basic Cost without Custom Duty)** | **Packing, Forwarding & other Taxes** | **Total Amount in INR (including P & F and other Taxes except Custom Duty)** | **Basic Cost in INR** | **Cost in INR (Basic Cost without Custom Duty)** | **Packing Forwarding & other Taxes** | **Total Amount in INR (including P & F and other Taxes except Custom Duty)** | **Basic Cost in INR** | **Cost in INR (Basic Cost without Custom Duty)** | **Packing, Forwarding & other Taxes** | **Total Amount in INR (including P & F and other Taxes except Custom Duty)** |
| 1 | SINGLE PLANE FLAT PANEL LATEST CARDIAC CATH LAB FOR CORONARY & ANGIOGRAPHIC & INTERVENTIONAL WORK with Warranty Five Years | 472190 Euro X 72.4952 | 34231508.49 | 354142 | 34585650.49 | 650000 USD X 64.3475 | 41825875 | 0 | 41825875.00 | 550000 USD X 64.3475 | 35391125 | 108900 | 35500025.000 |
| 2 | Accessories with table and mattress | 0 | 0 | 0 | 0 | 23278 | 23278 | 0 | 23278.00 | 11 USD X 64.3475 | 707.8225 | 0 | 707.823 |
| 3 | 2. QUANTIFICATION | 24000 Euro X 72.4952 | 1739884.8 | 18000 | 1757884.8 | 0 | 0 | 0 | 0.00 | 4 USD X 64.3475 | 257.39 | 0 | 257.390 |
| 4 | HEMODYNAMIC RECORDER | 14000 Euro X 72.4952 | 1014932.8 | 10500 | 1025432.8 | 363698.34 | 363698.34 | 0 | 363698.34 | 1900000 | 1900000 | 256500 | 2156500.000 |
| 5 | Dual Head Pressure Injector with 500 syringes | 1708000 | 1708000 | 0 | 1708000 | 2119012.6 | 2119012.6 | 0 | 2119012.58 | 2000000 | 2000000 | 270000 | 2270000.000 |
| 6 | ACCESSORIES: | | 1563172 | 0 | 1563172 | 1714238.6 | 1714238.6 | 0 | 1714238.62 | 3420000 | 3420000 | 461700 | 3881700.000 |
| 7 | Turn Key work | | 5433483 | 815022 | 6248505 | 1624044.9 | 1624044.9 | 0 | 1624044.92 | 1200000 | 1200000 | 162000 | 1362000.000 |
| **A** | **Total Amount in Rs.** | | | | **46888645.09** | | | | **47670147.46** | | | | **45171190.213** |
| 8 | CMC for 5 Years | | 10250000 | 1588750 | 11838750.00 | | | | 11904287.5 | 8000000 | 8000000 | 1200000 | 9200000 |
| **B** | **Total Amount in Rs. ( Inl. CMC Cost )** | | | | **58727395.09** | | | | **59574434.96** | | | | **54371190.21** |
| | **Difference** | | | | **4356204.88** | | | | **5203244.75** | | | | **L1** |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Buyback Value of old Machine** | | | | **1794999.00** | | | | **3500000.00** | | | | **1700000.00** |
| | **Net Cost After deduction of Buyback Value** | **45093646.09** | | | | **44170147.46** | | | | **<u>43471190.213</u>** | | | |

वरीलप्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Shimadzu Medical India Pvt. Ltd., Mumbai यांचे सर्व ॲक्सेसरीजसह पुर्णांकित मुळ दर रक्कम रु.४,५१,७१,१९०/- हे निम्नतम येत असून त्यांनी जुन्या मशिनची Buyback Value रु.१७,००,०००/- इतकी देऊ केलेली असून सदर जुन्या मशिनची रक्कम वजा जाता त्यांचेकडून मशिन खरेदी केल्यास रक्कम रु.४,३४,७१,१९०/- (अक्षरी रु.चार कोटी चौतीस लाख एकाहत्तर हजार एकशे नव्वद मात्र) इतका खर्च येईल. तसेच सदरचे मशिन आयात करणेकामी मशिनची L/C उघडून Custom Duty अदा करणेकामीची पुढील कार्यवाही वित्त व्यवस्थापक यांचेमार्फत करता येईल.

तरी M/s. Shimadzu Medical India Pvt. Ltd., Mumbai यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या रक्कम रु.४,३४,७१,१९०/- (अक्षरी रु.चार कोटी चौतीस लाख एकाहत्तर हजार एकशे नव्वद मात्र) चे खर्चास तसेच सदरचे मशिन आयात करणेकामी मशिनची L/C उघडून Custom Duty अदा करणेकामीची पुढील कार्यवाही वित्त व्यवस्थापक यांचेमार्फत करणेकामी मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता कॅथलॅब मशिन खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक M/s. Shimadzu Medical (India) Pvt. Ltd., Mumbai यांचे प्रतिनिधी, त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. सभेसमोर चर्चेअंती त्यांनी दिलेली मशिनची Basic Price ५,५०,००० USD इतकी होती. ती कमी करून त्यांनी ५,२३,६५० USD मात्र केली. तसेच वॉरंटी संपल्यावर CMC करीता पुढील ५ वर्षाकरीता रु.९२,००,०००/- इतकी रक्कम भरली होती. त्यामध्ये देखील त्यांनी प्रत्येक वर्षासाठी रु.५०,०००/- मात्र रक्कम कमी केली आहे. म्हणजे रु.८९,५०,०००/- मात्र CMC ची रक्कम त्यांनी पुढील ५ वर्षाकरीता दिलेली आहे. त्याचबरोबर जुने कॅथलॅब मशिन बायबॅकची रु.१७,००,०००/- मात्र रक्कमही त्यांनी कमी करुन दिलेली आहे.**

**तसेच M/s. Shimadzu (Asia Pacific) Pvt. Ltd., Singapore यांनी सदरहू साहित्य शिर्डी पर्यंत पोहोचविणेकामीची रक्कम USD ५२३६६५ मात्र ही L/C व्दारे अदा करावयाची असल्याने, त्यावेळच्या USD च्या दराप्रमाणे सदरहू रक्कम M/s. Shimadzu (Asia Pacific) Pvt.Ltd., Singapore यांना अदा करणेत यावी व उर्वरीत INR रु.७९,७०,२००/- मात्र रक्कम ही M/s. Shimadzu Medical India Pvt.Ltd., Chennai यांच्या नावाने देण्यात यावी, अशी त्यांनी लेखी स्वरुपात विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाकरीता कॅथलॅब मशिन खरेदी करणेकामी M/s. Shimadzu Medical (India) Pvt. Ltd., Mumbai यांनी दिलेली ५,२३,६५० USD मात्र अंतीम दर व या मशिनचे पुढील ०५ वर्षाचे CMC करीता दिलेले रु.८९,५०,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**तसेच M/s. Shimadzu Medical (India) Pvt. Ltd., Mumbai यांचे विनंतीनुसार, सदरहू साहित्य शिर्डी पर्यंत पोहोचविणेकामीची ५,२३,६६५ USD मात्र रक्कम, त्यावेळेसच्या भारतीय मुल्यामध्ये M/s. Shimadzu (Asia Pacific) Pvt. Ltd., Singapore यांचे नावे, सदरहू L/C वित्त विभागामार्फत उघडणेत येऊन, कस्टम डयुटीमध्ये सुट मिळविणेकामी कस्टम ऑफिसकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व अंतीम कस्टम डयुटीची रक्कम L/C व्दारे अदा करणेस व उर्वरीत INR रु.७९,७०,२००/- मात्र रक्कम ही M/s. Shimadzu Medical India Pvt.Ltd., Chennai यांच्या नावाने आदा करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१० **बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या संस्थान इमारतींचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदी करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतुद:-** *अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट –कलम (१) च्या खंड (क) अन्वये " मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन" करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडुन विश्वस्तव्यवस्थेचा निधीचा विनीयोग करण्याची तरतुद आहे.*

**मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णयः-** दि.१५/०६/२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ५०२ अन्वये बांधकाम विभागाचे आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने एकुण ७५० सिमेंटगोण्या खरेदी करण्यास व या कामी येणारे रु. २,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

**प्रस्तावना:-** बांधकाम विभागास दैनंदिन देखभाल दुरुस्ती कामासाठी यापुर्वी खरेदी करण्यात आलेल्या ३०० सिमेंटगोण्या पैकी सध्या विभागाकडे २५ गोण्या शिल्लक असुन विभागाकडील दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे कामात अडचण येउ नये याकरीता पहील्या टप्प्यात ३०० सिमेंटगोण्या खरेदी करणेकामी इकडील दि.०५/०६/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये येणारे रक्कम रु. ९६०००/- मात्रचे खर्चास व या कामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता घेणेत आलेली आहे.

त्यानुसार इकडील जा. क्र. १७९८/२०१७ दि.०१/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले असुन, या कामी ०४ सिलबंध कोटेशन प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशिल खालिल प्रमाणे आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव/गांव | आवक क्र. दिनांक |
|---|---|---|
| ०१ | आदित्य ट्रेडर्स, शिर्डी | ८७७४/०६/०७/२०१७ |
| ०२ | कृष्णा ट्रेडर्स, साकुरी | ८७७५/०६/०७/२०१७ |
| ०३ | श्री पटेल सॉ मिल, शिर्डी | ८९५२/०८/०७/२०१७ |
| ०४ | वाकचौरे पाटील सेल्स एजन्सी, साकुरी | ८९९०/०९/०७/२०१७ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले सिलबंध कोटेशन दि.१२/०७/२०१७ रोजीचे मा. खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता खलिल प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण/ एकक | कृष्णा ट्रेडर्स, साकुरी | | वाकचौरे पाटील सेल्स, साकुरी. | | श्री पटेल सॉ मिल, शिर्डी | | अदित्य ट्रेडर्स, शिर्डी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम | दर | रक्कम |
| ०१ | ३०० सिमेंट गोण्या | अल्ट्राटेक | ३३०/- | ९९,०००/- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ०२ | | अंबुजा | ३३०/- | ९९,०००/- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ०३ | | ए.सी.सी. | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ०४ | | बिर्ला ए-१ | ३२०/- | ९६,०००/- | २९०/- | ८७,०००/- | -- | -- | ३००/- | ९०,०००/- |
| ०५ | | बिर्ला गोल्ड | ३२०/- | ९६,०००/- | -- | -- | ३२६/- | ९७,८००/- | -- | -- |
| | | एकुण रुपये | ३२०/- | ९६,०००/- | **२९०/-** | **८७,०००/-** | ३२६/- | ९७,८००/- | ३००/- | ९०,०००/- |
| | | शेरा | | | **निम्नतम** | | | | | |

**प्रस्ताव:-** उपरोक्त तुलनात्मक तक्त्यात स्थानिक पुरवठादार वाकचौरे पाटील सेल्स, साकुरी यांनी नमुद केलेप्रमाणे बिर्ला ए- वन सिमेंट गोणीचे दर रु.२९०/-प्रती गोणी हे निम्नतम असुन त्यांचे कडुन बिर्ला ए वन कंपनीचे ३०० सिमेट गोण्या खरेदी करणेस रक्कम रुपये ८७,०००/- (अक्षरी रुपये सत्याऐंशी हजार) मात्र खर्च येईल. तरी त्यांचे निम्नतम दर स्विकारणेस निर्णयार्थ सादर.

**बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या संस्थान इमारतींचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदी प्रकियेमधील निम्नतम दरधारक वाकचौरे पाटील सेल्स, साकुरी यांना आजचे उपसमिती सभेसमोर, त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी बोलविणेत आले असता, ते सभेसमोर चर्चा करणेसाठी अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम विभागामार्फत करण्यात येणाऱ्या संस्थान इमारतींचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी सिमेंट खरेदी करणेकामी वाकचौरे पाटील सेल्स, साकुरी प्रति गोणी**

**रु.२९०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**११ एअर कुलर खरेदी करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

जुने प्रसादालय व 16 गुंठे परिसरामधील दर्शन लाईनमधील साई भक्तांचे तसेच पारायण मंडप हॉलमधील पाराणार्थीचे उष्णतेपासून संरक्षण होणेकरीता 15 नग एअर कुलर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 7,50,000/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 28/11/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 579 अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार दिनांक 25/05/2016 रोजी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर चौथे वेळी ई-निविदा फेर अपलोड करण्यात आलेली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक ते कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती दिनांक 1/6/2017 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ई-निविदेत देण्यात आली होती.

उपरोक्त मुदतीत खालील पुरवठादार यांच्या तांत्रिक ईनिविदाच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये संस्थानकडे प्राप्त झाल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Kapsun Resources Corpoation, Ahmadabad | 3. | Penta Plastic, Valsad |
| 2. | Ratanlal Ramanlal Karwa, Amrawati | 4. | Premium Moulding, Daman |

वरील प्राप्त 4 ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक 7/06/2017 रोजी मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आलेले आहेत. त्यातील कंपनीचा वार्षिक उलाढाल, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी. रकमेचा डी.डी., इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील चारही तांत्रिक निविदा पात्र झाल्याने, त्यांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक 12/07/2017 रोजीचे मा.खरेदी समितीत उघडणेत आले, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत:

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | कुलरचे वर्णन | एकत्रित दर रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|
| **1** | **Kapsun Resources Corpoation, Ahmadabad** | Air Coolers. Antatika Model AR12LC नग – 15 | **7,05,000/-** | **L1** |
| 2 | Ratanlal Ramanlal Karwa, Amrawati | | 9,90,000/- | L4 |
| 3 | Penta Plastic, Valsad | | 7,16,250/- | L3 |
| 4 | Premium Moulding, Daman | | 7,14,000/- | L2 |

उपरोक्त आर्थिक (Financial) बीडमधील अ.नं. 1 M/s. Kapsun Resources Corpoation, Ahmadabad यांचे 15 नग, एअर कुलर खरेदी करणेकरीता रक्कम रुपये 7,05,000/- मात्रचे दर निम्नतम आहेत.

तरी 15 नग एअर कुलर खरेदीकामी निम्नतम दरधारक M/s. Kapsun Resources Corpoation, Ahmadabad यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**जुने प्रसादालय व १६ गुंठे परिसरामधील दर्शन लाईनमधील साई भक्तांचे तसेच पारायण मंडप हॉलमधील पाराणार्थीचे उष्णतेपासून संरक्षण होणेकरीता एअर कुलर खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील निम्नतम दरधारक M/s. Kapsun Resources Corpoation, Ahmadabad यांचे प्रतिनिधी, आजचे उपसमिती सभेसमोर त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दरांबाबत चर्चा केली असता, त्यांनी जी.एस.टी. लागू झालेली असल्यामुळे दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे १५ नग एअर कुलर्स खरेदी करणेकामी M/s. Kapsun Resources Corpoation, Ahmadabad यांचे ई-निविदा प्रक्रियेमधील एकत्रित रु.७,०५,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **मौजे लाहे, ता.शहापुर, जि.ठाणे येथील गट नं.४९१ मधील ०.४० आर जमीन पालखी थांब्यासाठी विनामोबदला देणेबाबत श्रीमती रिना रत्नेशचंद जैन, शहापुर यांचा दि.२१.०६.२०१७ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबवविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव–** मौजे लाहे, ता.शहापूर, जि.ठाणे येथील गट नं.४९१ मधील ०.४० आर जमीन पालखी थांब्यासाठी विनामोबदला स्विकारणेबाबत.

**प्रस्तावना–** मौजे लाहे, ता.शहापूर, जि.ठाणे येथील गट नं.४९१ मधील ०.४० आर जमीन पालखी थांब्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना विनामोबदला देणेबाबत श्रीमती रिना रत्नेशचंद जैन,अग्रवाल हाऊस, शिवशक्ती राईस मिल कंपांऊंड,पंडीत नाका, गोठेघर, शहापूर, जि.ठाणे यांनी इकडेस विषयांकित अर्ज सादर केलेला आहे. त्याठिकाणी श्री.राधेश्याम सावरमल अग्रवाल,रा.शहापूर यांच्या आई-वडीलांच्या स्मरणार्थ नाव देण्यात यावे,अशी इच्छा आहे. तसेच सदर जागेवर मी स्वखर्चाने पूर्ण लेव्हलिंग/ सपाटीकरण करुन देईल व सदर दानपत्र हस्तांतरणाचा येणारा संपूर्ण खर्च व त्या अनुषंगाने येणारा इतर खर्च मी स्वत: करेन. संस्थानने त्या जागी पालखी थांबा करावा, असेबाबत अर्जात नमूद केलेले आहे.

उपरोक्त विषयानुसार पालखी थांब्यासाठी श्रीमती रिना रत्नेशचंद जैन, शहापूर यांनी संस्थानला जमीन देणगी देण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावास अनुसरुन व इतर ठिकाणच्या जमीनी पालखी थांब्यासाठी घेण्याबाबत संस्थानच्या मालमत्ता विभागाचे प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक व बांधकाम विभागाचे उपअभियंता यांनी दि२१/०६/२०१७ रोजी समक्ष जावून स्थळनिरीक्षण केले असता सदरची जागा मौजे लाहे, ता.शहापूर, जि.ठाणे येथील मुंबई-नाशिक महामार्गावर असलेली जमीन गट नं.४९१ मधील ०.४० आर जमीन देणगी स्वरुपात देणेस तयार आहेत. तेथे समक्ष जावून जागेची पाहणी केली असता सदर जागा पालखी थांब्यासाठी योग्य आहे परंतु या जागेवर खाच-खळगे असल्याने ती जमीनीच्या लेव्हलपर्यंत येण्यासाठी भर टाकावी लागेल. याबाबत सदर देणगीदारासोबत चर्चा केली असता त्यांनी ही जागा आम्ही स्वखर्चाने भर टाकून रस्त्याच्या लेव्हलपर्यंत आणून तेथे पालखी थांबा उभारण्यासाठी संस्थानला विकसित करुन देवू तसेच दानपत्राचे नोंदणी शुल्क व तत्सम संबंधीत इतर खर्च आम्ही स्वत: करु. फक्त आमची इच्छा आहे की, श्री.अग्रवाल यांच्या आई-वडीलांचे स्मरणार्थ तेथे नाव देण्यात यावे. स्थळनिरीक्षण केले असता पालखी थांब्यासाठी सदर जागा योग्य आहे. या जागेपासून पूढे नाशिककडे येतांना श्री.काशिनाथ गोविंद पाटील यांनी देणगी स्वरुपात देवू केलेली जागा यामधील अंतर सुमारे २२ किमी.आहे.

**विभागाचा अभिप्राय–** अर्जदार यांनी पालखी थांब्यासाठी ०.४० आर जमीन विनामोबदला हस्तांतर करणेबाबत कळविले आहे. सदर जमीन शहापूरपासून सुमारे १४ किमी अंतरावर मुंबई-नाशिक हायवेलगत आहे. संस्थानला मुंबई ते शिर्डी या रस्त्यावर पालखी थांबे उभारावयाचे असल्याने सदर जमीनीचा उपयोग होईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मुंबईवरुन शिर्डीकडे येणाऱ्या पालखी/ पदयात्री यांचे सोयीसाठी पालखीथांबा उभारणेकामी अर्जदार यांच्या जमीनीचा उपयोग होणार असल्यामुळे, श्रीमती रिना रत्नेशचंद जैन, शहापुर यांची मौजे लाहे, ता.शहापुर, जि.ठाणे येथील गट नं.४९१ मधील ०.४० आर जमीन विनामोबदला स्विकारणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०५** **मौजे कसारा, ता.शहापुर, जि.ठाणे येथील गट नं.३२ हिस्सा २ मधील क्षेत्र ०.३० आर जमीन विनामोबदला देणेबाबत श्री.काशिनाथ गोविंद पाटील, रा.कोपरी, चंदनसार, ता.वसई, जि.ठाणे यांचा दि.२५.०४.२०१७ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबवविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव–** मौजे कसारा खुर्द, ता.शहापूर,जि.ठाणे येथील गट नं.३२ हिस्सा २ क्षेत्र ०.३० आर जमीन विनामोबदला स्विकारणेबाबत..

**प्रस्तावना–** मौजे कसारा खुर्द,ता.शहापूर,जि.ठाणे येथील गट नं.३२ हिस्सा २ क्षेत्र ०.३० आर जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना विनामोबदला देणेबाबत श्री.काशिनाथ गोविंद पाटील,

रा.कोपरी चंदनसार, ता.वसई,जि.पालघर यांनी इकडेस विषयांकित अर्ज सादरकेलेला आहे. त्यात त्यांनी सदरचा व्यवहार मे.दुय्यम निबंधक,शहापूर यांचेकडे नोंदवावयाचा आहे. त्याकामी मुद्रांक व नोंदणीचा तसेच तद्नुषंगीक जो खर्च सदरचा दस्तऐवज करण्यासाठी होणार आहे तो खर्च मात्र तुम्ही सोसावा व तुमचे खर्चाने सदरचा व्यवहार माझेकडून पूर्ण करुन घ्यावा.

सदर दानपत्राने जी जमीन मिळकत मी तुम्हास दान देणार आहे. ती जमीन मिळकत माझ्या स्वकष्टार्जीत खरेदी मालकीच्या व स्वत:चे उत्पन्नातून खरेदी केलेली आहे. त्याचेशी माझे कुटूंबातील कोणत्याही सदस्याचा हक्क,हितसंबंध नाही. मात्र तरी सुध्दा तुमचे मालकी हक्काकामी काही त्रूटी राहू नये म्हणून माझे कुटूंबातील व्यक्तींचे प्रतिज्ञापत्र सुध्दा तुम्हास देत आहे. त्यांचीही सदरचे दान देण्यास व दानपत्रास संमती आहे व त्यांचीही श्री साईबाबांवर अपार श्रध्दा व भक्ती असल्याने त्यांनीही खुल्या दिलाने संमती दिलेली आहे. तरी सदरचा व्यवहार लवकरात लवकर पूर्ण करुन घ्यावा व साईचरणी माझी सेवा रुजू करुन घ्यावी, असेबाबत अर्जात नमूद केलेले आहे.

उपरोक्त विषयानुसार पालखी थांब्यासाठी श्री.काशिनाथ गोविंद पाटील यांनी संस्थानला जमीन देणगी देण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावास अनुसरुन व इतर ठिकाणच्या जमीनी पालखी थांब्यासाठी घेण्याबाबत संस्थानच्या मालमत्ता विभागाचे प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक व बांधकाम विभागाचे उपअभियंता यांनी दि२१/०६/२०१७ रोजी समक्ष जावून स्थळनिरीक्षण केले असता सदरची जागा मौजे कसारा खुर्द, लतिफवाडी पोलीस स्टेशनसमोर कसारा घाट उतरल्यानंतर डाव्या व उजव्या बाजूचा महामार्ग ज्या ठिकाणी एकत्र येतो त्या कॉर्नरमधील ०.३० आर जमीन देणगी स्वरुपात संस्थानला पालखी थांब्यासाठी दान मिळत आहे. सदर जमीन रस्त्याच्या लेव्हलपासून खाली साधारण ५ फूट असल्याने तेथे पालखी थांबा बांधण्यासाठी जमीनीचे लेव्हलिंग करण्यासाठी भर टाकून रस्त्याच्या बरोबरीने आणावी लागेल. ही जागा श्री साईभक्तांच्या पालख्या व पदयात्रींच्या विसाव्यासाठी अत्यंत योग्य आहे.

**विभागाचा अभिप्राय–** अर्जदार यांनी ०.३० आर जमीन विनामोबदला हस्तांतर करणेबाबत कळविले आहे. सदर जमीन शहापूरपासून सुमारे ३६ किमी अंतरावर मुंबई-नाशिक हायवेलगत आहे. संस्थानला मुंबई ते शिर्डी या रस्त्यावर पालखी थांबे उभारावयाचे असल्याने सदर जमीनीचा उपयोग होईल. उक्त नमूद केलेली ०.३० आर जमीन दानपत्राद्वारे स्विकारणे तसेच दानपत्र नोंदणी व इतर अनुषंगिक खर्च संस्थानने करणेकामी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मुंबईवरुन शिर्डीकडे येणाऱ्या पालखी/ पदयात्री यांचे सोयीसाठी पालखीथांबा उभारणेकामी अर्जदार यांच्या जमीनीचा उपयोग होणार असल्यामुळे, श्री.काशिनाथ गोविंद पाटील, रा.कोपरी, चंदनसार, ता.वसई, जि.ठाणे यांची मौजे कसारा, ता.शहापुर, जि.ठाणे येथील गट नं.३२ हिस्सा २ मधील क्षेत्र ०.३० आर जमीन विनामोबदला स्विकारणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०६** **सौ.विमल अप्पासाहेब वाळके, कासारा दुमाला, ता.संगमनेर यांचा मौजे वेस,ता.कोपरगाव येथील त्यांचे मालकीचे गट नं.१९३ पैकी क्षेत्र ०.०५ आर क्षेत्र संस्थानला दान करणेबाबतचा दि.२७.०४.२०१७ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबवविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव-** सौ.विमल आप्पासाहेब वाळके,कासारा दुमाला,ता.संगमनेर यांचा मौजे वेस,ता.कोपरगाव येथील त्यांच्या मालकीचे गट नं.१९३ पैकी क्षेत्र ०.०५ आर क्षेत्र संस्थानला दान करणेबाबतचा दि.२७/०४/२०१७ रोजीचा अर्ज

**प्रस्तावना-** अर्जदार सौ.विमल आप्पासाहेब वाळके,रा.कासारा दुमाला, ता.संगमनेर यांनी त्यांचे मालकीची मौजे वेस,ता.कोपरगाव येथील गट नं.१९३ पैकी क्षेत्र २ हेक्टर मधील ०.०५ आर इतके क्षेत्र संस्थानला दान देणेबाबत दि.२७/०४/२०१७ रोजीचा अर्ज सादर केलेला असून त्यात त्यांनी सदरचे ०.०५ आर जागेवर संस्थानने मुंबई व नाशिक येथून येणा-या साईभक्तांसाठी साईदर्शन पालखी निवारा उभारावा व उभारलेल्या साईदर्शन पालखी निवा-याला श्री साईबाबा संस्थान शिर्डी संचलित कै.शिवराम रामजी वाळके यांचे स्मरणार्थ असे नाव देण्यात यावे तसेच मुलगा आदिनाथ आप्पासाहेब वाळके यांचा इलेक्ट्रीकचा कोर्स झालेला असून त्यास श्री साईबाबा संस्थानच्या सेवेत कायमस्वरुपी नोकरी देण्यात यावीवगैरेबाबत नमूद केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय–** अर्जदार यांचे अर्जाचा विचार करता दान द्यावयाचे क्षेत्र अत्यंत अल्प असून त्यात साई पालखी निवारा उभारता येणार नाही. याशिवाय अर्जदार यांनी दानपत्राच्या मोबदल्यात उपरोक्तप्रमाणे अटी/ शर्ती नमूद केलेल्या आहेत. अशा परिस्थितीत सदरचे ०.०५ आर क्षेत्र दान स्विकारणे उचित होणार नाही.
सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.५२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामधील विभागाच्या अभिप्रायाचा विचार करता, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०७** **विशिष्ट स्वरुपाची देणगी देणाऱ्या साईभक्तांकरीता गोल्डन कार्डसारखी योजना सुरु करणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर.**

**निर्णय क्र.५२८** कोणतीही चर्चा न करता सदरहू विषय स्थगित ठेवण्यात आला. (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.०८** **टाटा ट्रस्ट, मुंबई यांचे सहकार्याने शिर्डी येथे संस्थानमार्फत श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:**मा.व्यवस्थापनसमितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७१.

**प्रास्ताविक:–** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७१ मध्ये शेवटी 'विवेकानंद हॉस्पिटल, नागपुर यांनी कॅन्सर रुग्णांसाठी कमी खर्चामध्ये सुसज्ज हॉस्पिटलची उभारणी केलेली आहे, त्यांच्या मार्गदर्शनानुसार श्रींच्या समाधी शताब्दी वर्षा निमीत्ताने शिर्डी येथे कॅन्सर पिडीत रुग्णांसाठी श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी करणेचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करण्यात यावा' असे ठरलेले आहे.

सध्या संस्थानमार्फत श्री साईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालय चालविले जात आहे. यातील श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये २४४ बेडस असुन याठिकाणी सुपर स्पेशालिटी वैद्यकीय सेवा असुन श्री साईनाथ रुग्णालयात ३०० बेडस असुन येथे जनरल वैद्यकीय सेवा देण्यात येत आहे. सध्या दोन्ही रुग्णालयात कॅन्सर चे युनिट कार्यरत नाही.

शिर्डीमध्ये कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी करणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांची टाटा ट्रस्ट, मुबंई यांचेशी प्राथमिक स्वरुपात चर्चा झालेली असुन श्री आर.वेंकटारामानन, मॅनेजींग ट्रस्टी, टाटा ट्रस्ट, मुंबई यांचे दि.०३/०५/२०१७ रोजीचे पत्र ईमेलव्दारे संसथानला प्राप्त झालेले आहे.त्यात त्यांनी शिर्डीमधील प्रस्तावित कॅन्सर हॉस्पिटलच्या संरचना, सुविधा व इत्यादीबाबत ४ ते ५ आठवडयात एक लहानसा अभ्यास करणार असुन त्या अभ्यासाचे आधारावर सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail Project Report) तयार करु आणि ६ आठवडयांच्या कालावधीत श्री साईबाबा संस्थानला अवलोकनासाठी सादर करुन तसेच प्राथमिक संशोधन करण्यासाठी शिर्डीला एक पथक पाठविणार आहे, त्यासाठी संस्थानची परवानगी व इतर सहाय आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे.

**प्रयोजन:-** वरील संदर्भीय क्र -०२ नुसार टाटा ट्रस्ट, मुंबई आणि सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचेमध्ये दि.३१ मार्च २०१६ मध्ये झालेल्या सामजस्य करारानुसार खालील उपक्रम हाती घेण्यास व त्या संदर्भात आवश्यक ती उपाय योजना करण्यास शासनाने पुढीलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

(१) सदर सामंजस्य करार ०३ वर्षासाठी राहील .

(२) राज्य स्तरावर आरोग्य सेवा सल्लागार गट स्थापन करणे (State Health Advisory Unit).

(३) महाराष्ट्र राज्य औषधी पुरवठा महामंडळाची स्थापना करणे (State Medical Supply Corporation)

(४) MDR (I) ( Marrow Donor Registry India) या सुविधेचा विस्तार संपुर्ण राज्यभर करणे.

(५) टाटा ट्रस्ट यांच्याव्दारेपुणे येथील मनोरुग्णालयात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या INCENSE उपक्रमाच्या आधारे प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपुर येथे सुधारणा कार्यक्रम राबविणे.

उपरोक्त महाराष्ट्र शासन निर्णयात, टाटा ट्रस्ट व शासन यांच्यातील सामंजस्य करारात कॅन्सर रुग्णालय सुरु करण्याचा कोणताही उल्लेख नाही.

त्यामुळे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व टाटा ट्रस्ट, मुंबई या स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विदयमानाने कॅन्सर हॉस्पिटल सुरु करण्यासाठीची परवानगी महाराष्ट्र शासनाकडुन मिळवुन ते चालु करण्याचा मानस आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** टाटा ट्रस्ट यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व टाटा ट्रस्ट यांच्यात कॅन्सर रुग्णालय उभारणी बाबतचा MoU (Memorandum of Understanding) चा ड्राफट संदर्भ.क्र.०३ नुसार पाठविलेला आहे.

सदर कॅन्सर रुग्णालयाची उभारणी करताना व MoU करताना खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे, असे वाटते.

(१) प्रथम महाराष्ट्र शासनाकडुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व टाटा ट्रस्ट,मुंबई यांच्या संयुक्त विदयमानाने कॅन्सर रुग्णालय सुरु करणेबाबतची परवानगी घेणे.
(२) कॅन्सर रुग्णालय किती बेडचे असावे हे निश्चित करणे.
(३) कॅन्सर रुग्णालयासाठी लागणारी जागा निश्चित करणे.
(४) या रुग्णालयासाठी बांधकामाचे नियोजन करणे.
(५) सदर रुग्णालयासाठी लागणारे मनुष्यबळ (तांत्रिक व अतांत्रिक) यांचे नियोजन करणे.
(६) सदर रुग्णालयासाठी लागणारी मशिनरी या बाबतचेनियोजन करणे.
(७) सदर रुग्णालयासाठी लागणारे तज्ञ डॉक्टर्स/इतर पॅरॉमेडिकल स्टाफ यांचे नियोजन करणे.
(८) वरील सर्व बाबींसाठी सविस्तर प्रकल्प अहवालानुसार अंदाजे येणाऱ्या खर्चाची तरतुद करणे.

तरी मा.व्यवस्थापन समिती यांनी विभागाच्या अभिप्रायावर योग्य ते मार्गदर्शन व निर्णय करणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थसादर.

**निर्णय क्र.५२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्रींच्या समाधी शताब्दी वर्षा निमीत्ताने शिर्डी येथे कॅन्सर पिडीत रुग्णांसाठी, श्री साईबाबा संस्थान संस्थानमार्फत १०० बेडसच्या श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर हॉस्पिटल उभारणेकामी जागेची निश्चिती करणेसाठी, उपलब्ध असलेल्या जागेचा प्रस्ताव सादर करणेत यावा. सदरहू कॅन्सर हॉस्पिटल संस्थान निधीतून उभारणेत यावे. तसेच याकामी टाटा ट्रस्ट, मुंबई या स्वयंसेवी संस्थेचे सहकार्य घेण्यात यावे व कॅन्सर हॉस्पिटलचे व्यवस्थापन, सर्व मशिनरी/ मनुष्यबळासह टाटा ट्रस्ट, मुंबई यांना देता येईल का? याबाबतचा सविस्तर अभ्यासपुर्वक प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ बांधकाम विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०९** **मंदिरातुननिघणारे हार व फुलांचे निर्माल्य बचत गटांना देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद- अधिनियम 2004 मध्ये 14(2) (ग) समितीच्या अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य या बाबत असून त्या प्रमाणे "नाशवंत अर्पण वस्तुंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे." अशी तरतूद प्रस्तूत कलमा मध्ये नमुद केलेली आहे

**प्रस्तावना-** दि.09/03/2017 रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.221 अन्वये, श्रींचे मंदिरातुन निघणाऱ्या निर्मल्यापासुन बचतगटांमार्फत सुगंधीत द्रव्ये/ साई आगरबत्ती तयार करणेत यावी व त्या वस्तु बचतगटाकडुन संस्थानने खरेदी करुन विक्रीसाठी ठेवणेबाबत असे ठरलेले आहे.

अधिनियम 2004 मध्ये 14(2) (ग) मधील नाशवंत अर्पण वस्तुंची लिलावाद्वारे विल्हेवाट लावण्याचे आणी त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणेबाबत तरतुद आहे. त्यानुसार मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्याची लिलाव करुन विल्हेवाट लावता येईल व त्याचे उत्पन्न संस्थानच्या निधी मध्ये जमा करता येईल.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी, शासन, निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- धोरणात्मक व आर्थीक विषय आहे.

मागणी- जनसेवा फाऊंडेशन या महीला बचत गटाने आवक नं.8325 दि.01/07/2017 रोजीच्या पत्रानुसार निर्मल्याची मागणी 20 वर्षाकरीता केलेली आहे. व ते वार्षीक उत्पन्नाच्या 10 % रक्कम ते संस्थानला भरणार असल्याचे कळविलेले असल्याने सदर बचत गटाला मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य काही वर्षाच्या कराराने देता येईल.

विभागाचा अभिप्राय- आवक नं.8325 दि.01/07/2017 रोजीच्या जनसेवा फाऊंडेशन महीला बचत गटाचे पत्रानुसार श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य जनसेवा फाऊंडेशन या बचत गटाला काही वर्षाच्या कालावधीसाठी देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५३०** **श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्यांपासून अगरबत्ती तयार करणेकामी चर्चा करणेसाठी आजचे सभेत जनसेवा फाऊंडेशन या बचत गटाचे प्रतिनिधी उपस्थित होते. सभेसमोर त्यांनी इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस यांचेबरोबर संयुक्तपणे काम करणार असल्याचे सांगितले**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बचत गटामार्फत साई अगरबत्ती तयार करुन घेणेसाठी श्रींचे समाधी मंदिरातुन निघणारे हार व फुलांचे निर्माल्य जनसेवा फाऊंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस यांचे संयुक्त प्रकल्पास ०३ वर्षासाठी विनामुल्य देण्यात यावे. त्या बदल्यात जनसेवा फाऊंडेशन बचत गट हे सदरहू अगरबत्ती विक्रीतून मिळणाऱ्या प्रतिमाह उत्पन्नाच्या १०% रक्कम संस्थानला वर्ग करतील. ०३ वर्षामध्ये जनसेवा फाऊंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस यांचे काम समाधानकारक असल्यास पुढील कालावधीसाठी निर्माल्य देणेकामी जनसेवा फाऊंडेशन बचत गट व इकोनिर्मिती इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस यांना प्राधान्य देण्यात यावे, अशी करारनाम्यामध्ये तरतूद ठेवण्यात यावी. तसेच याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **शिर्डी शहरात व शिर्डीत येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद- 14 (2) (घ) मधील भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे अशी तरतुद आहे.

प्रस्ताविक- महाराष्ट्र शासनाने हरित आच्छादन दिवसेंदिवस कमी होत असल्याने ते वाढविण्यासाठी 50 कोटी वृक्ष लागवड करणेबाबतचा महत्वकांक्षी संकल्प हाती घेतलेला आहे. याकरीता दर वर्षी दि.1 जुलै ते 7 जुलै असे सन 2017 ते 2019 पर्यंत वृक्षलागवड करावयाची आहे. तसेच संस्थानचे ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 हे श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष असल्यामुळे संपुर्ण शिर्डी परिसरात वृक्षारोपन करण्याचा मानस आहे.

श्री साईबाबा संस्थानमार्फत दि.1 जुलै ते 7 जुलै सन 2017 ते 2019 पर्यंत या कालावधीत वृक्षलागवड कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडणेकामी व श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाची सुरवात वृक्षारोपनाने करण्यासाठी मा.अध्यक्ष महोदय, यांनी दि.22/05/2017 रोजी आढावा बैठक घेतलेली असुन सदर बैठकीमध्ये विविध सामाजीक संस्था, ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डी व साईसेवा फाऊंडेश, शिर्डी यांचे प्रतिनीधी हजर होते. त्यामध्ये मा.अध्यक्ष महोदय यांनी संस्थानच्या शाळा, शिर्डी परिसरातील खाजगी शाळा, शिर्डी शहरातील नागरीक यांचे लोकसहभागातुन वृक्षारोपन करणेकामी सांगीतलेले आहे. त्यानुसार संपुर्ण शिर्डी शहरात व शिर्डी शहरात येणाऱ्या रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपन करावयाचे आहे. ज्यामुळे श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना सावली मिळेल व वातावरणात प्रसन्नता राहील.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- आर्थीक विषय आहे.

मागणी- श्री साईबाबा संस्थानमार्फत दि. 01 जुलै ते 7 जुलै सन 2017 ते 2019 पर्यंत अखेर शिर्डी शहरातील खालील रस्त्यांच्या कडेला झाडे लावायची आहे.

1 शिर्डी ते निमगाव , 2. शिर्डी ते कनकुरी , 3. शिर्डी ते नांदुर्खी गाव
4. शिर्डी ते पिंपळवाडी, 5. शिर्डी ते साकुरी

तसेच शिर्डी गावातील संस्थानने केलेली 20 रस्त्यांच्या कडेला झाडे लावायची आहे. याकामी साधारणत: 7 ते 8 फुट ऊंचीची गावरान आंबा, चिंच, गुलमोहर, रेन ट्रि, निम,बेल,वड आदी सावलीची व कमी पाण्यावर जोपासली जाणारी रोपांची लागवड करता येईल. सदर रोपे ही शासनाचे सामाजीक वनीकरण विभागाकडुन अथवा परिसरातील विविध नर्सरींकडुन खरेदी करता येईल.

वृक्षलागवड करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अं.न. | तपशिल | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| अ | सावलीची मोठी झाडे | | | |
| 01 | 8 फुट उंचीचे झाडे | 11,000 | 200 | 22,00,000 |
| 02 | शहराअंतर्गत खड्डे खोदाई करणे | 1,000 | 100 | 1,00,000 |
| 03 | रोडच्या कडेने खड्डे खोदाई करणे | 4,200 | 20 | 84,000 |
| 04 | पोयटा | 160 ब्रास | 1,500 | 2,40,000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 05 | 10 फुट उंचीचे बांबु झाडांना आधार देणेकामी | 10,000 | 30 | 3,00,000 |
| 06 | सुतळी | 100 किलो | 80 | 8,000 |
| 07 | खते | - | - | 3,00,000 |
| 08 | झाडांची लागवड मजुरी | - | - | 2,00,000 |
| | | | एकुण अ | 34,32,000 |
| ब | डिव्हायडर मधील शोभेची लहान रोपे | 10,000 | 40 | 4,00,000 |
| | | | एकुण ब | 4,00,000 |
| | | | एकुण अ + ब | 38,32,000 |

विभागाचा अभिप्राय- दि.1 जुलै ते 7 जुलै सन 2017 ते 2019 पर्यंत वृक्षारोपनासाठी साई आश्रम नं.2 येथुन सुरवात करता येईल. लागवड झालेल्या झाडांचे संवर्धन व संगोपन संस्थान करणार असल्यामुळे वाहन विभागाकडुन दोन ट्रॅक्टर, दोन टँन्कर (8,000 लि. क्षमतेचे) दिवस-रात्र पुरविण्यात येईल. बगीचा विभागाचे कर्मचाऱ्यांमार्फत झाडांना पाणी देण्यात येईल सदर झाडांना वर्षभर लागणारे पाणी शिर्डी नगरपंचायतीच्या फिल्टर टँक वरुन घेता येईल. तसा नगरपंचायतीला प्रस्ताव देता येईल.

वृक्षारोपनासाठी रोपांचे "इ" निवीदा शासनाच्या वेबसाईट वर प्रसिध्द करता येईल. देणगीदार किंवा शासनाच्या नर्सरींमध्ये झाडे उपलब्ध झाल्यास त्यांचेकडुन थेट झाडे खरेदी करता येईल. तसेच विविध कामांचे दरपत्रके मागवुन तसेच आलेल्या निवीदांचे तांत्रीक व कमर्शियल बिड मा.खरेदी समिती सभेपुढे उघडुन न्युनत्तम दर धारकास मा.उपसमिती सभेपुढे समक्ष बोलावुन त्यास पुरवठा आदेश देऊन त्यांचेकडुन काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या एकुण रु.38,32,000/- (अडवतीस लाख बत्तीस हजार) मात्र खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच शिर्डी शहरात व परिसरात झाडे लावायची असल्यामुळे संबंधीत प्रस्तावास महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घ्यावी लागेल. तरी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेणेकामी महाराष्ट्र शासनास प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **अकुशल, कुशल व तांत्रीक पदे आऊटसोर्स पध्दतीने भरण्याबाबतची नियमावली-२०१७.**

**निर्णय क्र.५३२** कोणतीही चर्चा न करता सदरहू विषय स्थगित ठेवण्यात आला. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१२** **संस्थानला साखर, डाळ, तांदुळ, गहु, तेल व इतर वस्तु NCDEX e-Markets Limited यांचेमार्फत E-Auction पध्दतीने खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** NEML (NCDEX E-Markets Ltd.) यांनी दि.१६.०३.२०१७ चे पत्राने विषयांकित वस्तू E-Auction पध्दतीने खरेदी करणेची संस्थानला विनंती केली आहे. सदर पत्रावर अभ्यासपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत दि.६/४/२०१७ रोजी निर्देश दिलेले आहेत.

सदर पत्रामध्ये NeML यांनी खालील माहिती दिलेली आहे.

१. NCDEX E-Markets Limited ही (Ncdex Ltd.) यांची उप कंपनी असून NCDEX ला NSE, LIC, NABARD, IFFCO, CRISIL, PNB and Canara Bank यांनी promote केले आहे.

२. NCDEX ही २३ एप्रिल, २००३ अन्वये Companies Act, 1956 अन्वये कंपनी स्थापन झालेली असून प्रत्यक्ष कामकाजाची सुरुवात १५.१२.२०१३ पासून झालेली आहे.

३. या कंपनीचे व्यावसायिक व्यवस्थापनासाठी स्वतंत्र Board of Directors आहेत.

४. जगातल्या दहा Commodity Exchanges पैकी त्यांची कंपनी एक आहे.

५. सदर कंपनीची दररोजची सरासरी उलाढाल रु.४५०० कोटी आहे.

६. केंद्र शासनाच्या FCI, NAFED, SFAC, PEC, MMTC या संस्थाही सदर कंपनीमार्फत गहू, शेंगादाणे, चना, तूर, उडीद, सुर्यफूल, इंपोर्टेड दाळी , आर.एम.सीड विविध प्रकारांनी खरेदी व विक्री करीत आहेत.

७. महाराष्ट्र, गुजरात, हरीयाणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक या राज्यांनीही साखर, तूरदाळ, मूग दाळ, चना दाळ, चना, मीठ, मसूर, उडीद, काबुली चना, आटा, गूळ, तूप, तांदूळ वगैरे Commodities या संस्थेमार्फत खरेदी करतात.

सदर कंपनीने संस्थानला E-Auction Process अंतर्गत साखर व गहू खरेदी प्रायोगिक तत्वावर सुरु करण्याची व एकदा याबाबतीत चांगली सुरुवात झालेनंतर Pulses, Rice, Edible Oil व इतर Commodities यामध्ये वाढ करता येईल, अशी विनंती केली आहे.

सदर NEML मार्फत संस्थानने E-Auction पद्धतीने खरेदी करण्याबाबत प्रस्तावासोबतचे माहिती पत्रकामध्ये, त्यांनी E-Auction पद्धतीने संस्थानला खरेदी करण्यासाठी खालीलप्रमाणे माहिती दिलेली आहे.

संस्थानला सदर संस्थेचे मेंबर व्हावे लागेल, याकामी खालीलप्रमाणे रक्कम संसथानला भरावी लागेल.

A. One time Admission Fees – Rs.20,000/- + Applicable Service Charges 14.5%

B. Interest free Security Deposit-– Rs.7.5 Lacs Refundable (Lock in Period Three Years)

C. Annual Membership Renewal Charges Rs.10,000/- + Applicable S.C.14.5%

सदर ई-लिलाव पध्दतीबाबत माहितीपत्रकात व श्री.सिरोही यांनी दूध्वनीवरुन दिलेली माहिती खालीलप्रमाणे-

१. संस्थानने NemL यांचेकडे Registration केलेनंतर User ID व Password एकच मिळेल. परंतु प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया पाहण्यासाठी Multiple ID मिळतील.

२. संस्थानकडून E-Auction द्वारे खरेदी करण्याचे ठरल्यास प्रथम सदर कंपनीला Work Order द्यावी लागेल. यामध्ये आवश्यक असणारा माल व आपल्या अटी- शर्ती टाकता येतील.

३. वर्कऑर्डर दिलेनंतर ई ऑक्शनची सूचना संस्थानच्या व एनसीडीएक्सच्या वेबसाईटवर टाकता येईल.

४. E-Auction ची तारीख Mutual Understanding ने ठरविता येईल. संस्थानला Online E-Auction Process पाहता येईल.

५. संस्थानने साधारण दोन महिन्याला लागणारी Quantity E-Auction द्वारे खरेदी करण्यासाठी प्रस्तावित करावी व डिलेव्हरी घेतांना आवश्यकतेनुसार दोन-तीन टप्प्यांमध्ये घ्यावी.

६. सदर प्रक्रियेद्वारे खरेदी केलेला माल सर्व टॅक्सेससहीत व F.O.R. शिर्डी प्राप्त होईल.

७. संस्थानने Work Order दिलेनंतर संस्थानच्या मागणी व अटी-शर्तीनुसार साधारण पंधरा (१५) दिवसांत E-Auction केले जाईल.

८. NeML मार्फत E-Auction पद्धतीने माल विक्री करण्यासाठी पुरवठाधारकाला NeML यांचेकडे काही रक्कम सुरक्षा अनामत म्हणून Deposit ठेवावी लागते.

९. E-Auction ची Online Process असल्यामुळे यामध्ये लिलाव चालु असेल त्या वेळेस कुठल्या Supplier ने भाग घेतला वगैरे बाबी कुणालाही समजत नाहीत.

१०. अत्यंत पारदर्शकपणे किंमत ठरविली जाते. सर्व पुरवठाधारकांना समान संधी मिळते व सदर System चे Audit ही संस्थानच्या वतीने करता येऊ शकते. या प्रक्रियेमध्ये मॅन्युअली कुणालाही हस्तक्षेप करता येत नाही. तसेच या पद्धतीचा Data संस्थानला केव्हाही उपलब्ध होऊ शकेल.

११. E-Auction साठी NeML चे Service Charges हे 0.5 ते 0.75 + Service Charge असतील व ते पुरवठाधारकांकडून वसूल केले जातील.

१२. E-Auction चा कालावधी साधारण अर्धा ते एक तास असणार आहे.

१३. लिलावामध्ये जसे एक वार, दोन वार, तीन वार अशा बोली असतात, तशाच तीन संधी E-Auction पद्धतीमध्येही उपलब्ध आहेत.

१४. Bid Final झालेनंतर, Bid Price ला होकार/नकार कळविण्यासाठी २४ तासाचा अवधी संस्थानला दिला जाईल.

अ) यामध्ये संस्थानने होकार कळविल्यास Bid Final होईल, त्यानुसार संस्थानकडून पुरवठाधारकास पुरवठा आदेश दिलेनंतर मालाची Delivery संस्थानला दिलेले शेडयुलप्रमाणे मिळेल. डिलेव्हरीसोबत मालाचे बील देण्यात येईल व त्यानंतर सदर मालाचे Payment (बील रक्कम) NeML ला अदा करावी लागेल. नंतर हे पेमेंट सदर कंपनीमार्फत संबंधित बीडधारकाला आदा होईल, थोडक्यात संस्थानला NeML ला Payment करावे लागेल.

आ) संस्थानला मालाची Bid Price मान्य नसेल व संस्थानने Bid स्विकारणेस असमर्थता दर्शविली तर बीड नाकारण्याचा अधिकारही संस्थानला आहे. त्यानंतर संस्थानच्या सदर खरेदीसाठी ४८ तासांमध्ये पुन्हा Re-Auction NeML मार्फत केले जाईल.

१५. E-Auction संपल्यानंतर व अंतिम किंमत Final झाल्यानंतर संस्थानला मिळालेले User ID व Password वापरुन या लिलावामध्ये कुणी भाग घेतला, Online किती वेळा बोली सादर केली, किती रक्कम बोलली गेली वगैरे सर्व माहितीचा Report प्राप्त होईल.

१६. संस्थानने Bid स्वीकारलेनंतर लिलावधारक ते रद्द करु शकणार नाही. लिलावधारक सदर माल पुरविणेस तयार नसल्यास त्याची सुरक्षा अनामत एनईएमएलमार्फत जप्त करुन ती संस्थानला पाठविण्यात येईल.

१७. संस्थानने Bid स्वीकारलेनंतर संस्थान ताबडतोब L-1 Bidder ला पुरवठा आदेश देऊ शकेल.

१८. संस्थानच्या मागणी/दर्जाप्रमाणे माल नसल्यास तो Reject करता येईल व असा माल परत केलेनंतर नवीन माल विहित वेळेत पुरविण्याची जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील.

सदर कंपनीमार्फत रक्कम रु.७.५० लाख सुरक्षा अनामत रक्कम भरण्याची तरतूद आहे तथापि प्रायोगिक तत्वावर सदर कंपनीमार्फत संस्थानने काही माल खरेदी केल्यास त्यासाठी सदर कंपनी संस्थानकडून हि डिपॉझिट रक्कम घेणार नाही, असे श्री.सिरोही यांनी सांगितले आहे

थोडक्यात संस्थानला प्रायोगिक तत्वावर मालाची खरेदी करण्यासाठी प्रथम रक्कम रु.३०,०००/- अधिक सर्व्हिस चार्जेस एवढी रक्कम भरावी लागेल. संस्थानने जर ही रक्कम भरली तर भरलेल्या रकमेच्या पावत्या संस्थानला रितसर दिल्या जातील.

सदर पध्दतीचे फायदे खालीलप्रमाणे नमूद केलेले आहेत.

१. अत्यंत पारदर्शक पध्दतीने जास्तीत जास्त स्पर्धेमुळे संस्थानला कमी किंमतीत माल उपलब्ध होईल व संस्थानची आर्थिक बचत होईल.

२. लिलाव चालू असतांना बीडरला कितीही वेळेस किंमती कमी करता येतील.

३. संस्थान कमीत कमी ५ दिवसाच्या पूर्व सुचनेने एनईएमएलमार्फत लिलाव आयोजित करु शकेल. त्यामुळे संस्थानचा जाहिरातीचा खर्च वाचेल.

४. NeML कडून लिलावाची पूर्वसूचना त्यांचेकडील नोंदणीकृत बीडरला दिली जाईल. तसेच त्यांच्या व संस्थानच्या वेबसाईटवरही ती प्रसिध्द करता येईल.

५. याकामी तयार झालेला सिस्टीम डाटा- EMD, Bid History, winner list, Quantity awarded etc. वगैरे Electronic records/documents ऑडिट व रेकॉर्डसाठी संस्थानला उपलब्ध होऊ शकतील.

सदर कंपनीची आर्थिक व इतर माहिती घेण्याच्या दृष्टीने सन २०१५-१६ चा वार्षिक अहवाल, सदर कंपनीचे रजिस्ट्रेशनबाबतची कागदपत्रे, पॅन कार्ड, व्हॅट टीन/सीएसटी नंबर वगैरे माहिती मागविता येईल. तसेच NeML कंपनीला संस्थानच्या मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सदर ई-लिलाव पध्दतीचा Demo/Presentation देण्यासही सांगता येईल.

मा.उप कार्यकारी अधिकारी व मा.मुख्य लेखाधिकारी यांच्यात झालेले चर्चेत या कंपनीमार्फत पुरवठा करणा-या पुरवठादारांची माहिती घेणेबाबत ठरले होते. त्यास अनुसरुन याबाबत एनईएमएल यांचेकडून माहिती घेतली असता त्यांनी पुरवठाधारकांची नांवे कळविता येणार नाहीत तथापि दि.२१/४/२०१७ चे मेलद्वारे खालीलप्रमाणे पुरवठाधारक संख्या त्यांचेकडे उपलब्ध असल्याची माहिती दिली आहे.

| अ.नं. | तपशिल | पुरवठादार संख्या |
|---|---|---|
| १ | दाळी | ८०० पेक्षा जास्त |
| २ | साखर | ५०० पेक्षा जास्त |
| ३ | खाद्यतेल | ३० पेक्षा जास्त |

| | | |
|---|---|---|
| ४ | तांदुळ | ४०० पेक्षा जास्त |
| ५ | गहू | ३००० पेक्षा जास्त |
| ६ | इतर माल | १५०० पेक्षा जास्त |

महाराष्ट्र शासनही महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांकरीता रेशन कार्डधारकांसाठी साखर ईलिलाव पध्दतीने एनसीडीईएक्स स्पॉट एक्सचेंज लि.यांचेमार्फत खरेदी करते, याबाबतचा शासन निर्णय क्रं.साखर २०१४/ प्र.क्र.१२३/ ना.पु.१९ दि.१७ डिसेंबर, २०१४ व शुध्दीपत्र दि.२२ जुलै, २०१६ च्या प्रतीही त्यांनी दिल्या आहेत. झारखंड, गुजरात, या राज्यांच्या खरेदीबाबतच्या तसेच अंदमान-निकोबार प्रशासन व इंडियन आर्मी यांनी दिलेले ऑर्डरच्या प्रतीही सोबत अवलोकनार्थ सादर केल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाचे सुधारित खरेदी नियमावली दिनांक ०१.१२.२०१६, तरतूद क्र.३.४ खरेदीच्या विशेष पद्धतीमध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

**३.४ खरेदीच्या विशेष पद्धती**

**३.४.१ इलेक्ट्रॉनिक रिव्हर्स ऑक्शन**

खरेदी कार्यालय खरेदीच्या वस्तूची/विषयाची खरेदी इलेक्ट्रॉनिक रिव्हर्स ऑक्शन पद्धतीव्दारे करण्याचा निर्णय घेऊ शकेल, जर –

अ) खरेदी कार्यालयाला खरेदीच्या विषयाचे सविस्तर वर्णन करणे सुसाध्य असेल, आणि

**ब) इलेक्ट्रॉनिक रिव्हर्स ऑक्शनमध्ये सहभागी होण्यासाठी अर्हता प्राप्त करुन घेण्यासाठी इच्छुक निविदाकारांची एक स्पर्धात्मक बाजारपेठ असेल, ज्यामुळे परिणामकारक स्पर्धेची खात्री मिळेल, आणि**

क) खरेदी कार्यालयाने यशस्वी निविदा निश्चित करण्यासाठी वापरावयाचे निकष हे संख्यात्मक असून ते पैशात व्यक्त करता येतील.

या संबंधात जे नियम करण्यात येतील त्यांच्या अधीन राहून, इलेक्ट्रॉनिक रिव्हर्स ऑक्शनच्या कार्यपद्धतीत खालील बाबींचा समावेश असेल.

अ) खरेदी कार्यालय इलेक्ट्रॉनिक रिव्हर्स ऑक्शनमध्ये आमंत्रणाव्दारे निविदा मागवेल,

ब) या आमंत्रणात खालील बाबींसंबंधात तपशील असेल

एक) लिलावात प्रवेश आणि नोंदणी,

दोन) लिलाव सुरु व बंद होण्याची वेळ,

तीन) लिलावाच्या कामकाजाची रीत आणि

चार) खरेदीच्या पद्धती संबंधी असणारी अन्यकोणतीही माहिती.

वरील सुधारित खरेदी नियमावलीतील अधोरेखित “ब” तरतुदीचा विचार करता NeML ही कंपनी याकामी स्पर्धात्मक बाजारपेठ आहे व या कंपनीमार्फत भारतातील विविध राज्ये, केंद्र सरकारच्या संलग्न संस्था इंडियन आर्मी वगैरे विविध मालाची खरेदी करीत आहेत. त्यामुळे संस्थानने NeML मार्फत प्रायोगिक तत्वावर काही माल खरेदी करण्यास हरकत नाही असे वाटते. मात्र याकामी मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करावा लागेल.

तसेच कायमस्वरुपी एनईएमएल यांचेमार्फत विविध माल खरेदी करणेबाबत धोरणात्मक निर्णय झाल्यास याकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाची परवानगी घेणे उचित होईल असे मत आहे.

तरी

(अ) साखर, तांदूळ, गहू, दाळी, तेल वगैरेपैकी एखादी वस्तू NeML मार्फत प्रायोगिक तत्वावर खरेदी करणेबाबत

(आ) साखर, तांदूळ, गहू, दाळी, तेल, गाईचे शुध्द तूप वगैरे व आणखी ज्या उपलब्ध होतील त्या वस्तू कायमस्वरुपी NeML मार्फत खरेदी करणेबाबतचे धोरणात्मक निर्णय होणेबाबत

वरील “अ” व “आ” बाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५३३** **उपरोक्त प्रस्तावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला साखर, डाळ, तांदुळ, गहु, तेल व इतर वस्तु NCDEX e-Markets Limited यांचेमार्फत प्रायोगिक तत्वावर खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.१३** **संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्याचे भूसंपादन व रस्ते विकसीत करणेकामी सादरीकरण करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) २००४ चे कलम २१ (२) खालील प्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :**

०१. निर्णय क्र. २६३ दि.२४/०४/२००६.
०२. निर्णय क्र. १६ (ब) दि.१०/०१/२०१०.
०३. निर्णय क्र. ५३८ दि.२४/०७/२०११.
०४. निर्णय क्र. ७०६ दि.२४/०९/ २०११.
०५. निर्णय क्र. ७८ दि.०८/०१/२०१४.
०६. निर्णय क्र. ७५० दि.११/०९/२०१४.
०७.निर्णय क्र. ७९९ दि.११/०९/२०१४.
०८.निर्णय क्र. ४६७ दि.१०/११/२०१५.
०९.निर्णय क्र. ६५६ दि.२८/१२/२०१५.
१०. निर्णय क्र. ३३ दि.२५/०२/२०१७.
११. निर्णय क्र. २८४ दि.२८/०४/२०१७.

**मा. शासन निर्णय :** मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णयक्र.

१. सासंवि/२००६/८७६/(१३१) का.सोळा, दि.०४/०९/२०१४
२. सासंवि-२०११/५१४/ प्र. क्र. ७४/का.१६, दि.२१/०८/२०१४

**प्रस्तावना**: शिर्डी शहरातील सार्वजनिक सोयीसुविधांचा विस्तार करण्याचे दृष्टीने व ज्यांचा साईभक्तांना प्रामुख्याने उपयोग होईल अशी विकास कामे हाती घेवून पूर्ण करणेसाठी संस्थान व्यवस्थापन शिर्डी नगरपंचायतीस मदत करीत आहे. या विविध पायाभूत सुविधांअंतर्गत शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरुन शिर्डी शहरातील रस्ते संस्थान निधीतुन विकसीत करणेस तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४/०४/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६३ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

अ) **शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्ते विकसीत करणे**: मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार प्रथम प्राधान्य गटातील १०.०६ किलोमीटर लांबीचे एकुण ११ रस्ते संस्थान निधीतून भूसंपादन व विकसीत करणेसाठी येणारे रु.८८ कोटी मात्रचे खर्चास दि.०४/०९/२०१४ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आलेली असून, सदर प्रकल्पासाठी आजपावेतो रु.७०,०७,८४,७६९/- इतकी रक्कम खर्च झाली आहे. सदरहू प्रकल्पातील रस्ता क्र. ०९ अ भूसंपादनासाठी व रस्ता क्र. ०८ साठी मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वाढीव मोबदला रक्कम उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी मागणीनुसार सदर प्रकल्पासाठी रु.३०,७५,३३,१४५/- वाढीव खर्च येत आहे. याकामी येणारे वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाचे विधी व न्याय विभागाकडे दि.१७/१०/२०१६ अन्वये सादर करणेत आलेला आहे. त्यास अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही. याबाबत पाठपुरावा करणेत येत आहे. तसेच रस्ता क्र.०५ चे उर्वरीत कामासाठी दि.०८/०६/२०१७ अखेर ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत.

ब) **शिर्डी शहरातील अस्तित्वातील आठ रस्ते विकसीत करणे**: मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी दि. १०/०६/२०११ व दि.१६/०७/२०११ रोजीचे पत्रान्वये प्रमाणे एकुण ०६ रस्त्यांचे भूसंपादनासाठी रु.४३.७३ कोटी व या सहा रस्त्यांसह भूसंपादनाची आवश्यकता नसलेले एकुण १७ रस्ते विकसीत करणेकामी अंदाजे रु.८२.३७ कोटी असा एकुण रु.१२६.१०० कोटी निधी उपलब्ध करणे व रस्ते विकसित करणेबाबतचा प्रस्ताव संस्थानला सादर केला होता. त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३८ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. तसेच शासनाचे विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्र. सासंवि-२०११/५१४/ प्र.क्र.७४/ का.१६, दि.२१/०८/२०१४ अन्वये सदर रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकसित करणे व इतर अटींसह मान्यता देण्यात आली आहे. मात्र शिर्डी नगरपंचायत यांनी १७ पैकी ०८ रस्त्यांकरीता सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेअंतर्गत निधी मंजूर झाला असल्याने सदरहू ०८ रस्ते वगळणेत यावेत व खालील उर्वरीत ९ पैकी शिर्डी शहरातील अहमदनगर मनमाड रस्ता वगळता खालील ८ रस्ते विकसीत करणेबाबत कळविले आहे.

| अ. नं. | रस्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | डॉ. हेडगेवार नगरमधील रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. (दोडीया गल्ली) |
| ०२. | १२ चारी रस्ता (स्वागत कक्ष ते नांदूर्खी शीव रस्ता १२ चारी बंदीस्त करणे. |
| ०३. | पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता |
| ०४. | रज्जाक शेख लगत पुनमनगर गल्ली क्र.०१ ते रावजी कोंडाजी कोते यांचे घरापर्यंत रस्ता |
| ०५. | श्रीकृष्ण नगर मधील रस्ते |
| ०६. | सर्व्हे नं. १३४ सर कॉलनी रस्ते. |
| ०७. | गणेशवाडी मधील रस्ते. |
| ०८ | हॉटेल श्रध्दापार्क ते पुखराज लोढा- १२ चारी इनामवाडी रस्ता. |

**क)** **<u>शिर्डी शहरातील सहा रस्ते भूसंपादन करुन विकसीत करणे</u>**. मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार खालील सहा रस्ते भूसंपादनासाठी रु.४३.७३ कोटी व विकसनासाठी रु.५७.२८ कोटी असा एकुण रु.१०१.०१ कोटी खर्चाचा प्रस्ताव इकडील दि.०४/०४/२०१२ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेत आला होता.

| अ. नं. | रस्त्याचे नांव | लांबी (मी.) | रुंदी (मी.) | अस्तित्वातील रुंदी (मी.) | भूसंपादनाची रुंदी (मी.) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | विकास योजनेतील २४ मीटर रुंद वळण रस्ता (साई श्रध्दा हाउसिंग सोसायटी कॉर्नर ते सन एड सॅन हॉटेल रस्ता) | २६५० | २४ | - | २४.०० |
| ०२ | विकास योजनेतील १२ मिटर रुंदीचा हॉटेल गोराडीया समोरील रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता) | ५५० | १२ | ५.५० | ६.५० |
| ०३ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा बिरेगांव रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ता- वराह चौक ते कालिकानगर-१५ मीटर व पुढे बिरोबा मंदिरापर्यंत वहिवाटीप्रमाणे) | ५०० | १५ | १० | ५.०० |
| ०४ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (जैन मंदिरालगत नगर-मनमाड ते १८ मीटर वळण रस्ता) | ३२० | १५ | - | १५.०० |
| ०५ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा जुना पिंपळवाडी रस्ता (पुष्पांजली हॉटेल चौक ते पिंपळवाडी शिव हद्दीपर्यंत) | १००० | १५ | १० | १५.०० |
| ०६ | विकास योजनेतील १५ मीटर रुंदीचा रस्ता (पिंपळवाडी रस्ता ते १८ मीटर रस्ता यांना जोडणारा निता हॉटेल पश्चिमबाजू दक्षिणोत्तर रस्ता) | ३०० | १५ | -- | १५.०० |
| | एकूण लांबी | ५३२० | | | |

उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी या सहा रस्त्यांचा भूसंपादन खर्च रु.४३.७३ कोटी ऐवजी रु.५४.२६ कोटी येत असलेबाबत कळविले होते. त्यानुसार सदरहू कामी एकुण रु१११.५४५ कोटी सुधारीत खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.७८ अन्वये मान्यता देणेत आली. त्यानुसार दि.१०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये शासन मान्यतेसाठी सुधारीत प्रस्ताव सादर करणेत आला. याबाबत विधी व न्याय विभागाने दि.१८/०२/२०१४ रोजीचे पत्रान्वये, भूसंपादनाची आवश्यकता असणारे सात रस्ते विकसीत करणेबाबतचे प्रस्तावास सद्यस्थितीत कार्यरत त्रिसदस्य समितीची मान्यता घेऊन, मा. उच्च न्यायालयाच्या सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१२०५६/२०१२ दि.१६/१०/२०१२ च्या आदेशानुसार उच्च न्यायालयाकडे जाऊन प्रथम मान्यता घेण्यात यावी असे कळविले. त्यानुसार द्वितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता असलेले सहा रस्त्यांचे भूसंपादन व विकसनासाठी आवश्यक असणारा रु.१११.५४५ कोटी मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेकामी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज क्र.८७०९/ २०१४ अन्वये सादर करणेत आला होता. तदनंतर या सहा रस्त्यांचे भूसंपादन करणेकामी रु.५४.२६ कोटी ऐवजी आता नवीन भूसंपादन कायदा सन २०१३ दि.०१/०१/२०१४ पासून लागू करण्यात आला असल्याने, या कायद्याचे कलम २४ तसेच कलम २६ ते ३० प्रमाणे हिशोबीत करुन द्यावी लागणार असल्याने सुधारीत भूसंपादन खर्च एकुण रु.१५०,१८,८८,७९७.०० इतका येत असलेबाबत उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी कळविले. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

*"..यावर सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी प्रस्तावित कामी येणा-या रु.१११.५४५ कोटी मात्र रकमेच्या खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज सादर केलेला असून, अद्याप पर्यंत या अर्जावर काहीही निर्णय झालेला नाही. मा. औरंगाबाद खंडपीठाकडे याबाबत पाठपुरावा करणेत यावा व मा. औरंगाबाद खंडपीठाचे मंजूरी मिळालेनंतर वाढीव रकमेचा प्रस्तप्न समितीपुढे सादर करणेत यावा असे ठरले."*

त्यांनतर उपरोक्त 'ब' व 'क' मधील रस्त्यांबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.४६७ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

*"..यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, व्दितीय प्राधान्य गटात नमूद केलेल्या १७ रस्त्यापैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राजस्तर) योजनेत मंजूर झालेले ०८ रस्ते वगळणेत येऊन, उर्वरीत ०९ रस्त्यांची सद्यःस्थिती, निकड, खर्चाची रक्कम यासह सुधारीत खर्चाचा प्रस्ताव तयार करावा तसेच भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या ०६ रस्त्यांचे भूसंपादन व इतर अनुषंगीक खर्चाबाबतचा सुधारीत तपशील शिर्डी नगरपंचायतीकडून घेण्यात यावा व त्यासह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. "*

तसेच मा. त्रिसदस्य समितीचे दि.२८/१२/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६५६ खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"...यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील ०६ रस्ते भू-संपादीत करुन विकसीत करणे व ०९ रस्ते विकसीत करणेबाबतचे प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली. तसेच याबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून सुधारीत सविस्तर अंदाजपत्रकासह प्रस्ताव मागविणेत यावा, त्यांचेकडून प्रस्ताव आल्यानंतर मान्यतेसाठी मा. उच्च न्यायालयामध्ये सादर करणेत यावा, असे ठरले."*

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.३०/०६/२०१६ रोजीचे पत्राने उर्वरीत एकूण १५ रस्त्यांपैकी शिर्डी हद्दीतील नगरमनमाड रस्ता कॉन्क्रीटीकरण करणे कामाचा खर्च वगळता इतर १४ रस्त्यांचे खर्चाचा सुधारीत प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केला.

| | | |
|---|---|---|
| **(अ)** | ०६ रस्ते भूसंपादन खर्च | : रु.१६३,५५,२६,२१०.०० |
| | ०६ रस्ते विकसन खर्च | : रु.४३,७२,२७,५४३.०० |
| | **०६ रस्ते एकूण खर्च** | **:** रु.२०७,२७,५३,७५३.०० |
| **(ब)** | ०८ रस्ते विकसन खर्च | : रु.२२,६९,९१,५१०.०० |
| | **एकूण खर्च (अ+ब)** | : **रु.२२९,९७,४५,२६३.००** |

सदरहु प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी सादर करणेबाबत कार्यवाही विधी विभागामार्फत सुरु होती. दरम्यान दि.२८/०७/२०१६ रोजी पासून मा. व्यवस्थापन समिती अस्तीत्वात आलेली आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विधी विभागामार्फत सिव्हील अर्ज मागे घेणेबाबतची कार्यवाही करणेत आली आहे. त्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर निर्णय क्र.३३ खालीलप्रमाणे झालेला आहे.

*"..यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमूद केलेल्या रस्त्यांपैकी ज्या रस्त्यांचे भू-संपादन करण्याची आवश्यकता नाही, अशा रस्त्यांविषयी तसेच दि.२१/०८/२०१४ रोजीच्या शासन आदेशान्वये मान्यता मिळालेल्या शिर्डी शहरातील द्वितीय प्राधान्य गटातील १७ रस्त्यांविषयी व शिर्डी नगरपंचायतीला सुवर्ण जयंती नगरोथ्थान महभियान योजनेअंतर्गत मंजूर ८ रस्त्यांविषयीचा सविस्तर प्रसूताव सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच द्वितीय प्राधान्य गटातील ६ रस्त्यांचे भूसंपादन व विकसन करणे संदर्भातील स्वतंत्र प्रस्ताव सभेसमोर ठेवण्यात यावा."*

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील अस्तीत्वातील आठ रस्ते विकसीत करणेकामी रु.२२,६९,९१,५१०.०० मात्र रकमेस मान्यता मिळणेसाठी संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर निर्णय क्र.२६० खालीलप्रमाणे झालेला आहे.

*".. यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वितीय प्राधान्य गटातील विकसीत करावयाच्या रस्त्यांची संख्या कमी झालेली असल्यामुळे याकामी येणा-या खर्चाच्या अंदाजपत्रकाची रक्कमही कमी झालेली आहे. याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेस मान्यता देण्यात आली."*

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार शिर्डी शहरातील ०६ रस्ते भूसंपादन करुन विकसीत करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीने दि.३०/०६/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार याकामी रु. २०७,२७,५३,७५३/- मात्र अपेक्षित खर्चास व याकामी अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार शासन

मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर निर्णय क्र.२८४ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

*"..यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, समाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी कोणते रस्ते व कसे महत्वाचे आहेत, याचे पुढील सभेसमोर सादरीकरण दाखविणेत यावे, असे ठरले."*

**प्रस्ताव:** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील ०६ रस्ते भूसंपादन करुन विकसीत करणे व अस्तित्वातील ०८ रस्ते विकसीत करणेबाबत रस्त्यांची सद्यस्थिती व अनुषंगिक माहितीचे सादरीकरण पाहून निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३४** **आजचे सभेत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे अधिकाऱ्यांची शिर्डी शहरातील रस्ते विकसनाबाबतचे सादरीकरण सादर केले व समितीने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त प्रस्तावामधील ब तक्त्यामध्ये नमूद केलेल्या ०८ रस्त्यांपैकी चार रस्त्यांची कामे शिर्डी नगरपंचायतीने पुर्ण केलेली असल्यामुळे, ती वगळता इतर (१) १२ चारी रस्ता (स्वागत कक्ष ते नांदूर्खीशीव रस्ता १२ चारी बंदीस्त करणे), (२) पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता, (३) रज्जाक शेख लगत पुनमनगर गल्ली क्र.०१ ते रावजी कोंडाजी कोते यांचे घरापर्यंत रस्ता व (४) हॉटेल श्रध्दापार्क ते पुखराज लोढा- १२ चारी इनामवाडी हे अस्तित्वातील ०४ रस्ते संस्थानमार्फत विकसीत करणेत यावे. तसेच प्रस्तावामधील क तक्त्यामध्ये नमुद केलेले ०६ रस्ते भूसंपादन करुन विकसीत करणेकरीता शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत सविस्तर अंदाजपत्रक शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणीत करुन घेऊन, शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना बेंचेस (बाक) देणे.**

**निर्णय क्र.५३५** कोणतीही चर्चा न करता सदरहू विषय स्थगित ठेवण्यात आला. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१५** **श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीचे नांदुर्खी रस्त्यालगतचे संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेकामी मा.नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी तथा मा.विश्वस्त यांचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ५८४ खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*''..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीत रंगकाम करणे व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेकामी एस. ए. पांडोळे, कर्जत यांचे रु.११,२६,८२४.१३ मात्र दर स्विकारणेत येवून त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.''*

**प्रस्तावना :** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. १२५ (नगरपंचायत मिळकत नं.१६६६) क्षेत्र ४०आर मध्ये संस्थानमार्फत उभारणेत आलेल्या खालील इमारती अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, अहमदनगर यांचे श्री साईनाथ माध्यमीक व उच्च माध्यमीक विद्यालय, शिर्डी यांचे वापरासाठी देणेत आलेल्या आहेत.

| अ.नं. | इमारतीचे नांव | बांधकामाचा प्रकार | वर्ग खोल्या | बांधकामाचे क्षेत्रफळ (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|
| 01. | जुनी यु टाईप इमारत | पत्रा छत | ११ वर्ग खोल्या | ७२०.०८ |
| 02. | न्यु स्कुल इमारत (तळ+१ला मजला) | आर.सी.सी. | ०६ वर्ग खोल्या | ३७५.१४ |
| 03. | साई सरस्वती इमारत (तळ+१ला मजला) | आर. सी. सी. | १ हॉल/खोल्या व ०३ स्वच्छतागृहे | १४४१.७८ |
| | | | **एकुण ..** | २५३७.०० |

वरील इमारतीचे आतिल व बाहेरील बाजूचे रंगकाम करणे तसेच संरक्षणाचे दृष्टीने सदरहू इमारतीचे बाजूने संरक्षक भिंतीचे बांधकाम करुन मिळणेबाबत तत्कालीन उपमुख्याध्यापक यांनी त्यांचेकडील दि.१५ मे,२०१२ रोजीचे विनंतीपत्रावर तत्कालीन मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.६६८ दिनांक २५/०८/२०१२ खालील प्रमाणे संमत करणेत आला होता.

*".. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे इमारतीस रंगकाम करणे व संरक्षक भिंतीचे बांधकाम करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१२,४२,७७५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी विहीत पध्दतीने जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.तसेच श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय ही शाळा संस्थानकडे वर्ग करण्यासंदर्भात चर्चा करणेसाठी शाळेचे समिती सदस्य यांना समक्ष चर्चेसाठी आमंत्रित करण्यात यावे, असे ठरले."*

तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश : C.A. No. 13280 of 2013 In P.I.L. NO. 18 of 2011 dt. 26/09/2014 अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे.

मा.त्रिसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयानुसार व मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार सदरहू कामासाठी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी पात्र निविदाधारकाचे ई-निविदेचा लिफाफा क्र.02 (Commercial Bid) मा. उपसमितीचे सभेत उघडून त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८४ अन्वये ठेकेदार एस.ए. पांडोळे कर्जत यांना कार्यादेश देणेत यावा असे ठरले.

दरम्यान, प्रस्तुत इमारत श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाचे वापरासाठी भाडेतत्वावर देणेत आलेली असल्याने, सदरहू इमारती संस्थानकडे परत घेणेबाबत कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत सुरु असलेने, मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजी झालेल्या चर्चेचे अनुषंगाने विषयांकीत काम तुर्तास स्थगित ठेवणेस व चालू असलेली निविदा प्रकिया रद्द करणेस दि.१०/०९/२०१६ रोजीचे टिपणीअन्वये मान्यता देण्यात आली.

मा. अध्यक्ष महोदय यांना अग्रेषित दि.२५/०२/२०१७ रोजीचे पत्रात मा. नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत तथा विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी नांदुर्खी रोडचे बाजूने शाळेला संरक्षक भिंत बांधणेबाबत विनंती केली असुन सदर पत्राचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

''..या इमारतीला नांदुर्खी रोडच्या बाजुने संरक्षक भिंत होतीच परंतु गेल्या २/३ वर्षापुर्वी रोड रुंदीकरणाच्या काळात हि भिंत पाडण्यात आली. संरक्षक भिंत नसल्याने सध्या शाळेत खूप मोठया समस्या निर्माण होत आहे. त्यात प्रामुख्याने वर्दळीचा रस्ता असल्याने अपघात होण्याची शक्यता, विद्यालयाला प्रायव्हसी नसणे, स्टेज व मैदानावरील कार्यक्रम व्यवस्थितप्रणे घेता न येणे, सायकल चोरीचे वाढते प्रमाण, रात्री बेरात्री व्यसनाधीन लोकांची वाढती वर्दळ, ये-जा करणा-या लोकांवर नियंत्रण ठेवणक कठीण होणे, आजूबाजुचे लोकांनी कचरा टाकल्याने आरोग्यावर परीणाम होणे, विद्यार्थ्यांचे शौचालयाचा बाहेरील लोकांकडून वापर, वेडसर व विक्षिप्त लोकांचा त्रासदायक वावर, रोडवरुन जाणा-या गाडयांचा त्रास, टारगट मुलांकडून मुलींना त्रास इ. समस्यांचा उल्लेख असुन या समस्या सोडविण्यासाठी तसेच सदर इमारत आपलीच असल्याने इमारतीच्या कायमस्वरुपी संरक्षणासाठी या शाळेला ७/८ फुट उंचीची संरक्षक भिंत बांधणेबाबत विनंती केली आहे.''

**प्रस्ताव :** संस्थान मालमत्तेचे संरक्षणाचे दृष्टीने नांदूर्खी रोडचे बाजूने असलेल्या दगडी बांधकामातील पायावर सुमारे ६५ मी. लांबीचे संरक्षक भिंतीचे २३० मि.मी. रुंदी, १.५०मि. उंचीचे बांधकाम, त्यावर ०.९मी. उंचीची चेनलिंक फेन्सिंग, एम.एस. गेट बसविणे व सिमेंट पेंटने भिंतीस रंगकाम करणे इत्यादि कामासाठी सन २०१६-१७चे जिल्हा दरसूचीतील दराने करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.३,७१,४१०/- इतका खर्च अपेक्षित आहे. याकामासाठी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविता येतील.

तरी उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय इमारतीचे नांदुर्खीरस्त्यालगतचे संरक्षक भिंतीचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे बांधकाम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ३,७१,४१०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रक्कम रु. १,७१,००,०००/- आर्थिक सहाय्य देणेबाबत.**

**निर्णय क्र.५३७** कोणतीही चर्चा न करता सदरहू विषय स्थगित ठेवण्यात आला. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१७** **श्री. रजत राजेंद्र गेठे यांना Racing Car बनविण्यासाठी रक्कम रु.५ लक्ष आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री रजत राजेंद्र गेठे हा विद्यार्थी 'सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय कोंढवा बु' येथे मॅकेनिकल इंजिनियर शिक्षण घेत आहे. रजत व त्याची टीम Racing Car बनवित असून ती कार जर्मनी येथे Competition साठी घेऊन जाणार आहेत. ही कार बनविल्यास महाराष्ट्राचे नाव परदेशात जाणार आहे. त्यामुळे ही कार बनविण्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. त्यासाठी मा. उपाध्यक्ष श्री कदम साहेब यांनी शिफारस केली आहे. रजत ने Racing Car बनविण्यासाठी श्री साईबाबा संस्थानकडे रु. ५ लक्ष मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

**<u>अर्थ साहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:-</u>**

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल."

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल. अशी तरतूद आहे.

**<u>मा.छाननी समितीचा निर्णय:-</u>** मा.छाननी समितीचे दि.२७.०३.२०१७ रोजीच्या सभेत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला. छाननी समितीच्या कामकाजासंबधात तयार करणेत आलेल्या विनियमाचे अवलोकन करण्यात आले. विनियमात प्रस्तावित बदल व नविन निकष यांचा समावेश करून त्यांना सर्वसंमतीने मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे इतःपर कार्यवाही होईल व असेही ठरले की, वरील निकषातील परिस्थीतनिरुप काही बदल करावयाचे असल्यास छाननी समिती असे बदल करू शकेल. तसेच सदर विनियम शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे मंजूरीसाठी पाठविणेत यावेत, असे सर्वानुमते ठरले.

त्यावेळी कार्यकारी अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, कलम २१ खालील प्रयोजनांमध्ये वैयक्तीक व्यक्तीला अर्थसहाय्य करता येणार नाही.

**<u>विभागाचा अभिप्राय:-</u>**

१) दररोज वैयक्तीकरित्या, शैक्षणीक, आर्थिक अशा वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात, त्यामुळे एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

२) वैयक्तीक व्यक्तीला (कारणासाठी) अर्थसहाय्य करणेबाबत अधिनियम २००४ मध्ये स्पष्ट तरतूद नाही.

३) जर्मनी येथे होणा-या स्पर्धा हया राष्ट्रीय स्तरावरील नसून त्या खाजगी संस्थेने आयोजित केलेली आहे

४) श्री रजत गेठे हा राज्याचे अथवा देशाचे प्रतिनीधीत्व करीत नसून वैयक्तीक प्रतिनिधीत्व करीत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी चा कारभार अधिनियम २००४ अन्वये चालत असून त्यात वैयक्तीक कारणासाठी अनुदान देणेबाबत तरतुद नाही. उपरोक्त छाननी समिती व विभागाचा अभिप्राय विचारात घेऊन, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अधिनियम- २००४ मध्ये वैयक्तिक कारणासाठी अनुदान देणेबाबत तरतूद नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१८** **व्दारकामाई वृध्दाश्रम शिर्डी, कर्मचारी वसाहत सिंचन शाखा शिर्डी व श्रीरामनगर शिर्डी यांचेकडुन संस्थानमार्फत पाणी पुरवठा होणेसाठी केलेल्या मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियम कलम 17 मधील पोट-कलम (2) च्या खंड (ण) अन्वये "मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईचे दर्शनासाठी दिवसेंदिवस साईभक्तांचे संख्येत मोठया प्रमाणावर वाढ होत आहे. संस्थानमार्फत साईभक्तांचे सोयी-सुविधेसाठी निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था माफक

दरात करण्यात येत आहे. साईभक्तांचे पिण्याचे व निवासव्यवस्थेकरीता बांधण्यात आलेल्या इमारतींकरीता पाणी पुरवठा करणेकामी शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजना सन 1992 पासून कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदर योजनेतंर्गत मौजे कनकुरी ता.राहाता या ठिकाणी पाणी साठविणेसाठी चार साठवण तलावांची निर्मिती करण्यात आलेली असून, त्यांची साठवण क्षमता 311 एम.एल. इतकी आहे. सदरचे साठवण तलावात नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन (रोटेशन) देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन 53.3205 एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे.

सदरहू योजनेतून मौजे कनकुरी, पिंपळवाडी या गावांसह संस्थान परिसर, श्री साईप्रसादालय, विविध भक्तनिवासस्थाने, शैक्षणिक संकुले यासह कर्मचारी वसाहती, नव्याने झालेले साईआश्रम प्रकल्प भाग 01 व भाग 02 तसेच 03 कर्मचारी हौसिंग सोसायटी, शिर्डी पोलीस स्टेशन, या ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सद्यस्थितीत संस्थानचा दैनंदिन पाणी वापर हा अंदाजे सरासरी 35 लाख लिटर्स ते 40 लाख लिटर्स इतका झालेला आहे. गर्दीचे कालावधी सदरचा पाणी वापर हा यापेक्षाही जास्त होत आहे. मागील दोन ते तीन वर्षापासून पर्जन्यमान कमी होत असलेने, संस्थानकडुन साईभक्तांना पाणी पुरवठा करणेसाठी विकत टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करुन घ्यावा लागलेला आहे.

**प्रस्ताव:-** संदर्भ क्रं.01 अन्वये, व्दारकामाई सेवा ट्रस्ट, हैद्राबाद यांचे दि.09 जानेवारी, 2017 रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदरहू पत्रान्वये त्यांनी कनकुरी रोडवरील व्दारकामाई वृध्दाश्रम, शिर्डी करीता संस्थानकडून मोफत पिण्याचा पाण्याचा पुरवठा नियमित सुरु ठेवणेबाबत विनंती केलेली आहे.

व्दारकामाई वृध्दाश्रम, शिर्डी मध्ये वृध्द स्त्री/पुरुष राहत असलेने त्यांचे पिण्याचे पाण्याचे सोयीसाठी तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे तोंडी सुचनेनुसार 1/2" नळ कनेक्शनव्दारे संस्थानकडुन पिण्याचे पाण्याचा पुरवठा जोडुन देण्यात आलेला होता. त्यांना 1/2" नळ कनेक्शनव्दारे दररोज 1 तास पाणीपुरवठा करणेत येत आहे. संस्थानचे पाणी टंचाई कालावधीत सदरचा पाणी पुरवठा बंद करणेत येत असल्यामुळे त्यांनी संस्थानकडून मोफत पिण्याचा पाण्याचा पुरवठा नियमित सुरु ठेवणेबाबत विनंती केलेली आहे.

**संदर्भ क्रं.02 अन्वये**, सिंचन शाखा, शिर्डी यांचे जा.क्रं./7/सन 2017, दि.12 जानेवारी, 2017 रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदरहू पत्रान्वये त्यांनी श्री साईबाबा संस्थानला पाणी पुरवठा करणेबाबत पाटबंधारे विभागाचे नेहमीच सहकार्य असलेने, नगर-मनमाड रोड लगतचे शिर्डी येथील पाटबंधारे कर्मचारी वसाहतीस पाण्याचा स्त्रोत नसलेने, वसाहतीतील 05 कुटुंबास पिण्याचे पाण्याचा पुरवठा होणेबाबत विनंती केलेली आहे.

सिंचन शाखा, शिर्डी कर्मचारी वसाहतीस संस्थानकडुन तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे तोंडी सुचनेनुसार 1" नळ कनेक्शनव्दारे दररोज 1 (एक) तास पाणी पुरवठा करणेत येत असून, संस्थानचे पाणी टंचाई कालावधीत सदरचा पाणी पुरवठा बंद करणेत येतो.

**तसेच संदर्भ क्रं.03 अन्वये,** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे जा.क्रं.न.पं./टिबल क्रं.7/124/2017, दि.10 जानेवारी, 2017 रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे. सदरहू पत्रान्वये शिर्डी नगरपंचायत हद्दीतील श्रीरामनगर भागात नाला रोड व विठ्ठल नगर परिसरात नागरीकांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत संस्थानचे ओव्हर हेड टॅंक येथील विहिरीतुन पाणीपुरवठा पुर्ववत सुरु करणेस विनंती केलेली आहे.

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील श्रीरामनगर भागात नाला रोड व विठ्ठल नगर परिसरात नागरीकांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे तोंडी सुचनेनुसार ओव्हर हेड टॅन्क येथील विहीरीतील पाणी 2" पाईप कनेक्शनव्दारे दररोज 1 (एक) तास पाणी पुरवठा करणेत येत असून, संस्थानचे पाणी टंचाई कालावधीत सदरचा पाणी पुरवठा बंद करणेत येतो.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** व्दारकामाई सेवा ट्रस्ट, हैद्राबाद संचलीत व्दारकामाई वृध्दाश्रम शिर्डी, सिंचन शाखा शिर्डी कर्मचारी वसाहत व शिर्डी नगरपंचायत हद्दीतील श्रीरामनगर भागात नाला रोड व विठ्ठल नगर परिसरात नागरीकांना होणारा पाणी पुरवठा हा तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे तोंडी सुचनेनुसार तात्पुरता जोडुन देण्यात आलेला होता. संस्थानचे पाणी टंचाई कालावधीत सदरचा पाणी पुरवठा बंद करणेत येतो.

वरील संदर्भीय पत्रान्वये व्दारकामाई सेवा ट्रस्ट, हैद्राबाद संचलीत व्दारकामाई वृध्दाश्रम शिर्डी, सिंचन शाखा शिर्डी व शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सदरहू पत्रात नमुद केलेप्रमाणे पाणी पुरवठा पुर्ववत सुरु करणेबाबत मागणी केलेली आहे. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय होणे आवश्यक आहे असे मत आहे.

तरी व्दारकामाई सेवा ट्रस्ट, हैद्राबाद संचलीत व्दारकामाई वृध्दाश्रम शिर्डी, सिंचन शाखा शिर्डी व शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी केलेल्या मागणीबाबत नियमानुसार शुल्क आकारुन किंवा मोफत पाणी पुरवठा सुरळीत ठेवणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारकामाई वृध्दाश्रम शिर्डी व कर्मचारी वसाहत सिंचन शाखा, शिर्डी यांना सध्या संस्थानमार्फत पाणी पुरवठा चालू आहे, तो यापुढे मीटरद्वारे सशुल्क सुरु ठेवण्यात यावा. तसेच श्रीरामनगर, शिर्डी येथील रहिवाशांसाठी संस्थान ऐवजी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी मार्फत पाणी पुरवठा करणेस कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **पेन्सिल चित्रातील "साईबाबा" यांचा जीवन पट सादरीकरण परवानगी बाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत. कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

व्यवस्थापन समितीचा ठराव:- निरंक

प्रास्तविक :- दि. २२.०४.२०१७ रोजीच्या पत्रान्वये श्री साईबाबांचे समाधी शताब्दी निमित्त पेन्सिल चित्रातुन ४ फुट उंच व ८६४ फुट लांबीचा जीवनपट करण्याचा मानस असले बाबत नमुद असुन सदर भव्य चित्रे "गिनीज वल्ड रेकार्ड" साठी नामांकीत करण्यात येणार आहे त्याबाबतीत काही मुद्दे खालील प्रमाणे सादर केले आहेत.

१) हे साईचरित्र conson पेपरवर चित्रित करण्यात येणार आहे. त्या साठी ४ फुट उंच व ३५ फुट लांबीचे २४ रोल फ्रांसहुन, लागणा-या पेन्सिल ऑस्ट्रिया वरुन व खोडरबर जर्मनी वरुन मागविण्यात येणार आहे.

२) ह्या चित्रांव्दारे श्री साईबाबांचे समाधी शताब्दी निमित्त साईचरित्र जास्तीत जास्त भक्त भाविकांपर्यंत पोहचावे अशा प्रकारे बाबांची सेवा करण्याची त्यांचा मानस आहे

३) आपल्या कडील मंजुरी मिळताच कामास प्रारंभ करुन हे भव्य चित्र जुलै २०१८ पर्यंत पुर्ण करुन आपण उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर कायम स्वरुपात लावुन संस्थेस देणगी स्वरुपात देण्यात येणार आहेत.ह्या चित्रांची देखभालीची जबाबदारी देखील ते घेणार असुन नियमित देखभाल ते करणार आहेत व या चिंत्राची आयुष्य मर्यादा २० ते ३० वर्ष इतकी असेल.

४) साधारणपणे या प्रकल्पास लागणारे साहित्य (पेपर+पेन्सिल+इत्यादी) प्रत्यक्ष काम, मांडणी, सादरीकरण (फ्रेमसह लाईट व इतर फिटिंग) असा एकंदर खर्च रु. ४५,००,०००/- (पंचेचाळीस लाख रुपये.) होणार आहे जो ते देणगी स्वरुपाने करणार आहेत.

५) ह्या पेन्सिल चित्रातील जीवनपट कायम स्वरुपी लावणेसाठी संस्थानच्या अधिकाऱ्यांसह त्यांनी पाहणी केलेली असुन त्या प्रमाणे साईआश्रम मधील प्रत्येक इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील व्हरांडा (parapet wall) मिळावी असे कळविले आहे.

उपरोक्त प्रमाणे मुद्दे सादर केले असुन सदर प्रस्तावास संस्थानचे स्तरावर मंजुरी मिळावी व श्री साईबाबांचे समाधी शताब्दी महोत्सवात आम्हास बाबांची सेवा करण्याची संधी मिळणे बाबत या पत्राव्दारे नम्र विनंती केली आहे.

विभागाची मागणीः- निरंक

संस्थानचे अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक कायदेशीर व आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः- आर्थिक दृष्टया खर्चिक मात्र देणगीदाखल असलेने संस्थानचे नावलौकिकात भर घालणारे आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री. नागपुरे हे ३५ वर्षापासुन ह्या क्षेत्रात कार्यरत असुन त्यात राजकीय, सामाजिक अशा लोकांची स्केच चित्रे तयार केली आहेत. अशा चांगल्या कार्याबद्द्ल त्यांचे०४ वेळा "गिनीज बुक" व ०५ वेळस "लिम्का बुक" मध्ये नोंदी झालेल्या आहेत. साईबाबांवर श्रध्दा असलेल्या साईभक्तांकडुन साईबाबांचे जीवनपटावरील पेन्सिल चित्र श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी महोत्सवा निमित्त प्रदर्शित झाल्यास साईभक्तांसाठी एक आकर्षक व अविस्मरणीय बाब ठरेल त्यामुळे साईभक्तांमध्ये व त्यांच्या भक्तीत निश्चितच वाढ होईल असे याविभागाचे मत असलेने श्री. नागपुरे यांना पेन्सिल चित्रातील "साईबाबा" यांचा जीवन पट सादरीकरण्यास परवानगी असावी तसेच सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर करणेस निर्णायार्थ सादर.

**निर्णय क्र.५४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत कलादालन उभारणेचे प्रस्तावित असून, सदरहू कलादालन उभारणेत आलेनंतर तेथे श्री.नागपुरे यांना पेन्सिल चित्रातील "साईबाबा" यांचा जीवन पट सादरीकरण करणेस परवानगी देण्यात यावी. तसेच त्यांचेकडील पेन्सिल चित्रातील जीवनपट साईआश्रमच्या प्रत्येक इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील दर्शनी भागामध्ये कायम स्वरुपी लावणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२०** **महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) यांचेकडून मंदिर व परीसराकरीता मनुष्यबळ घेणेबाबत तसेच सुरक्षा ऑडीट मधील त्रुटीनुसार साहित्यांबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे मंदिर व मंदिर परिसराचे सुरक्षितता ही बाब अत्यंत महत्वाची असल्यामुळे सुरक्षा यंत्रणा, फायर सेफ्टी, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा वगैरे सुरक्षा विषयक मार्गदर्शनासाठी केंद्र शासनाच्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल यासारख्या चांगल्या संस्थेचे मार्गदर्शन घेण्याची संस्थानला आवश्यकता असल्याने, त्यास अनुसरुन केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे (CISF) अधिकारी यांनी दि.14.01.2016 ते दि.18.01.2016 या कालावधीत मंदिर, मंदिर परिसर तसेच संस्थान संलग्न सर्व परिसराची पहाणी करुन आढळुन आलेल्या त्रुटी, उणीवाबाबत सुरक्षितेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना व खरेदी करणे आवश्यक असलेले सुरक्षा साहित्य इत्यादी बाबतचा सविस्तर सुरक्षा अहवाल इकडील कार्यालयास सादर केला होता. परंतु CISF यांनी पुर्णवेळ संस्थानला सुरक्षा व्यवस्था पुरविणेस तयार नसल्याचे कळविले होते.

त्या अनुषंगाने CISF यांचेकडील प्राप्त अहवालानुसार सुरक्षा साहित्य खरेदीबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात आला होता. त्यावेळी सदरच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडुन मंदिर व परीसराचे सुरक्षा ऑडीट करुन त्यांचे अहवालानुसार सुरक्षा व्यवस्था व सुरक्षा साहित्य खरेदीबाबत प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

**अ)** महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) यांना संस्थानमार्फत रजिष्ट्रेशन फी आदा करण्यात येऊन त्यांनी दि.20.09.2016 व दि.21.09.2016 रोजी संस्थान परीसरात सुरक्षीततेच्या दृष्टिकोनातून सुरक्षा ऑडीट करण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांनी उपरोक्त संदर्भिय क्र.१ अन्वये दि.09.11.2016 आवक नं.14956 रोजीचे पत्रान्वये इकडील कार्यालयास सुरक्षा ऑडीट अहवाल सादर केला होता.

उपरोक्त संदर्भिय सुरक्षा ऑडीट अहवालामध्ये MSSC यांनी श्री साईबाबा संस्थानला दररोज 1342 सुरक्षा कर्मचा-यांची आवश्यकता असल्याचे कळविलेले आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांनी सादर करण्यात आलेल्या नियमावलीनुसार 1342 सुरक्षा कर्मचा-यांचे सरासरी तीन महिन्यांचे वेतन 'सिक्युरीटी डिपॉझीट' म्हणून (विना सेवा शुल्क् आणि रीफंडेबल) आणि एक महिन्याचे वेतन (सेवा शुल्कासहीत) ॲडव्हान्स म्हणून MSSC कडे जमा करावे लागेल, असे कळविलेले आहे. तसेच त्यांचे अहवालानुसार त्यांनी 'सिक्युरीटी सुपरवायझर ऑफीसर' (निवृत्त पोलीस अधिकारी (Acp/Dysp पदाचे)) यांची वरीष्ठ अधिकारी म्हणून नेमणूक करण्याची शिफारस करण्यात यावी तसेच त्यांचेकडील प्राप्त अहवालानुसार त्यांनी संस्थानला पुरविण्यात येणा-या कर्मचा-यांचे खालीलप्रमाणे दरमहा वेतन कळविले होते.

| Name of post | Chargable Rate | Name of post | Chargable Rate |
|---|---|---|---|
| SSO (Rtd. Addi.SP) | 80,000/- | AHG (Armed Head Guard) | 24,000/- |
| SSO (Rtd. ACP) | 60,000/- | HG (Head Guard) | 21,000/- |
| SSO (Rtd. P.I.) | 50,000/- | SG (Security Guard) | 20,000/- |
| SO | 33,000/- | LSG (Ladies Security Guard) | 20,000/- |
| ASO | 27,000/- | ASG (Armed Security Guard) | 23,000/- |
| SS | 36,000/- | | |

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे सुरक्षा ऑडीट अहवालानुसार 1342 सुरक्षा कर्मचा-यांकरीता मासिक रु. 3,24,19,650.00 (अक्षरी रुपये तीन कोटी चोवीस लाख एकोणवीस हजार सहाशे पन्नास) मात्र खर्च येत असल्याने सदरचा खर्च जादा प्रमाणात असल्याने संस्थानमार्फत एवढया जादा प्रमाणात खर्च करणे उचित नसल्याने मंदिर व परीसराकरीताच आवश्यक लागणारे मनुष्यबळ महाराष्ट्र सुरक्षा महामंडळाकडून घेणेबाबतचा

प्रस्ताव सादर केला असता त्यावर तात्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा करा शेरा देऊन तुर्त स्थगित ठेवण्यात आले होते.

**ब)** तसेच शुक्रवार, दि.१२/०५/२०१७ रोजी पोलीस अधिक्षक मा.रंजनकुमार शर्मा सो. यांनी मंदिर व परीसरात पहाणी करुन संस्थानचे लेंडीबाग येथील मिटींग हॉल येथे संस्थान सुरक्षा ऑडीट संदर्भात मिटींग घेतली होती. त्यावेळी त्यांनी उपरोक्त दोन्ही केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (CISF) व महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (MSSC) यांचेकडील प्राप्त अहवालावर चर्चा करुन त्यांनी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेकडुन सुरक्षा कर्मचारी घेणेबाबत मत व्यक्त केले. त्यावेळी अहवालात निर्देशित केलेल्या सुरक्षा कर्मच-यांची संख्या जास्त प्रमाणात असलेने आवश्यक त्याच ठिकाणी सुरक्षा कर्मचारी घेणेबाबत चर्चा झाली. त्यानुसार त्यांनी डॉ.सागर पाटील सो., उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे समवेत संस्थान अधिकारी यांनी एकत्रित चर्चा करुन आवश्यक सुरक्षा कर्मचारी यांचे पाँईटची निश्चिती करुन प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना करण्यात आल्या होत्या.

तसेच पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.जिविशा/शिर्डी मंदिर सुरक्षा/ ३७२९/ १७ दि.०१/०६/२०१७ अन्वये त्यांनी सुरक्षा आढाव्यात जादा मनुष्यबळाचे संदर्भात खालीलप्रमाणे त्रुटी दर्शविलेली आहे.

| अ.नं. | आढळुन आलेली त्रुटी व उणिवा | केलेली सुचना |
|---|---|---|
| ९ | सध्या मंदिर परीसरामध्ये पोलीस विभागाकडुन मंदिर परीसरात सुरक्षेकरीता १ पोनि, १ पोसई, ६३ पोलीस कर्मचारी, नाशिक परीक्षेत्रातुन ३ अधिकारी व ३५ पोलीस कर्मचारी नेमले जातात. तसेच मंदिर प्रशासना कडुन १००१ खाजगी सुरक्षा रक्षक कर्मचा-यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. हि सुरक्षा व्यवस्था पाहाता मंदिर प्रशासनाकडुन पुरविण्यात येणारी सुरक्षा ही प्रशिक्षित नसल्याने सुरक्षे संबंधी त्रुटी निर्माण होत आहेत. या त्रुटी भरुन काढण्यासाठी मंदिर प्रशासनाने महाराष्ट्र सिक्युरीटी फोर्स यंत्रणा यांच्याकडुन प्रशिक्षीत सुरक्षा रक्षक घेतल्यास अथवा निवृत्ता सैन्या अधिकारी/ कर्मचारी, पोलीस खात्यामधुन निवृत्ता झालेले अधिकारी/कर्मचारी हे संरक्षण कामी घेतल्यास मंदिर सुरक्षेसाठी फायदा होईल व कमीत कमी लोकामध्ये मंदिराची सुरक्षा चांगल्या प्रकारे करता येईल. या उपर मंदिर व्यवस्थापनामार्फत व शासनाकडुन मंदिर सुरक्षेसाठी सी.आय.एस.एफ कडुन संरक्षण घेणेबाबतचा विचार झाल्यास त्यास आमची हरकत असणार नाही. | मंदिरात सुरक्षे संबंधी त्रुटी निर्माण होत आहेत. या त्रुटी भरुन काढण्यासाठी मंदिर प्रशासनाने महाराष्ट्र सिक्युरीटी फोर्स यंत्रणा यांच्याकडुन प्रशिक्षीत सुरक्षा रक्षक घेतल्यास अथवा निवृत्ता सैन्या अधिकारी/ कर्मचारी, पोलीस खात्यामधुन निवृत्ता झालेले अधिकारी/कर्मचारी हे संरक्षण कामी घेतल्यास मंदिर सुरक्षेसाठी फायदा होईल् व कमीत कमी लोकांमध्ये मंदिराची सुरक्षा चांगल्या प्रकारे करता येईल. या उपर मंदिर व्यवस्थापनामार्फत व शासनाकडुन मंदिर सुरक्षेसाठी सी.आय.एस.एफ. कडुन संरक्षण घेणे बाबतचा विचार झाल्यास त्यास आमची हारकत असणार नाही. याबाबत त्वरीत कारवाई होणे गरजेचे आहे. |

त्याअनुषंगाने मा.डॉ.सागर पाटील सो. यांनी केलेल्या सुचनेनुसार साई मंदिर सुरक्षा विभागाचे श्री.सचिन जाधव सो., सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी मंदिर व परीसरातील सर्व्हेकरुन आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची पॉईंटची निश्चिती करुन खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे इकडील कार्यालयास कळविलेली आहे.

**शिर्डी संस्थान सुरक्षा व्यवस्थेचा आढावा तक्ता**

| अ. नं. | ठिकाण | प्रथम सत्र | | व्दितीय सत्र | | तृतीय सत्र | | एकूण | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | SG | LSG | SG | LSG | SG | LSG | SG | LSG | |
| १ | गेट A फ्री दर्शन | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| २ | गेट B फ्री दर्शन | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| ३ | गेट नं.०३ आत/बाहेर | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| ४ | गेट नं.०४ आत/बाहेर | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| ५ | गेट नं.०५ बाहेर | १ | १ | १ | १ | १ | १ | ३ | ३ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| ६ | गेट नं.०२ व्हीआयपी | १ | १ | १ | १ | १ | १ | ३ | ३ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| ७ | साई कॉम्प्लेक्सा चेकिंग पाँईट | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| ८ | पिंपळवाडी रोड चेकिंग पाँईट | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| ९ | व्दारकामाई चेकिंग पाँईट | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| १० | मेन गेट नं.०४ च्या बाहेर | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | लाडु काऊंटर फ्री पासेस | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| १२ | प्रसादालय चेकिंग पॉईंट १ | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| १३ | प्रसादालय चेकिंग पॉईंट २ | २ | २ | २ | २ | २ | २ | ६ | ६ | फ्रिक्सींग/चेकिंग |
| | **एकूण** | **२४** | **२४** | **२४** | **२४** | **२४** | **२४** | **७२** | **७२** | फ्रिक्सींग/चेकिंग |
| १४ | **SSO** | **जनरल शिफ्ट** | | | | | | **०१** | | |
| १५ | **ASO** | **दोन सत्रात (६/२, २/१०)** | | | | | | **०२** | | |
| १६ | **SS** | **१** | | **१** | | **१** | | **०३** | | |
| १७ | **HG** | **३** | | **३** | | **३** | | **०९** | | |

उपरोक्त तक्तयात दर्शविलेल्या सुरक्षा कर्मचा-यांच्या सुटया सोडविणे कामी लागणा-या कर्मचा-यांसह एकूण सुरक्षा कर्मचारी तक्ता खालीलप्रमाणे –

| SSO | ASO | SS | HG | SG | LSG | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०४ | ११ | ९३ | ९३ | २०४ |

**एकूण कर्मचारी संख्या (सुटया सोडविणेसह) – २०४ कर्मचारी**

मा.पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये साई मंदिर सुरक्षा विभागाने सर्व्हे करुन उपरोक्तप्रमाणे निश्चिती केलेल्या सुरक्षा अधिकारी, कर्मचारी यांचेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेकडील प्राप्त अहवालात दर्शविलेल्या दरपत्रकानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित राहिल.

| अ.नं. | पदनाम | अहवालानुसार वेतन | संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | **SSO** (Senior Security Officer) | 60,000 | 01 | 60,000 |
| २ | **ASO** (Asistant Security Officer) | 27,000 | 02 | 54,000 |
| ३ | **SS** (Security Seupervisor) | 36,000 | 04 | 1,44,000 |
| ४ | **HG** (Head Guard) | 21,000 | 11 | 2,31,000 |
| ५ | **SG** (Security Guard) | 20,000 | 93 | 18,60,000 |
| ६ | **LSG** (Ladies Security Guard) | 20,000 | 93 | 18,60,000 |
| | | **एकूण:-** | **204** | **42,09,000** |

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे अहवालातील वेतन दरपत्रकानुसार साई मंदिर सुरक्षा विभागाने निश्चिती केलेल्या मनुष्यबळाकरीता (एकूण २०४ कर्मचारी) रु.४२,०९,०००/- (अक्षरी रुपये बेचाळीस लाख नऊ हजार) मात्र मासिक खर्च अपेक्षित आहे.

**क)** मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर व मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परीक्षेत्र यांनी दि.१२/०५/२०१७ व दि.१५/०५/२०१७ रोजी राज्य गप्तवार्ता विभाग, उपकेंद्र, शिर्डी येथील अधिकारी, जिल्हा विशेष शाखा, अ.नगर, पोलिस निरीक्षक, शिर्डी पो.स्टे. व श्री साईबाबा मंदिर सुरक्षा तसेच शिर्डी संस्थानचे अधिकारी यांची संयुक्तरीत्या संस्थानचे लेंडीबाग येथील 0 नंबर मिटींग हॉल येथे संस्थानचे सुरक्षा ऑडीट संदर्भात घेतलेल्या मिटींगमध्ये सुरक्षा आढाव्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच पोलीस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.जिविशा/शिर्डी मंदिर सुरक्षा/३७२९/१७ दि.०१/०६/२०१७ अन्वये त्यांनी सुरक्षा आढाव्यात सुरक्षा साहित्यांबाबत खालीलप्रमाणे काहि प्रमुख त्रुटी दर्शविलेली आहे.

| **अ.नं.** | **आढळुन आलेल्या त्रुटी व उणिवा** | **केलेली सुचना** |
|---|---|---|
| ४ | शहरामध्ये येणा-या मुख्य रस्त्यांवर व चौकामध्ये गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे | शहरामध्ये येणा-या मुख्य रस्त्यांवर व चौकां मध्ये गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे त्यामुळे शहरात येणा-या हालचालीवर व वाहनांवर नजर ठेवणे शक्य होईल.<br>**– सदरच्या मुद्याबाबत सीसीटीव्ही विभागामार्फत नव्याने कॅमेरे खरेदी करुन बसविणे बाबतची कार्यवाही सुरु असुन त्याकामी त्यांचे मार्फत कन्सल्टंट नेमणुकीचीही व ई-निवीदा कार्यवाही चालु आहे.** |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रवेश रांगेच्या जवळ असलेले दोन्ही बॅगेज स्कॅनर मशिन बंद पडलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे बॅगेज, फुले, हार इत्यादी चेक करण्यासाठी लावण्यात आलेले स्कॅनर हे बंद असल्याने स्कॅनिंगकडे दुर्लक्ष होत आहे. दर्शनाकरीता येणा-या भाविकांच्या बॅग्ज हया व्यवस्थित न तपासता मंदिरात घेऊन जातात. तसेच त्या ठिकाणी नेमण्यात आलेले कर्मचारी हे प्रशिक्षीत नाहीत. | दोन्ही बॅग स्कॅनर मशिन हया सुरक्षेच्या दृष्टीकोनातून त्वरीत दुरुस्त करुन घेण्यात यावेत व सदर ठिकाणी प्रशिक्षीत असलेले सिक्युरीटी संस्थान कडुन नेमण्यात यावे. जेणेकरुन मंदिरात जाणा-या बॅगेज पर्स हया चांगल्याप्रकारे तपासणे शक्य होईल. |

त्यावेळी त्यांनी सुरक्षा आढाव्यातील त्रुटींबाबत विचारणा करुन आढाव्यानुसार सुरक्षा साहित्यांची तातडीने खरेदी करणेबाबत सुचना केल्या आहे. त्यानुसार वेळोवेळी केलेल्या सुचनानुसार तसेच सुरक्षा आढाव्यात दर्शविलेनुसार एक्स-रे बॅगेज स्कॅनर, डिएफएमडी, बॉडी स्कॅनर, व्हीएचएफ, एचएचएमडी इ. साहित्यांची खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्य.स.चे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आला असता त्यावर सविस्तर चर्चा होऊन येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरचे सुरक्षा साहित्य खरेदी कामी ई-निविदाची कार्यवाही करण्यात येत आहे.

**ड)** मा.ना.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.०६/०७/२०१७ रोजीच्या श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखडया संदर्भात आढावा बैठकित श्री साईबाबा मंदिर सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी व श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष २०१७-१८ दरम्यान होणारी भाविकांची गर्दी या सर्व पार्श्वभुमीवर मा.मुख्यमंत्री महोदय यांनी संरक्षण व्यवस्थेतील त्रुटी तातडीने दुर करणेसाठी शासनाच्या माहिती तंत्रज्ञान गृह विभागामार्फत शिर्डी येथे सीसीटीव्ही यंत्रणा तातडीने उभारणे व महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा व्यवस्था मंदिरासाठी उपलब्ध करुन घेणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

तरी मा.मुख्यमंत्री व मा.पोलीस अधिक्षक यांचे सुचनेनुसार तसेच सुरक्षा त्रुटी आढाव्यानुसार परीशिष्ठ 'ब' मध्ये नमुद केलेप्रमाणे साई मंदिर सुरक्षा विभागाने जादा मनुष्यबळासंदर्भात सर्व्हे करुन निश्चिती केलेल्या एकूण २०४ कर्मचारी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडुन घेणेकामी त्यांचेकडील प्राप्त अहवालातील दरपत्रकानुसार मासिक रु.४२,०९,०००/- (अक्षरी रुपये बेचाळीस लाख नऊ हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचेमार्फत मंदिर सुरक्षेकरीता सुरक्षा कर्मचारी घेणेकामी प्रतिमाह येणारे रु.४२,०९,०००/- (अक्षरी रुपये बेचाळीस लाख नऊ हजार) मात्र खर्चास मान्यता मिळणेस तसेच महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे पत्रातील मुद्दा क्र.०४ प्रमाणे तिन महिण्याचे सरासरी वेतन हे डिपॉझीट म्हणुन जमा करणेस व एक महिन्याचे वेतन ॲडव्हान्स म्हणुन महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे खात्यावर जमा करणे याबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सध्या संस्थानमध्ये कायम व कंत्राटी सुरक्षा रक्षकांची संख्या जास्त असल्यामुळे संस्थानवर मोठया प्रमाणावर आर्थिक भार पडत आहे. तथापि, मंदिर सुरक्षा हाही अतिशय प्राधान्याचा विषय आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांचे ५० सुरक्षा कर्मचारी व एक सुरक्षा अधिकारी एवढे मनुष्यबळ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुषंगाने सुरुवातीस एक वर्ष (दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१८) कालावधीसाठी घेणेत यावे व त्यांचा कामाच्या अनुभवानुसार व संस्थानची गरज पाहुन मनुष्यबळ वाढविणेबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन तसेच श्री साई समर्थ सामाजीक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ई-लर्निंग महाराष्ट्र या शैक्षणिक उपक्रमास आर्थिक सहाय्य देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन तसेच श्री साई सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत करण्यात आलेल्या इ- लर्निंग महाराष्ट्र हा शैक्षणीक उपक्रम राबविण्यात येणार असून या उपक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातील जि.प.शाळा डिजीटल करण्याचा आमचा मानस आहे. सदर उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण होईल व तंत्रज्ञानाशी स्पर्धा करण्याचे सामर्थ्य येईल. असे कळविले असून त्यासाठी श्री साईबाबा संस्थान मार्फत इ- लर्निंग महाराष्ट्र या उपक्रमास निधी उपलब्ध करून देणेबाबत विनंती केलेली आहे.

**अर्थ साहाय्य करणेबाब संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद -**

१) अधिनियम कलम १७ (२) (ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील,अशी तरतुद आहे.

२) अधिनियम कलम २१ (१) (ट) अन्वये कलम १७ (२) मधील कर्तव्ये पार पाडण्यासाठी विश्वस्त निधीचा विनीयोग करण्याचा अधिकार समितीला आहे.

३) अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

**विभागाचा अभिप्राय-**

१) दररोज शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

२) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध कामांकरिता ३१८६ कोटी रुपयांचा कृती आराखडा शासनास सादर केलेला आहे. संस्थानचा स्वतःचा निधीही त्यासाठी खर्च होणार असल्याने सबंधीतांना निधी देता येणार नाही असे वाटते.

३) श्री साईबाबा संस्थान मार्फत चालविले जाणारे श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कूल हे इमारतीअभावी दोन सत्रात चालविले जाते. तसेच श्री साईबाबा संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयासाठी इमारत नसल्याने त्याची साईआश्रम येथे पर्यायी व्यवस्था केलेली आहे.

४) श्री साईबाबा संस्थान मार्फत वरिष्ठ महाविद्यालय आणि भारतीय प्रशासन सेवा ॲकाडमी सुरू करण्याचे नियोजन असल्याने त्यासाठी मोठा निधी अपेक्षीत आहे.

तरी याबाबत उपरोक्त बाबींचा विचार होऊन निर्णय होणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामधील विभागाच्या अभिप्रायाचा विचार करता, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२२** **अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना नविन वर्ग खोल्या इमारती बांधकामासाठी रक्कम रु.३६ कोटी अनुदान देणेबाबत.**

**निर्णय क्र.५४३** कोणतीही चर्चा न करता सदरहू विषय स्थगित ठेवण्यात आला. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२३** **अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना संरक्षण भिंती बांधकाम करणेसाठी रक्कम रु.४२.७८ कोटी अनुदान देणेबाबत.**

**निर्णय क्र.५४४** कोणतीही चर्चा न करता सदरहू विषय स्थगित ठेवण्यात आला. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२४** **जिल्हा रुग्णालय, चंद्रपुरया आरोग्य रुग्णालयाकरीता एम.आर. मशिनसाठी अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सामान्य रुग्णालय चंद्रपूर हे ३०० खाटांचे जिल्हा रुग्णालय आहे. त्याअंतर्गत ३ उपजिल्हा रुग्णालय व १० ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित असून, जिल्हयात १५ तालुके आहेत यामध्ये कोपरना, राजूरा, गोंडपिंपरी हे अदिवासी क्षेत्र आहे. याशिवाय जिल्हयात मोठया प्रमाणावर औद्योगीक क्षेत्र, थर्मल पॉवर स्टेशन, सिमेंट उद्योग, स्टील उद्योग, पेपर मिल, कोळसा खाणी व इतर कारखाने आहेत. चंद्रपूर जिल्हयास तेलंगणा राज्याची सिमा तसेच यवतमाळ व अदिवासी नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हाची सिमा लागुन असल्यामुळे सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथे मोठया प्रमाणात आंतरबाहय रुग्णांची संख्या जास्त आहे.

सद्यस्थितीत सामान्य रुग्णालय येथे रुग्णांकरिता एमआरआय मशीन उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होते. त्या अनुषंगाने अत्याधुनिक पद्धतीचची एम आर आय मशिन द्यावयाची झाल्यास १६ कोटी ८० लक्ष इतका खर्च अपेक्षीत आहे. सोबत PHILIPS (3.0 Tesla) कंपनीचे व TOSHIBA MEDICAL (1.5 Tesla) यांचे दरपत्रक सादर केलेले असून एमआरआय मशीन साठी श्री साईबाबा संस्थान मार्फत निधी उपलब्ध करून देणेबाबत विनंती केलेली आहे.

**अर्थ साहाय्यसाठी अधिनियमातील तरतुद-**

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१क) पोटकलम १ च्या तरतुदीस अधीन राहुन विश्वस्तव्यस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने , आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अटी शर्तीच्या अधीन राहून, भक्तांना पायाभुत सुविधा पुरविणे किंवा त्या वाढवण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव:-** जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर यांना देणगी स्वरूपात एम आर आय. मशिन दिल्यास इतरही जिल्हे अशा प्रकारची मागणी करतील, असे कार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, चंद्रपूर हा अदिवासी व नक्षलग्रस्त जिल्हा असून त्याच्या शेजारीच गडचिरोली हाही नक्षलग्रस्त जिल्हा आहे. त्यामुळे जिल्हा रुग्णालय चंद्रपूर येथे नक्षली कारवायांमुळे जखमी झालेले जवान/नागरिक अथवा इतर कारणास्तव मोठया संखेने आंतरबाहय रुग्ण असतात. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल शिर्डी साठी एम आर आय मशीन (1.5 श्रीस्ला) मशिन खरेदीकरणेकामीची ई- निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आहे या सर्व बाबींचा विचार करता मानव जातीचे कल्याण या उदात्त हेतूने चंद्रपूर व गडचिरोली या दोन्ही जिल्हयांसाठी, रुग्णांच्या सोयीसाठी जिल्हा रुग्णालय चंद्रपूर यांना श्री साईबाबा हॉस्पीटल करिता एम. आर. आय. मशिन खरेदीकामी प्राप्त होणा-या निम्नतम दराची रक्कम अनुदान म्हणून देण्यात यावी. मात्र तत्पूर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात यावा असे ठरले.

**विभागाचा अभिप्राय:-** श्री साईबाबा हॉस्पीटल मार्फत राबविण्यात येणारी एम आर आय मशीन खरेदी प्रक्रिया तांत्रिक बाबींमुळे फेर निविदा मागविण्यात येणार आहे. पुनश्च प्रक्रिया राबविणे ही बाब विलंबाची आहे. जिल्हा शल्य चिकीत्सक चंद्रपूर यांनी नव्याने प्रस्ताव पाठविला असून त्यात त्यांनी १.५ Tesla एमआर आय मशीनसाठी रक्कम रु. ७.५ कोटीचे TOSHIBA MEDICAL यांचे दरपत्रक व ३.० Tesla साठी रक्कम रु. १६.८० कोटी चे PHILIPS कंपनीचे दरपत्रक सादर केलेले आहे.

तरी जिल्हा रुग्णालय चंद्रपूर यांना एम आर आय द्यावयाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ फेरसादर.

**निर्णय क्र.५४५** **जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपुर यांनी नव्याने 1.5 Tesla व 3.00 Tesla क्षमतेचे एम.आर.आय. मशिन खरेदीसाठीचे दरपत्रक सादर करुन अनुदानाची मागणी केलेली आहे. तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये, गडचिरोली सामान्य रुग्णालयासाठीही ०१ नग एम.आर.आय. मशिन उपलब्ध करुन देणेबाबत पत्र प्राप्त झालेले आहे, अशी माहिती मुख्यलेखाधिकारी यांनी सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, चंद्रपुर हा नक्षलग्रस्त व आदिवासी जिल्हा असून शेजारीच गडचिरोली हाही नक्षलग्रस्त जिल्हा आहे. त्यामुळे या जिल्यांममध्ये नक्षली कारवायांमुळे जखमी झालेले जवान, नागरीक व इतर आजारांचे उपचारासाठी सामान्य रुग्णालयामध्ये मोठया प्रमाणावर आंतरूबाहय रुग्ण असतात. यामुळे चंद्रपुर व गडचिरोली या दोन्ही जिल्हयासाठी मिळून सामान्य रुग्णालय, चंद्रपुर यांना, त्यांचे मागणीप्रमाणे ०१ नग १.५ Tesla एम.आर.मशिन खरेदी करणेकामी आवश्यक असलेली रु.७.५० कोटी रक्कम अथवा श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी एमआरआय मशिन खरेदीकामी सुरु असलेल्या ई-निविदा प्रकियेमध्ये प्राप्त होणाऱ्या निम्नतम दराची रक्कम, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यता घेण्यात येऊन, अनुदान स्वरुपात देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२५** **२.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत श्री साईबाबा संस्थानने मे.सुझलॉन एनर्जी लि.,पुणे यांचेमार्फत भोयरे पठार (सुपा) याठिकाणी २.५ मेगावॅट पवनचक्की प्रकल्प उभारुन दिनांक १४ ऑगस्ट २००७ रोजी दुपारी १६.०० वाजता प्रकल्प चालू करुन कार्यान्वित केलेला आहे.

प्रकल्प चालू झालेनंतर मेसुझलॉन एनर्जी लि., पुणे यांनी ऑगस्ट-२००७ ते जुलै-२००८ या एक वर्षाचे कालावधीत २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेची फ्री सर्व्हिस दिलेली होती. त्यानंतर ऑगस्ट-२००८ ते मार्च-२०१२ या कालावधीत ५ वर्षाकरीता तसेच एप्रिल-२०१२ ते जुलै-२०१७ या कालावधीसाठी ५ वर्षाकरीता मे.सुझलॉन एनर्जी लि., यांनी १० वर्षाकरीता त्या-त्या वर्षात २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट रकमेत दरवर्षी ५ % Escalation (वाढ) धरून दर कॉप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले होते.

मे.सुझलॉन एनर्जी लि., पुणे यांचे दि१४-०४-२०१७ चे पत्रान्वये माहे एप्रिल-२०१७ मे मार्च-२०२२ या पुढील ०५ वर्ष कालावधीकरीता ऑपरेशन-मेन्टेनन्स कॉप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करीता प्रतीवर्षी ७.५ % Escalation (वाढ) नमूद करुन नविन दर संस्थानला कळविलेले होते. यानुसार २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मे.सुझलॉन, पुणे यांना माहे एप्रिल-२०१७ मे मार्च-२०२२ या पुढील ०५ वर्ष कालावधीकरीता देणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-०५-२०१७ रोजीचे सभेत २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉप्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेसाठीच्या दरांवर चर्चा करणेसाठी मेसुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे प्रतिनिधींना बोलविणेत आलेले होते. त्यांचेबरोबर झालेल्या चर्चेनंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

२.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेसाठीच्या दरांवर चर्चा करणेसाठी मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे प्रतिनिधी आजचे सभेत उपस्थित होते.समितीने त्यांचेबरोबर CAMC चे पुढील ०५ वर्षाच्या दरांबाबत चर्चा केली. त्यांनी मागणी केलेले दर सदरहू पवनचक्कीच्या उत्पन्नातून मिळणाऱ्या रकमेच्या २५% आहेत. समितीने त्यांना पवनचक्कीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या १०% मात्र दरांमध्ये CAMC करावी, असे सांगितले असता, त्यांचे प्रतिनिधींनी वरीष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बोलणी करुन कळवितो, असे सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे हे पवनचक्कीमार्फत मिळणा-या उत्पनाचा १० % दरावर तयार असतील तरच त्यांना २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट पुढील ०५ वर्ष कालावधीसाठी देणेत यावे, अन्यथा विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.

यानंतर मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी दिनांक२४-०५-२०१७ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांचे नावे एक पत्र दिलेले असून सदरच्या पत्रावर मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहे. त्यानुसार सदरचे पत्र दि.२७-०६-२०१७ रोजी विद्युत विभागाकडे पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात आलेले आहे. मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी सादर केलेल्या पत्रामध्ये खालील बाबींचा उल्लेख केलेला आहे.

"मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे हे संस्थानच्या निदर्शनास काही गोष्टी आणून देऊ इच्छितात. यामध्ये विंडमीलचे असणारे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे पुर्ण कॉम्प्रेसिव्ह स्वरुपाचे (सर्व समावेशक) असे असून त्यामध्ये ०१). प्रिव्हेन्टीव्ह मेन्टेनन्स, ०२). क्युरेटिव्ह मेन्टेनन्स, ०३). मेजर ॲण्ड मायनर ब्रेकडाऊन या बाबींचा समावेश आहे.

तसेच सन २०१५-२०१६ मध्ये एका विंडमीलचे ब्लेड सेट तुटले असता मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी हे तिनही ब्लेड (सेट) कोणतेही अतिरिक्त चार्जेस न घेता बदलून दिलेले होते. याकरीता तीन वर्षाची ए.एम.सी.च्या रकमे इतकी रक्कम या ब्लेड सेट पोटी (साधारणत: ७५ लाख रुपये) लागणार होती. परंतू वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस मेन्टेनन्ससाठी असलेल्या चार्जेस अतिरिक्त कोणत्याही प्रकारची जादा रक्कम मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी संस्थानकडून घेतली नाही.

संस्थानच्या विनंतीचा मान ठेऊन मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांच्या मॅनेजमेंटने दोन्ही विंडमील मिळून रक्कम रु.३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.तीस लाख मात्र) अधिक टॅक्सेस सन २०१७-२०१८ करीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस मेन्टेनन्सचे चार्जेस असतील म्हणून कळविले आहे. तसेच पुढील वर्षापासून ७.५ % ऐवजी मागील १० वर्षापासून असलेले ५ % एक्सलेशननेच पुढील पाच वर्षामध्ये करण्यात येईल."

वरीलप्रमाणे मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी कळविलेले असून सदरचे पत्र हे विद्युत विभागाकडे दिनांक २७-०६-२०१७ रोजी प्राप्त झालेले आहे. परंतू विद्युत विभागामार्फत या अगोदर दिनांक १४-०६-२०१७ रोजी मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनामेल पाठविलेला असून त्यामध्ये सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे उत्पादित वीज युनिट रकमेच्या १० % इतक्या दरात मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे करावयास तयार असल्यास तसे आपण संस्थानला त्वरीत कळवावे जेणेकरुन आपणाला पुढील कार्यादेश देणे शक्य होईल. अन्यथा मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे हे १० % इतक्या दरात काम करण्यास तयार नसेल तर संस्थानला ई-निविदा बोलवाव्या लागतील, असेही मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांना कळविण्यात आलेले होते.

यावर मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी याबाबत आमचे मॅनेजमेंटशी चर्चा करुन कळवितो असे मेलव्दारे कळविलेले होते. त्यानुसार मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी दिनांक २८-०६-२०१७ रोजी मेल करुन संस्थानकरीता स्पेशल केस म्हणून खालीलप्रमाणे मागील पाच वर्षाची सरासरी काढून त्यातील सरासरीच्या १० % इतक्या दरात काम करण्यास तयार असल्याचे कळविलेले आहे. त्यानुसार गेल्या पाच वर्षाच्या कालावधीतील निर्मित झालेलया उत्पादित वीज युनिट रकमेचा खालीलप्रमाणे तक्ता मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी कळविलेला आहे.

| अ.क्र. | कालावधी | दर वर्षी मिळालेली रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१) | दि.०१-०४-२०१२ ते दि.३१-०३-२०१३ | रु. २,०५,२७,५४३.०० |
| ०२) | दि.०१-०४-२०१३ ते दि.३१-०३-२०१४ | रु. २,१८,०५,३१५.०० |
| ०३) | दि.०१-०४-२०१४ ते दि.३१-०३-२०१५ | रु. २,००,१४,२०८.०० |
| ०४) | दि.०१-०४-२०१५ ते दि.३१-०३-२०१६ | रु. २,०१,१२,०३०.०० |
| ०५) | दि.०१-०४-२०१६ ते दि.३१-०३-२०१७ | रु. २,२१,०९,७८३.०० |
| ०६) | दोन्ही विंडमिलची एकुण रक्कम | रु. १०,४५,६८,८७९.०० |
| ०७) | दोन्ही विंडमिलची एका वर्षाची सरासरी रक्कम | रु. २,०९,१३,७७५.८० |
| ०८) | राऊंडअप रक्कम | रु. २,०९,१३,७७६.०० |
| ०९) | एका विंडमिलची रक्कम | रु. १,०४,५६,८८८.०० |
| १०) | १० **%** रक्कम | रु. ०,१०,४५,६८८.८० |
| ११) | राऊंडअप रक्कम | रु. ०,१०,४५,०००.०० |

उपरोक्तप्रमाणे संस्थानकरीता स्पेशल केस म्हणून मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी गेल्या पाच वर्षाच्या कालावधीतील निर्मित झालेल्या उत्पादित वीज युनिट रकमेच्या सरासरीनुसार एका विंडमिलची एका वर्षाची कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची रक्कम १० % प्रमाणे रु.१०,४५,०००/- + इतर टॅक्सेस इतकी कळविलेली आहे. त्यानुसार दोन्ही विंडमिलची रक्कम रु. २०,९०,०००/- + इतर टॅक्सेस होत आहे.

प्रत्यक्षात दरवर्षी MERC च्या नियमानुसार उत्पादित वीज युनिटचे दर वाढत असतात. त्यामुळे दरवर्षी उत्पादित वीज युनिट रकमेमध्ये होणारी वाढ ही जास्त असणार आहे. या वाढीव दरांचा जर विचार केला तर भविष्यात मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांना प्रती विंडमील रक्कम रु. १०,४५,०००/- पेक्षा जास्त रक्कम १० % प्रमाणे द्यावी लागणार होती. परंतू मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी मागील पाच वर्षाची सरासरी गृहीत धरुन त्यावर फिक्स रक्कम रु.१०,४५,०००/- इतकी कळविल्याने संस्थानचा यात फायदाच होणार आहे.

तसेच दि.३०-०६-२०१७ रोजीच्या मेलनुसार मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी श्री साईबाबा संस्थानकरीता स्पेशल केस म्हणून कळविलेले प्रती विंडमील रु. १०,४५,०००/- ही रक्कम सन २०२२ पर्यंत कायम ठेवणार असल्याचे कळविले आहे. तसेच दि.०१-०७-२०१७ रोजीच्या मेलनुसार सदरची रक्कम ही त्यांना ॲडव्हान्स स्वरुपात देण्याचे मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांनी कळविलेले आहे

**मागणी:-**मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-०५-२०१७ रोजी झालेल्या सभेतील निर्णयानुसार व मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे ईमेलव्दारे कळविल्यानुसार मागील पाच वर्षाच्या वीज

उत्पादनापोटी मिळालेल्या एकुण रकमेच्या सरासरी रकमेवर होणारी १० % इतकी रक्कम प्रतिवर्षाकरीता रु. १०,४५,०००/- + टॅक्सेस (प्रती विंडमील) इतकी निश्चित करुन त्यानुसार पुढील पाच वर्षाकरीता या रकमेत कोणताही बदल न करता मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांना प्रतीवर्ष आदा करावी लागणार आहे त्यासाठी मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचेशी करारनामा करणे गरजेचे आहे

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांना प्रती विंडमील रु. १०,४५,०००/- + इतर टॅक्सेस याप्रमाणे दोन्ही विंडमीलकरीता रक्कम रु. २०,९०,०००/- + इतर टॅक्सेस इतकी रक्कम प्रती वर्षाप्रमाणे आदा करणेस व पुढील पाच वर्षाकरीता सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करारनामा करण्यास तसेच सदरची रक्कम ॲडव्हान्समध्ये मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांना प्रतीवर्ष आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६** **सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर लाडू प्रसाद विक्री काऊंटर्स सुरु करणेसाठी पत्र्याचे शेड उभारणे व इतर अनुषंगीक कामे करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) अन्वये मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल,व्यवस्थापन व प्रशासन करणे व खंड (ग) अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे या प्रयोजनांसाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-** दि.२७/०३/२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालील प्रमाणे निर्णय संमत झाला आहे.

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोयीसाठी जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या जुन्या इमारती काढून त्या ठिकाणी नविन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणेस मान्यता देण्यात आली. याकामी आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेकडून नियोजित इमारतींचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. तसेच जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं. १ व २ या इमारतींमध्ये साईभक्तांसाठी चालविण्यात येणारे विविध सेवा – सुविधांचे काऊंटर्स योग्य जागेची निश्चीती करणेत येऊन, इतरत्र स्थलांतरीत करण्यात यावे व या जुन्या इमारती पाडणेसाठी ( Demolition) प्रथमतः स्वतंत्र निविदा मागविण्यात यावा, असे ठरले.*

**प्रस्तावना:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४१ नूसार जुने प्रसादालय परिसरात नविन दर्शन लाईनची उभारणी करिता साईप्रसाद नं.१ व २ इमारती पाडणेपूर्वी सदर इमारतीमधील कार्यालय, काऊंटर्स स्टोअर्स इ. इतरत्र स्थलांतरीत करणेचे ठरले आहे. याकामी दि.०५/०५/२०१७ रोजी मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचे कक्षात झालेल्या सभेत सेवाधाम इमारतीचे आतील बाजूस तळमजल्यावर ६ लाडू विक्री काऊंटर्स सुरु करणेबाबत तसेच साईभक्तांना सुलभतेने जाणेकरीता इमारतीच्या पश्चिम बाजुने आत प्रवेश करण्यासाठी दोन खोल्यांच्या भिंती काढून प्रवेशद्वार तयार करणेबाबत सूचना केल्या आहेत.

सेवाधाम इमारतीचे दक्षिण बाजूकडील ३ रुममध्ये ६ काऊंटर्स सुरु करता येईल तसेच इमारतीचे आतील बाजुस असलेल्या १९X११ या साईजच्या ओपन टू कोर्ट यार्डचे मोकळया जागेत साईभक्तांना लाडू प्रसाद घेणेकामी लाईन लावता येईल. सेवाधाम इमारतीचे आतील बाजूस प्रवेश करणेकामी रुम नं.७७ व ५८ या दोन रुमच्या बाहेरील मधील भिंती काढून घेता येईल.

याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|
| ०१ | सेवाधाम इमारतीचे दक्षिण बाजूकडील तीन रुममध्ये काऊंटर करणेकामी व्यवस्था करणेकामी दरवाजे व खिडक्यांचे शटर काढणे. काऊंटरसाठी ऑफीस टेबल व खुर्च्या खरेदी करणे. | १,३८,२३४/- |

| | | |
|---|---|---|
| ०२ | काऊंटर समोरील पॅसेजला पाय-या तयार करणे. | १२,०७९/- |
| ०३ | काऊंटर समोर रेलींगवर कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारणे. | ३,८६,६१४/- |
| ०४ | सेवाधाम इमारतीमध्ये प्रवेश करणेकामी रुममधील भिंती काढणे व ग्रील गेट बसविणे. | १९,७४९/- |
| ०५ | काऊंटर रुम व पॅसेजमधील भिंतीचे रंगकाम करणे. | ५,०००/- |
| ०६ | सेवाधाम इमारतीचे ओपन टू – कोर्ट यार्डचे भागात तात्पुरते स्वरुपात मंडप व्यवस्था करणे. ( २३०० चौ. फुट ३ महिनेकरीता) | ८४,६४०/- |
| | **एकूण खर्च-** | **६,४६,३१५/-** |

प्रस्तावः- वर नमूद केलेप्रमाणे सेवाधाम इमारतीमध्ये लाडू विक्री काऊंटर तयार करणे व इतर सुविधा करणेकामी रु.६,४६,३१५/- मात्र खर्च अपेक्षित आहे. वरील कामांचे स्वरुप भिन्न असल्यामुळे सदर कामे वेगवेगळया एजन्सीजमार्फत करावी लागतील. उपरोक्त कामांपैकी तोडफोडीचे कामे, पाय-यासाठी वीट बांधकाम करणे व रंगकाम करणे ही कामे विभागामार्फत करता येईल. ओपन टू - स्काय कोर्टयार्डमध्ये कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारणेचे काम ई– निविदा मागवून करता येईल तोपर्यंत तात्पुरते स्वरुपात मंडप व्यवस्था करता येईल. सदरचे कामे विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून करता येईल.

तरी वरीलप्रमाणे सेवाधाम येथे लाडू विक्री काऊंटर तयार करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी तसेच त्याकरीता येणारे अपेक्षीत खर्चास व सदर कामासाठी विहीत पध्दतीने कोटेशन्स/ ई – निविदा मागवून करुन घेणेस मान्यता असावी. इतर अनुषंगीक कामे करणे.

**निर्णय क्र.५४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सेवाधाम इमारत अथवा मंगल कार्यालय येथे लाडू विक्री काऊंटर व इतर अनुषंगीक कामे करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ईनिविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **मौजे निमगांव कोऱ्हाळे, ता.राहाता येथील गट नं.८०, ८५, १६९ व १७२ मधील श्री साईप्रसादालय, वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थाने व साईआश्रम धर्मशाळा या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करण्यासाठी तडजोड शुल्क अदा करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-** अधिनियमातील कलम २१ मध्ये *"विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वारण्यात अथवा खर्च करण्यात येईल, असे नमूद आहे.*

*छ) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमांचे प्रदान.*

*ज) त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायदयान्वये विश्वस्त व्यवस्थेकडून देय्य असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान."*

**प्रस्तावना:-** वरील विषयाबाबत मा. तहसिलदार, राहाता यांचेकडून खालिल विनंतीपत्र प्राप्तझालेली असून ती सोबत अवलोकनार्थ जोडली आहेत.

| अ.नं. | संदर्भ क्रमांक | विषय | तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | राहाता तहसिल कार्यालय यांचे क्र.कावि.जमिन/८३५/२०१६ दि.१५/१०/२०१६ (आवक क्र. १३४७८, दि. १९/१०/२०१६) | विना परवाना/ बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत | श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांच्या मालकीचे बांधकामे नियमानुकूल करणेकामीचे प्रस्ताव तात्काळ दाखल करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती. |
| ०२ | राहाता तहसिल कार्यालय यांचे क्र.कावि.जमिन/तडजोड/६५/२०१६ दि.१५/११/२०१६(आवक क्र.१५६७१, दि.१५/११/२०१६) | विना परवाना बांधकाम / बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत. | कायदेशिर तरतुदींच्या अनुशंगाने स्टाप कॉर्टर व साई प्रसादालय या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करणेकामीचे प्रस्ताव तात्काळ दाखल करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती. |
| ०३ | राहाता तहसिल कार्यालय यांचे क्र.कावि.जमिन/तडजोड /६५/२०१६ दि.२१/१२/२०१६(आवक क्र.१८४९८,दि.२१/१२/२०१६) | विना परवाना बांधकाम / बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाप्रमाणे गट नं. ८० व ८५ मधिल बांधकामाचे मुल्यांकन रु.१२,११,३३,०००/- आहे. सदर मुल्यांकनाच्या १०% इतकी रक्कम तडजोड शुल्क (कंपाऊंडींग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | चार्जेस) भरुन इमारतींचे बांधकाम नियमानुकूल करणे आवश्यक असून त्याकरीता रक्कम रु.१,२१,१३,३००/- शासकीय खजान्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल होणेस विनंती. |
| ०४ | राहाता तहसिल कार्यायलय यांचे क्र.कावि.जमिन/तडजोड /८१४/२०१७ दि.०६/०७/२०१७,(आवक क्र. ८७५५,दि.०६/०७/२०१७) | मौजे –निमगांव-को, ता. राहाता येथिल विना परवाना बांधकाम/ बांधकामा आराखड्या व्यतिरीक्त केलेले बांधकाम नियामानुकूल करणेबाबत | मौजे निमगांव-को, ता. राहाता येथिल विना परवाना बांधकाम/ बांधकामा आराखडयाव्यतिरिक्त केलेले बांधकाम नियमानुकूल करणेकामी एकूण ४,३२,९९,६७३/- रुपये तडजोड शुल्क भरणेकामी संबंधितांना आदेश होणेस विनंती. |

वर नमूद पत्रांद्वारे तहसिलदार, राहाता यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २००४ ( सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३) अन्वये मौजे निमगांव – को-हाळे, ता. राहाता येथिल संस्थान मालकीच्या गट नं. १६९ मधिल स्टाफ क्वार्टर्स तसेच गट नं.८० व ८५ मधिल साई प्रसादालय या इमारतींच्या बांधकामासाठी ग्रामपंचायत निमगांव यांनी दिलेली परवानगी वैध नाही असे कळविले आहे.

सदरहू पत्रातील अंतिम परिच्छेदात खालीलप्रमाणे विनंती नमूद आहे.

**वरील अ. नं. २ चे पत्रः-**

*"प्रादेशिक योजनेचा मसूदा तयार किंवा मान्य करण्यात आलेल्या क्षेत्रांमध्ये नियोजन प्राधिका-याच्या परवानगीशिवाय कोणतेही विकासाचे काम अनुज्ञेय नाही. अहमदनगर जिल्हयासाठी दि. १४/०७/२००५ रोजी प्रादेशिक विकास योजना लागू झालेली आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १८ अन्वये नियोजन प्राधिकारी हे मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर असल्याने नियमानुसार बांधकाम परवानगी घेणे आवश्यक होते.*

*याबाबत मा. प्रधान सचिव नगरविकास विभाग यांचेकडील १०/११/१९९७ रोजीच्या आदेशातील मार्गदर्शक सुचनांनुसार बांधकाम नियमानुकूल करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांचेकडे प्रस्ताव दाखल करणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम ५२ ,५३ अन्वये आवश्यक परवानगीशिवाय करण्यात आलेले बांधकाम शास्तिस पात्र असल्याने कायदेशीर तरतुदींच्या अनुशंगाने स्टाफ कॉर्टर व साई प्रसादालय या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करणेकामीचे प्रस्ताव तात्काळ दाखल करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती आहे."*

**वरील अ. नं. ३ चे पत्रः-**"*मौजे निमगांव – को-हाळे, ता. राहाता येथिल गट नं. ८० व ८५ मधिल आपल्या मालकीच्या बांधकामांची तपासणी करुन मुल्यांकन कळविणेकामी संदर्भ क्र. ३ अन्वये उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग राहाता यांना कळविले असता त्यांचेकडील संदर्भ क्र.४ चा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाप्रमाणे गट नं. ८० व ८५ मधिल बांधकामाचे मुल्यांकन रु.१२,११,३३,०००/- आहे. सदर मुल्यांकनाच्या १०% इतकी रक्कम तडजोड शुल्क (कंपाऊंडींग चार्जेस) भरुन इमारतींचे बांधकाम नियमानुकूल करणे आवश्यक आहे. तरी रक्कम रु.१,२१,१३,३००/- शासकीय खजान्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल होणेस विनंती.*
*सार्वजनिक बांधकाम विभागाकडील संदर्भ क्र.४ चा मुल्यांकन अहवाल तसेच मा. सहाय्यक संचालक, नगररचना अहमदनगर यांचेकडील संदर्भ क्र.५ अन्वयेचा अहवाल सोबत जोडून सादर करत आहे."*

तहसिलदार, राहाता यांचे वर नमूद विनंतीचे अनुषंगाने सादर करणेत येते की, श्री साई प्रसादालय इमारतीचा सर्व साधारण तपशिल खालीलप्रमाणे आहे.

इमारतीचे नांवः- श्री साई प्रसादालय.
इमारतीचे स्थळः- मौजे निमगांव – को-हाळे, ता. राहाता गट नं.८०/१ पै. गट नं.८५ पै.
भूखंडाचे क्षेत्रः- २ हे. ८५ आर.
बांधकाम क्षेत्रः- तळमजला - ११६७९.८४ चौ. मी.
पहिला मजला – ५०४२.७२ चौ. मी.
एकूण – १६७२२.५६ चौ. मी.
बांधकाम पूर्णत्वाचा दिनांकः- १५/०८/२००७.

सदर इमारतीचे बांधकामासाठी परवानगी मिळणेबाबत संस्थानकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-बांधकाम/ १३३८४/ २००५, दि.१८/११/२००५ चे पत्राद्वारे मा. सरपंच, ग्रामपंचायत, मौजे निमगांव- को-हाळे

यांचेकडे अर्ज करणेत आला होता. त्यास अनुसरुन, ग्रामसेवक व सरपंच, ग्रामपंचायत, निमगांव- को-हाळे यांचेकडील जा.नं.४७/०६, दि.२४/०२/२००६ अन्वये बांधकाम परवाना प्राप्त झालेला आहे.

सदर इमारतीचे वापर परवान्यासाठी संस्थानकडील जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१३९५२/२००७, दि.३०/०८/२००७ चे पत्राद्वारे मा.सरपंच/ ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, निमगांव – को-हाळे यांचेकडे अर्ज करणेत आला होता. त्यास अनुसरुन ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव– को-हाळे यांचेकडील जा.नं.२१/०७, दि.०५/०९/२००७ अन्वये वापर परवाना प्राप्त झाला आहे.

सदरहू इमारत बांधकामासाठी संस्थानने सादर केलेल्या अंदाजपत्रकास मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, नाशिक यांनी रक्कम रु.१४,७०,१३,८५२/- मात्र इतक्या रकमेकरीता तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

श्री साई प्रसादालयात या इमारतीचा उदघाटन समारंभ मा. श्रीमती प्रतिभा देवीसिंग पाटील, महामहिम राष्ट्रपती, भारतीय गणराज्य यांचे शुभहस्ते मंगळवार दि.२७ नोव्हेंबर, २००७ रोजी संपन्न झालेला आहे.

मौजे निमगांव को-हाळे गट नं.८० व ८५ मधिल संस्थानचे श्री साई प्रसादालय इमारतीचे बांधकामाकरीता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, राहाता यांनी केलेले मुल्यांकन रु.१२,११,३३,०००/- च्या१०% रक्कमरु.१,२१,१३,३००/- मात्र तडजोड शुल्क (कंम्पाऊंडीग चार्जेस) शासकीय खजिन्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल करणेबाबत तहसिलदार, राहाता यांनी विनंती केली होती.

सदरहू प्रस्तावार श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त गठीत कृती आराखडा समीतीची मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्रजी फडणवीस यांचे अध्यक्षतेखाली द्वीतीय बैठक दि.३१/०३/२०१७ रोजी झाली. सदरहू बैठकीचे इतिवृत्तानुसार *"मौजे निमगांव को-हाळे, ता. राहाता येथील संस्थान मालकीच्या गट नं.८०, ८५, १७२ आणि १६९ मधील श्री साई प्रसादालय, साई आश्रम ०२, स्टाफ क्वार्टर या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करण्यासाठी संस्थानने प्रथमतः तडजोड शुल्क भरावे. तदनंतर तडजोड शुल्क परत मिळविण्याकरीता संस्थानने विभागीय आयुक्त, नाशिक यांच्यामार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करावा व त्या प्रस्तावावर यथोचित कार्यवाही करण्यात यावी,"* असा निर्णय झाला आहे.

त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला असता सदरहू प्रस्तवावर खालीलप्रमाणे निर्णय क्र. ४२७ समंत झालेला आहे.

"**..***यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथिल गट नं. ८०व ८५ मधिल साईप्रसादालय इमारत बांधकाम नियमानुकूल करणेसाठीच्या तडजोड शुल्काची फेरतपासणी करणेबाबत महसुल विभागस कळविणेत यावे व दरम्यानचे कालावधीमध्ये समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी सदरहू शुल्क कमी करणेसाठी शासन स्तरावर प्रयत्न करावेत. यानंतर येणारे अंतीम तडजोड शुल्क(कंपाऊंडींग चार्जेस) भरुन बांधकाम नियमीत करुन घेण्यात यावे, असे ठरले."*

मा.व्यवस्थान समितीचे निर्णयानुसार वर नमूद निर्णयानुसार श्री साईप्रसादालय इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करणेसाठीच्या तडजोड शुल्काची फेर तपासणी करुन इकडील कार्यालयास कळविणेकामी त्यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी/१७२४/२०१७ दि.३०/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले होते.त्यानुसार तहसिलदार, राहाता यांनी सदर विषयाबाबत झालेला पत्रव्यवहार व अनुषंगीक कायदेशीर तरतुदी यानुसार मुल्यांकनाचा तपशिल खालीलप्रमाणे कळविला आहे.

| गावाचे नांव | इमारतीचे नाव | गट नं. | यापुर्वी कळविलेले मुल्यांकन (रु.) | फेरतपासणी अंती आलेले मुल्यांकन (रु.) | तडजोड शुल्काची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| निमगांव-को | साई प्रसादालय | ८० व ८५ | १२,११,३३,००० | १२,११,३३,००० | १,२१,१३,३०० |
| निमगांव-को | साई आश्रम भक्तनिवास | १७२ | २८,९०,१२,२०८ | २८,५३,१२,८५२ | २,८५,३१,२८५ |
| निमगांव-को | स्टाफ कॉर्टर | १६९ | ३,६३,०१,४५७ | ३,५४,०१,१८१ | २६,५५,०८८ |
| | | | | **एकूण** | **४,३२,९९,६७३** |

**प्रस्ताव-** तरी तहसिलदार, राहाता यांनी उक्त तपशिलात नमूद केलेप्रमाणे मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथिल बांधकाम नियमानुकूल करणेकामी एकूण रु.४,३२,९९,६७३/- मात्र इतके तडजोड शुल्क भरणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. तसेच दि.०६/०७/२०१७ रोजी मा. मुख्यमंत्री, यांचे अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थान, मुंबई येथे झालेल्या बैठकीत सदरहु विषयाबाबत चर्चा झाली. त्यावेळी यापुर्वी दि. ३१/०३/२०१७

रोजी झालेल्या कृती आराखडा समितीचे बैठकीत याविषयी देण्यात आलेल्या निर्देशांन्वये संस्थानने कार्यवाही करावी असे मा. मुख्यमंत्री महोदय यांनी सूचित केले आहे. तरी त्यानुसार वर नमूद तपशिलाप्रमाणे तडजोड शुल्क एकूण रक्कम रु. ४,३२,९९,६७३/- मात्र तहसिलदार, राहाता यांना अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे, ता.राहाता येथील गट नं.८०, ८५, १६९ व १७२ मधील श्री साईप्रसादालय, वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थाने व साईआश्रम धर्मशाळा या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करण्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे रु.४,३२,९९,६७३/- मात्र तडजोड शुल्क तहसिलदार, राहाता यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीसाठी ध्वजस्तंभाची उभारणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम १(ख) रूढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, व पूजा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम १(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५८ अन्वये *"...शताब्दी वर्षाचे सुरूवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी सोबत सादर केलेल्या नमुन्यांमधील अ.नं.०३ चा नमुना सर्वानुमते मान्य करण्यात आला. या ध्वजासाठी भगव्या रंगाचे उच्च प्रतीचे रेशमी कापड वापरण्यात येऊन, त्यावर समाधी शताब्दीचा लोगो व श्रींचा श्रध्दा सबुरी मंत्र छापनेत यावा. तसेच ध्वजाची उंची साधारण ६० फुट म्हणेजच रामनवमी उत्सवातील निमोणकर निशाणाचे उंची इतकी असावी व ऊन, वारा, पावसामुळे ध्वज खराब होईल. याकरीता प्रत्येक उत्सवाचे वेळेस ध्वजाचे कापड बदलण्यात यावे. ध्वजाची पाद्यपुजा, उभारणी व स्तंभ सरंजाम बागेत करावी..."* असे ठरलेले आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस सन-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने त्याचे औचित्य साधून श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी ध्वजारोहणाचे कार्यक्रमाद्वारे श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाची सुरूवात व इतर धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे उदघाटन करण्याचे नियोजन आहे.

यासाठी मा.कार्यकारी अभियंता व मा.उपकार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग) यांनी दि.०१/०७/२०१७ रोजी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाची सुरूवात करावयाच्या ध्वजारोहणासाठी उभारावयाच्या ध्वजस्तंभाच्या जागेसाठी पहाणी केली. त्यानुसार समाधी मंदिर परिसरातील सरंजाम बाग, लेंडीबाग व जनसंपर्क कार्यालया शेजारील दगडी गेट नं.०१ हायमास्ट जवळ यापैकी एका ठिकाणी उभारता येईल.

सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ मध्ये नाशिक महानगरपालिकेमार्फत रामकुंड, नाशिक येथे कायमस्वरुपी पितळी ध्वजस्तंभ उभारण्यात आला आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांचेहस्ते ध्वजारोहण करण्यात येऊन कुंभमेळ्याचे कार्यक्रमांची सुरवात करण्यात आली होती. नाशिक येथे उभारण्यात आलेल्या ध्वजस्तंभाची दि.२८/६/२०१७ रोजी प्रत्यक्ष जाऊन पहाणी करण्यात आली आहे. सदरहू ध्वजस्तंभ संस्थानचे माजी विश्वस्त श्री.प्रदिप पटेल यांनी देणगीदाखल दिलेला आहे. श्री.पटेल यांचेशी संपर्क केला असता दि१०/०७/२०१७ रोजी शिर्डी येथे भेट देऊन ध्वजस्तंभाचे डिझाईन व इतर अनुषंगीक माहिती देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शतादी महोत्सवाच्या अनुषंगाने करावयाच्या ध्वजारोहण स्तंभाचे उभारणीसाठी खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१) मंदिर परिसरातील सरंजाम बाग, लेंडीबाग व जनसंपर्क कार्यालया शेजारील गेट नं.०१ हायमास्ट जवळ यापैकी एका ठिकाणी ध्वजस्तंभाची उभारणी करणे.

२) नाशिक येथील ध्वजस्तंभ संस्थानचे माजी विश्वस्त श्री. प्रदिप पटेल यांनी देणगीदाखल दिलेला आहे. करीता त्यांचेकडून माहिती घेऊन ध्वजस्तंभाची उभारणी करणेसाठी येणारे खर्चास मान्यता देणे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निणयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीसाठी लेंडीबागेमधील धबधब्याजवळ ध्वजस्तंभाची उभारणी करणेत यावी. सदरहू ध्वजस्तंभ दानशुर साईभक्त श्री.ए.एन. रेड्डी, नेल्लोर हे देणगीदाखल देणेस इच्छुक आहेत, त्यांची देणगी स्विकारणेत यावी. त्याचप्रमाणे यासाठी लेंडीबागेतील धबधब्याजवळ डान्सींग/ म्युझीकल/ लायटींग फाऊंटन तयार करणेची कार्यवाही सुरु करणेत यावी. लेंडी बाग व धबधबा सुशोभिकरण/ नुतनीकरणाचे काम तातडीने पुर्ण करुन घेण्यात यावे, असे ठरले व याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख/ बांधकाम/ विद्युत/ ध्वनीक्षेपण व टेलिफोन विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९** **मंदिर परिसरातील सभाकुंड येथे साईभजन संध्या, किर्तन, प्रवचन इत्यादी दैनंदिन कार्यक्रमांसाठी टेन्साईल फॅब्रीक शेड, अॅराकॉन पॅनेल पार्टीशन, एम.एस.ग्रील, इत्यादी कामे करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.२६१ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील सभाकुंड येथे साईभजन संध्या, किर्तन, प्रवचन इत्यादी दैनंदिन कार्यक्रमासाठी उभारण्यात येणा-या मंडपावर पडणा-या पावसाच्या पाण्याचा आवाज येणार नाही व कार्यक्रमांसाठी व्यत्यय येणार नाही. याकरीता सदरहू ठिकाणी व्हाईट कॅन्व्हासचा मंडप (डोम) उभारणी कामीचा प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले."*

समाधी मंदिराचे उत्तरेकडील सभाकुंड येथे उत्सवाचे कालावधीमध्ये कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करणेत येत असतात. मा. अध्यक्ष महोदय यांनी साईभक्तांना दर्शनाव्यतिरिक्त इतर वेळेमध्ये मंदिर परिसरात दररोज धार्मिक कार्यक्रम साईभजन संध्या/ किर्तन, प्रवचन इत्यादी आयोजित करणेबाबत मंदिर विभागास आदेशीत केले आहे. त्यास अनुसरुन मंदिर विभागाने त्यांचे कडील दि.०८/१०/२०१६ रोजीचे आदेशाने इकडील विभागाकडून खालील कामे करुन मिळणेबाबत कळविले आहे.

*".. समाधी मंदिराचे उत्तरेकडील भागात असलेल्या सारंजाम बाग येथे उत्तरेकडे तोंड असलेले मोठया आकाराचे स्टेज बांधुन देण्यात यावे तसेच त्यांचे शेजारी कपडे बदलणे, कलाकारांना चहा – पान करणेकामी एक छोटया आकाराची खोली बांधण्यात यावी. मंदिर विभागाचे साहित्य ठेवणे व कार्यक्रमाच्या नोंदी ठेवणेकामी, विद्युत व्यवस्था व ध्वनीक्षेपन, सीसीटीव्ही व्यवस्थाकरीता एकत्रित एक मोठया आकाराची खोली बांधून त्यात पार्टीशन करुन देण्याची व्यवस्था करण्यात यावी."*

समाधी मंदिराचे उत्तरेकडील सभाकुंड (पुर्वीचा सरंजाम बाग) येथे कार्यक्रमासाठी यापूर्वी पक्क्या रुपाचे स्टेज बांधणेत आले होते. तसेच या भागात कारंजा बसविणेत आला होता. सदरचा कारंजा व स्टेज काढण्यात येवून या ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविण्यात आले आहेत. मंदिर परिसरातील साईभक्तांना श्रींचे आरतीचा लाभ व्हावा याकरीता या ठिकाणी CCTV मार्फत TV बसविणेत आलेला आहे.

श्री साईबाबांचे समाधी शताब्दी सन २०१७-१८ या कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने सभाकुंड येथील परिसर आवश्यक त्यावेळी मोकळा करावा लागेल. याकरीता सदर ठिकाणी पक्क्या स्वरुपाचे स्टेज व्यवस्थे ऐवजी एम.एस. ॲगलचे फ्रेममध्ये प्लायवूड बसवून स्टेज तयार करता येईल. म्हणजे सदरहू स्टेज पाहिजे त्यावेळी काढून घेता येईल.

**प्रस्तावना:-** सभाकुंड येथे साईभजन संध्या/ किर्तन प्रवचन इत्यादी कार्यक्रमाचे दैनंदिन आयोजन करणेत आलेले आहे. सदर ठिकाणी स्टेजची व्यवस्था नसलेने मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवून सदरची व्यवस्था करुन घेणेत येत आहे. परंतू सदर कार्यक्रम हे अखंडपणे सुरु असलेने, कायमस्वरुपी स्टेज व्यवस्था करुन घेणे आवश्यक आहे. सभाकुंड येथील मोकळी जागा ६५फुट X६५ फुट या साईजची असून, सदरहू जागा कमी

असल्याने स्टेजकरीता बरीच जागा व्यापली जाईल. त्यासाठी २४X१६ साईजचे स्टेजकरीता सभाकुंड येथील स्टेडीयमच्या ४ फुट रुंदीच्या पॅसेजचा वापर स्टेजकरीता करता येईल. याकरीता स्टेडीयमचे पॅसेज समोरील भिंत काढावी लागेल. तसेच स्टेडीयमचे पश्चिम बाजूकडील स्लॅबचे छत असलेल्या भागाचा वापर ग्रीन रुमकरीता करता येईल. त्यामुळे स्टेजसमोरील भागात जास्त मोकळी जागा राहील व जागेचा वापर साईभक्तांचे बैठक व्यवस्थेसाठी करता येईल.

सभाकुंड येथे स्टेज उभारणेसाठी एम एस अॅगलमध्ये फ्रेमवर्क करुन त्यावर प्लायवूड बसविणे. स्टेजवरील शेडकरीता एम एस स्ट्रक्चरल स्टील फ्रेमवर्क करुन त्यावर कलर कोटेड पत्रे बसविणे, ग्रीन रुमचे पार्टीशनकरीता अॅराकॉन पॅनल शिट बसविणे इ कामे करणेसाठी येणारे अंदाजे २,९५,३३१/- मात्रचे खर्चास व याकामी आवश्यक मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपूढे सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊनवर नमूद निर्णय क्र.२६१ अन्वये मंदिर परिसरातील सभाकुंड येथे साईभजन संध्या, किर्तन, प्रवचन इत्यादी दैनंदिन कार्यक्रमासाठी उभारण्यात येणा-या मंडपावर पडणा-या पावसाच्या पाण्याचा आवाज येणार नाही व कार्यक्रमांसाठी व्यत्यय येणार नाही, याकरीता सदरहू ठिकाणी व्हाईट कॅन्व्हासचा मंडप (डोम) उभारणी कामीचा प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार मंदिर परिसरातील सभाकुंड येथील संपूर्ण मोकळया जागेत टेन्साईल फॅब्रीकचे शेड उभारता येईल, जेणेकरुन स्टेजसमोर साईभक्तांची बैठक व्यवस्था करता येईल. तसेच साईभक्तांचे ऊन, पाऊस यापासून संरक्षण होईल.

जुने प्रसादालय येथे लाडू काऊंटर, पिंपळवाडी रस्त्यावरील गेट नं.१ व मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळया जागेत टेन्साईल फॅब्रीकचे शेड उभारणेकामी ठेकेदार वेस्टर्न आऊट डोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांना रु.१,२२,९२,८८१/- मात्र रक्कमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. परंतू जुने प्रसादालय येथील लाडू काऊंटर गेट नं.१ जवळील शेडचे काम रद्द करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर कामाच्या खर्चात रक्कम रु.२९,२५,६४३/- मात्र बचत होणार आहे.

सभाकुंड येथील मोकळया जागेत टेन्साईल फॅब्रीक शेड ठेकेदार वेस्टर्न आऊट डोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांचेकडून त्यांचे मंजूर निविदा दरात उभारणेकामी खालीलप्रमाणे खर्च येईल.

| **अ.नं.** | **तपशिल** | **परिमाण/एकक** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| अ) | १) एम एस स्टीलमध्ये शेडचे फ्रेमवर्क तयार करुन त्यावर टेन्साईल फॅब्रीक बसविणे. | ४१० चौ.मी. | ५३२३.०४ | २१,८२,४४६.४० |
| | २) शेडचे स्ट्रक्चरल स्टील फ्रेमवर्ककरीता आर सी सी फाऊंडेशन करणे. | १४ नग | २६,५५५.५३ | ३,७१,७७७.४२ |
| | | | **एकुण (अ)** | **२५,५४,२२४.००** |
| ब) | स्टेज पाठीमागे ग्रीन रुमचे पार्टीशनकरीता व स्टेजचे मागील भागात अॅराकॉन पॅनल शिटचे पार्टीशन करणे. | ६०.०० चौ. मी. | १७२१.६० | १,०३,२९६.०० |
| क) | स्टेज पाठीमागील भागात एम एस ग्रील बसविणे. | २५.०० चौ. मी. | १,२५८/- | ३१,४५०.०० |
| | | | **एकुण अपेक्षित खर्च रुपये (अ+ब+क) .** | **२६,८८,९७०/-** |

**प्रस्तावः-** <u>सदर प्रस्तावाबाबत खालिल बाबींविषयी निर्णय होणेस विनंती.</u>

१) वरील 'अ' मध्ये नमूद टेन्साईल फॅब्रीक शेड व आर सी सी फाऊंडेशनचे कामासाठी येणारे अंदाजे रु.२५,५४,२२४/- मात्र खर्चास व सदर काम मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळया जागेत टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणी कामाचे ठेकेदार मे. वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांचेकडून त्यांचे मंजूर निविदादराने करुन घेणेस अथवा सदर कामासाठी ई – निविदा मागविणेस मान्यता देणे.

२) वरील 'ब' मध्ये नमूद अॅराकॉन पॅनेल बसविण्याचे कामासाठी अंदाजे रु.१,०३,२९६/- मात्र खर्चास व सदर कामासाठी ई–निविदा मागविणेस मान्यता देणे.

३) वरील 'क' मध्ये नमूद स्टेज पाठीमागिल भागात एम.एस. ग्रील बसविण्याचे कामासाठी येणारे अंदाजे रु.३१,४५०/- मात्र खर्चास व सदर काम संस्थानचे मेकॅनिकल विभागामार्फत करणेस मान्यता देणे.

तरी प्रस्तावातील उपरोक्त बाबींविषयी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील सभाकुंड येथे साईभजन संध्या, किर्तन, प्रवचन इत्यादी दैनंदिन कार्यक्रमांसाठी टेन्साईल फॅब्रीक शेड व आर.सी.सी. फाऊंडेशनचे कामासाठी येणारे अंदाजे रु.२५,५४,२२४/- मात्रचे खर्चास व सदर काम मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळया जागेत टेन्सईल फॅब्रीक शेड उभारणी कामाचे ठेकेदार मे.वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांचेकडून त्यांचे मंजूर निविदा दराने करुन घेणेस मान्यता देणेत आली. तसेच ॲराकॉन पॅनेल बसविणे व स्टेज पाठीमागिल भागात एम.एस. ग्रील बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे अनुक्रमे रु.१,०३,२९६/- व रु.३१,४५०/- मात्रचे खर्चासही मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३०** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमीत्ताने शिर्डी शहरामधुन जाणाऱ्या अहमदनगर-मनमाड (NH-160) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर व दक्षिण बाजुस स्वागत कमानी उभारणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागास निधी उपलब्ध करुन देणे.**

**निर्णय क्र.५५१** सदरहू विषयीचा सुधारित प्रस्ताव आजचे सभेमध्ये आयत्या वेळेच्या विषयांमध्ये सादर केलेला असल्यामुळे याठिकाणी रद्द करणेत आला. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३१** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ चे अनुषंगाने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता साईआश्रम भक्तनिवास परिसरात वर्षभरासाठी मंडप अथवा टेन्साईल फॅब्रीकशेड व इतर अनुशंगीकव्यवस्था करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ख), रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय–** *मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५ जून, २०१७ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्रं. ५११ संमत करणेत आला आहे.*

*"श्रींचे समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने साईभक्तांसाठी मोठमोठ्या कलाकारांचे कार्यक्रम साईआश्रम भक्तनिवास येथे आयोजीत करावयाचे आहेत, त्यासाठी त्या ठिकाणी होणा-या कार्यक्रमांकरीता डोम स्वरुपाचा मंडप संस्थानमार्फत खरेदी करुन अथवा भाडोत्री पध्दतीने उभारणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सभेसमोर सादर करणेत यावा."*

**प्रस्तावना-** थोर संत श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे. तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन साईचरीत्रावर आधारीत वेगवेगळे इव्हेन्ट तयार करुन त्याचे सादरीकरण करणे, जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील. अशाप्रकारे श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत.

यापुर्वी दि.११/१२/२०१६ रोजी साईआश्रम भक्तनिवास येथे डोम टाईप मंडप उभारुन जागतीक साई मंदिरे यांचे विश्वस्त (पदाधिकारी) यांचे चर्चासत्र आयोजीत करण्यात आले होते. सदर साई आश्रम परिसरातील

H, I व J इमारतींचे उत्तर बाजूकडील मोकळया जागेत मंडप अथवा मंडप अथवा टेन्साईल फॅब्रिक शेड उभारता येईल. त्यासाठी खालीलपैकी योग्य त्या पर्यायाची निवड करता येईल.

**पर्याय क्रं.०१ :- साई आश्रम भक्तनिवास परिसरात १०५ कार्यक्रमांकरीता वर्षभरासाठी मंडप व्यवस्था भाडेतत्वावर करणे.**

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/एकक | दर (रु) | रक्कम(रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **डोम मंडप व्यवस्था:-** वॉटरप्रुफ छत असलेला मंडप, आतिल बाजूस सुशोभित कापड, मध्यवर्ती ठिकाणी २७' उंची व दोन्ही बाजूस १२' उंची असलेला मंडप, साईडला व पाठीमागील बाजूस सफेद कनात, संपूर्ण मंडपात लाल रंगाचे कारपेट बिछायत इ(लोखंडी पाईप स्ट्रक्चर) | ८०'X३००' | २४००० चौ.फूट | ३२५/- | ७८,००,०००/- |
| २ | **स्टेज व्यवस्था:-** ४०' X ३०' साईजचे जमिनीपासून ०४ फुट उंचीचे भक्कम स्टेज उभारणे, स्टेजवर लाल रंगाचे कारपेट, स्टेजला बॅकड्रॉपसाठी सुशोभित कापड लावणे. | ४०'X३०' | १२०० चौ. फूट | ३२५/- | ३,९०,०००/- |
| ३ | **स्वागत कमानी:-** २'X२' आकाराची बॉक्स टाईप स्वागत कमानी उभारणे. रुंदी- २० फुट उंची- १८ फुट | -- | ०२ नग | १,६९,०००/- | ३,३९,८४०/- |
| ४ | फायबर खुर्च्या पुरविणे. | -- | १५०० नग | ४०९.५० | ६,१४,२५०/- |
| ५ | थ्री सिटर एस.एस. सोफा व कुशनसह व त्याकरीता पांढरे शुभ्र व स्वच्छ कापड लावणे. | --- | १५० नग | १०,५००/- | १५,७५,०००/- |
| ६ | व्ही.आय. पी. करीता व्यासपीठ खुर्च्या खरेदी करणे. | -- | ३० नग | १५००/- | ४५,०००/- |
| | | | | **एकूण -** | **१,०७,६४,०९०/-** |

उपरोक्तप्रमाणे पर्याय क्र.०१ नुसार कामे रेटवर करणेकामी रु.**१,०७,६४,०९०/-**मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**पर्याय क्र.०२:- संस्थानमार्फत टेंसाईल फॅब्रीकचे शेड उभारणे.**

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | टेंसाईल फॅब्रिक स्ट्रक्चरमध्ये संस्थानमार्फत कायमस्वरुपी मंडप शेड उभारणे (सिव्हील वर्क, स्ट्रक्चरल वर्क, फॅब्रीकेशन, इरेक्शन, फॅब्रीकचे इन्टॉलेशन इ. सह) | (८०'X३००) फॅब्रीक क्षेत्रफळ = २४,००० चौ. फुट | २२३० चौ.मी. | ५,०००/- | १,११,५०,०००/- |
| २ | **स्टेज व्यवस्था:-** ४०' X ३०' साईजचे जमिनीपासून ०४ फुट उंचीचे भक्कम स्टेज, स्टेजवर लाल रंगाचे कारपेट, (मेकॅनिकल विभाग व बांधकाम विभाग) | ४०'X३०' | १२०० चौ.फुट | ३२५/- | ३,९०,०००/- |
| ३ | **स्वागत कमानी:-** २'X२' आकाराची बॉक्स टाईप स्वागत कमानी उभारणे. रुंदी- २०' व उंची- १८'. (मेकॅनिकल विभाग व बांधकाम विभाग) | -- | ०२ नग | १,६९,०००/- | ३,३९,८४०/- |
| ४ | पीव्हीसी खुर्च्या पुरविणे. (संस्थानचे खरेदी विभागामार्फत खरेदी करणे) | -- | १५०० नग | ५५०/- | ८,५२,५००/- |
| ५ | मंडप/शेड करीता साईडने व पाठीमागील बाजूस कनात लावणे. | -- | ७६०० चौ.फूट | १८५/- | १४,०६,०००/- |
| ६ | थ्री सिटर एस.एस. सोफा व कुशनसह व त्याकरीता पांढरे शुभ्र व स्वच्छ कापड लावणे. (संस्थानचे खरेदी विभागामार्फत खरेदी करणे) | --- | १५० नग | १२,७४४/- | १९,११,६००/- |
| ७ | व्ही. आय. पी. करीता व्यासपीठ खुर्च्या खरेदी करणे. (संस्थानचे खरेदी विभागामार्फत खरेदी करणे). | -- | ३० नग | १५००/- | ४५,०००/- |
| | | | | **एकूण-** | **१,६०,९४,९४०/-** |

उपरोक्तप्रमाणे पर्याय क्र.०२ नुसार कायमस्वरुपी व्यवस्था संस्थानमार्फत केल्यास रु.१,६०,९४,९४०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव-** उपरोक्त नमूद पर्यायापैकी पर्याय क्र. ०२ नुसार कार्यवाही केल्यास सुशोभित तसेच सुमारे १० वर्ष व वॉरंटी असलेले फॅब्रीकचा मंडप शेडची उभारणी करणे योग्य होईल असे मत आहे. तरी उपरोक्त नमूद पर्यायापैकी नं.०२ चा विचार होऊन अपेक्षित खर्चास व सदरहू व्यवस्था साई आश्रम भक्तनिवास येथिल पार्किंगमध्ये करणेसाठी व त्याप्रमाणे वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे ई-निविदा मागविणेबाबत सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी शताब्दी वर्षामधील विविध कार्यक्रमांसाठी साईआश्रम भक्तनिवासचे पार्किंगमध्ये प्रस्तावात नमुद केलेल्या पर्याय क्र. ०२ नुसार कार्यवाही करणेस तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी अशीही चर्चा झाली की, छोटया स्वरुपाचे कार्यक्रम १६ गुंठे जागेमध्ये आयोजित करावेत. साईनगर समोरील मैदानावर साऊंडप्रुफ स्टेज तयार करणेत याठिकाणीही काही कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे व नवीन प्रसादालयाच्या पाठीमागील जागेमध्ये मोठया स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजित करणेत यावे. तसेच नवीन प्रसादालयाशेजारील शेती महामंडळाची जागा संस्थान नावे खरेदी होईपर्यंत, पार्किंगसाठी भाडेतत्वावर घेण्यात यावी.**

**तसेच भक्तमंडळ सभासदांना संपर्क करणेत येऊन, त्यांचे भक्तमंडळ सम्मलेन शिर्डी येथे आयोजित करणेची कार्यवाही सुरु करावी. भक्तमंडळ सभासदांना शताब्दी वर्षामध्ये आयोजित करावयाच्या मोठया स्वरुपाच्या कार्यक्रमांना आमंत्रित करणेत यावे व त्यावेळेस त्यांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.३२** **सी.टी. स्कॅन (64 Slice) मशिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे.**

**विषय नं.३३** **एम.आर.आय.मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणेबाबत.**

**निर्णय क्र.५५३** उपरोक्त विषय नं.३२ व ३३ वर दिनांक १३.०७.२०१७ रोजीचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये चर्चा होऊन, मंजुरी मिळालेली असल्यामुळे या ठिकाणी रद्द करणेत आले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३४** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Liquid Medical Oxygen Gas मंजूरदराने खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद–**१७ (२) ण

**प्रास्ताविक–** श्री साईबाबा हॉस्पिटलचे सर्व वार्ड/ विभागांसाठी लागणारे Liquid Medical Oxygen GasPlant साठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१०/०१/२०१० रोजीचे सभेत मान्यता मिळालेली होती. त्यानूसार विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१०/१०/२०१५ निर्णय क्र.७५६ अन्वये चर्चा/ वाटाघाटी होऊन M/s. Praxair India Pvt. Ltd., Navi Mumbai यांचेकडून 6KL क्षमतेचा गॅस प्लॅन्ट भाडेतत्वावर ठेवण्यास व त्याकामी त्यांना दरमहा भाडे रु.१६८७५/- देण्यास तसेच ऑक्सीजन गॅस रु.१३.४९/ sm3 व्हॅटसह व पॉवरचे दरात वाढ झाली तर १.५० पैसे/ sm3 व डिझेलचे दरात वाढ झाली तर ०.२० पैसे/ sm3 दर वाढवून देण्यास मान्यता मिळालेली होती.त्यानूसार M/s.Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांना इकडील पत्र क्र.५२९२ दि.०३/१२/२०१० रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

दरम्यानच्या काळात श्री साईबाबा हॉस्पिटलमधील गॅसचा खप पाहता मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०१/२०१२ निर्णय क्र.३० अन्वये सदर प्लॅन्टची क्षमता वाढवून 13KL करण्यात येऊन त्यांचे दरमहा भाडे रक्कम रु.३४८७५/- सर्व करांसह असे ठरवून सदर प्लॅन्ट ०५ वर्षाकरीता रुग्णालयात बसिवण्यात यावे असे ठरले होते त्यानूसार M/s.Praxair India Pvt. Ltd., Navi Mumbai यांना इकडील पत्र क्र.५७०८ दि.०१/०२/२०१२ रोजी नविन कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यानूसार दि.३१/०८/२०१२ पासून सदर Liquid Medical Oxygen GasPlant श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

सदर कार्यादेशानुसार ऑक्सीजन गॅस रु.१३.४९ / sm3 व्हॅटसह व पॉवरचे दरात वाढ झाली तर १.५० पैसे /sm3 व डिझेलचे दरात वाढ झाली तर ०.२० पैसे /sm3 दर वाढवून देण्यास मान्यता मिळालेली होती. त्यानूसार अद्याप पावेतो दोन वेळेस पॉवरचे दरात व डिझेलचे दरात वाढ झाल्यामुळे दि.१०/१०/२०१२ रोजीचे

पत्रान्वये रक्कम रु.१५.४१ / sm3 व्हॅटसह तर दि.१२/०६/२०१३ चे पत्रान्वये रक्कम रु.१८.२२ / sm3 व्हॅटसह इतके दर वाढवून दिलेले आहे.

सदर Liquid Medical Oxygen GasPlant कार्यान्वित झाल्यापासून प्रती महिना साधारणतः २५००००/- या प्रमाणे श्रीसाईबाबा रुग्णालयात रक्कम रु.१,६५,४७,०१९/- इतक्या रक्कमेचा गॅस खरेदी करण्यात आलेला आहे.त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| अ.नं. | वर्ष | झालेला खर्च रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | २०१२-१३ | २३,०६,४३१.०० |
| २ | २०१३-१४ | ३५,४५,४२२.०० |
| ३ | २०१४-१५ | ३५,६२,६४७.०० |
| ४ | २०१५-१६ | ३२,९०,९१८.०० |
| ५ | २०१६-१७ | ३२,०६,२११.०० |
| ६ | दि.०१/०४/२०१७ ते १७/०५/२०१७ | ६,३५,३९०.०० |
| | **एकूण रक्कम रु.** | **१,६५,४७,०१९.००** |

त्यासाठी श्री साईबाबा रुग्णालयात Liquid Medical Oxygen GasPlant विहित पध्दतीने ई - निविदा मागवून बसविणेस व त्याकरीता येणा-या एकूण रक्कम रु.१,२६,८१,४८०/- (अक्षरी रु. – एक कोटी सव्वीस लाख एक्यांशी हजार चारशे ऐशी मात्र) चे खर्चास तसेच ई - निविदा मागवून खरेदीस मान्यता घेणेसाठी सदरचा प्रस्तावावर दि.२५/०२/२०१७ चे मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.१०४ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, सदर प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानूसार ई निविद प्रसिध्द करण्याची कार्यवाही चालू आहे व दि.३०/०८/२०१७ रोजी M/s.Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचा पुरवठा आदेशाचा कालावधी संपूष्टात येणार आहे. त्यामुळे सदर ई निविदेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत M/s.Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचकडून त्यांचे सध्या मंजूर असलेले दराने गॅस खरेदी करता येईल.

**मागणी–** दि.३०/०८/२०१७ रोजी सदर Liquid Medical Oxygen GasPlant चा ०५ वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे. त्यामुळे सदर Liquid Medical Oxygen GasPlant नव्याने बसवावा लागणार आहे.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–** श्री साईबाबा रुग्णालयात Liquid Medical Oxygen GasPlant विहित पध्दतीने ई - निविदा मागवून बसविणेस व त्याकरीता येणा-या एकूण खर्चास तसेच ई - निविदा मागवून खरेदीस दि.२५/०२/२०१७ चे मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.१०४ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार ई निविद प्रसिध्द करण्याची कार्यवाही चालू आहे व दि.३०/०८/२०१७ रोजी M/s.Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचा पुरवठा आदेशाचा कालावधी संपूष्टात येणार आहे. त्यामुळे सदर ई निविदेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत M/s.Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचकडून त्यांचे सध्या मंजूर असलेले दराने गॅस खरेदी करता येईल.

तरी सदर ई निविदेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत किंवा तीन महिने यापैकी जे लवकर होईल तो पर्यंत M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचकडून त्यांचे सध्या मंजूर असलेले दराने गॅस खरेदी करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३५** **मेडिकल ऑक्सीजन गॅस व नायट्रस गॅस सिलेंडर पुरवठाधारक मे.बालाजी ट्रेडींग कंपनी, संगमनेर यांना GST नुसार बील अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद**:-1) पृ. क्र. 355, समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये 14(2) ख

2) पृ. क्र. 356, समितीची कर्तव्ये व अधिकार 17 (2) झ

3) पृ. क्र. 359, विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग 21 (1) क, (2) (ग)
**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** निर्णय क्र. 988, दि. 08/12/2012

**प्रस्ताविक:-** श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मेडीकल ऑक्सीजन गॅस व नायट्रस गॅसचा पुरवठा मे.बालाजी ट्रेडींग कंपनी संगमनेर यांचेमार्फत उपरोक्त पुरवठा आदेशानुसार सिलेंडरद्वारे सन 2013 पासुन आजपावेतो खालील दराने केला जात आहे.

| Sr.No. | Description | Packing | Rate Per |
|---|---|---|---|
| 1 | Oxygen Gas | Per Cubic | Rs.20.00/ Cubic |
| 2 | Nitrous Gas | Per Liter | Rs.0.30/ Liter |

उपरोक्त दर हे पुरवठा आदेशाच्या काळातील सर्व करांसहीत होते. त्यानुसार ऑक्सीजन गॅसचा 7 Cubic चा सिलेंडर रु.140/- इतक्या दराने व नायट्रस गॅसचा 17 हजार लिटर क्षमेतेचा सिलेंडर रु.5100 इतक्या दराने 30 जुन 2017 पर्यंत मेडीकल स्टोअर विभागामार्फत खरेदी करण्यात येत होता.

**मागणी:-** परंतु मे.बालाजी ट्रेडींग कंपनी संगमनेर यांनी त्यांचे दि. 03/07/2017 पत्रानुसार उपरोक्त दरानुसार गॅसचा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली असुन नवीन GST कर रचनेनुसार खालीलप्रमाणे नवीन दरानुसार मेडीकल ऑक्सीजन गॅस व नायट्रस गॅसचा पुरवठा करता येईल असे कळविले आहे.

| Sr. No. | Description | Old Rate (Incl. VAT) | New Rate Per | New Rate Incl.Taxes |
|---|---|---|---|---|
| 1 | Oxygen Gas | Rs. 140 Per Cylinder | Rs. 130 + 18 % GST Per Cylinder | Rs.153.40 Per Cylinder |
| 2 | Nitrous Gas | Rs. 0.30/ Liter | Rs. 0.28 + 12 % GST Per Liter | Rs.0.3136 Per Liter |

सध्या श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयात ऑक्सीजन गॅसचे 7 Cubic चे सिलेंडर दररोज 15 नग व दोन्ही रुग्णालय मिळुन दर 4 दिवसासाठी नायट्रस गॅसचा 17 हजार लिटर क्षमेतेचा सिलेंडर 01 नग वापरला जातो. ऑक्सीजन गॅसच्या सिलेंडर मधुन श्री साईनाथ रूग्णालयातील ऑपरेशन थिएटर, आय. सी. यु. विविध वार्डमध्ये सेंट्रल पाईपालाईन द्वारे पुरवठा केला जातो. तसेच दोन्ही रूग्णालयातील आय, सी. सी. यु. विविध वार्डमध्ये पोर्टेबल ऑक्सीजन गॅसचे सिंलेडर भरणेसाठी देखील वापरले जातात. सदर ऑक्सीजन हा उपरोक्त सर्व विभागातील रूग्णांना तातडीच्या वेळी आवश्यकतेनुसार पुरविला जातो. आणि नायट्रस गॅस सिलेंडर मधुन दोन्ही रूग्णालयातील ऑपरेशन थिएटर करीता नायट्रस गॅस पुरवठा पाईपलाईन द्वारे केला जातो. सदर नायट्रस गॅसचा उपयोग सर्व ऑपरेशन थिएटरमध्ये रूग्णांची सर्जरी करतांना भुल देणेकरीता वापरला जातो.

सध्या रूग्णालयाच्या खरेदी विभागामार्फत उपरोक्त ऑक्सीजन गॅस व नायट्रस गॅस करीता निविदा प्रक्रिया सुरू करणेत येत असुन लवकरच निविदा प्रकाशित करण्यात येत आहे असे माहीती प्राप्त झाली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरील संस्थान अधिनियमानुसार तसेच शासनाच्या नवीन GST कर रचनेनुसार उपरोक्त नवीन करांच्या दराने गॅसचा पुरवठा करणेस पुरवठाधारकास नवीन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत मान्यता देता येईल. सदर गॅस करीता प्रति महिना रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेणेची आवश्यकता आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** शासनाच्या नवीन GST कर रचनेनुसार उपरोक्त नवीन करांच्या दराने गॅसचा पुरवठा करणेस पुरवठाधारकास नवीन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत मान्यता देता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे मेडीकल गॅस पुरवठा धारक मे. बालाजी ट्रेडींग कंपनी संगमनेर यांचे मागणीनुसार शासनाच्या नवीन GST कर रचनेनुसार उपरोक्त नवीन करांच्या दराने गॅसचा पुरवठा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक सन २०१७-१८ या वर्षाकरीता लागणारी औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदीस फेर ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुगणालयाकरिता वार्षिक सन २०१७ – २०१८ या वर्षाकरिता लागणारे औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदी करणेकामी प्रस्ताव दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अंदाजे रक्कम रु.५५,९१,९१,८३६.२२ चा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला

होता, त्यावर निर्णय क्र.०५ यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, "उपरोक्त प्रस्ताव सन २०१६- २०१७ या वर्षासाठी औषधे/ सर्जिकल खरेदीबाबतचा होता. परंतु, सन २०१६- २०१७ चा कालावधी संपुष्टात आलेला असून या आर्थिक वर्षामध्ये औषधे/ सर्जिकल साहित्यांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता वेळोवेळी अतिरिक्त खरेदीस मान्यता देण्यात आलेली होती. त्यामुळे सन २०१६- २०१७ साठी वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य On Consignment Material खरेदी करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव रद्द करणेत यावा."

या प्रस्तावामध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य On Consignment Material खरेदीकामी नमूद केलेली कार्यपध्दती सन २०१७-२०१८ या वर्षाच्या खरेदीसाठी राबविण्यात यावी व फक्त उत्पादकांकडूनच औषधे खरेदी करण्यात यावी, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

सदरहू औषध खरेदीची प्रक्रिया राबविणेसाठी वेळोवेळी, आवश्यकतेनुसार रुग्णालय उपसमितीने संस्थान रुग्णालयांसाठी आवश्यक असलेली वार्षिक औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी करतेवेळी गुणवत्ता व दर यांचा विचार करुन, रुग्णांच्या सोयीचे दृष्टीने नामांकींत कंपनीची औषधे खरेदी करावी, असे ठरले.

वरील ठरावास अनुसरुन दि.१३/०३/२०१७ रोजीचे मंजूर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२४/०३/२०१७ ते १५/०४/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई- निविदा मागविण्यात आल्या आहेत, त्यानुसार दि.२५/०३/२०१७ रोजीचे ई– मेलव्दारे ३७३ कंपन्यांना व २६८ डिस्ट्रीब्युटर यांना ई– निविदा भरणेकामी अवगत करण्यात आले होते. तसेच दि. २४/०३/२०१७ रोजीचे परिपत्रकान्वये श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयातील डॉक्टर / तंत्रज्ञ यांना आपणाकडे येणारे कंपनीचे प्रतिनिधी यांना ई– निविदा भरणेकामी सांगण्यात यावे असे कळविले होते. त्यानुसार प्रि– बिड मिटींग दि.२९/०३/२०१७ रोजी ठेवण्यात आली होती. प्रि– बिड मिटींगमध्ये पुरवठाधारकांनी उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन करुन दि.०४/०४/२०१७ रोजी अपलोड करण्यात आले होते. परंतु, ब-याच निविदाधारकांनी दूरध्वनीवरुन सदरहू ई-निविदेस मुदतवाढ मिळणेकामी विनंती केल्यामुळे तसेच काही निविदाधारकांनी ई- मेल पत्राव्दारे दि.१४ व १५/०४/२०१७ रोजी सरकारी सुट्टी असल्यामुळे निविदा भरण्यास अडचणी येत असल्यामुळे कमीत- कमी १ आठवडयाची मुदतवाढ मिळावी असे कळविले होते. त्यानुसार, दि. १५/०४/२०१७ पर्यंत १६ पार्टकरिता ८९ ऑनलाईन निविदा प्राप्त झाल्या होत्या. खरेदीकामी जास्तीत – जास्त प्रतिसाद मिळणेकामी पहिल्यांदा दि. २४/०४/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार १२६ ऑनलाईन ई – निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार दि. २४/०४/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दुस-यांदा दि. ०१/०५/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यास अनुसरुन १४८ ऑनलाईन ई– निविदा प्राप्त झाल्या आहेत. तसेच तांत्रिक सिलबंद निविदा (Hard Copy) दि.०५/०५/२०१७ पर्यंत स्वीकारणेस मुदतवाढ देण्यात आली होती.

दि. ११/०५/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे मा. विश्वस्त मंडळातील सदस्य, मा. कार्यकारी अधिकारी सो., मा.उपकार्यकारी अधिकारी सो., मा.मुख्यलेखाधिकारी सो., मा.प्रशासकीय अधिकारी सो. तसेच उपस्थित पुरवठाधारकांचे समक्ष प्राप्त झालेल्या १४८ तांत्रिक ऑनलाईन ई – निविदा उघण्यात आलेल्या आहेत.

प्राप्त झालेल्या तांत्रिक ऑनलाईन ई– निविदा वित्त विभागाचे व्यवस्थापक व त्यांचे कर्मचारी, यांचेकडून तांत्रिक बाबींचे कागदपत्र तपासणी करुन घेण्यात्त आले आहेत. तदनंतर संस्थान विभागाचे अंतर्गत लेखापरिक्षक कर्मचारी यांचेकडून सदर तसेच तांत्रिक बाबीं तपासून घेण्यात्त आल्या होत्या. तसेच संस्थानचे वरिष्ठ अधिकारी यांनी देखील तांत्रिक बाबींचे कागदपत्रऔषध भांडार विभागात येऊन तपासणी केली आहे.

**वरीलप्रमाणे तांत्रिक बाबींची तपासणी केलेल्या बाबींचा तसेच १६ पार्टकरिता प्राप्त झालेल्या १४८ ऑनलाईन ई – निविदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| Sr. No. | Name of Item | Teder Received | Tender Accept | Tender Reject |
|---|---|---|---|---|
| **Part A** | | | | |
| 1 | Tablets | 10 | 6 | 4 |
| 2 | Injection | 19 | 13 | 6 |
| 3 | Lab. Chemicals | 13 | 8 | 5 |
| 4 | CDL | 18 | 14 | 4 |
| 5 | X-ray, CT, MRI | 04 | 04 | 0 |
| 6 | Miscellaneous | 07 | 04 | 3 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | Ayurvedic & Homeopathic Medicines | 07 | 07 | 0 |
| 8 | Catgut & Suture Material | 06 | 05 | 1 |
| 9 | Liquid Orals (Syrup) | 05 | 03 | 2 |
| 10 | Ointment | 04 | 03 | 1 |
| 11 | Eye, Ear & Nasal Drops | 05 | 01 | 4 |
| 12 | OTM | 23 | 18 | 5 |
| 13 | Dialysis Unit | 04 | 2 | 2 |
| 14 | Dental | 1 | 0 | 1 |
| 15 | Neuro | 1 | 0 | 1 |
| **Part B** | | | | |
| 16 | On Consignment | 21 | 12 | 9 |
| | **Total** | **148** | **100** | **48** |

त्यानुसार पात्र ऑनलाईन १०० कमर्शिअल ई – निविदा दि. ०७/०६/२०१७ रोजी खरेदी समिती व मा. विश्वस्त मंडळातील सदस्य, मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.उपकार्यकारी अधिकारी सो., मा. मुख्यलेखाधिकारी सो., मा. प्रशासकीय अधिकारी सो., तसेच उपस्थित पुरवठाधारकांचे समक्ष उघण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्राप्त निविदाधारकांचा दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यामधील एकूण १६ पार्टमधील ३०३६ आयटम पैकी ५२९ आयटमकरिता ०३ व ०३ पेक्षा जास्त दर प्राप्त झाले आहेत. तसेच ४१४ आयटमकरिता ०२ निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहेत. व ७२० आयटमकरिता ०१ निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहे. उर्वरित १३७३ आयटमकरिता कुठल्याच निविदाधारकांचे दर प्राप्त झाले नाहीत.

**त्या आयटमचा तपशिल खालीलप्रमाणे:-**

| **Part "A"** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Sr.no.** | **Medicine Details** | **Total Item** | **Nil Tender** | **1 Tender** | **2 Tender** | **3 or More tender** |
| 1 | Tablets | 291 | 189 | 89 | 10 | 3 |
| 2 | Injection | 246 | 104 | 96 | 33 | 13 |
| 3 | Liquid Orals (Syrup) | 61 | 54 | 7 | 0 | 0 |
| 4 | Ointment | 51 | 42 | 9 | 0 | 0 |
| 5 | Eye, Ear & Nasal Drops | 42 | 40 | 2 | 0 | 0 |
| 6 | Lab. Chemicals | 381 | 217 | 66 | 20 | 78 |
| 7 | O.T.& Other Surgical Material | 598 | 211 | 184 | 130 | 73 |
| 8 | CDL | 400 | 108 | 129 | 82 | 81 |
| 9 | Neuro O.T. Surgical Material | 36 | 36 | 0 | 0 | 0 |
| 10 | Dialysis Unit | 10 | 3 | 1 | 6 | 0 |
| 11 | Miscellaneous | 128 | 114 | 14 | 0 | 0 |
| 12 | Dental Material | 43 | 43 | | | |
| 13 | X-ray, CT, MRI | 14 | 3 | 7 | 4 | 0 |
| 14 | Catgut & Suture Material | 213 | 3 | 25 | 41 | 144 |
| 15 | Ayurvedic & Homeopathic Medicines | 232 | 35 | 98 | 59 | 40 |
| | | 10 | 0 | 10 | 0 | 0 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Total** | **2756** | **1201** | **680** | **391** | **484** |
| | **Part “B”** | | | | | |
| 1 | On Consignment | 280 | 172 | 80 | 2 | 26 |

उपरोक्त प्राप्त निविदा तसेच तुलनात्मक तक्यात काही निविदाधारकांचे Generic चे दर प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे त्याची निविदा विचारात घेण्यात आलेली नाही. तसेच Generic चे दर प्राप्त झाल्यामुळे बरेच ठिकाणी दोन दर प्राप्त झाले असून तेथे निर्णय घेता आलेला नसल्यामुळे फेर निविदा करण्यात येत आहे. तसेच बरेच ठिकाणी तीन दर प्राप्त झाले असून निम्नतम दर प्राप्त Generic असल्याने खरेदी नियमावलीप्रमाणे दोन निविदाधारकांचे दरांची टक्केवारी काढण्यात येऊन खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजे किंमत यामध्ये (-) २०% ते (+) १०% तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदी विभागास मुभा राहील. त्यानुसार खरेदी करण्यात येत आहे. प्राप्त १९ ठिकाणी Branded कंपनीचे दोन निविदामध्ये निम्नतम दर अगोदर ठरविलेल्या किंमती पेक्षा (+) १०% ते (+) २५% नी जास्त असलेल्या निविदाधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन अगोदर ठरविलेल्या किंमतीच्या (+) १०% च्या आत दर मिळाल्यास ते खरेदी करण्याचा तसेच अगोदर ठरविलेल्या किंमतीच्या (+) १०% पेक्षा जास्त ठेवल्यास फेर निविदा करण्यात येत आहे.

त्यानुसार एकूण ७४५ औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदी करण्यात येत आहे व उर्वरित २२९१ औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदी करणेकामी फेर ई– निविदा काढण्यात येऊन खरेदीचा प्रस्ताव सादर करावा लागणार आहे. तेंव्हा उपरोक्त खरेदीचे प्रस्तावामध्ये खालील प्रमाणे बदल करण्याची मागणी केलेली आहे. जेणेकरुन पुढील खरेदी प्रक्रिया पूर्णपणे यशस्वी करता येईल असे मत आहे.

४) प्राप्त निविदेचा विचार करता संस्थानमार्फत राबविण्यात आलेली DMER / DHS च्या खरेदी प्रक्रिया नुसार ई– निविदा काढतांना निविदा फक्त उत्पादक कंपन्या भरण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यामध्ये मार्केटींग करत असलेल्या कंपन्या व अधिकृत विक्रेते यांना निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास मान्यता देण्यात आली नव्हती. DMER/ DHS च्या अंतर्गत महाराष्ट्रातील सर्वच सरकारी रुग्णालये व वैद्यकीय कॉलेज येत असल्याने त्याची खरेदीची संख्या पाहता संस्थानपेक्षा किती तरी पटीने जास्त असते. त्यामुळे तेथे Manufacture Criteria/ Company भाग घेतात. परंतु, संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ दोन्ही रुग्णालये मिळून ५०० बेड आहेत. त्यामुळे खरेदीची संख्या मर्यादीत असल्यामुळे DMER/ DHS च्या खरेदी प्रक्रियेचा अवलंब केल्यामुळे खरेदीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे पुन्हा फेर ई- निविदा काढतांना जर संस्थाने खालीलप्रमाणे अटी शिथील केल्यास औषध खरेदीला फायदा होऊ शकतो.

फेर ई –निविदा काढतांना उत्पादक कंपन्यासह मार्केटींग करणा-या कंपन्या तसेच सर्व अधिकृत विक्रेते यांना खरेदी प्रक्रियेत भाग घेवू दिल्यास उर्वरित सर्व आयटमकरिता दर प्राप्त होवून खरेदी करता येईल, जेणेकरुन रुग्णांची गैरसोय होऊ शकणार नाही.

५) शासन नियमावली परिशिष्ट ६.८ नुसार अनामत रक्कम व टेंडर फॉर्म फी कामी जर खरेदी रक्कम १ कोटी पेक्षा जास्त असल्यास तेथे संबंधित विभागाची अनामत रक्कम व निविदा फॉर्म शुल्क ठरविण्याची जबाबदारी राहील, त्यानुसार अनामत रक्कम रु. १,११,०००/- व निविदा फॉर्म रक्कम रु. ११,०००/- इतकी ठेवल्यास जास्तीत– जास्त निविदा प्राप्त होऊन, स्पर्धात्मकदृष्ट्या दर प्राप्त होऊन संस्थानला आर्थिक फायदा होईल.

६) Branded कंपनीचे औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदीकामी निविदाधारकांस निविदा देतांनी रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर लिहून घेतल्यास त्यांना Branded कंपनीचे औषधे देणे बंधनकारक राहील.

७) औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदीकामी प्रत्येक Product मागणी करतांनी संबंधित डॉक्टांकडून ५ ते १० नामांकींत कंपन्याची औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material मागणी केल्यास त्यानंतर निम्नतम दराने Branded औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी करता येईल.

८) Annual Turnover हा उत्पादक / मार्केटींग कंपनीचा दाखविणे आवश्यक राहील. तसेच सदर Annual Turnover हा विदेशी चलनात दिलेला असेल तर तो विचारात घेण्यात यावा, कारण बरेचशे मटेरियल हे आयात करुन पुरविले जाते.

९) तांत्रिक बाबीं तपासणेकामी समिती गठीत करण्यात यावी, जेणेकरुन निविदाधारकांची निविदा रद्द झाल्यास त्याचे सविस्तर कारणीमीमांसा देता येईल.

१०) On Consignment Material साठी Scheme न स्वीकारता दर कमी करुन घ्यावे लागतील. कारण आपले रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत तथा पेड पेशंटसाठी Scheme चे मटेरियल वापरता येत नाही.

११) सध्या काढलेल्या निविदेनुसार फक्त २०% मटेरियल खरेदी करता येणार आहे त्यामुळे उर्वरित ८० % मटेरियलसाठी फेर ई– निविदा काढून ते खरेदी करण्यास अजून १ ते २ महिन्यांचा कालावधी लागणार तेंव्हा सध्या दैनंदिन गरज पाहता मागील सन २०१५ – १६ चे मंजूर दराने अतिरिक्त खरेदी करावे लागणार आहे. परंतु, GST लागू झाल्यामुळे कर प्रणालीमध्ये बदल होणार असल्याने त्यानुसार पुरवठाधारकाचे दर (कमी किंवा जास्त) त्यांना बदलून द्यावे लागणार आहे. तेंव्हा मंजूर दराने अतिरिक्त खरेदी करता येणार आहे. त्यानुसार कर प्रणालीत बदल करण्यास मान्यता असावी.

**<u>विभागाचा अभिप्राय:-</u>** वरीलप्रमाणे अ. नं. १ ते ८ मुद्यांचा विचार करता उत्पादक कंपनीसह मार्केटींग कंपन्या तसेच अधिकृत विक्रेते यांना खरेदी प्रक्रियेत भाग घेऊ दिल्यास जास्तीत – जास्त स्पर्धात्मक दर मिळून संस्थानला त्याचा आर्थिक फायदा होईल. तसेच खरेदीचे तांत्रिकबाबी तपासणेकामी त्या संबंधी समिती गठीत केल्यास खरेदीमध्ये पारदर्शकता येईल असे मत आहे.

तेंव्हा वरील मुद्यांप्रमाणे औषधे/ सर्जिकल साहित्य फेर खरेदी प्रक्रियेत बदल करण्यास व तांत्रिक बाबींसाठी त्या संबंधी समिती गठीत करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक सन २०१७-१८ या वर्षाकरीता लागणारी औषधे/ सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या मुद्यांप्रमाणे खरेदी प्रकिय्रमध्ये बदल करणेस व यामधील तांत्रिक बाबी तपासणेसाठी समिती गठीत करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३७** **अनुकंपा कारणास्तव संबधीत पात्र नातेवाईकांची गट क-लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक करणे.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा.शासन निर्णयातील अनुकंपा तरतूदीचे अधिन राहून संस्थान सेवेत असतांना मृत पावलेल्या खालील दिवंगत कर्मचा-यांच्या पात्र नातेवाईकांना अनूकंपा कारणास्तव गट क मधील लिपीक-टंकलेखक पदावर संस्थान सेवेत सामावून घेण्याचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.१२.२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता.

| अं.क्र | दिवंगत कर्मचा-यांचे नाव | अर्ज केलेल्या नातेवाईकाचे नाव | दिवंगत कर्मचा-यांशी नाते. |
|---|---|---|---|
| १. | कै.अशोक हरीशचंद्र गोडगे | श्री.राहुल अशोक गोडगे | मुलगा |
| २. | कै.इंदरराव एकनाथ देशमुख | श्री.विशाल इंद्रभान देशमुख | मुलगा |
| ३. | कै.काशिनाथ गजानन दाभाडे | श्री.विजय काशिनाथ दाभाडे | मुलगा |
| ४. | कै.सोमनाथ भगवान मराठे | श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे | पत्नी |

त्यावर पुढील प्रमाणे निर्णय संमत झालेला आहे, संस्थानमधील सर्व विभागांचे मनुष्यबळ व्यवस्थापनाचे काम पुर्ण झालेले आहे. मनुष्यबळ व्यवस्थापन अहवालाच्या प्रती सर्व समिती सदस्यांना पुरविणेत याव्यात व या अहवालावर निर्णय होईपर्यंत सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा.

**(ब)** मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वैभव प्लेसमेंट्स प्रा.लि.नाशिक यांना संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापन परिक्षणाचे काम देण्यात आलेले आहे. सदरहू कामाचा अहवाल त्यांनी दि.२०/१०/२०१६ रोजीचे पत्राने सादर केलेला असून, त्याबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी काही सुचना वजा दुरुस्ती सांगितलेल्या आहेत. याबाबत वैभव प्लेसमेंट्स यांना दोन वेळेस पत्र देण्यात आलेले असून त्यांचेकडून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. वैभव प्लेसमेंट्स यांचेकडून प्राप्त होणा-या अंतीम अहवालानुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविस्तर प्रस्ताव सादर करणे क्रमप्राप्त आहे. सदर कारणास्तव उपरोक्त पात्र उमेदवारांना अनुकंपा नेमणूक

देणेपासून वंचीत ठेवणे उचीत नसून, त्यांना त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार रिक्त असलेल्या लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक देता येईल, असे मत आहे.

वास्तविक बघता, आज रोजी लिपीक-टंकलेखक पदनामाच्या ११५ जागा रिक्त आहेत. म्हणजेच जवळजवळ सर्वच विभागांमध्ये लिपीक संवर्गातील कर्मचा-यांची कायम पदे रिक्त असून अपु-या संख्येमुळे संबधीत विभागांना दैनंदिन कामात अडचणी येत आहेत. सबब, उपरोक्त उमेदवारांना अनुकंपा कारणास्तव लिपीक-टंकलेखक पदावर नेमणूक दिल्यास त्यांची नेमणूक आवश्यक विभागांकडे करता येईल, असे मत आहे.

**(क) अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेचे संदर्भात म.शासनाचे सर्वसाधारण नियम खालील प्रमाणेआहेत.**

१. दि.२८ मार्च, २००१ चे शासन निर्णयानुसार, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ सेवेतील असतांना दिवंगत पावलेल्या गट 'क' व 'ड' मधील कर्मचा-यांच्या कुटूंबियांना गट 'क' आणि 'ड' मधील पदावर नियुक्तीसाठी अनुज्ञेय आहे.

२. दि.२२ ऑगस्ट, २००५ चे शासन निर्णयानुसार, शासकीय कर्मचा-यांच्या मृत्यू दिनांकापासून एका वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक आहे.

३. दि.०६/१२/२०१० चे शासन निर्णयानुसार, अर्जदाराचे वय नियुक्तीचे वेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४. दि.०१ मार्च, २०१४ रोजीचे शासन निर्णयानुसार, प्रतीवर्षी रिक्त होणा-या पदांच्या १०% पदे अनुकंपा नियुक्तीने भरली जातात. म्हणेज सध्या लिपीक-टंकलेखक पदनामाची ११५ पदे रिक्त असून त्यापैकी १० % पदांवर (म्हणजेच ११ पदांवर) उपरोक्त उमेदवार व इतर पात्र होणारे उमेदवारांना नियुक्ती देता येईल.

५. दि.१७/११/२०१६ रोजीचे शासन निर्णयानुसार, अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत कर्मचा-यांचे पुढील नातेवाईक पात्र असतात १. **पती/ पत्नी** २.**मुलगा/ मुलगी** (अविवाहीत/ विवाहीत) मुत्यूपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला **मुलगा/ मुलगी** (अविवाहीत/ विवाहीत) ३.दिवंगत कर्मचा-यांच्या नातेवाईकांपैकी कोणीच नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची **सून** ४.**घटस्फोटीत/ परित्यक्ता/ विधवा मुलगी किंवा बहिण.** ५.केवळ अविवाहित शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा**भाऊ किंवा अविवाहित बहीण.**

६. दि.२३ ऑक्टोबर, ११९४ रोजीचे शासन निर्णयानुसार, वर्ग ०३ व वर्ग ०४ चे पदावर नेमणूक देणेसाठी संबधीत पात्र उमेदवारांची परिक्षा घेणेची आवश्यकता नाही.

**(ड)** मंजुर आकृतीबंधातील तरतुदीनुसार जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ४४६०/ २०१४ दि.२७/१२/२०१४ रोजी पुर्वप्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमात लिपीक-टंकलेखक पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

| अं.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | सध्याची रिक्त पदसंख्या | पात्रता Qualification | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **By Nomination** | **By Promotion** |
| 01 | Clerk-Typist | 3050-4590 Pay Band 5200-20200 Grade pay 1900 | 115 | 1. Age not more than 33 years.<br>2. Graduate from any Government recognized University;<br>3. MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>4. Government Commercial Certificate of | 1. Graduate from any Government recognized University;<br>2. MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3. Government Commercial Certificate of Typing English 40 w.p.m and Marathi 30 w.p.m speed. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Typing English 40 w.p.m and Marathi 30 w.p.m speed. | 4. Experience of 5 years as a Coupon Seller or Class -IV Employees in sansthan. |

अनुकंपा कारणास्तव नोकरी मिळणेसाठी अर्ज केलेल्या संबधीत उमेदवारांची शैक्षणिक पात्रता खालील प्रमाणे.

| अं. क्र | दिवंगत कर्मचा-यांचे नाव,पदनाम व विभाग | अर्जदाराचे नाव,जन्मतारीख व दि.०१जून, २०१७ रोजीचे वय. | दिवंगत कर्मचा-यांशी नाते. | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | कै.अशोक हरीशचंद्र गोडगे (मदतनिस, खरेदी विभाग) | श्री.राहुल अशोक गोडगे (दि.२९/०१/१९८९) **वय २८ वर्षे ०४ महिने.** | मुलगा | B.A (Y.C.M.O.U), MS-CIT, Typing English 30, 40 w.p.m and Marathi 30 w.p.m., Tally. |
| २ | कै.इंदरराव एकनाथ देशमुख (मदतनिस, पाणीपुरवठा) | श्री.विशाल इंद्रभान देशमुख (दि.१४/०७/१९९१) **वय २७ वर्षे ०८ महिने.** | मुलगा | B.A (Y.C.M.O.U),MS-CIT,Typing English 30,40w.p.m and Marathi 30 w.p.m. |
| ३ | कै.काशिनाथ गजानन दाभाडे (मदतनिस, साईप्रसाद निवासस्थान विभाग) | श्री.विजय काशिनाथ दाभाडे (दि.०५/१०/१९९२) **वय २४ वर्षे ०७ महिने.** | मुलगा | B.com (Pune University),MS-CIT, Typing English 40, 30 w.p.m and Marathi 30 w.p.m.,Tally. |
| ४ | कै.सोमनाथ भगवान मराठे (मदतनिस, प्रसादालय विभाग) | श्रीमती रुपाली सोमनाथ मराठे (दि.२६/०५/१९८३) **वय ३४ वर्षे ०६ महिने.** | पत्नी | B.A (Pune University), MS-CIT, Typing English 30, 40w.p.m and Marathi 30 w.p.m., Montessori Teachers Corse. |

उपरोक्त तक्त्यातील अं.क्र.०१ ते ०३ चे उमेदवार सध्या तूर्त कंत्राटी(अकुशल) पध्दतीने संस्थानचे आय.टी विभागाकडे कामावर आहेत व अं.क्र.०४ चे उमेदवारास तूर्त कंत्राटी पध्दतीने कामावर घेणेत आलेले नाही. सेवाप्रवेश नियमातील उपरोक्त तरतुदीनुसार उपरोक्त उमेदवारांनी पुणे विद्यापीठ व यशवंतराव मुक्त विद्यापीठ नाशिक येथून पदवी शिक्षण पूर्ण केलेले असून महाराष्ट्र शासनाचे दि.१२ डिसेंबर, २००६ रोजीचे शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचेकडून प्रदान केलेल्या पदवी / पदवीकांना राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त परिच्छेद अ, ब, क व ड मध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता, उपरोक्त तक्त्यातील अ.क्र०१ ते ०४ चे उमेदवार लिपीक-टंकलेखक पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व मा.शासन निर्णयातील सर्व अटींची पूर्तता करत आहेत. सबब, उपरोक्त उमेदवारांना अनुकंपा कारणास्तव लिपीक-टंकलेखक पदावर (५२००-२०२०० ग्रेड पे रु.१९००) या वेतनश्रेणीमध्ये एक वर्षाच्या परिवीक्षाधीन कालावधीचे अटीवर नेमणूक देणेबाबतचा विषयावर निर्णय होणेस विंनती.

**निर्णय क्र.५५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामधील परिच्छेद अ, ब, क व ड मध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीचे अवलोकन करता, उपरोक्त तक्त्यातील अ.क्र०१ ते ०४ या उमेदवारांनी लिपीक-टंकलेखक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता व मा.शासन निर्णयातील सर्व अटींची पूर्तता केलेली असल्यामुळे त्यांना अनुकंपा कारणास्तव संस्थान नियमानुसार लिपीक्टंकलेखक या पदावर रु.५२००-२०२००+ ग्रेड पे रु.१९००/- या वेतनश्रेणीमध्ये एक वर्षाचा परिविक्षाधीन कालावधीचे अटीवर नेमणूक देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३८** **मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे या कंपनीचा साईटेक प्रोजेक्ट संदर्भातील चौकशी अहवाल.**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये दि.२५.०२.२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ०९ मध्ये खालील प्रमाणे निर्णय पारित झालेला आहे.

"उपरोक्त विषयावर चर्चा सुरु असताना समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी सभेस अशी माहिती दिली की, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे संस्थानमध्ये चाललेले काम समाधानकारक नाही व जोपर्यंत समाधानकारक काम होत नाही, तोपर्यंत त्यांचे पुर्ण बील देण्यात येऊ नये, या आशयाचे पत्र संस्थानला दिलेले होते. मे.कॉग्नीझंटटेक्नॉलॉजी, पुणे या कंपनीने सदरहू पत्र श्री.प्रताप भोसले यांना दाखवून आमचे बील का

थांबविले, अशी विचारणा केली. सदर बाब गंभीर आहे. यापुर्वीही या कंपनीचे कामकाज समाधानकारक नसलेचे व त्यांचेकडून योग्य सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, समितीने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली. संस्थानला दिलेले पत्र मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे या कंपनीकडे कसे गेले, याचबरोबर मे.कॉग्नीझंटटेक्नॉलॉजी, पुणे ही कंपनी व त्यामधील भागीदारी याची मुख्यलेखाधिकारी यांनी चौकशी करुन समितीसमोर अहवाल सादर करावा. तसेच या कंपनीकडून संस्थानचे सोर्स कोड काढून घेण्यात यावे, असे ठरले. ”

मा.व्यवस्थापन समितीतील निर्णयानुसार मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे. या कंपनीचा साईटेक प्रोजेक्ट संदर्भातील चौकशी अहवाल खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

१. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६.०३.२००८ रोजीचे निर्णय क्र. २४९ अन्वये मुंबई दिल्ली व हैद्राबाद या माहिती व सुविधा केंद्रावर इंट्रानेट मार्फत ऑनलाईन डोनेशन व रुम रिझर्वेशन या सुविधा करण्यासाठी रु.१ कोटी ३ लाख पर्यंतच्या खर्चास तत्वतः मान्यता देण्यात येऊन, संस्थानने इंग्रजी व मराठी भाषेतील दैनिक वर्तमानपत्रात व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन त्यानुसार एकुण १५ प्रस्ताव प्राप्त होऊन या सभेत उघडण्यात आले.

२. उघडण्यात आलेले प्रस्ताव धारकांची मा.कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संकल्पनात्मक (Conceptual) बैठक घेऊन, सदर बैठकीमध्ये माहिती व सुविधी केंद्रावर इंट्रानेट मार्फत ऑनलाईन डोनेशन व रुम आरक्षण या सुविधा सुरु करण्यासाठी अद्यायावत संगणक प्रणाली, इंटरनेट, व हार्ड वेअर इ.कामकाजाच्या स्वरुपाबाबत चर्चा करुन कर्मशियल बीड भरण्याचे सांगण्यात आले.

३. याच बैठकीमध्ये आयत्यावेळच्या विषयामध्ये श्री के.व्ही रमणी,चेन्नई यांची तांत्रिक सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून नेमणुक करणेबाबत निर्णय क्र. ७३४ अन्वये मान्यता देण्यात आली. त्या समितीचे सल्लागार म्हणून विजय नायडू कोपरगाव, व श्री तेजांश न्याती, पुणे या दोघांची नेमणुक करण्यात आली. जेकी हे सदस्य या अगोदर सल्लागार म्हणुन कार्यरत होते.

४. ERP प्रकल्पासाठी फेर निविदा मागविणेबाबत माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.२३.०१.२००९ रोजी प्रस्ताव सादर करून त्यामध्ये यापुर्वी प्राप्त झालेल्या ११ व मुदतीनंतर ४ असे एकुण १५ प्राप्त झालेले प्रस्ताव ६ सप्टेंबर, २००८ रोजीचे सभेमध्ये उघडण्यात आलेले आहे. त्यामध्ये हे सर्व प्रस्ताव तांत्रिक सल्लागार कमीटीचे अध्यक्ष श्री.रमणी यांचे अवलोकनार्थ सादर करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी सदर यादीचा अभ्यास करून यादीतील ब-याच कंपन्या संगणकप्रणाली तथा , संगणक नेटवर्क या दोन्ही क्षेत्रातील नसुन, काही फक्त संगणकीय नेटवर्क यंत्रणेत तर काही संगणक प्रणालीशीच संलग्न आहे. शिवाय सदर कंपन्या लहान असून, त्यांचेकडून सदर प्रकल्पाची पुर्तता होईल किंवा नाही? याबाबत शंका आहे. सदरील निवीदापैकी दोन ते तीन निविदा नामांकित कंपन्याचे आहेत. यासर्व बाबींचा विचार करता पुर्वीची निविदा रद्द करून , फेर निविदा श्री के.व्ही. रमणी यांचे मार्गदर्शनाखाली तयार करण्यात येऊन ती मुंबई पुणे बेंगलोर आदी ठिकाणचे नामांकित वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देणेबाबतच्या सुचना त्यांनी २२.०१.२००९ रोजीचे ई-मेलव्दारे कळविलेले आहे. याबाबत मा.अध्यक्ष साहेब यांचेशी दुरध्वनीव्दारे चर्चा केली असता, त्यांनी श्री.के.व्ही. रमणी सांगतील त्या प्रमाणे कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व कुठल्याही प्रकारचा विलंब अथवा अडथळा मला मान्य नाही असे निर्देश दिलेले आहेत.

५. उपरोक्त निर्देशा नुसार श्री.के.व्ही. रमणी यांनी नमुद केल्याप्रमाणे फक्त निविदाधारक कंपनीची मागील तीन वर्षाची आर्थिक स्थिती व प्रत्यक्ष कामाचा अनुभव लक्षात घेऊन साधारण तिन ते चार नामांकित कंपन्याच संस्थानची आवश्यकता व सध्याचे वापरात येणारे संगणक प्रणालीचा अभ्यास करून कमर्शियल निविदा भरण्यास सांगता येईल असे चर्चे अंती ठरले त्यानुसार जाहिरात देण्यास मान्यता घेण्यात आली.

६. दि.१२.०३.२००९ च्या प्रस्तावानुसार नव्याने एकूण १२ निविदा प्राप्त झालेल्या प्रस्तांवांची छाननी (Pree Qualification Round) च्या आधारे साधारणः तीन ते चार नामांकिंत बहूराष्ट्रीय कंपन्यांना तांत्रिक फेरीत प्रवेश दिला जाईल. व त्या आधारे संस्थानला सध्याची आवश्यकता व भविष्यातील आवश्यकता याबाबी विचारात घेऊन निविदा बनविण्यास सांगण्यात येईल यासाठी प्रीबीड बैठक आयोजीत करण्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली.

७. दि.०९.०८.२००९ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये प्राप्त ४ निविदा दि.१९.०७.२००९ चे रोजीच्या सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. सदर निविदा मा.श्री.के.व्ही.रमणी यांनी अभ्यास करण्यासाठी ठेऊन घेतल्या, प्रत्येक निविदाधारकाशी स्वतंत्रपणे चर्चा केली. प्रकल्पासंदर्भातील तांत्रिक निविदेत शंका असल्याने, व उघडण्यात आलेल्या कमर्शियल निविदा यांचा एकत्रित करून दोन दिवसांत अंतिम तांत्रिक दोष दुरुस्ती अहवाल इकडील कार्यालयास पाठविणार होते. व ते निविदाधारकास ई-मेल व्दारे पाठवून दि. २९.०७.२००९ अखेर फेर कमर्शियल निविदा स्पष्टिकरणासह जमा करण्यात याव्यात असे मा.अध्यक्ष साहेब यांनी सांगितले व त्यानुसार खालील चार निविदा प्राप्त झाल्या.

| S.No | PARTY NAME |
|---|---|
| १. | United Telecoms Ltd.,Banglore. |
| २ | Persistent System Ltd., Pune. |
| ३ | Relince Communications Ltd. Pune. |
| ४ | Cognizant Technology solutions, Pune. |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या चार निविदा या सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदा श्री.के.व्ही. रमणी यांचेकडे पाठवून अंतिम दोन निविदा धारकांना मा व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

८. दि.०७.११.२००९ रोजी झालेल्या निर्णय क्र.७९९ मध्ये साईटेक प्रकल्पाची पार्श्वभुमी व आत पर्यंत झालेल्या कामकाजाची माहिती श्री.के.व्ही.रमणी, अध्यक्ष तांत्रिक सल्लागार समिती यांनी प्रेझेन्टेंशन व्दारे मा.व्यवस्थापन समितीस दिली. तांत्रिकदृष्ट्या सबळ निविदांची रॅकिंग सांगण्यात आली. ती खालीलप्रमाणे

१. Cognizant Technology Solutions, Pune. २. Pesistent Systems Ltd. Pune

3. United Telecoms Ltd., Bangalore. 4. Relience Communications Ltd. Pune.

(टेलिकॉमसाठी) असे रॅकिंग श्री. रमणी यांनी सांगुन कमर्शियल निविदेचा तक्ता श्री.के.व्ही. रमणी यांनी सादर केला त्यांचा तपशिल पुढील प्रमाणे.

| Quote for one Time & 5 Years | Congizant technology solutions, Pune. | Prsistent+Reliance Communications Ltd. Pune. | United Telecoms Ltd. Bangalore |
|---|---|---|---|
| All amount in corers | | | |
| I.T. Telecom & other cost | 24.81 | 26.35 | 28.61 |
| Discount | 2.94 | 1.00 | 2.11 |
| Negotiation/ amount | 21.87 | 25.35 | 26.00 |

उपरोक्त तक्त्यानुसार वाटाघाटी अंती Cognozant Technology Solutions, Pune. यांची निविदा तांत्रिकदृष्ट्या अधिक सक्षम असल्याने ती स्विकारण्यात आली त्यसाठी २१.८७ कोटीचे खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु उपरोक्त तक्त्यात नमुद केलेली १७ लाख ही टॅक्सची रक्कम सध्याच्या टॅक्सेसनुसार असल्याने भविष्यात टॅक्स मध्ये बदल झाल्यास त्याप्रमाणे टॅक्सची रक्कम आदा करावी असे ठरले. तसेच श्री.के.व्ही.रमणी अध्यक्ष तांत्रिक सल्लागार समिती यांचे मार्गदर्शनाखाली प्रकल्पाची कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

या दरम्यान विधी व न्याय विभाग यांनी दि.२८.०२.२०१३ चे पत्रान्वये श्री.के.व्ही.रमणी यांची आयटी ॲडव्हायझरी कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करतानां त्यास शासनाची मान्यता घेणे उचित ठरले असते. तथापी संस्थानने शासनाची मान्यता न घेता परस्पर नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला होता. भविष्यात अशाप्रकारे नियुक्ती करण्यापुर्वी त्यास शासनाची मान्यता घेण्याची दक्षता घेण्यात यावी असे सुचविले आहे.

तथापी श्री.के.व्ही.रमणी यांचे तांत्रिक सल्लागार समितीच्यया अध्यक्ष पदाची मुदत दि.३०.०९.२०१३ रोजी संपुष्टात येत असुन, साईटेक प्रकल्पाचे काम बाकी असल्याने मा.श्री.के.व्ही. रमणी यांना त्यांची मुदत संपुष्टात येत असलेल्या कालावधीपासुन पुढे दोन वर्षाकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी.

असा निर्णय दि.१७.०९.२०१३ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेत आयत्या वेळचा विषय क्र.७ विश्वतांच्या सुचना बाबत निर्णय क्र.७०५ ने झालेला आहे.

त्याचप्रमाणे या प्रोजेक्टचे दोन वेळेस थर्ड पार्टी ऑडीट झालेले आहे. १. गव्हर्वमेंट ऑफ महाराष्ट्र, यांचा दि.१४.०८.२०१७ ते दि.१६.०८.२०१४ अखेर अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये टेक्नीकल लोकांचा अहवाल असुन, आर्थिक बाबींचा कोठेही उल्लेख नाही. तसेच २ रा अहवाल ट्रिपल ए टेक्नॉलॉजी मुंबई यांनी देखील सादर केलेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन मंडळाचे झालेले निर्णय व संबधीत विभागात प्रत्यक्ष जाऊन इतर झालेले ठराव, कागदपत्रे पाहता, खालील प्रमाणे निष्कर्ष अहवाल सादर करीत आहे.

१. संस्थानने स्वतः श्री.के.व्ही.रमणी यांना समितीचे अध्यक्षपदी नेमणुक करुन संपुर्ण प्रकल्प त्यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात यावे. असे व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय झालेले आहेत.

२. कमर्शियल बीडचा विचार करता कॉग्नीझंट कंपनीचे दर इतर कंपन्यापेक्षा सर्वात कमी असुन, त्यांनतर देखील समक्ष तीनही कंपन्यांशी चर्चा वाटाघाटी करुन त्यामध्ये देखील सर्वात कमी दर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी सोलुशन्स, पुणे यांचाच आहे. (२१.८७ कोटी)

३. कंपनीला एकुण ३७ सॉफटवेअर ६ टप्प्यात करुन देण्यासाठी १८ महिन्याचा कालवधी देण्यात आलेला होता. करारनाम्यानुसार जानेवारी २०१० ला सुरु झालेला प्रकल्प जुन २०११ ला पुर्ण होणे अपेक्षित हाते. १८ माहिन्याच्या कालावधीत उर्वरीत कार्यवाही होणे अपेक्षित होते. परंतु प्रकल्प उभारणीच्या कामात आलेल्या विविध अडचणींमुळे प्रकल्प निर्धारीत वेळेत पुर्ण करणे अशक्य झालेले आहे.

४. निर्धारीत वेळेत बदल करण्याचा अधिकारानुसार दि.१८.०७.२०१२ रोजी मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये विषय सादर करुन त्या बैठकीत सदरचे सादरीकरण पुढील सभेपुढे करण्यात यावे असे ठरले. तथापी संबधीत कंपनीला नविन प्लॅन नुसार दि.३१.०८.२०१६ अखेर मुदतवाढ देण्यात आली. त्यावेळी जानेवारी २०१३ पासुन संस्थानकडे ठेवण्यात आलेली ७% अनामत रक्कम आदा करण्याबाबतची दि.२६.०७.२०१३ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.६११ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

५. माहिती तंत्रज्ञान विभागातील प्राप्त कागदपत्रावरुन असे दिसुन आले की, श्री.के.व्ही.रमणी यांचे ई-मेल व्दारे श्री.मुकेश सोमकुंवर, सोक्शन ऑफीसर, डिरोक्टोरेट ऑफ इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी, महाराष्ट्र शासन यांचीही आयटी ॲडव्हईजर कमिटी मेंबर म्हणुन नेमणुक करणेबाबत सुचविले आहे. त्याप्रमाणे त्यांची नेमणुक करण्यात यावी असे ठरले.

६. साईटेक प्रकल्पासंदर्भात आय.टी.कमिटी व मा.व्यवस्थापन समिती यांची संयुक्त बैठकही झाली आहे. त्या बैठकीचे इतिवृत्त मा.व्यवस्थापनल समिती सभा दि.२५.०९.२०१४ रोजीच्या सभेमध्ये निर्णय क्र.८३७ कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे. यांचे हलगर्जीपणामुळे व चुकीमुळे प्रकल्प पुर्ण होण्यास दिरंगाई झाली आहे. पाठीमागील कटू अनुभवांचा फारसा विचार न करता, केवळ प्रायोगीक तत्वावर तीन महिन्याचा कालावधी त्यांना काम पुर्ण करण्यास वाढवुन दिलेला होता. परंतु कामात प्रगती झालेली नाही. त्यामुळे काम पुर्ण झाल्यानंतर उर्वरीत बील दिले जावे. आवश्यक ऑडीट व फायनालिटी क्लॉजला अनुसरुन, त्यांचेबरोबरचा करार रद्द केला जाईल. असे त्यांना कळविण्यात यावे.

७. या सर्व दरमयान माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.संजय काळे यांनी साईटेक प्रकल्पावर मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे सदरचा प्रकल्पथांबविणे व श्री.के.व्ही.रमणी यांना पार्टी करुन केस दाखल करण्यात आलेली होती. तथापी केस मा. कोर्टाने डिसमिस करुन दाखल करुन घेतली नाही.

उपरोक्त संदर्भीय निर्णयातील मुद्दा क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मा.विश्वस्त श्री. प्रतापराव भोसले यांनी संस्थानला दिलेले पत्र मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे यां कंपनीकडे कसे गेले? याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागाकडे चौकशी केली असता, याबाबतची आवश्यक नस्ती अवलोकनार्थ उपलब्ध झाली नाही. तथापी संबधीत पत्राबाबत खुलासा मागविणेकामी सदरचे पत्र माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे यांना दिले असल्याचे पत्र मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे यांचे दि२७.०९.२०१६ रोजीचे संस्थान आवक क्र.११५८९ चे पत्रात केलेल्या उल्लेखावरुन दिसते.

मुद्दा क्र.२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पत्र मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे ही कंपनी व त्यामधील भागीदारीबाबत चौकशी करण्यास सांगितले होते. कागदपत्राची तपासणी केली असता, कॉग्नीझंट कंपनीमध्ये

कोणाचीही भागीदारी असल्याचे निदर्शनास येत नाही. तसेच ३७ सॉफ्टवेअर ऐवजी ३८ सॉफ्टवेअर संस्थानच्या ताब्यात मिळालेले आहे. जे काही लायसन्स घेतलेले आहे, ती सर्व लायसन्स संस्थानच्या नावाने आहे.

उपरोक्त संदर्भीय मा.व्यवस्थापन समितीतील निर्णयात नमुद केलेल्या मुद्दा क्र.१ नुसार संस्थानला दिलेले पत्र मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे या कंपनीकडे कसे गेले, व मुद्दा क्र.२ मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे ही कंपनी व त्यामधील भागीदारी याचे निगडीत कागदपत्रांची छाननी करुन, त्याबाबत चौकशी करुन, तुयाबातचा सविस्तर अहवाल तयार करण्यात आलेला आहे. सदर अहवालाचे अवलोकन होणेकामी, अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.५५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे या कंपनीचा साईटेक प्रोजेक्ट संदर्भातील चौकशी अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३९** **साईटेक प्रकल्पातंर्गत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंट अदा करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-**

०१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३४.
०२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५७.
०३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३३.
०४. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२७.
०५. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४३२.
०६. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१८.

**प्रास्ताविक:-** साईटेक प्रकल्पासाठी करणेत आलेल्या करारनाम्याअंतर्गत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा प्रकल्प देखभालीचा कालावधी माहे एप्रिल-२०१७ अखेर संपुष्टात आलेला आहे. सबब, मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये साईटेक प्रकल्प दुरूस्ती देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक करणेकामी संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही इकडील विभागामार्फत सुरू करणेत आलेली आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणाली सुरळीत चालू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच संस्थानचे प्रशासकीय कामकाजात अडचणी येऊ नयेत, याकरीता साईटेक प्रकल्प दुरूस्ती देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत प्रकल्प देखभाल मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी,पुणे यांचेमार्फत सुरू ठेवणेकामी मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव मा.व्यवसथापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

"मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी,पुणे यांची साईटेक प्रकल्प दुरूस्ती-देखभालकामीची मुदत संपुष्टात आलेली असल्यामुळे, सदरहूकामी विहीत पद्धतीने नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत साईटेक कार्यप्रणाली सुरळीत चालू रहावी, साईभक्तांची गैरसोय होऊ नये व संस्थानचे कामकाजात अडथळा येऊ नये यासाठी फक्त Functional Support सुरू ठेवणेबाबत मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी,पुणे यांना पुर्वीच्याच अटी/शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी व यासाठी त्यांचेकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन पुढीलप्रमाणे सभेसमोर सादर करणेत यावा."

मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी त्यांना सुचित केलेप्रमाणे साईटेक प्रकल्प देखभालीसाठी उपरोक्त संदर्भ क्र. ०१ अन्वये चा प्रस्ताव प्रकल्पाअंतर्गत यांचे थकीत पेमेंट अदा करणेच्या अटीवर सादर केलेला आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून साईटेक प्रकल्प देखभालीसाठीचा प्राप्त झालेला प्रस्ताव व आवश्यक कार्यवाही बाबतचा पुढीलप्रमाणे प्रस्ताव निर्णयास्तव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता.

अ) साईटेक प्रकल्प देखभालीसाठी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार दरमहा रुपये १४,४४,०००/- मात्र रक्कमेप्रमाणे त्यांना कार्यादेश देता येईल.

आ) प्रस्तावामध्ये मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांना देय असलेल्या रक्कमेबाबत निर्णय होऊन त्यांना रक्कम अदा करता येईल.

इ) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेसमोर सादर केलेल्या प्रस्तावानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत सद्यस्थितीत भाडेतत्वावर वापरात असलेले प्रिंटरचे मासिक भाडे अंदाजे रक्कम रुपये १,७०,०००/- + कर संस्थानमार्फत अदा करुन, सदरचे आवश्यक प्रिंटर्स कार्यान्वीत ठेवता येतील.

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्प दुरूस्ती-देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत सदरहू प्रकल्पाअंतर्गंत कार्यान्वीत करण्यात आलेली कार्यप्रणाली सुरळीत चालू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच संस्थानचे कामकाजात अडथळा येऊ नये, याकरीता प्रस्ताविकेत नमुद मुद्दा "अ", "आ" व "इ" प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्देशान्वये साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाज चालू ठेवणेसाठी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना जा.नं. एसएसएसटी/आयटी/१४१५/२०१७, दि. १६/०६/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना सुचित केलेप्रमाणे त्यांनी साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाज आजतागायत नियमीतपणे सुरु ठेवलेले आहे.

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे साईटेक प्रकल्प देखभाली संदर्भातील पत्र व ई-मेल प्राप्त झालेले आहे. सदर ई-मेलमध्ये मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी साईटेक प्रकल्पाअंतर्गत त्यांचे देय असलेल्या बीलांची रककम ३० जुन, २०१७ पुर्वी अदा करणेची विनंती केलेली आहे. तसेच सदरची रककम त्यांना अदा न झाल्यास त्यांचेमार्फत सुरू असलेले साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाज ०१ जुलै, २०१७ पासून सुरू ठेवणे शक्य होणार नाही, असे पत्र व ई-मेलमध्ये नमुद केलेले आहे. मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पत्र व ई-मेलबाबत तसेच पत्र व ई-मेलमध्ये कळविलेप्रमाणे त्यांनी प्रकल्प देखभालीचे कामकाज दि.०१.०७.२०१७ पासून थांबविल्यास येणा-या अडचणींबाबत मा.अध्यक्ष महोदय व मा.विश्वस्त यांना उपरोक्त संदर्भ क्र. ०५ रोजीचे ई-मेलद्वारे अवगत करणेत आलेले आहे.

सद्यस्थितीत साईटेक प्रकल्पाअंतर्गत साईभक्तांना संस्थानमार्फत पुरविण्यात येणा-या सोई-सुविधासंदर्भातील ऑनलाईन सर्व्हिसेस, देणगी कार्यालय, दर्शन पास, प्रसादालय, रुम बुकींग, पुस्तक विक्री, कापड कोठी-विक्री, साईलीला व भक्तंडळ सभासद नोंदणी इ. सारख्या कार्यप्रणाली कार्यरत आहेत. तसेच प्रशासनासंदर्भात पगारबील, आवक-जावक, वैद्यकिय अनुदान, कॅशीअर, कॅश काऊंटींग, इलेक्ट्रिक विभाग इ. सारख्या कार्यप्रणाली कार्यरत आहेत. मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी पत्र व ई-मेलद्वारे कळविलेप्रमाणे दि.०१.०७.२०१७ पासून साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाज थांबविल्यास साईभक्तांची फार मोठ्या प्रमाणात गैरसोय तसेच संस्थानचे प्रशासकीय कामकाजात अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे बीलाची मागील (मार्च-२०१४ ते ऑगष्ट-२०११ कालावधीचे) राखीव ठेवलेली रक्कम रु. १,००,२६,९४१.७७ तसेच माहे सप्टेबर-२०१५ ते मे-२०१६ चे बीलांची येणारी रक्कम रु. २,५३,५०,६२२.९५ अशी एकुण रक्कम रुपये ३,५३,७७,५६४.७२ अदा करणेसाठी व पुढील बीले प्रस्तावीत Migration Audit रिपोर्ट आलेनंतर त्याचे अहवालानुसार अदा करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.व्यवस्थापन समितीचे दि. १९/०९/२०१६ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती निर्णय क्रं. ६५७ अन्वये,मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे सप्टेबर-२०१५ ते मे-२०१६ अखेरच्या बीलांच्या रकमेपैकी तुर्तास ८०% रक्कम त्यांना अदा करणेत यावी. तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे Migration Audit रिपोर्ट आलेनंतर त्याचे अहवालानुसार उर्वरीत बील अदा करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे निर्देश देण्यात आलेले होते.

साईटेक प्रकल्पाअंतर्गंत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व लेखाशाखा विभागातील ERP कार्यप्रणालीचे System Audit व Migration Audit करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २३४ अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती. सदरचे निर्णयान्वये संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा राबवून सदरकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७३३ अन्वये M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांना कार्यादेश देण्यात आलेला होता.

उपरोक्त कार्यादेशान्वये M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांनी साईटेक प्रकल्पाअंतर्गंत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व लेखाशाखा विभागातील ERP कार्यप्रणालीचे System Audit व Migration Audit करून सादर केलेल्या अहवालानुसार मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून पुर्तता करुन घेण्यात आलेली होती. पुर्तता झालेनंतरचा M/s. AAA Technologies

Private Ltd., Mumbai यांचेकडून प्राप्त झालेला पुर्तता अहवाल नोंद घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चेअंती निर्णय क्रं.४१८ अन्वये त्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणाली सुरळीत सुरु राहून साईभक्तांची गैरसोय व प्रशासकीय कामकाजात अडचणी येऊ नये याकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दि. १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील त्यांचे मार्च-२०१४ ते ऑगष्ट-२०१६ या कालावधीतील पेमेंटबाबतच्या निर्णय क्रं. ६५७ नुसार दिलेल्या निर्देशाप्रमाणे माहे जुन-२०१६ ते एप्रिल-२०१७ या बिलांच्या एकूण रक्कमेच्या २०% राखीव ठेवून उर्वरित रक्कम त्यांना अदा करता येईल. तसेच राखीव ठेवणेत आलेली रक्कम प्रकल्प देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होऊन प्रकल्प हस्तांतरीत झालेनंतर अदा करता येईल.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्राप्त झालेल्या बीलांच्या देय असलेल्यारकमेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 20% Amount of Mar 2014 to May 2016 | 1,50,97,067 |
| Payment of Month June-2016 to April 2017 | 2,90,66,852.66 |
| **Total (Including Hardware) :** | **4,41,63,919.66** |

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणाली सुरळीत सुरु राहून साईभक्तांची गैरसोय व प्रशासकीय कामकाजात अडचणी येऊ नये याकरीता साईटेक प्रकल्प देखभाल मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून नियमीत सुरु राहणेकरीता त्यांचे माहे जुन-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीतील बिलांच्या एकूण रक्कमेच्या (रक्कम रुपये २,९०,६६,८५३/-) २० % रक्कम राखीव ठेऊन उर्वरित ८० % रक्कम रुपये २,३२,५३,४८२/- त्यांना अदा करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणाली सुरळीत सुरु राहून साईभक्तांची गैरसोय व प्रशासकीय कामकाजात अडचणी येऊ नये याकरीता, साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाज मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून नियमीत सुरु राहणेकरीता त्यांचे माहे जुन-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीतील बिलांच्या एकूण रक्कमेच्या (रक्कम रुपये २,९०,६६,८५३/-) २०% रक्कम राखीव ठेऊन उर्वरित ८०% रक्कम रुपये २,३२,५३,४८२/- त्यांना लेखाशाखा विभागामार्फत संस्थान नियमाप्रमाणे अदा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय:-** साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणाली सुरळीत सुरु राहून साईभक्तांची गैरसोय व प्रशासकीय कामकाजात अडचणी येऊ नये याकरीता, साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाज मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून नियमीत सुरु राहणेकरीता त्यांचे माहे जुन-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीतील बिलांच्या एकूण रक्कमेच्या (रक्कम रुपये २,९०,६६,८५३/-) २० % रक्कम राखीव ठेऊन उर्वरित ८० % रक्कम रुपये २,३२,५३,४८२/- त्यांना लेखाशाखा विभागामार्फत संस्थान नियमाप्रमाणे अदा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.५५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणाली सुरळीत राहून साईभक्तांची गैरसोय व प्रशासकीय कामकाजात अडचणी येऊ नये. याकरीता साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाज मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून नियमीत सुरु राहणेसाठी त्यांच्या माहे जुन- २०१६ ते एप्रिल- २०१७ या कालावधीतील बिलांच्या एकूण (रु.२,९०,६६,८५३/-) रकमेपैकी ५०% (रु.१,४५,३३,४२६.५०) रक्कम राखीव ठेवणेत येऊन, उर्वरित ५०% रु.१,४५,३३,४२६.५० मात्र रक्कम मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे आदा करणेत यावी. तसेच माहे मे- २०१७ पासून प्रकल्प देखभालीसाठीचे पुर्ण मासिक बील मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना नियमीत आदा करणेत यावे, असे ठरले.**

**याचवेळी अशीही चर्चा झाली की, मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी प्रकल्प देखभालीचे कामकाज थांबविल्यास, सदरहू कार्यप्रणाली सुरळीत सुरु ठेवणेसाठी नवीन कंपनीची नेमणूक करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रकिया राबविणेत यावी व त्यास "साईटेक प्रकल्प- १ दुरुस्ती**

**देखभाल" असे संबोधण्यात यावे व सध्या साईटेक प्रकल्प दुरुस्ती देखभालीसाठी नवीन कंपनीची नेमणूक करणेकामी चालू असलेली ई-निविदा प्रक्रियाही पुढे चालू ठेवणेत यावी व त्यास "साईटेक प्रकल्प- २" असे संबोधण्यात यावे.**

**मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी प्रकल्प देखभालीचे कामकाज थांबविल्यास प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणाली सुरळीत राहून साईभक्तांची गैरसोय व प्रशासकीय कामकाजात अडचणी येऊ नये, याकरीता समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी या क्षेत्रातील तज्ञ व त्यांचे सहकारी यांना दिनांक ११.०७.२०१७ पासून करावयाच्या कार्यवाहीबाबत अभ्यास करुन अहवाल सादर करणेकामी शिर्डी येथे पाठविलेले आहे. सदरहू तज्ञ व त्यांचे सहकारी हे काम विनामुल्य करणार असल्याने त्यांची, त्यास साईटेक प्रकल्प- १ दुरुस्ती देखभाल निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत द्वारावती निवासस्थान येथे २ वातानुकुलीत खोल्यांमध्ये मोफत निवासव्यवस्था, प्रसादालयामधील विशेष बैठक कक्षामध्ये मोफत भोजनव्यवस्था, याबरोबरच शिर्डी येथे अंतर्गत दळणवळणासाठी मोफत वाहनव्यवस्था करणेत यावी. एक महिन्यामध्ये त्यांनी प्रकल्प देखभालीसाठी काय काम करता येईल याचा अभ्यास करुन पुढील सभेसमोर त्याचे सादरीकरण करावे. मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, ई-निविदा प्रक्रियेशिवाय अशा प्रकारे या क्षेत्रातील तज्ञ व त्यांचे सहकारी यांचेवर काम सोपविणे तसेच संस्थानची माहिती त्यांना देणे योग्य नाही. परंतु समिती सदस्यांनी त्यांना विनामोबदला काम करणेस परवानगी दिली.**

**याचबरोबर मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी अशीही माहिती दिली की, प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान) हे शिर्डी येथे भेट देणार असून त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे साईटेक टप्पा-२ चे टेंडर तयार करावे, यास समिती सदस्यांनी सहमती दर्शविली. त्यानुसार सद्यस्थितीत राबविणेत येत असलेल्या साईटेक प्रकल्प टप्पा- २ फेर साठी ई-निविदा प्रसिध्द करणेपुर्वी ई-निविदेची तपशीलवार माहिती (हार्डवेअर, सॉफ्टवेअर, मनुष्यबळ इ.) अंदाजीत रक्कम तसेच ओरॅकल ईआरपी व इतर कार्यप्रणाली यांची तुलनात्मक माहितीही समितीसमोर सादर करावी. त्याचप्रमाणे संस्थानचे कामकाजात गतिमानता व सुसूत्रता यावी याकरीता संस्थानमध्ये SOP (Slandard Operating Procedure) कार्यान्वीत करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.४० म्युझियम हॉल येथील दर्शनीय भागात श्रींचे समकालीन साईभक्त /संत यांचे फोटो लावणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे हयातीमध्ये अनेक साईभक्तांनी श्रींची नि:सीम सेवा केली आहे. याबाबतचे पुरावे संस्थान प्रकाशीत श्रीसाईसच्चरित या ग्रंथामध्ये अढळुन येतात. श्रींचे समकालीन त्यांची सेवा केलेल्या एकूण ५३ भक्तांचे फोटो फार पुर्वीपासुन समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये लावण्यात आलेले आहेत. सध्याच्या काळामध्ये श्रीसाईबाबांचा प्रचार व प्रसार वाढल्यामुळे अनेक श्रींचे समकालीन साईभक्त यांचे वंशज त्यांचे पुर्वजांच्या श्रीसाईसच्चरिताचा दाखला दाखवुन अशाच पद्धतीने फोटो समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये लावणेबाबत आग्रह धरत आहेत. याबाबतचे काही अर्ज मंदिर विभागाकडे उपलब्ध आहेत. परंतु, सध्या समाधी मंदिर सभामंडपामध्ये फोटो लावणेची जागा अपुरी असल्याने व यापुर्वी मा.पद्मश्री.सदाशिवराव गोरक्षकर, संस्थान म्युझियम सल्लागार यांनीही असे कळविले होते की, समाधी मंदिरात दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना या फोटोंबाबत माहिती अढळत नसल्याने येथुन पुढे नवीन फोटो लावू नये असे सूचित केले होते. तसेच याकरीता श्रींचे साईसच्चरित ग्रंथामध्ये उल्लेख असलेले सर्व फोटोंची आर्ट गॅलरी तयार करण्यात यावी व त्याठिकाणी सर्व फोटोंसह श्रीसाईबाबांशी आलेल्या प्रसंगचित्रासह माहिती विविध भाषांमध्येदेऊन आर्ट गॅलरी तयार करण्यात यावी ज्यामुळे भक्तांना भक्तांचा संदर्भ लक्षात येईल अशी सूचना केली होती

त्यानंतर श्रीसंत राममारुती महाराजांचा फोटो लावणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील विषय नं.०५, निर्णय क्र.८१४ नुसार याबाबत सविस्तर विषय ठेवण्यात आलेला होता. त्यावेळी चर्चा होऊन, संस्थानमार्फत मंदिर परिसरामध्ये योग्य ठिकाणी आर्ट गॅलरी तयार करुन प्रस्तावात नमूद केलेले श्रीसाईबाबांचे समकालीन संत व साईभक्त यांचे फोटो श्रीसाईसच्चरितामधील सविस्तर माहिती तसेच प्रसंगचित्रासह लावणेत यावे, असे ठरले. ठरावानुसार मंदिर विभागाचे दि.२७/१२/२०१६रोजीचे मंजूर टिपणीनुसार याबाबत बांधकाम विभागास ठरावाची प्रत पुढील कार्यवाहीकरीता देण्यात आलेली आहे. त्याबाबत बांधकाम विभागामार्फत योग्य ती कार्यवाही चालू आहे.

**प्रस्ताव-** श्रींचे समाधी शताब्दी वर्षाचे औचित्य साधुन असे साईभक्त ज्यांनी यापुर्वी आपले पुर्वजांचा उल्लेख श्रींचे साईसच्चरितामध्ये अढळुन येतो असे अर्ज पडताळणी करुन त्यांचे फोटो समाधी मंदिरामध्ये न

लावता म्युझियम हॉल येथे दर्शनीय भागामध्ये लावणेबाबत कार्यवाही करणेबाबत मा.श्री.सचिन तांबे, विश्वस्त यांनी सूचना केलेल्या आहेत.

**विभागाचा अभिप्राय-** श्रींचे समकालीन व मंदिर विभागाकडे प्राप्त असलेले व फोटो लावणे बाकी असलेले अर्ज व त्यांचे श्रीसाईसच्चरितामध्ये उल्लेख खालीलप्रमाणे आहेत-

| अ.क्र | अर्जदारांची नावे | समकालीन भक्तांची नावे | श्रीसाईसच्चरितामध्ये उल्लेख आहे/ नाही. | साईसच्चरितामधील संदर्भ | प्रथम अर्ज केल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री रविंद्र शांताराम नाचणे, ठाणे | कै.शांताराम बळवंत नाचणे (डहाणूकर) | श्रीसाईसच्चरित ग्रंथात उल्लेख नाही. परंतु, साईलिला मासिकात आहे. | साईलिला अंक १९२३ सन-१९१२मध्ये | दि.१०/०३/२००५ |
| ०२ | श्री लालसिंग नारायणसिंग परदेशी, | प.पू.रामचंद्र महाराज पारनेरकर | श्रीसाईसच्चरित ग्रंथात उल्लेख नाही. परंतु, साईलिला मासिकात आहे. | समाधी मंदिराचा विजयादशमी-१९५२, दि.२९/०९/१९५२ साली समाधी मंदिराच्या कलशारोहन कार्यक्रम प.पू.रामचंद्र महाराज पारनेरकर यांचे शुभहस्ते करण्यात आला आहे. | दि.०२/०४/२००५ |
| ०३ | श्री सुरेश जयचंद सांड, राहाता | कै.चंद्रभानजी सांड<br>कै.खुशालचंद सांड | उल्लेख आहे | १.उपोद्घात पान नं.१०, २.अध्याय क्र.८/ पान नं.१००/ ओ.क्र.१२६ ते १३४ | दि.३०/०५/२००५ |
| ०४ | श्री तुषार बिपीनचंद्र कर्णिक, ठाणे | कै.हरी केशव कर्णिक | उल्लेख आहे | अध्याय क्र.३३/ पान नं.४५०/ ओ.क्र.१९८ | दि.१८/०७/२००५ |
| ०५ | श्री बा.य.वायदे, इंदौर, म.प्र. | श्री माधवनाथ महाराज | श्रीसाईसच्चरित ग्रंथात उल्लेख नाही. | | दि.२३/०७/२००५ |
| ०६ | श्री कुमुदचंद्र दत्तात्रय गडकरी, इंदोर (म.प्र) | कै.उद्धवेश रानडे उर्फ साईसुत शामदास | श्रीसाईसच्चरित ग्रंथात उल्लेख नाही. परंतु, साईलिला मासिकात उल्लेख आहे. | सन-१९२६ साईलिला मासिक | दि.२०/०९/२००५ |
| ०७ | श्री बोमन के. मेहता, मुंबई | प.पू.सदगुरु कम्मूबाबा, मुंबई | श्रीसाईसच्चरित ग्रंथात अथवा कोठेही उल्लेख नाही | ----- | दि.११.०९.२००५ |
| ०८ | श्रीमती छाया नाईक वेल्फेयर ऑफीसर, मुंबई व श्री मोरेश्वर के. गव्हाणकर मुंबई | कै.डॉ.आण्णासाहेब गव्हाणकर | श्रीसाईसच्चरित ग्रंथात उल्लेख नाही. परंतु, साईलिला मासिकात उल्लेख आहे. | साईलिला मासिक | दि.०२/११/२००५ |
| ०९ | श्री सुरेश द.साठे, कार्यवाह, साठे साठ्ये साठये कुलपुरस्कृत न्यास, पुणे | कै.रावबहादूर हरी विनायक साठे | उल्लेख आहे | अध्याय क्र.१८/ पान नं.२२४ ते २६३ | दि.१०/०७/२००६ |
| १० | श्री दत्तात्रय वासुदेव औरंगाबादकर, सोलापूर | कै.सौ.गंगुबाई सखाराम औरंगाबादकर | उल्लेख आहे | अध्याय क्र.३६/ पान नं.४९७/ ओ.क्र.११९ ते १६६ | दि.२७/०६/२००७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | श्री अमृतराव मुरलीधर गोंदकर पा. शिर्डी | कै.वामनराव (दादा) माणकोजी पा. गोंदकर | उल्लेख आहे | १.अध्याय क्र.५/ पान नं.५८/ ओ.क्र.४६ ते ४९ २.अध्याय क्र.१९/ पान नं.२५६/ ओ.क्र.२३८ | दि.१३/१०/२००८ |
| १२ | श्री शेखर मो.कीर्तिकर, मुंबई | कै.डॉ.एम.के.किर्तीकर | श्रीसाईसच्चरित ग्रंथात अथवा कोठेही उल्लेख नाही | ---- | सन-२००९ चे पत्र |
| १३ | श्री प्रमोद ज्ञानदेव गोंदकर, शिर्डी | कै.निवृत्ती हनुमंतराव पा. गोंदकर | श्रीसाईसच्चरित ग्रंथात उल्लेख नाही | ---- | दि.१९/०५/२००९ |
| १४ | सौ अलका सुभाष बोरावके, कोपरगांव | कै. रावसाहेब बापूराव राघोजी बोरावके | श्रीसाईसच्चरित ग्रंथात उल्लेख नाही. | --- | दि.२६/०७/२००९ |
| १५ | श्री नरसिंह गोपालदास महाराज संजीवन समाधी मंदिर व श्री सिद्ध साई पंचायतन मंदिर, नाशिक | श्री नरसिंह गोपालदास महाराज | उल्लेख आहे | अध्याय क्र.३३/ पान नं.४५१, ओ.क्र.२०४ | दि.०४/०१/२०१० |
| १६ | श्री एल.पी.इंगळे, अकोला(विदर्भ) | श्रीश्री १००८ अवधुत केशवानंदजी श्री दादाजी धूनिवाले, खंडवा, म.प्र. | कुठेही उल्लेख नाही. (श्रीसाईबाबांशी संबंध नाही.) | ------ | दि.१६/०१/२०१२ |
| १७ | श्री निरंजन साई जानी, मुंबई | कै.काकासाहेब दिक्षीत | उल्लेख आहे | अध्याय क्र.२३/ पान नं.३०२, ओ.क्र.५७ तसेच इतर अध्यायातही उल्लेख अढळुन येतो. | (म्युझियम हॉल/ दिक्षीत वाड्यास "काकासाहेब दिक्षीत वाडा बाबांचे संग्रहालय" असे नाव देणेबाबत) दि.०७/१२/२०१३ |
| १८ | श्री मनोहर मार्तंड नागरे, शिर्डी | कै.मार्तंड म्हाळसापती भगत नागरे, शिर्डी | श्रीसाईसच्चरित ग्रंथात उल्लेख नाही. परंतु, खापर्डे डायरीमध्ये आहे. | खापर्डे डायरी पान नं.६१ वर म्हाळसापतींना कृष्ण जन्माचे दिवशी पुत्ररत्न (कै.मार्तंड म्हाळसापती नागरे) झाले असा उल्लेख. | दि.२५/०१/२०१४ याबाबत त्यांचा उल्लेख श्रीसाईसच्चरित ग्रंथात नाही असे यापुर्वी जा.क्र. एसएसएस/ मंदिर/ ५९६८/२०१४, दि.२२.०३.२०१४ अन्वये कळविलेले आहे. |
| १९ | श्री.सतीष बाबुराव गायके पा. व गायके पा. परिवार, शिर्डी | कै.दगडूभाऊ गायके | उल्लेख आहे | १.उपोद्घात पान नं.०८, २.अध्याय क्र.५/ पान नं. ५८/ ओवी क्र.४१ | दि.२२/०२/२०१४ |

उपरोक्तप्रमाणे साईभक्तांचे अर्ज ईकडील कार्यालयास प्राप्त झालेले असून श्रींचे समकालीन संत/ भक्त यांचे फोटो लावणे अद्याप बाकी आहेत. फोटो लावणेबाबत खालील बाबींचा विचार व्हावा, ही विनंती.

१. समाधी मंदिरामध्ये पुर्वीपासुन ५३ फोटो आहेत. नवीन ४-५ फोटो लावणेपुरती जागा उपलब्ध आहे. त्यामुळे नवीन फोटो तेथे लावण्यात येऊ नये. अन्यथा कोणाचा लावावा कोणाचा नाही याबाबत वाद निर्माण होऊ शकतो.

२. वरील नमूद केलेल्या काही व्यक्तींचाच श्रीसाईसच्चरितामध्ये उल्लेख अढळुन काहींचा नाही. तसेच काहींचा नाममात्र उल्लेख आहे. त्यामुळे याबाबत नेमके कोणाचे फोटो लावावेत व कोठे लावावेत याबाबत निर्णय होणेस विनंती.

३. बांधकाम विभागामार्फत नवीन आर्ट गॅलरी तयार करण्यात येणार आहे. त्यामध्ये श्रीसाईसच्चरितामध्ये उल्लेख असलेले सर्व साईभक्त/संत यांचा प्रसंगचित्रासह फोटो लावणेबाबत प्रस्तावित आहे. त्यावेळी उपरोक्त अर्जांचा विचार करता यईल.

४. समाधी मंदिरात जागा उपलब्ध नसल्यामुळे सदर संत/भक्त यांचे फोटो म्युझियम हॉलचे हॉलचे रिकाम्या जागेत लावता येतील. मात्र नवीन अर्जदार अर्ज करुन अशा प्रकारची मगणी करतील याचा विचार व्हावा.

तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे श्रीसाईबाबांचे समकालीन संत/भक्त यांचे फोटो लावणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रथमत: उपसमिती सभेसमोर म्युझियम हॉल येथील दर्शनीय भागात श्रींचे समकालीन साईभक्त /संत यांचे फोटो लावणेकामीची नियमावली तयार करणेत यावी व त्या नियमावलीनुसार श्रींचे समकालीन साईभक्त /संत यांचे फोटो लावणेकामीचा प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१** **मंदिर विभागाकरीता एक वर्षाकरीता आवश्यक असणारे अष्टगंध देणगी स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/ तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२२(३) नुसार सभेच्या सुरुवातीस झालेल्या चर्चेप्रमाणे साईभक्त हा केंद्रस्थानी माननेत येऊन, त्यासाठी संस्थानतर्फे साईभक्तांना आणखी सुविधा देण्यात याव्यात याब्वाबत चर्चा करणेत आली व चर्चेअंती श्रीपुण्यतिथी उत्सवाचे मुहुर्तावर यापुढे दर्शन रांगेमधील सर्व भक्तांचे श्रींचा गंध लावून स्वागत करणेत यावे असे ठरले आहे. त्यानुसार मंदिर विभागामार्फत कर्मचारी नेमुन सर्व साईभक्तांना गंध लावणेत येत आहे.

**प्रस्ताव-** अर्जदार साईभक्त श्री संभाजी शामसुंदर शहाणे, रा.शिर्डी यांनी दि.१०.०६.२०१७ चे अर्जान्वये श्रींचे दर्शनासाठी समाधी मंदिरात येणा-या साईभक्तांना दर्शनापुर्वी श्रींचा गंध लावतात त्यामुळे भक्तांमध्ये भक्तीमय वातावरणाचा अनुभव येत असल्याचे जाणवत आहे. त्यामुळे संस्थानला श्री.शहाणे यांनी एक वर्षाकरीता मंदिर विभागास आवश्यक असणारे अष्टगंध देणेबाबत इच्छा व्यक्त केली असून त्याबबतची परवानगी मागितली आहे. तरी सदर देणगी स्विकारणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**विभागाचे मत/ अभिप्राय-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२२(३) नुसार समाधी मंदिरामध्ये दर्शनासाठी येणारे साईभक्त व ग्रामस्थ यांना दैनंदिन गंध लावणेत येत आहे. त्याकरीता मंदिर विभागामार्फत वार्षिक खरेदीद्वारे अष्टगंध खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवुन दि.२३.०५.२०१७चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०१, निर्णय क्र.४१९(२२) नुसार सन-२०१७-१८ करीता अष्टगंध खरेदीकरणेकामी भवानी शंकर अष्टगंध(पिवळा) खरेदी करणेकामी मेसर्स.गंगवाल ए.एस, & कं.शिर्डी यांचे प्रती किलो दर रु.१५५/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देणेबाबत मान्यता प्राप्त झालेली असून पुरवठादार यांना पुरवठा आदेश देणेकामी प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. संस्थानमार्फत भवानी शंकर अष्टगंध (पिवळा) विहीत पद्धतीने खरेदी करणेकामीची प्रक्रीया पुर्ण झालेली असून पुरवठा आदेश देण्यात येणार आहे. देणगी स्विकारणेकामीची मान्यता मिळालेनंतर पासुन मंदिर विभागास पुरवठादार मेसर्स.गंगवाल ए.एस & कं., शिर्डी यांचेकडुन आवश्यक असणारे अष्टगंध खरेदी करणेचे ऐवजी सदर देणगीदार यांचेकडुन त्याच प्रतिचे अष्टगंध स्विकारणेकामी हरकत नाही, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे मंदिर विभागाकरीता आवश्यक असणारे भवानी शंकर अष्टगंध(पिवळा) श्री.संभाजी शामसुंदर शहाणे, रा.शिर्डी यांचेकडुन देणगीदाखल स्विकारणेकामी मान्यता असावी.

**निर्णय क्र.५६१ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री.संभाजी शामसुंदर शहाणे, रा.शिर्डी यांचेकडुन मंदिर विभागाकरीता आवश्यक असणारा भवानी शंकर अष्टगंध(पिवळा) देणगीदाखल स्विकारणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२ दि.०७ ऑगस्ट,२०१७ रोजी खग्रास चंद्रग्रहणामुळेशेजारती १५ मिनीटे अगोदर करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/ तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** संस्थानमार्फत समाधी मंदिर येथे विविध उत्सव, स्थानिक उत्सव, सण, महोत्सव असे कार्यक्रम साजरा करण्यात येतात. त्याचप्रमाणे दाते पंचांगानुसार शिर्डी येथे चंद्रग्रहण व सुर्यग्रहण दिसणार असल्यास पंचांगाचे तिथीनुसार व मार्गदर्शनाप्रमाणे ग्रहणाचे वेध पाळण्यात येत नाहीत, अशी पुर्वीपासुन प्रथा आहे.

**प्रस्ताव-** श्रावण शु.१५,शके १९३९, सोमवार, दि.०७ ऑगस्ट,२०१७ चे दिवशी खग्रास चंद्रग्रहण दिसणार असल्याने त्या दिवशी रात्रौ शेजारतीच्या वेळेत बदल करुन श्रींची शेजारती रात्रौ १०:३०चे ऐवजी **रात्रौ १०:१५ वा** करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय-** दाते पंचांगकर्ते, सोलापूर यांचे इसवी सन-२०१७-१८चे पंचांग पान.२४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्रावण शु.१५, सोमवार, दि.०७ ऑगस्ट,२०१७ चे दिवशी खग्रास चंद्रग्रहण दिलेले असून हे चंद्रग्रहण भारतातही दिसणार आहे. ग्रहणाची वेळ- स्पर्शः- रात्रौ २२:५२ मि., मध्यः- रात्रौ २३:५१ मि. आणि मोक्षः- रात्रौ २४:४९ मि. अशी नमूद केली आहे.

मंदिर पुजारी श्री.बाळासाहेब जोशी यांनी दि.२०/०६/२०१७ चे पत्रान्वये याबाबत असे लेखी कळविले आहे की, ग्रहण रात्रौ २२:५२ मि. सुरु होत आहे, श्रींची शेजारती दैनंदिन रात्रौ २२:३० वा सुरु होऊन २२:५०वा संपते, संस्थानचे प्रथेप्रमाणे ग्रहण स्पर्श व मोक्ष या कालावधीमध्ये नित्य कार्यक्रम आले तर त्या कार्यक्रमाचे वेळेमध्ये बदल करावा लागतो व ग्रहणकालामध्ये मंत्र पठण केले जाते. दि.०७/०८/२०१७ रोजी शेजारती जर रात्रौ २२:३० वा केली तर आरती होऊन उपस्थित साईभक्त दर्शन घेऊन बाहेर जाणे, मच्छरदानी लावणे व इतर कामे करण्याकरीता २० ते २५ मि लागतात व त्यावेळेत ग्रहण सुरु होते. ग्रहण काळात नित्याचे कार्यक्रम करण्याची प्रथा नाही. त्यामुळे शेजारतीचे वेळेत बदल करुन शेजारती रात्रौ २२:१५ वा सुरु करता येईल व ग्रहण सुरु होणेपुर्वी मंदिर बंद करता येईल. तसेच शेजारतीनंतर व काकड आरतीपुर्वी होणारे ग्रहणाचा विचार संस्थान प्रथेप्रमाणे करता येणार नाही.

यापुर्वीही ग्रहण कालावधीत श्रींचे आरती व दैनंदिन कार्यक्रमामध्ये बदल करण्यात आलेला आहेत. तरी दाते पंचांगानुसार व मंदिर पुजारी, श्री बाळासाहेब रा. जोशी यांचे लेखी पत्रानुसार दि०७ ऑगस्ट,२०१७ रोजी श्रींची शेजारती १५मिनीटे अगोदर करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, खग्रास चंद्रग्रहणामुळे दि.०७ ऑगस्ट,२०१७ रोजी शेजारती १५ मिनीटे अगोदर करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख/ माहिती तंत्रज्ञानप्रमुख/ जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.४३ संस्थानचे दक्षता पथक सदस्य व फायर विभाग कर्मचारी व संरक्षण कर्मचारी यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण यशदा, पुणे यांचेमार्फत देणेबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद–** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात समितीचे कर्तव्य व अधिकारी या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा अर्चा,

समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

**प्रस्ताविक–** श्री साईबाबांचे समाधीस सन २०१८ मध्ये शंभर वर्ष पुर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.३१ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत (विजयादशमी अखेर) श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. शताब्दी वर्षाचे कालावधीत श्रींचे दर्शनासाठी साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. कुंभमेळा २०१५ पुर्वी संस्थानचे दक्षता पथकातील सदस्यांना यशवंतराव चव्हाण विदया विकास प्रबोधीनी ( यशदा ) व एन.डी.आर.एफ पुणे यांचेमार्फत आपत्ती व्यवस्थापनाचे दक्षता पथकातील कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आलेले होते. त्यानुसार शताब्दी महोत्सवापुर्वी नव्याने यशदा, पुणे यांचे मार्फत संदर्भ क्र०४ नुसार दि.१९,२० व २१.०७.२०१७ रोजी ३० कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे बाबत प्रशासकिय मान्यतेनुसार प्राप्त झालेल्या पत्रानुसार किमान मर्यादा ३० कर्मचाऱ्यांसाठी यशदा नियमाप्रमाणे प्रतीदिन ३०×८००×३ दिवस = ७२,०००/- खर्च अपेक्षित आहे. प्रशिक्षणापुर्वी ६० टक्के रक्कम संस्थानमार्फत आर.टी.जी.एस.व्दारे यशदा संस्थेस अदा करणेबाबत पत्रात नमुद करणेत आलेले आहे. तसेच सदर प्रशिक्षणासाठी संस्थानचे फायर विभागाचे ३० व संरक्षण विभागाचे कायम व कंत्राटी कर्मचारी यांनाही प्रशिक्षणास विना मोबदला सामावून घेता येईल असे यशदा संस्थेचे डायरेक्टर श्री सुपनेकर सो. यांचेशी चर्चा झालेली आहे.

संदर्भ क्र.०४ चे पत्रासोबतचे वेळापत्रकानुसार दि.१९,२०.०७.२०१७ रोजी दक्षता पथकातील सदस्यांना प्रशिक्षण देता येईल तसेच दि.२१.०७.२०१७ रोजी फायर ॲण्ड सेफ्टी व संरक्षण विभागातील कायम व कंत्राटी कर्मचारी यांना प्रशिक्षण देता येईल असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय–** श्री साईबाबांचे समाधी शताब्दी वर्ष दि. ०१ ऑक्टोबर २०१७ ते ३१ ऑक्टोबर २०१८ कालावधीत शिर्डी श्रीचे दर्शनाकरीता येणा-या सर्व भाविकांचे दर्शन सुखकर व्हावे तसेच आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास साईभक्तांना तातडीने मदतकार्य करणेकामी नेमणूक केलेल्या दक्षता पथकातील सदस्यांना यशदा, पुणे यांचेमार्फत आपत्ती व्यवस्थापनाचे फेर प्रशिक्षण देता येईल.

दि.१९ ते २१.०७.२०१७ रोजी ३० कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे बाबत ३० कर्मचा-यांसाठी प्रतीदिन ३० कर्मचारी × ८०० रु. प्रतीकर्मचारी प्रतीदिन ×याप्रमाणे ३ दिवसांसाठी = ७२,०००/- याप्रमाणे खर्च अपेक्षित असून प्रशिक्षणापुर्वी ६० टक्के रक्कम संस्थानचे लेखाशाखा विभागामार्फत प्रशिक्षणापुर्वी आर.टी. जी.एस. व्दारे यशदा संस्थेस अदा करुन उर्वरीत रक्कम प्रशिक्षणानंतर अदा करता येईल. तसेच संस्थानचे फायर विभाग व संरक्षण विभागातील कायम व कंत्राटी कर्मचारी यांना दि.२१.०७.२०१७ रोजी एक दिवस सदरचे प्रशिक्षण देता येईल असे नम्र मत आहे.

**करीता...**

अ. संस्थानचे दक्षता पथकातील सदस्य, फायर विभाग व संरक्षण विभागाचे कायम व कंत्राटी कर्मचारी यांना यशदा, पुणे यांचे मार्फत आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणेकामी परीपत्रकाव्दारे कळविणेस तसेच प्रशिक्षणासाठी इतर आवश्यक सुविधा पुरविणेबाबत संबंधीत विभागांना परिपत्रकाव्दारे कळविणेस मान्यता असावी.

ब. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणासाठीची रु.७२,०००/- रकमेपैकी ६० टक्के रक्कम प्रशिक्षणापुर्वी तसेच उर्वरीत रक्कम प्रशिक्षण झालेनंतर अदा करणेबाबत संस्थानचे लेखाशाखा विभागास कळविणेस मान्यता असावी.

क. यशदा, पुणे यांचे मार्फत आयोजित प्रशिक्षणाकामी येणा-या रु.७२,०००/- खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त **अ**,**ब** आणी **क** बाबत सदरचा विषय मा.व्य.समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दक्षता पथक सदस्य व फायर विभाग कर्मचारी व संरक्षण कर्मचारी यांना यशदा, पुणे यांचेमार्फत आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभाग)

---

**विषय नं.४४** **मंदिर परिसर, दर्शनरांग व साईबाबा भक्तनिवासस्थान येथील साफसफाईसाठी मशिनरी खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधिल तरतूद -** अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम (१) च्या खंड (ग) अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिर प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडणेसाठी सोयी व सुविधा पुरविणे अशी तरतूद आहे.

**प्रास्ताविक-** आरोग्य विभागामार्फत संस्थान इमारती आणि परिसरातील साफसफाई केली जाते. साफसफाईचे कामासाठी स्वच्छता साहित्याची नेहमीच गरज असते सध्या मंदिर परिसरातील साफसफाईचे काम कर्मचा-यांमार्फत केले जात आहे. पुर्वीपेक्षा सध्या भक्तांच्या गर्दीचे प्रमाण जास्त आहे. दररोज सुमारे ४० ते ५० हजार साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येत आहेत सुटीचे दिवशी या संख्येत आणखी वाढ होते. मंदिर परिसरात फुलांच्या पाकळया, झाडांची पाने पडत असतात तसेच मा.त्रिसदस्य समितीने साईभक्तांसाठी दर्शनानंतर मोफत बुंदी प्रसाद वाटप सुरु केलेले आहे. त्यामुळे मंदिर परिसारत फरशीवर बुंदी सांडून फरशी चिकट होत आहे ती स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे. दर्शन रांगेत साईभक्तांना मोफत चहा-बिस्किटे वाटप करण्यात येत आहेत सदर ठिकाणची फरशी संगमरवरी असल्याने ती चिकट होत आहे त्यामुळे स्वच्छता करताना वेळ लागतो तसेच स्वच्छता व्यवस्थित करता येत नाही. याबाबत मा. अध्यक्ष महोदय यांनी राऊंड घेतेवेळी सुचना दिलेल्या आहेत. साईभक्तांना उच्च दर्जाची सेवा देणे आवश्यक आहे. तसेच मा. प्रधानमंत्री भारत सरकार यांनी सर्व देशवाशियांना स्वच्छ भारत अभियानात सक्रीय सहभागी होणेबाबत निवेदन केले आहे. मशिनरीमुळे वेळ व मनुष्यबळ यामधे बचत होईल व स्वच्छताही चांगली राहील. या सर्व बाबींचा विचार करुन साईभक्तांना उच्च दर्जाची सेवा देणेकरिता मंदिर परिसर आतील व बाहेरील बाजु, दर्शनरांग तसेच ५०० रुम साफसफाईसाठी खालील मशिनरी खरेदी करणेकामी मा. व्यवस्थापन समितीपुढे विषय सादर करण्यास मान्यता मिळणेसाठी दि. २२/११/२०१६ रोजी टिपणी सादर करण्यात आली.

**अ) मंदिर परिसर (आतील व बाहेरील बाजु)**

| अ.नं. | तपशील | संख्या | कंपनीचे नाव | किंमत प्रति नग | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | Swingo-2100 ऑटोमॅटिक स्क्रबर ड्रायर | १ नग | Taski | १११५९६७/- | १११५९६७/- |
| २ | Rider 1201 with Honda engine 6.5hp petrol | १ नग | Taski | १५५९०७६/- | १५५९०७६/- |
| ३ | Ergodisc -165 सिंगल डिस्क स्क्रबर | १ नग | Taski | १७९०३०/- | १७९०३०/- |
| ४ | Vacumat-22 (वेट व्हॅक्युम क्लिनर) | १ नग | Taski | ५८५८५/- | ५८५८५/- |
| | | | | **एकुण-** | **२९१२६५८/-** |

**ब) दर्शन रांग-**

| अ.नं. | तपशील | संख्या | कंपनीचे नाव | किंमत प्रति नग | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | Swingo-350 स्मॉल ऑटो स्क्रबर | १ नग | ३५० Taski | २६९७५५/- | २६९७५५/- |
| २ | Swingo-455 E ऑटो स्क्रबर ड्रायर | २ नग | ४५५ Taski | ३३८६३६/- | ६७७२७२/- |
| | | | | **एकुण-** | **९४७०२७/-** |

**क) ५०० रुम (श्री साईबाबा भक्त निवासस्थान)**

| अ.नं. | तपशील | संख्या | कंपनीचे नाव | किंमत प्रति नग | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | Swingo-350 स्मॉल ऑटो स्क्रबर | १ नग | ३५० Taski | २६९७५५/- | २६९७५५/- |
| २ | Ergodisc -165 सिंगल डिस्क स्क्रबर | १ नग | Taski | १७९०३०/- | १७९०३०/- |
| ३ | Vacumat-22 (वेट ॲण्ड ड्राय क्लिनर) | २ नग | Taski | ६५९५६/- | १३१९१२/- |
| ४ | Swingo-455 E ऑटो स्क्रबर ड्रायर | २ नग | ४५५ Taski | ३३८६३६/- | ६७७२७२/- |
| | | | | **एकुण-** | **१२५७९६९/-** |

**एकुण अंदाजे खर्च अ) २९,१२,६५८/- + ब) ९,४७,०२७/- + क) १२,५७,९६९/- = रु. ५१,१७,६५४/-**

उपरोक्त मशिनरीसाठी रुपये ५१,१७,६५४ + केमिकल्स खरेदीकामी रु. २२०००/- असे एकुण अंदाजे रु.५१,३९,६५४/- (अक्षरी रुपये एकावन्न लाख एकोणचाळीस हजार सहाशे चोपन्न मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त १३ मशिनरी ई-निवीदा पध्दतीने खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रु. ५१,३९,६५४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेपुढे विषय नं. १९ ने सादर करण्यात आला. त्यावर निर्णय क्र. ९२३ नुसार प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अद्यावत मशिनरी खरेदी करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

सदर मशिनरीची खरेदी ही तांत्रिक स्वरुपाची असल्याने मॅकेनिकल विभागाचे मार्गदर्शनाने खरेदी विभागामार्फत ई-निविदा पध्दतीने खरेदीची पुढील कार्यवाही करणेकामी खरेदी विभागास दि. ०३/०१/२०१७ रोजीचे पत्राने आवश्यक कागदपत्रासह खरेदीचा प्रस्ताव खरेदी विभागाकडे पाठविण्यात आलेला होता.

खरेदी विभागाने उपरोक्त मशिनरीबाबत मॅकेनिकल विभागाचा अभिप्राय घेतला. दि. ०३/०२/२०१७ रोजी मॅकेनिकल विभागाने ई-निविदा अटी व शर्ती बाबत खरेदी विभागास कळविलेले असून सदर अभिप्राय नुसार प्रस्तावातील मशिनरी खरेदी करताना Swingo-350 E या मशीनची व्हॅक्युम मोटार लहान असलेने तिची सक्शन क्षमता कमी आहे. तसेच मशीनला खालील बाजूने लावणेत आलेले वायफर ब्लेड लवकर खराब/डॅमेज होते एकंदरीत मशीनचा मेंटनन्स अधिक असल्याने Swingo-350 E ही मशीन खरेदी करु नये त्याऐवजी Swingo-455 E या मॉडेलचे ४ ऐवजी ५ नग खरेदी करावेत तसेच या व्यतिरिक्त उर्वरीत मशिनरी खरेदी करणेस हरकत नाही असे कळविले आहे.

त्यास अनुसरुन सदर प्रस्तावातील एकुण १३ मशिनरी पैकी Swingo-350 E (नग २) ही मशिन मॅकेनिकल विभागाने खरेदी करु नये परंतू उर्वरीत मशिनरी खरेदी करणेस हरकत नाही असे कळविले नुसार सध्या उर्वरित ११ मशिनन्स खरेदी करता येतील, मा. व्यवस्थापन समितीने रु. ५१,३९,६५४/- मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे. Swingo-350 E या दोन मशिन खरेदी न केल्यास मुळ मंजूर रकमेतून अंदाजे रु २६९७५५ X २ नग = रु. ५३९५१०/- इतका कमी खर्च होणार आहे. त्यामुळे उर्वरीत ११ मशिनरी मॅकेनिकल विभागाने कळविलेल्या अटी व शर्ती प्रमाणे खरेदी करणेस इकडील दि. १०/०३/२०१७ रोजीचे मा.का.अ.सो. यांचे मान्यतेने खरेदी विभागास पाठविण्यात आलेले आहे.

खरेदी विभागाने दि .३१/०३/२०१७ रोजी सदरचा प्रस्ताव (जाहिरात, ई-निविदा अटी शर्ती BOQ सह) मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचे मान्यतेसाठी सादर केला असता त्यावर मा. वरिष्ठांचे सुचनेनुसार एकाच कंपनीचे Specifications आहेत Common Specifications टाकुन सदर विषय मा. व्यवस्थापन समिती समोर सादर करावा व किमान ३ ब्रॅंड नमुद करावेत असे निर्देश झालेले आहेत. त्यासअनुसरुन सदर विषय मा. व्यवस्थापन समिती समोर फेर सादर करावा लागेल..

**मागणी-** आरोग्य विभागाचे प्रस्तावात एकच ब्रॅंड नमुद करण्यात आला होता खरेदी विभागाचे दि.३१/०३/२०१७ रोजीचे जाहिरात, ई-निविदा अटी शर्ती BOQ सह प्रस्तावावरील दि. २०/०४/२०१७ चे निर्देशास अनुसरुन प्रस्तावातील मशिनरी आणखी कोणत्या कंपनीकडे मिळतील या विषयीची सविस्तर माहिती घेतली असता 1) Cleanfix, 2) Tennant 3) Taski 4) NSS 5) Karcher या कंपन्या बाजारात उपलब्ध आहेत. मात्र या सर्व कंपन्यांचे टेक्नीकल स्पेशिफिकेशन सारखे नसून वेगवेगळे आहेत. खरेदी विभागाचे प्रस्तावावरील निर्देशास अनुसरुन प्रस्तावातील मशिनरीच्या बाजारात अनेक ब्रॅंड आहेत परंतू त्यांचे Specifications Common नसून वेगवेगळे आहेत. त्यामुळे बाजारात उपलब्ध असलेल्या मशिनरीच्या कंपनीचे ब्रॅंड नमुद करता येतील, असे मत आहे.

**अ) मंदिर परिसर (आतील व बाहेरील बाजु)**

| अ.नं. | तपशील | संख्या | कंपनीचे नाव | किंमत प्रति नग | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑटोमॅटिक स्क्रबर ड्रायर (मंदिर परिसर आतील बाजू साफसफाईसाठी) | १ नग | Cleanfix, Tennant, Taski, NSS, Karcher | ११९५९६७/- | ११९५९६७/- |
| २ | Rideon Sweeper (मंदिर परिसर, पिंपळवाडी रोड, १६ गुंठे, व्दारकामाई रोड ते ४ नं. गेट बाहेरील बाजू साफ सफाईसाठी ) | १ नग | Cleanfix, Tennant, Taski, NSS, Karcher | १५५९०७६/- | १५५९०७६/- |
| ३ | सिंगल डिस्क स्क्रबर (मंदिर सभामंडप व परिसरातील मार्बल साफ करणेसाठी) | १ नग | Cleanfix, Tennant, Taski, NSS, Karcher | १७९०३०/- | १७९०३०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | Vacuum Cleaner (वेट व्हॅक्युम क्लिनर) (मंदिर परिसर, शांती निवास, भक्त निवास हॉल्सचे टॉयलेट ब्लॉक्स व कुलर येथील सफाई करणेसाठी) | १ नग | Cleanfix, Tennant, Taski, NSS, Karcher | ५८५८५/- | ५८५८५/- |
| | | | | **एकुण-** | **२९१२६५८/-** |

**ब) दर्शन रांग**

| अ.नं. | तपशील | संख्या | कंपनीचे नाव | किंमत प्रति नग | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | ऑटो स्क्रबर ड्रायर (शांती व भक्त निवास दर्शन हॉल व लाईनमधील पॅसेज साफसफाईसाठी ) | २ नग | Cleanfix, Tennant , Taski , NSS, Karcher | ३३८६३६/- | ६७७२७२/- |
| | | | | **एकुण-** | **६७७२७२/-** |

**क) ५०० रुम (श्री साईबाबा भक्त निवासस्थान)**

| अ.नं. | तपशील | संख्या | कंपनीचे नाव | किंमत प्रति नग | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिंगल डिस्क स्क्रबर (सा.भ.नि. येथील वेटींग हॉलमधील मार्बल साफ करणेसाठी) | १ नग | Cleanfix, Tennant, Taski, NSS, Karcher | १७९०३०/- | १७९०३०/- |
| २ | Vacuum Cleaner (वेट ॲण्ड ड्राय क्लिनर) (सा.भ.नि. येथील टॉयलेट ब्लॉक्स व कुलरचा परिसर साफ करुन कोरडा करणेसाठी ) | २ नग | Cleanfix, Tennant, Taski, NSS, Karcher | ६५९५६/- | १३१९१२/- |
| ३ | ऑटो स्क्रबर ड्रायर ( सा.भ.नि. आतील परिसरासाठी) | २ नग | Cleanfix, Tennant, Taski, NSS, Karcher | ३३८६३६/- | ६७७२७२/- |
| | | | | **एकुण-** | **९८८२१४/-** |

**एकुण अंदाजे खर्च अ) २९,१२,६५८/- + ब) ६,७७,२७२/- + क) ९,८८,२१४/- = रु. ४५,७८,१४४/-**

उपरोक्त मशिनरीसाठी खालील प्रकारचे केमिकल मागणी करावी लागेल. त्यामुळे मंदिर परिसरातील चिकट डाग तसेच लेंडीबागेतील तेलकट भाग स्वच्छ करण्यास उपयोगी होईल. तसेच जनरल टॉयलेट येथे दुर्गंधीनाशक म्हणुन वापरता येईल. सदरचे केमिकल सहा महिने प्रायोगिक तत्वावर वापरता येईल.

**केमिकलसाठी येणारा खर्च -**

| अ.नं. | तपशील | लिटर | किंमत प्रति लिटर | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | सर्व प्रकारचे डाग काढण्यासाठीचे लिक्विड | ५० लिटर | ७५/- | ३७५०/- |
| २ | तेलकट डाग काढण्यासाठीचे लिक्वीड | ५० लिटर | ७५/- | ३७५०/- |
| ३ | Toilet cleaner – | ५० लिटर | १२०/- | ६०००/- |
| ४ | दुर्गंधीनाशक लिक्विड | २० लिटर | ४२५/- | ८५००/- |
| | | | **एकुण-** | **२२,०००/-** |

**विभागाचा अभिप्राय –** मंदिर परिसरातील साफसफाईचे कामासाठी उपरोक्त प्रमाणे मशिनरीची खरेदी करणे आवश्यक व मागणीतील केमिकल वापरामुळे स्वच्छता करण्यास मदत होणार आहे. सदर मशिनरीची खरेदी ही तांत्रिक स्वरुपाची असल्याने मॅकेनिकल विभागाचे अभिप्राय नुसार प्रस्तावातील १३ पैकी Swingo-350 E २ नग वजा जाता उर्वरित ११ मशिनरी खरेदीची कार्यवाही खरेदी विभागामार्फत ई-निविदा पध्दतीने करावी लागेल. सदरची मशिनरी खरेदी केल्यानंतर मशिनरीचा वापर करण्यासाठी या विभागाकडील किमान ४० कर्मचा-यांना पुरवठाधारकाकडून मोफत प्रशिक्षण द्यावे लागेल. उपरोक्त मशिनरी व केमिकल्स खरेदीकामी अंदाजे ५१,३९,६५४/- (अक्षरी रुपये एकावन्न लाख एकोणचाळीस हजार सहाशे चोपन्न मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर मशिनरी खरेदीकामी सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात बजेट तरतूद करण्यात आली आहे.

अ) प्रस्तावित केलेनुसार एकाच ब्रॅंड ऐवजी 1) Cleanfix, 2) Tennant 3) Taski 4) NSS 5) Karcher या ५ (ब्रॅंड) कंपन्याचा समावेश करणेस

ब) मॅकेनिकल विभागाचे अभिप्राय नुसार प्रस्तावातील १३ पैकी Swingo-350 E मशिनरी २ नग वजा जाता उर्वरित ११ मशिनरी व केमिकल्स खरेदी करणेस

क) सदरची खरेदी ई-निविदा पध्दतीने खरेदी विभागामार्फत होणेस व खर्चास मान्यता मिळणेस

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसर, दर्शनरांग व साईबाबा भक्तनिवासस्थान येथील साफसफाईसाठी मशिनरी खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी अशीही चर्चा झाली की, आरतीपुर्वी श्रींचे समाधी मंदिराची साफ-सफाई करणेसाठी बराच वेळ जातो. हा वेळ कमी करणेसाठी नवीन अत्याधुनीक मशिनरी खरेदी करणेत याव्यात व सदरहू मशिनरींची खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत या मशिनरी भाडेतत्वावर घेण्याची कार्यवाही सुरु करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग/ मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.४५** **संस्थान वाहनांकरीता आवश्यकतेनुसार बॅटऱ्या खरेदी करणेस, वार्षिक दर निश्चित करणेकामी फेर दरपत्रके मागविणे.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुद:-** अधिनियम कलम १७ (१) मध्ये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील." असे नमुद केलेले आहे.

**प्रस्तवाना:-** संस्थान वाहनांकरीता एक वर्ष कालावधीसाठी संस्थान वाहनांकरीता आवश्यकतेनुसार बॅटरीज पुरविणे कामी वार्षिक दर निश्चित करणे करीता जा.नं.एसएसएस/वशी/वाहन/६४०४/२०१७ दि.१२.०३.२०१७ रोजीचे पत्राने परिसरातील एक्साईड, एस.एफ. सोनीक, ॲमरॉन, प्रेस्ट्रोलाईन, पॅनासोनिक व टाटा या नामांकित कंपनीचे ०६ अधिकृत पुरवठादारांकडून जुनी बॅटरी परत (By Back) घेवुन तीची किंमत वजा करुन नवीन बॅटरी देणे बाबत दरपत्रके मागविण्यात आली होती.

त्यानुसार, मुदतीत प्राप्त झालेली ०४ दरपत्रके दि.०३.०४.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेली होती. सदर दरपत्रकात देवु केलेल्या दरांचा तुल्नात्मक तक्त्यातील ठळक अक्षरात नुमद केलेल्या निम्नतम दरधारकास कार्यादेश देणे कामी सदरचा प्रस्ताव दि.२५.०४.२०१७ रोजीचे मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणे कामी सादर करण्यात आला होता. त्यानुसार दि.२८.०४.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३२२ (१२) नुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार, संस्थान वाहनांकरीता पुढील एक वर्ष कालावधीसाठी संस्थान वाहनांकरीता आवश्यकतेनुसार बॅटरीज पुरविणे कामी निम्नतम दरधारक साई ॲटो बॅटरी सर्व्हिस, शिर्डी व वर्धमान टायर्स, श्रीरामपुर यांना जा.नं.एसएसएस/वाहन/७१२ व ७१३ दि.०९/०५/२०१७ चे पत्राने कार्यादेश देण्यात आलेला आहे. तथापि, अद्यापपर्यंत संस्थानच्या कोणत्याही वाहनाची बॅटरी खराब न झाल्याने बॅटरी खरेदी करण्यात आलेली नाही.

दि.०१ जुलै, २०१७ पासुन GST Tax लागु होणार असलेने यात बॅटरी करीताचे GST Tax मध्ये वाढ झाल्यास पुरवठादार जुन्या दरात बॅटरीचा पुरवठा करणार नाहीत तसेच टॅक्स कमी झाल्यास संस्थानचे आर्थिक नुकसान होईल. याकरीता दि.२८.०४.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३२२ (१२) निरस्त करुन व पुरवठाधारकांना देण्यात आलेला कार्यादेश रद्द करावा लागेल. तसेच परिसरातील पुरवठादारांकडून GST Tax सह जुनी बॅटरी परत (By Back) घेवुन नवीन बॅटरीचे फेर दरपत्रके मागवावे लागतील.

**मागणी:-** तरी संस्थान वाहनांकरीता पुढील एक वर्षा करीता आवश्यकतेनुसार बॅटरी पुरविणे कामी या करीता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेला निर्णय व कार्यादेश रद्द करुनपुढील एक वर्षाकरीता वार्षिक दर निश्चित करणेसाठी एक्साईड, एस.एफ. सोनीक, ॲमरॉन, प्रेस्ट्रोलाईन, पॅनासोनिक व टाटा या नामांकित कंपनीचे

अधिकृत पुरवठादारांकडून GST व इतर Tax सह, जुनी बॅटरी परत (By Back) घेवुन तीची किंमत वजा करुन नवीन बॅटरी खरेदीचे फेर दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वाहनांकरीता आवश्यकतेनुसार बॅटऱ्या खरेदी करणेकामी वार्षिक दर निश्चित करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.४६** **संस्थानचे ५ प्रवासी बसेस वाहनांकरीता नवीन १४ टायर्स खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुदः-** अधिनियम कलम १७ (१) मध्ये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील." असे नमुद केलेले आहे.

**प्रस्तावना:-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील प्रमाणे अ.नं. ०१ ते ०३ या तिन प्रवासी बसचा वापर साई आश्रम व श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना मंदिर परिसर व प्रसादालय येथे ने-आण करणे कामी होत आहे. तसेच अ.नं. ०४ ते ०५ या दोन प्रवासी बसचा वापर नगरसुल रेल्वेस्टेशन येथे येणा-या साईभक्तांना ने-आण करणे कामी होत आहे. सदर पाच प्रवासी बस वाहनांचे सध्याचे टायर्सची सततच्या वापराने झिज होऊन खराब झाल्याने त्यांना नवीन टायर्स (टयुब+ फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे.सध्याचे टायर नवीन टायर खरेदी प्रक्रीया पुर्ण होई पर्यंत चालु शकतील.

| अ. नं. | वाहन क्र. | वाहन कंपनी | सध्याचे टायर वापर | टायर साईज | टायरची कंपनी | आवश्यक टायर संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | MH-17-T-3301 | टाटा प्रवासी बस | 38,250 | 10:00:20 | MRF SML-99 (टयुब+ फ्लॅपसह) | 02 |
| 02 | MH-17-T-3302 | टाटा प्रवासी बस | 39,200 | 10:00:20 | | 02 |
| 03 | MH-17-T-8504 | टाटा प्रवासी बस | 40,100 | 10:00:20 | | 02 |
| 04 | MH-17-T-7109 | टाटा प्रवासी बस | 30,540 | 10:00:20 | | 04 |
| 05 | MH-17-T-7110 | टाटा प्रवासी बस | 31,120 | 10:00:20 | | 04 |
| | | | | | **एकुण टायर्स संख्या** | **14** |

**विभागाचा अभिप्राय:-** उपरोक्त प्रवासी बस वाहनास नवीन टायर्स बसविलेनंतर सर्व साधारणपणे अंदाजे ४० ते ५० हजार कि.मी. प्रवास होऊ शकतो. टायर रिमोल्डींग केलेनंतर २५ ते ३० हजार कि.मी.प्रवास होवु शकतो. यामध्ये टायर मधील हवेचा दाब, रस्त्याची स्थिती, ड्रायव्हर कौशल्य इ. गोष्टीमुळे रिमोल्डींग टायर्सचे लाईफ थोडे फार कमी अथवा अधिक होवु शकते. वाहनाचे पुढील बाजुस नवीन व मागील बाजुस शक्यतो रिमोल्डींग केलेले टायर वापरण्यात येतात.

उपरोक्त प्रमाणे ५ प्रवासी बस वाहनांकरीता वरील प्रमाणे एकुण नवीन १४ टायर खरेदी करणे आवश्यक आहे. याकामी सध्याचे मार्केटमधील दरानुसार अंदाजे रु२,१०,०००/- (अक्षरी दोन लाख दहा हजार) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च मोटारकार दुरुस्ती देखभाल या अंदाजपत्रकीय रक्कमेतुन करता येईल.

या कामी MRF कंपनीची गुणवत्ता चांगली असुन सदर कंपनीचे टायर अधिक वेळा रिमोल्डींग करुन वापरता येवु शकतात. त्यामुळे सदर बसेस करीता MRF कंपनीचे SML-99 (उभी नक्षी) या प्रकाराचे टायर्स परिसरातील पुरवठादार यांचेकडून दरपत्रके मागवुन खरेदी करता येतील.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** सदर बाब आर्थिक आहे.

**मागणी:-** तरी संस्थानचे ५ प्रवासी बसेस करीता नवीन १४ टायर्स खरेदी करणे कामी परिसरातील MRF कंपनीचे पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणेस व या कामी येणाऱ्या रु.२,१०,०००/- (अक्षरी रु. दोन लाख दहा हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील प्रस्तावित ०५ प्रवासी बसेसकरीता १४ टायर्स खरेदी करणेकामी MRF कंपनीचे अधिकृत पुरवठाधारकांकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.४७** **पाच प्रवासी बसेस खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास व ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४** मधील १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिनराहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमतेची व कामाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पुजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणेसाठी आणि पार पाडणेसाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगंणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कार्तव्ये असतील." असे नमुद केलेले आहे.

**प्रस्तावनाः- अ)** दि.१९/०९/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतीलविषय नं.११,निर्णय नं.६४८ अन्वये, संस्थानचे वाहन विभागाकडे उपलब्ध असलेली कार्यालयीन-६, रुग्णवाहीका-५, मालवाहतुक-३, प्रवासीबस-४, स्कुलबस-१ व दुचाकी-५ अशी एकुण २४ वाहने बरीच जुनी असल्यामुळे व त्यांचा वापर अधिक झालेने त्यांचे देखभाल दुरुस्ती वरील खर्च मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच वाहनांचे बॉडीचा पत्रा गंज पकडुन वाहने खराब होत असल्याने सदर वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पत्र क्र.सासंवि-२०१७/२५/ प्र.क्र.२८/ का.१६ दि.१३.०४.२०१७ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या मालकीची जुन्या २४ वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर केला होता.

त्यास अनुसरुन कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पत्र क्र. सासंवि-२०१७/ २५/प्र.क.२८/का.१६,दि.२२.०३.२०१७ अन्वये,खालील प्रमाणे २ प्रवासी बसेस वाहनांची जाहिर लिलावाने विक्री करण्यास व विक्री न झाल्यास निरुपयोगी ठरविण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.नं. | वाहन क्र. | वाहन प्रकार |
|---|---|---|
| १. | MH-17-T-7109 | प्रवासी बस |
| २. | MH-17-T-7110 | प्रवासी बस |

साईभक्तांची गैरसोय होऊ नये या करीता सदर बसेसच्या लिलावा पुर्वी २ प्रवासी बसेस खरेदी करणे आवश्यक आहे.

**ब)** श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीत शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेव संपुर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येणार आहे.

सध्या उपलब्ध असलेल्या प्रवासीबसेस जुन्या झाल्या असुन सदर शताब्दी वर्ष कालावधीत साईभक्तांना सोयी सुविधा देणे करीता ५४+२ आसन क्षमतेच्या ३ प्रवासी बसेस खरेदी करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त अ व ब प्रमाणे एकुण ५ प्रवासी बसेस खरेदी कराव्या लागतील. याकामी खालील प्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.**

१) **बसेस खरेदी खर्च-** नवीन ५ बसेस (५४+२ सिटर) खरेदी करणे आवश्यक आहे. सदर कामी प्रति बस अंदाजे रु.२३,५०,०००/- प्रमाणे एकुण बसेस करीता रु.१,१७,५०,०००/- इतका खर्च येईल.

२) **कर्मचारी वेतन खर्च-**प्रति बसकरीता ०१ वाहन चालक व ०१ मतदनीस या प्रमाणे एकुण ५बसेस करीता ५ वाहन चालक व ५मदतनीस कर्मचारी उपलब्ध करुन द्यावे लागतील, त्यानुसार या सेवेसाठी ०१ कंत्राटी वाहन चालकाचे प्रति महा वेतन रु.१३,५००/- व कंत्राटीमदतनीस कर्मचारी प्रतिमहा वेतन रु.१०,०००/- प्रमाणे ५ बसेस करीता प्रतिमहा रु.१,१७,५००/- प्रमाणे रु.१४,१०,०००/- इतका वार्षिक वेतन खर्च अपेक्षीत आहे.

३) **इंधन खर्च-**नगरसुल प्रति बस ९० कि.मी. प्रमाणे २ बसेस करीता प्रति दिन अंदाजे १८०कि.मी. व भक्तनिवास स्थानकडील प्रति बस ४० कि.मी. प्रमाणे ३ बसेस करीता १२० कि.मी. असे ५ बसेस करीता एकुण ३०० कि.मी. प्रती दिन अंतराकरीता ४ कि.मी. प्रती लिटर प्रमाणे ७५ लिटर डिझेल Xअंदाजे रु.६२/- प्रति लिटरप्रमाणे रु.४,६५०/- प्रति दिवस याप्रमाणे वार्षिक (३६५ दिवस) अंदाजे रु.१६,९७,२५०/- मात्र इंधन खर्च अपेक्षीत आहे.

४) **दुरुस्ती व देखभाल खर्च-**५बसेसचे दुरुस्ती व देखभाल खर्च प्रति बस रु.५०,०००/- प्रमाणे रु.२,५०,०००/- खर्च अपेक्षीत आहे.

५) **विमा खर्च-**सर्व बसेसची किंमत व प्रवासीसंख्या (५४+२) नुसार विमा करणे करीता अंदाजे प्रति बस फी रु.९०,०००/- X ५ बसेस प्रमाणे रु.४,५०,०००/- प्रति वर्ष खर्च येतील.

६) **RTO टॅक्स खर्च-** RTO कार्यालयाचे प्रचलित नियमानुसार, टॅक्ससाठी प्रति सिट रु.१९००/- प्रमाणे X ५४ सिट करीता रु.१,०२,६००/- प्रति बस प्रमाणे ५ बसेस करीता एकुण रक्कम रु.५,१३,०००/- खर्च येईल.

| अ.नं. | तपशिल | भांडवली खर्च (रु.) | अंदाजे वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | नवीन ५ बसेस खरेदी खर्च-<br>(अंदाजे प्रतिबस रु.२३,५०,०००/- प्रमाणे) | १,१७,५०,०००.०० | २३,५०,०००.००<br>(२०% घसारा) |
| ०२ | कर्मचारी वेतन खर्च (वार्षिक) | --- | १४,१०,०००.०० |
| ०३ | इंधन खर्च (वार्षिक) | --- | १६,९७,२५०.०० |
| ०४ | दुरुस्ती व देखभाल खर्च (वार्षिक) | --- | २,५०,०००.०० |
| ०५ | विमा खर्च(वार्षिक) | --- | ४,५०,०००.०० |
| ०६ | RTO टॅक्स खर्च(वार्षिक) | --- | ५,१३,०००.०० |
| | **एकुण अंदाजे खर्च** | **१,१७,५०,०००.००** | **६६,७०,२५०.००** |

तरी उपरोक्त तपशिला प्रमाणे पाच बस खरेदी करीता येणारे अंदाजे रु.१,१७,५०,०००/- व इतर अनुषंगिक वार्षिक खर्च अंदाजे रु.६६,७०,२५०/- येणार आहे. GST मुळे सदर खर्चात बदल होऊ शकतो.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकः-भांखस-२०१४/ प्र.क्र.८२ भाग III/ उद्योग-४ दिनांक १/१२/२०१६ सुधारित नियमपुस्तिके मध्ये ३.२.३. मध्ये,"कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे, मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/ वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु. एककोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी.

**विभागाचा अभिप्राय:-** उपरोक्त प्रमाणे पाच प्रवासी बसेस नामांकित कंपनीचे अधिकृत डिलर कडून ५४+२ सिटर असन क्षमता असलेल्या प्रवासी बसेस खरेदी कामी ई-निविदेद्वारे दरपत्रके मागवावी लागतील.

**मागणी:-** तरी उपरोक्त प्रमाणे पाच प्रवासी बसेस खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास व ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोयीसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पाच प्रवासी बसेस खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.४८** **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी बस सेवा सुरु करणेकामी नवीन पाच प्रवासी बसेस खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास व ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुद:-**

१) कलम १७ (१) मध्ये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व व कामाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील" असे नमुद केलेले आहे .

२) कलम १७ (२) (ढ) मध्ये, विशेषकरुन आणि पोट-कलम (१) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, समिती सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील,असे नमुद आहे.

**प्रस्तावना:-** दि.२८/०४/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३२६ नुसार, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी संस्थान मार्फत बससेवा उपलब्ध करुन देणेत यावी व यासाठी स्कुलबस खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा.

तसेच, कोणत्या गावांना स्कुलबस सुविधा पुरवावयाची व सदरहू स्कुलबसचे प्रवास शुल्क किती आकारावयाचे यावर सविस्तर चर्चा करणेसाठी स्थानिक उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले आहे.

दि.०८/०६/२०१७ रोजीचे मा.स्थानिक उपसमितीचे सभेतील विषय क्र.०१ नुसार व दि.१५/०६/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय निर्णय क्र.४९२ (२३) अन्वये, संस्थान संचलित श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी बससेवा सुरु करणेसाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या तक्ता क्र.३ प्रमाणे कार्यवाही करणेस, सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच बससेवेचा लाभ घेणा-या विद्यार्थीनींकडून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कार्यपध्दती व बस थांब्यानुसार तसेच प्रत्यक्ष होणा-या प्रवासानुसार प्रति कि.मी. रु.१/- मात्र प्रति दिन याप्रमाणे एकुण २३० शालेय दिवसांचे वार्षिक बस शुल्क आकारणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

यानुसार,**शिर्डी व नगर-मनमाड रस्त्यावरील गांवे** वगळुन इतर गावातील मुलींना बससेवा संस्थान मार्फत द्यावयाची असल्यास खालील प्रमाणे मार्ग/ बस थांबे करावे लागतील.

| अ.नं. | ठिकाण | जाणे+ येणे अंतर कि.मी. अंदाजे (आणणे +सोडणे) | संख्या | एकुण | प्रति कि.मी. रु.१/- नुसार जमा होणारी अंदाजित रक्कम (०३X०४X२३० शालेय दिवस ) | आवश्यक बस संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** | **०८** |
| ०१ | रुई | २१+२१=४२ | ३२ | ३६ | ३,०९,१२०/- | ०१ बस | कोहकी येथील मुलांना दत्त मंदीर स्टॉप येथे बोलवावे लागेल. |
| | कोहकी (दत्त मंदिर) | २३+२३=४६ | ०४ | | ४२,३२०/- | | |
| ०२ | पिंपळवाडी | १८+१८=३६ | ६० | ७२ | ५,९६,१६०/- | २ बसेस | नपावाडी+ पुणतांबा+ शिंगवे येथील मुलींना पिंपळवाडी येथे बोलवावे लागेल. |
| | शिंगवे-२+नपावाडी-८+ पुणतांबा-२ | | १२ | | | | |
| ०३ | नांदुर्खी बु. | २४+२४=४८ | २९ | ५२ | ३,२०,१६०/- | ०१ बस | काकडी येथील ०१ मुलगी को-हाळे येथे बोलवावे लागेल. |
| | नांदुर्खी खु. | २६+२६=५६ | १५ | | १,९३,२००/- | | |
| | को-हाळे-७ + काकडी-०१ | ३६+३६=७२ | ०८ | | १,३२,४८०/- | | |
| ०४ | डो-हाळे | २४+२४=४८ | ३६ | ५४ | ३,९७,४४०/- | ०१ बस | |
| | कनकुरी | १८+१८=३६ | १८ | | १,४९,०४०/- | | |
| | एकुण-२३८ कि.मी. | **एकुण** | **२१४** | **२१४** | **२१,३९,९२०/-** | **५ बस** | |

संस्थानमार्फत, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपरोक्त तक्तानुसार मुलींकरीता बससेवा उपलब्ध करुन देणे करीता खालील तपशिला प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | भांडवली खर्च (रु.) | अंदाजे वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | नवीन ५ बसेस खरेदी खर्च (अंदाजे प्रतिबस रु.२३,५०,०००/- प्रमाणे) | १,१७,५०,०००.०० | २३,५०,०००.०० (२०% घसारा) |
| ०२ | कर्मचारी वेतन खर्च (वार्षिक) | --- | १४,१०,०००.०० |
| ०३ | इंधन खर्च (वार्षिक) | --- | ८,५५,६००.०० |
| ०४ | दुरुस्ती व देखभाल खर्च (वार्षिक) | --- | २,५०,०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | विमा खर्च (वार्षिक) | --- | ४,३७,५००.०० |
| ०६ | RTO टॅक्स खर्च (वार्षिक) | --- | ५,१३,०००.०० |
| | **एकुण अंदाजे खर्च** | **१,१७,५०,०००.००** | **५८,१६,१००.००** |

तरी उपरोक्त तपशिला प्रमाणे पाच बस खरेदी करीता येणारे अंदाजे रु.१,१७,५०,०००/- व इतर अनुषंगिक वार्षिक खर्चा अंदाजे रु.५८,१६,१००/- येणार आहे. GST मुळे सदर खर्चात बदल होऊ शकतो.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकः-भांखस-२०१४/ प्र.क्र.८२ भाग III/ उद्योग-४ दिनांक ०१/१२/२०१६ सुधारित नियमपुस्तिकेतील ३.२.३ मध्ये, "कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे, मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/ वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु. एक कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निविदा प्रक्रियामार्फतच करण्यात यावी.

**विभागाचा अभिप्राय:-** उपरोक्त प्रमाणे पाच प्रवासी बसेस नामांकित कंपनीचे अधिकृत डिलर कडून ५४+१ सिटर असन क्षमता असलेल्या प्रवासी बसेस खरेदी कामी ई-निविदेद्वारे दरपत्रके मागवावी लागतील.

**मागणी:-** तरी उपरोक्त प्रमाणे पाच प्रवासी बसेस खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास व इ-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी बस सेवा सुरु करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पाच प्रवासी बसेस खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.४९** **वाहन विभागाकडील कंत्राटी वाहन चालकांना कायम वाहन चालकांप्रमाणे प्रवास भत्ता व अतिकालीन भत्ता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम १७ (१) मध्ये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्च, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

**प्रस्तावना:-** सध्या वाहन विभागात कायम-२९ व कंत्राटी-६८ असे एकुण-९७ वाहन चालक कार्यरत आहेत. सदर वाहन चालकांना वेळोवेळी कार्यालयीन, मालवाहतुक, व रुग्णवाहीका वाहने घेऊन संस्थानचे विविध कामाकरीता बाहेरगांवी पाठवावे लागते. कायम वाहन चालकांची संख्या अपुरी असलेने ब-याच वेळा कंत्राटी वाहन चालकांनाच बाहेरगांवी पाठवावे लागते काही वेळेस त्यांना दोन दिवस त्यापेक्षा अधिक कालावधीकरीता बाहेरगांवी जावे लागते. या प्रवासात वाहन चालकांच्या चहा, नाष्टा, जेवण इ. कामी प्रासंगिक खर्च होतो.

जा.नं.एसएसएस/वाहन/२१०६/२००० दि.३०/०६/२०००चे आदेशान्वये,वाहन विभागातील कंत्राटी वाहन चालकांना दि.०१.०७.२००० पासुन प्रवास भत्ता दर प्रति दिवसासरु.४५/- प्रवास वमुक्कामाकरीता एकच दर राहील. जो कर्मचारी नगर-नाशिक अंदाजे ८० कि.मी. एका बाजुचा प्रवास किंवा त्यापेक्षा अधिक प्रवास करील त्यांनाच सदरचा भत्ता देण्यात येईल. यापेक्षा कमी अंतराचे प्रवासा करीता भत्ता मिळणार नाही, असे आदेशीत करण्यात आलेले आहे.

दि.२४/०९/२००५ व दि.०७/०१/२००६ चे मंजुर टिपणीनुसार,संस्थानमार्फत नगरसुल रेल्वेस्टेशन येथे साईभक्तांचे जाणे व येणेसाठी प्रवासी बससेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली असुन या बसवर डयुटीस असलेल्या कंत्राटी कुशल व अकुशल कामगार यांना प्रति दिन रु४५/- प्रमाणे दि.०६/०८/२००५ पासुन प्रवास भत्ता देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-०१/४२६०/२०११ दि.२०/१२/२०११ रोजीचे आदेशानुसार,संस्थान कामासाठी बाहेरगांवी ये-जा करणा-या कायमकर्मचा-यांच्या प्रवास वदैनिक भत्याच्या दरात शासन निर्णयानुसार सुधारित दराप्रमाणे प्रवास व दैनिक भत्ता बिल मुख्यलेखाधिकारी यांनी तपासुन अदा करणेबाबतचाआदेश पारित झालेला

आहे. त्यानुसार दि.२०/१२/२०११ पासुन कायम कर्मचा-याना दैनिक भत्ता रु.१००/- प्रमाणे देण्यात येत आहे. परंतू कंत्राटी कामगारांना पुर्वी प्रमाणेच प्रति दिवसरु.४५/- मात्र प्रवास भत्ता देण्यात येत आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-०१/४५७१/२०११ दि.०३/०१/२०१२ चे आदेशानुसार दि.०९/०९/२०११ पासुन संस्थान मधील कायम सेवेत असलेले वाहन चालकांना विहित ०९ तासांच्या कामांच्या वेळेपेक्षा जास्त वेळ काम केल्यास अतिकालीन भत्याच्या अटी शर्तीचे अधीन राहुन रु.४०/- प्रती तास अतिकालीन भत्ता देण्यात येत आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** वाहन विभागाकडील कंत्राटी वाहन चालकांना कायम वाहन चालकाप्रमाणे प्रवास भत्ता व अतिकालीन भत्ता देण्याकामीचा सविस्तर कार्योदेश पुर्वीप्रमाणेच सामान्य प्रशासन मार्फत काढुन वाहन चालकांची प्रवास भत्ता व अतिकालीन भत्ता बीले लेखाशाखेमार्फत तपासुन अदा करता येतील.

**मागणीः-** तरी वाहन विभागाकडील कंत्राटी वाहन चालकांना कायम वाहन चालकाप्रमाणे प्रवास भत्ता व अतिकालीक भत्ता देणेस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढेसादर करणेसमान्यता असावी.

**निर्णय क्र.५६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाहन विभागातील कंत्राटी वाहन चालकांना कायम वाहन चालकांप्रमाणे प्रवास भत्ता व अतिकालीन भत्ता देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग/ मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.५०** **श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूदः** अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तंची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना**: श्री साईबाबा हॉस्पीटल (STP क्षमता 200 Cum/Day) व श्री साईनाथ रुग्णालय (STP क्षमता 150 Cum/Day) येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयत्र उभारणेत आलेले आहे. सदर प्रकल्पाची प्रत्येक वर्षी AMC देण्यात येत असते. मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३०७(६) अन्वये सदर प्रकल्पाचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC)चे काम ठेकेदार मे. पानशे कन्सल्टंट, पुणे यांना एक वर्षासाठी रुपये ८,४०,०००/- मात्रचे रकमेत (दोन्ही प्लॅन्ट रुपये ७०,०००/- प्रती महिना) दिनांक ०१/०७/२०१६ ते दिनांक ३०/०६/२०१७ या कालावधीसाठी देणेत आलेले आहे.

सदरचा कालावधी हा दिनांक ३०/०६/२०१७ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यानंतर सांडपाणी प्रक्रिया सयंत्राची पुढिल एक वर्ष कालावधीकरीता AMC देणेकामी ई-निविदा प्रक्रिया करावी लागणार आहे. तसेच यत्रंनेची दुरुस्ती करावी लागणार आहे. (फिल्टर मधील सॅन्ड व कार्बन बदलने, बटर फ्लाय व्हॉल्व, प्रेशर गेज, एअर ड्रेन व्हॉल्व नविन टाकणे टयुब सेट मेडीया क्लिनींग करणे इ.), त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहेः

| **अ.नं.** | **कामाचा तपशील** | **अंदाजे प्रतीमाह एकूण खर्च रुपये** | **अंदाजित प्रती वर्ष खर्च रुपये** |
|---|---|---|---|
| 1. | श्री साईबाबा हॉस्पीटल (STP क्षमता 200 Cum/ Day) व श्री साईनाथ रुग्णालय (STP क्षमता 150 Cum/Day) येथील सांडपाणी सयंत्र वार्षिक AMC/ Operation & Maintenance करणे. | ७३,५००/- | ८,८२,०००/- |
| २. | फिल्टर मधील सॅन्ड व कार्बन बदलने, बटर फ्लाय व्हॉल्व, प्रेशर गेज, एअर ड्रेन व्हॉल्व नविन टाकणे टयुब सेट मेडीया क्लिनींग करणे. | | १,२५,०००/- |
| | | **एकूण अपेक्षित खर्च (एका वर्षाकरीता):** | **१०,०७,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचेसन २०१७-२०१८ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणे

तसेच इतर दुरुस्ती कामे करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १०,०७,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख, सात हजार) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाचे अंदाजपत्रक २०१७-२०१८ मध्ये तरतूद केलेल्या 'मशीनरी दुरुस्ती व देखाभाल खर्च' या शिर्षाखाली मंजूर असणा-या रुपये ५०,००,०००/- मात्रचे रकमेतून करता येईल. सदरील AMC बाबतची कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन ई-निविदा मागवून करता येईल. या कार्यवाहीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेस व प्रस्तावित दुरुस्तीचे कामे करणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणे तसेच प्रस्तावित दुरुस्तीची कामे करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.५१** **संस्थानचे उर्वरीत कर्मचाऱ्यांना साईभक्तांशी करावयाचा संवाद, वर्तणूक व इतर अनुषंगीक बाबींचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबत जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीन, अहमदनगर यांचे दि.१०.०४.२०१७ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा.त्रिसदस्य समितीचे दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१८ मा.विश्वस्तांच्या सुचनांमध्ये, संस्थान कायम कर्मचा-यांना साईभक्तांशी नम्रतेने, आदरपुर्वक व सेवाभाव वृत्तीने काम करणेबाबतचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना देणेत आलेल्या होत्या. त्यानुसार मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांचेकडून दि२९/०३/२०१६ रोजीचे पत्राने सविस्तर सशुल्क प्रस्ताव मागविणेत आलेला होता.

जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांनी कळविलेल्या दि.१६/०५/२०१६ रोजीचे सशुल्क प्रस्तावानुसार प्रशिक्षणासाठी येणा-या प्रशिक्षकांची निवासव्यवस्था, चहा व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत करुन प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचे दिवशी दोन वेळेचा चहा व माध्यन्ह भोजन, प्रशिक्षणासाठी प्रोजेक्टर, संगणक, साऊंड सिस्टिम व इतर अनुषंगीक बाबी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देऊन पहिल्या टप्यात मंदिर विभाग, संरक्षण विभाग व जनसंपर्क विभागातील एकूण २०८ कायम कर्मचा-यांकरीता शिर्डी येथे दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षण शिबीर आयोजित करणेस व त्याकामी प्रती प्रशिक्षणार्थी प्रति दिन रु.४००/- प्रमाणे शुल्क अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता, त्यास निर्णय क्र.७७६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार मंदिर विभाग, संरक्षण विभाग व जनसंपर्क विभागाकडील १९९ कर्मचारी दि.१७/०१/२०१७ ते दि.१४/०२/२०१७ अखेर पाच बॅचमध्ये प्रत्येकी दोन दिवस प्रशिक्षण शिबीरासाठी उपस्थित राहिलेले आहेत. त्यानुसार जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनीचे अंतीम बील अदा करणेत आलेले आहे.

**(ब)** आता, जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांनी दि.१०/०४/२०१७ रोजीचे पत्राने, "संस्थानमार्फत एकूण २००० कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण आयोजित करणेबाबत कळविणेत आले होते. यापूर्वी फेब्रुवारी २०१७ मध्ये संस्थान वर्ग ०४ चे १९९ कर्मचा-यासाठी उजळणी प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे. कृपया या प्रशिक्षणार्थींचे मूल्यमापन अहवालाचे अवलोकन करावे. प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण उत्कृष्ठ झाल्याचे नमूद केलेले आहे. तसेच असे प्रशिक्षण सर्व कर्मचा-यांसाठी वारंवार आयोजित करावेत असे नमूद केले आहे. सदरच्या प्रशिक्षणाबाबत आपलेसोबत चर्चा झालेली होती. तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या उर्वरित सर्व कर्मचा-यांकरीता दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षणाचे आयोजन करणेकामी आपले स्तरावरुन मान्यता मिळावी,जेणेकरुन शताब्दीचे कामकाज सुरु होणेपूर्वी प्रशिक्षण पूर्ण करता येईल." असे कळविले आहे.

**(क)** जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांचेमार्फत पहिल्या टप्यात मंदिर, जनसंपर्क व संरक्षण विभागाकडील १९९ वर्ग०४ कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. प्रशिक्षणार्थींचे मूल्यमापन अहवलाचे अवलोकन केल्यास जवळ-जवळ सर्वच प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण उत्कृष्ठ असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार

पुनःश्च दुस-या टप्प्यामध्ये इतर विभागातील कर्मचा-यांसाठी प्रशिक्षण आयोजित करावयाचे झाल्यास ज्या विभागातील कर्मचा-यांचा दैंनदिन कामानिमित्त थेट साईभक्तांशी संबध येतो असे कॅन्टिन विभाग, सर्व निवासस्थाने व लाडू व बर्फी प्रसाद निमिती विभागातील (जे कर्मचारी लगतच्या एक- दोन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत अशांव्यतिरिक्त) वर्ग ०४ कर्मचारी व कुपनविक्रेते अशा एकूण २२४ कर्मचा-यांना जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांचेमार्फत दोन दिवसीय सशुल्क (अनिवासी) प्रशिक्षण शिबीर आयोजित करता येईल, असे मत आहे.

**(ड)** तरी जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीन, अहमदनगर यांनी कळविलेल्या दि.१६/०५/२०१६ रोजीचे सशुल्क प्रस्तावानुसार प्रशिक्षकांची निवासव्यवस्था, चहा व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करुन प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचे दिवशी दोन वेळेचा चहा व माध्यन्ह भोजन तसेच प्रशिक्षणासाठी प्रोजेक्टर, संगणक, साऊंड सिस्टिम व इतर अनुषंगीक बाबी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देऊन कॅन्टिन विभाग, सर्व निवासस्थाने व लाडू व बर्फी प्रसाद निमिती विभागातील कुपन विक्रेते व वर्ग ०४ कर्मचारी अशा एकूण २२४ कर्मचा-यांकरीता शिर्डी येथे दोन दिवसीय (अनिवासी) प्रशिक्षण शिबीर आयोजित करणेस व त्याकामी प्रती प्रशिक्षणार्थी प्रति दिन रु.४००/- प्रमाणे प्रशिक्षण शुल्क अदा करणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७६ अन्वये मान्यता मिळालेनुसार मंदिर विभाग, संरक्षण विभाग व जनसंपर्क विभागाकडील १९९ कर्मचाऱ्यांना जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनी, अहमदनगर यांचेकडून प्रशिक्षण देण्यात आलेले आहे, त्याचा अहवाल समितीसमोर सादर करावा व तोपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.५२** **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगावू आरक्षण केन्द्रासाठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील सेवाधाम इमारतीमधील वापरास दिलेली जागेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगावू आरक्षण केंद्रासाठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील सेवाधाम इमारतीमधील वापरास दिलेल्या जागेसंबंधातील प्रस्ताव विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडेस पाठविणेसंबंधी.

**प्रस्तावना-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगावू आरक्षण केंद्रासाठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील सेवाधाम इमारतीमधील वापरास देवू केलेली जागा विनामुल्य वापरास देणेबाबत आगार व्यवस्थापक, रा.प.कोपरगाव यांचे दि.१२/०९/२०१६ व दि.०१/१०/२०१६ रोजीचे पत्राचे अनुषंगाने प्रस्तुतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेपूढे सादर करण्यात आला होता. त्यात निर्णय क्रं.८३७ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

“यावर सविस्तर चर्चा होऊन,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगाऊ आरक्षण केंद्रासाठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील सेवाधाम इमारतीमधील जागा वापरास देणेस मान्यता देण्यात आली. परंतु याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच सदरहू जागा विनामुलय देणे उचित होणार नाही, याकरीता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेकडून संस्थान नियमानुसार भाडे आकारणी करणेत यावी, असे ठरले.”

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगावू आरक्षण केंद्रासाठी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.११९ मधील सेवाधाम इमारतीतील तळमजल्यातील पश्चिम बाजूकडील रुम नं.५७ क्षेत्र १०० चौ.फूट ही जागा सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून निश्चित झालेले मासिक भाडे रु.७९२/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारणीनुसार ११ महीन्यांचा (दि.०८/०२/२०१७ ते दि.०७/०१/२०१८ पर्यंत) लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा दि.०८/०२/२०१७ रोजी करण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल

त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**विभागाचा अभिप्राय-** उपरोक्त प्रकरणी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना उपरोक्त जागा फक्त ११ महीन्यांच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स कराराने वापरास दिलेली आहे. म्हणजेच सदरचा कालावधी हा उपरोक्त अधिनियमातील कलम १७(३) मध्ये नमूद केलेल्या कालावधीपेक्षा कमी असल्याने उपरोक्त निर्णय क्रं.८३७ मध्ये नमूद केलेप्रमाणे याकामीचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडेस मान्यतेसाठी पाठविणेची आवश्यकता नाही.

अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.५७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.५३** **मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे कार्यालयातील, त्यांचे अधिनस्त असलेल्या भूसंपादनकक्षास व या कक्षात कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणे.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-१६ व १७ जुलै, २००० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २३८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे संबंधित भूसंपादनाची कामे करणेकरीता मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर उपविभाग, श्रीरामपूर (महसूल) यांचे पर्यवेक्षणाखाली श्रीरामपूर येथील कार्यालयात स्वतंत्र भूसंपादन कक्षाची स्थापना करणेत आलेली होती. मध्यंतरीचे काळात,मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील आदेश क्रमांक भूसंपादन/ कार्या/१६-क/१०८५/२०१३ दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशाने मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचे अधिनस्त असणारा विषयांकीत भूसंपादन कक्ष तेथे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांसह मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग यांचे अधिनस्त देणेत आलेला होता. संबधीत भूसंपादन कक्षास व कक्षाकडे कार्यरत कर्मचा-यांना सन २००० पासून ते आजपावेतो मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वेळोवेळा मुदतवाढ देणेत आलेली आहे. सध्या भूसंपादन कक्ष व कक्षाकडे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.३०/०४/२०१७ अखेर संपत असल्याने विषयांकित भूसंपादन कक्षास व कक्षाकडे कार्यरत असलेल्या खालील कर्मचा-यांना मुदतवाढ देणेचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्र.१९७ अन्वये भूसंपादन कक्षाकडील चालू प्रकरणांपैकी किती प्रकरणांची आवश्यकता आहे व किती प्रकरणे वाटाघाटीने मिटवता येतील या अहवालासह सदरहू भूसंपादन कक्षाने मागील दोन वर्षांमध्ये केलेल्या कामाची सविस्तर माहिती सभेसमोर सादर करणेत यावी. तोपर्यंत तात्पुरते ०३ महिने कालावधीसाठी आहे त्याच मानधनावर भू-संपादन कक्ष व त्यामधील कर्मचा-यांना मुदतवाढ देण्यात यावी. असा निर्णय संमत झालेला आहे.

उपरोक्त संमत निर्णयानुसार खालील कर्मचा-यांना आस्थापना विभागाचे दि.०८ एप्रिल, २०१७ रोजीचे आदेशाने दि.३१/०७/२०१७ अखेर आहे त्याच मानधनावर मुदतवाढ देणेत आलेली आहे.

| **अ.क्र.** | **तपशील** | **मंजूर पद संख्या** | **सध्या प्रति महिना देणेत येत असलेले मानधन रुपये** |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.आर.बी.नागरे, सेवानिवृत्त अव्वल कारकून | ०१ | १०, ०००/- (एकत्रित) |
| ०२ | लिपीक टंकलेखक संवर्ग (कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने) | ०२ | किमान वेतनदराप्रमाणे कुशल कर्मचारी वेतन. |
| ०३ | शिपाई संवर्ग कर्मचारी (कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने) | ०१ | किमान वेतनदराप्रमाणे अकुशल कर्मचारी वेतन. |

उपरोक्त कर्मचा-यांपैकी अ.क्र.०१ श्री.रामचंद्र भानुदास नागरे, सेवानिवृत्त अव्वल कारकून यांनी दि.२१/०४/२०१७ रोजीचे पत्राने वैयक्तिक कारणास्तव दि.०१/०५/२०१७ पासून विषयांकित भूसंपादन कक्षाकडील कामाचा राजीनामा दिलेला असून, त्यांचा राजीनामा जा.नं.एसएसएस/साप्रशा-आस्था/ १०३६/ २०१६ दि.३०/०५/२०१७ रोजीचे आदेशाने मंजूर करणेत आलेला आहे.

**(ब)** आता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विषयांकित भूसंपादन कक्षामार्फत मागील दोन वर्षामध्ये केलेल्या कामाचा अहवाल व चालू प्रकरणांपैकी किती प्रकरणांची

आवश्यकता आहे व किती प्रकरणे वाटाघाटीने मिटवता येतील याचा अहवाल प्र.अधिक्षक, मालमत्ता कक्ष यांचेकडून मागविणेत आलेला होता. त्यावर उपविभागीय अधिकारी, भाग शिर्डी यांनी दि.०१/०५/२०१७ रोजीचे पत्राने अहवाल सादर केलेला असून, सदरचा अहवाल मालमत्ता विभागामार्फत कार्यवाहीस्तव इकडील कार्यालयाकडे सादर केलेला आहे. मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी सादर केलेला तपशिलवार अहवाल खालील प्रमाणे.

"१) श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचेकरीता या कार्यालयाकडे एकूण ०४ प्रकरणांत भूसंपादनाची कार्यवाही चालु आहे. सदरची प्रकरणे अंतिमतः पुर्ण झालेली नाहीत या प्रकरणात मागील ०२ वर्षात करणेत आलेल्या कार्यवाही बाबत प्रकरण निहाय माहिती सविस्तरपणे नमूद करुन देण्यात आली आहे.

२) शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकरीता या कार्यालयाकडे एकूण०८ प्रकरणात भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे. सदरचे प्रकरणांपैकी चार प्रकरणात संयुक्त मोजणी पासून ते कलम ९ (३)(४) चे टप्यापर्यंत कार्यवाही करण्यात आलेली आहे. या चारही प्रकरणात म्हणजे एसआर नंबर १/१२, २/२०१२,३/१२ व ६/१२ यात कलम ६ ची अधिसुचना दिनांक ३१ ऑक्टोबर २०१३ रोजी प्रसिध्द झालेली आहे. या प्रकरणात भूसंपादन प्रस्ताव दाखल झालेनंतर शासन परिपत्रकाप्रमाणे एकूण मोबदला रक्कमेपैकी ३० टक्के रक्कम त्वरीत शासनाकडे जमा करणे आवश्यक होते. उर्वरीत ७० टक्के रक्कम निवाडा घोषित करणेपूर्वी भरावयाची होती सदर रक्कम जमा करणेसाठी वारंवार मागणी पत्रे देण्यात आली आहेत. शिर्डी नगर पंचायतीने भूसंपादन प्रकरणात श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी रक्कम भरणे आवश्यक होते. काहीही रक्कम भरलेली नाही. एस आर नंबर १/२००८ या प्रकरणातील कार्यवाही अंतिम टप्यात असून मा.विभागीय आयुक्त नाशिक यांनी प्रारुप निवाडा तपासणीतल काढेलल्या त्रुटींची पुर्तता करणेचे काम चालु आहे. एस आर नंबर ६८/२००५ शिर्डी गावठण हद्दीतील रस्ता यामध्ये सुधारित अंतिम निवाडा दिनांक ३०/१२/२०१६ रोजी घोषीत करणेत आलेला असून शासनाने एकतर्फी ताबा दिनांक ०६/०१/२०१७ रोजी घेतला आहे. एसआर नंबर ४/२०१५, ०५/२०१५ यामध्ये नविन भूसंपादन कायदा सन २०१३ मधील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु केली असून ती प्राथमिक टप्यावर आहे. या आठ प्रकरणापैकी सहा प्रकरणातील कार्यवाहीबाबत प्रकरण निहाय सविस्तर तपशिल पुढे स्वतंतपणे देण्यात आलेला आहे.

याखेरीज शिर्डी परिसरातील इतरही भूसंपादन संस्थेच्या सहा प्रकरणात सुधारित अंतिम निवाडे करणे तसेच प्रतयेक प्रकरणात चालु असलेली न्यायालीन प्रकरणे या मा.सुप्रिम कोर्टातील प्रकरणे मा.उच्च न्यायालयातील प्रकरणे कलम १८ खालील भूसंदर्भ प्रकरणे कलम २८ अ खालील निवाडा करणेची प्रकरणे यांचा समावेश असून सर्व न्यायालयीन प्रकरणात पॅरावाईज अहवाल व इतर आवश्यक ती संबधीत कागदपत्रे तयार करणे इ. कामे भूसंपादन कक्षाने मागिल ०२ वर्षात केलेली आहे. त्याचा प्रकरण निहाय तपशिल पुढ देण्यात आलेला आहे.

चालु प्रकरणांपैकी किती प्रकरणांची आवश्यकता आहे याबाबतचा निर्णय संबधीत भूसंपादक संस्थेने त्यांचे स्तरावर प्रकरणाचे गुणवत्तेनुसार घेणे आवश्यक आहे. भूसंपादन अधिकारी यांना याबाबत निर्णय घेता येणार नाही. त्याचप्रमाणे वाटाघाटीने प्रकरणे मिटविण्यासाठी संबंधित जमीन मालकाशी प्रथम चर्चा करणे आवश्यक आहे. वाटाघाटीने किती प्रकरणे मिटविता येतील याबाबत चर्चा करणेपूर्वी अंदाज करणे ठरविता येणार नाही. जमीन मालकांची बैठक घेऊन त्यांचेशी चर्चा करुन प्रयत्न करणे हाच वाटाघाटीने प्रकरण मिटविण्याचा मार्ग आहे. त्यासाठी संबधीत भूसंपादक संस्थेने जमीन मालकांची बैठक घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून त्याअनुषंगाने सकारात्मक भूमिका घेतल्यास प्रकरण मिटविण्याचा मार्ग निघु शकतो.

भूसंपादन प्रकरणात मागील दोन वर्षातील कार्यवाहीचा प्रकरण निहाय तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचेकरिता भूसंपादन प्रकरणे**

| अ.क्र | एस आर नंबर व प्रयोजन | तपशिल |
|---|---|---|
| 1 | **प्रयोजन- 10/2000, धर्मशाळा व इतर बांधकाम करणे** | स.नं 148/1 क्षेत्र 4.73 चौ.मी 19, सदर भूसंपादन प्रकरण सन 2000 साली सुरु झाले. प्रकरण प्रारुप निवाडा करणेचे टप्प्यात असतांना जमीन मालकांने मा उच्च् न्यायालयात रिट पिटीशन नंबर 390/2002 दाखल केले. व न्यायालयाकडुन स्थगिती आदेश मिळविला. या दाव्यात दिनांक 24/4/2015 रोजी निर्णय झाला या दाव्यात जमीन मालकांचे भूसंपादन कायदा1894 चे कलम 4 व 6 या अधिसुचना चॅलेंज केल्या होत्या. त्या मा. न्यायालयाने योग्य ठरवुन दावा डिसमिस केला. परंतु नविन भूसंपादन कायदा सन 2013 हा 1 जानेवारी 2014 पासुन लागु झाला. या कायद्यातील कलम 26 ते 30 यामध्ये मोबदला रक्कम ठरविणेची तरतुद आहे. या तरतुदीनुसार या प्रकरणात मोबदला रक्कम देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. परंतु दिनांक 25/4/2014 मा उच्च न्यायालयाचे |

| | | |
|---|---|---|
| | | निर्णयानंतर लगेच निवाडा करता आला नाही. कारण त्यावेळी संपादित करावयाचे क्षेत्र 5 हे 02 आर होते. आणि प्रकरण न्यायप्रविठ असतांनाचे काळात संपादित करावयाचे क्षेत्रातुन शिर्डी विकास योजनेतील एसआर नंबर 2/2007 व एसआर नंबर 4/2007 या रस्त्याचे दोन भूसंपादन प्रकरणात मिळुन सुमारे 29 आर क्षेत्र शिर्डी नगरपंचायतीसाठी संपादित झाले त्यामुळे यात नव्याने कार्यवाही करणे क्रमप्राप्त ठरले.<br>प्रथम उपअधिक्षक भूमि अभिलेख राहाता यांचेकडुन संयुक्त मोजणी नकाशा व संयुक्ती मोजणीपत्रक यात दुरुस्ती करुन घेण्यात आली. सदर प्रकरणी संयुक्त मोजणी अहवाल दिनांक 19/12/2014 अन्वये प्राप्त झाला. या सुधारित संपादित करावयाचे क्षेत्रानुसार नविन दुरुस्त भूसंपादन प्रस्ताव भूसंपादक संस्थेकडुन घेण्यात आला. भूसंपादक संस्था( श्री साईबाबा संस्थान शिर्डी) यांचेकडुन दुरुस्त प्रस्ताव दिनांक 27/1/2015 रोजी प्राप्त झाला. सदर प्रस्तावानुसार दुरुस्त 52 अ आदेश व कलम 4 ची अधिसुचना यांची कार्यवाही न करता, कलम 6 चे दुरुस्त अधिसुचनेची कार्यवाही करणेत आली कारण मा. विभागीय आयुक्त नाशिक यांना संपादनाचे क्षेत्र घोषित करतांना कलम 6 ची अधिसुचना प्रसिध्द करतांना कलम 4 चे प्रसिध्दीकरणानंतरही अंशतः क्षेत्र वगळुन कलम 6 ची अधिसुचना प्रसिध्द करणेचे अधिकार आहेत. त्यात कलम 48/2 ची बाध येत नाही. सदर बाबत 1) महाराष्ट्र शासनाचे भूसंपादनाबाबतचे मॅन्युअल मधील भाग 10 मधील नियम 303, 303अ, मध्ये विश्लेषण करण्यात आलले आहे.<br>मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांनी दुरुस्त कलम 6 ची अधिसुचना दिनांक 17/3/2015 रोजी काढली व ती रद्द मार्च 2015 ला शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत आली. एप्रिल 2015 मध्ये इतर विहीत प्रसिध्दीने प्रसिध्दी करणेत आली.<br>माहे एप्रिल 2015 मध्ये कलम 9 (1)(2) व कलम 9 (3)(4) चे नोटीसा देवुन जमीन मालकांचे म्हणणे घेण्यात आले. ते 29/4/2015 रोजी प्राप्त झाले. भूसंपादक संस्थेने जमीन मालकांचे म्हणणेवर अभिप्राय दिनांक 18/5/2015 अन्वये सादर केली. त्यानंतर जुन, जुलै मध्ये जमीन मालकांचे अर्जावरुन सुनावण्याघेण्यात आल्या.<br>नविन भूसंपादन कायद्याचे कलम 26 चे 30 नुसार मुल्यांकन करावयाचे असलेने दुय्यम निबंधक यांचेकडुन खरेदीविक्रीच्या 3 वर्षातील सभोवतालचे जमीनीच्या सुची क्रमांक 2 च्या नकला मागवुन प्रारुप निवाडा तयार करणेचे काम सुरु केले व प्रारुप निवाडा जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे मान्यतेसाठी दिनांक 30/6/2015 रोजी सादर केला. त्यांनी दिनांक 12/8/2015 रोजी प्रारुप निवाडयास मान्यता दिलेनंतर दिलेल्या सुचनेप्रमाणे अंतिम निवाडा तयार करुन तो दिनांक 13/8/2015 रोजी घोषित केला.<br>जमीन मालकास मोबदला रक्कम देवुन जमीनीचा ताबा घेणेसाठी कलम 12 (2) व 16 च्या नोटीसा तयार करुन देण्यात आल्या. त्यासाठी नोटीसद्वारे दिनांक 26/8/2015 ही तारीख नेमण्यात आली. परंतु जमीन मालक नेमलेल्या तारखेस गैरहजर राहिले परंतु जमीनीचा एकतर्फी ताबा घेण्यात आला नंतर त्यांनी तक्रारी अर्ज दिले. कलम 18 खाली भूसंदर्भ दाखल केले त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पिटीशन 29875/2015 व 29962/2015 हे दाखल केलेले आहेत.<br>कलम 18 खालील भूसंदर्भाबाबत तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल दाव्याबाबत शासनाकरिता व भूसंपादक संस्थेकरिता पॅरावाईज रिपोट तयार करणेत येवुन न्यायालयात वकीलामार्फत ॲफेडेव्हीट देवुन सादर करणेत आलेले आहेत. त्याप्रमाणे सदरची बाब न्यायप्रविष्ठ आहे.<br>प्रस्तुत प्रकरणात अंतिम निवाडयानुसार सन 2002 मधील मुल्यांकन दिनांकानुसार रुपये 5 कोटीपर्यंत निवाडयातील एकुण मुल्यांकन आलेले आहे. परंतु जमीन मालकाचे म्हणणेनुसार नविन भूसंपादन कायदा सन 2013 हा 1 जानेवारी 2014 पासुन लागु झालेला आहे. तेव्हा सन 2014 चे रेडीरेकनर दरानुसार असलेला मुल्यदर रुपये 8200/- प्र. चौ.मी या दराने मुल्यांकन करुन मोबदला रक्कम मिळावी. या दराने मुल्यांकन केल्यास व मुद्रांक शुल्क विभागाचे सुचनेनुसार टप्पा पध्दतीने हिशोबीत केल्यास सदरची रक्कम 46 कोटीपर्यत येते. |

| | | |
|---|---|---|
| **2** | एलएक्यु/एसआर नंबर 14/2000, प्रयोजन – शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्रमांक 34 श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे रुग्णालय विस्तारीकरणासाठी भूसंपादन | या प्रकरणात स.न 126, 125 क्षेत्र 0.69 असे आहे. प्रस्तुत प्रकरणात दिनांक 30/12/2013 रोजी प्रथम निवाडा घोषित केला होता. परंतु जमीन मालकांनी मोबदला रक्कम अदा करणेत आलेला नव्हता. दिनांक 1 जानेवारी 2014 रोजी नविन भूसंपादन कायदा सन 2013 लागु झाला. नविन कायद्याच्या कलम 24 च्या तरतुदीनुसार व शासनाच्या नियमावलीनुसार नविन भूसंपादन कायदा 2013 चे कलम 26 ते 30 मधील तरतुदीनुसार सुधारित निवाडा तयार करावा लागला. सुधारित मुल्यदराबाबत नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग यांचे कार्यालयाचे पत्र दिनांक 30/8/2014 चे पत्राने कळविले . त्यानुसार अंतिम निवाउा तयार करुन दिनांक24/4/2015 रोजी निवाडा घोषित केला आहे. त्याच तारखेस कलम 12(2) व 16 च्या नोटीसा तयार करुन जमीन मालकास बजाविणेत आल्या. मोबदला रक्कम देणे व जमीनीचा ताबा घेणे यासाठी दिनांक 29/4/2015 ही तारीख नेमण्यात आली. परंतु संपादित क्षेत्रात रहाती घरे असल्यामे काही जमीन मालकांनी या तारखेस ताबा दिला नाही. त्यामुळे पंचनामा करुन एकतर्फा ताबा शासनाने घेतला आहे.<br>त्यानंतर जमीन मालकांशी चर्चा करुन त्यांना पर्यायी घराची व्यवस्था करणेसाठी काही मुदत देण्यात आली. 24 जमीन मालकांपैकी 22 इसमांनी मोबदला रक्कम स्विकारली आहे. 2 इसमांना त्यांचे वारस नोंदी अभावी रक्कम अदा करणेत आलेली नाही. भूसंपादक संस्थेस ताबा देणे बाकी आहे. या प्रकरणात 24 जमीन मालकांपैकी 13 जमीन मालकांनी भूसंपादन कायदा1894 चे कलम 18 नुसार भूसंदर्भ दाखल केलेले आहे त्यासंदर्भात सोबत जोडावयाची कागदपत्रे तयार करुन मा. न्यायालयात प्रकरणे दाखल केलेली आहेत. |
| **3** | एलएक्यु/ एसआर नंबर 16/ 2000, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्रमांक 39, विविध उपक्रमांसाठी भूसंपादन | याप्रकरणात स.नं 124, 126 क्षेत्र 4.हे 54आर 18 चौ.मी इतके क्षेत्र भूसंपादन करणेत येणार होते. प्रस्तुत प्रकरणात प्रारुप निवाडा तयार करुन मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेत आल्यानंतर त्यांनी काढलेल्या त्रुटीनुसार संपादित क्षेत्रात शिर्डी विकास योजनेतील रस्त्याचे क्षेत्र स.नं 126 मधील पट्टीच्या स्वरुपात संपादनात येत होते. ते क्षेत्र वगळुन भूसंपादन करणेच्यासुचना होत्या. त्यामुळे संयुक्तमोजणी नकाशा व संयुक्त मोजणीपत्रक दुरुस्त करुन पुढील भूंसपादनाची कार्यवाही करावयाची होती. भूसंपादनातील विविध टप्प्यावर पुन्हा खालील प्रमाणे कार्यवाही करावी लागली.<br>1) मोजणी नकाशा दुरुस्त करुन त्यानुसार दुरुस्त प्रस्ताव घेणे<br>2) दुरुस्त प्रस्ताव प्राप्त झालेनंतर दुरुस्त 52 अ आदेश घेणे<br>3) कलम 6 ची दुरुस्त अधिसुचना सर्व विहीत मार्गाने प्रसिध्द करणे<br>4) कलम 9(1)(2) व कलम 9(3)(4) च्या दुरुस्त नोटीसा देवुन जमीन मालकांचे म्हणणे घेणे<br>5) सुधारित प्रारुप निवाडा तयार करणे व मान्यतेसाठी सादर करणे. इ<br>या प्रकरणात दुरुस्त 52 अ आदेश दिनांक 3/12/2012 रोजी पारित झाला. कलम 6 ची दुरुस्त अधिसुचना दिनांक 7-13 फेब्रुवारी 2013 ला प्रसिध्द झाली. कलम 9(1)(2) व 9(3)(4) ची कार्यवाही नंतर नविन भूसंपादन कायदा सन2013 चा कायदा 1/1/2014 ला लागु झालेने मुल्यांकन दराचा मुद्दा व नियमावलीचा प्रश्न उपस्थित झाला. आणि मुल्यांकनाचे मुद्द्यावरुन नविन कायद्यानुसार मोबदला रक्कम मिळणेवरुन जमीन मालकांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन दाखल केले. ते खालीलप्रमाणे<br>1) डॉ श्री संतोषकुमार माणकचंद लोढा- रिट पिटीशन नंबर - 2040/2014<br>2) श्रीमती भिमाबाई पंढरीनाथ शेळके- रिट पिटीशन नं 330/2015<br>3) श्री चंद्रकांत रतीलाल मेहता- रिट पिटीशन नंबर 2084/2016<br>यात रिट पिटीशन नंबर 2040/2014 मध्ये मा. न्यायालयाने निवाडा घोषित करु नये म्हणुन दिनांक 13/3/2014 रोजी स्थगीती आदेश दिला. त्यामुळे 2015 मध्ये प्रारुप निवाडा तयार करुन मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचकडेस मान्यतेसाठी सादर केला आहे परंतु त्यावर पुढील कार्यवाही झाली नाही. आणि 2015 व 2016 मध्ये न्यायालयीन कार्यवाही सुरु राहिली. त्यात कोर्ट कामासाठी आवश्यक ते कागदपत्रे वेळोवेळी तयार करणे व मा. न्यायालयात सादर करणे याबाबतची कार्यवाही सुरु राहीली. फेब्रुवारी 2017 मध्ये भूसंपादक संस्थेचे म्हणणे व जमीन मालकाचे म्हणणे यावरुन 7/2/2017 ला भूसंपादन प्रस्ताव रद्द करणे/ वगळणे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिला. त्यानुसार भूसंपादक संस्थेने आरक्षण क्रमांक 39 चा भूसंपादक प्रस्ताव रद्द करणेसाठी मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडेस जा.क्र एसएसएसटी/ मालमत्ता/ 6154/2017 दिनांक 6/03/2017 रोजी सादर करणेत आला आहे. त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्याप्रमाणे कार्यवाही भूसंपादन कक्षाने केलेली आहे |

**शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांची भूसंपादन प्रकरणे**

| अ.क्र | एस आर नंबर व प्रयोजन | तपशिल |
|---|---|---|
| 1 | 1/2008, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्रमांक 31 च्या पश्चिम कोप-यापासुन ते स.नं 9 मधील 18.00 मीटर विकास योजना रस्त्यापर्यंत 18 मीटर रुंद रस्त्यासाठी भूसंपादन. | सदर प्रकरणात स.नं 9, 54, 55, 56,111, 110, 188, 113 समाविष्ठ आहेत. क्षेत्र 23715.25 संपादित होणार आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रारुप निवाडा तयार करुन मा. विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडेस दिनांक क्र. भूस/कार्या-16अ/14/2013 दिनांक 21/1/2013 अन्वये मा. जिल्हाधिकारी अमदनगर यांचेमार्फत सादर करणेत आला होता. मा विभागीय आयुक्त नाशिक यांनी प्रारुप निवाडयाची तपासणी करुन त्यात त्रुटी काढुन दिनांक 19/10/2013 अन्वये दुरुस्तीसाठी परत पाठविला क्षेत्राबाबत त्रुटी असल्याने खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आली.<br>1) संयुक्त मोजणी नकाशा पत्रक दुरुस्तीसाठी उपअधिक्षक भूमि अभिलेख राहाता यांना 27/5/2014 चे पत्रान्वये कळविले वारंवार पत्रे व फोनद्वारे पाठपुरावा केल्यानंतर दिनांक 8/1/2015 ला त्यांनी अहवाल सादर केला.<br>2) त्यानंतर शिर्डी नगरपंचायत शिर्डीकडुन दुरुस्त प्रस्ताव दिनांक 2/2/2015 अन्वये प्राप्त झाला.<br>3) दुरुस्त प्रस्तावानुसार दुरुस्त 52अ आदेश दिनांक 16/3/2015 अन्वये प्राप्त झाला.<br>4) कलम 6 ची अधिसुचना दिनांक 24/4/2015 रोजी प्रसिध्द झाली.<br>5) त्यानंतर कलम 9 (1)(2) व कलम 9 (3)(4) ची कार्यवाही करणेत आली.<br>6) नविन भूसंपादन कायदा सन 2013 मधील मुल्यांकनाबाबत तरतुदी 26 ते 30 याचे अनुषंगाने आवश्यक ती कागदपत्रे तयार करुन सुधारित प्रारुप निवाडा तयार करणेत आला. यामध्ये आयुक्त् कार्यलयाने काढलेल्या सर्व त्रुटींची पुर्तता करुन सुधारित प्रारुप निवाडा जिल्हाधिकरी अहमदनगर यांचेकडेस दिनांक 28/3/2016 अन्वये सादर करणेत आला. परंतु मोबदला रक्कमेत, बेरजेत संगणकीय चुका झाल्याने दुरुस्तीसाठी परत भूसंपादन अधिकारी यांचेकडेस सुधारित प्रारुप निवाडा परत आला. त्यात सुचनेप्रमाणे दुरुस्ती केलेनंतर दिनांक 17/10/2016 अन्वये सुधारित प्रारुप निवाडा फेरसादर करणेत आला. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिनांक 31/12/2016 चे पत्रान्वये फेर सुधारित प्रारुप निवाडा मा. विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडेस सादर केला. आयुक्त कार्यालयाने निवाडयाची तपासणी करुन त्यात पुन्हा त्रुटी काढलेल्या आहेत. सदरच्या त्रुटी शासन परिपत्रक दिनांक 29/8/2015 मुद्रांक शुल्क् विभागाने मुल्यांकनाबाबत सुचना व शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेशी तसेच नगर रचना विभागाशी संबंधित असुन त्याची पुर्तता संबंधितांशी पत्रव्यवहार केला असुन पुर्तता करणेची कार्यवाही चालु आहे. तसेच या प्रकरणातील स.नं 9 चे जमीन मालक श्री रतिलाल पुनमचंद लोढा यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद या न्यायालयात रिट पिटीशन नंबर 12761/2016 दाखल केले त्यात शासनाचे वतीने दिनांक 14/2/2017 रोजी प्रतिज्ञापत्र सादर करणेत आलेले आहे.<br>वरीलप्रमाणे भूसंपादन कक्षाने कामाची कार्यवाही केलेली आहे. |
| 2 | 1/2012, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील बिरेगांव रस्ता 15.00 मीटर रुंदीकरणासाठी भूसंपादन | सदर भूसंपादन प्रस्तावात स.नं 55, 56, 57 व क्षेत्र 886 चौ.मी अंतर्भूत आहे. |
| 3 | 2/2012, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील नगर- मनमाड रस्ता ते 18 मी रुंद वळण रस्त्यास जोडणारा 15 मी रुंदीच्या रस्त्यासाठी भूसंपादन | सदर भूसंपादन प्रस्तावात स.नं 164, 166, 167,168 व क्षेत्र 4838 चौ.मी अंतर्भूत आहे. |
| 4 | 3/2012, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील हॉटेल गोरडीया समोरील 12 मी रुंदीकरणासाठी भूसंपादन (पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव् रस्ता) | सदर भूसंपादन प्रस्तावात स.नं 4, व क्षेत्र 4644 चौ.मी अंतर्भूत आहे. |

| | | |
|---|---|---|
| 5 | 6/2012, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील 24 मी रुंदीच्या रस्त्यासाठी (श्रध्दा हौसींग सोसायटी रस्ता ते बन रस्ता ते बिरेगांव रस्ता ते निमगांव शिव रस्ता, पुर्व पश्चिम व दक्षिण उत्तर रस्ता) | सदर भूसंपादन प्रस्तावात स.नं 7,8, 10,11,12,14, 18,19,15,52, 58,97,98, 99 व क्षेत्र 79856 चौ.मी अंतर्भूत आहे. |
| 6 | एसआर नंबर 68/2005 प्रयोजन- शिर्डी गावठाण हद्दीतील रथ रस्ता ते नविन पिंपळवाडी रस्ता 9मी. रुंदीकरण भूसंपादन | या प्रकरणात भागिरथीबाई गंगाधर भुजबळ व इतर 1 यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन नंबर 7489/2013 दाखल केलेले होते. यात म्हणणे व प्रतिज्ञापत्र देण्यात आलेले होते. प्रकरणी स्थगिती आदेश होता. मा. उच्च न्यायालयाने दिनांक 15/11/2016 रोजी निकाल देवुन नविन भूसंपादन कायदा सन 2013 मधील तरतुदीनुसार मोबदला रक्कम देवुन भूसंपादन करणेचा आदेश केला. या आदेशाप्रमाणे दिनांक 30/12/2016 रोजी निवाडा घोषित करणेत आला. व दिनांक 6/1/2017 रोजी संपादित क्षेत्राचा एकतर्फा ताबा घेण्यात आला. |
| 7 | 4/2015, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील पिंपळवाडी रस्त्यापासुन 18. मी रिंग रस्त्यापर्यंत 15 मी रुंदीचा रस्ता (वृदावन इमारतीकडे जाणारा) | या प्रस्तावात स.नं 5 पैकी, क्षेत्र 5100.00 चौ.मी क्षेत्र अंतर्भुत आहे. प्रस्तुत प्रकरणात नविन कायद्यानुसार कार्यवाही करावयाची आहे. प्रकरणात अद्याप कार्यवाही सुरु झालेली नाही. एस.आय. ए होणे बाकी आहे. |
| 8 | 5/2015, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील नांदुर्खी रस्ता ते चारी रस्ता यांना जोडणारा 12.मी रुंद रस्ता (आरक्षण क्रमांक 39 च्या दक्षिणेस) | या प्रस्तावात स.नं 124 व 126 पैकी, क्षेत्र 3642.00 चौ.मी क्षेत्र अंतर्भुत आहे. प्रस्तुत प्रकरणात नविन कायद्यानुसार कार्यवाही करावयाची आहे. प्रकरणात अद्याप कार्यवाही सुरु झालेली नाही. एस.आय. ए होणे बाकी आहे. |

तक्त्यातील अ.न. 2 ते 5 या चार भूसंपादन प्रकरणात संयुक्त मोजणी कलम 6 ची अधिसुचना प्रसिध्दी दिनांक 31/10/2013 रोजी झाली आहे. त्यानंतर कलम 9 (1)(2) व कलम 9 (3)(4) या टप्प्यापर्यंत कार्यवाही सन 2014 मध्ये करणेत आली परंतु भूसंपादन संस्थे ने काहीही मोबदला रक्कम चारही प्रकरणात भरलेली नाही त्यासाठी भूसंपादन संस्थेस वारंवार मागणी करणेत आलेली आहे. नियमाप्रमाणे भूसंपादन प्रस्ताव दिल्यानंतर कलम 6 ची अधिसुचना प्रसिध्द करणेपुर्वी एकुण मोबदला रक्कमेच्या 30 % रक्कम भरल्याशिवाय कलम 6 ची अधिसुचना प्रसिध्द करण्यात येवु नये असे शासन परिपत्रक आहे. परंतु या प्रकरणात काहीही मोबदला रक्कम शासनाकडे जमा करणेत आलेली नाही. आता कलम 6 ची अधिसुचना प्रसिध्दी होवुन सुमारे 4 वर्षाचा कालावधी होत आला आहे. त्यामुळे भूसंपादनाची पुढील कार्यवाही करता आलेली नाही. प्रस्तुत शिर्डी विकास योजनेतील रस्त्यासाठी लागणारी भूसंपादनाची रक्कम श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांनी भरावयाची आहे. प्रस्तुत प्रकरणातील कार्यवाहीच्या कालावधीत श्री साईबाबा संस्थान शिर्डी मध्ये त्रिसदस्यीय समिती अस्तीत्वात होती. त्यांना खर्चाबाबत मर्यादित अधिकार असलेने त्यांनी भूसंपादन प्रकरणात निधी प्राप्त होणेबाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस निधी प्राप्त होणेसाठी परवानगी मिळणेकामी प्रस्ताव सादर केलेले होते. तसेच शासनाचे न्याय व विधी विभागाकडे ही भूसंपादनासाठी निधी मिळणेकामी प्रस्ताव सादर केलेले होते. परंतु परवानगी अभावी निधी प्राप्त झालेला नाही.

या शिर्डीतील भूसंपादन प्रकरणाव्यतीरीक्त शिर्डी लगतचे परिसरातील भूसंपादन प्रकरणातही या भूसंपादन कक्षाने कार्यवाही केलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. या प्रकरणात सन 2015 ते 2016 या कालावधीत कार्यवाही करणेत आलेली आहे.

| अ.क्र | एलएक्यु/ एसआर नंबर व प्रयोजन |
|---|---|
| 1 | 3/2016 मोर्विस– सावळीविहीर भरवस रस्तयावर ग.नं 168/1 मध्ये जोड रस्त्यासाठी भूसंपादन |
| 2 | 2/1992, 3/1992 कोपरगांव साठी येसगांव येथील जमीनीचे भूसंपादन प्रकरणात कलम 28अ खालील निवाडे जाहिर करणे |
| 3 | 75/2007 – सोनेवाडी पाणीपुरवठा योजनेसाठी भूसंपादन अंतिम सुधारित निवाडा तयार करणे. |
| 4 | 53/2003 – नागपुर- मुंबई हायवेसाठी सुधारित अंतिम निवाडा तयार करणे |
| 5 | 173/2010- अंजनापुर ता. कोपरगांव पुर चारीसाठी भूसंपादन सुधारित अंतिम निवाडा तयार करणे |
| 6 | 3/1997- पाणी पुरवठा योजना साठवण तलाव शहापुर ता. कोपरगांव सुधारित अंतिम निवाडा तयार करणे |

याशिवाय शिर्डी बाहय वळण रस्ता भूसंपादनाची 8 प्रकरणे व शिर्डी विकास योजनेतील भूसंपादनाची 8 प्रकरणे याप्रमाणे एकुण 16 प्रकरणांमध्ये विहीत मार्गाने भूसंपादन प्रकरणे निर्गत केलेली आहे. तसेच यासर्व प्रकरणांमध्ये निवाडयानुसार घोषित केलेली रक्कम जमीन मालकांना मान्य नसल्याने त्यांनी कलम 18 खाली भूसंदर्भ दाखल केलेले आहे त्या भूसंदर्भ प्रकरणात या कार्यालयानी कार्यवाही केलेली आहे.

या कार्यालयाने कार्यालयीन कामकाजाबाबत वेळोवेळी दिलेल्या सुचनेप्रमाणे काम केलेले आहे. तसेच श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे मा. न्यायालयात दाखल भूसंपादन प्रकरणात पॅरावाईज रिपोर्ट तयार करुन देणे इ कामे केलेली आहे.

सध्या या कार्यालयात श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचेकरिता व शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेसाठी खालीलप्रमाणे भूसंपादन प्रकरणे कार्यवाहीसाठी आहेत.

| श्री साईबाबा संसथान यांचेसाठी भूसंपादन प्रकरणे | |
|---|---|
| अ.क्र | एसआर व प्रयोजन |
| 1 | 10/2000, धर्मशाळा व इतर बांधकामासाठी भूसंपादन |
| 2 | 14/2000, रुग्णालय विस्तारीकरणासाठी भूसंपादन |
| 3 | 16/2000, विविध उपक्रमांसाठी भूसंपादन |
| 4 | 43/2006, विद्युत कार्यालयाचे विस्तारीकरण व लाडु प्रसादालय |

वरीलप्रमाणे अ.नं 1 मध्ये भूसंपादनाची कार्यवाही निवाडा घोषित करुन पुर्ण झालेली आहे. पंरतु जमीन मालकाने मा. सर्वोच्च न्यायालयात एसएलपी नंबर 29875/2015 दाखल केलेले असुन, त्यात शासनातर्फे म्हणणे व प्रतिज्ञापत्र दाखल करणेत आलेले आहेत. प्रकरणात स्थगिती आदेश आहे. मा. न्यायालयाच्या आदेशानंतरच पुढील योग्य ती कार्यवाही करता येईल.

अ.नं 2 मध्ये निवाडा घोषित होवुन 24 पैकी 22 जमीन मालकांनी मोबदला रक्कम स्विकारली आहे. भूसंपादक संस्थेस ताबा देणे व न्यायालयात दाखल भूसंदर्भात निकालानंतर योग्य ती कार्यवाही करणे बाकी आहे.

अ.नं 3 मध्ये भूसंपादन प्रकरणे वगळणेबाबत मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे प्रस्ताव दाखल असुन तसा आदेश होणेवर त्यांचे स्तरावर बाकी आहे. यात तडजोड करणेच प्रश्नच उदभवत नाही.

अ.नं 4 मध्ये मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन नंबर 8066/2015 दाखल असुन मा. न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेला आहे. निकाल होणे बाकी आहे. मा. न्यायालयाचे निकालानंतर उचित कार्यवाही करणे योग्य होईल. शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडील भूसंपादन प्रकरणे रस्त्यांची आहेत. व त्यात अनेक जमीन मालकांचे अंशतः स्वरूपात क्षेत्र संपादित होत आहे.

सध्या या कार्यालयात शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेसाठी खालीलप्रमाणे भूसंपादन प्रकरणे कार्यवाहीसाठी आहेत.

| शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकरिता भूसंपादन प्रकरणे | |
|---|---|
| अ.क्र | एसआर नंबर व प्रयोजन |
| 1 | 1/2008, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्रमांक 31 च्या पश्चिम कोप-यापासुन ते स.नं 9 मधील 18.00 मीटर विकास योजना रस्त्यापर्यंत 18 मीटर रुंद रस्त्यासाठी भूसंपादन. |
| 2 | 1/2012, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील बिरेगांव रस्ता 15.00 मीटर रुंदीकरणासाठी भूसंपादन. |
| 3 | 2/2012, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील नगर- मनमाड रस्ता ते 18 मी रुंद वळण रस्त्यास जोडणारा 15 मी रुंदीच्या रस्त्यासाठी भूसंपादन |
| 4 | 3/2012, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील हॉटेल गोरडीया समोरील 12 मी रुंदीकरणासाठी भूसंपादन (पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव् रस्ता) |
| शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकरिता भूसंपादन प्रकरणे चालु | |
| अ.क्र | |
| 5 | 6/2012, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील 24 मी रुंदीच्या रस्त्यासाठी (श्रध्दा हौसींग सोसायटी रस्ता ते बन रस्ता ते बिरेगांव रस्ता ते निमगांव शिव रस्ता, पुर्व पश्चिम व दक्षिण उत्तर रस्ता) |
| 6 | एसआर नंबर 68/2005 प्रयोजन- शिर्डी गावठाण हद्दीतील रथ रसुता ते नविन पिंपळवाडी रस्ता 9मी. रुंदीकरण भूसंपादन |

| | |
|---|---|
| 7 | 4/2015, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील पिंपळवाडी रस्त्यापासुन 18. मी रिंग रस्त्यापर्यंत 15 मी रुंदीचा रस्ता (वृदावन इमारतीकडे जाणारा) |
| 8 | 5/2015, प्रयोजनः- शिर्डी विकास योजनेतील नांदुर्खी रस्ता ते चारी रस्ता यांना जोडणारा 12.मी रुंद रस्ता (आरक्षण क्रमांक 39 च्या दक्षिणेस) |

वरीलपैकी अ.क्र 1 मध्ये प्रारुप निवाडा तयार करुन मान्यतेसाठी मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडेस सादर केला होता. त्यात त्यांनी 4 त्रुटी काढल्या होत्या. त्यापैकी 3 त्रुटींची पुर्तता करण्यात आली असुन, 1 त्रुटी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे स्तरावर बाकी आहे. या त्रुटी संबंधाने त्यांचे अभिप्राय प्राप्त होताच निवाडा पुन्हा मान्यतेसाठी फेर सादर करणेत येईल.

अ.क्र 2 ते 5 या 4 प्रकरणात 31 ऑक्टोंबर 2013 ला कलम 6 ची अधिसुचना शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत आली आहे. व पुढे कलम 9 (3)(4) चे टप्प्यापर्यंत कार्यवाही करणेत आली आहे परंतु या 4 ही प्रकरणात भूसंपादक संस्थेकडुन काहीही मोबदला रक्कम जमा करण्यात आलेली नसल्याने पुढील कार्यवाही करता आलेली नाही.कलम 6 ची अधिसुचना प्रसिध्द होवुन चौथे वर्ष सुरु झालेले आहे.अनेक वेळा मागणी करुनही मोबदला रक्कम जमा करणेबाबत भूसंपादक संस्थेकडुन काहीही कळविणेत आलेले नाही.

अ.क्र 6 हया प्रकरणात भूसंपादक संस्था शिर्डी नगरपंचायत शिर्डी हेच मोबदला रक्कम देणार असल्याने श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचा या प्रकरणात सहभाग नाही. परंतु कामकाजाच्या दृष्टिने या कार्यालयाने यात निवाडा घोषित करुन शासना तर्फे एकतर्फा ताबा घेतलेला आहे.

अ.न 7 व 8 ही दोन्ही प्रकरणे सन 2015 मध्ये नविन भूसंपादन कायदा सन 2013 नुसार प्राप्त झाली असुन, त्यात अद्याप नविन कायद्यानुसार एस.आय.ए ( समाजिक परिणाम निर्धारण अहवाल) ची कार्यवाही सुरु झालेली नाही. तथापि या 2 प्रकरणात जमीन मालकांबरोबर सध्याचा रेडीरेकनर मुल्यदर विचारात घेवुन तडजोडीने कार्यवाही करणेस हरकत नाही.

अ.क्र 1 ते 5 या प्रकरणात जवळजवळ अंतिम टप्प्यापर्यंत कार्यवाही करण्यात आलेली आहे. यातील मुल्यांकन सन 2013 मधील असल्याने आर्थिकदृष्टया पाहता, नियमीत भूसंपादनाने जमीन संपादन करणे संस्थानचे आर्थिक हिताचे दृष्टीने फायदेशीर राहील. या प्रकरणात तडजोडीने भूसंपादन करावयाचे ठरविल्यास जमीन मालक आजचे रेडीरेकनर दरानुसार मोबदला रकमेची मागणी करतील. सन 2013 च्या तुलनेत आजचे रेडीरेकनर दरात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे संस्थानचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होईल. नियमीत भूसंपादनात सन 2013 चे भूसंपादन कायद्यानुसार म्हणजेच त्यातील कलम 26 ते 30 यात दिलेल्या सुत्रानुसार मोबदला रक्कम हिशोबित करण्यात येणार असल्याने जमीन मालक जरी कोर्टात जावुन कलम 18 खालील भूसंदर्भ दाखल करतील. तरी त्यात मोबदला रक्कम वाढ होणेस फारशी संधी राहणार नाही. त्यामुळे या पाच प्रकरणात नियमीत भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण करणे उचित वाटते.

श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचेकरिता भूसंपादनाची कामे जवळजवळ संपलेली असल्याने, उपविभागीय अधिकारी शिर्डी यांचे कार्यालयातील संस्थानचे भूसंपादन कक्षास संस्थानचे काम राहीलेले नाही. फक्त शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडील विकास योजनेतील वर नमुद तपशिलाप्रमाणे भूसंपादनाची प्रकरणे राहिलेले आहेत. या प्रकरणांपैकी 7 प्रकरणात श्री साईबाबा संस्थान शिर्डी भूसंपादनासाठी निधी देणार आहे. प्रस्तुत शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे 7 प्रकरणात पुढील कार्यवाही सुरु ठेवायची असल्यास भूसंपादन कक्ष पुढे चालू ठेवावा लागेल." असे कळविलेले आहे.

तरी मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडील दि.०१/०५/२०१७ रोजीचे पत्रातील उक्त पार्श्वभूमीनुसार विषयांकित भूसंपादन कक्ष व सदर कक्षाकडे सध्या कार्यरत असलेल्या ०२ कुशल कंत्राटी (लिपीक-संवर्ग) व ०१ अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना दि.०१/०८/२०१७ पासून पुढे मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले असता, मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे कार्यालयामध्ये संस्थानमार्फत कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांनी मागील पुर्ण वर्षामध्ये कोणतेही उल्लेखनीय काम केलेले दिसून येत नाही, यामुळे मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे अधिनस्त असलेल्या भू-संपादन कक्षामध्ये संस्थानमार्फत फक्त १ लिपीक पुर्वीप्रमाणेच कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी देणेत यावा. उर्वरित सर्व कर्मचारी कमी करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.५४** **श्री.संतोष गणपत गुठळे, मदतनीस, श्री साईप्रसादालय यांचे गैरशिस्त वर्तन.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम -२००४ तरतुद-** कलम १७ (१)(झ) समिती- सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील सर्व गोष्टी करील,

**प्रस्तावना-** श्री संतोष गणपत गुठळे, हे दि. ०५-१२-२००६ पासून संस्थान सेवेत कार्यरत आहेत. १) श्री गुठळे हे श्री साईप्रसादालय विभागात वर्ग -४ कर्मचारी या पदावर कार्यरत असून त्यांची दि. ११-५-२०१४ रोजी आठवडा सुट्टी होती. त्यांनी दि.०९-५-२०१४ ते दि.१०-५-२०१४ रजा घेतलेली असून त्यांनी त्यास जोडून दि.११-०५-२०१४ रोजी आठवडा सुट्टी जोडून घेतलेली आहे. त्यांचा वरील कालावधीचा रजा अर्ज मंजूर करणेत आलेला असतांना देखील त्यांनी आठवडा सुट्टीचे दिवशी हजेरी मस्टरवर स्वाक्षरी केलेली आहे. तसेच त्यांनी परस्पर श्री साईप्रसादालयातील रात्रपाळी चावी जमा नोंद रजिस्टरवर स्वत:च्या हाताने नाव टाकून स्वाक्षरी केलेली आहे. ते सुट्टीवर असतांना कामावर हजर असलेबाबत हजेरी मस्टरला स्वाक्षरी करणे हे त्यांचे कृत्य गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

२) दि.१२-०५-२०१५ ते दि.३१-०३-२०१६ तसेच ते दि.०१-०४-२०१६ पासून ते आतापर्यंत अखेरपर्यंत या कालावधीत पुर्व परवानगीशिवाय कामावरुन गैरहजर राहिले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली. श्री. गुठळे यांना विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. असे प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय विभाग यांची निवेदने प्राप्त झालेली आहे. श्री. गुठळे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

म्हणून उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री गुठळे यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६२६/२०१४, दि.२२-०५-२०१४, जा.नं.एसएसएस//वशी-७ए/८१०/२०१४, दि.३१-०५-२०१४, जा.नं.एसएसएस//वशी-७ए/१३१०/२०१४, दि.१७-०६-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१३४०/२०१४, दि.१९-०६-२०१४, जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/१६०३/ २०१४, दि.०५-०७-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२३०१/२०१४, दि.०९-०८-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ३३०३/ २०१४, दि.१३-१०-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ३७४९/ २०१४, दि.१०-११-२०१४, जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/४४०९/२०१४, दि.१५-१२-२०१४, जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/४९९०/२०१५, दि.१२-०१-२०१५, जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/५७७७/२०१५, दि.२३-०२-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६४१३/२०१५, दि.२६-०३-२०१५, जा.नं. एसएसएस/वशी-७ए/ २३९/ २०१५, दि.१५-०४-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/९२७/२०१५, दि.१६-०५-२०१५, जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/१४५७/२०१५, दि.११-०६-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१९१७/२०१५, दि.०६-०७-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२६८९/२०१५, दि.१२-०८-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ३२३४/ २०१५, दि.०७-०९-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३८५२/२०१५, दि.१०-१०-२०१५, जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/४५११/२०१५, दि.१२-११-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४९७०/२०१५, दि.०५-१२-२०१५, जा.नं. एसएसएस/वशी-७ए/ ५५४१/ २०१६, दि.०७-०१-२०१६, जा.नं.एसएसएस//वशी-७ए/ ६१९१/ २०१६, दि.०९-०२-२०१६, जा.नं.एसएसएस/वशी-७ए /६७९०/२०१६, दि.०३-०९--२०१६, जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/१०३/२०१६, दि.११-०४-२०१६, अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढून त्यांचे लेखी खुलासे मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन श्री गुठळे यांनी दि.१७-०३-२०१६ रोजीचा लेखी खुलासा सादर केला असुन तो लेखी खुलासा असमाधानकारक आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ कलम ३ (१) प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानच्या कर्मचा-यांचे कर्तव्य:-**

१) संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

i. संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.
ii. सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल; आणि
iii. संस्थानाच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

उपरोक्तप्रमाणे सेवा वर्तणुक विनिमयांचे उल्लंघन,हे गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते. सदर गैरशिस्त वर्तन श्री. गुठळे यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवण्यात आलेले होते.

म्हणून सदर गैरशिस्तवर्तनाबाबत श्री गुठळे यांना जा.नं.एसएसएस//वशी-७ए/५४६/२०१६, दि.१६-०५-२०१६ अन्वये अभिकथनपत्र देवून, त्यांचेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी ) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ कलम ३ (१) अन्वये त्याप्रमाणे आरोप ठेवण्यात आले होते.

**प्रस्ताव:-** श्रींचे समाधीस १८ आक्टोबर-२०१८ रोजी १०० वर्षे पुर्ण होत असल्याने दि.१७ आक्टोबर-२०१७ ते १८ ऑक्टोबर-२०१८ या कालावधीत संस्थानमार्फत "श्री साई समाधी शताब्दी महोत्सव" साजरा करण्यात येणार आहे. या कालावधीत संपूर्ण वर्षभर संपुर्ण मंदिर परिसरात वेगवेगळया अत्याधुनिक लाईट इफेक्टव्दारे विद्युत रोषणाई करुन मंदिर परीसर सुशोभित करुन आकर्षक बनविणे इत्यादि कामे करावी लागणार आहे. यास अनुसरुन दि.०४-०२-२०१७ रोजी मा.विश्वस्त-श्री.जयकर साहेब यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे मा.विश्वस्तांनी सुचना केलेल्या आहेत असे प्रशासकीय अधिकारी कक्ष यांनी जा.नं.एसएसएस/ वशी/ प्र.अ./ ३९७६/ २०१७ दि.०८-०२-२०१७ अन्वये विद्युत विभागास कळविले होते.

तसेच जा.नं.एसएसएस/ काअ– स्वीय/ ५६४ / २०१७ दि.२४-०४-२०१७ चे परिपत्रकातील अ.क्र.१५ अन्वये दि.१२-०४-२०१७ रोजी झालेल्या सभेत मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांनी मंदिर व गेटवर श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१७ पूर्वी लाईट इफेक्टस दिसणेबाबतची प्रात्यक्षिक सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही तात्काळ पुर्ण करण्यात यावी असे निर्देश दिलेले होते.

त्यानुसार श्री व्दारकामाई मंडळामार्फत श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये व श्री रामनवमी उत्सवामध्ये तसेच महाराष्ट्र शासनाच्या विविध कार्यक्रमांमध्ये **(**सप्तरंग इ.**)** विद्युत रोषणाई करणारे मे.साई आर्टस ॲण्ड लाईटस, मुंबई यांना त्यांचे स्वतचे सर्व लाईटस, उपकरणे स्वत:चे वाहनव्दारे मुंबई येथून आणून ते मंदिर व मंदिर परीसरातील गेट याठिकाणी वापरुन प्रत्यक्ष डेमो विनामुल्य सादर करणेकामी दि.२३-०५-२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.०१ निर्णय क्र.४१९ (०२) अन्वये मान्यता मिळाली व त्यानुसार "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव" चे निमित्ताने करावयाच्या विद्युत रोषणाईचा डेमो (प्रात्यक्षिक) मंदीर व गेट नं ०१ येथे मे.साई आर्टस ॲण्ड लाईटस, मुंबई यांनीदिनांक १९-०५-२०१७ ते दिनांक २४-०५-२०१७ या कालावधीत विनामुल्य सादर केलेला होता. सदर विद्युत रोषणाईचा डेमो (प्रात्यक्षिक) मा.अध्यक्ष, मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी महोदया तसेच उप कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. तसेच सदर विद्युत रोषणाईचा डेमो (प्रात्यक्षिक) चे चित्रीकरण व फोटोग्राफस संस्थानचे सि.सी.टि.व्ही.विभागामार्फत काढण्यात आलेले आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव"-२०१७-२०१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परीसर व इतर संस्थान परिसरात अशाच प्रकारे विद्युत रोषणाई करावयाची असल्यास त्याकरिता खालीलप्रमाणे मटेरीयल खरेदी करावे लागणार आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**पर्याय क्र.०१). वर्षभर विद्युत रोषणाई करीता संस्थानने स्वत: मटेरीयल खरेदी केल्यास पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :-** ( ही विद्युत रोषणाई जोडणे, इलेक्ट्रॉनिक मशिनरी ऑपरेट करण्याकरीता या क्षेत्रातील कारागीर वर्षभर नेमावे लागणार आहेत. तसेच यातील मशिनरी मेन्टेनन्स, रिइन्स्टॉलेशन, रिशफल, इत्यादि कामासाठीचा खर्च वेगळा दर्शविला आहे.)

| A) | LIGHTING MATRIEAL | | | |
|---|---|---|---|---|
| SR.NO | PARTICULAR | QTY | RATE | AMT. |
| 1 | 1 MTR FIXEL TUBE | 2000 | 1000 | 2000000 |
| 2 | 1/2 MTR FIXEL TUBE | 1000 | 500 | 500000 |
| 3 | LED Roap Lights (Meter) | 1000 | 2500 | 2500000 |
| 4 | Sharpy | 48 | 125000 | 6000000 |
| 5 | MATRIX SOFTWARE KEY | 2 | 290000 | 580000 |
| 6 | NEBULA | 8 | 30000 | 240000 |
| 7 | LAPTOP | 2 | 60000 | 120000 |
| 8 | DMX CONTROLBOARD SMALL<br>SGM PILOT 2000 | 5 | 75000 | 375000 |
| 9 | AVO BOARD 2010 | 2 | 200000 | 400000 |
| 10 | AVO SPLITER | 12 | 65000 | 780000 |
| 11 | UPS | 6 | 9500 | 57000 |
| 12 | FIXEL LED BULB | 250000 | 12 | 3000000 |
| 13 | SERIES LED BULB(400000) | 2000 | 1500 | 3000000 |
| 14 | LED Flud Lights (For Trees) | 150 | 3500 | 525000 |
| 15 | CAM2/ETZ (SS338ET) | 400 | 17250 | 6900000 |
| 16 | SUPER SOLAR-2 ze/ETZ (SS342XCET) | 300 | 50250 | 15075000 |
| 17 | PANELCYC- ze/ETZ (SS346XCET) | 36 | 82500 | 2970000 |
| 18 | pixiCYC/ETZ (SS335XCET) | 100 | 42500 | 4250000 |
| 19 | TARPON i90 Black (AM723XWT) | 36 | 117000 | 4212000 |
| 20 | MAIN WIRE / POWER CABLE<br>EXCELER WIRE FOR DMX CONTROL<br>C FORM MALE/FEMALE | | | 1400000 |
| 21 | 3 MTR PATCH CODE (COMPUTER) | 500 | 350 | 175000 |
| 22 | AUTOMATIC MAIN DISTRIBUTION | 6 | 70000 | 420000 |
| | **Total :-** | | | 55479000 |
| | **Vat @ 13.5 %** | | | 7489665 |
| | **Total Amount (A) :-** | | | **62968665/-** |
| **B)** | **OPERATOR / SERVICE & MAINTANACE** | | | |
| 1 | Lighting Designer 1 | | LUMSUM | 100000 |
| 2 | OPERATOR 2 X15000 PER MONTH | 12 | 30000 | 360000 |
| 3 | Technician 6 persons at Rs 15000/- per month | 12 | 90000 | 1080000 |
| | **Total :-** | | | 1540000 |
| | **S.T.Should be charge @15% on the Amt.** | | | 231000 |
| | **Total Amount (B) :-** | | | **1771000/-** |
| | | | | |
| **C)** | **FABRICATION & STRUCTURE** | | | |
| **1** | Frames 1x3 & ½ x 3 | | LUMSUM | 500000 |
| **2** | Fitting,Nut Bolts & Extra | | LUMSUM | 50000 |
| | **Total :-** | | | 550000 |
| | **S.T.Should be charge @15% on the Amt.** | | | 82500 |
| | **Total Amount (C) :-** | | | **632500/-** |
| | **Total (A+B+C) :-** | | | **65372165/-** |

वरिल साहित्य जोडण्यासाठी ठिकठिकाणी लोखंडी विविध डिझाईन्स बनावे लागणार आहे. त्याचाही अंदाजे खर्च धरला आहे.

**पर्याय क्र.०२).** विद्युत रोषणाई करीता वरीलप्रमाणे सर्व मटेरीअल वर्षभर भाडोत्री घेतल्यास पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे:-

| Sr.No | PARTICULAR | QTY | Amt. |
|---|---|---|---|
| 1 | **Light Hire Charges** | **Above All Material** | 39223299/- |
| | Service Tax Should be Charge @ 15 % On the Amount | | 5883495/- |
| | **Total Rs :-** | | **45106794/-** |

**पर्याय क्र.०३).** विद्युत रोषणाई करीता वरीलप्रमाणे सर्व मटेरीयल वर्षभर प्रतिमहिना १० दिवस भाडोत्री घेतल्यास पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे:-

| Sr.No | PARTICULAR | QTY | Amt. |
|---|---|---|---|
| 1 | **Light Hire Charges** | **Above All Material** | 26148866 |
| | Service Tax Should be Charge @ 15 % On the Amount | | 3922330 |
| | **Total Rs :-** | | **30071196/-** |

**पर्याय क्र.०४).** विद्युत रोषणाई करीता वरीलप्रमाणे सर्व मटेरीयल श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७, शिर्डी महोत्सव-२०१७ (नाताळ), श्री रामनवमी उत्सव-२०१८, श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१८ व श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ या उत्सव कालावधीत (प्रत्येक १० दिवस) भाडोत्री घेतल्यास पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :-

| Sr.No | PARTICULAR | QTY | Amt. |
|---|---|---|---|
| 1 | Light Hire Charges | Above All Material | 16343041 |
| A) | Dasara Utsav -2017 10 Days | | |
| B) | Shirdi festival -2017 10 Days (Natal) | | |
| C) | Ramnavmi Utsav -2018 10 Days | | |
| D) | Gurupornima Utsav -2018 10 Days | | |
| E) | Dasara Utsav -2018 10 Days | | |
| Service Tax Should be Charge @ 15 % On the Amount **Total Rs :-** | | | 2451456 |
| | | **Total Rs :-** | **18794497/-** |

**मागणी:-** "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव" २०१७-२०१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परीसर व इतर संस्थान परीसरात विद्युत रोषणाई करणेकामी संस्थानमार्फत मटेरीयल खरेदी करावयाचे झाल्यास अंदाजे रक्कम रुपये ६,५३,७२,१६५/- अपेक्षित आहे. तसेच सदरचे सर्व मटेरीयल वर्षभर भाडे तत्त्वावर घेतल्यास अंदाजे रक्कम रुपये ४,५१,०६,७९४/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे सर्व मटेरीयल वर्षभर प्रतिमाह १० दिवस भाडे तत्त्वावर घेतल्यास अंदाजे रक्कम रुपये ३,००,७१,१९६/- इतका खर्च अपेक्षित आहे. व विद्युत रोषणाई करीता वरीलप्रमाणे सर्व मटेरीयल श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७, शिर्डी महोत्सव-२०१७ (नाताळ), श्री रामनवमी उत्सव-२०१८, श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१८ व श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ या उत्सव कालावधीत (प्रत्येक १० दिवस) भाडोत्री घेतल्यास अंदाजे रक्कम रुपये १,८७,९४,४९७/- इतका खर्च अपेक्षित आहे. याव्यतिरिक्त या रोषणाईसाठी गरज पडल्यास भाडोत्री जनरेटरसेट लावावे लागणार आहे. त्याचा खर्च प्रतिदिन रुपये १०,०००/- (प्रत्यक्ष वापर दिवस) + इंधन संस्थानमार्फत पुरवावे लागेल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव" २०१७-२०१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परीसरात विद्युत रोषणाई करणेकामी वरील चार पर्याय पैकी कोणत्या पर्याया संबंधी ई-निविदेची कार्यवाही करावी, याबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय झाल्यानंतर सदर विद्युत रोषणाईकरीता येणा-या खर्चास व याकामाकरीता बाहेरील ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी जास्त खपाच्या मराठी व इंग्रजीतील मुंबई-पुणे येथील आवृत्तीच्या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-

निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट देखाव्यासाठी खुपच जास्त खर्च येत आहे. याकरीता समाधी शताब्दी महोत्सवामध्ये प्रस्तावातील पर्याय क्र.०४ मध्ये नमुद केलेपैकी पुण्यतिथी उत्सव- २०१७ मध्ये ०३ दिवस, रामनवमी उत्सव- २०१८ मध्ये ०३ दिवस, गुरुपौर्णिमा उत्सव- २०१८ मध्ये ०३ व पुण्यतिथी उत्सव- २०१८ मध्ये १० दिवस तसेच शिर्डी महोत्सव- २०१७ मध्ये ११ दिवस (दिनांक २३.०२.२०१७ ते दिनांक ०२.०१.२०१८) मंदिर/ मंदिर परिसरामध्ये, बाहेरील विद्युत एजन्सींमार्फत विद्युत रोषणाई करणेत यावी, याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच मंदिर व मंदिर परिसराच्या सर्व महाद्वारांवर समाधी शताब्दी कालावधीमध्ये संस्थानमार्फत लाईट इफेक्ट करणेत यावे. यासाठी आवश्यक असलेले साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.६२** **औद्योगिक प्रशिक्षण संस्था व निमगांव कोऱ्हाळे नविन सेवाधाम स्टाफ क्वॅार्टरसाठी चेंजओव्हर स्विच (ATS) खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:- (क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला (Industrial Training Institute) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून थ्री फेज वीजपुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा विद्युतपुरवठा खंडीत झाल्यानंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला ५०० रुमकडील जनरेटरचा सप्लाय देणेसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे पॅनेल रुम मध्ये विद्युत विभागामार्फत जुन्यातील चेंजओव्हर स्विच बसविला आहे. हा चेंजओव्हर जुना असल्याने गरम होत आहे. त्याठिकाणी Automatic Supply Tranfer Switch (Change Over Switch) खरेदी करुन बसविणे गरजेचा आहे.

तसेच निमगांव को-हाळे येथे संस्थान अधिकारी/ कर्मचारी यांचे निवासाकरीता ८ स्टाफ क्वॅार्टर सेवाधाम इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. या इमारतींमध्ये राहणारे अधिकारी/ कर्मचारी यांनी सदरील इमारतींमधील रुमकरीता जनरेटरचा वीजपुरवठा जोडणी करुन मिळणेबाबत दिनांक १९-०५-२०१७ रोजी संस्थानकडे अर्ज केलेला आहे. त्यांचे विनंती अर्जामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, संस्थानचे साईनगर स्टाफ क्वॅार्टर तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) जवळील स्टाफ क्वॅार्टर येथील अधिकारी/ कर्मचारी वसाहतीकरीता जनरेटरचा विद्युतपुरवठा जोडून देण्यात आलेला आहे. त्याच धर्तीवर निमगांव को-हाळे शिवारातील स्टाफ क्वॅार्टर करीता जनरेटर सप्लाय जोडून देण्यात यावा अशी मागणी करण्यात आलेली आहे.

निमगांव को-हाळे स्टाफ क्वॅार्टर करीता स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर व सबस्टेशनची उभारणी करुन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून स्वतंत्र ११ केव्हीए/ ४४० व्होल्ट सप्लाय जोडून घेण्यात आलेला आहे. परंतू याठिकाणी जनरेटर बसविण्यात आलेला नाही. सेवाधाम इमारतीपासून जवळच असलेल्या साईधर्मशाळा येथून (डी.जी.रुमपासून) स्टाफ क्वॅार्टर पर्यंत एक केबल टाकण्यात आलेली आहे. या केबल मधून स्टाफ क्वॅार्टर परीसर, स्ट्रीट लाईट व इमारतींच्या गॅलरीमध्ये जनरेटर सप्लाय देण्यात आलेला आहे. याच केबलवरुन स्टाफ क्वॅार्टर इमारतींच्या रुममध्ये जनरेटरचा सप्लाय जोडणे शक्य आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीची लाईट

गेल्यानंतर इमारतीतील क्वॉर्टरमधून अंधार होतो. परंतु याकरीता ०१ नग Automatic Supply Tranfer Switch (Change Over Switch) खरेदी करावा लागेल.

**मागणी:-** उपरोक्तप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता ०१ नग Automatic Supply Transfer Switch व निमगांव को-हाळे स्टाफ क्वॉर्टर करीता ०१ नग Automatic Transfer Switch खरेदी करावा लागणार आहे. खरेदी कराव्या लागणा-या Automatic Transfer Switch चा तपशील पुढीलप्रमाणे आहे. उपरोक्त ठिकाणी लावणेकरीता खरेदी कराव्या लागणा-या स्टॅण्ड फॅनचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Description | Quantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | HPL Make, Automatic Supply Transfer Switch in sheet metal enclosure. Item code = ATyS M6e – 125AMP | 02 Nos. | Rs.60,000/- | Rs.1,20,000/- |
| | | **Total Amount :-** | | **Rs.1,20,000/-** |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्तप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता ०१ नग Automatic Transfer Switch व निमगांव को-हाळे येथील नविन स्टाफ क्वॉर्टर करीता ०१ नग Automatic Transfer Supply Switch खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रुपये १,२०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरची खरेदी करणेकरीता शासन निर्णयानुसार बाहेरील विद्युत साहित्य पुरवठादार यांना पत्र पाठवून कोटेशन मागविणेकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन कोटेशन बोलविणेस तसेच कोटेशन प्राप्त झाल्यानंतर कोटेशन खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता ०१ नग Automatic Transfer Switch व निमगांव को-हाळे येथील नविन स्टाफ क्वॉर्टर करीता ०१ नग Automatic Transfer Supply Switch खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,२०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.६३** **शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता आवश्यक लागणारे कुशल कंत्राटी शिक्षक रिक्त पदे कंत्राटदारांमार्फत आऊटसोर्स पध्दतीने घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक–** उपरोक्त संदर्भान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी ही शाळा महाराष्ट्र शासनाचे मान्यतेने श्री साईबाबा संस्थान यांचेकडून कायम विनाअनुदानीत तत्वावर चालविली जाते. आपल्या शाळेची प्राथमिक विभागाची इ. १ ली ते ७ वी पर्यंत व माध्यमिक विभागाची इ.८ वी ते १० वी पर्यंत नियमानुसार मान्यता आहे. परंतू सन १९९० पासून सुरु करण्यात आली तेव्हापासून आपल्या शाळेत पुर्वप्राथमिक विभाग ज्यु. केजी व सि. केजी. वर्गांनां प्रवेश देण्यात येत असून आज अखेरपर्यंत पुर्व प्राथमिक विभागाची शालेय मान्यता घेण्यात आलेली नाही. परंतू शाळेचा शिक्षक व शिक्षकेतर आकृतीबंध मंजूर करतांना पुर्व प्राथमिक विभाग ०८ सहा. शिक्षक मंजूर करुन घेण्यात आलेला आहे. श्री साईबाबा संस्थान प्रशासन व तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने पुर्व प्राथमिक विभागात पाल्यांना प्रवेश देवून तेच विद्यार्थीपुढे इयत्ता १ ली साठी प्रविष्ट करुन घेतले व पुढील वेळोवेळी शालेय मान्यता घेऊन तुकडी मान्यता घेण्यात आलेल्या आहेत.

**सन १९९० ते २०१७ अखेर ज्यु. केजी वर्ग तुकडी तपशिल खालीप्रमाणे आहे.**

| अ. नं. | सन | ज्यु. केजी कार्यरत तुकडी | ज्यु. केजी कडे वाढ झालेली तुकडी संख्या | ज्यु. केजी कडे कमी झालेली तुकडी संख्या | ज्यु. केजी विभाग एकूण कार्यरत तुकडी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९९० ते १९९८ | ०२ | --- | -- | ०२ |
| २ | १९९९ ते २००३ | ०२ | ०१ | -- | ०३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | २००४ ते २००६ | ०२ | --- | ०१ | ०२ |
| ४ | २००६ ते २००७ | ०२ | ०१ | -- | ०३ |
| ५ | २००८ ते २००९ | ०३ | ०२ | -- | ०५ |
| ६ | २००९ ते २०१० | ०३ | --- | ०२ | ०३ |
| ७ | २०१० ते २०१३ | ०३ | ०३ | -- | ०६ |
| ८ | २०१३ ते २०१७ अखेर | ०५ | -- | ०१ | ०५ |

शाळेच्या शिक्षणाचा दर्जा व इतर शाळेच्या तुलनेत अत्यंत अल्पदरात असलेले शैक्षणिक शुल्क व स्कुलबस शुल्क विचारात घेता पालकांनी आपल्या शाळेला मोठयाप्रमाणावर पसंती देवून पाल्यांला शाळेत प्रवेश मिळणेसाठी त्यावेळेचे मा. व्यवस्थापन समितीकडे व प्रशासनाकडे पाठपुरावा करुन प्रसंगी आंदोलन करुन ज्यु. केजी वर्ग तुकडी वाढविण्यास भाग पाडले. सदर वर्ग तुकडीवाढ होणेसाठी मिडीयाचा वापर करुन तसेच राजकीय दबाव आणून ज्यु. केजी चे प्रवेश वाढविले यामुळे सन २०१० ते २०१७ अखेर वर्ग तुकडीमध्ये मोठयाप्रमाणावर वाढ झालेली दिसून येते. सदरचे केजी विभागाचे विद्यार्थी पुढे सालाबाद प्रमाणे वरच्या वर्गात प्रवेशीत करण्यात आले व विद्यार्थी संख्या नुसार वेळोवेळी शिक्षक भरती करावी लागली आहे. संस्थानचा आकृतीबंध हा सन २००९ मध्ये मंजूर करण्यात आला त्यानंतर कुठलाही आकृतीबंधात मंजूरीबाबत वाढ करण्यात आलेली नाही. परंतू नैसर्गिक तुकडी वाढीमुळे वाढलेल्या वर्ग तुकडींना अध्यापन करणेकरीता आवश्यकतेनुसार सहा. शिक्षक भरती करावी लागली आहे. सन २०१२ मध्ये ०५ शिक्षण सेवक प्राथमिक विभागाकडे जाहिरात देवून भरण्यात आले आहे परंतू आकृतीबंधात पंदाची मंजूरी नसल्याने त्यांचा अद्याप संस्थान सेवेत कायम करण्यात आलेले नाही.

तसेच वर्ग तुकडीमध्ये झालेली नैसर्गिक वाढ विचारात घेता वाढीव वर्ग तुकडीला अध्यापन करणेकामी कंत्राटी पद्धतीने कंत्राटदारांमार्फत कंत्राटी शिक्षक नेमण्यात आले असून त्याचे मार्फत विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम करण्यात येत आहे. ज्यु. केजीच्या एकूण नैसर्गिक वाढीने विद्यार्थी संख्या दरवर्षी वाढत आहे. सदर स्कुलचे पुर्व प्राथमिक विभाग एकूण विद्यार्थी ५१३, प्राथमिक विभाग इयता १ ली ते ७ वी एकूण विद्यार्थी संख्या १६४३ आहे. व इयत्ता ८ वी ते १० वी एकूण विद्यार्थी संख्या ३४० आहे. असे शाळेत एकूण २४९६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एकूण ३४ वर्गखोल्यांमध्ये अध्यापनाचे काम अविरतपणे करण्यात येत आहे. शाळा दोन सत्रात कार्यरत असून केजी विभाग व इयत्ता ६ वी ते १० वी सकाळसत्रात भरते. तसेच इयत्ता १ ली ते ५ वी दुपारसत्रात भरविण्यात येते. यासाठी एकूण ३४ वर्ग खोल्या वापरात आहेत. सन २०१७-१८ मध्ये शालेय वेळेत बदल करण्यात येत असून मान्यतेनुसार प्राथमिक विभाग इ.१ ली ते ७ वी ३५ वर्ग तुकडी सकाळचे सत्रात सकाळी ०७.१५ ते १२.१५ यावेळेत भरविण्यात येत आहे तसेच ज्यु. केजी , सिनी. केजी. १० वर्ग व माध्यमिक विभाग ८ वी ते १० वी एकूण ०९ वर्ग तुकडी या दुपारचे वेळेत दुपारी १२.३० ते ०५.३० या वेळेत भरविण्यात येणार आहेत याबाबत मंजूरी मिळालेली आहे.

सन २००९ मध्ये शाळेकडील आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला असून त्यावेळेची विद्यार्थी संख्या, शिक्षक संख्या व आजची विद्यार्थी यामध्ये अमुलाग्र बदल झाला आहे. सन २०१७ -१८ शैक्षणिक वर्षात वर्ग तुकडीत नैसर्गिक वाढ झाल्याने शिक्षक संख्या कमी पडत आहे. तरी खालीलप्रमाणे आवश्यक लागणारे कंत्राटी शिक्षक भरावे लागतील जेणेकरुन शालेय व्यवस्थापन सुरळीत चालणेस मदत होईल.

| पदनाम | मंजुर आकृतीबंध २००९ | | | कार्यरत असलेले कायम व कंत्राटी कर्मचारी | | | आवश्यक लागणारे कुशल कंत्राटी सहा.शिक्षक कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कायम | कंत्राटी | एकूण | कायम | कंत्राटी | एकूण | कायम | कंत्राटी | एकूण |
| प्राचार्य | १ | ---- | १ | १ | ० | १ | ० | ० | ० |
| मुख्याध्यापिका | ० | ---- | ० | १ | ० | १ | ० | ० | ० |
| सहा. शिक्षक (माध्यमिक) | ८ | ---- | ८ | ७ | २ | ९ | ० | ४ | ४ |
| संगणक शिक्षक (माध्यमिक) | १ | ---- | १ | १ | ० | १ | ० | ० | ० |
| उच्च प्राथमिक सहा. शिक्षक | ४ | ---- | ४ | ८ | १ | ९ | ० | ३ | ३ |
| प्राथमिक शिक्षक | ८ | ---- | ८ | १४ | १४ | २८ | ० | ० | ० |
| संगणक शिक्षक (प्राथमिक) | १ | ---- | १ | १ | १ | २ | ० | ० | ० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुर्व प्राथमिक सहा. शिक्षक | ८ | ---- | ८ | २ | ८ | १० | ० | ० | ० |
| वरिष्ठ लिपीक | १ | ---- | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| लिपीक- टंकलेखक | १ | ---- | १ | १ | २ | ३ | ० | ० | ० |
| मदतनिस पुरुष | ९ | ---- | ९ | ५ | ९ | १४ | ० | ० | ० |
| मदतनिस स्त्री | ४ | ---- | ४ | ४ | ७ | ११ | ० | ० | ० |
| शिपाई | १ | ---- | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण संख्या | ४७ | ---- | ४७ | ४५ | ४४ | ८९ | ० | ७ | ७ |

**मागणी-**श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये उच्च प्राथमिक विभाग इयत्ता ६ वीचे वर्ग तुकडीत नैसर्गिक वाढ होत असल्याने कुशल कंत्राटी ०३ शिक्षक भरती करावी लागणार आहे. तसेच इयत्ता ८ वी व ९ वीचे वर्गतुकडीत नैसर्गिक वाढ होत असल्याने कुशल कंत्राटी ०४ शिक्षक भरती करावी लागणार आहे. उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये असे सुचीत करण्यात आले आहे की, आपले विभागासाठी स्थायी व एकत्रीत मानधनावर कंत्राटी पद्धतीने भरती करावयाची झाल्यास मंजुर पदे, संस्थान अधिनियम व मंजूर आकृतीबंधातील तरतुदी विचारात घेऊन पदभरतीचे प्रस्ताव संबधित आस्थापनेमार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावीत तसेच मंजुर आकृतीबंध व अधिनियमातील तरतुदी शिवाय पदे भरती करण्यात येऊ नये असे नमूद आहे. आजमितीस उच्च प्राथमिक इयत्ता ५ वी ते ७ वी व माध्यमिक विभाग ८ वी ते १० करीता खालीलप्रमाणे वर्ग तुकडी व शिक्षक कार्यरत असून संभाव्य लागणारे कंत्राटी शिक्षक खालील तक्त्यात नमूद केले आहे.

शाळा सहिंतानुसार इयत्ता १ ली ते ४ थी शिक्षकांचे प्रमाण (एक वर्ग तुकडी एक शिक्षक) याप्रमाणे असते.

शाळा सहिंतानुसार इयत्ता ५ वी ते ७ वी शिक्षकांचे प्रमाण ( १.३ ) याप्रमाणे असते.

| **सन २०१६-२०१७ कार्यरत असलेल्या वर्ग तुकडी** | | | **सन २०१७-२०१८ संभाव्य होणाऱ्या वर्ग तुकडी** | | | **२०१७-१८ रिक्त पदे** |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता वर्ग | तुकडी संख्या | उपलब्ध शिक्षक कायम व कंत्राटी | इयत्ता वर्ग | तुकडी संख्या | उपलब्ध शिक्षक कायम व कंत्राटी | भरावयाची कंत्राटी पदे |
| १ ली ते ४ थी | २१ | २१ | १ ली ते ४ थी | २० | २० | ----- |
| इयत्ता ५ वी | ६ | | इयत्ता ५ वी | ६ | | |
| इयत्ता ६ वी | ३ | १७ | इयत्ता ६ वी | ६ | १८ | ०२ |
| इयत्ता ७ वी | ४ | | इयत्ता ७ वी | ३ | | |
| | | | संगीत शिक्षक | ---- | -------- | ०१ |
| एकूण | ३४ | | | ३५ | | ०३ |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे उच्च प्राथमिक विभागाकडे ६ वीचे वर्ग तुकडीमध्ये नैसर्गिक वाढ झाल्याने कंत्राटी भरती करावयाचे शिक्षंकामध्ये डी. एड. पात्रता ०२ शिक्षक व संगीत विशारद पात्रता ०१ शिक्षक (क्रीडा शिक्षक) घेण्यात यावा असे एकूण ०३ कंत्राटी शिक्षक घ्यावे लागतील. याबात मा. अध्यक्ष सो. यांनी स्कुलकडे ०१ संगीत शिक्षक नेमावा असे सूचीतही केलेले आहे. जेणेकरुन विद्यार्थ्यांना संगीताचे ज्ञान देता येईल.

**शाळा सहिंतानुसार इयत्ता ८ वी ते १० वी शिक्षकांचे प्रमाण ( १.५ ) याप्रमाणे असते.**

| **सन २०१६-२०१७ कार्यरत असलेल्या वर्ग तुकडी** | | | **सन २०१७-२०१८ संभाव्य होणाऱ्या वर्ग तुकडी** | | | **२०१७-१८ रिक्त पदे** |
|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता वर्ग | तुकडी संख्या | उपलब्ध शिक्षक कायम व कंत्राटी | इयत्ता वर्ग | तुकडी संख्या | उपलब्ध शिक्षक कायम व कंत्राटी | भरावयाची कंत्राटी पदे |
| इयत्ता ८ वी | ३ | | इयत्ता ८ वी | ४ | | |
| इयत्ता ९ वी | २ | ११ | इयत्ता ९ वी | ३ | ११ | ०२ |
| इयत्ता १० वी | २ | | इयत्ता १० वी | २ | | |
| | | | कला-संगीत शिक्षक | ---- | -------- | ०१ |
| एकूण | ७ | | | ९ | | ०३ |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे माध्यमिक विभागाकडे वर्ग तुकडीमध्ये नैसर्गिक वाढ झाल्याने कंत्राटी भरती करावयाचे शिक्षंकामध्ये बी.ए.बी.एड. ( इंग्रजी स्पे., इतिहास भुगोल) ०१ शिक्षक , बी.ए.बी.एड. (हिंदी स्पे. ) ०१ शिक्षक असे एकूण ०२ कंत्राटी शिक्षक तसेच मा. अध्यक्ष सो. यांचे सुचनेनुसार स्कुलकडे ०१ संगीत शिक्षक असे एकूण ०३ शिक्षक नेमावे लागतील.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:-**शालेय प्रशासनाचा भाग म्हणून गरजेचे आहे.

१) नैसर्गिक तुकडी वाढ करतांना वाढीव आकृतीबंधास मंजूरी घेतलेली नाही. २) सदर पदे आकृतीबंधात मंजूर नाहीत. ३) सदरचे पदे कंत्राटी स्वरुपात भरवयाची आहेत.

**विभागाचा अभिप्राय-** सदरची पदे आकृतीबंधात मंजूर नसल्याने व नैसर्गिक तुकडीत वाढ झालेली असल्याने नविन शिक्षक घेणे गरजेचे आहे. तरी सध्या कंत्राटदारांमार्फत आऊटसोर्स पद्धतीने कुशल कामगारांचे वेतन देऊन प्राथमिक विभाग डी. एड. पात्रता असलेले ०२ शिक्षक व ०१ संगीत शिक्षक असे ०३ शिक्षक तसेच व माध्यमिक विभागासाठी बी.ए.बी.एड. ( इंग्रजी स्पे., इतिहास भुगोल) पात्रता असलेला ०१ शिक्षक, बी.ए.बी.एड. (हिंदी स्पे.) पात्रता असलेला ०१ शिक्षक असे ०२ शिक्षक व ०१ कला- संगीत शिक्षक असे ०३ असे एकूण ०६ कुशल कंत्राटी शिक्षक नेमणेस मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.५८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित पदे आकृतीबंधात मंजूर नसल्याने व नैसर्गिक तुकडीत वाढ झालेली असल्याने नविन शिक्षक घेणे आवश्यक असल्याने प्राथमिक विभागासाठी डी. एड. पात्रता असलेले ०२ शिक्षक व ०१ संगीत शिक्षक तसेच माध्यमिक विभागासाठी बी.ए.बी.एड. (इंग्रजी स्पे., इतिहास भुगोल) पात्रता असलेला ०१ शिक्षक, बी.ए.बी.एड. (हिंदी स्पे.) पात्रता असलेला ०१ शिक्षक असे ०२ शिक्षक व ०१ कला- संगीत शिक्षक असे एकूण ०६ शिक्षक सध्या संस्थानला कंत्राटी पध्दतीने कुशल/ अकुशल कर्मचारी पुरविणाऱ्या कंत्राटदारांमार्फत आऊटसोर्स पद्धतीने कुशल कामगारांचे वेतन देण्यात येऊन, कामावर घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.६४** **सर्व शैक्षणिक संकुल प्राचार्य व सहा.शिक्षक यांना ड्रेसकोड (ब्लेझर) खरेदीकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र -.दि. ०९ .१०.२०१६ रोजीची सभा निर्णय क्र. ६८९**

**प्रास्तविक – संदर्भ ०१)** मा . व्यवस्थापन समिती दि. २८.११.२०१५ रोजीची सभा निर्णय क्र. ५३० अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाकडील पुरुष/ स्त्री शिक्षक कर्मचारी यांना गणवेश/ साडया खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु. ९३,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

**संदर्भ २ )** श्री साईबाबा औद्यगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशक कर्मचारी यांचेकरीता नियमित गणवेष खरेदीकामी मा . व्यवस्थापन समिती दि. ०२.०४.२०१६ रोजीची सभा निर्णय क्र. २२८ स्टाप नियमित गणवेष खरेदी करणेकामी रक्कम रुपये ४८,०००/- खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

**संदर्भः- ३ )** मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९.१०.२०१६ रोजीची सभा विषय नं. ०२ निर्णय क्र. ६८९ अन्वये (०७) यावर सविस्तर चर्चा होऊन इंग्लिश मिडीयम स्कुल मधील सहा. शिक्षक पुरुष यांना गणवेश व स्त्री शिक्षिका यांना साडया खरेदीकामीचा उपरोक्त विषय रद्द करणेत येऊन, शैक्षणिक संकुलांकडील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना गणवेश देणेसाठीचा एकत्रित प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.

परंतू सदरहू इतिवृत वाचून कायम करत असतांना, शैक्षणिक संकुलाकडील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना संस्थान गणवेश देणेऐवजी ड्रेसकोड देण्यात यावा, असे ठरले.

**मागणीः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित शैक्षणिक संकुलात श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, श्री साईबाबा औद्यगिक प्रशिक्षण संस्था व श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ

महाविद्यालय असे विभाग कार्यरत असून सदर विभागाकडे खालीलप्रमाणे प्राचार्य, मुख्याध्यापक व सहा. शिक्षक कायम सेवेत कार्यरत आहेत.

| अ.नं | विभागाचे नांव | शिक्षक महिला | शिक्षक पुरुष | मुख्याध्यापिका | प्राचार्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साईबाबा इं. मि. स्कुल | २३ | १० | ०१ | ०१ |
| २ | औद्यगिक प्रशिक्षण संस्था | ०१ | २९ | ०० | ०१ |
| ३ | कन्या विद्या मंदीर | ०३ | १२ | ०१ | ०० |
| ४ | कनिष्ठ महाविद्यालय | ११ | ०९ | ०० | ०० |
| | एकूण | **४८** | **६०** | **०२** | **०२** |

यापूर्वी सन २०११ मध्ये शैक्षणिक संकुलातील सहा. शिक्षकांना ड्रेस व शिक्षिकांना साडया संस्थानचे वतीने प्रशासन शाखा कार्यासन ५ मार्फत देण्यात आलेले आहे. मा. स्थानिक समिती दि. १६.०९.२०१६ रोजीचे सभेत संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल मार्फत शिक्षकांना ड्रेस देणेकामी प्रस्ताव सादर केला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानचे शैक्षणिक संकुलातील सर्व सहा. शिक्षकांना ड्रेस कोड देण्यात यावा असे ठरल्याने शैक्षणिक संकुलाकडील सर्व प्राचार्य व मुख्याध्यापिका यांचे चर्चेअंती असे ठरले की, सर्व सहा. शिक्षकांना नेव्हीब्ल्यु रंगाचे ब्लेझर खरेदी करण्यात यावे व सदरचे ब्लेझरवर श्री साईबाबा संस्थानचा लोगो छपाई करुन घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले आहे. संस्थानचे चारही शैक्षणिक संकुलात एकूण ०२ पुरुष प्राचार्य व ०२ स्त्री मुख्याध्यापिका असे एकूण ०४ व सहा. शिक्षक व शिक्षिका एकूण संख्या १०८ अशी असून एकूण ११२ नग ब्लेझर खरेदी करावे लागणार आहेत.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:-** आर्थिक खर्चाची बाब आहे.

**विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत-** प्रस्ताविक मध्ये नमुद केलेप्रमाणे सर्व स्त्री व पुरुष शिक्षक कर्मचारी यांचेसाठी एकाच रंगाचे ब्लेझर खरेदी करणेत यावे जेणेकरुन ड्रेसकोड दिसून येईल असे नम्र मत आहे. याकामी बाजारपेठेत चौकशी केली असता ०१ नग ब्लेझर व त्यावर श्री साईबाबा संस्थानचा लोगो छपाई खरेदीकामी अंदाजे रु. १४००/- (अक्षरी रुपये एक हजार चारशे मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. याकामी एकूण ११२ नग खरेदीसाठी अंदाजे रु. १,५६,८००/- ( अक्षरी रुपये एक लाख छपन्न हजार आठशे मात्र ) खर्च येणार असून संस्थानमार्फत खरेदी करणेत यावे व याबाबतची कार्यवाही वशी-५ विभागाकडून करण्यात यावी असे नम्र मत आहे. तरी सदर खरेदी कार्यवाही वशी-५ विभागकडून करावयाची असल्याने याकामी येणा-या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेकरीता निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.५८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सर्व शैक्षणिक संकुल प्राचार्य व सहा.शिक्षक यांना संस्थानमार्फत ब्लेझर न देता त्याचा कोड ठरवून देण्यात यावा व त्याप्रमाणे सर्व शिक्षकांनी स्वखर्चाने ब्लेझर खरेदी करावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.६५** **सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील लाडु व बर्फी प्रसाद निर्मीती विभागातील कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ) -** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१) घ नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

**प्रास्ताविक–** लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागांतर्गत श्रीं चे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांचे गर्दीनुसार दररोज सरासरी अंदाजे ४० ते ५० हजार मोफत बुंदी प्रसाद पाकीटे तसेच सरासरी २५ ते ३० हजार लाडु प्रसाद पाकीटांची निर्मिती करुन कॅन्टीन विभागामार्फत वाटप व विक्री केली जाते. श्रींचे उत्सवामध्ये ही संख्या वाढुन अंदाजे ६५ ते ७० हजार मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप केले जाते व अंदाजे ३५ ते ४० हजार लाडु प्रसाद पाकीटांची विक्री केली जाते. याकामी लागणारे कडधान्य (हरभरा दाळ) मशिनव्दारे व मनुष्यबळाव्दारे दाळीमध्ये निघणा-या काडया ,खडे काढुन स्वच्छ करण्यात येते व त्यानंतर पीठ गिरणीवर सदरची हरभरा दाळ दळुन घ्यावी लागते, दाळ दळल्यानंतर तिच्या वजनामध्ये घट-तुट येते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०७.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) अन्वये, सन २००७-०८ या आर्थिक वर्षात आलेली प्रत्यक्ष घट/तुट खर्ची टाकण्यात आली होती. मात्र सदरील घट-तुटीस

मान्यता देतांना अंतर्गत लेखापरीक्षक- मा.श्री ए.जी.लोंगाणी व मुख्यलेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी खालीलप्रमाणे सुचना (नियमावली) सुचविलेली होती त्यास मा.व्यवस्थापन समितीने दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६० (३१) नुसार मान्यता मिळालेली आहे.

१. सन २००७-०८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असुन इतरांचे तुलनेने कमी असल्याने प्रस्तावित प्रमाणानुसार घट-तुट जमा-नांवे टाकणेत यावी.

२. दर ६ महिन्यांनी प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची पडताळणी करावी.

३. दर ६ महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर अवलोकनार्थ सादर करावा, मात्र प्रस्तावित सरासरीपेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्तप्रमाणे नियमावलीनुसार दरवर्षी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील एकुण खर्ची पडलेल्या किराणा मालातील प्रत्यक्ष आलेली घट-तुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेत आलेली आहे.

**मागणी-** सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिस्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आली होती.

खालील घट-तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेंली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीच्या प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे सदरील घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्र.०३ नुसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करावा लागणार आहे.

**सन २०१६-१७ मध्ये कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल**
**(कालावधी दिनांक-०१/०४/२०१६ ते दिनांक-३१/०४/२०१७)**

| दिनांक | किराणा मालाचा तपशिल | आवक किराणा माल | खर्च झालेला किराणा माल | प्रत्यक्ष आलेली घट-तुट | घट-तुटीचे प्रमाण (प्रती क्विंटल) | मान्य घट-तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम | किलो ग्रॅम |
| दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ | हरभरा दाळ | ६६९५२६.०० | ६६५३६०.०० | १०३१.०० | ०१.६४९ | ०२ .०० |
| दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ | हिरवी विलायची | २३००.७६०.०० | २२८५.७६० | १५.०० | ००.६५२ ग्रॅम | ०१.०० |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय व मत –** लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडील दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ या कालावधीत कडधान्य व किराणा मालात झालेल्या घट-तुट ही मा.मुख्यलेखाधिकारी तसेच अंतर्गत लेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या सुचनास (नियमावली) मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार मान्य घट-तुटीचे प्रमाणापेक्षा कमी आहे. तरी सदरच्या अहवालास मान्यता घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील लाडु व बर्फी प्रसाद निर्मीती विभागातील कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतच्या उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६६** **लाडु प्रसाद निर्मिती करीता प्लास्टीक कॅरेट्स (नं.JBC543634) खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ) -** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

**प्रास्ताविक-** श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र.०८ व निर्णय क्र.५३७ नुसार लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद निर्मिती करण्यात येत आहे. दिवसेंदिवस

साईभक्तांच्या संख्येत होणारी वाढ व शताब्दी वर्ष या निमित्ताने साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डीमध्ये प्रंचड गर्दी होण्याची शक्यता आहे. त्याकरीता साईभक्तांना मोतीचुर लाडु प्रसाद व मोफत बुंदी प्रसाद उपलब्ध करुन देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे जास्त प्रमाणावर मोतीचुर लाडु व बुंदी प्रसाद साठवण व वाहतुक करणेसाठी साधनसामग्री असणे गरजेचे आहे.

सध्या मोतीचुर लाडु प्रसाद पाकीटे व मोफत बुंदी प्रसाद पाकीटे यांची वाहतुक करणेसाठी लाडु निर्मिती विभागाकडे एकुण २०० नग प्लास्टीक कॅरेट्स आहेत. सदरचे कॅरेट्स कॅन्टीन विभागाकडील लाडु विक्री लाडु प्रसाद निर्मिती विभागाकडे वर्ग करणेत आल्याने त्यांचेकडुन घेण्यात आलेली आहेत. लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडे जास्तीचे प्लास्टीक कॅरेट उपलब्ध नसल्याने लाडु प्रसाद निर्मिती करुन साठवणुक करणेसाठी आहे त्याच उपलब्ध साधनां त गर्दीचे नियोजन करावे लागत आहे. त्यामुळे जास्त प्रमाणात लाडु निर्मिती करुन साठवण करता येत नाही. परंतु येणा-या शताब्दी वर्षाची संभाव्य गर्दीचे नियोजन करणेसाठी उपलब्ध असलेली प्लास्टीक कॅरेट पुरेशी नाहीत.तसेच लाडू विक्री काऊंटर्स मध्येही वाढ करण्यात आलेली आहेत. व साईभक्तांना लाडू प्रसाद त्या त्या ठिकाणी असलेल्या काऊंटर्स वरुन घेता येतील.यासाठी साईभक्तांना विहीत वेळेत लाडु प्रसादाचा पुरवठा करणेसाठी व गर्दीचे वेळी लाडु प्रसादाचे साठा उपलब्ध करुन ठेवणेसाठी आणखी **३५० नग** प्लास्टीक कॅरेट खरेदी करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे लाडु प्रसाद निर्मितीचे प्रमाण वाढुन साठा करुन ठेवण्यास मदत होणार आहे.

सदर प्लास्टीक कॅरेट खरेदीबाबत खालील पुरवठाधारक यांचेकडुन लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागास दरांबाबत ई-मेलव्दारे दर प्राप्त झालेले असून पुरवठा धारकांनी प्लास्टीक ट्रे नं. JBC543634 करीता पुढीलप्रमाणे दर कळविलेले आहेत.

| **अ.नं.** | **पुरवठाधारकाचे नाव** | **Specification** | **०१ नग प्लास्टीक कॅरेटसाठी दर** |
|---|---|---|---|
| १ | विजय नॉव्हेल्टीज, शालीमार, नाशिक | Mod No-JBC543634<br>OD.540X360X340<br>ID.510X328X330MM | रु.८५०/- |
| २ | महेश इंजीनियरींग, नाशिक | Mod No-543634<br>OD.540X360X340<br>ID.510X328X330MM | रु.८१०/- |
| ३ | निलकमल लिमिटेड, नाशिक रोड, नाशिक | Mod No-JBC543634BLU<br>OD.540X360X340<br>ID.510X328X330MM | रु.६५६/- |

उपरोक्तप्रमाणे प्लास्टीक कॅरेट खरेदीबाबतचे दर पुरवठादारांनी कळविलेले असुन, ०१ प्लास्टीक कॅरेट खरेदीसाठी सरासरी रुपये ३५० X ७७२ = २,७०,२००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच सन २०१६-१७ चे अंदाजपत्रकात नवीन भांडी/साहित्य खरेदीकरीता रक्कम रु.१०,००,०००/- तरतुद करणेत आलेली आहे.

**मागणी–** उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे, वर नमुद केलेले प्लास्टीक कॅरेट श्रीं चा प्रसाद बनविणेसाठी वापरण्यात येणार असुन, येणा-या शताब्दी वर्षाची संभाव्य गर्दीचे नियोजन करुन, तयार मालाचा साठा व वाहतुक करणेसाठी उपलब्ध असलेली प्लास्टीक कॅरेट पुरेशी नाहीत. सदरचे साहीत्यांअभावी भक्तांना लाडु व बुंदी प्रसाद पुरविणेकामी अडचणी येवु नयेत, याकरीता उपरोक्त नमुद केलेप्रमाणे विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन खरेदी करता येईल.

अनुमान – आर्थिक, धोरणात्मक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– मोतीचुर लाडु प्रसाद तयार करुन वितरीत करणे, साठवण करणे व इतर अनुषंगीक कामे करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्लास्टीक कॅरेट नं JBC543634 विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन खरेदी करता येईल.

तरी वरीलप्रमाणे अडचणी व संभाव्य गर्दी लक्षात घेता सदरचे प्लास्टीक कॅरेट नं JBC543634 विहीत पध्दतीने दरपत्रके मागवुन खरेदी करण्यास व येणा-या अंदाजे रक्कम रु.२,७०,२००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडु प्रसाद निर्मिती करीता प्लास्टीक कॅरेट्स (नं.JBC543634) खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,७०,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.६७** **लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे लाडू निर्मितीचा परवाना नूतनीकरण करणेसाठी अग्रीम रक्कम (अॅडव्हान्स) मिळणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद२१ -(१) (घ)** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१ (ग व घ १) नुसार भक्तांचे सोयीसाठी आवश्यक ती उपाययोजना हाती घेण्याचे तसेच मंदिरात देवतेच्या दर्शन व प्रार्थनेसाठी आलेल्या भक्तांना सोयी-सुविधा पुरविणे, जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

**प्रास्ताविक-** मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.३०/०३/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९६ अन्वये, तसेच सामान्य प्रशासन शाखा यांचेकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३३०३/२०१४, दि.०३/०१/२०१४ रोजीचे आदेशान्वये, लाडु निर्मिती विभाग हा श्री साई प्रसादालय विभागातुन वेगळा करुन स्वतंत्र विभाग सुरु करणेत आलेला आहे .

श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना श्रींचा प्रसाद मिळावा या हेतुने दर्शन लाईनमध्ये दि.१५ ऑगस्ट २०१३ पासुन मोफत लाडु प्रसाद वाटप करणेस मान्यता देण्यात आली. मात्र दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत मोठ्या प्रमाणात वाढ होत गेल्याने व भक्तांची लाडु प्रसादाची मागणी वाढत गेल्याने भक्तांना वाटप करणेसाठी पुरेश्या प्रमाणात लाडु प्रसादाची निर्मिती करता यावी या उद्देशाने जुन्या प्रसादालयाऐवजी श्रीसाई प्रसादालयाचा अन्नदान कक्ष असलेला हॉल दि.१४/०५/२०१५ रोजी पासुन प्रसाद निर्मिती करणेसाठी उपलब्ध करुन देण्यात आला. सदरचे ठिकाणी प्रसादाची निर्मिती करणेकरीता अन्न व औषध प्रशासन, मुंबई व अन्न व औषध प्रशासन कार्यालय, अहमदनगर यांचे अन्न व औषध सुरक्षा अधिनियम २००६, चे अटी-शर्तीस अधीन राहुन त्यांनी प्रती दिवशी १५ मे.टन इतक्या क्षमतेचा लाडु प्रसाद निर्मिती करण्याचा परवाना क्र.१००१२०२२००१३२६, दि.२८/१२/२०१२ श्री साईबाबा संस्थानचे लाडु प्रसाद निर्मिती विभागास दिलेला आहे. मात्र सदरचा परवान्याची मुदत केवळ ०५ वर्षाकरीता वैध असल्यामुळे त्याची वैधता दि.३१/१२/२०१७ रोजी संपुष्टात येणार आहे .

अन्न व औषध प्रशासन कार्यालय, मुंबई यांचेकडील लाडु प्रसाद निर्मितीच्या परवान्याची मुदत दि.३१/१२/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने अन्न सुरक्षा अधिनियम २००६ चे नियमावलीस अनुसरुन पुढील ०५ वर्षे कालावधीकरीता (सन २०१७ ते २०२२) वैधता संपलेल्या परवान्याचे विहीत मुदतीत नुतनीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. परवान्याचे नुतनीकरण केल्याशिवाय संस्थानचे लाडु प्रसाद निर्मिती विभागास मोतीचुर व बुंदी प्रसादाचे उत्पादन करता येणार नाही. तसेच विनापरवाना उत्पादन केल्यास त्यावर दंडात्मक कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदरचा परवाना नुतनीकरण करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन कार्यालय, मुंबई यांचेकडे दि.०९/०५/२०१७ दुरध्वनीवरुन चर्चा केली असता, परवाना नुतनीकरण फी रक्कम रु.३६,०००/- व कार्यकारी अधिकारी यांचे नावात बदल करणेची फी रक्कम रु.७,५००/- आणि इतर अनुषंगीक कागदपत्रे तयार करणेकामी सरासरी अंदाजे एकुण रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी रुपये – पन्नास हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित असलेबाबत सांगण्यात आले आहे.

उपरोक्त प्रमाणे परवाना नुतनीकरण करणेकामी लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत कार्यवाही करणेत येणार असुन, सदरचे कार्यवाहीसाठी किमान ०२ महिने अन्न व औषध प्रशासन कार्यालय, मुंबई यांची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. सदरचे कामासाठी बराच अवधी जाणार आहे.

अधिनियम तरतुदीनुसार अनुमान/मागणी- श्री साईप्रसादालयाचे अन्नदान कक्षात लाडु/बुंदी प्रसादाचे उत्पादन सुरळीतपणे सुरु ठेवणेसाठी व अन्न व औषध प्रशासन कार्यालय, मुंबई यांनी दिलेला परवाना क्र. १००१२०२२००१३२६, दि.२८/१२/२०१२ पुढील ५ वर्षाकरीता नुतनीकरण करणेसाठी येणा-या अंदाजे रक्कम रू. ५०,०००/- (अक्षरी रुपये- पन्नास हजार मात्र) चे खर्चास मान्यता घेऊन सदरची कार्यवाही लवकरात लवकर सुरु करता येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत– उपरोक्तप्रमाणे श्री साईप्रसादालयाचे अन्नदान कक्षात पुर्वीप्रमाणेच लाडु/बुंदी प्रसादाचे उत्पादन सुरळीतपणे सुरु ठेवणेसाठी व शताब्दी वर्षात प्रसाद पुरविणेकामी अडथळा येऊ नये यासाठी सदरचा परवाना पुढील ५ वर्षाकरीता नुतनीकरण करणे अतिशय महत्वाचे आहे.

त्यास अनुसरुन अन्न व औषध प्रशासन कार्यालय, मुंबई यांनी दिलेला परवाना क्र १००१२०२२००१३२६, दि.२८/१२/२०१२ नुतनीकरण करणेसाठी व सदरचे कार्यवाही सुरु करणे करीता येणा-या अंदाजे रक्कम रू. ५०,०००/- (अक्षरी रुपये- पन्नास हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळुन, त्यासाठी आवश्यक असणारी रक्कम लेखाशाखा विभागाकडुन अग्रीम (अॅडव्हान्स) स्वरुपात मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाचे लाडू निर्मितीचा परवाना नूतनीकरण करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी आवश्यक असणारी अग्रीम रक्कम (अॅडव्हान्स) देण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षकक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.६८** **साईधर्मशाळा येथे नविन शॉडी ब्लॅकेट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम- (१) १४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे.(२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** निरंक

**प्रस्ताविक:-** साईधर्मशाळा विभागात एकुण ६ इमारती असुन १ इमारत साईबाबा संचलित कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास देण्यात आलेली आहे. व उर्वरीत ५ इमारतीमध्ये एका इमारतीत ३२ हॉल प्रमाणे एकुण १६० हॉल असुन, सदरील हॉलमध्ये सहली, ग्रुपने येणारे साईभक्त,अंध/अपंग तसेच हॉस्पीटलमधील रुग्णांचे नातेवाईक, साईप्रसादालय परिसरातील साईभक्त इत्यादींची निवासव्यवस्था करण्यात येत आहे.

साई धर्मशाळा विभागामध्ये पालखी पदयात्री तसेच ग्रुपने येणारे साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. साई धर्मशाळा विभागामध्ये एकुण ५ इमारतीमध्ये १६० हॉल साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध आहेत. प्रत्येक हॉल मध्ये १८ कॉट असुन सदर १६० हॉलमध्ये एकुण २८८० कॉट साईभक्तांना निवासासाठी ठेवण्यात आलेले आहेत. हॉलमधील प्रत्येक कॉटवर १ याप्रमाणे बेडशिट, पिलो, पिलोकव्हर तसेच चादर ठेवण्यात आलेले आहे. परंतु असे निर्दशनास आले की थंडीचे दिवसात चादर गार पडते त्यामुळे साईभक्तांना थंडीपासुन संरक्षण होत नाही.

**सध्या विभागामध्ये ब्लॅकेट नसल्यामुळे साईभक्तांचे सोयी सुविधेसाठी नविन ब्लॅकेट खरेदी करणे आवश्यक आहे.**

| **अ.नं.** | **विभागाचे नाव** | **ब्लॅकेट** | | **आवश्यक ब्लॅकेट नग संख्या** |
|---|---|---|---|---|
| | | **कॉट नुसार आवश्यक** | **जादा नग** | |
| १ | साईधर्मशाळा | २८८० | २१२० | ५००० नग |
| | | | **एकूण** | **५,००० नग** |

दरपत्रक महाराष्ट्र शासन- उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक- भांखस २०१४/ प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि.३० ऑक्टोबर २०१४ खरेदी संबंधी शासन निर्णया अंतर्गत यादी नुसार तसेच मा. मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा तथा प्रशासकीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार १) एम.एम.हॅण्डलुम कॉर्पोरेशन लि. नागपुर २) येरवडा मध्यवर्ती कारागृह येरवडा पुणा, ३) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित नवी मुंबई यांना फोन वरुन तसेच दि०४/०५/२०१७ रोजीचे इमेल व्दारे तातडीन नमुन्यात दिल्याप्रमाणे दरपत्रकाची मागणी करण्यात आली त्यापैकी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांनी शॉडी टाईप वुलन ब्लॅकेटचे नमुन्या प्रमाणे दर देऊ केलेले आहे. तसेच एम.एम. हॅण्डूलम कॉपोरेशन लि. नागपुर व येरवडा मध्यवर्ती कारागृह येरवडा पुणा यांना इमेल तसेच वारंवार फोन करुनही दर पाठविण्यात आले नाही.

साईधर्मशाळा विभागाकरीता ब्लॅकेंट खरेदी कामी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित नवी मुंबई यांनी सध्याचे बाजारभावाचे दर दिले आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| अ. क्र | कंपनीचे नाव | मालाचे वर्णन | वजन Wt. Kgs. | वातावरणाचा परिणाम (Tollent) | आडवे धागे (Ends) | उभे धागे (Picks) | धाग्याची टक्केवारी (Blend %) | | प्रति नग रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | उलन Cash millon | सिथेंटिक Fiber | |
| १ | महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित नवी मुंबई | शॉडी ब्लॅकेट 58'' x 88'' | 1.900 | +_ 5 % | 90 | 54 | 40 | 60 | 450.00 |

साईधर्मशाळा विभागाकरीता ब्लॅकेंट खरेदी कामी काही ट्रेडींग कंपनीचे सध्याचे बाजारभावाचे दर मागविण्यात आले आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| अ. क्र | कंपनीचे नाव | मालाचे वर्णन | वजन Wt. Kgs. | वातावरणाचा परिणाम (Tollent) | आडवे धागे (Ends) | उभे धागे (Picks) | धाग्याची टक्केवारी (Blend %) | | प्रति नग रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | उलन Cash millon | सिथेंटिक Fiber | |
| १ | मे. अमित एन्टरप्राईज, मुबई | शॉडी ब्लॅकेट 58'' x 88'' | 1.900 | +_ 5 % | 90 | 54 | 40 | 60 | 300.00 |
| २ | मे. जय भवानि ट्रेंडीग कंपनी, मुंबई | | 1.900 | +_ 5 % | 90 | 54 | 40 | 60 | 295.00 |
| ३ | मे. रिध्दी ट्रेंडीग कंपनी, मुंबई | | 1.900 | +_ 5 % | 90 | 54 | 40 | 60 | 300.00 |
| ४ | मे. एम.बी. ट्रेडिंग कं.फॅशन कलेक्शन ,नाशिक रोड | | 1.900 | +_ 5 % | 90 | 54 | 40 | 60 | 280.00 |
| | | सरासरी दर १ ब्लॅकेंट साठी रु. २९४.०० | | | | | | | |
| | | एकुण ब्लॅकेट ५,००० X २९४ रु. = १४,७०,०००.०० (अक्षरी रु. चौदा लाख सत्तर हजार मात्र) | | | | | | | |

स्थानिक ट्रेडींग कंपनीचे सध्याचे बाजारभावाचे दर मागविले असता शासकीय व खाजगी ट्रेडींग कंपनीचे दरात प्रति नग रक्कमेस बरीच तफावत आढळुन आलेली असुन त्यांचे क्लॉलिटीमध्ये फरक दिसुन येत आहे.

सरासरी नुसार विचार करता, रु. २९४ /-रुपये प्रमाणे एक ब्लॅकेट साठी खर्च येत असुन असे एकुण ५,००० नग ब्लॅकेंटसाठी सरासरी रु. १४,७०,०००/- ( अक्षरी रु. चौदा लाख सत्तर हजार मात्र ) इतका खर्च अपेक्षीत आहे.

**मागणी:-** साईधर्मशाळा येथे नविन शॉडी ब्लॅकेंट खरेदी करणे बाबत.

**वर्गीकरण -**

| मालाचे वर्णन | साईज | वजन Wt.Kgs | वातावरणाचा परिणाम (Tollent) | आडवे धागे (Ends) | उभे धागे (Picks) | धाग्याची टक्केवारी (Blend %) | | एकुण मागणी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | उलन Cashmillon | सिथेंटिक Fiber | |
| शॉडी ब्लॅकेट | 58'' x 88'' | 1.900 | +_ 5 % | 90 | 54 | 40 | 60 | 5,000 नग |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत -**

**१)** निवासासाठी येणा-या साईभक्तांचे थंडीपासुन संरक्षण करणेकरीता नविन ५,००० नग शॉडी ब्लॅकेट खरेदी करणेस व जनसंपर्क कार्यालयामार्फत अहमदनगर, पुणे, मुंबई, औरंगाबाद व नाशिक येथील दैनिक वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास.

**२)** उपरोक्त तक्त्यातील सरासरी दरानुसार नविन ब्लॅकेट ५,००० नग खरेदी करण्यासाठी रु. १४,७०,०००/- (अक्षरी रुपये- चौदा लाख सत्तर हजार मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे, त्यास मान्यता असावी.

**३)** विहीत पध्दतीने नविन शॉडी ब्लॅकेट खरेदी करणे बाबतची कार्यवाही संस्थानचे खरेदी विभागामार्फत ई-टेंडर पध्दतीने करण्यास सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीपुढे सादर .

**निर्णय क्र.५८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईधर्मशाळा येथे निवास करणाऱ्या साईभक्तांच्या सुविधेसाठी नविन ५००० नग शॉडी ब्लॅकेट खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१४,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**विषय नं.६९** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे निवास करणाऱ्या साईभक्तांसाठी सोलापुर चादरी खरेदी करणे अथवा दुसऱ्यापर्यायाचा विचार करणे.**

**प्रस्ताव-** दि.०७.३.२०१७ रोजी सोलापुर चादर खरेदी बाबतचा मंजुर फेर प्रस्ताव कार्यवाहीसाठी खरेदी विभागाकडे सादर करण्यात आला. दि.२५.०४.२०१७ रोजी खरेदी विभागाकडील पत्र क्रं- ५८५ नुसार मा. कार्यकारी अधिकारी महोदया, यांनी सोलापुर चादर ऐवजी दुस-या पर्यायाचा विचार करुन प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहे. त्यास अनुसरुन आपले विभागाकडील सोलापुर चादरी ५००० नग खरेदी बाबतचा प्रस्ताव परत पाठवत आहोत वरील निर्देशाप्रमाणे पुढिल उचीत कार्यवाही सत्वर करावी. असे निर्देश दिलेले असल्याने त्यास अनुसरुन, महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.भांखस-२०१४ प्र/क ८२/ भाग ३/ उदयोग-०४ मंत्रालय, मुंबई. खरेदी नियमावलीमध्ये प्रकरण क्रं.६ व परिशिष्ट क्र.१२ मध्ये बॅरॅक कंबल, कंबल, किंवा कंम्बली या महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ/ महासंघ (महाटेक्स) व कारागृहामार्फत खरेदी करण्यासाठी राखुन ठेवण्यात आलेले आहेत. असे नमुद असल्याने संबंधीताकडुन इकडील जा.क्र.७७० दि.१५.०५.२०१७ अन्वये पत्र पाठवुन खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली.

| अ.नं. | आवश्यक माहिती | तपशिल |
|---|---|---|
| १ | वुलन ब्लॅकेट (सिंगल) | ६०'' X ९०'' |
| २ | वजन | |
| ३ | वातावरणाचा परिणाम (Tollent) | |
| ४ | आडवे धागे (Ends) | |
| ५ | उभे धागे (Picks) | |
| ६ | धाग्याची टक्केवारी (Blends) | |
| ७ | अंदाजे किंमत प्रती नगास | |

**अ) यास अनुसरुन खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली आहे .**

| अ.नं. | शासकिय विभागाचे नाव | ब्लॅकेट खरेदीकामी आवश्यक स्पेसीफीकेशन बाबतचा तपशिल |
|---|---|---|
| १ | येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे<br>पत्र क्रं- ५९४२ /२०१७<br>दि.२२.०५.२०१७ | पत्र.क्रं-ये.म.का./ कारखाना/ विणकाम/ ६०६०/२०१७ दि.२४.०५.२०१७, ७ बाय ४ या मापाचे २ नग शॉडी वुलन ब्लॅकेट.नमुना ०२ नग सह<br>१. २-२० ग्रे कॉटन धाग्याचा ताणा (उभा धागा) picks<br>१. शॉडी वुलन धाग्याचा बाणा (आडवा धागा ) Ends<br>२. ७५ % वुल व २५ % इतर<br>३. काऊंट ४ ५+% |
| २ | महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ, मर्यादित MSHC कॉम्प्लेक्स, उमरेड रोड, नागपुर | पत्र पाठवुन तसेच फोनवर संपर्क साधुनही आजअखेर प्रतिसाद दिलेला नाही. |

वरिल बाबीचे निरीक्षण केले असता.

१. फक्त कारागृह विभागाने त्यांचे दरपत्रक , नमुना व स्पेसीफीकेशन सादर केले आहे त्यामध्ये

अ) प्राप्त वुलन ब्लॅकेट नमुन्याचे अवलोकन केले असता सदर वुलन ब्लॅकेट रफ असल्याचे दिसुन येते .

आ) वजन ९०० ते ९५० ग्रॅम चे दरम्याकन आहे, किंमत प्रती नगास रु.६००/- आहे व ती मार्केट रेट सरासरीचा विचार केल्यास जादा आहे.

इ) अनुभवानुसार भक्तगण ते अंगावर घेणे ऐवजी खाली अंथरतील त्यामुळे ते योग्य ठरणार नाहीत असे नम्र मत आहे .

२. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित (महाटेक्स) यांनी आपले मागणीस प्रतिसाद दिलेला नाही.

**ब)** अधिक माहितीसाठी मे.एम बी ट्रेडींग कंपनीचे फॅशन कलेक्शन, नासिक यांचेकडून पर्ल ग्लो उलन बॅकेट (Non Branded) चा नमुना व तपशिल आणला आहे तो सोबत अवलोकनार्थ सादर आहे, सदर ब्लॅकेटचा तांत्रीक तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. नं. | तपशिल | साईज | वजन | Tollerence वातावरणाचा परिणाम | Ends बाणा (उभा धागा) | Picks ताणा (आडवा धागा) | Blends % उल | Blends % इतर | किंमत प्रति नग रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पर्ल ग्लो | ९६ X ५६ | १.४५५ ग्रॅम | ५ ते १० % | ९० | ५४ | ५० | ५० | ५१०/- |

सदर ब्लॅकेटची किंमत प्रति नगास ५१० रुपये इतकी आहे.ती चादरीचे किंमतीचे तुलनेत जादा आहे याच वजनाचे ३००० नग ब्रॅडेड कंपनीचे ब्लॅकेटस आपणाकडे उपलब्ध असून वापरात आहेत.

उत्तर नगर जिल्हातील हिवाळा तथा पावसाळयातील सरासरी वार्षिक तापमान सुमारे ३२ ते ३५ डिग्री सेल्सीयसचे दरम्यान असते व उन्हाळयामधील तापमान ३७ ते ४० डिग्री सेल्सीयसचे दरम्यान असते त्यामुळे साईभक्त ब्लॅकेटचा वापर करणे टाळतात असा अनुभव आहे.

हिवाळयामध्ये शिरस्त्याप्रमाणे प्रती वर्षी माहे नोव्हेंबर महिन्यातील दुस-या पंधरवाडयामध्ये अपणाकडे असणारे ओसवाल व इतर कंपनीचे ३००० नग ब्लॅकेट प्रत्येक कॉटवर ठेवले जातात सोबत सोलापुर चादरही असते त्यामुळे जादा थंडीचा त्रास साईभक्तांना होत नाही.

**क)** सन २००६ मध्ये ओसवाल, रेमन्ड व इतर कंपनीचे ३००० नग उलन ब्लॅकेट खरेदी केले असुन त्यांचा दर्जा, रंग व पोत अद्यापही चांगला असुन थंडीचे मोसमात साईभक्तांचे वापरात आहेत व प्रती नगास ओसवाल रु.२६१.२४ पैसे (१.१८० कि/ग्रॅम), रेमंन्ड् रु. ३१३.००(१.६६० कि/ग्रॅम), व इतर रु ११०.०० (१.३६० कि/ग्रॅम), याप्रमाणे किंमत अदा करुन खरेदी करण्यात आलेले आहेत.

**ख)** आपणाकडे सन २००९ मध्ये खरेदी केलेल्यार सोलापुर चादरचा नमुना सोबत अवलोकनार्थ सादर आहे. सदरहु चादर प्रती नगास (१.४०० कि/ग्रॅम) वजनाची २९०/- रुपये अदा करुन खरेदी करण्यात आली होती. आपले येथील वातावरणाचा व इतर बाबींचा विचार केल्यास सोलापुर चादर योग्य ठरेल. पूर्वीपासून चादर वापरास साईभक्तांनचे पसंती असून महाराष्ट्रा तील बहुतेक सर्व तीर्थक्षेत्राचे ठिकाणी भक्तगणांसाठी निर्मीत धर्म शाळेमध्येस चादरीचाच वापर केला जातो, असे निर्दशनास आले आहे. तसेच त्याची किंमतही किफायतशीर असल्यागने त्या च योग्या ठरतील असे नम्र मत आहे.

तरी वरील **<u>ब, क, ख</u>** या पर्यायापैकी उचीत पर्याय निवडुन रितसर खरेदी प्रकिया खरेदी विभागामार्फत पुर्ण करण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.५८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे निवास करणाऱ्या साईभक्तांच्या सुविधेकरीता उलन ब्लँकेट खरेदी करणेत यावे, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.७०** **साईमंदिर सुरक्षाकामी नियुक्त केलेल्या व शिर्डी विमानतळाचे सुरक्षेसाठी नेमणूक होणाऱ्या पोलीस कर्मचारी यांचे निवास व्यवस्थेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतूद</u> -**२१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते.

**<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.</u>-** ०१.दि.१६/०८/२०१६ रोजीची मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.५३५ **<u>व</u>** ०२.दि.३०/११/२०१६ रोजीची मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७८८.व ०३. दि.२३-२४/०५/२०१७ रोजीची मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्र.३८४

**<u>प्रस्तावीक</u> –** मा.पोलीस महानिरीक्षक सो. नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्या आदेशान्वये श्री साईबाबा मंदिर सुरक्ष शिर्डी येथे बंदोबस्ताकरीता धुळे जिल्हा, नंदुरबार जिल्हा, नाशिक ग्रामीण येथून ०३ अधिकारी व ४५ पोलीस कर्मचा-यांची नियुक्तीकरणेत आली आहे.

सध्या नियुक्त करणेत आलेल्या पोलीस कर्मचा-यांची साईआश्रम धर्मशाळा येथे विनामुल्य निवासव्यवस्था करणेत आली आहे. संदर्भ क्र.०१ अन्वये दि.१६/०८/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.५३५ नुसार साईमंदिर सुरक्षेसाठी नियुक्त केलेल्या पोलीस कर्मचा-यांची निवासव्यवस्था साईधर्मशाळे ऐवजी सध्या वापरासाठी बंद असलेल्या साईउद्यान इमारती मध्ये करण्यात यावी असे ठरले आहे.

त्यानुसार संदर्भ क्र.०२ अन्वये आदेश पारीत करणेत आला. त्यानंतर संदर्भ क्र.०३ चे पत्रान्वये संरक्षण विभागाने सदर पोलीस कर्मचा-यांना साईउद्यान इमारतीतील ०३ हॉल तात्काळ उपलब्ध करुन देणे बाबत कळविले आहे.

तथापि, साईउद्यान इमारती मधील हॉल्सचा ताबा घेणेकामी अद्याप कुणीही पोलीस कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागात आलेले नाहीत.

आता, संदर्भ क्र.०४ चे टिपणीअन्वये उपरोक्त पोलीस कर्मचा-यांना साईउद्यान इमारती मधील ०३ हॉल्स व नव्याने आलेले जळगाव जिल्हयातील पोलीस अधिकारी व १५ पोलीस कर्मचारी यांचे करीता साईउद्यान इमारती मधील ०१ हॉल देणे बाबत कळविणेत आले आहे. तथापि, नव्याने आलेल्या पोलीस कर्मचा-यांची राहण्याची व्यवस्था साईधर्मशाळा येथे करणे बाबत सहा.पोलीस निरीक्षक, साई मंदिर सुरक्षा शिर्डी यांनी कळविले आहे.

तसेच संदर्भ क्र०५ अन्वये दि.३०/११/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७८८ नुसार शिर्डी विमानतळाचे सुरक्षेसाठी नेमणूक होणा-या पोलीस कर्मचा-यांची (अंदाजे ४० ते ५०) निवासव्यवस्था संस्थानचे साईउद्यान इमारती मध्ये तात्पुरते ११ महिने कालावधीसाठी नियमानुसार शुल्क आकारुन करणेत यावी असे ठरले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.०६ अन्वये आदेश पारीत करणेत आला आहे.

तथापि, शिर्डी विमानतळाचे सुरक्षेकरीता नेमणूक करणेत आलेले पोलीस कर्मचारी साईउद्यान इमारतीचा हॉल ताबेत घेणेकामी अद्याप साईप्रसाद निवासस्थान विभागात आलेले नाहीत.

तरी मंदिर सुरक्षेसाठी नियुक्त करणेत आलेल्या पोलीस कर्मचारी यांची साईधर्मशाळे ऐवजी साईउद्यान इमारतीमध्ये निवासव्यवस्था करणे बाबतच्या मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयाला साधारण १० महिने झालेले आहेत

तसेच शिरडी विमानतळाचे सुरक्षेसाठी नेमणूक होणा-या पोलीस कर्मचारी यांचीही साईधर्मशाळे ऐवजी साईउद्यान इमारतीमध्ये निवासव्यवस्था करणे बाबतच्या मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयाला साधारण ०७ महिने झालेले आहेत.

वरील निर्णयांप्रमाणे अद्याप कार्यवाही झालेली नसून मंदिर सुरक्षेसाठी नियुक्त करणेत आलेले पोलीस कर्मचारी सध्या साईआश्रम धर्मशाळा येथेच राहात आहेत.

**<u>मागणी</u>-** यावरुन मंदिर सुरक्षेसाठी नियुक्त करणेत आलेले पोलीस कर्मचारी यांची साईउद्यान इमारतीत राहण्याची उत्सुकता दिसत नाही.

आता, दि.२३-२४/०५/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.३८४ नुसार नियोजीत दर्शनरांग प्रकल्प उभारणीकामी साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारती बंद करुन साईउद्यान इमारतीचा वापर पुर्ववत सुरु करणेकामी प्रस्तावत नमुद केले प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार दि.३१/०५/२०१७ पासून साईप्रसाद नं.०१ इमारतीचा वापर बंद करणेत आला असून साईप्रसाद नं.०२ इमारतीचा वापरही लवकरच बंद करणेत येणार आहे.

तसेच दि.०८/०६/२०१७ पासून साईउद्यान इमारती मधील लॉकर्स व हॉल्स साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु केले आहे. तसेच साईप्रसाद नं.०२ बंद केलेनंतर साईउद्यान मधील रुम्सचा वापरही सुरु करणेत येणार आहे. साईउद्यान इमारत श्रींचे मंदिर लगत असल्याने तेथे रुम्स, हॉल्स व लॉकर्स घेणेसाठी साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी असते तसेच सदर इमारतीत रुम्स, हॉल्स व लॉकर्स असल्याने एकट्या माणसाची, फॅमिलीची तसेच ग्रुपने आलेल्या साईभक्तांची अतिशय सुलभतेने निवासव्यवस्था होत आहे.

श्रींचे मंदिरा लगत साईउद्यान व्यतिरिक्त संस्थानचे इतर निवासस्थान उपलब्ध राहीलेले नाही त्यामुळे साईमंदिर सुरक्षेसाठी नियुक्त केलेल्या पोलीस कर्मचा-यांची व शिरडी विमानतळाचे सुरक्षेसाठी नेमणूक होणा-या पोलीस कर्मचा-यांची साईउद्यान इमारतीत निवासव्यवस्था केल्यास साईभक्तांची निवासाची गैरसोय होईल.

**<u>विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ स्पष्ट मत</u>–** साईमंदिर सुरक्षेसाठी नियुक्त केलेल्या पोलीस कर्मचा-यांची व नव्याने आलेल्या पोलीस कर्मचा-यांची यापुर्वी झालेल्या निर्णयाप्रमाणे कायमस्वरुपी विनामुल्य तसेच शिरडी

विमानतळाचे सुरक्षेसाठी नेमणूक होणा-या पोलीस कर्मचा-यांची यापुर्वी झालेल्या निर्णयाप्रमाणे शुल्क आकारुन साईउद्यान ऐवजी साईआश्रम धर्मशाळेकडेच निवासव्यवस्था करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.५९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईमंदिर सुरक्षाकामी नियुक्त केलेल्या व शिर्डी विमानतळाचे सुरक्षेसाठी नेमणूक होणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना शासनामार्फत भत्ता मिळत असतो, यामुळे संस्थानमार्फत त्यांची निवासव्यवस्था करणेची आवश्यकता वाटत नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.७१** **श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी झालेल्या निर्णयाबाबत फेरविचार करणेबाबत व आऊटसोर्स पध्दतीने वाढपी लावणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात ताशी 20000 क्षमतेचे चपाती मशिन असल्यामुळे चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी ई-निविदा मागवून मा.व्यवस्थापन समिती दि.19.5.2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र.307(9) नूसार, जा.नं.एसएसएस/वशी/ 1141/ 2016 दि.09.06.2016 अन्वये दि.यशोधरा महिला सह.उत्पादक संस्था,नाशिक यांना दि.16 जून 2016 ते दि.15 जून 2017 अखेर एक वर्ष या कालावधीकरीता प्रति क्विंटल कोरडा आटा+ मैदयास रु.323.90 पै (अक्षरी रु.तीनशे तेवीस पैसे नव्वद मात्र) सर्व करांसह या प्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेले आहे.

दिउत्पादक संस्था.यशोधरा महिला सह.,नाशिक यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.15.06.2017 अखेर संपूष्टात येत आहेत्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी मशिनवर . चपाती तयार करणेकामी ई.मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता व्यवस्थापन समितीचे.निविदा मागविणेकामी मा-

मा.व्यवस्थापन समिती दि.25.02.2017 रोजीचे सभेतील निर्णय क्र.155 अन्वये, “श्री साई प्रसादालयातील चपाती मशिनवर चपाती तयार करणेचे काम विभागांअतंर्गत करुन घेण्यात यावे, तसेच आवश्यकता भासल्यास कर्मचालविणेचे प्रशिक्षण देण्यातयांना सदरहू मशिन चा-” यावे असे ठरलेले आहे.

सदर मशिनवर काम करणेसाठी आवश्यक असलेला एका शिफ्टला 16 याप्रमाणे दोन शिफ्टसाठी 32 कर्मचारी प्रसादालयाकडे उपलब्ध नाही त्यामुळे सदरची कामे करणेस व भक्तांना प्रसादभोजन पुरविणेस फार मोठया प्रमाणात अडचणी येत आहे.

त्यामुळे प्रसादालयाचे तुर्त कामाची निकड लक्षात घेता, मा.व्यवस्थापन समिती दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानूसार, चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी आहे त्याच निविदाधारकाला आहे त्याच दरात यापुर्वी देण्यात आलेल्या अटीशर्तीचे अधीन राहुन/ संदर्भिय अं.नं.3 नूसार उपरोक्त टेंडरबाबत कार्यादेश होईपावेतो एक महिना मुदतवाढ देणेत आलेली आहे.

अ) चपाती मशिनवर चपाती तयार करणेकामी माहे एप्रिल-2016 ते मार्च-2017 अखेर ई-निविदा बोलावून टेंडरधारकाची नेमणूक करणेत आलेली आहे. त्यानूसार प्रति क्विंटल आटा+मैद्यास रु.323.90 प्रमाणे चपाती मशिन ठेकेदार यांना आदा करणेत आलेल्या बीलाचे रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | महिना | आटामैदा किव्टंलमध्ये+ | प्रति क्विंटल मजुरी दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 01 | एप्रिल-2016 | 143.80 | 410.00 | 58958/- |
| 02 | मे-2016 | 201.70 | 410.00 | 82697/- |
| 03 | जुन-2016 | 72.80<br>92.00 | 410.00<br>323.90 | 61,300/- |
| 04 | जुलै-2016 | 158.40 | 323.90 | 51306/- |
| 05 | ऑगष्ट-2016 | 115.80 | 323.90 | 37508/- |
| 06 | सप्टेबर-2016 | 125.40 | 323.90 | 40617/- |
| 07 | ऑक्टोबर-2016 | 439.20 | 323.90 | 142257/- |
| 08 | नोव्हेबर-2016 | 646.40 | 323.90 | 209369/- |
| 09 | डिसेंबर-2016 | 782.20 | 323.90 | 253355/- |
| 10 | जानेवारी-2017 | 819.90 | 323.90 | 265566/- |
| 11 | फेब्रुवारी-2017 | 498.00 | 323.90 | 161302/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | मार्च-2017 | 464.40 | 323.90 | 150419/- |
| | **एकुण=** | **4560.00** | | **15,14,653/-** |

सन २०१६-२०१७ मध्ये चपाती मशिनर चपाती तयार करणेकामी संस्थानला उक्ते आऊटसोर्स पध्दतीने रक्कम रु.१५,१४,६५३/- (अक्षरी रक्कम रु.पंधरा लाख चौदा हजार सहाशे त्रेपन्न मात्र.) इतका प्रत्यक्ष खर्च आलेला आहे. भविष्यात सदर कामाच्या ई निविदा-मागविल्यास प्रति क्विंटल दरात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही .

मा.व्यवस्थापन समिती दि.25.02.2017 रोजीचे सभेतील निर्णय क्र.155 नूसार, चपाती मशिनवर चपाती तयार करण्याचे काम विभांगातर्गत करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानूसार त्याकामी संस्थानचे इनसोर्स लेबर कॉन्ट्रॅक्टमार्फत कंत्राटी पध्दतीने कर्मचारी पुरविलेस खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | प्रतिदिन कर्मचारी संख्या | प्रतिदिन किमान वेतन दर | एकुण रक्कम | मासिक खर्च | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 32 | 294.47 | 9423/- | 2,82,691/- | 33,92,294/- |
| | उपरोक्त वार्षिक खर्च रकमेवर अंदाजे प्रॉ फंड.13.15% रुपये = | | | | 4,46,087/- |
| | सानुग्रह अनुदान खर्च अंदाजे ८.३३ **% =** | | | | 2,82,578/- |
| | **एकूण रक्कम =** | | | | **41,20,959/-** |

संस्थानचे इनसोर्स मार्फत कंत्राटी पध्दतीने कामगार घेतल्यास अंदाजे रक्कम रु.४१,२०,९५९/- इतका खर्च संस्थानला येणार आहेत.

उपरोक्तबाबत विचार करता, चपाती मशिनवर चपाती तयार करणेचे काम विभागाअंतर्गत करुन घेतल्यास त्याकामी निविदेपेक्षाही मोठया प्रमाणात आर्थिक भार संस्थानवर पडणार आहे त्यामुळे .विभागांतर्गत चपाती मशिन चालविणेबाबतच्या झालेल्या निर्णयावर फेर विचार व्हावा असे नम्र मत आहे. तसेच सदरची कार्यवाही पुर्णहोईपावेतो आहे त्याच ठेकेदारास दि.१६/०७/२०१७ पासून ते ई-निविदेची कार्यवाही होवून कार्यादेश देईपावेतो, आहे त्याच मंजूर दरात व निविदेतील/करारनाम्यातील अटी/शर्तीस अधिन राहून मुदतवाढ द्यावी लागेल असे नम्र मत आहे.

**ब)** श्री साई प्रसादालयामध्ये भक्तांना प्रसादभोजन सेवा पुरविणेकामी कामय कर्मचारी 360+414 कंत्राटी कर्मचारी असे एकुण 774 कर्मचा परंतू सध्या प्रसादालयात .यांचा आकृतीबंध मंजूर करणेत आलेला आहे280 कायम कर्मचारी +301 कंत्राटी कर्मचारी असे एकुण 581 कर्मचारी कार्यरत आहेम्हण .ेजच कायम 80 कर्मचारी +113 कंत्राटी कर्मचारी असे एकुण 193 कर्मचारी संख्या कमी आहे .सदर कर्मचारी हे रजा, सुट्टया व प्रसादालयातील काम हे अंगमेहनतीचे असल्याने गर्दीचे काळात बरेच कर्मचारी गैरहजर राहतात. पैकी ३०१ कंत्राटी कामगार सुध्दा पुर्ण क्षमतेने मिळत नसून दररोज साधारणत: २२५ चे जवळपास कामगार मिळतात. म्हणजेच तेही ७५ कमी मिळत आहेत.

तसेच माहे जानेवारी- 2016 पासून प्रसादालयाकडून इतर विभागाकडे बदली झालेले, सेवानिवृत्त, निलिंबत, मयत झालेले असे 35 कर्मचारी आहेत परंतू त्याचें ऐवजी प्रसादालयात इतर विभागाकडून बदली होऊन आलेले 21 कर्मचारी यामध्येही प्रत्यक्षात 14 कर्मचारी कमी मिळालेले आहेत. प्रत्येक वेळीचे व्यवस्था आपसात करण्यात यावी अथवा कामगार विभागाकडून कंत्राटी कर्मचारी देण्यात यावे असे आदेशात नमुद करण्यात येते प्रत्यक्षात तशी व्यवस्था (कायदेशीर अडचणीमुळे) कामगार विभागाकडून करण्यात येत नाही. त्यामुळे प्रसादालय विभागात मोठया प्रमाणात कामगार कमी पडत आहेत. त्यातच सध्याय विविध विभागांमध्ये् कामाची वाढ झाल्यानंतर त्या विभागासाठी आवश्यपक असलेला कंत्राटी कर्मचारी वर्ग हा संबंधीत ठेकेदार परस्पर प्रसादालयातून काढून घेवून आवश्यक त्या विभागामध्ये देतात व त्या मोबदल्यात वेगळे कंत्राटी कर्मचारी अथवा आऊटसोर्स कर्मचारी देखील देत नाहीत.

याचबरोबर शैक्षणिक संकुलाकडील विद्यार्थ्यांसाठी (3000 ते 3500) पोषण आहार योजना ही दि.१५/०६/२०१७ रोजीपासून कार्यान्वीत करणेत आलेली आहे. याकामी कमीत कमी 08 जादा कर्मचा-यांची आवश्यकता असून त्याचेही अपुर्तता आहे. तेही मिळणे आवश्यक आहे. इतक्या मोठया प्रमाणात कर्मचारी वर्ग अपुरा झाल्याानने ब-याच वेळा प्रसादालयात ताटे धुणे, ताटे लावणे, जेवण वाढणे इत्यादी कामांसाठी वाढपी कर्मचारी अत्यंत तुटपूंजा होतो अशावेळेस ताटाऐवजी पत्रावळी लावणेशिवाय पर्याय उरत नाही. मात्र एका

पत्रावळीचा दर हा अंदाजे जवळपास रु.१.५० ते २.०० इतका आहे व तो संस्थानला परवडणारा नाही त्यामुळे कामाची अत्यंत निकड लक्षात घेता, तुर्त वाढीव ४० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने घेणे गरजेचे आहे.

मागणी :- अ) बाबत विचार करता, चपाती मशिनवर चपाती तयार करणेचे काम विभागाअंतर्गत करुन घेतल्यास त्याकामी निविदेपेक्षाही फार मोठया प्रमाणात आर्थिक भार संस्थानवर पडत आहे. त्यामुळे ठेकेदारामार्फतच चपाती मशिन चालविणे हितावह आहे असे वाटते. त्याकरीता यासंबंधीत झालेल्या ठरावाबाबत फेरविचार होवून ई-निविदा प्रक्रीया करणेस व सदर प्रक्रीया पुर्ण होवून कार्यादेश देईपावेतो कालावधीसाठी आहे त्याची ठेकेदारास मंजूर दरात व निविदेतील/ करारनाम्यारतील अटी/शर्तीस अधिन राहून मुदतवाढ द्यावी लागेल असे नम्र मत आहे.

ब) बाबत विचार करता, कामगार विभागामार्फत संस्थानचे लेबर कॉन्ट्रॅक्टरकडून अत्यावश्यक गरज म्हणून तातडीने ४० कंत्राटी कामगार मिळावेत. किंवा कामगार विभागामार्फत कामगार उपलब्ध न झाल्यास प्रसादालयाचे हाऊसकिपींग ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने वाढीव 40 वाढपी कामगार लावणेस व त्यांलचे वेतनावरील खर्चास मान्यता मिळणे गरजेचे आहे. करीता अ) व ब) बाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम-: ठराव यानुसार अनुमान/** आर्थिक

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत :-**

**अ)** बाबत विचार करता, ठेकेदारामार्फतच चपाती मशिन चालविणे हितावह आहे असे वाटते. करीता यापुर्वी झालेल्या ठरावाबाबत फेरविचार होवून ई-निविदा प्रक्रीया करणेस व सदर प्रक्रीया पुर्ण होवून कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीसाठी आहे त्याच ठेकेदारास मंजूर दरात व निविदेतील/ करारनाम्यातील अटी/शर्तीस अधिन राहून मुदतवाढ देणेकामी तसेच

**ब)** बाबत विचार करता, कामगार विभागामार्फत संस्थानचे लेबर कॉन्ट्रॅक्टरकडून अत्यावश्यक गरज म्हणून तातडीने ४० कंत्राटी कामगार मिळावेत. किंवा कामगार विभागामार्फत कामगार उपलब्ध न झाल्यास प्रसादालयाचे हाऊसकिपींग ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने वाढीव 40 वाढपी कामगार लावणेस व त्यांचे वेतनावरील खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामध्ये चपाती मशिनव्दारे चपाती तयार करणेकामी विभागाच्या अभिप्रायामधील अ प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.७२** **संस्थानचे दोन्ही रुग्णालयाकरीता संगणकीय साहित्यांचे वार्षिक दर निश्चित करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयामध्ये संगणकीय प्रणाली कार्यान्वीत करण्यातआलेलीअसूनदोन्ही रुग्णालयांचे सर्व संगणकीय कामकाज संगणकीकृत करण्यात आलेले आहे. सदर संगणक संच कायम वापरात असल्याने त्यात वेळोवेळी बिघाड निर्माण होत असल्याने त्यांचे दुरूस्तीकरीता स्पेअर-पार्ट्सची आवश्यकता असते. तसेच संगणक संचामधील वापरात असणारे संगणक व प्रिंटर्स करीता स्पेअर-पार्ट्स (Computers Peripherals, Keyboard, Mouse, SMPS, Toners, Cartridge, Battery, Pen Drive, Network Switch, Network Cable, RJ45 Connector, Antivirus, Printer Spare parts & Printer Toner Refilling with Spare partsetc.) असे इ. साहित्यांची आवश्यकता असते. दोन्ही रुग्णालयांमध्ये सध्या वापरात असणारे बरेचसे संगणके व संगणकीय साहित्य् कालबाह्य् झालेले असल्यामुळे, सदर संगणक व संगणकीय साहित्य् वेळोवेळी बंद पडत आहेत् तसेच रुग्णालयाच्या वाढत्या कामाचा व्याप पाहता, रुग्णालयाच्या सुरळीत चालणाऱ्या दैनंदिन कामकाजात अडचणी येऊ नये, याकरीता संगणक व संगणकीय साहित्य् दुरुस्तीकामी आवश्यक स्पेअस्पार्ट्स व साहित्य् खरेदी करणे आवश्यक आहे.

त्यानुषंगाने, पुढील एका वर्षाकरीता इकडील विभागाने विविध पुरवठाधारकांकडून आवश्यक असणाऱ्या साहित्यांचे अंदाजीत दरपत्रके संदर्भीय क्र.1, 2 व 3 चे ई-मेलव्दारे मागविलेले असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे–

| Annual Rate Contract - Computer Spare Parts List | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Item Description | Make | Qty | Vendor's Approximate Item wise Rates with All Taxes | | | Total | Average |
| | | | | Sharp Imaging A.Nagar | S.B Computers | Surendra Traders | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **A) EPSON LQ 310+ Printer Spare Parts** | | | | | | | | |
| 1 | EPSON LQ 310+ Dmp Printer Head | Epson | 1 | 5000/- | 5513/- | 2200/- | 12713/- | 4237.66/- |
| 2 | EPSON LQ 310+ Dmp Printer Head cable Pair | Epson | 1 | 500/- | 551/- | 275/- | 1326/- | 442/- |
| 3 | EPSON LQ 310+ Dmp Printer R.D. Assembly | Epson | 1 | 750/- | 827/- | 275/- | 1852/- | 617.33/- |
| 4 | EPSON LQ 310+ Dmp Printer Belt Driver Pulley | Epson | 1 | - | - | 110/- | 110/- | 110/- |
| 5 | EPSON LQ 310+ Dmp Printer carriage Belt | Epson | 1 | 750/- | 827/- | 385/- | 1962/- | 654/- |
| 6 | EPSON LQ 310+ Dmp Printer carriage Bush | Epson | 1 | 750/- | 827/- | 275/- | 1852/- | 617.33/- |
| 7 | EPSON LQ 310+ Dmp Printer knob | Epson | 1 | 250/- | 276/- | 100/- | 626/- | 208.66/- |
| 8 | EPSON LQ 310+ Dmp Printer Tractor Spocket | Epson | 1 | - | - | 660/- | 660/- | 660/- |
| 9 | EPSON LQ 310+ Dmp Printer P.F. gear | Epson | 1 | 500/- | 551/- | 110/- | 1161/- | 387/- |
| 10 | EPSON LQ 310+ Dmp Printer Flat tern gear | Epson | 1 | 350/- | 386/- | 110/- | 846/- | 282/- |
| 11 | EPSON LQ 310+ Dmp Printer ribbon rifill pack 13 mtr | Epson | 1 | 150/- | 165/- | 30/- | 345/- | 115/- |
| 12 | EPSON LQ 310+ Dmp Printer ribbon rifill pack 18 mtr | Epson | 1 | 150/- | 165/- | 45/- | 360/- | 120/- |
| 13 | EPSON LQ 310+ Dmp Printer Data Cable | Epson | 1 | 200/- | 221/- | 100/- | 521/- | 173.66/- |
| 14 | EPSON LQ 310+ Dmp Printer USB 2.0 Cable | Epson | 1 | 200/- | 221/- | 100/- | 521/- | 173.66/- |
| 15 | EPSON LQ 310+ Dmp Printer cartridges | Epson | 1 | 250/- | 276/- | 180/- | 706/- | 235.33/- |
| **B) HP LASER JET 1020/1020+/CANNON LBP 2900/HP 1136 MFP PRINTERS SPARE PARTS** | | | | | | | | |
| 16 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner | HP | 1 | 3700/- | 4079/- | 5000/- | 12779/- | 4259.66/- |
| 17 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner Magnet Rod | HP | 1 | 70/- | 77/- | 150/- | 297/- | 99/- |
| 18 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner Magnet Bush | HP | 1 | 20/- | 22/- | 50/- | 92/- | 30.66/- |
| 19 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner Teflon sleev | HP | 1 | 500/- | 551/- | 200/- | 1251/- | 417/- |
| 20 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Heater Assembly | HP | 1 | - | - | 2000/- | 2000/- | 2000/- |
| 21 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Pressure Roller | HP | 1 | 500/- | 551/- | 350/- | 1401/- | 467/- |
| 22 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Pick up Roller | HP | 1 | 600/- | 662/- | 500/- | 1762/- | 587.33/- |
| **C) HP LASER JET 1020/1020+/CANNON LBP 2900/HP 1136 MFP TONER REFILLING WITH SPARE PARTS** | | | | | | | | |
| 23 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A, 78A, 88A, 16A, 36A Toner Refilling And Reconditioning | HP | 1 | 350/- | 386/- | 350/- | 1086/- | 362/- |
| 24 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner Toner Drum | HP | 1 | 300/- | 331/- | 100/- | 731/- | 243.66/- |
| 25 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner Powder make Toner | HP | 1 | 100/- | 110/- | 100/- | 310/- | 103.33/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 26 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner wiper Blade | HP | 1 | 150/- | 165/- | 50/- | 365/- | 121.66/- |
| 27 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner Doctor Blade | HP | 1 | 150/- | 165/- | 50/- | 365/- | 121.66/- |
| 28 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner P.C.R Roller | HP | 1 | 150/- | 165/- | 50/- | 365/- | 121.66/- |
| 29 | HP LASER JET 1020/3050/3015/1018/3392 Q 2612 A Toner connecting Spring | HP | 1 | 50/- | 55/- | 20/- | 125/- | 41.66/- |
| 30 | 88 A Toner Powder - 100 gm | Toner | 1 | - | - | 100/- | 100/- | 100/- |
| **D) COMPUTER PERIPHERALS** | | | | | | | | |
| 31 | Keyboards (USB) | Dell | 1 | 700/- | 772/- | 500/- | 1972/- | 657.33/- |
| | | TVS Gold | 1 | 2300/- | 2536/- | 2000/- | 6836/- | 2278.66/- |
| | | Logitech | 1 | 700/- | 772/- | 550/- | 2022/- | 674/- |
| | | HP | 1 | 700/- | 772/- | - | 1472/- | 736/- |
| 32 | Mouse (USB) | Dell | 1 | 450/- | 496/- | 250/- | 1196/- | 398.66/- |
| | | Logitech | 1 | 450/- | 496/- | 400/- | 1346/- | 448.66/- |
| | | HP | 1 | 450/- | 496/- | - | 946/- | 473/- |
| 33 | Screw Driver Set | Taparia | 1 | - | - | 1000/- | 1000/- | 1000/- |
| 34 | Krone Tool | D-Link | 1 | 1200/- | 1323/- | - | 2523/- | 1261.50/- |
| 35 | Crimping Tool | D-Link | 1 | 1500/- | 1654/- | 2000/- | 5154/- | 1718/- |
| 36 | Network Switch 8 Port | D-Link | 1 | 800/- | 882/- | 650/- | 2332/- | 777.33/- |
| 37 | Network Switch 16 Port | D-Link | 1 | 1200/- | 1323/- | - | 2523/- | 1261.50/- |
| 38 | Network Switch 24 Port | D-Link | 1 | 2250/- | 2481/- | 1500/- | 6231/- | 2077/- |
| 39 | Network Switch 48 Port | D-Link | 1 | 12000/- | 13230/- | 3048/- | 28278/- | 9423/- |
| 40 | Cat 6 Cable Box | D-Link | 1 | 5100/- | 5623/- | 6000/- | 16723/- | 5571.33/- |
| 41 | I/O Box With face Plate & Back Box | D-Link | 1 | 250/- | 276/- | 300/- | 826/- | 275.33/- |
| 42 | External DVD Writer | LG | 1 | 2200/- | 2426/- | 1700/- | 6326/- | 2108.66/- |
| 43 | Internal DVD Writer | LG | 1 | 1300/- | 1433/- | 1000/- | 3733/- | 1244.33/- |
| 44 | External Hard Disk (1 TB) | Seagate | 1 | 4700/- | 5182/- | 4500/- | 14382/- | 4794/- |
| | | WD | 1 | 4900/- | 5402/- | - | 10302/- | 5151/- |
| | | Toshiba | 1 | 4800/- | 5292/- | - | 10092/- | 5046/- |
| 45 | Antivirus for Client | Quick Heal Total Security | 1 | 500/- | 551/- | 1100/- | 2151/- | 717/- |
| | | Net Protector Total Security | 1 | 500/- | 551/- | 400/- | 1451/- | 483.66/- |
| 46 | Pendrive 16 GB | HP | 1 | 500/- | 551/- | 500/ | 1551/- | 517/- |
| 47 | Pendrive 32 GB | HP | 1 | 900/- | 992/- | 1000/- | 2892/- | 964/- |
| 48 | SMPS | Branded | 1 | 800/- | 882/- | 600/- | 2282/- | 760.66/- |
| 49 | 12+v Volts UPS Battery | Exide | 1 | 750/- | 827/- | 1000/- | 2577/- | 859/- |
| | | Powersafe | 1 | 750/- | 827/- | - | 1577/- | 788.50/- |
| | | Luminous | 1 | 750/- | 827/- | - | 1577/- | 788.50/- |
| 50 | RJ 45 Connector | D-Link | 1 | 4/- | 4/- | 8/- | 16/- | 5.33/- |

दोन्ही रुग्णालयांतील कार्यान्वित असलेल्या संगणकांची दुरूस्ती देखभाल करणेकामी उपरोक्त नमूद तक्त्यातील संगणकीय स्पेअर पार्ट्सची व इतर संगणकीय साहित्यांची वेळोवेळीआवश्यकता भासत असते.

त्यामुळे दोन्ही रुग्णालयाच्या कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने उपरोक्त नमूद तक्त्यातील संगणकीय स्पेअर पार्ट्‌सची व इतर संगणकीय साहित्यांचे वार्षिक दर संस्थानच्या विहीत पद्धतीने निश्चित होणे आवश्यक आहे.

सन 2013-14 या आर्थिक वर्षात संगणकांची दुरूस्ती देखभाल करणेकामी स्पेअर-पार्ट्‌स व इतर किरकोळ साहित्यांकरीता साधारणत: रक्कम रु. 1,12,384/- मात्र इतका व ऑक्टोबर 2015- ऑक्टोबर 2016 या वर्षात सदरकामी साधारणत: रक्कम रु. 95,556/- मात्र इतका खर्च झालेला आहे.

**मागणी:-** त्यानुसार, पुढील एका वर्षाकरीता दोन्ही रुग्णालयांमध्ये कार्यान्वित असलेले संगणके व संगणकीय साहित्यांची दुरूस्ती व देखभाल कामी आवश्यक असणारे संगणकीय स्पेअर पार्ट्‌स व इतर संगणकीय साहित्यांची वार्षिक दर संस्थानचे विहित पद्धतीने निश्चित करणेकामी, माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावरनिविदेची जाहिरात प्रसिद्ध करून विविध पुरवठाधारकांकडून सीलबंद पाकिटात त्यांची दरपत्रके मागविता येईल. तद्नंतर प्राप्त होणारी दरपत्रके मा. खरेदी समितीचे सभेसमोर उघडण्यात येऊन निम्नत्तम पुरवठाधारकास कार्यादेश देता येईल व दर निश्चित झालेल्या निम्नत्त्म पुरवठाधारकाकडून कार्यादेशाच्या तारखेपासून पुढील एक वर्षाच्या कालावधी अखेरपर्यंत आवश्यकतेनुसार सदरचे संगणकीय साहित्य खरेदी करता येईल, असे नम्र मत आहे.

**विभागाचाअभिप्राय/ स्पष्टमत:-** संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमधील कार्यान्वित असलेले संगणके व संगणकीय साहित्यांची दुरुस्तीकामी आवश्यक असणारे संगणकीय स्पेअर-पार्ट्‌स व साहित्यांचे पुढील एका वर्षाकरीताचे वार्षिक दरपत्रके संस्थानचे विहित पद्धतीने निश्चित करणेकामी, माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर निविदेची जाहिरात प्रसिद्ध करणेस व विविध पुरवठा धारकांकडून सिलबंद पाकिटात वार्षीक दराबाबतचे कोटेशन मागविणेस, तसेच प्राप्त होणारी दरपत्रके मा.खरेदी समितीचे सभेसमोर उघडून दर निश्चित झालेल्या निम्नत्तम निविदाधारकास पुरवठा आदेश देणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजीत खर्चास मान्यता मिळणेकामी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय होणेस्तव सादर!

निर्णयास्त व सादर.

**निर्णय क्र.५९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दोन्ही रुग्णालयाकरीता संगणकीय साहित्यांचे वार्षिक दर निश्चित करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.७३** **श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता, डस्टबीन, बकेट व मग इत्यादी खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील मेट्रन ऑफीसने मागणीपत्रकान्वये खालील डस्टबीन, बकेट व मग इ.ची मागणी केलेली आहे.

| Sr. No. | Description | Dustbin without Jali | | | | | | | | | | | | Dustbin with Jali White | Bath Bucket 15 Ltr | Bucket 5 Ltr Yellow | Mug | Dustbin with Padle |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 15 Ltr. | | | | 50 Ltr. | | | | 100 Ltr. | | | | | | | | |
| | | Yellow | Green | Blue | Red | Yellow | Green | Blue | Red | Yellow | Green | Blue | Red | | | | | |
| 1 | CRU - II | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 2 | | | |
| 2 | CRU - II | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | | | | 1 | 1 | | | 2 |
| 3 | Cardiac Ward | 1 | 1 | 1 | 1 | | 1 | | | | | | | 1 | | | | |
| 4 | CVTS Ward | | | | | | | | | | | | | 1 | 8 | 5 | 8 | |
| 5 | ICCU | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 4 | | 4 | 12 |
| 6 | GICU | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 2 | 2 | | 2 | 4 |
| 7 | FGW | 1 | 1 | 1 | 1 | | | | | | | | | 1 | 5 | | 5 | |
| 8 | Ortho O.T. | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | 1 | 2 | | | | |
| 9 | Neuro O.T. | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | 1 | 2 | | | | |
| 10 | Gen O.T. | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | 1 | 1 | | | 1 | |
| 11 | CVTS O.T. - 1 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 3 | 1 | 1 | | | | | 2 | | | | |
| 12 | CVTS O.T. - 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | | | | 1 | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | Cathlab | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | | | | 1 | | | | |
| 14 | Medicine Ward | 2 | 1 | 1 | 1 | | | | | | | | | 1 | 15 | | 15 | |
| 15 | SICU | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | | |
| 16 | Dailysis | 1 | 1 | 1 | 1 | | | | | | | | | 1 | 10 | | | |
| 17 | Rediology | 2 | 2 | 2 | 2 | | | | | | | | | 2 | | | | 5 |
| 18 | All OPD | | | | | | | | | | | | | | | | | 15 |
| 19 | MSW | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | | | | 1 | 5 | 5 | 5 | |
| 20 | SPR + Deluxe | 1 | 1 | 1 | 1 | | | | | | | | | 1 | 9 | 10 | 10 | 9 |
| 21 | Casualty | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | | | | 1 | | | | 10 |
| | **Total Qty.** | **25** | **24** | **24** | **24** | **13** | **16** | **13** | **13** | **7** | **7** | **4** | **7** | **25** | **62** | **20** | **50** | **57** |

सध्या रुग्णालयातील डस्टबीन ह्या वापरुन खराब झालेल्या आहेत. त्यामुळे विविध वार्ड / विभागांमध्ये ठेवण्यासाठी डस्टबीन, बकेट व मग इ.ची आवश्यता आहे. त्यामुळे मेट्रन ऑफीसने उपरोक्त प्रमाणे डस्टबीन, बकेट व मग इ.चीमागणी केलेली आहे.

उपरोक्त विभागासाठी उपरोक्त प्रमाणे डस्टबीन, बकेट व मग इ. खरेदीकामी अंदाजेखर्चाकरीता M/s.Nilkamal, Nashik यांचेकडून दि२३/०३/२०१७ रोजीचे ई मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानूसार M/s.Nilkamal, Nashik यांनी दि.०१/०४/२०१७ रोजीचे ई मेल पत्रान्वये दर कळविलेले आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| **Sr. No.** | Description | Qty. | **Estimate cost ( per unit)** | **Total Amt in Rs.** |
|---|---|---|---|---|
| 1 | Dustbin without Jali 15 Ltr. | | | |
| | Yellow | 25 | 120.00 | 3000.00 |
| | Green | 24 | 120.00 | 2880.00 |
| | Blue | 24 | 120.00 | 2880.00 |
| | Red | 24 | 120.00 | 2880.00 |
| 2 | Dustbin without Jali 50 Ltr. | | | |
| | Yellow | 13 | 450.00 | 5850.00 |
| | Green | 16 | 450.00 | 7200.00 |
| | Blue | 13 | 450.00 | 5850.00 |
| | Red | 13 | 450.00 | 5850.00 |
| 3 | Dustbin without Jali 100 Ltr. | | | |
| | Yellow | 7 | 850.00 | 5950.00 |
| | Green | 7 | 850.00 | 5950.00 |
| | Blue | 4 | 850.00 | 3400.00 |
| | Red | 7 | 850.00 | 5950.00 |
| 4 | Dustbin with Jali White | 25 | 75.00 | 1875.00 |
| 5 | Bath Bucket 15 Ltr | 62 | 150.00 | 9300.00 |
| 6 | Bucket 5 Ltr Yellow | 20 | 80.00 | 1600.00 |
| 7 | Mug | 50 | 20.00 | 1000.00 |
| 8 | Dustbin with Padle | 57 | 150.00 | 8550.00 |
| | | **Total Amt in Rs.** | | 79965.00 |

उपरोक्त प्रमाणे डस्टबीन, बकेट व मग इ. खरेदीकामी रक्कम रू.७९,९६५/- (अक्षरी रू. एकोण एंशीहजार नऊशे पासष्ठ मात्र) अपेक्षित आहे.

**मागणी –** श्री साईबाबा रुग्णालयातीलमेट्रनविभागाने दि.०७/०३/२०१७ रोजीचे पत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.०८/०३/२०१७) मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३.– दरपत्रकाच्या आधारे खरेदी- जेव्हा खरेदीची किंमत रुपये पाच हजार (रु.5,000/-) पेक्षा जास्त व रुपये तीन लाख (रु.3,00,000/-) पर्यंत असेल तेंव्हा खरेदी दरपत्रक मागवून (खुली स्पर्धत्मक निविदा न मागवता) करता येईल. यासाठी खरेदी किंमतीच्या मर्यादेत वाढ करण्याबाबत दर 5 वर्षांनी उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग आढावा घेऊन स्वतंत्र आदेश निर्गमित करेल (परिशिष्ट९) अशी दरपत्रके खुल्या बाजारातून कमीत कमी तीन वेगवेगळ्या पुरवठादार/ उत्पादकांकडून तुलना करण्यासाठी मागविण्यात यावीत. दरपत्रक सादर करणा-या निविदाकारांचा खरेदी कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा. यापूर्वी असे दिसून आले आहे की, खरेदी अधिकारी मोठे आदेश लहान लहान आदेशांमध्ये विभागणी करतात आणी ते त्याच विक्रेत्यांकडून दरपत्रकाच्या माध्यमातून खरेदी करतात. ही प्रथा काटेकोरपणे टाळण्यात यावी. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रुपये तीन लाखापेक्षा (रु.3,00,000/-) जास्त नसावे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदर विभागामध्ये सध्या रुग्णालयातील डस्टबीन, बकेट व मग इ. वापरुन खराब झालेले आहेत. त्यामुळे विविध वार्ड / विभागांमध्ये ठेवण्यासाठी डस्टबीन, बकेट व मग इ. ची आवश्यकता आहे,त्यामुळे त्यांना नवीन डस्टबीन, बकेट व मग इ. विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातीलविविध वार्ड / विभागाकरीता उपरोक्तप्रमाणे डस्टबीन, बकेट व मग इ. विहित पध्दतीने कोटेशनमागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रू.७९,९६५/- (अक्षरी रू. एकोणएंशीहजार नऊशे पासष्ठ मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे डस्टबीन, बकेट व मग इत्यादी खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७९,९६५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.७४** **श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरीता Biopolar Cable व Baonet Forcep खरेदीकामी येणाऱ्या जास्तीच्या खर्चास मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील मंजुर टिपणीअन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरिता Biopolar Cable व Biyonet Forcep विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेव व याकामी येणा-या रक्कम रू. २८,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली होती.त्यानुसार इकडील पत्र क्र. २४७३, दि.०९/१२/२०१५ अन्वये एकूण ०५ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि ३१/१२/२०१५ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते परंतु कोटेशन विहीत वेळेत प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र.१०५४ दि. २२/०८/२०१६ अन्वये एकूण १७ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि १५/०९/२०१६ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते त्यास अनुसरून ०५ सिलबंद कोटेशन प्राप्त झाले होते.

दि.२८/१२/२०१६ रोजीचे मा. रुग्णालय उपसमितीचे सभेत प्राप्त झालेले कोटेशन उघडण्यात आले. प्राप्त कोटेशन पैकी M/s. PSI Marketing Pvt.Ltd.,Nagpur यांचे निम्नतम दर प्राप्त झालेले असल्यामुळे त्यांचे दरानुसार सदर साहित्य खरेदीकामी रु.४६९२०/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळालेली आहे. परंतु दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत सदर Biopolar Cable व

Biyonet Forcep खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रू. २८,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली होती त्यानुसार प्रत्यक्षात रक्कम रू.१८,९२०/- इतका जास्तीचा खर्च येणार आहे.

तरी M/s. PSI Marketing Pvt.Ltd.,Nagpur यांचेकडून Biopolar Cable व Biyonet Forcep खरेदी करण्यास व याकामी येणा-या रक्कम रू.१८,९२०/- (४६९२०-२८,००० = १८,९२०) इतक्या जास्तीच्या खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरीता आवश्यक असलेले Biopolar Cable व Baonet Forcep प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, M/s. PSI Marketing Pvt.Ltd., Nagpur यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.१८,९२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.७५** **श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी.विभागामध्ये मंजूरदराने Epoxy Flooring व Coving चे काम करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. मधील Epoxy Flooring खराब झालेले असल्यामुळे सदर विभागाने मागणीपत्रकान्वये Epoxy Flooring चे काम करुन मिळावे असे कळविलेले आहे तसेच सदर ओ.टी. मधील Coving खराब झालेले असून ते देखील करणे गरजेचे आहे. तेथील Epoxy Flooring चे कामाचा तपशील खालील प्रमाणे -

| अ.नं. | तपशील | |
|---|---|---|
| १ | Epoxy Flooring ओ.टी. नं – १ | ३८७.५००७६ Sq ft. |
| | Covingओ.टी. नं – १ | २१५.२७८३ |
| २ | Epoxy Flooring ओ.टी. नं – २ | ३८७.५००७६ Sq ft. |
| | Covingओ.टी. नं – २ | २१५.२७८३ |

दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २२५ (९) अन्वये श्रीसाईबाबारुग्णालयातील CVTS O.T.2 मध्ये Epoxy Flooring चेकामकरुनघेणेसाठी M/s. Rainbow Enterprises, Nashik यांचे रु.२३,५१३/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आलेली होती. त्यानूसार इकडील पत्र क्र. ०३ दि.०१/०४/२०१७ अन्वये M/s. Rainbow Enterprises, Nashik यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कार्यादेशानुसार M/s. Rainbow Enterprises, Nashik यांनी CVTS O.T.2 मध्ये Epoxy Flooring चेकामकरुन दिलेले आहे. सदर काम करण्यास M/s. Rainbow Enterprises, Nashik यांचे प्रतीनिधी शिर्डी येथे आले असता त्यांना जनरल ओ.टी. येथे Epoxy Flooring चेकामाबद्दल विचारणा केली होती ते याच मंजूर दराने सदर काम करण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितलेले आहे. तसेच सदर ओ.टी. मधील Coving खराब झालेले असून ते देखील करणे गरजेचे आहे. जनरल ओ.टी. विभागातील दोन्ही विभागाकरीता एकूण ४३०.५६ Running ft. इतके Coving चे काम करावे लागणार आहे. सदर Epoxy Flooring चे काम M/s. Rainbow Enterprises, Nashik यांचेकडून करण्यात असल्यामुळे त्याच पुरवठाधारकाकडून Coving चे काम करावे लागणार आहे. त्यासाठी M/s. Rainbow Enterprises, Nashik यांना विचारणा केली असता त्यांनी रु.३७/- इतके प्रती Running ft. इतकेदर कळविलेले आहे. त्यांचे दरानुसार सदर Coving चे कामाकरीता रक्कम रु.१५९३०.६० इतका खर्च येणार आहे. सदर ओ.टी मध्ये Epoxy Flooring व Coving चे काम करणकरीता एकत्रित रक्कम रु.७४१३०.६० इतका खर्च येणार आहे.

M/s. Rainbow Enterprises, Nashik मंजूर दरानूसार जनरल ओ.टी.विभागात Epoxy Flooring करणेकामी रु. ५८२०० /- इतका खर्च येणार आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr.No. | Description | | Rate Per in Rs. | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|
| १ | Epoxy Flooring ओ.टी. नं – १ | ३८८ Sq ft. | 75.00 Per Sq ft. | २९१००.०० |
| २ | Covingओ.टी. नं – १ | २१५.२७८३ Running ft | 37.00 Running ft | ७९६५.३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | Epoxy Flooring ओ.टी. नं – २ | ३८८ Sq ft. | 75.00 Per Sq ft. | २९१००.०० |
| ४ | Covingओ.टी. नं – २ | २१५.२७८३ Running ft | 37.00 Running ft | ७९६५.३० |
| | | **Total Amt in Rs.** | | **७४१३०.६०** |

**मागणी–** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी.विभाग यांचे दि.१३/०४/२०१७ रोजीचे मागणी पत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि.२९/०४/२०१७)

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. 3.3.2 पुनर्प्रत्ययी आदेश – पूर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुनर्प्रत्ययी आदेश, सुरुवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महीन्याच्या कालावधीच्या पूर्वी देता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २२५ (९) अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS O.T.2 मध्ये Epoxy Flooring चे काम करुन घेणेसाठी M/s. Rainbow Enterprises, Nashik यांचे रु.२३,५१३/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आलेली होती. त्यानूसार इकडील पत्र क्र.०३ दि.०१/०४/२०१७ अन्वये M/s. Rainbow Enterprises, Nashik यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कार्यादेशानुसार M/s. Rainbow Enterprises, Nashik यांनी CVTS O.T.2 मध्ये Epoxy Flooring चेकामकरुन दिलेले आहे. सदर काम करण्यास M/s. Rainbow Enterprises, Nashik यांचे प्रतीनिधी शिर्डी येथे आले असता त्यांना जनरल ओ.टी. येथे Epoxy Flooring चेकामाबद्दल विचारणा केली होती ते याच मंजूर दराने सदर काम करण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितलेले आहे. तसेच सदर ओ.टी. मधील Coving खराब झालेले असून ते देखील करणे गरजेचे आहे. जनरल ओ.टी. विभागातील दोन्ही विभागाकरीता एकूण ४३०.५६ Running ft. इतके Coving चे काम करावे लागणार आहे. सदर Epoxy Flooring चे काम M/s. Rainbow Enterprises, Nashik यांचेकडून करण्यात्त असल्यामुळे त्याच पुरवठाधारकाकडून Coving चे काम करावे लागणार आहे. त्यासाठी M/s. Rainbow Enterprises, Nashik यांना विचारणा केली असता त्यांनी रु.३७/- इतके प्रती Running ft. इतकेदर कळविलेले आहे. त्यांचे दरानुसार सदर Coving चे कामाकरीता रक्कम रु.१५९३०.६० इतका खर्च येणार आहे. सदर ओ.टी मध्ये Epoxy Flooring व Coving चे काम करणकरीता एकत्रित रक्कम रु.७४१३०.६० इतका खर्च येईल.

तरी उपरोक्त Epoxy Flooring चे काम मंजूर दराने करण्यास तसेच Coving चे काम रु.३७/- इतके प्रती Running ft. याप्रमाणे करण्यास व याकामी येणा-या एकत्रित रक्कम रु. ७४१३१/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी.विभागामधील Epoxy Flooring व Coving चे काम करुन घेणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.७६** **(अ) जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरीमिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक-** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | श्री.बाबासाहेब काशिनाथ थेटे<br>विभाग-द्वारावती<br>हुद्दा- मदतनीस | स्वतः | Ca | डॉ.देवरे | रुबी हॉल क्लिनीक, पुणे | ३४१०२७.०० | ३०३९३२.०० | |
| २ | श्री.शेषराव राधाकृष्ण कुलभैया<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-कॅथ्लॅब टेक्नीशियन | वडिल | Ca | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | १५६३८७.०० | १४२९४७.०० | |
| | | | | | **एकूण** | **४९७४१४.००** | **४४६८७९.००** | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–**

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.४४६८७९.००इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेचरुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले वउपचार घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापनसमितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

---

**(ब) जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरीमिळणेबाबत.**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.– १)** जा.नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | श्री.बाबासाहेब काशिनाथ थेटे<br>विभाग-द्वारावती<br>हुद्दा- मदतनीस | स्वतः | Ca | डॉ.देवरे | रुबी हॉल क्लिनीक,पुणे | १०३३४९.०० | १०२१३९.०० | |
| २ | श्री. शेषराव राधाकृष्ण कुलभैया<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-कॅथ्लॅब टेक्नीशियन | वडिल | Ca | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | ४५५९०.०० | ४३९१०.०० | |
| ३ | श्री.अभयकुमार शांताराम दुनाखे | स्वतः | Septicemic Hydrovolu | डॉ.जाधवर | सह्याद्री हॉस्पिटल, नाशिक | ५९६८२७.०० | ५११८२१.०० | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विभाग-आयटीआय हुद्दा-निर्देशक | | me Shock with uncontrolled DM/ARF herpos zoster | | | | | |
| | | | | | **एकूण** | ७४५७६६.०० | ६५७८७०.०० | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.६५७८७०.०० इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन काही औषधे औषध भांडार विभागात उपलब्ध नव्हती तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील अ व ब प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची, वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे, अ व ब प्रस्तावातील तक्त्यामध्ये कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम, त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.७७** **न्युरो ओ.टी. व पॅथोलॉजी विभागातील यु.पी.एस.च्या बॅटरीज खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील न्युरो ओ.टी. पॅथोलॉजी विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 470, दि. 23/04/2013 अन्वये मे.तेजस इलेक्ट्रॅानिक्स, अहमदनगर यांचेकडुन 10 KVA यु.पी.एस. 1 नग एकुण रू.1,50,350/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले. तसेच पुरवठा आदेश 8630 दि. 02/02/2013 पॅथोलॉजी विभागाकरीता मे. ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. मुंबई यांचेकडुन एक Fully Automatic Clinical Bio- Chemistry Analyzer मशिन 2 KVA यु.पी.एस. सह एकुण रू.10,35,500/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर यु.पी.एस. करीता कंपनीने दिलेला वॉरंटी कालावधी संपला असून सदर यु.पी.एस.ची दुरुस्ती व देखभालीकरीता मे. तेजस इलेक्ट्रॅानिक्स, अहमदनगर यांचेकडे वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करणेत येत आहे. सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणाऱ्या स्पेअर पार्टची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या न्युरो ओ. टी. व पॅथोलॉजी विभागातील यु.पी.एस. व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागांनी कळविले आहे. त्यानुसार वरील दोन्ही यु.पी.एस.ची तपासणी करून यु.पी.एस. च्या (12V/18Ah) बॅटरीज खराब झाल्याचे निदर्शनास आले आहे. न्युरो ओ.टी. विभागातील 10 के.व्ही.ए. यु.पी.एस. करीता (12V/18Ah) या प्रकारच्या एकुण 16 नग बॅटरीज तसेच कार्डीयाक ओ.टी. विभागातील 10 के.व्ही.ए. यु.पी.एस. करीता (12V/18Ah) या प्रकारच्या एकुण 4 नग बॅटरीज अशा 20 नग बॅटरीज बदलणे आवश्यक आहे. तसेच 2 KVA यु.पी.एस. करीता (12V/18Ah) 8 नग बॅटरीज बदलणे आवश्यक आहे. सदर यु.पी.एस. नियमीत वापरात असल्याने बॅटरीज तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे.

**मागणी:-** त्यासाठी कंपनीने पत्र दि. 16/03/2017 अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr. No. | Description | Qty | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | 12V,18Ah Sealed Maintainance Free Battery | 28 | 2100.00 | 58,800.00 |
| **Total Amount R/o (Incl. all Taxes) in Rs** | | | | **58,800.00** |

वरीलप्रमाणे 10 के.व्ही.ए. यु.पी.एस. व 2 KVA यु.पी.एस.च्या 28 नग बॅटरीज खरेदी करणेस सर्व करांसहीत एकुण रू. 58,800/- (अक्षरी रू. आठ्ठावन्न हजार आठशे मात्र) इतका खर्च येणार आहे. उपरोक्त बॅटरीज करीता कंपनी दोन वर्षाची वॉरंटी देत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरील संस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल. सदर दुरूस्ती करीता रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेणेची आवश्यकता आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** सध्या पॅथोलॉजी व न्युरो ओ. टी. अशा अतिमहत्वाच्या ठिकाणी Life Saving Equipments & Machines नियमित वापरले जातात. सदरच्या मशिन्स तातडीच्या वेळी वापरल्या जात असताना विदयुत प्रवाह खंडीत झाल्यास बंद पडु शकतात. त्यामुळे रुग्णाच्या जीवास धोका निर्माण होउ शकतो. त्यामुळे यु.पी.एस.च्या बॅटरीज तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे. सदर बॅटरीज विहीत पध्दतीने विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागणी करून खरेदी करता येतील तसेच जुन्या खराब झालेल्या बॅटरीज रेकॉर्ड विभागाकडे जमा करून त्यांची विहीत पद्धतीने विक्री करता येईल असे नम्र मत आहे.

तरी न्युरो ओ. टी. व पॅथोलॉजी विभागातील यु.पी.एस. च्या (12V/18Ah) 28 नग बॅटरीज विहीत पध्दतीने कोटेशन मागणी करून खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. 58,800/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, न्युरो ओ. टी. व पॅथोलॉजी विभागातील यु.पी.एस. साठी (12V/18Ah) २८ नग बॅटरीज खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५८,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.७८** **स्टेन्ट खरेदीकामी संस्थानकडून वाढीव दराने अदा करण्यात आलेली रक्कम पुरवठाधारकाकडून वसूल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण मे. कोचर ॲन्ड असोसिएट्स चार्टेड अकौटंन्ट, मुंबई यांनी केले होते त्यांच्या जा.क्र.एसएसएसटी/एसएसबीएच/वित्त-२०१४ दि.१९/१२/२०१४ च्या लेखापरीक्षण अहवालातील त्रुटी क्र.०९ नुसार स्टेन्ट पुरवठाधारकांना वाढीव दराने बिले अदा केल्यामुळे संस्थानचे रक्कम रु.१६,९९,९३३/- इतक्या रुपयांचे नुकसान झालेले आहे, असे म्हणण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन मध्यवर्ती औषध भांडार विभागाकडून दि.२७/१२/२०१४ रोजी दोष-दुरुस्ती अहवाल सादर करण्यात आला होता. परंतु दि.०३/०९/२०१६ रोजी मा.मुख्यलेखाधिकारी यांचेकडील पत्र जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/२०९७/२०१६ अन्वये सदर पुर्तता अहवाल समाधानकारक व वस्तुनिष्ठ नाही असे सांगण्यात आले.

| 12 | Sternum Cutter | Manman | M/s. Manman mfg. Co. Pvt. Ltd. | 1 | 2006 | 100402 | 11 | 5653.95 | 10 | 150000 | Working but frequent breakdowns and old technology |
| **S** | **Cath Lab** | | | | | | | | | | |
| 1 | ACT Machine | Helena | M/s. B. L. Life Sciences Pvt. Ltd. New Delhi | 1 | 2006 | 110000 | 11 | 6194.48 | 8 | 200000 | Working but old technology. |
| 2 | Pace Maker Dual Chamber 5388 | Meditron ic | M/s.Medico Equipment ,Mumbai | 1 | 2007 | 200000 | 10 | 1313.51 | 5 | 200000 | Working but old technology. |
| 3 | Multipara Monitor | MP20 | M/s. Philips Electronics Pvt. Ltd | 1 | 2005 | 241543 | 12 | 10202.34 | 8 | 450000 | Working but old technology. |
| 4 | Electric Suction machine | | M/s. Kalelkar Surgical Pvt. Ltd. Mumbai | 1 | 2005 | 18580 | 12 | 1046.30 | 10 | 15000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| 5 | Fumigator | Micro clean | M/s. Sanjay Medical, Pune | 1 | 2006 | 32000 | 11 | 1802.20 | 15 | 25000 | Not Working needs immediate replacement |
| 6 | TEE Probe | Omni III TEE | M/s.CareMedie quip,Mumbai | 1 | 2009 | 2000000 | 8 | **200231.25** | 8 | 1500000 | Not Working needs immediate replacement |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | Cardiodoc image software | Cardiodoc 4.4.8 | M/s Medsynaptic, Pune | 1 | 2013 | 0 | 4 | Nill | 5 | 65000 | Working but frequent breakdowns |
| **T** | **CRU - I** | | | | | | | | | | |
| 1 | Multipara Monitor | MP20 | M/s. Philips Electronics Pvt. Ltd | 8 | 2006 | 1932344 | 11 | **81612.50** | 8 | 350000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| 2 | Multipara Monitor | MP20 | M/s. Philips Electronics Pvt. Ltd | 11 | 2005 | 2656973 | 12 | **84163.50** | 8 | 350000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| 3 | Syringe Pump | Perfuser Compact | M/s. B. Braun Medical, Mumbai | 3 | 2005 | 133650 | 12 | 4233.54 | 10 | 50000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| 4 | Syringe Pump | Perfuser Compact | M/s. B. Braun Medical (I) Pvt. Ltd. Mumbai | 6 | 2005 | 273378 | 12 | 8659.65 | 10 | 50000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| 5 | Syringe Pump | SP500 | M/s. AllwinLifecare, Mumbai | 2 | 2005 | 86030 | 12 | 2725.11 | 10 | 50000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| 6 | Syringe Pump | TOP 5300 | M/s. Rohit Enterprises, Pune | 3 | 2007 | 109999 | 10 | 6194.43 | 10 | 50000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| 7 | ECG Machine | 8408 View | M/s. B. P. L. Ltd. Mumbai | 1 | 2006 | 81700 | 11 | 3450.60 | 8 | 90000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| 8 | ECG Machine | Cardiart 108T/MK | M/s. B. P. L. Ltd. Mumbai | 1 | 1998 | 37000 | 19 | 879.15 | 8 | 30000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| 9 | Bi-Pap Syncrony | Bi- Pap Ventilator | M/s. RescareMedisys (I) Pvt. Ltd | 1 | 2006 | 208000 | 11 | 8784.90 | 10 | 150000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| 10 | Single Phase 10 KVA UPS | Uniline | M/s.Uniline, Mumbai | 1 | 2006 | 83980 | 11 | 3546.75 | 10 | 200000 | Working but frequent breakdowns and old technology. |
| | | **Total no. of machines (B)** | | **171** | | **41049873** | | | **Total cost in Rs. (B')** | **47133600** | |
| **No. of Machines whose depreciated cost is more than Rs.50,000** | | | | **67** | | | | | | | |

**(परीशिष्ट ब)**

**Shri Sainath Hospital, Shirdi**

**Annexure 'B'- Needs to be purchased**

| Sr. No. | Equipment Description | Manufacturer/ Supplier | Purchase/ Install.Year | Purchase Price (Rs.) | Used For Yrs. | Life Expectancy as per WHO Guidelines | Approx. Cost of Equivalent Equip./ Machine per Unit in Rs. | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **A** | **General Surgery OT** | | | | | | | |
| 1 | Radiant Heat Warmer | M/s. Zeal Medical, Mumbai | 1998 | 28985 | 19 | 10 | 35000 | Working but frequent breakdowns So, needs replacement. |
| 2 | Fibre Optic Bronchoscope | M/s. Olympus | 2011 | 500000 | 6 | 6 | 450000 | Not Working, Needs replacement. |
| 3 | Laparoscopy Instrument Set | M/s. Chimco Biomedical, Mumbai | 1999 | 200000 | 18 | 10 | 2000000 | Working but frequent breakdowns So, needs replacement. |
| 4 | Max-50 Ventilator | M/s Max corporation | 2005 | 300000 | 12 | 10 | 800000 | Working but frequent breakdowns So, needs replacement. |
| 5 | CO2 Surgical Laser System | M/s. Shailtec | 2009 | 150000 | 8 | 8 | 300000 | Not Working, Needs replacement |
| 6 | OGD Scope | M/s. Olympus | 1999 | 200000 | 6 | 18 | 400000 | Not Working, Needs replacement |
| **B** | **Ortho surgery OT** | | | | | | | |
| 1 | Electric Ortho Drill machine | M/s.PitkarOrthotols , Pune | 2004 | 65000 | 13 | 10 | 150000 | Working but frequent breakdowns So, needs replacement. |
| 2 | Electric Ortho Drill machine | M/s.PitkarOrthotols , Pune | 2009 | 24001 | 8 | 10 | 150000 | Working but frequent breakdowns So, needs replacement. |
| 3 | Electric Ortho Drill machine | M/s. Manman Surgicals, Pune | 2010 | 112169 | 7 | 10 | 150000 | Working but frequent breakdowns So, needs replacement. |
| 4 | Battery Operated Drill | M/s. Medical Development &Engg. Mumbai | 2011 | 385000 | 6 | 10 | 300000 | Working but frequent breakdowns So, needs replacement. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | Shadowles Lamp | M/s . A.G. Joshi &Co., Pune | 2011 | 370000 | 6 | 6 | 3000000 | Working but frequent breakdowns So, needs replacement. |
| **C** | **Gynec surgery OT** | | | | | | | |
| 1 | L&T Boyles Anesthesia Machine | M/s. L&T Ltd. Pune | 2006 | 190000 | 11 | 10 | 1000000 | Working but frequent breakdowns.And old technology. So, needs replacement. |
| 2 | HospitechBoyels machine | M/s.Hospitech | 2005 | 28000 | 12 | 10 | 1000000 | Working but frequent breakdowns.And old technology. So, needs replacement. |
| 3 | Low Speed Autoclave | M/s.M.shah&Co.Pune | 2000 | 227500 | 17 | 12 | 500000 | Working but frequent breakdowns.And old technology. So, needs replacement. |
| 4 | Pulse Oximeter | M/s.DatexOhmeda (GE Healthcare) | 2000 | 240398 | 17 | 5 | 40000 | Working but frequent breakdowns.And old technology. So, needs replacement. |
| 5 | Jahangir Solid state Electrosurgical Unit | M/s.Jahangir Mumbai | 2000 | 90816 | 17 | 10 | 350000 | Working but frequent breakdowns.And old technology. So, needs replacement. |
| 6 | Jahangir Solid state Electrosurgical Unit | M/s. Jahangir, Mumbai | 2008 | 50000 | 9 | 10 | 350000 | Working but frequent breakdowns.And old technology. So, needs replacement. |
| 7 | Bear CUB Infant Ventilator | M/s.Viaysis | 2005 | 585000 | 12 | 10 | 1000000 | Working but less Use. And old technology. So, needs replacement. |
| 8 | Gynec OT Table | M/s. Janak Healthcare, Mumbai | 2005 | 81246 | 12 | 15 | 1000000 | Working but frequent breakdowns So, needs replacement. |
| 9 | Single Dome Portable Lamp | M/s.Bharat Surgical, Pune | 2010 | 20250 | 7 | 10 | 35000 | Working but frequent breakdowns.And old technology. So, needs replacement. |
| **D** | **ENT/ Opthal OT** | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Operating Microscope | M/s. Carl Zeiss India Pvt Ltd., Mumbai | 1998 | 1983953 | 19 | 12 | 1500000 | Working .And old technology. So, needs replacement. |
| 2 | Marathon Power Unit | M/s. Kalelkersurgicals, Mumbai | 2006 | 1394195 | 11 | 12 | 40000 | Working but frequent breakdowns. So, needs replacement. |
| 3 | ENT OT Table | M/s. Janak Healthcare, Mumbai | 2005 | 81246 | 12 | 15 | 1000000 | Working but frequent breakdowns. So, needs replacement. |
| **E** | **ICCU** | | | | | | | |
| 1 | Draeger Ventilator | M/s.Dragger Medical I Pvt. Ltd, Mumbai | 2005 | 739299 | 12 | 10 | 800000 | Working but frequent breakdowns, Needs Replacement |
| **F** | **Pathology Lab** | | | | | | | |
| 1 | Eliza Plate Reader | M/s. Ark Diagnostics, Mumbai | 1999 | 128250 | 18 | 8 | 250000 | working but old Technology. So, needs replacement |
| 2 | Eliza Plate Washer | M/s. Ark Diagnostics, Mumbai | 2005 | 160000 | 12 | 8 | 200000 | working but old Technology. So, needs replacement |
| 3 | Knife Sharpner | M/s.Panchal Scientific Corporation | 2010 | 34307 | 7 | 10 | 30000 | Working but frequent breakdowns, Needs Replacement |
| 4 | Coagulometer | M/s.Tulip Diagnostics | 2006 | 111550 | 11 | 5 | 200000 | Working but frequent breakdowns, Needs Replacement |
| 5 | Auto Tissue Processor | M/s. Labcon | 2006 | 949375 | 11 | 10 | 1000000 | Not Working, Needs replacement |
| **G** | **Sonography Deptt** | | | | | | | |
| 1 | Ultrasound Machine | M/s. L&T Ltd. Pune | 1999 | 480500 | 18 | 7 | 2000000 | Not Working, Needs replacement |
| **H** | **Radiology Deptt** | | | | | | | |
| 1 | 100 mA X-Ray M/c | M/s.Meditronics | 2008 | 118125 | 9 | 8 | 250000 | Working but frequent breakdowns, Needs Replacement |
| 2 | X-ray Auto Film Processor | M/s. Choksi Imaging Ltd., Mumbai | 2009 | 534375 | 8 | 8 | 1000000 | Not Used. Old Technology. Needs replacement |
| **I** | **Physiotherapy** | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Shortwave Diathermy | M/s.MedtechIndPvt.Ltd | 2007 | 10,24,868 | 10 | 10 | 35000 | Not Working so needs replacement |
| 2 | Traction Machine | M/s.Medtech IndPvt.Ltd | 2007 | 347598 | 10 | 10 | 30000 | Working but frequent breakdowns, Needs Replacement |
| **J** | **Casualty** | | | | | | | |
| 1 | Single Dome Portable Lamp | M/s.A.G. Joshi & co., Pune | 2010 | 20250 | 7 | 10 | 35000 | Working but frequent breakdowns, Needs Replacement |
| 2 | Single Dome Portable Lamp | M/s. Philips electronics India Ltd., Mumbai. | 2000 | 11875 | 17 | 10 | 35000 | Working but frequent breakdowns, Needs Replacement |
| 3 | CardioplusDefibrilator with Multi para Monitor (monophasic) | M/s.Schiller Healthcare | 2005 | 125000 | 12 | 8 | 450000 | Working but old Technology, Needs Replacement |
| **K** | **Blood Bank** | | | | | | | |
| 1 | $4^{o}$ C Freezer | M/s. Remi Sales N Engg. Services, Mumbai | 2008 | 185625 | 9 | 12 | 175000 | Working but frequent breakdowns, Needs Replacement |
| **L** | **Gy.Ward** | | | | | | | |
| 1 | Single dome Portable Lamp | M/s.A.G. Joshi & co., Pune | 2010 | 20250 | 7 | 10 | 35000 | Working but frequent breakdowns, Also Old Technology. So,Needs Replacement |
| 2 | Phototherapy | M/s.Zeal Medical, Mumbai | 1998 | 28985 | 19 | 10 | 35000 | Working but frequent breakdowns, Needs Replacement |
| 3 | Feotal Doppler | M/s.Kalelkar Surgicals, Mumbai | 2007 | 5000 | 10 | 7 | 8000 | Working but frequent breakdowns, Needs Replacement |
| 4 | Radient heat Warmer | M/s.Realmedicare system, Nasik | 2003 | 62560 | 14 | 10 | 65000 | Working but frequent breakdowns, Also Old Technology. So,Needs Replacement |
| **M** | **ECG Deptt** | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | single channel ECG machine | M/s. BPL Ltd., Mumbai | 2000 | 20000 | 17 | 8 | 95000 | Working but frequent breakdowns, Also Old Technology. So,Needs Replacement |
| 2 | single channel ECG machine | M/s.Saitrons Medical Equipments, Loni | 2007 | 15840 | 10 | 8 | 95000 | Working but frequent breakdowns, Also Old Technology. So,Needs Replacement |
| 3 | 12 channel ECG machine | M/s. Gandhi Enterprises, Ahmednagr | 2007 | 93000 | 10 | 8 | 95000 | Working but frequent breakdowns, Also Old Technology. So,Needs Replacement |
| | **Total No. of Machines (D)- 49** | | | | | | **22468000** | |
| **No. of Machines whose depreciated cost is more than Rs.50,000** | | | | | | | | |

श्री साईबाबा हॉस्पिटल येथील (परीशिष्ट अ नुसार) 171 नगमशिन्सबदलणे करीता अंदाजेरू. 4,71,33,600/- (रू. चार कोटी एकाहत्तर लाख तेहतीस हजार सहाशे) अपेक्षीत आहे. आणि श्री साईनाथ रूग्णालय येथील (परीशिष्ट ब प्रमाणे) 49 नग मशिन्स बदलणे करीता अंदाजे रू. 2,24,68,000/- ( रू. दोन कोटी चोवीस लाख आडोसष्ट हजार) खर्च अपेक्षित आहे. याप्रमाणे दोन्ही रूग्णालयातील एकूण 220 नग मशिन्स बदलणे करीता एकूण रू.6,96,01,600/- (रू.सहा कोटी शहान्नव लाख एक हजार सहाशे) खर्च अपेक्षित आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलच्या एकुण 57 नग मशिन्सची खरेदी कार्यवाही हॉस्पिटलचे खरेदी विभागामार्फत सुरू आहे. त्यांची एकुण अंदाजे किंमत रू. 19,04,97,000/- इतकी आहे. वरील एकुण मशिन्स पैकी 23 नग मशिन्सचे घसारा वजा जाता दि. 31/03/2017 रोजीची किंमत रू.50000/- पेक्षा अधिक आहे त्यामूळे सदर 23 नग मशिन निर्लेखित करुन बायबॅक करणे करीता अथवा लिलावाने विक्री करणेसाठी संस्थानला शासनाची पुर्व मान्यता घेणे बंधनकारक आहे. सदर मान्यता मिळालेनंतर विहीत पध्दतीने रुग्णालयाच्या खरेदी विभागामार्फत खरेदीची पुढील कार्यवाही सुरू करता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान:** वरीलसंस्थान अधिनियमानुसार 2004 मधील कलम 17 (4) च्या तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेत निहीत केलेले पन्नास हजार पेक्षा अधिक किंमतचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मैल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजुरी शिवाय समितीला विकता येत नाही, तारण म्हणुन ठेवता येत नाही अन्यथा अन्य संक्रामित करता येत नाही. सदर तरतुदीनुसार रू. 50 हजार पेक्षा अधिक मुल्य असणा-या वस्तु निर्लेखित करुन बायबॅक करणेसाठी अथवा लिलावाने विक्री करणेसाठी संस्थानला शासनाची पुर्व मान्यता घेणे बंधनकारक आहे.

वरीलसंस्थान अधिनियमा नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलच्या एकुण 18 नग मशिन तसेच श्री साईनाथ रुग्णालयाचे एकुण 5 नग निर्लेखित करणेसाठी अथवा लिलावाने विक्री करणेसाठीसंस्थानला शासनाची पुर्व मान्यता घेणे बंधनकारक आहे. सदर मान्यता रूग्णालयाचे विभागाच्या खरेदी/ डेडस्टॉक विभागामार्फत शासनास पत्र पाठवुन करण्यात येते.

उपरोक्त श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मशिन्सपैकी 10नग वगळता तसेच श्री साईनाथ रूग्णालयातील 12 नग वगळता उर्वरीत मशिन्सचा WHO Guidelines नुसार वापरायोग्या कालावधी संपला असुन आजपावेतो उपरोक्त सर्वच मशिन्सचा अधिक वापर झालेमुळे सध्या वारंवार नादुरूस्त होत आहेत. तसेच सध्याच्या वापरात असलेल्या काही मशिन्सचे तंत्रज्ञानात बदल होउन नवीन अद्यावत तंत्रज्ञानाची अधिक अचुकतेने व अधिक सुविधाचे मशिन्स उपलब्ध झालेमुळे अशा विविध कारणामुळे मशिन्स बदलणे आवश्यक आहेत.

सदर मशिन्स बदलणेकरीता रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** सर्व मेडीकल इक्विपमेंटस्, मशिनरी व उपकरणे यांचा नियमित सतत वापर होत असतो, परीणामी मशिनरी व इक्विपमेंटस् वारंवार दुरूस्त देखील करावे लागतात. त्यामुळे दुरुस्ती व देखभालीकरीता होणारा खर्च देखील वाढतो. तसेच अंदाजे दर 10 वर्षांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे, अधिक वेगाने व अचूकतेने काम करणारे आणि वापरकर्ते व रुग्णांना नवीन अधिक सुविधाजनक असे मेडीकल इक्विपमेंटस् मशिनरी व उपकरणे यांचे नवनवीन मॉडेल बाजारात उपलब्ध होत असतात.

तसेच जागतिक आरोग्य संघटनेने विविध मेडिकल इक्वीपमेंट्स करीता वापरायोग्य कालावधी वर्षामध्ये दिलेला असून त्यानुसार वापरायोग्य कालावधी संपल्यानंतर काही इक्विपमेंटस्, मशिनरी व उपकरणे बदलणेची आवश्यकता असते. उपरोक्त सर्व मशिन्सचे सध्या वारंवार ब्रेकडाउन होत असुन ते कधीही बंद पडु शकतात त्यामुळे तातडीने बदलणे आवश्यकता आहे. त्याचा सोबतच्या तक्त्यामध्ये समावेश केला असून सोबत प्रत माहीतीस्तव जोडली आहे.

उपरोक्तपैकी काही इक्विपमेंटस्, मशिनरी व उपकरणे हे आहे त्यास्थितीमध्ये फेर विक्री करणे शक्य आहे.

सोबतच्या तक्त्यानुसार श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयाच्या मशीन्स बदलणेबाबत निर्णय झालेनंतर विहीत पध्दतीने निर्लेखित करुन श्रीसाईबाबा हॉस्पिटलच्या खरेदीविभागामार्फत नवीन मशिन खरेदी करताना Buyback करणे किंवा लिलावाद्वारे विक्री करता येईल असे नम्र मत आहे.

तरी सोबतच्या तक्त्यानुसार श्रीसाईबाबा हॉस्पिटलच्या एकुण 171 नग मशीन्स व श्रीसाईनाथ रूग्णालयाच्या एकुण 49 नग याप्रमाणे दोन्ही रूग्णालयातील एकूण 220 नग मशिन्स बदलणेसाठी व त्यासाठी येणा-या अंदाजे एकुण रू.6,96,01,600/- च्या खर्चास मान्यता घेणेस्तव आणि त्यानंतर श्रीसाईबाबा हॉस्पिटलच्या खरेदी विभागामार्फत पुढील कार्यवाही विहीत पध्दतीने करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिन्स बदलणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,९६,०१,६००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.८५** **श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता (इन्सेटीव्ह) लागु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय ही दोन रुग्णालये चालविली जात आहेत. सदर रुग्णालयांमध्ये वेगवेगळया आजारांवर विविध तपासण्या/उपचार/शस्त्रक्रिया केल्या जातात. शिर्डीसारख्या लहान गावात सुपरस्पेशालिटी दर्जाच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने व त्यासाठी आवश्यक असलेले डॉक्टर्स उपलब्ध होवून ते टिकून राहणेसाठी श्री साईबाबा रुग्णालयातील डॉक्टरांना त्यांचे मासिक वेतनाव्यतिरिक्त रुग्णांकडून आकारण्यात येणाऱ्या बिलातील काही विशिष्ट रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून देणेबाबत प्रथमतः निर्णय संमत झालेला आहे. त्यानूसार दरपत्रकामध्ये वेळोवेळी बदल करण्यात आलेले असून काही डॉक्टरांचे इनसेंटीव्ह कमी जास्त देखील करण्यात आलेले आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाच्या इतर विभागांचे इनसेंटीव्हमध्ये सन २००६ पासून वाढ करणेत आलेली नाही. मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१९६ अन्वये इनसेंटीव्ह रकमेत वाढ करणेबाबत मागणी केलेलीहोती. दि.०७/९/२०१५ रोजीच्या मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेतील निर्णय क्र.३१९ अन्वये इनसेंटीव्ह दराच्या वाढीबाबत इतरही डॉक्टरांची मागणी एकत्रितपणेविचारात घेणे गरजेचेआहे. त्यामुळे इनसेंटीव्ह दर लागू करणेपुर्वी सदर बाबींचा व्यापक अभ्यास करणेची गरज भासलेली आहे. केवळ रुग्णांची गैरसोय होवू नये, डॉक्टर्स हॉस्पिटल सोडून जावू नये तसेच रुग्णालय बंद पडू नये यासाठी प्रायोगिक तत्वावर १ महिन्यासाठी (जुलै २०१५) वाढ देणेत आलेली होती. परंतु, मा.त्रिसदस्यीय समितीला इनसेंटीव्हमधील प्रस्तावित दरवाढीचा किती आर्थिक भार संस्थानवर पडतो याबाबत तौलनिक तक्ता सादर करणेचे ठरले. त्यामुळे नवीन इनसेंटीव्ह दरवाढीबाबत धोरण निश्चित होईपर्यंत प्रायोगिक दरवाढीची अंमलबजावणी न करता सर्व डॉक्टरांना जुन्याच प्रचलित दराने इनसेंटीव्ह देणेत यावा असे समितीने ठरविले व इनसेंटीव्ह दरवाढीबाबत सर्वसमावेशक प्रस्ताव त्रिसदस्यीय समितीचे सभेत सादर करावा अशी सुचना देणेत आली.

त्याअनुषंगाने श्रीसाईनाथ रुग्णालयातील डॉक्टर देखील वेळोवेळी प्रोत्साहन भत्ता मिळणेकामी वारंवार लेखी किंवा तोंडी स्वरुपात विचारणा करीत आहेत. तसेच काही डॉक्टर्स इनसेंटीव्ह अभावी रुग्णालय सोडून

गेलेले आहेत. रुग्णालयातील नामांकित डॉक्टरांनी रुग्णांना अखंडीत सेवा देणे गरजेचे असल्याने डॉक्टरांना इनसेंटीव्ह मिळणे आवश्यक वाटते. रुग्णालयात एकुणच असणारी रुग्णसंख्येचा विचार केला असता डॉक्टरांना अतिरिक्त काम करावे लागत आहे.

सदर बाबतीत विचार करता डॉक्टरांना देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्याबाबत महाराष्ट्र शासनाचा कोणताही आदेश उपलब्ध झालेला नाही. सदर इनसेंटीव्हची रक्कम रुग्णालयपरत्वे ज्या त्या रुग्णालयांवर अवलंबून राहील अशी माहिती मिळालेली आहे

सदर बाब ही वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत असल्याने वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक यांनी तयार करुन दिलेल्या निर्देश/ विवरणानूसार श्री साईनाथ रुग्णालयाकडील डॉक्टरांना द्यावयाच्या प्रोत्साहन भत्यांबाबतचे दरपत्रक तयार करणेत येवून सोबत जोडले आहे.

श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालयआहे. सदर रुग्णालयाची दैनंदिन ओपीडीची संख्या ही साधारण ७०० ते ८०० होती. परंतु,मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र.९४४, दि.२२/१२/२०१६ अन्वये श्री साईबाबांनी सुरु केलेले रुग्णसेवेचे कार्य पुढे सुरु ठेवून त्याची व्याप्ती वाढविणेसाठी दि.०१/०१/२०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालयमध्ये होत असलेले वैद्यकीय उपचार सर्वांसाठी मोफत करणेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे त्यामुळे दैनंदिन ओपीडी १२०० ते १४०० पर्यंत पोहोचलेली आहे. रुग्णालयास ३०० बेडची मंजुरी प्राप्त असून त्यापैकी २५०-२७५ बेड कायम भरलेले असतात.

३०० बेडच्या रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या डॉक्टरांच्या संख्येपेक्षा श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांची संख्या तुलनेनेकमी आहे. २०० बेडसाठी २००९ व२०११ साली आकृतीबंध मंजुर असून वाढीव बेडसाठी आकृतीबंधास मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे उपलब्ध असणा-या मनुष्यबळावर अतिरिक्त कामकाजाचा भार पडलेला आहे. रुग्णालयातील ब-याच विभागांमध्ये एकच डॉक्टर असल्यामुळे सदर डॉक्टर २४ तास ऑनकॉल असतात.

श्री साईनाथ रुग्णालयात कायम, रिक्त व व्हिजीटींग पध्दतीने कार्यरत असणारे डॉक्टर्स

| अ.नं. | पदनाम | मंजुर पदे | कायम | व्हिजीटींग | कंत्राटी | रिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक | १ | ० | ० | ० | १ | डॉ.मैथिली पितांबरे, प्र.वै.अ. रक्तसंक्रमण अधिकारी |
| २ | फिजिशियन | २ | १ | १ | ० | १ | |
| ३ | त्वचारोग तज्ञ | १ | १ | ० | ० | ० | |
| ४ | कान नाक घसा तज्ञ | १ | ० | २ | - | १ | |
| ५ | जनरल सर्जन | २ | १ | २ | - | १ | |
| ६ | रेडिओलॉजिस्ट | १ | १ | ० | ० | ० | |
| ७ | भुलतज्ञ | १ | ० | ० | ० | १ | |
| ८ | नेत्ररोग तज्ञ | १ | २ | ० | ० | ० | डॉ.अजित पाटील, नेत्ररोग तज्ञ, श्री साईबाबा रुग्णालय प्रत्यक्ष कामकाज श्रीसाईनाथ रुग्णालय. |
| ९ | स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ | १ | १ | ० | ० | ० | |
| १० | ऑर्थो.सर्जन | २ | १ | ० | ० | १ | |
| ११ | पॅथॉलॉजिस्ट | १ | १ | ० | ० | ० | |
| १२ | क.भुलतज्ञ | ३ | ३ | ० | १ | ० | |
| १३ | दंतरोग तज्ञ | २ | १ | ० | १ | ० | |
| १४ | होमिओपथीतज्ञ | १ | १ | ० | ० | ० | |
| १५ | बालरोग तज्ञ | १ | १ | ० | ० | ० | |
| १६ | सोनोलॉजिस्ट | १ | १ | ०२ | ० | ० | डॉ.राजश्री शिनगारे, आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | आयुर्वेद तज्ञ | २ | १ | २ | ० | १ | |
| १८ | सीएमओ | ६ | ३ | ० | ० | ३ | |
| १९ | आरएमओ | १६ | ११ | ० | २ | ५ | |
| २० | चीफ बीटीओ | १ | ० | ० | ० | १ | |
| २१ | बीटीओ | ४ | २ | ० | ० | २ | डॉ.भरत धोका, आरएमओ, श्री साईनाथ हॉस्पिटल, प्रत्यक्ष काम श्री साईनाथ रक्तपेढी बीटीओ |

श्री साईनाथ रुग्णालयातील ०८ आरएमओ डॉक्टर्स हे इतर विभागात तज्ञ म्हणून काम पाहत आहेत व उर्वरित ०६ आरएमओ हे अपघात विभागात शिफटप्रमाणेडयुटी करतात.

येथील वैद्यकीय अधिकारी वेळोवेळी साईभक्तांची सेवा करणे तसेच तातडीच्या शस्त्रक्रिया करणे, वेगवेगळया शिबीरांचे आयोजन करणे, ओपीडीतील रुग्ण तपासणे इ.प्रकारची रुग्णसेवा वेळेचे बंधन न पाळता करीत आहेत. परंतु याकामी श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिका-यांना कोणत्याही प्रकारचा प्रोत्साहन भत्ता देण्यात येत नाही.

श्री साईनाथ रुग्णालयाकडील डॉक्टर्स ब-याच वर्षांपासून सेवेत असून विनातक्रार सेवा पुरवित आहेत. परंतु सदर रुग्णसेवा करताना डॉक्टर्स श्री साईबाबा हॉस्पिटलमधीलडॉक्टरांच्या वेतनाबरोबर तुलना करीत आहेत. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णसेवा संपुर्णपणे मोफत केलेली असल्याने सदर डॉक्टरांना बिलातून इनसेंटीव्ह देणे शक्य नाही. त्यामुळे एक विशेष बाब म्हणून व श्री साईबाबा रुग्णालयाशी तुलना करुन श्री साईनाथ रुग्णालयातील सदर डॉक्टरांना इनसेंटीव्ह देणेत यावा.तसेच रुग्णांची संख्या देखील श्रीसाईबाबा रुग्णालयाच्या संख्येत जास्त असलेमुळे प्रतिरुग्ण इनसेंटीव्ह देणे शक्य नाही तरी याकरिता फिक्स इनसेंटीव्ह देणे योग्य राहील असे मत आहे.

**विभागाचा अभिप्राय-**

श्री साईनाथ रुग्णालयात मंजुर कर्मचारी आराखडयाप्रमाणे पदे व शैक्षिणक पात्रता व कामाचा अनुभव यावरुन निवड झालेल्या डॉक्टरांना ते नव्याने कामावर रुजु होणे व त्यांची गुणवंत सेवा अखंडीत राहणेकामी एकुण मासिक पगाराव्यतिरिक्त किमान रक्कम देणेस अनुसरुन फिक्स इनसेंटीव्ह प्रस्तावित करत आहोत. तसेच अशा प्रकारचा इनसेंटीव्ह सुरु करणेसाठी शासनाचा कोणताही आधार नाही व संस्थान अधिनियमात ही तरतूद नाही. तरी श्री साईबाबा रुग्णालयातील इनसेंटीव्ह पध्दतीच्या आधारे श्रीसाईनाथ रुग्णालयात इनसेंटीव्ह सुरु करणे गरजेचे आहे. यासाठी सदर डॉक्टरांचा संस्थान रुग्णालयातील सेवेचा कालावधी व शैक्षणिक पात्रता (पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री घेऊन बाहेर पडलेला डॉक्टर साधारण १ वर्षात १,००,०००/- इतका पगार कोणत्याही रुग्णालयात सरासरी मिळवतो, अनुभवानुसार त्याचा पगार वाढत जातो.) हे लक्षात घेता खालीलप्रमाणे फिक्स इनसेंटीव्ह स्थायी पदावर असलेल्या डॉक्टरांना प्रस्तावित करत आहोत.

| अ.नं. | कालावधी | साधारणतः देय रक्कम | प्रस्तावित मासिक एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ०० ते १ वर्ष | एकुण पगार+फिक्स इनसेंटीव्ह | ०० |
| १ | १ वर्ष ते ३ वर्षे | एकुण पगार+फिक्स इनसेंटीव्ह | १,००,०००/- |
| २ | ४ वर्षे ते ६ वर्षे | एकुण पगार+फिक्स इनसेंटीव्ह | १,२५,०००/- |
| ३ | ७ वर्षे ते ९ वर्षे | एकुण पगार+फिक्स इनसेंटीव्ह | १,५०,०००/- |
| ४ | १०वर्षे ते १२ वर्षे | एकुण पगार+फिक्स इनसेंटीव्ह | १,७५,०००/- |
| ५ | १२ वर्षापेक्षा जास्त | एकुण पगार+फिक्स इनसेंटीव्ह | २,००,०००/- |

उपरोक्त् फिक्स इनसेंटीव्ह मंजुर कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे विभागवार मेडीकल ऑफीसर पदांना लागू राहील. श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णांना संपुर्णपणे मोफत उपचार मिळत असलेने दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढत आहे. या रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविणेसाठी मंजुर आकृतीबंधाप्रमाणे असलेल्या पदांव्यतिरिक्त काही आरएमओ डॉक्टर्स मेडीकल ऑफीसर(वेगवेगळया विभागात तज्ञ म्हणून) यांची सेवा आवश्यक असून आरएमओ पदावर भरती केलेले काही डॉक्टर्स मेडीकल ऑफीसर पदाचे प्रत्यक्ष काम करीत आहेत. त्यामुळे रुग्णालयातील मंजुर ३०० बेडसाठी योग्य तो आकृतीबंध लागू होईपर्यंत मेडीकल ऑफीसर पदाचे काम करणा-या आरएमओ डॉक्टरांना देखील फिक्स इनसेंटीव्ह लागू करणे व्यवहार्य आहे.

मा.मुख्य लेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिला आहे.

१. शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा डॉक्टर्स यांना प्रोत्साहनपर भत्ता देणेबाबत तरतूद नाही. मात्र त्यांना व्यवसायरोध भत्ता (मुळ वेतनाच्या ३० टक्के) प्रमाणे बाहेर व्यवसाय न करण्यासाठी देण्यात येतो. संस्थानच्या श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहनपर भत्ता मंजुर करणेसाठी शासनाची मान्यता घ्यावी, असे मत आहे.

२. सद्यस्थितीत प्रस्तावित करण्यात आलेल्या Incentive Policy मध्ये ज्या डॉक्टरांना संस्थानची निवासस्थाने आहेत त्यांचा घरभाडे भत्ता त्यांचे पगारबिलात निघत नसल्यामुळे त्यांचे व जे डॉक्टर्स खाजगी निवासस्थानात राहतात त्यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेयआसल्याने त्यांना तो मिळेल. त्यामुळे त्यांचे पगारात HRA, एवढा फरक राहील. मात्र Incentive देताना सरसकट दिल्यास संस्थानचे निवासस्थानातून डॉक्टरांना कपात केलेल्या घरभाडयासह संपूर्ण रक्कम मिळेल. त्यामुळे सदर Incentive चे देय रक्कमेतून संस्थान निवासस्थानात राहणा-या डॉक्टरांचा HRA कपात करण्यात येवून Incentive आदा करणे योग्य राहील.

सोबत परिशिष्ट अ जोडले आहे. (श्री साईनाथ रुग्णालयातील इनसेंटीव्हबाबतचा पदनामानूसार तक्ता)

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील प्रशासकीय पदांवर काम करणा-या डॉक्टरांच्या इनसेंटीव्हबाबत

(वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक०२ पदे, वैद्यकीय प्रशासक)

प्रशासकीय कामाचा व्याप पाहता आतापर्यंत उपरोक्त ५पदे कधीही भरण्यात आलेली नाहीत. सध्या सदर पदांवर कार्यरत असणारे डॉक्टर्स प्रभारी किंवा अतिरिक्त पदभारावर काम करीत आहेत. नवीन पदभरती करण्यात आल्यानंतर त्यांचीखालीलप्रमाणे वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे ,असे मत आहे.देखील उपरोक्तप्रमाणे वेतननिश्चिती करणेत यावी, असे मत आहे. त्यामुळे सदर पदांवर काम करणा-या वैद्यकीय अधिकारी यांना सध्या देण्यात येत असलेल्या सध्याच्या एकुण वेतनाच्या काही ठराविक दराने फिक्स इनसेंटीव्ह देण्यात यावा,असे मत आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाकडील डॉ.नरोडे इनटेंसीव्हीस्ट पदावर काम करीत असून त्यांचेकडे वैद्यकीय संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविणेत आलेला आहे. त्यांना संस्थान नियमानूसार इंटेसीव्हीस्ट पदाचा इनसेंटीव्ह मिळत आहे. एकावेळी दोन पुर्णवेळ कामकाजाची पदे सांभाळणे अवघड असलेमुळे डॉ.नरोडे यांना सध्या इनटेंसीव्हीस्ट पदासाठी देण्यात येणारा इनसेंटीव्ह बंद करणेत येवून वैद्यकीय संचालक पदाचा कार्यभार असेपर्यंत सदर पदासाठीचा मंजुर झालेला इनसेंटीव्ह सुरु करणेत यावा.

**सोबत परिशिष्ट ब जोडले आहे. (प्रशासकीय पदांबाबतचा इनसेंटीव्हबाबतचा पदनामानूसार तक्ता)**

**विशेष बाब-**

१. डॉ.राजेंद्र बिडगर, ऑर्थो सर्जन (M.B.B.S., D.ortho, FCPS, CPS) व डॉ.सुरेखा माने (बिडगर) भुलतज्ञ (M.B.B.S., D.A., CPS) हे दोघेही ११ महिने कालावधीसाठी श्री साईनाथ रुग्णालयात मानधनावर कार्यरत आहेत. डॉ.बिडगर हे स्वतंत्रपणे ओपीडी व ऑर्थो.सर्जरी करतात व डॉ. माने या स्वतंत्र भूलतज्ञ म्हणून काम करत आहेत. तरी डॉ.बिडगर व डॉ.माने यांना इनसेंटीव्ह लागू करावा अगर कसे? याबाबत मार्गदर्शन् होणे आवश्यक आहे.

**विभागाचे मत:- १ )** श्री साईबाबा रुग्णालयातील काही डॉक्टर्स हे ११ महिने कालावधीसाठी काम करीत आहेत व सदर डॉक्टरांना देखील इनसेंटीव्ह चालू आहे. त्याचधर्तीवर डॉ.राजेंद्र बिडगर व डॉ.सुरेखा माने यांनादेखील इनसेंटीव्ह लागू करणेत यावा.

**सोबत परीशिष्ठ 'क' जोडलेला आहे.**

श्री साईबाबा रुग्णालयात काम करत असणा-या कन्सलटंट डॉक्टरांना सध्या मिळत असलेला व श्री साईनाथ रुग्णालयात काम करत असणा-या वैद्यकीय अधिका-यांना प्रस्तावित असणारा इनसेंटीव्ह बाबतचा तौलानिक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.नं. | डॉक्टर्स (पुर्णवेळ) | श्री साईबाबा रुग्णालयातील सध्याचा सरासरी मासिक इनसेंटीव्ह | श्री साईनाथ रुग्णालयातील प्रस्तावित मासिक इनसेंटीव्ह |
|---|---|---|---|
| १ | जनरल सर्जन | ३,३१,८६४/- | १०२४९०/- |
| २ | जनरल फिजिशियन | १,०६,५०३/- | ९७,५७२/- |
| ३ | ऑर्थो.सर्जन | २,०६,९०२/- | १,०७६५०/- |

एकुण प्रस्तावित इनसेंटीव्ह मंजुर केलेनंतर प्रतिमहिना संस्थान प्रशासनावर पडणारा आर्थिक बोजा खालीलप्रमाणे

| अ.नं. | तपशील | प्रस्तावित इनसेंटीव्ह |
|---|---|---|
| १ | कन्सलटंट डॉक्टर | ९,६५,९२७/- |
| २ | वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक , वैद्यकीय प्रशासक | २,२६,७४०/- |
| ३ | विशेष बाब | १,१०,०००/- |
| | एकुण | **१३,०२,६६७/-** |

**सदर इनसेंटीव्ह लागू झालेनंतरत्याबाबतची नियमावली असणे आवश्यक वाटते. त्याप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये फिक्स इनसेंटीव्ह लागू करणेकामी खालीलप्रमाणे नियमावली असावी.**

१. आकृतीबंधाप्रमाणे भरती झाल्यानंतर विहीत पध्दतीने फिक्स इनसेंटीव्ह लागू करणेत येईल.

२. व्हिजीटींग डॉक्टरांना प्रति व्हिजीट मंजुर नियमावलीप्रमाणे चार्जेस देणेत येतील, त्यांना फिक्स इनसेंटीव्ह लागू राहणार नाही.

३. सदर इनसेंटीव्ह मंजुर तारखेपासून लागू होईल, त्याआधीच्या तारखेपासून कोणताही इनसेंटीव्ह देण्यात येणार नाही.

४. संस्थान रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी हे संस्थानकडून पदवी किंवापदव्युत्तर अध्ययन रजा घेवून सदर कोर्ससाठी जातात.

ज्या कोर्ससाठी अध्ययन रजा घेतलेली आहे अशा कोर्सची पुर्तता झालेनंतर (पास) आवश्यक असतील ती संपूर्ण प्रमाणपत्रे जमा केलेनंतर सदर दिवसापासून नवीन पदाचा योग्य तो इनसेंटीव्ह लागू करणेत येईल.

५. आठवडा सुट्टी वगळता कोणत्याही रजेच्या दिवसांचा इनसेंटीव्ह देण्यात येणार नाही.

६. तातडीच्या वैद्यकीय सेवा किंवा उपचारांवर कोणत्याही प्रकारचा इनसेंटीव्ह लागू होणार नाही.

७. फिक्स इनसेंटीव्ह लागू केलेल्या डॉक्टरांनी रुग्णालयाला (आठवडयातून ६ दिवस) पुर्णवेळ सेवा देणे अनिवार्य राहील. सदर डॉक्टरांना खाजगी प्रॅक्टीस करता येणार नाही, तसे निदर्शनास आल्यास संबंधित डॉक्टरांवर कार्यवाही करणेत येवून देण्यात आलेला इनसेंटीव्ह वसुल करणेचा अधिकार संस्थान प्रशासनास राहील.

८. सर्व वैद्यकीय अधिका-यांनी रुग्णालयाने ठरवून दिलेल्या ओपीडी किंवा ऑपरेशनवेळा देखील पाळणे आवश्यक आहे. सदर नियमाचा भंग झाल्यास संबंधित डॉक्टरांवर कारवाई करणेत येवून त्यांना देण्यात आलेला इनसेंटीव्ह त्यांचे वेतनातून वसूल करणेत येईल.

९. वैद्यकीय अधिका-यांनी नेमुन दिलेल्या ऑनकॉल दिवसी कॉल घेण्यास/ रुग्ण पाहणे व हलगर्जीपणा केलेचे आढळून आलेस त्यांचा इनसेंटीव्ह बंद करण्याचे संपुर्ण अधिकार प्रशासनास राहतील.

१०. रुगणालयात काम करणा-या भुलतज्ञ वैद्यकीय अधिका-यांना साय. ४.०० वाजेनंतर नियोजित (Routine Cases) तातडीच्या (Emergency) असणा-या शस्त्रक्रिया या त्या विभागात काम (डयुटी) करणा-या भुलतज्ञ डॉक्टरांना करणे बंधन कारक राहील. याचा कोणताही अतिरिक्त मोबदला घेता येणार नाही.

११. अतिरिक्त कार्यभार सोपविलेला असल्यास कोणत्याही एका पदाचा इनसेंटीव्ह देता येईल, दोन्ही पदांसाठी इनसेंटीव्हचा लाभ घेता येणार नाही.

१२. संस्थान निवासस्थानात राहणा-या डॉक्टरांना प्रोत्साहन भत्त्यासह एकुण मासिक वेतन देताना त्यांचे वेतनदर नियमाप्रमाणे घरभाडे भत्ता व वाहतूक भत्ता त्याप्रमाणात कमी अदा केला जाईल.

१३. प्रशासनाकडून वेळोवेळी मंजुर होणारा सानुग्रह अनुदानाची रक्कम इनसेंटीव्हप्रमाणे न राहता वेतना इतकीच राहील.

१४. दंतविभाग (दंत विभागातील MDS सोडून) आयुर्वेदिक, होमिओपॅथी, फिजिओथेरपीस्ट, सीएमओ, आरएमओ यांना इनसेंटीव्ह देय होणार नाही.

१५. संस्थान सेवेचा तात्काळ राजीनामा दिल्यास एक महिन्याचे वेतन+ इनसेंटीव्ह अनामत म्हणून जमा करावा लागेल. अथवा संस्थान नियमाप्रमाणे एक महिना पुर्व नोटीस दयावी लागेल.

१६. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना इनसेंटीव्ह/ फिक्स इनसेंटीव्ह देणेबाबतचे किंवा त्यात बदल करणेचे अधिकार तसेच दर ३ वर्षांनी सदर बाबत पुनर्विलोकन करणेचे अधिकार मा.वैद्यकीय अधिक्षक, मा.वैद्यकीय संचालक यांचेमार्फत व्यवस्थापन समितीला राहतील.

याअनुषंगाने श्री साईनाथ रुग्णालयात वेळोवेळी नव्याने भरती होणा-या स्थायी, मानधनावर, कंत्राटी पध्दतीने नेमणुक झालेल्या सर्व डॉक्टरांना वरीलप्रमाणे योग्य तो इनसेंटीव्ह लागु होणेस मान्यता असावी.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना सदर इनसेंटीव्ह तातडीने लागू करणेस, त्यासाठी लागणा-या रु.१३०२६६७/- इतक्या मासिक आर्थिक खर्चास मंजुरी मिळणेस, वेळोवेळी सदरच्या खर्चात झालेल्या कमी जास्त बदलास नव्याने भरती होणा-या स्थायी, मानधनावर, कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांना वरीलप्रमाणे इनसेंटीव्ह लागु करणेस व इनसेंटीव्ह लागू करण्याच्या नियमावलीस मान्यता मिळणेस, मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेकामी सादर.

**निर्णय क्र.६०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता (इन्सेटीव्ह) लागु करणेसाठी प्रस्तावित केलेल्या नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, सदरहू नियमावलीची अंमलबजावणी करणेस मान्यता देण्यात आली. परंतु तत्पुर्वी उपरोक्त प्रस्तावास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षीका)

---

**विषय नं.८६** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मयत रुग्णांचे मृतदेह झाकणेकरीता पांढरा कपडा खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद-१७- (ण)</u>**

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.- दि.१६/०८/२०१६ विषय नं.४५-१५ नि.क्र.५५४

**प्रस्ताविक-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅज्युलिटी विभागाने डि.पी.नं.५७८ दि.१५/०६/२०१७ अन्वये रुग्ण मयत झाल्यानंतर सदर मृतदेह झाकण्याकरीता पांढ-या कपडयाची मागणी केली आहे. यापुर्वी अश्या प्रकारचा कापडाची खरेदी केलेली नाही. परंतु मा.व्यवस्थापन सभा दि.१६/०८/२०१६ वि.क्र.४५/१५ नि.क्र.५५४ अन्वये मयत रुग्णांचा मृतदेह झाकुन देणेसाठी एका रुग्णास नविन सफेद कापड ५ मी. रुग्णालय व्यवस्थापनाकडुन मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे. (सदर सवलत देणेसाठी पिवळया/किशरी रंगाची शिधापत्रिका व ओळखपत्र उपलब्ध असल्यास घेणे आवश्यक राहील) असा नियम झाला असुन सदर नियमाची त्वरीत अमंलबजावणी करणेत यावी असे ठरले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ICU, GICU, SICU तसेच अपघात विभागातुन दर महिण्याला अंदाजे ६० पेशंट मयत होत असतात. वर्षाअखेर अंदाजे ७२० पेशंट मयत होत असतात.

एक मृतदेह झाकण्याकरीता अंदाजे ५ मी. कापड लागणार आहे त्यामुळे कापडाचे अंदाजे दर पाहण्याकरीता स्थानीक पुरवठाधारक मे. कावेरी साडी शॉपी,शिर्डी यांचेकडुन दि.२७/०६/२०१७ रोजी कोटेशन मागविण्यात आले होते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | दर प्रती मी. |
|---|---|---|
| १ | सफेद कापड (Nehru Bag)Double Panna 60" Inch कॉटन | ३६.५० |

मृतदेह झाकणेकरीता वरीलप्रमाणे कापड खरेदी करणे आवश्यक आहे. एक मृतदेह झाकण्याकरीता ५ मीटर कापड त्यामुळे ७२० पेशंटकरीता अंदाजे (७२० पेशंट X ५मी.कापड= ३६०० मी. कापड) ३६०० मीटर कापड X अंदाजे दर रू. ३६.५०.००= रू.१,३१,४००/- (अक्षरी रू.एक लाख एकतीस हजार चारशे मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

**<u>मागणी-</u>** कॅज्युलिटी विभाग डि.पी.नं.५७८ दि.१५/०६/२०१७

**<u>संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश,तांत्रिक,कायदेशीर तसेच आर्थिक विषय छाननी करुन अनुमान-</u>** १) समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे, त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात.

<u>२)</u> शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४,दि.३०ऑक्टोबर २०१५ अन्वये-परिच्छेद ३.२.३- खरेदी जर रु.५००० ते ३ लाखापर्यंत असेल तेव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण

मुल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS &D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधीत खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** श्री साईबाबा हॉस्पीटलमधील ICU,GICU,SICU व Casualty विभागात अॅडमीट असणारे रुग्ण रात्री अपरात्री मृत झाल्यास मृतदेह घेऊन जाण्यासाठी रात्री दुकाने बंद असल्यामुळे नातेवाईकांस कापड मिळत नाही, प्रसंगी मृतदेह बांधुन देण्यासाठी जुने बेडशीट किंवा चादरी देण्यात येतात. जर संस्थानमार्फत त्यांना कापड दिल्यास त्यांना मृतदेह घेऊन जाण्यास मदत होईल. त्यामुळे त्यांना कापड देण्यात यावे असे नम्र मत आहे.

तरी सदर कापड विहीत पध्दतीने खरेदीकामी पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागविणेस व येणा-या अंदाजे खर्च रु.१,३१,४००/- (अक्षरी रु.एक लाख एकतीस हजार चारशे मात्र) चे प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.६०६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मयत रुग्णांचे मृतदेह झाकणेकरीता पांढरा कपडा खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,३१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच संस्थान रुग्णालयांमध्ये रुग्ण मयत झाल्यास, त्याचा मृतदेह स्वगृही घेऊन जाणेसाठी संस्थान शववाहिका मोफत देण्यात यावी, अशा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

विषय नं.८७ **दि.१ एप्रिल, २०१६ ते दि.३१ मार्च, २०१७ अखेर कालावधीत दिलेले अनुदान रक्कम व रुग्ण संख्या यांची नोंद घेणे.**

प्रस्ताव- **अधिनिय २००४ मधील तरतुद:-** कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

**प्रास्तविक:-** उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी. यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय, उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येते. त्यासाठी संस्थान व्यवस्थापनाने स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे. त्यास अनुसरुन सन १ एप्रिल-२०१६ ते ३१ मार्च २०१७ अखेर कालावधीत दिलेले वैद्यकिय आर्थिक अनुदान व लाभार्थी रुग्ण संख्या खालील प्रमाणे आहे.

| अं.नं. | महिना | लाभार्थी रुग्ण संख्या | अनुदान वाटपाची रक्कम | मंजुर बजेट |
|---|---|---|---|---|
| १ | ०१ एप्रिल -२०१६ | ४९ | ११,८८,०००/- | |
| २ | मे -२०१६ | ६० | १४,४५,२२५/- | |
| ३ | जुन - २०१६ | ६९ | १६,११,५३५/- | |
| ४ | जुलै -२०१६ | ८१ | १९,७०,७५०/- | |
| ५ | ऑगस्ट -२०१६ | ८२ | १९,४६,५००/- | |
| ६ | सप्टेंबर -२०१६ | ५२ | १२,१३,२५०/- | |
| ७ | ऑक्टोंबर -२०१६ | ६४ | १५,३९,२५०/- | |
| ८ | नोव्हेंबर -२०१६ | ६५ | १६,०८,०००/- | १५,००,००,०००/- |
| ९ | डिसेंबर -२०१६ | ७० | १६,९२,१२७/- | |
| १० | जानेवारी -२०१७ | ८१ | १९,४७,५००/- | |
| ११ | फेब्रुवारी -२०१७ | ६३ | १५,१९,०००/- | |
| १२ | ३१ मार्च -२०१७ | ९८ | २३,३४,७९५/- | |
| | **एकुण** | **८३४** | **२,००,१५,९३२/-** | |
| १३ | विशेष बाब | ०२ | ५०,०००/- | |
| | **एकुण** | **८३६** | **२,००,६५,९३२/-** | |

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/११/२०१६ निर्णय क्र.७५६, अन्वये श्री धनंजय पांडुरंग केकडे सोलापुर यांना रु.२५,०००/- व निर्णय क्र.७५९, सौ. प्राची कल्पेश पाटील यांना रु.२५,०००/- मात्र विशेषबाब म्हणुन आदा करणेत आलेले आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान्-** श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन, यास शासनाची मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार/ शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णांकित रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८४ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील आठ आजारांकरीता देण्यात येते.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय, उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे, सन- ०१ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ अखेर देण्यात आलेल्या, वैद्यकीय आर्थिक अनुदान बाबत माहितीची नोंद घेणेसाठी, सदरचा प्रस्ताव, मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.६०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१ एप्रिल, २०१६ ते दि.३१ मार्च, २०१७ अखेर कालावधीत दिलेले अनुदान रक्कम व रुग्ण संख्या यांची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षिका)

---

**विषय नं.८८** **वृक्ष लागवडीसाठी रोपे खरेदीचे बिल आदा करणेकामी कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाने हरित आच्छादन दिवसेंदिवस कमी होत असल्याने ते वाढविण्यासाठी 50 कोटी वृक्ष लागवड करणेबाबतचा महत्वकांक्षी संकल्प हाती घेतलेला आहे. याकरीता या वर्षी दि.1 जुलै ते 7 जुलै 2017 अखेर वृक्षलागवड करणेबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी कोपरगाव यांचे कार्यालय व तहसील कार्यालय राहाता यांचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले असुन शासनाच्या या महत्त्वकांक्षी कार्यक्रमात संस्थानने सहभाग घेणेबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार श्री साईबाबा संस्थान मार्फत सोमवार दि.3 जुलै 2017 रोजी साई आश्रम नं.2 येथील पार्किंग परिसरामध्ये वृक्षलागवड कार्यक्रम आयोजीत करणेत आलेला आहे.

**<u>मागणी-</u>** सदर वृक्षलागवडीसाठी रोपे खरेदी करणे आवश्यक असल्याने तसेच साई सेवा फाऊंडेशन, शिर्डी यांचेमार्फत वृक्षारोपनासाठी रोपे उपलब्ध न झाल्यामुळे, रोपे खरेदीसाठी त्यांचेकडुन निधी उपलब्ध न झाल्याने तसेच वृक्षारोपन कार्यक्रम जवळ आल्याने तातडीने रेंज फॉरेस्ट ऑफिसर, राहुरी (वनक्षेत्रपाल राहुरी प्रा. यांचे कार्यालय) सामाजीक वनीकरण विभाग यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-बगीचा/1543/ 2017 दि.22/06/2017 अन्वये, कार्यादेश देऊन त्यांचेकडुन 1000 नग रोपे खरेदी करण्यात आलेली आहे. रोपे खरेदीचे बिल रक्कम रु.45,000/- मात्र झालेली असुन सदरची रोपे ताब्यात मिळालेली आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय-</u>** दि.28/06/2017 रोजीच्या मंजुर टिपणी अन्वये, रेंज फॉरेस्ट ऑफिसर, राहुरी (वनक्षेत्रपाल राहुरी प्रा. यांचे कार्यालय) सामाजीक वनीकरण विभाग यांचेकडुन रोपे खरेदीचे झालेले बिल रक्कम रु.45,000/- मात्र त्यंना ॲडव्हान्स घेऊन रोखीने आदा केलेली आहे. सदरची रोपे ही शासनाचे सामाजीक वनीकरण विभागाकडुन खरेदी करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर कार्यात्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.८९** **श्री साईलिला अंक पाठविणेकामी पाकिटे छपाई करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविकः-** श्री साईलीला व्दैमासिक नियतकालिके पाकीटात भरुन सर्वसाधारण टपालाव्दारे व्दैमासिकांच्या सभासदांना पोस्टाने पाठविली जातात. वापरात येणारी पाकीटांचा शिल्लक साठा लवकरच संपत असून पुढील वर्षाची तरतूद म्हणून श्री साईलीला- मराठी ०१ लाख व हिंदी-इंग्रजीचे १ लाख ५० हजार पाकिटे उपलब्ध करुन देणेबाबत सहा. संपादक, श्री साईलीला, मुंबई कार्यालय यांनी दि१०.०६.२०१७ रोजीचे आवक पत्रान्वये कळविले आहे.

**प्रस्तावः-** श्री साईलीला नियतकालिके पाठविणेकामी पाकिटे आवश्यक असल्याने खालील प्रमाणे तक्त्यात छपाई करुन घेणे आहे.

| अ.नं. | छपाई तपशिल | शिल्लक साठा | मागील छपाई दर (सन-२०१६) | प्रस्तावित छपाई नग | प्रस्तावित अंदाजे छपाई दर | अंदाजे एकूण प्रस्तावित छपाई खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **साईलीला- मराठी** पाकीटाचा आकार- ११.५ X ८.५+ १.७ प्लॅप वापरावयाचा कागद- ८० जी.एस.एम. क्राफ्ट ब्राऊन पेपर, एक रंगात छपाई | १०,००० | ०.८९ | १,००,००० | १.२५ | १,२५,०००/- |
| ०२ | **श्री साईलीला- हिंदी-इंग्रजी** पाकीटाचा आकार- ११.५ X ८.५+ १.७ प्लॅप वापरावयाचा कागद- ८० जी.एस.एम. क्राफ्ट ब्राऊन पेपर, एक रंगात छपाई | ७,००० | ०.८९ | १,५०,००० | १.१६ | १,७४,०००/- |
| | | | | | एकूण रु. | २,९९,०००/- |

**मागणीः-** श्री साईभक्तांना अंक पाकिटात पाठविले जातात. मुंबई कार्यालय यांचे मागणीनुसार छपाई करणे आवश्यक आहे.

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई छाननी करुन अनुमानः-** आर्थिक/ धोरणात्मक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** श्री साईलीला- मराठी व हिंदी-इंग्रजीचा रजिस्ट्रेशन क्रमांक वेगवेगळे असल्याने वितरणव्यवस्थेसाठी मराठी व हिंदी-इंग्रजीचे स्वतंत्र पाकिटे छपाई करण्यात येते.

श्री साईलीला अंक पाठविणेकामी बृहन्मुंबई, नाशिक व परिसरातून दरपत्रके मागणी करुन अंकांची पाकिटे पुरवठदारांकडून मागणीनुसार छपाई करुन घेता येईल. उपरोक्त छपाईकामी येणा-या अंदाजे खर्च रु.२,९९,०००/- मात्रचे खर्चास तसेच दरपत्रके मागणी करणेस, प्राप्त दरपत्रके मा. खरेदी समिती सभेपुढे उघडणे, निम्नत्तम दर देणा-या दरधारकास कार्यादेश पारित करणेकामी मान्यतेसाठी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलिला अंक पाठविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पाकिटे छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,९९,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९०** **कै.शिवराम ठाकूर लिखीत श्री साईसच्चरित्र हिंदी भाषेचा काश्मीरी अनुवाद करणे व श्री.सुनिल शेगावकर, पुणे यांचा कन्व्हॉसवर चित्रित करणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये संमत झालेले निर्णय निरस्त करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) 'ठ' मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविकः-** १) मा. व्यवस्थापन समिती दि.०७.०८.२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.४५३ अन्वये Mr. Raj Vyasabhattu, New Yark यांना कै. शिवराम ठाकूर लिखित श्री साईसतचरित्र-हिंदी भाषेचा काश्मिरी भाषेत अनुवाद करणेस परवानगी देण्यात यावी. मात्र काश्मिरी भाषेत असलेल्या अधिकृत विद्यापीठामधील तज्ञ प्राध्यपकाकडून सदरहू अनुवाद तपासून घेतल्यानंतर ते प्रकाशित करणेस मान्यता देण्यात यावी. असा निर्णय झालेला आहे.

२) मा.व्यवस्थापन समिती दि.२२.१२.२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९०८ अन्वये श्री. सुनिल शेगांवकर, पुणे यांनी कॅनव्हॉसवर चित्रीत केलेली साईबाबांच्या जीवनचरित्रावरील प्रसंग चित्रे अप्रतिम आहेत.

परंतू एकाच चित्रकाराकडून चित्रे करणे योग्य होणार नाही, प्रस्तावातील 'ब' मध्ये नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. असा निर्णय झालेला आहे.

**प्रस्तावः-**१) मा.व्यवस्थापन समिती दि.०७.०८.२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ४५३ अन्वये Mr. Raj Vyasabhattu, New Yark यांना कै. शिवराम ठाकूर खिीत श्रीसाईसतचरित्र-हिंदी भाषेचा काश्मिरी भाषेत अनुवाद करणेस परवानगी देण्यात आलेली होती. सदर विषयाबाबत श्री. राज वैश्यभट्टू, न्युयार्क यांच्याशी अनुवादाबाबत वेळोवेळी संपर्क साधला असता त्यांचेशी संपर्क होऊ शकला नाही व त्यांनीही संस्थानकडे कोणताही संर्पक न केल्याने सदर विषयाची कार्यवाही प्रक्रिया पार पाडता येत नाही व सदर प्रकरणाची कार्यवाही प्रलंबीत दिसून येत आहे.

२) मा.व्यवस्थापन समिती दि.२२.१२.२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९०८ अन्वये श्री. सुनिल शेगांवकर, पुणे यांचा कॅनव्हॉसवर चित्रीत करणेबाबतचा ठराव मंजूर करण्यात आलेला होता. परंतू श्री साईबाबांची कॅनव्हॅासवर श्री साईचरित्र पोथीमधील ५२ अध्यायातील ५२ प्रसंग चित्रे २' X ३' साईजमधील श्री. अतूल राखे, बडोदा यांनी देणगीदाखल संस्थानकडे जमा केलेली आहेत व ती शांतिनिवास इमारतीतील प्रथम माळयावरील दर्शनलाईनमध्ये लावणेबाबत बांधकाम विभागास कळविणेत आले आहे.

**मागणीः-** सदरचे ०२ ठराव निरस्त करणे आहे.

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई छाननी करुन अनुमानः-** धोरणात्मक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** वरील अं.नं.०१ प्रस्तावानुसार श्री. राज वैश्यभट्टू, न्युयार्क यांनी कोणताही प्रतिसाद न दिलेने व अं.नं.०२ श्री साईचरित्र पोथीमधील ५२ अध्यायातील ५२ प्रसंग चित्रे कॅनव्हॉसवर तयार करुन श्री. अतूल राखे, बडोदा यांचेकडून देणगीदाखल प्राप्त झालेने, मा. व्यवस्थापन समिती सन-२०१६ चे सभेतील ठराव क्र. ४५३ व ठराव क्र. ९०८ निरस्त करणेकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कै.शिवराम ठाकूर लिखीत श्री साईसच्चरित्र हिंदी भाषेचा काश्मीरी अनुवाद करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री.राज वैश्यभट्टू, न्युयार्क हे कोणताही प्रतिसाद देत नाही याकरीता यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०८.२०१६ रोजीचे सभेत संमत झालेला निर्णय क्र.४५३ निरस्त करणेत यावा. तसेच श्री.सुनिल शेगांवकर, पुणे यांनी कॅनव्हॉसवर चित्रीत केलेली साईबाबांच्या जीवनचरित्रावरील प्रसंग चित्रे अप्रतिम आहेत. परंतू एकाच चित्रकाराकडून चित्रे खरेदी करणे योग्य होणार नाही याकरीता मा.व्यवस्थापन समिती दि.२२.१२.२०१६ रोजीचे सभेत संमत झालेला निर्णय क्र.९०८ निरस्त करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.९१** **कंत्राटी कर्मचारी पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा-हजर दिवसांबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ चे सभेतील निर्णय क.८१० व मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.सासंवि १०१६/७७७/प्र.क्र.१०४/का.१६ दि.१५ एप्रिल, २०१७ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक फीचा परतावा करण्यात येतो, त्याच धर्तीवर सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांना (एकुण २७३६) पाल्यांचा शैक्षणिक फीचा परतावा करण्यास आणि त्याकरिता होणा-या अंदाजे ८० लक्ष इतक्या खर्चास शासन मान्यता मिळालेली आहे.

सदर मान्यतेनुसार संस्थानचे विविध विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा फी परताव्याकामी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/वशी-०६/७३२/२०१७ दि.०८ मे, २०१७ अन्वये परिपत्रक पारित करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकामध्ये पुढीलप्रमाणे अटी व शर्तीची पालन करणेबाबत नमुद केलेले आहे.

**१.** स्थायी कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करतांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे, त्याच नियमावलीचे अधीन राहून कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा फी परतावा अदा करण्यात येईल.

२. जे कंत्राटी कर्मचारी सन २०१६-१७ (एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७) या आर्थिक वर्षात किमान २४० दिवस हजर आहेत, असेच कर्मचारी त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक फि परतावा मिळणेस पात्र असतील.

३. सदर शैक्षणिक शुल्क परताव्याच्या आधारे भविष्यात संस्थानच्या कंत्राटी कर्मचा-यांना इतर कोणताही सेवाविषयक किंवा आस्थापनाविषयक लाभ अथवा स्थायित्वाच्या अन्य सुविधांसाठी संस्थानवर दावा करता येणार नाही.

४. शासन आदेशात नमुद केल्यानुसार सोबतच्या मसुद्याप्रमाणे संबधीत कंत्राटी कर्मचा-यांकडून हमीपत्र भरुन घ्यावे.

परिपत्रकातील अटी व शर्तीचे बाबत, श्रीमती योगिता गोरक्ष डांगे व इतर ०४ कंत्राटी शिक्षिका, श्री साईबाबा इंग्लिश मिडीमय स्कुल यांनी त्यांचेकडील दि.२०.०५.२०१७ रोजीचे अर्जान्वये "आम्ही श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये कंत्राटी शिक्षिका/शिक्षक म्हणून कार्यरत आहोत. मा.व्यवस्थापन मंडळाचे निर्णयानुसार व शासनाच्या आदेशानुसार स्थायी कर्मचा-याप्रमाणेच कंत्राटी कर्मचा-यांचे पाल्यांना सन २०१६-१७ या वर्षाचे शैक्षणिक फी परतावा करणेस मान्यता मिळालेली आहे. त्याप्रमाणे संस्थानमार्फत जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ वशी-०६/७३२/२०१७ दि.०८ मे, २०१७ रोजी परिपत्रक पारित करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकातील अटी व शर्ती अ.क्र.२ मध्ये जे कंत्राटी कर्मचारी सन २०१६-१७ (एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७) या आर्थिक वर्षात किमान २४० दिवस हजर आहेत, असेच कर्मचारी त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक फि परतावा मिळणेस पात्र असतील असे नमुद आहे. मात्र आम्ही सर्व कंत्राटी शिक्षिका म्हणून कार्यरत आहोत. आम्हांस शाळेच्या कामाच्या दिवशीच शाळेमध्ये हजर राहावे लागते, इतर दिवशी आम्हांला सुट्टी घ्यावी लागते. (उदा.सर्व सार्वजनिक सुट्टया, नाताळ सुट्टी, दिवाळी सुट्टी, उन्हाळी सुट्टी) त्यामुळे आमचे कामाचे दिवस हे २४० दिवसांपेक्षा काही अंशी कमी (२२० ते २३० दिवस) भरतात. आम्ही जाणीवपुर्वक कमी दिवस काम केलेले नाही. शाळेच्या कामाच्या दिवशी आम्ही पुर्णपणे कामावर हजर आहोत. त्यामुळे पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा देतांना आम्ही खाली सह्या करणा-या कर्मचा-यांच्या हजर दिवसांबाबतची अट शिथिल करुन आमच्या साठी विशेष बाब म्हणून किमान २२० ते २३० दिवस कामावर हजर असणा-या कर्मचा-यांच्या पाल्याचा फी परतावा मिळावा, अशी विनंती केलेली आहे.

याबाबत प्राचार्य, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल (पुर्व प्राथमिक विभाग) यांना इकडील कार्यालयाकडील दि.२९ मे, २०१७ रोजीचे पत्रान्वये वस्तुस्थितीबाबत अहवाल सादर करणेस कळविलेले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचेकडील दि.३१.०५.२०१७ रोजीचे पत्रान्वये पुढीलप्रमाणे अहवाल दिलेला आहे.

"शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये शाळेत विद्यार्थ्यांना शिकविणे एकुण कामकाजाचे दिवस हे २२१ इतके झाले आहे. संपुर्ण शैक्षणिक वर्षात एकुण सार्वजनिक सुट्टी, उन्हाळी दिर्घ सुट्टी, नाताळ सुट्टी तसेच दिवाळी दिर्घ सुट्टी अशा सुट्टया देण्यात येत असल्याने त्या दिवशी शालेय कामकाज बंद असते यामुळे शिक्षकांनाही या दिवशी सुट्टी देण्यात येते. तसेच या सर्व महिला कंत्राटी शिक्षिका कर्मचारी यांना दिर्घ सुट्टीचे कालावधीत सक्तीने सुट्टी घ्यावी लागते. इतर पुरुष कंत्राटी शिक्षक व मदतनिस यांना दिर्घ रजा/ सुट्टीचे कालावधीत इतर विभागाकडे कामासाठी वर्ग केले जाते.

शालेय कामकाज २२१ दिवस व संपूर्ण वर्षभरातील सार्वजनिक सुट्टी, उन्हाळी सुट्टी, नाताळ सुट्टी तसेच दिवाळी सुट्टी विचारात घेता विशेष बाब म्हणून हजर दिवसांची अट शिथिल करुन २२० ते २३० दिवस कामावर हजर असलेल्या कंत्राटी शिक्षक कर्मचारी यांना शैक्षणिक शुल्क परतावा देणेत यावा. परंतू सदरची अट ही शैक्षणिक वर्ष २०१६-१७ शैक्षणिक फी परताव्यापुरती मर्यादीत ठेवावी जेणेकरुन इतर कंत्राटी कर्मचारी अशा सवलतीचा गैरफायदा घेणार नाहीत असे नम्र मत आहे. तरी उपरोक्त परिस्थिती विचारात घेता अशा प्रकारची अट शिथिल करुन शैक्षणिक शुल्क फी परतावा देण्याची तरतुद असेल तर त्या तरतुदीनुसार श्रीमती डांगे व इतर ०४ कंत्राटी शिक्षक कर्मचारी यांना फी परतावा देणेत यावा" असा अभिप्राय दिलेला आहे.

अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेली विनंती तसेच प्राचार्य, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांचेकडील अभिप्राय याचा विचार करता अर्जदार महिला कंत्राटी शिक्षिका यांना शाळेकडील शालेय कामकाजाचे दिवस वगळता सर्व सार्वजनिक सुट्टया, उन्हाळी सुट्या, दिवाळी सुट्टया, नाताळ सुट्टया इत्यादी सक्तीने घ्याव्या लागतात. त्यामुळे त्यांचे २४० हजर दिवस पुर्ण होत नाहीत. बहुतांशी करुन हीच परिस्थिती शैक्षणिक संकुलाकडील कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये देखील असू शकते.

त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये शैक्षणिक संकुलाकडील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील फक्त महिला कंत्राटी शिक्षिका यांचे पाल्यांचा फी

परतावा आदा करणेकामी परिपत्रकात नमुद असलेली किमान २४० दिवस हजर असण्याची अट काही अंशी शिथिल करुन, किमान २२० ते २३० दिवस कामावर हजर असलेल्या महिला कंत्राटी शिक्षिका यांच्या पाल्यांचा फी परतावा करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्तबाबत निर्णय होणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.६११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलाकडील कायम व कंत्राटी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या रजा/ सुट्टयांबाबतच्याशासन निर्णयांसह सदरहू प्रस्ताव फेर-सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.९२** **इलेक्ट्रिकल मटेरिअल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ – रु. ५ हजार ते रु.३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** श्री साई मंदिर, दर्शनरांगेच्या इमारती, सर्व भक्तनिवासस्थाने इमारती, श्री साई प्रसादालय इमारत, दोन्ही हॉस्पीटल, शैक्षणिक संकुले इमारती, साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा इमारती यासर्व ठिकाणचे इमारतींमधील इलेक्ट्रीकल मेन्टेनन्सची कामे विद्युत विभागामार्फत केली जातात.

विद्युत विभागास लागणा-या विविध प्रकाराच्या इलेक्ट्रीकल मटेरीअलची खरेदी यापुर्वी सन-२०१४ मध्ये म्हणजे तीन वर्षापुर्वी करण्यात आली होती. या सन-२०१४ मध्ये झालेल्या वार्षिक खरेदीमध्ये फक्त ४० टक्के मटेरीयल पुरवठाधारकांकडून पुरविण्यात आले आहे. त्यामुळे इलेक्ट्रीकल मेन्टेनन्ससाठी अडचणी निर्माण होत आहे.

यानंतर गेली तीन वर्ष अद्यापपर्यंत खरेदी झालेली नाही. साधारणत: दरवर्षी वार्षिक खरेदी होत असते. परंतू मध्यंतरी खंड पडल्याने तसेच नविन इमारतींचा साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, व्दारावती याठिकाणी मेन्टेनन्स चालू झाल्याने इलेक्ट्रीकल मटेरीयलची अत्यंत गरज भासत आहे. त्यामुळे विद्युत विभागामार्फत करावयाच्या दैनंदिन मेन्टेनन्सकामी व नविन कराव्या लागणा-या कामासाठी विविध प्रकारचे लागणारे इलेक्ट्रीकल मटेरीयल संस्थानचे मुख्य भांडार व विद्युत विभागाचे सबस्टोअरला शिल्लक नसल्याने दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होत आहे. मटेरीयलचा तपशील खालीलप्रमाणे :-

**मागणी:-** तरी विद्युत विभाग दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्स करीता खालीलप्रमाणे इलेक्ट्रीकल खरेदी करावे लागणार आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

| **अ.क्र.** | **मटेरीयलचा तपशिल** | **मागणी** | **दर** | **एकुण** |
|---|---|---|---|---|
| ०१) | २८ वॅट, टी-५, टयुबसेट,<br>कंपनी :- क्रॉम्प्टन / फिलिप्स | ३०० नग | रु. ३९०/- | रु. १,१७,०००/- |
| ०२) | ११ वॅट, पी.एल.२ पीन,<br>कंपनी :- क्रॉम्प्टन / फिलिप्स | १६०० नग | रु. ६०/- | रु. ०,९६,०००/- |
| ०३) | २८ वॅट, टी-५, टयुबबार,<br>कंपनी :- क्रॉम्प्टन / फिलिप्स | २०० नग | रु. ९१/- | रु. ०,१८,२००/- |
| ०४) | १४ वॅट, टी-५, टयुबसेट,<br>कंपनी :- क्रॉम्प्टन / फिलिप्स | १५० नग | रु. ३८०/- | रु. ०,५७,०००/- |
| | | | **एकुण रक्कम:-** | **रु. २,८८,२००/-** |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्तप्रमाणे इलेक्ट्रीकल मटेरीयलची खरेदी करणेकामी येणाऱ्या रक्कम रुपये २,८८,२००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरची खरेदी करणेकरीता शासन निर्णयानुसार बाहेरील विद्युत साहित्य पुरवठादार यांना पत्र पाठवून कोटेशन मागविणेकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन कोटेशन बोलविणेस तसेच कोटेशन प्राप्त झाल्यानंतर कोटेशन खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेले इलेक्ट्रिकल मटेरिअल खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.२,८८,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.९३** **श्री साईप्रसादालयाकडील व्ही.आय.पी.भोजन कक्ष नं.२ व चपाती किचनमध्ये एक्झॉस्ट फॅन खरेदी करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:- (क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** श्री साई प्रसादालयातील मुख्य किचन व चपाती किचन इत्यादी ठिकाणी किचनमधील गरम हवा बाहेर जाणेसाठी व थंड हवा आत येण्यासाठी वायुविजन यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. दि.२१-०५-२०१७ रोजी चपाती किचन करीता कार्यरत असलेली वायुवीजन यंत्रणा जळालेली असून बाबांच्या कृपेने मोठा अनर्थ टळलेला आहे. सदर यंत्रणा दुरुस्ती होण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. सध्या उन्हाळयाचे दिवस असल्यामुळे उष्णतेचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे. त्यामुळे त्याठिकाणी काम करणा-या कर्मचा-यांना कामे करणे खुपच निकडीचे होत असल्याने सदर चपाती किचन करीता एक्झॉस्ट फॅन बसविणेबाबत कळविले आहे.

त्याचप्रमाणे श्री साई प्रसादालय व्ही.आय.पी.भोजन कक्ष नं.०२ च्या खालील बाजूस किचनमधील भट्टया येत असल्यामुळे त्याची उष्णता व वरील बाजूस असलेले सिलींग उष्णतेने गरम झाल्यामुळे प्रसादभोजनासाठी आलेल्या साईभक्तांना प्रचंड प्रमाणात उकाडा सहन करावा लागतो. त्या कक्षात असलेले फॅन चालू असून देखील भयंकर प्रमाणात गरम होते. त्याठिकाणी एक्झॉस्ट फॅन बसविण्यात यावे असे कळविले आहे.

**मागणी:-** उपरोक्तप्रमाणे एक्झॉस्ट फॅन बसविणेसाठी सदरहू दोन्ही ठिकाणी वायरींग करुन नवीन एक्झॉस्ट फॅन खरेदी करुन बसवावे लागतील. त्याचा वायरींगसह अपेक्षित खर्च सन २०१५-२०१६ चे C.S.R. नुसार खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-1-4 | Supplying & laying ISI mark Rigid Steel conduit 16 SWG - 25 mm. dia. with necessary accessories in RCC work/false ceiling/false flooring as per specification No: WG-MA/CC, parano. 1.2.3 | 250 Mtrs. | 179.55 | 44,887.50 |
| 02) | 1-3-14 | Supplying & erecting mains with 3x2.5 sq.mm F.R. L.S copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WGMA/ BW | 500 Mtr. | 82.95 | 41,475.00 |
| 03) | 1-8-6 | Supplying and erecting modular type switch one way 16 / 20 A, ISI mark, approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete with neon indicator. | 15 Nos. | 151.20 | 02,268.00 |
| 04) | 1-8-11 | Supplying and erecting modular type 3 pin 6 / 16A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 15 Nos. | 165.90 | 02,488.50 |
| 05) | 1-8-29 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 3 module duly erected in an approved manner. | 15 Nos | 157.50 | 02,362.50 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 06) | 2-13-19 | Supply of Exhaust fan heavy duty 230 V A.C. 50 cycles 450 mm. 1400 RPM complete erected in position as per specification no. FG-FN/EXF | 15 Nos. | 5067.30 | 76,009.50 |
| 07) | 5-1-16 | Supplying and erecting Triple pole metal/ iron clad HRC fuse switch 415/ 500V 63A with neutral link with ISI marked HRC fuses on angle iron frame as per specification No.SW-SWR/TPHRC | 01 No. | 5063.00 | 05,063.00 |
| 08) | 5-3-2 | Supplying, erecting & marking SPMCB 6A to 32A, C-series (for motor/power) in provided distribution board as per specification No. SW-SWR/MCB | 24 Nos. | 184.80 | 04,435.20 |
| 09) | 5-3-25 | Supplying erecting and marking Four pole isolators only switch version of miniature circuit breakers of 63 A in provided distribution board. | 02 Nos. | 761.25 | 01,522.50 |
| 10) | 5-4-7 | Supplying & erecting triple pole and neutral distribution board (TPNDB) with door surface/ flush mounted SPMCB of 12 ways, on iron frame/wooden board.(Horizontal type) as per specification No. SW-SWR/MCBDB | 02 Nos. | 2717.40 | 05,434.80 |
| 11) | 5-6-2 | Providing, erecting & commissioning RCCB only of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 40 A. 2 pole complete as per specification No. SW-RCCB/RCCB | 06 Nos. | 2313.15 | 13,878.90 |
| 12) | 7-1-17 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½ core 25 sq mm aluminium conductor with continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 100 Mtr | 244.65 | 24,465.00 |
| 13) | 7-1-19 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½ core 50 sq mm aluminium conductor with continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 50 Mtr | 378.00 | 18,900.00 |
| 14) | 7-7-3 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3 to 4 core 16 sq mm /3 to 4 core 25 sq mm /3 core 35 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 04 Nos. | 83.475 | 00,333.90 |
| 15) | 7-7-5 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 4 core 50 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 02 Nos. | 135.45 | 00,270.90 |
| 16) | 7-9-2 | Supplying & erecting crimping type copper lugs for cable 25 sq mm complete as per specification No. CB-CL/CU | 16 Nos | 24.15 | 00,386.40 |
| 17) | 7-9-4 | Supplying & erecting crimping type copper lugs for cable 50 sq mm complete as per specification No. CB-CL/CU | 08 Nos | 34.65 | 00,277.20 |
| | | | | **Total Rs.:-** | **2,44,458.80** |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालयाकडील व्ही.आय.पी. भोजनकक्ष नं.०२ व चपाती किचनमध्ये एक्झॉस्ट फॅन खरेदी करुन बसविणेकामी येणा-या रक्कम रुपये २,४४,४५८/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरची खरेदी करणेकरीता शासन निर्णयानुसार बाहेरील विद्युत साहित्य ठेकेदार/ पुरवठादार यांना पत्र पाठवून कोटेशन मागविणेकामी संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन कोटेशन बोलविणेस तसेच कोटेशन प्राप्त झाल्यानंतर खरेदी समितीसमोर कोटेशन उघडून कोटेशनच्या दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकडील व्ही.आय.पी.भोजनकक्ष नं.०२ व चपाती किचनमध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे एक्झॉस्ट फॅन खरेदी करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.२,४४,४५८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.९४** **साईआश्रम भक्त निवासकडील इमारत व परिसरात एल.ई.डी.फिटींग बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** दिनांक १५-०६-२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत संस्थानमधील सर्व ठिकाणच्या इमारती व परीसरामध्ये एकाच वेळी एल.ई.डी.फिटींग बसविणे ऐवजी टप्प्याटप्प्याने एल.ई.डी.फिटींग बसविणेची कार्यवाही त्वरीत सुरु करणेबाबत निर्देश मिळालेले आहेत. संस्थानचे मंदिर परीसर, साईनगर परीसर, धर्मशाळा परीसर, ५०० रुम परीसर, साईआश्रम भक्तनिवास परीसर, साई धर्मशाळा भक्तनिवास परीसर, श्री साई प्रसादालय परीसर तसेच कनकुरी साठवण परीसर इत्यादी १० परीसर असून प्रत्येक परीसरामध्ये खालीलप्रमाणे इमारती आहेत.

| अ.क्र. | परीसराचे नांव | इमारतींचा तपशील |
|---|---|---|
| ०१) | मंदिर परीसर | ०१).समाधी मंदिर, ०२). शनी मंदिर ,०३).गणपती मंदिर, ०४).महादेव मंदिर, ०५). गुरुस्थान, ०६). चावडी, ०७). व्दाराकामाई, ०८).दिक्षित वाडा, ०९). सभामंडप, १०). म्युझियम हॉल, ११). शांतिनिवास इमारतीमधील सर्व ऑफिसेस, १२). भक्तनिवास इमारतीमधील सर्व ऑफिसेस, १३). शांतीनिवास इमारतीमधील दर्शन हॉल, १४). भक्तनिवास इमारतीमधील दर्शन हॉल, १५). पिंपळवाडी रोडवरील दर्शन लाईन शेड, १६). साईनाथ छाया इमारत, १७). सेवाधाम इमारत, १८). साईनिवास अतिथीगृह १९). मुख्य भांडार, २०). सुलभ शौचालय इमारत, २१). साईउद्यान इमारत, २२). मंगल कार्यालय इमारत, २३). शांतिनिकेतन, २४).साई कॉम्प्लेक्समधील मिटींग हॉल, २५). साई कॉम्प्लेक्समधील ०४ काऊंटर, २६). मंदिर परीसरातील दोन्ही डोनेशन काऊंटर, २७). सत्यनारायण पुजेचा हॉल, २८). हनुमान मंदिर, २९). खुले नाटयगृह, ३०).गुरुस्थान समोरील ध्यान मंदिर (सध्या सी.सी.टि.व्ही.करीता वापर), ३१). केशव मंदिर, ३२). १६ गुंठे परीसर, ३३). लेंडीबाग धबधबा, ३४).जनरेटर रुम, ३५). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०२) | साईनगर परीसर | ०१).साईध्यान नं.०१, ०२). साईध्यान नं.०२, ०३).साईनगर, ०४).समर्पण, ०५). साईस्मरण नं.०१, ०६). साईस्मरण नं.०२, ०७). साईस्मरण नं.०३, ०८).साईचिंतन नं.०१, ०९).साईचिंतन नं.०२, १०). साईचिंतन नं.०३, ११).साईचिंतन नं.०४, १२). मुख्य भांडार, १३). व्यायाम शाळा, १४). श्री साईबाबा हॉस्पीटल , १५). आर.एम.ओ.इमारत, १६). मेडीकल स्टोअर, १७). ब्लड बँक, १८). जनरेटर रुम, १९). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०३) | धर्मशाळा परीसर | ०१).व्दारावती भक्तनिवास, ०२). श्री साईनाथ हॉस्पीटल,०३).कॅन्टीन, ०४).केसपेपर कार्यालय, ०५). जनरेटर रुम, ०६).बगीचा, ०७).लॉण्ड्री, ०८). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०४) | साईआश्रम भक्तनिवास परीसर | ०१).ए ब्लॉक, ०२).बी ब्लॉक,०३).सी ब्लॉक, ०४). डी ब्लॉक, ०५).ई ब्लॉक,०६). एफ ब्लॉक,०७).जी ब्लॉक, ०८).एच ब्लॉक, ०९).आय ब्लॉक, १०).जे ब्लॉक, ११).के ब्लॉक,१२).एल ब्लॉक, १३).आर ब्लॉक, १४).ॲम्पिथिएटर, १५).जनरेटर रुम, १६).एच.टी.पी.प्लॅण्ट, १७).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०५) | साई धर्मशाळा परीसर | ०१).ए ब्लॉक, ०२).बी ब्लॉक ,०३).सी ब्लॉक, ०४).डी ब्लॉक, ०५). ई ब्लॉक, ०६).एफ ब्लॉक, ०७).आर ब्लॉक, ०८).ॲम्पिथिएटर, ०९).जनरेटर रुम, १०).एच.टी.पी.प्लॅण्ट, ११).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०६) | ५०० रुम परीसर | ०१).इमारतीमधील सर्व खोल्या , ०२). कॅन्टीन,०३).बगीचा, ०४).सर्व गाळे, ०५). सर्व हॉल, ०६). मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थान, ०७). साई सहवास नं.०१, ०८).साई सहवास नं.०२, ०९).साईसहवास नं.०३, १०). साईसहवास नं.०४, ११). वाहन विभाग, १२). बगीचा, १३). जनरेटर रुम, १४). वर्कशॉप , १५). पंपरुम, १६). लॉण्ड्री, १७). |

| | | |
|---|---|---|
| | | गुलाब गार्डन, १८). कन्या शाळा, १९). इंग्लीश मेडियम स्कुल, २०).आय.टी.आय., २१). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०७) | श्री साई प्रसादालय परीसर | ०१).कार्यालय, ०२).जनरल हॉल,०३).बुफेहॉल, ०४).व्ही.आय.पी.हॉल, ०५).व्ही.व्ही.आय.पी.हॉल, ०६).मेन किचन, ०७).चपाती किचन, ०८).स्टोअर, ०९).आय.टी.विभाग, १०).गॅस प्लँट एरिया, ११).मेकॅनिकल विभाग, १२).लाडू विभाग, १३).जनरेटर रुम, १४).पंपरुम, १५).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०८) | नवीन सेवाधाम परीसर | ०१).ए ब्लॉक, ०२). बी ब्लॉक,०३). सी ब्लॉक, ०४).डी ब्लॉक, ०५).ई ब्लॉक, ०६).एफ ब्लॉक, ०७).जी ब्लॉक, ०८).एच ब्लॉक, ०९). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०९) | कनकुरी साठवण तलाव परीसर | ०१).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट, ०२). जनरेटर रुम,०३). पंपरुम, ०४).वर्कशॉप, ०५).स्टोअर रुम |
| १०) | पालखी थांबे | ०१).पांगरी पालखी थांबा, ०२). सिन्नर पालखी थांबा,०३). पांढुर्ली पालखी थांबा, ०४).येसगांव पालखी थांबा |

उपरोक्तप्रमाणे संस्थानमध्ये एकुण परीसर असून त्या त्या परीसरात वरील इमारती आहेत. दिनांक १५-०६-२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत वरील सर्व इमारतीतील सध्या लावण्यात आलेल्या साध्या बल्ब व टयुब फिटींगच्या जागी टप्प्याटप्प्याने एल.ई.डी.बल्ब व टयुब फिटींग बसविणेची कार्यवाही त्वरीत सुरु करावी असे निर्देश मिळालेले आहेत.

त्यानुसार पहिल्या टप्प्यात साईआश्रम भक्तनिवास या परीसरातील सर्व इमारतींमधील खोल्यांमधील सध्या वापरात असलेल्या लाईट फिटींग तसेच सर्व स्ट्रीट लाईट फिटींग बदलून नवीन एल.ई.डी.फिटींग बसविता येतील. सध्या साईआश्रम भक्तनिवास या परीसरातील सर्व इमारतींमधील खोल्यांमधील सध्या वापरात असलेल्या लाईट फिटींग तसेच सर्व स्ट्रीट लाईट फिटींगचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | लाईट फिटींगचा तपशील | एकुण संख्या |
|---|---|---|
| ०१) | T-5, २८ वॅट सिंगल टयुब लाईट फिटींग | ३२३९ नग |
| ०२) | T-5, २८ वॅट डबल टयुब लाईट फिटींग | ७३ नग |
| ०३) | नाईट लॅम्प फिटींग | १५३६ नग |
| ०४) | ११ वॅट पी.एल.लॅम्प फिटींग | ४६०८ नग |
| ०५) | सिंगल ब्रॅकेट स्ट्रीट लाईट पोल | ६० नग |
| ०६) | डबल ब्रॅकेट स्ट्रीट लाईट पोल | ४६ नग |
| ०७) | ३६ वॅट पी.एल.साईलक्स शेड | ७२ नग |
| ०८) | ३६ वॅट सी.एफ.एल लॅम्प | ३४ नग |
| ०९) | २५० वॅट हायमास्ट लॅम्प फिटींग | १६ नग |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास या परीसरातील सर्व इमारतींमधील खोल्यांमध्ये तसेच परीसरामध्ये फिटींग बसविण्यात आलेल्या आहेत. या सर्व फिटींग बदलून नवीन एल.ई.डी.फिटींग बसविणे तसेच मेन्टेनन्ससाठी काही प्रमाणात जादा नग खरेदीकामी येणा-या खर्चाचा तपशील महाराष्ट्र शासनमान्य सी.एस.आर.सन २०१५-२०१६ नुसार पुढीलप्रमाणे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01). | 2-1-30 | Supplying approved make, 1 x 20 watt LED Tube fitting with tubebar suitable to fixed at ceiling or wall. (Instead of 40 watt tubelight fitting) | 3600 Nos. | 1138.20 | 40,97,520.00 |
| 02). | 2-3-10 | Supplying bulkhead fitting suitable for integral LED upto 11W fixed on wall. As per specification no.FG-IDF/BHF | 5500 Nos. | 166.95 | 09,18,225.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 03) | 2-1-28 | Supplying LED Lamp 3 watt 230 V Intergral type | 2000 Nos. | 254.10 | 05,08,200.00 |
| 04) | 2-1-29 | Supplying LED Lamp 8 watt 230 V Intergral type | 5500 Nos | 298.20 | 16,40,100.00 |
| 05) | 2-9-17 | Supplying approved type 150 Watt LED Flood light fitting, including lamp, with PF > 0.95, class IP 65 and above. Housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium as per specification no. FG-ODF/FL | 60 Nos | 29286.60 | 17,57,196.00 |
| 06) | 2-9-9 | Supplying approved type 120 Watt LED street light fitting, including lamp, having PF > 0.95, class IP 65 or above. Housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium as per specification no. FG-ODF/FLS2 | 190 Nos. | 18484.20 | 35,11,998.00 |
| 07) | 2-9-2 | Supplying approved type 25 Watt LED street light fitting, including lamp, with PF > 0.95, class IP 65 or above. Housing of pressure die cast aluminium alloy and heat sink extruded aluminium as per specification no. FG-ODF/FLS2 | 300 Nos. | 3204.60 | 09,61,380.00 |
| | | | | Total Rs:- | **1,33,94,619.00** |

**मागणी :-** उपरोक्तप्रमाणे साई आश्रम भक्तनिवास या परीसरातील सर्व इमारतीमधील खोल्यांमधील सध्या वापरात असलेल्या लाईट फिटींग तसेच सर्व स्ट्रीट लाईट फिटींग बदलून नविन एल.ई.डी.फिटींग बसविणे कामाकरीता अंदाजे रक्कम रुपये १,३३,९४,६१९/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे साई आश्रम भक्तनिवास या परीसरातील सर्व इमारतीमधील खोल्यांमधील सध्या वापरात असलेल्या जुन्या पारंपारिक पध्दतीच्या लाईट फिटींग तसेच सर्व स्ट्रीट लाईट फिटींग बदलून नविन एल.ई.डी.फिटींग बसविल्यास एका वर्षामध्ये अंदाजे रक्कम रुपये ३४,६०,४७३/- इतकी वीजबीलात बचत होऊ शकते. तसेच सध्या वापरात असलेल्या जुन्या पारंपारिक पध्दतीच्या लाईट फिटींगचे आयुष्यमान कमी असल्यामुळे त्याचे मेन्टेनन्सकरीता जादा खर्च येत असतो. त्यानुसार साधारणत: तीन ते चार वर्षाच्या कालावधीत नविन एल.ई.डी.फिटींग बसविण्याच्या कामाचा खर्च वसूल होऊ शकतो.

सदरील खर्चास व बाहेरील ठेकेदार यांचेकडून निविदा मागविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेसाठी सदर प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्त किंमत ही महाराष्ट्र शासनमान्य सी.एस.आर.सन २०१५-२०१६ नुसार असून प्रत्यक्षात मार्केटमध्ये यापेक्षा कमी दरात एल.ई.डी.बल्ब/ टयुब फिटींग/ स्ट्रीट लाईट फिटींग उपलब्ध आहेत. त्यामुळे वरील रकमेपेक्षा कमी रकमेत एल.ई.डी.बल्ब/ टयुब फिटींग/ स्ट्रीट लाईट फिटींग आपणाला मिळू शकतील. त्याकरीता भारतातील टॉप ब्रॅण्ड असलेल्या फिलिप्स/ ओसाराम/ हॉवेल्स/ बजाज/ सिस्का या पाच कंपन्यांचे एल.ई.डी.बल्ब/ टयुब फिटींग/ स्ट्रीट लाईट फिटींगसाठी ई-निविदा मागविता येतील. तसेच ई-निविदेमध्ये संबंधित एल.ई.डी.बल्ब/ टयुब फिटींग/ स्ट्रीट लाईटसाठी तीन वर्षाच्या फ्री रिप्लेसमेंट गॅरंटी कालावधीचा उल्लेख करता येईल. तसेच एल.ई.डी.बल्ब/ टयुब फिटींग / स्ट्रीट लाईट फिटींगकरीता संस्थानची मागणी मोठया प्रमाणात असल्याने मोठया प्रमाणात संस्थानला डिस्काऊंट मिळू शकतो. उपरोक्तप्रमाणे साई आश्रम भक्तनिवास या परीसरातील सर्व इमारतीमधील खोल्यांमधील सध्या वापरात असलेल्या लाईट फिटींग तसेच सर्व स्ट्रीट लाईट फिटींग बदलून नविन एल.ई.डी.फिटींग बसविणे कामाकरीता अंदाजे रक्कम रुपये १,३३,९४,६१९/- इतका खर्च अपेक्षित असून सदरील खर्चास व बाहेरील ठेकेदार यांचेकडून ईनिविदा मागविणेकामी मराठीतील व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबईपुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्त निवासकडील इमारत व परिसरात एल.ई.डी.फिटींग बसविणेकामी अंदाजपत्रकीय रक्कम २०% कमी दर्शवून विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू साहित्य खराब झालेल्या साहित्याचे जागेवरच बसविणेत यावे. याकरीता या ई-निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त होणाऱ्या निम्नतम दरधारक पुरवठाधारकांकडूनटप्प्या-टप्प्याने साहित्य खरेदी करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.९५** **श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ हॉस्पिटल येथे लॉन्ड्री व प्रयोगशाळेच्या रासायनिक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP प्लान्ट उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद :-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट–कलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१. मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ०७/०८/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६६५ अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथे लॉण्ड्री व प्रयोगशाळेच्या रसायनीक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP उभारणेसाठी त्यांचे डिझाईन, ड्रॉईग, निविदा वगैरे तयार करुन घेणेसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागार यांची विहीतपध्दतीने नेमणूक करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

२. मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.९२५ अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी फक्त दोनच RFP Document वजा प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत व त्या दोन्हीही प्रस्तावांमध्ये फारच तफावत दिसून येत आहे. त्याकरीता याकामी फेर प्रस्ताव मागविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.

३. मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ०२/०४/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.२०५ (०६) अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे लॉण्ड्री व प्रयोगशाळेच्या रासायनिक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP उभारणेकामी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करणेसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील En-Struct Consulting Engineers, Pune यांचे रु.२,४७,०००/- + सर्व्हिस टॅक्स मात्र हे निम्नतम स्विकारण्यात येऊन, त्यांना सल्लागार म्हणून नेमणूक देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय लॉण्ड्री व पॅथोलॉजी लॅब करीता स्वतंत्र ETP उभारणे गरजेचे आहे. असे बायोमेडीकल विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी कळविले आहे. श्री साईनाथ हॉस्पीटल येथील लॉण्ड्री मधून दररोज साधारणतः ७००० ते ८००० लिटर रासायनिक सांडपाणी बाहेर निघते. तसेच दोन्ही हॉस्पीटलचे पॅथोलॉजी लॅबमधून प्रत्येकी साधारणतः १००० ते १५०० लिटर रासायनिक सांडपाणी बाहेर निघते. सदर सांडपाण्याचा पुर्नवापर फ्लशींग व बगीचासाठी करता येईल.

सदरहू निघाणा-या पाण्यासाठी दोन्ही रुग्णालय येथे स्वतंत्र ETP प्लॅन्ट उभारणेकामी तत्कालीन मा. त्रिसदस्य समितीचे दि.०२/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२०५ (०६) अन्वये, सदर ETP प्लॅन्ट उभारणेकामी माहिती तयार करणे, डिझाईन तयार करणे, निविदा व नकाशे तयार करणे याकामांसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागार En-Struct Consulting Engineers, Pune यांचे रु.२,४७,०००/- + सर्व्हिस टॅक्स मात्र हे निम्नतम स्विकारण्यात येऊन, त्यांना सल्लागार म्हणून नेमणूक देणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार त्यांना इकडील जा.क्र.१४७३/२०१६ दि.२९/०६/२०१६ अन्वये, नेमणूक आदेश देणेत आला आहे. त्यानुसार सल्लागार En-Struct Consulting Engineers, Pune यांनी दि.०८/०४/२०१७ रोजीचे पत्रान्वये विषयांकीत कामासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल, आराखडे व अंदाजपत्रक सादर केले आहे.

| अ.नं. | कामाचे स्वरुप | अंदाजीत खर्च रू. |
|---|---|---|
| ०१. | **श्री साईबाबा हॉस्पीटल** येथील सांडपाण्यासाठी Effluent Treatment Plant ची उभारणी करणे. | |
| | **1.** Civil Work:- Excavation, Construction of 5000 lit. capacity Equalization Tank, Construction of Sludge Drying Bed, Equipments Foundation, Repairing damaged chambers, P & F Paving Blocks, Laying and jointing 25mm pipe line for pumping. | 2,80,000/- |
| | **2.** Mechanical Works:- Submersible Pump, Static Mixer, Pipe Flocculator, Alum Dosing System, Calcium Chloride Dosing System, Clarifier/ Settling Tank, Filter Feed Tank, Horrizontal Centrifugal Pump, | 8,41,230/- |

| | | |
|---|---|---|
| | Pressure Sand Filter, Activated Carbon Filter, Cartridge Filter, Treated Water Storage Tank, Ozone Dosing System, Interconnecting piping.<br>**3.** Instrumentation Works:- Pressure Indicators at inlet and outlet, Level Controller at Equalization/ Collection tank, Selector Switch on level controller, Mechanical flow meter.<br>**4.** Electrical Works:- MCC/ Control Panel, Cabling, Equipments Earthing. | 14,375/-<br><br>89,395/- |
| ०२. | **श्री साईनाथ रुग्णालय** येथील लॉण्ड्री व रासायनिक सांडपाण्यासाठी Effluent Treatment Plant ची उभारणी करणे.<br>**1.** Civil Work:- Excavation, Construction of 15000 lit. capacity Equalization Tank, Construction of Sludge Drying Bed, Equipments Foundation, Construction of Inspection Chambers, P & L 200 mm dia. PVC Pipe line, Laying and jointing 25mm pipe line for pumping.<br>**2.** Mechanical Works:- Providing PVC 200 mm dia. Pipe line, Bar Screen, Submersible Pump, Static Mixer, Pipe Flocculator, Alum Dosing System, Calcium Chloride Dosing System, Clarifier/ Settling Tank, Sequential Batch Reactor Tank, Air Blower, Horrizontal Centrifugal Pump, Pressure Sand Filter, Activated Carbon Filter, Cartridge Filter, Treated Water Storage Tank, Ozone Dosing System, Interconnecting piping.<br>**3.** Instrumentation Works:- Pressure Indicators at inlet and outlet, Level Controller at Equalization/ Collection tank, Selector Switch on level controller, Safety Relief Valve, Mechanical flow meter.<br>**4.** Electrical Works:- MCC/ Control Panel, Cabling, Equipments Earthing. | <br>8,65,000/-<br><br>16,36,090/-<br><br>15,525/-<br><br>1,03,385/- |
| **दोन्ही रुग्णालयासाठी** Effluent Treatment Plant **ची उभारणी करणेसाठी अपेक्षित खर्च रु.** | | 38,45,000/- |

**प्रस्ताव**: तरी वरीलप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे लॉण्ड्री व पॅथोलॉजीमधील रासायनिक सांडपाण्यासाठी स्वंतत्र Effluent Treatment Plant ची उभारणी करणेकामी वरीलप्रमाणे अंदाजे रु.३८,४५,०००/- मात्रचे खर्चास व सदरहू कामी सल्लागार En-Struct Consulting Engineers, Pune यांचेकडून सविस्तर निविदा तयार करुन घेऊन, विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करुन घेणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ हॉस्पिटल येथे लॉन्ड्री व प्रयोगशाळेच्या रासायनिक सांडपाण्यासाठी स्वतंत्र ETP प्लान्टची उभारणी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३८,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.९६** **श्री साई प्रसादालय, भक्तनिवास लॉन्ड्री युनिटचे स्टीम बॉयलर करीता तसेच थर्मिक फ्लुड हिटरकरीता अत्यावश्यक स्पेअरपार्ट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद** : कलम 14(2)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

**प्रस्तावना** : श्री साईभक्तांना वेळेत प्रसाद भोजन मिळावे याकरीता संस्थानने सन २००९ मध्ये वाढीव क्षमतेचे श्री साई प्रसादालय सुरु केले असून, तेथे दैनंदिन प्रसाद भोजन तयार करणेकरीता लागणा-या वाफेची निर्मिती सोलर प्रकल्पाव्दारे तसेच थर्मेक्स कंपनीच्या बॉयलरव्दारे केली जाते. याकामी थर्मेक्स कंपनीचे RXD 850 व RXG 400 असे दोन स्टीम बॉयलर्स वापरात आहेत. तसेच लाडू विभागात बुंदी तळणेसाठी दोन लाख किलो कॅलरी क्षमतेची थर्मेक्स कंपनीची थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणा व नविन भक्तनिवास्थान येथील लॉन्ड्री युनिटमध्ये थर्मेक्स कंपनीचे तासी 200 किलो क्षमतेचा स्टीम बॉयलर कार्यान्वित करणेत आलेला आहे.

उपरोक्त स्टीम बॉयलर्स व थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणा सुरळीत कार्यरत राहणेकरीता त्यांचे AMC करीता थर्मेक्स कंपनीचे अहमदनगर व औरंगाबाद जिल्ह्याचे अधिकृत डिलर मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना दिनांक ०१/०१/२०१७ ते दिनांक ३१/१२/२०१७ या कालावधीकरीता जा.नं. एसएसएस/वशी-मेकॅनिकल/ ५४५४/ २०१७ दिनांक २४/०१/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरचे कार्यादेशानुसार मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी यांनी शिरडी येथे येऊन् सदरचे युनिटची सव्हीसिंग केलेली आहे. सदर मशीनरी दुरुस्ती कामी खालील स्पेअरपार्ट टाकावे लागणार आहे :

१) श्री साई प्रसादालयातील RXG 400 बॉयलर – बॉयलर चालू केलेनंतर बाहेरील बाजु गरम होत असलेने, सुरक्षिततेकरीता नविन जॅकेट टाकावे लागणार आहे, RTD असेम्बली नवीन टाकणे, Temp. इंडीकेटर नवीन टाकणे.

२) श्री साई प्रसादालयातील RXD 850 बॉयलर – बॉयलरचे प्रेशर स्वीच, इलेक्ट्रोड कॅप नविन खरेदी करुन बसवावी लागणार आहे.

३) नविन भक्तनिवासस्थान येथील बॉयलर – बॉयलरचे हिट ऑपटीमायझर, सेफ्टी व्हॉल्व, स्टीम व्हॉल्व नविन खरेदी करुन बसवावे लागणार आहे.

वरीलप्रमाणे नविन स्पेअरपार्ट खरेदी करणेकामी मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांनी दरपत्रक दिलेले असून, त्यानुसार खालीलप्रमाणे खर्च लागणार आहे.

| Sr. No. | Item Code | Particular | Qty | Price Each | Valve |
|---|---|---|---|---|---|
| **A)** | **RXD 850 बॉयलर** | | | | |
| 1. | P23PK10040 | PR Switch (Low PR.) DG 150U3 for RXD 850 | 1 | 8,641/- | 8,641/- |
| 2. | P22IE10010 | Electrode Cap for RXD 850 | 2 | 80/- | 160/- |
| 3. | | Aluminum Radiator Sheet | 1 | 15,000/- | 15,000/- |
| **Total (A) Rs :** | | | | | **23,801/-** |
| **B)** | **RXG 400 बॉयलर** | | | | |
| 1. | PRXJK10009 | Inner Jacket for Rax 04 | 1 | 32,755/- | 32,755/- |
| 2. | P44TE10030 | RTD Assembly, 2 MT Long | 1 | 1,102/- | 1,102/- |
| 3. | P44TS10080 | Temperature Indicator 1 SP | 1 | 2,965/- | 2,965/- |
| **Total (B) Rs :** | | | | | **36,822/-** |
| **C)** | **RXA 02 बॉयलर** | | | | |
| 1. | PRXEC10017 | Heat Optimiser for RXA 02 | 1 | 10,498/- | 10,498/- |
| 2. | P36SS2009M | Valve Safe PSI-BRZ-IBRNC-1" BSP 25 mm for RXA 02 | 1 | 4,118/- | 4,118/- |
| | | | | **Total (C) Rs :** | **14,616/-** |
| | | | | **Total - A+B+C (Tax Extra) Rs. :** | **75,239/-** |

**मागणी:** उपरोक्तप्रमाणे स्टीम बॉयलर व थर्मिक फल्युड हिटर यंत्रणा दुरूस्तीकामी रुपये ७५,२३९/- + टॅक्स मात्रचा खर्च अपेक्षित आहे. प्रस्तुत यंत्रणेचे स्पेअरपार्ट थर्मेक्स कंपनीचे असल्याने, ते कंपनीचे डिलर व्यतिरीक्त मार्केटमध्ये अन्यत्र उपलब्ध होत नसलेने, थर्मेक्स कंपनीचे डिलर मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करावे लागतील. सदरील खर्च इकडील विभागाकडील सन २०१७-२०१८ या वर्षातील मंजूर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकात 'मशीनरी दुरूस्ती व देखभाल खर्च' या शिर्षातील शिल्लक रुपये १,२६,३०,४८३/- मात्रचे रकमेतून करता येईल. या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय** : श्री साई प्रसादालय, भक्तनिवास लॉन्ड्री युनिटचे स्टीम बॉयलर तसेच थर्मिक फ्लुड हिटर यंत्रणा विना तक्रार कार्यान्वित राहणेसाठी, त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. दुरुस्ती कामी आवश्यक मटेरिअल कंपनीचे डिलर मे.मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या

अपेक्षित रक्कम रुपये ७५,२३९/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर हजार, दोनशे एकोणचाळीस) + टॅक्स या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, श्री साई प्रसादालय, भक्तनिवास लॉन्ड्री युनिटचे स्टीम बॉयलर करीता तसेच थर्मिक फ्लुड हिटरकरीता अत्यावश्यक स्पेअरपार्ट मे.मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेसव त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७५,२३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.९७ **श्री साईसमाधी शताब्दी महोत्सव २०१८ चे गर्दीचे नियोजनकामी Resilient India, Nashik यांचे मार्फत संरक्षण विभागाकडील कायम व कंत्राटी कर्मचारी यांना आपत्ती व्यवस्थापनचे मोफत प्रशिक्षण देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद–** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीचे कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वाये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टये साध्या करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक:- निरंक**

**प्रास्तविक:-** Resilient India, Nashik यांचे दि.२९/०५/२०१७ चे पत्र इकडील कार्यायास प्राप्त झाले असुन सदर पत्रामध्ये श्री साई समाधी शताब्दी महोत्सव २०१८ चे निमीत्ताने होणारे गर्दीचे नियोजनकामी गर्दीवर नियंत्रण करणे व आपत्कालीन परिस्थतीवर मात करण्यासाठी आराखडा तयार करणे, प्रशिक्षण मोफत देणेस तयार असलेबाबत नमुद केलेले आहे. सदरचे पत्रामध्ये त्यांनी नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०१५ चे दरम्यान नाशिक आयुक्तालय व पोलिस यांच्या निरंतर संपर्कात राहुन गर्दीचे नियम, आराखडा आणि प्रशिक्षणावर भर देऊन एक अवघड कार्य सिध्दीस नेले. जेंव्हा की भक्तांची / तिर्थयात्रींची संख्या ३ कोटींच्या जवळपास गेली. काही जागा आणि तेथील भौगोलीक परिस्थीती आणि कार्यक्रमाचे स्थळ शहराच्या मध्येभागी होती. यामुळे सर्वांना एकच निर्णय/ परिणाम पहायला मिळाला, कुठल्याही प्रकारची क्षती/ हानी झालेली नाही, इ. नमुद केले आहे.

Resilient India, Nashik चे श्री राजीव चौबे यांचेशी प्रशिक्षणबाबत चर्चा केली असता त्यांनी प्रथम एक किंवा दोन दिवस मंदिर परिसराचा पुर्ण सर्वे करुन सर्वेमध्ये आढळुन आलेल्या त्रुटी/ धोक्याबाबत कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार आहेत. प्रशिक्षणामध्ये प्रामुख्याने बचाव, धोक्याची तिव्रता कमी करणे, तयारी करणे, प्रतिसाद, पुर्ननिर्माण, आणि आपातकालानंतर पुर्नबांधणी इ. चा समावेश असणार आहे.

Resilient India, Nashik यांनी प्रस्तावामध्ये एका दिवशी १००० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार असल्याचे नमुद केले आहे. परंतु प्रशिक्षणाचा कालावधी कमी वाटत असल्याने श्री राजीव चौबे यांचेशी दुरध्वनीद्वारे चर्चा केली असता त्यांनी खालील प्रमाणे प्रशिक्षणाचा कालावधी कळविला आहे.

| एका बॅचमधील व्यक्तींची संख्या | अवधी | प्रशिक्षण कोर्सची संख्या | किंमत |
|---|---|---|---|
| एका वेळी १२५ कर्मचारी | २ दिवस | (कोर्सचे ४ प्रकार)<br>१. धोका ओळखणे २. गर्दीचे नियमण करणे<br>३. आपातकाल प्रबंधन ४. कवायद करणे | विनामुल्य |

एका बॅचमध्ये १२५ कर्मचारी (एका बॅचकरीता २ तास कालावधी) X दररोज ४ बॅच = एका दिवसामध्ये ५०० कर्मचारी असे ०२ दिवसामध्ये १००० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देता येईल, असे सांगितले.

तसेच ट्रेनींगकामी येणारे सात व्यक्ती यांची मुंबई ते शिर्डी येणे-जाणेची व्यवस्था, निवासव्यवस्था व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत मोफत होणेस पत्रामध्ये नमुद केले आहे.

**अनुमान:-** धोरणात्मक.

**मागणी:-** संरक्षण विभागाकडील कायम व कंत्राटी कर्मचारी यांना आपत्ती व्यवस्थापनचे प्रशिक्षण देणे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साई समाधी शताब्दी महोत्सव २०१८ चे निमीत्ताने साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होणार असुन संरक्षण विभागाकडील कायम व कंत्राटी कर्मचारी यांना आपत्ती व्यवस्थापन / गर्दीचे नियमन बाबत प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. श्री राजीव चौबे, Resilient India, Nashik यांनी यापुर्वी नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०१५ चे वेळी पोलिस आयुक्तालय, नाशिक यांचे मान्यतेने पोलिस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलेले आहे. या कामाचा त्यांना अनुभव आहे. तसेच सदरचे काम ते विनामुल्य करुन देणार असल्याने संरक्षण विभागाचे कर्मचाऱ्याबरोबर फायर विभाग व आपत्कालीन पथकातील कर्मचाऱ्यांनाही प्रशिक्षण देता येईल, असे नम्र मत आहे.

तरी श्री.राजीव चौबे, Resilient India, Nashik यांचेकडुन श्री साई शताब्दी महोत्सव २०१८ चे गर्दीचे नियोजनकामी मंदिर परिसराचा सर्वे करुन संरक्षण विभागाकडील कायम व कंत्राटी कर्मचारी, फायर विभाग कर्मचारी तसेच आपत्कालीन पथकातील कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याचे काम विनामुल्य करुन घेण्यास व ट्रेनींगकामी येणारे सात व्यक्ती यांची मुंबई ते शिर्डी येणे-जाणेची व्यवस्था, निवासव्यवस्था व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.राजीव चौबे, Resilient India, Nashik यांचेकडुन श्री साई शताब्दी महोत्सव २०१८ चे गर्दीचे नियोजनकामी मंदिर परिसराचा सर्वे करुन संरक्षण विभागाकडील कायम व कंत्राटी कर्मचारी, फायर विभाग कर्मचारी तसेच आपत्कालीन पथकातील कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याचे काम विनामुल्य करुन घेणेस व सदरहू ट्रेनींगकामी त्यांचेमार्फत येणाऱ्या ०७ व्यक्तींची मुंबई ते शिर्डी येणे-जाणेची व्यवस्था, निवासव्यवस्था व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री.राजीव चौबे, Resilient India, Nashik यांचेकडुन आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडाही तयार करुन घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.९८** **दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांना श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डीचे परिसरात नोगा ब्रॅन्ड फुड प्रॉडक्टस विक्री केंन्द्राकरीता जागा मिळणेबाबत डॉ.अशोक करंजकर, मॅनेजिंग डायरेक्टर, दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांचेकडील पत्र क्र. एमएआयडीसी/ नोगा/ स्टॉल/ २०१७/ ३४३४, दि.०६/०६/२०१७.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता,भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

**प्रस्ताव -** दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांना श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी चे परिसरात नोगा फूड प्रॉडक्टस विक्री केंद्राकरीता जागा मिळणेबाबत..

**प्रस्तावना–** दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई ही एक महाराष्ट्र शासन अंगीकृत संघटना असून फर्टिलायजर्स,पेस्टीसाईडस,पशुखाद्य,ॲग्रो इंजिनिअरींग व फूड प्रॉडक्ट प्रक्रिया केंद्र असून नोगा ब्रॅण्ड म्हणून उत्पादन व विक्री करीत आहे. तरी श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट परिसरात नोगा प्रॉडक्ट विक्री केंद्राकरीता जागा उपलब्ध करुन द्यावी,असेबाबत डॉ.अशोक करंजकर,मॅनेजिंग डायरेक्टर, दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांनी विषयांकित पत्राद्वारे विनंती केलेली आहे

**विभागाचा अभिप्राय–** सदर प्रॉडक्ट हे शेतकरी व ग्राहकांच्या उपयोगाचे आहेत. परंतु नवीन दर्शन रांगेचे काम सुरु होत असलेने विविध विभागांनी साईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम-१ येथील गाळे वापरास घेतले असल्याने या दोन्ही ठिकाणी भाडेतत्वावर देण्यासाठी गाळे उपलब्ध नसल्याचे तेथील विभाग प्रमुखांनी कळविले आहे.

त्यामुळे सध्या दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांना गाळा उपलब्धकरुन देणे शक्य होत नाही. या दोन्ही ठिकाणी पूढे गाळा रिकामा झाल्यास त्यांना भाडेतत्वावर गाळा उपलब्ध करुन देता येईल, असे मत आहे.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि महाराष्ट्र अॅग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांना, त्यांचे नोगा ब्रॅन्ड फुड प्रॉडक्टस विक्री करणेसाठी वाहन उभा करणेकामी साईआश्रम भक्तनिवास परिसरामध्ये संस्थानच्या विहीत अटी/ शर्तीनुसार जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.९९** **श्री साई प्रसादालयाचे माऊंटेड गॅस प्लॅन्टमधील इन्स्टुमेंट दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद** : कलम 14(2)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

**प्रस्तावना**: श्री साईप्रसादालयातील प्रसादभोजन, फूड पॅकेट, लाडु प्रसाद तयार करणेकामी इंधन म्हणून एल.पी. गॅसचा वापर करण्यात येत आहे. एल. पी. जी. साठविणे करीता सन २००८ मध्ये मे. ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्री प्रा.लि., मुंबई यांचेकडुन१० मे. टन क्षमतेच्या दोन माऊंटेड गॅस टॅंक बसविण्यात आलेले आहेत. माऊंटेड गॅस प्लॅन्टचे सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक लिकेज डिटेकशन सिस्टिम, अॅटो वॉटर स्प्रिंकलर, रिमोट ऑपरेटेड न्युमॅटीक व्हॉल्व, डिजीटल फ्लो मिटर, टेंम्प्रचर मिटर, प्रेशर मिटर इ. बसविण्यात आलेले आहेत. सदरची यंत्रणा उभारणीकामी रक्कम रूपये २,७३,००,०००/- इतका खर्च आलेला होता. सदरचे इंस्टयुमेंन्ट पैंकी काही इन्स्ट्रयुमेंट सततचे वापराने नादुरूस्त झालेले आहे. त्यामुळे सदरचा प्लॅन्ट मॅन्युअली ऑपरेटींग करावा लागतो. तसेच गॅस टॅंकर अनलोडींग करीता वापरात असलेला होज पाईप सततच्या वापराने खराब झालेला असून, तो बदलणेही आवश्यक आहे.

सदरचा प्लॅन्ट मे.ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्री प्रा. लि., मुंबई असलेने प्लॅन्ट उभारणी केलेला असल्याने प्रस्तुत स्पेअरपार्ट व इक्युपमेंट मे. ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्री प्रा.लि., मुंबई यांचेकडूनच दुरुस्ती करुन घ्यावे लागणार आहे. याबाबत मे.ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्री प्रा. लि., मुंबई यांनी संदर्भिय ईमेल द्वारे खर्चाचा तपशिल कळविलेला आहे.

A) **Supply of D'canting Hose/ MOV & other Accessories.**

| Sr. No. | Description | Unit | Qty | Unit rate in INR | Total In INR |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Solenoid Coil for ROV 230 V | No | 2 | 9,000/- | 18,000/- |
| 2. | Electro Pneumatic Valve (MOV) 2-1/2"x150#FE | No | 3 | 35,000/- | 1,05,000/- |
| 3. | 4" Dial pressure gauge brass internal 0-10 kg/cm2, ½" BSP & Connection | No | 1 | 1,350/- | 1,350/- |
| 4. | D'canting Hose 300# Flange one side & other side ACME Fitting, Size 2" & 1-1/2" x 4 Mtrs. Long | Set | 1 | 30,000/- | 30,000/- |
| | | | | **Total (A)** | **1,54,350/-** |
| **B ) Supply & Installation of Electrical Accessories** | | | | | |
| 1. | Supply of Vaporizer Shed Light On/Off Switch | No | 4 | 450/- | 1,800/- |
| 2. | Supply PBS at Pump Shed | No | 2 | 1,800/- | 3,600/- |
| 3. | Supply of Emergency PBS at Pump Shed | No | 1 | 1,800/- | 1,800/- |
| 4. | Supply of Selector Switches on the Panel | No | 1 | 5,000/- | 5,000/- |
| 5. | Supply of Control relays | No | 1 | 28,500/- | 28,500/- |
| 6. | Supply of Miscellaneous accessories and hardware for panel rectification. | No | 1 | 35,000/- | 35,000/- |
| 7. | Supply of PLC Controller | No | 5 | 8,800/- | 44,000/- |
| 8. | Supply of Feeder Name Plates | No | 1 | 2,500/- | 2,500/- |
| 9. | Supply Crocodile Clamps for Tanker | No | 2 | 1,500/- | 3,000/- |
| 10. | Supply of MIMIC Panel for all the faults | No | 1 | 22,000/- | 22,000/- |
| 11. | Supply of Exhaust Fan at the Panel | No | 1 | 700/- | 700/- |
| 12. | Supply of Level Switch High | No | 2 | 18,000/- | 36,000/- |
| 13. | Supply of Pressure Transmitter at Regulator | No | 2 | 17,000/- | 34,000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 14. | Wiring Hardware Like tie, belt, lugs etc. | Lot | 1 | 10,000/- | 10,000/- |
| 15. | Installation / Commissioning | Job | 1 | 1,40,000/- | 1,40,000/- |
| | | | | **Total (B)** | **3,67,900/-** |
| | | | | Total (A) | 1,54,350/- + Taxes |
| | | | | Total (B) | 3,67,900/- + Taxes |
| | | | | **Grand Total (A+B)** | **5,22,250/- + Taxes** |

उपरोक्तप्रमाणे माऊंटेड गॅस प्लॅन्ट दुरूस्तीकामी रुपये ५,२२,२५०/- + टॅक्स मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाकडील सन २०१७-२०१८ या वर्षातील अंदाजपत्रकात 'मशीनरी दुरूस्ती व देखभाल खर्च' या शिर्षातील मंजूर रुपये १,३४,००,०००/- मात्रचे रकमेतून करता येईल. प्रस्तुत कार्यावाहीस व खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय** : श्री साई प्रसादालयातील माऊंटेड गॅस प्लॅन्टची सुरक्षिततेच्या दुष्टीने व ॲटो ऑपरेटींग करणेकरीता प्रस्ताविक दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तरी प्रकल्पाचे उभारणीदार व पुरवठादार मे. ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्री प्रा. लि., मुंबई यांचेकडून प्रस्तुत दुरुस्ती करुन घेणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये ५,२२,२५०/- + टॅक्स (अक्षरी रुपये पाच लाख बावीस हजार दोनशे पन्नास मात्र) + टॅक्स या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साई प्रसादालयातील माऊंटेड गॅस प्लॅन्टच्या सुरक्षिततेच्या दुष्टीने व ॲटो ऑपरेटींग करणेकरीता, प्रकल्पाचे उभारणीदार व पुरवठादार मे.ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्री प्रा. लि., मुंबई यांचेकडून दुरुस्तीकरुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या रु.५,२२,२५०/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.१००** **श्री.बाबासाहेब नामदेव राहणे, गुरुकृपा कलेक्शन, जवळके यांचे अग्निशमन वाहनाचे बिल माफ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** जवळके येथील गुरुकृपा क्लॉथ स्टोअर्स या कापड दुकाणास दि.२७.०१.२०१६ रोजी पहाटे ०२.३० वाजेदरम्यान आग लागली होती. या बाबत शिर्डी पोलिस स्टेशनचे ठाणे आंमलदार श्री चव्हाण यांचा संस्थानचे अग्निशमन वाहन पाठविणे बाबत फायर विभागास पहाटे ०३.२९ वाजता फोन आला होता. त्यानुसार संस्थानचे अग्निशमन वाहन क्र. MH 17 BD - 2718 हे कर्मचा-यांसह दि.२७.०१.२०१६ रोजी पहाटे ०३.३० वाजता पाठविणेत आलेले असून सदरचे वाहन हे संस्थानचे वॉचरुम येथे सकाळी ०६.१० वाजता दाखल झालेले आहे. सदर आग विझाविणेकामी संस्थानचे अग्निशमन वाहनाचा वापर ०२ तास ४० मिनीटे झालेला होता. संस्थानचे मा.व्य.समितीचे दि.२८.१२.२०१५ रोजीचे सभेतील नगरपालिका स्थायी निर्देश ३१ मधील दरानुसार विषय क्र.४१ व निर्णय क्र.६५९ नुसार अग्निशमन वाहन वापराचा चार्ज रु.४०००/- (अक्षरी रुपये - चार हजार मात्र) श्री साईबाबा संस्थानचे लेखाशाखेत रोखीने अथवा डी. डी. व्दारे भरणा करणेबाबत जवळके येथील गुरुकृपा क्लॉथ स्टोअर्सचे मालक श्री.बाबासाहेब नामदेव रहाणे, गुरुकृपा कलेक्शन, बहादरपूर यांना खालील प्रमाणे फायर विभागामार्फत कळविणेत आलेले होते.

**परिशिष्ट 'अ'**

| **अ.नं** | **जावक क्रमांक** | **दिनांक** | **स्मरण पत्र क्रं.** |
|---|---|---|---|
| ०१ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/२९५६/२०१६ | २८.०१.२०१६ | बील |
| ०२ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/६८७८/२०१६ | १४.०३.२०१६ | ०१ |
| ०३ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/७१०७/२०१६ | २९.०३.२०१७ | ०२ |
| ०४ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/८२३/२०१६ | २४.०५.२०१६ | ०३ |
| ०५ | जा.नं.एसएसएस/फायर ॲण्ड सेफ्टी/२९४/२०१६ | ०८.०९.२०१६ | ०४ |

उपरोक्त परिशिष्टातील स्मरण पत्रांव्दारे श्री रहाणे यांना संस्थानचे अग्निशमन वाहनाचे थकीत बील भरणेबाबत वारंवार कळविणेत आलेले होते परंतु त्यांनी सदर बीलाची रक्कम संस्थानचे खाती जमा केली नाही. त्यामुळे फायर ॲण्ड सेफ्टी जा.नं. ४०७ दि. ०२.०१.२०१७ रोजीचे मा.का.अ.सो यांचे मान्यतेने अग्निशमन वाहनाचे बीलाची रक्कम वसुलीबाबत श्री रहाणे यांना संस्थानचे विधि विभागाकडुन वकिलामार्फत कायदेशीर नोटीस पाठविणेबाबत कळविणेत आलेले होते त्यानुसार विधी विभागामार्फत ॲड श्री जे.के.गोंदकर यांना

जा.नं.एसएसएस/वशी-विधी/५६३३/२०१७ दि.२५.०१.२०१७ रोजी कायदेशीर नोटीस देणेबाबत कळविणेत आलेले होते. ॲड श्री जे.के.गोंदकर यांनी श्री रहाणे यांना संस्थानचे अग्निशमन वाहनाचे थकीत बील भरणा करणेबाबत कायदेशीर नोटीस दि.२८/०२/२०१७ रोजी पाठविणेत आलेली आहे. परंतु तरीही श्री रहाणे यांनी सदर बीलाची रक्कम संस्थान खाती जमा केलेली नाही.

आता उपरोक्त संदर्भ क्रं. ०१ नुसार श्री रहाणे यांचे अग्निशमन वाहनाचे बील माफ करणेबाबत मा.विश्वस्त श्री भाऊसाहेब वाकचौरे साहेब यांचे प्राप्त झालेले पत्रामध्ये नमुद केलेले आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्रं. ०२ श्री राहणे यांचे अर्जावर मा. विश्वस्त श्री सचिन तांबे साहेब यांनी तातडीने कार्यवाही करावी तसेच सभेपुढे सादर करावे असे निर्देश दिलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** संस्थानचे मा.व्य.समितीचे दि.२८.१२.२०१५ रोजीचे सभेतील नगरपालिका स्थायी निर्देश ३१ मधील दरानुसार विषय क्र.४१ व निर्णय क्र.६५९ नुसार आजपर्यत परिसरातील घडणा-या आगीचे घटनेवेळी संस्थानचे अग्निशमन वाहन पाठविणेत आलेले होते त्यापैकी खालील प्रमाणे अग्निशमन वाहन आकार येणे बाकी आहे.

**परिशिष्ट ब - अग्निशमन वाहनाचे बील थकबाकीदार**

| अ.नं. | नाव | घटना दिनांक | घटना ठिकाण | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री बाबासाहेब रहाणे गुरुकृपा क्लॉथ स्टोअर्स | २७.०१.२०१६ | जवळके | ४०००/- |
| ०२ | श्री.हाजी सद्दाम हूसेन सय्यद (भंगार दुकान) | ०३.०३.२०१७ | कोपरगाव | ८८००/- |
| ०३ | निमगाव – को-हाळे ग्रामपंचायत (व्यवसायीक गाळे) | २८.०४.२०१७ | पालखी निवारा शेजारी | ४०००/- |
| ०४ | शिर्डी विमानतळ (एकुण थकीत रक्कम) | दि.२४.०६.२०१६ ते आजपावेतो | शिर्डी विमानतळ काकडी | ७४१०५/- |
| | | | **एकुण थकीत रक्कम** | **९०९०५/-** |

श्री बाबासाहेब रहाणे, गुरुकृपा क्लॉथ स्टोअर्स जवळके यांना संस्थानचे अग्निशमन वाहन वापराचे बील रु. ४०००/- (अक्षरी– चार हजार रु मात्र) माफ केले तर उपरोक्त अ.नं. ०१ ते ०४ यांचेही संस्थानचे अग्निशमन वाहनाचे बील माफ करणेबाबत विनंती अर्ज येण्याची तसेच अग्निशमन सेवा निशुल्क केलेस अग्निशमन वाहनांचा अनावश्यक गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री.बाबासाहेब रहाणे गुरुकृपा क्लॉथ स्टोअर्स, जवळके यांचे बील माफ करणेबाबत सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.६२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेल्या अ.नं.०४ वगळता इतरांची अग्निशमन वाहनांची बीले माफ करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०१** **व्दारावती निवासस्थान समोरील गार्डनमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१(१) अन्वये समितिकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:**

१. मा. त्रिसदस्य समिती सभा दिनांक १५ मार्च, २०१४ निर्णय क्र.१८६.
२. मा .व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ मार्च, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२४ (७).

प्रस्तावना: बगिचा विभागाचे दि.२६/११/२०१३ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये द्वारावती निवासस्थान समोरील गार्डन मध्ये शिर्डी व परीसरातील नागरीक व साईभक्त फिरावयास येत असल्याने सदर गार्डनमध्ये पाणी मारल्यानंतर होणा-या चिखलामुळे होणारी गैरसोय टाळणेसाठी पेव्हिंग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे) तयार करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सादर केलेल्या रु.१२,२९,९००/- खर्चाचे प्रस्तावास मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १५ मार्च, २०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.१८६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर मान्यतेनुसार याकामी सहावे ई-निविदा मागविणेचे वेळेस पात्र तिन ठेकेदारांचे ई-निविदेचा लिफाफा क्र.०२ (Technical bid) उघडणेबाबतचा प्रस्ताव दि.२७ मार्च, २०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.२२४ (७) खलीलप्रमाणे झालेला आहे.

*" ...यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती निवासस्थान समोरील गार्डनमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे) तयार करणेचे काम विभागांतर्गत करून घेण्यात यावे. यासाठी आवश्यक त्याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी तसेच प्रस्तावीत निविदाप्रक्रीया रद्द करणेत यावीअशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. "*

विषयांकीत कामासाठी जे.सी.बी. यंत्राने खोदाई करणे, दगड वाहतुक, मुरुम वाहतुक करणे, सोलींग व रोलींग करणे इत्यादि कामे करावयाची आहेत. त्यासाठी मशिनरी व वाहनांची आवश्यकता आहे. मशिनरी भाडोत्री घेणे तसेच पेव्हींग ब्लॉक व इतर मटेरीयल खरेदीसाठी वगेवेगळे कोटेशन / ई-निविदा मागवाव्या लागतील. त्यामुळे पेव्हिंग ब्लॉक बसविणेसह संपूर्ण कामासाठी एकत्रित ई-निविदा मागविणे योग्य राहील असे मत आहे.

प्रस्ताव: तरी विषयांकीत कामासाठी मटेरीअल खरेदी, मशिनरी भाडेतत्वावर घेणे व मजुरीसाठी कोटेशन मागविणे ऐवजी संपुर्ण काम ठेकेदारांकडून करून घेणेसाठी एकत्रित ईनिविदा मागविणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती निवासस्थान समोरील गार्डनमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणेचे काम प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे बाहेरील ठेकेदाराकडून करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१०२** **शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता ज्युनियर के.जी.प्रवेश वाढ करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – मा.व्य.समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५०**

**प्रास्ताविक–**श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ ज्यु. केजी प्रवेशासाठी समिती ठरविण्यात आली होती. समिती अंतर्गत ठरविलेले नियम व वयोमर्यादा ४.०० ते ४.९ अशी ठेवण्यात आली होती त्यानुसार खालीलप्रमाणे एकूण १९५ प्रवेश अर्ज पात्र ठरविण्यात आले होते .

**उपरोक्त नियमात बसलेल्या प्रवेश अर्जांमधून खालीलप्रमाणे प्रवेश देण्यात आलेले आहे.**

| अ.न. | प्रवेशासाठी एकूण पात्र ठरलेले | नियमात बसलेले एकूण प्रवेश अर्ज | पैकी निश्चित प्रवेश झालेले |
|---|---|---|---|
| १ | कायम कर्मचारी पाल्य | ०८ | ०७ |
| २ | कंत्राटी / आऊटसोर्स.कर्मचारी पाल्य | ८६ | ८० |
| ३ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रहिवाशी पाल्य | १०१ | ८८ |
| | **एकुण** | **१९५** | **१७५** |

उपरोक्त नियमात बसलेल्या १९५ प्रवेश अर्जपैंकी १७४ पालकांनी आपल्या पाल्याचा दि.३०.०५.२०१७ अखेर प्रवेश निश्चित केलेला आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णय नुसार एकूण २०० प्रवेश द्यावयाचे ठरलेले असल्याने दि. २६.०५.२०१७ व दि. ३१.०५.२०१७ रोजी मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचेशी झालेल्या चर्चेनुसार उर्वरीत प्रवेशासाठी खालीलप्रमाणे एकूण २६ पाल्यांचा ज्यु. केजी च्या प्रवेश यादीत समावेश करण्यात यावा असे ठरले.

| अ.न. | प्रवेशासाठी एकूण पात्र ठरलेले | नियमात बसलेले एकूण प्रवेश अर्ज | पैकी निश्चित प्रवेश झालेले |
|---|---|---|---|
| १ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील भाडेकरु तत्वावर असलेले रहिवाशी पाल्य | **१०** | ९ |
| २ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रहिवाशी पाल्य | **०१** | |
| ३ | सरकारी सेवेत कार्यरत असलेले परंतू बदली झालेले कर्मचारी पाल्य | **०३** | |
| ४ | कंत्राटी/ आऊटसोर्स. कर्मचारी पाल्य (वयोमर्यादा ०४.१० ते ०४.११) | **०४** | ०३ |
| ५ | उच्चतम वयोमर्यादा पाल्य (वयोमर्यादा ०४.१०) नगरपंचायत हद्द (मुले व मुली) | **०४** | ०३ |
| ६ | उच्चतम वयोमर्यादा पाल्य (वयोमर्यादा ०४.११) नगरपंचायत हद्द **फक्त मुली** | **०३** | ०१ |
| | **एकूण संख्या** | **२५** | **१६** |

**मागणी:-** उपरोक्त ज्यु. केजी एकूण १९१ प्रवेश झाले. परिसरातील पालकांची प्रवेशासाठी मागणी लक्षात घेता, मा. अध्यक्ष आणि मा. कार्यकारी महोदया यांचेशी दि. १६.०६.२०१७ रोजी समक्ष झालेल्या चर्चेनुसार वयात बसलेले परंतु नगर पंचायत हद्दी बाहेरील असलेले ६३ पाल्यांना प्रवेश देणेत यावा. ज्यु. केजीसाठी अंदाजे एकूण २५० पर्यंत प्रवेश करण्यात यावे. ज्यु. केजीच्या एकूण ०५ वर्ग तुकडी करण्यात येऊन प्रत्येक वर्ग तुकडीत किमान ५० ते ५२ विद्यार्थी पटसंख्या करण्यात यावी, असे ठरले.

**विभागाचा अभिप्राय:-** तरी चर्चेअंती ठरल्याप्रमाणे ज्यु. के.जी. करीता प्रवेश संख्या वाढ करणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.६२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दरम्यानचे कालावधीमध्ये तातडीची गरज म्हणून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता ज्युनियर के.जी.प्रवेशामध्ये वाढ करणेत आलेली आहे, त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.१०३** **श्री साईनाथ रुग्णालय इमारतीकडील वाढीव मजल्याचे विद्युतविषयक कामासाठी येणाऱ्या सुधारीत एकत्रित खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:- (क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** सर्व्हे नं.१४८ पै. मधील धर्मशाळा क्र.०१ व ०२ इमारतींमध्ये श्री साईनाथ रुग्णालय सन २००३ मध्ये सुरु करण्यात आलेले आहे. श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालया मध्ये रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत असल्यामुळे मुलभूत सोयी सुविधा कमी पडत आहेत . याकरीता धर्मशाळा क्र.०१ व ०२ या इमारतींवर श्री साईनाथ हॉस्पीटल करीता तिस-या मजल्याचे बांधकाम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

धर्मशाळा क्र.०१ व ०२ या इमारतींवर तिस-या मजल्याचे बांधकाम केले जाणार असल्याने सदरील ठिकाणी विद्युतीकरणाचे काम कराव लागणार आहे. या होणा-या नवीन बांधकामामधील विद्युतीकरण कामाकरीता बांधकाम विभागामार्फत इमारतीच्या बांधकामाच्या इस्टीमेटच्या रकमेवर रु. ४,५४,३५,७६७/- अंदाजे १० % इतकी रक्कम रु. ४५,४३,५७७/- विद्युतीकरणाकरीता गृहीत धरण्यात आली होती. सदर प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीसमोर मांडण्यात आला होता. व या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२५-०२-२०१७ रोजीच्या झालेल्या सभेतील निर्णय क्र.३८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्या मंजूर १० % रकमेच्या अनुषंगाने बांधकाम विभागामार्फत या इमारतीकरीता नेमण्यात आलेले आर्किटेक्ट/ कन्सल्टंट यांनी विद्युतीकरण कामामधील खालील काही ठराविक कामांचाच समावेश केलेला होता (मंजूर रकमेपेक्षा कन्सल्टंट यांनी खालीलप्रमाणे कळविलेले इस्टीमेट रु १००३१.०९ ने कमी होते.)

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | वायरींग व डिस्ट्रीब्युशन बोर्ड | रु. २६,६०,६०१.२१ |
| २ | अर्थिंग | रु. ०६,८९,५२६.३० |
| ३ | एम.व्ही.पॅनेल | रु. ११,८३,४१८.४० |
| | **एकुण रक्कम :-** | **रु. ४५,३३,५४५.९१** |

परंतू उपरोक्त कामांमध्ये खोल्यांमधून/ रुममधून बसवाव्या लागणा-या लाईट/ टयुब/ फॅन यांचा समावेश करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे इमारत बांधून झाल्यानंतर व बांधकाम विभागाने कळविलेल्या व त्यानुसार मंजूर झालेल्या १० % इस्टीमेटमधील उपरोक्त कामानंतर फॅन / टयुबकरीता वेगळे टेंडर काढावे लागले असते. बांधकाम पुर्ण झाल्यानंतर त्याठिकाणी बसविण्यात येणऱ्या रुग्णालयाच्या नविन उपकरणांना तसेच प्रकाशव्यवस्थेकरीता वीजपुरवठा करणेकरीता त्या परीसरातील जनरेटर रुमपासून पॅनेलपर्यंत वीजवाहिन्या (केबलचा) टाकणे कामाचा समावेश करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर या पॅनेलला सप्लाय देणेकरीता केबलसाठी पुन्हा नवीन टेंडर काढावे लागणार होते.

**मागणी:-** त्यामुळे इमारत बांधकाम होतानाच विद्युतीकरणाचे काम परिपुर्ण होणेसाठी बांधकाम विभागाकडून नेमणूक करण्यात आलेले आर्किटेक्ट / कन्सल्टंट मे.निकम पाटील यांचेकडून वरील सर्व कामाचे एकत्रित इस्टिमेट मागविण्यात आले होते ते खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **तपशील** | **रक्कम** |
|---|---|---|
| १ | वायरींग ॲण्ड डिस्ट्रीब्युशन बोर्ड | रु. २६,६०,६०१.२१ |
| २ | अर्थिंग | रु. ०६,८९,५२६.३० |
| ३ | एम.व्ही.पॅनेल | रु. ११,८३,४१८.४० |
| ४ | फॅन ॲण्ड फिटींग्ज | रु. १४,०१,८०२.४४ |
| ५ | लाईटनिंग अरेस्टर | रु. ०३,७५,९००.०० |
| ६ | अंडरग्राऊंड केबल | रु. ४०,०२,९४६.०० |
| | **एकुण रक्कम :-** | **रु. १,०३,१४,१९४.३५** |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** यापुर्वी दिनांक २५-०२-२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३८ नुसार विद्युतीकरण कामाकरीता रक्कम रुपये ४५,४३,५७७/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. परंतू सुधारीत एकत्रित सर्व खर्चाची रक्कम रुपये १,०३,१४,१९४/- मात्र होत आहे. श्री साईनाथ रुग्णालय इमारतीवरील वाढीव मजल्याचे विद्युतीकरण कामासाठी येणा-या रक्कम रुपये १,०३,१४,१९४/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेसाठी तसेच विद्युत ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी मराठीतील व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.६२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालय इमारतीकडील वाढीव मजल्याचे विद्युतविषयक काम करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी सुधारीत एकत्रित येणाऱ्या रु.१,०३,१४,१९४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०४** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील नादुरुस्त जुना म्युझीकल कारंजा (Buy Back) करुन नवीन म्युझीकल कारंजा खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-(१) अन्वये समितीकडुन विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे श्री साईभक्तांचे मनोरंजनासाठी आतील बाजूस असलेल्या बगीचामध्ये बांधकाम विभागामार्फत दि.०९/०६/२००० रोजी रक्कम रु.५,६८,०००/- किमतींचा म्युझीकल कारंजा खरेदी करुन बसविणेत आलेला होता.तदनंतर सदरचा म्युझीकल कारंजा हा बांधकाम विभागाने ध्वनिक्षेपण विभागाकडे वर्ग केलेला होता. सदरहू, म्युझीकल कारंजास सुमारे १७ वर्ष झालेले असुन,सततच्या वापरामुळे कारंजा हा नादुरुस्त झालेला आहे.सदरचा कारंजा हा फारच जुना असल्याने या म्युझीकल कारंजाचे स्पेअर्स सध्यस्थितीत मार्केटमध्ये उपलब्ध नाहीत. त्यामुळे कारंजा ऑपरेट करतांना दिवसेंदिवस असंख्य अडचणी येत आहेत. सद्यस्थितीत कारंजाची घसारा वजा जाता किमंत ही रु.३५,८४८.४२/- मात्र इतकी आहे.

सन २०१८ मध्ये श्री साईबाबांचे समाधी शताब्दी महोत्सव असल्याने लाखो श्री साईभक्त शिर्डी मध्ये श्रीसाईचे दर्शनासाठी येणार असल्याने, त्यांचे मनोरंजनासाठी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे असलेल्या नादुरुस्त म्युझीकल कारंजाचे ठिकाणी नविन म्युझीकल कारंजा बसविणे आवश्यक आहे.सदरचे ठिकाणी म्युझीकल कारंजा बसविल्यास श्री साईबाबांचे समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने श्री साईभक्त शिर्डी मध्ये श्रीसाईचे दर्शनासाठी आलेनंतर त्यांचे मनोरंजन होणेकामी मदत होणार आहे.सदरकामी Royal World Class Fountain, Ahmedabad या कंपनीचे प्रतिनिधी साईभक्त श्री.सतिष औताडे यांनी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील सध्यस्थितीत कार्यरत असलेल्या म्युझीकल कारंजाची प्रत्यक्ष पाहणी करुन

सदरहु कारंजाचे सिव्हिल वर्क (पाण्याचा हौद) आहे तसाच ठेऊन त्यामध्ये नविन कारंजा बसविण्यासाठी खालील तपशिलातील साहित्य खरेदी करणे आवश्यक असून, त्याकरीता अंदाजे रक्कम रुपये २८,१७,०३२/- खर्च अपेक्षित असल्याचे त्यांनी दि.०८/०७/२०१७ रोजीचे ई- मेलव्दारे कळविले आहे.

| | **PARTICULARS** | **UNIT PRICE/ LABOUR** | **QNTY** | **AMOUNT** |
|---|---|---|---|---|
| | MDF FOUNTAIN WITH 16 CREATOPMS | | | |
| 1 | 1/4 Brass Nozzles | 265.00 | 30 | 7,950.00 |
| 2 | Center Jet | 9,500.00 | 1 | 9,500.00 |
| 3 | Revolving Nozzles | 8,300.00 | 4 | 33,200.00 |
| 4 | Vulcan Brass Nozzles | 3,200.00 | 4 | 12,800.00 |
| 5 | Arch Jet Nozzles | 2,100.00 | 4 | 8,400.00 |
| 6 | Foam Nozzles | 4,000.00 | 4 | 16,000.00 |
| 7 | Height Adjusting Valve PVC Ball Type 1" | 1,200.00 | 14 | 16,800.00 |
| 8 | Ring Supporting Stand MS | 750.00 | 7 | 5,250.00 |
| 9 | Sound Speaker Box JBL | 45,000.00 | 4 | 1,80,000.00 |
| 10 | Filter Grill PVC | 1,500.00 | 6 | 9,000.00 |
| 11 | Fully Automatic Electronic Control Unit | 12,25,400.00 | 1 | 12,25,400.00 |
| 12 | RGB Led Light SS Stainless Steel | 3,200.00 | 20 | 64,000.00 |
| 13 | All Pipe are use only PVC ISI 1.5" | 350.00 | 100 | 35,000.00 |
| 14 | Electrical Wiring Fountain to Control Panel | 76,000.00 | 1 | 76,000.00 |
| 15 | Outdoor Speaker WaterProof Box | 15,000.00 | 4 | 60,000.00 |
| 16 | Revolving Mechanism Center Jet | 11,000.00 | 1 | 11,000.00 |
| 17 | G.I. Pipe for 3' Ring 1.5" 'B' Class | 9,000.00 | | 9,000.00 |
| 18 | Submersible Pump 1.5 H.P. | 11,000.00 | 2 | 22,000.00 |
| 19 | Submersible Pump 2 H.P. | 13,000.00 | 4 | 52,000.00 |
| 20 | Electrical 1.5 four Core Inside the fountain tank | 8,000.00 | 1 | 8,000.00 |
| 21 | Fountain Assembly Fabricate material | 18,000.00 | 1 | 18,000.00 |
| 22 | Fountain Manufacture Labour | 50,000.00 | 1 | 50,000.00 |
| 23 | Amplifier 1000 Watt JBL | 75,000.00 | 1 | 75,000.00 |
| 24 | Packing And Forwarding | 40,000.00 | 1 | 40,000.00 |
| 25 | Electrical Pipe for inside fountain tank wiring 1/2" | 9,000.00 | 1 | 9,000.00 |
| 26 | Color | 10,500.00 | 1 | 10,500.00 |
| 27 | Ball Joint | 7,200.00 | 5 | 36,000.00 |
| 28 | N.R.V Valve PVC | 2,600.00 | 6 | 15,600.00 |
| 29 | Missellinious Material Elbow,tee,coupling etc., | 19,000.00 | 1 | 19,000.00 |
| NB | All any other applicable Taxes, Transit, Lodging –Boarding during the installation will be charged Extra. Against "C" Form only 2 % CST will be charge instead 15% GST | **TOTAL RUPEES** | | 21,34,400.00 |
| | | Installation & Labour | | 85,000.00 |
| | | G.S.T | 28.00% | 5,97,632.00 |
| | | C.S.T. | 0.00% | 0.00 |
| | | Surcharges | | 0.00 |
| | | **GRAND TOTALS Rs.** | | **28,17,032.00** |
| **RUPEES:-** | **Twenty Eight Lakh Seventeen Thousand And Thirty Two Only.** | | | |

तरी, उपरोक्त तपशिलातील नमुद साहित्य खरेदी करणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन याकामी ई-निविदा शासनाचे www.mahatender.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करुन संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत मराठी व इंग्रजीमध्ये मुंबई व पुणे येथुन प्रकाशीत होणारे जास्त खपाचे मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर याकामी जाहिरात प्रसिध्द करता येईल.

**मागणी:-** श्री साईबाबांचे समाधी शताब्दी महोत्सवाकरीता लाखो साईभक्त शिर्डी मध्ये श्रीसाईचे दर्शनासाठी येणार असल्याने श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील आतील बाजूस असलेल्या बगीचामध्ये श्री साईभक्तांचे मनोरंजनासाठी त्याठिकाणी असलेला सद्यस्थितीतील नादुरुस्त म्युझीकल कारंजा पुरवठादारास परत (Buy Back) करुन त्याऐवजी नविनम्युझीकल कारंजा बसविणेकामी प्रस्तावात नमुद केलेले साहित्य खरेदी करणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन याकामी ई-निविदा शासनाचे www.mahatender.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द तसेच संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत मराठी व

इंग्रजीमध्ये मुंबई व पुणे येथुन प्रकाशीत होणारे जास्त खपाचे मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर याकामी जाहिरात प्रसिध्द करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश, तांत्रिक ,कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक,आर्थिकव प्रशासकिय.

**विभागाचा अभिप्राय:-** उपरोक्त प्रस्तावात व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये २८,१७,०३२/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील नादुरुस्त जुना म्युझीकल कारंजा (Buy Back) करुन नवीन म्युझीकल कारंजा खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२८,१७,०३२/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- ध्वनिक्षेपण व टेलीफोन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीत भारतात व परदेशात श्री साई पादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमांचे आयोजन करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड)श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय –**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८ एप्रिल, २०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.२८० खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

*"श्रींचे समाधी शताब्दी महोत्सवामधील कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरूप ठरविणेकामी शताब्दी कक्ष या विभागाने तयार केलेले सादरीकरण सभेमध्ये दाखविणेत आले. परंतु वेळेअभावी सादरीकरणावर चर्चा होऊ शकली नाही. याकरीता सदरहू सादरीकरणाच्या छायांकित प्रती सर्व मा.समिती सदस्यांना पुरविणेत याव्यात व समिती सदस्यांनी आपले सूचना वजा अभिप्राय पुढील सभेपर्यंत शताब्दी कक्षास कळवावे, असे ठरले. याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की,जे सर्वसामान्य साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश –विदेशामध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात. यासाठी जी साईमंदिरे बाबांच्या पादुकांची मागणी करतील, त्यांची योग्य ती चौकशी व खातरजमा करुन, त्यांनाही चांदीच्या पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. या पादुकांसोबत संस्थानची दक्षिणा पेटी व देणगी पावती पुस्तक ठेवण्यात यावे. मंदिर विभागाने या संबंधीची नियमावली तयार करावी व समाधी शताब्दी वर्षातील मुळ पादुका दर्शन सोहळयाची सुरुवात आंध्रप्रदेश राज्यातील विजयवाडा येथून करणेत यावी. या ठिकाणी श्रींच्या भक्तांची संख्या जास्त प्रमाणात आहे. तसेच समाधी शताब्दी वर्षामध्ये आयोजित कार्यक्रमांमधील भजन/किर्तन/प्रवचन या प्रकारचे कार्यक्रम मंदिराचे उत्तरेस सरंजाम बागेत ठेवावेत व मोठया स्वरुपाच्या कार्यक्रमांसाठी जागेची निश्चिती करावी".*

*२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.*

*शताब्दी वर्षाचे प्रत्येक महिन्यात पादुका दर्शन कार्यक्रम आयोजित करावा. पादुका दर्शन सोहळयासाठी सर्व सोयीयुक्त संस्थान वाहन तयार करुन घेण्यात यावे. या कार्यक्रमाचे नियोजन व खर्च त्या त्या राज्यातील दानशूर साईभक्तांमार्फत किंवा मंदिरामार्फत करणेत यावे. तसेच देश- विदेशातील पादुका दर्शनासाठी दोन पादुकांचा सेटचा वापर करणेत यावा. तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेत यावा.*

**प्रस्तावना–** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन झालेल्या निर्णय क्रमांक १७१ नुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्ताने दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते ३१ऑक्टोंबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे, असे ठरले आहे.

त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला असता त्यावर निर्णय क्रं. २८० नुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाच्या प्रचार प्रसारासाठी तसेच जे सर्वसामान्य साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश विदेशांमध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात, असे ठरले आहे.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षाच्या प्रचार प्रसारासाठी महाराष्ट्रासह देशाच्या विविध राज्यांत तसेच विदेशातील काही महत्वाच्या शहरांमध्ये श्री साई पादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमाचे आयोजन व याकामी आयोजकांनी करावयाची व्यवस्था व त्याकामी येणा-या खर्चासह ठेवलेल्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ व दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे देशातील विविध राज्यांत तसेच विदेशातील काही महत्वांच्या शहरांमध्ये साईभजन संध्या व पादुका दर्शन आयोजीत करणेचे नियोजन केलेले आहे.

**अ) <u>देशातील विविध राज्यात आयोजीत करावयाचे पादुका दर्शन व साईभजन संध्याकार्यक्रमाचे वार्षिक वेळापत्रक-</u>**

| दिनांक | वार | राजधानी शहर | राज्यांचे नाव |
|---|---|---|---|
| १०/१०/२०१७ ते ११/१०/२०१७ | मंगळवार–बुधवार | विजयवाडा | आंध्रप्रदेश |
| १२/१०/२०१७ ते १३/१०/२०१७ | शुक्रवार – शनिवार | हैद्राबाद | तेलंगणा |
| १८/१०/२०१७ ते १९/१०/२०१७ | बुधवार –गुरुवार | बेंगलोर | कर्नाटक |
| २१/१०/२००७ ते २२/१०/२००७ | शनिवार-रविवार | पणजी | गोवा |
| २८/१०/२०१७ | शनिवार | सेलवासा | दादरा-नगर-हवेली |
| २९/१०/२००७ | रविवार | दमण | दिव-दमण |
| १६/११/२०१७ | गुरुवार | त्रिवेंद्रम | केरळ |
| १९/११/२०१७ | रविवार | कोइम्बतुर | तामिळनाडू |
| २१/११/२०१७ | मंगळवार | पॉन्डेचरी | पॉन्डेचरी |
| २३/११/२०१७ ते २४/११/२०१७ | गुरूवार- रविवार | चैन्नई | तामिळनाडू |
| २६/११/२०१७ | रविवार | पोर्ट-ब्लेअर | अंदमान-निकोबार |
| ०६/१२/२०१७ ते०७/१२/२०१७ | बुधवार- गुरुवार | सुरत | गुजरात |
| ०९/१२/२०१७ ते १०/१२/२०१७ | शनिवार- रविवार | अहमदाबाद | गुजरात |
| २१/०१/२०१८ | रविवार | फरीदाबाद | हरीयाणा |
| २२/०१/२०१८ | सोमवार | गाझीयाबाद | उत्तरप्रदेश |
| २३/०१/२०१८ | मंगळवार | गुडगांव | हरीयाणा |
| २४/०१/२०१८ ते २५/०१/२०१८ | बुधवार-गुरूवार | दिल्ली | दिल्ली |
| २७/०१/२०१८ ते २८/०१/२०१८ | शनिवार- रविवार | मुंबई | महाराष्ट्र |
| ३०/०१/२०१८ | मंगळवार | पुणे | महाराष्ट्र |

| | | | |
|---|---|---|---|
| ०८/०२/२०१८ | गुरूवार | इंदौर | मध्यप्रदेश |
| ०९/०२/२०१८ | शुक्रवार | उजैज्न | मध्यप्रदेश |
| ११/०२/२०१८ | रविवार | भोपाळ | मध्यप्रदेश |
| १४/०२/२०१८ ते १५/०२/२०१८ | बुधवार-गुरूवार | रायपुर | छत्तीसगड |
| १८/०२/२०१८ | रविवार | भुवनेश्वर | ओरीसा |
| ०३/०३/२०१८ ते ०४/०३/२०१८ | शनिवार- रविवार | जयपूर | राजस्थान |
| १४/०४/२०१८ ते १५/०४/२०१८ | शनिवार- रविवार | चंदीगड | पंजाब |
| १६/०४/२०१८ | सोमवार | अमृतसर | पंजाब |
| १९/०४/२०१८ | गुरूवार | सिमला | हिमाचलप्रदेश |
| २१/०४/२०१८ ते २२/०४/२०१८ | शनिवार- रविवार | देहरादून | उत्तराखंड |
| ११/०५/२०१८ ते १८/०५/२०१८ | शुक्रवार-शुक्रवार | उत्तर पूर्व राज्य | उत्तर पूर्व राज्य |
| ०१/०६/२०१८ ते ०२/०६/२०१८ | शुक्रवार-शनिवार | लखनौ | उत्तरप्रदेश |
| ०५/०६/२०१८ | मंगळवार | पटणा | बिहार |
| ०८/०६/२०१८ | शुक्रवार | कोलकत्ता | पश्चिमबंगाल |
| १०/०६/२०१८ | रविवार | रांची | झारखंड |

**ब) विदेशात साईभजन संध्या व पादुका दर्शन-**

| **दिनांक** | **वार** | **देशाचे नाव** | **एकूण दिवस** |
|---|---|---|---|
| २३/०६/२०१८ ते ३०/०६/२०१८ | शनिवार ते रविवार | यु. ए. ई. (दुबई) | ०८ दिवस |
| ०१/०७/२००८ ते २५/०७/२०१८ | रविवार ते मंगळवार | लंडन | १० दिवस |
| १८/०७/२०१८ ते २२/०७/२०१८ | बुधवार ते बुधवार | सिंगापूर, हॉगकॉग, मलेशिया, इंडोनेशिया, बाली, बॅंकाक | ०५ दिवस |
| ०१/०८/२०१८ ते ११/०८/२०१८ | बुधवार ते शनिवार | अमेरीका, कॅनडा | १० दिवस |
| ०४/०९/२०१८ ते १२/०९/२०१८ | मंगळवार ते बुधवार | जर्मनी, स्विझर्लंड | ०९ दिवस |
| १५/०९/२०१८ ते ३०/०९/२०१८ | शनिवार ते रविवार | ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड | १५ दिवस |
| ०१/१०/२०१८ ते ०५/१०/२०१८ | सोमवार ते शुक्रवार | जपान, हॉगकॉग | ०५ दिवस |

**बाहेरील राज्यातील स्थानिक आयोजकांनी कार्यक्रमाचे ठिकाणी करावयाची व्यवस्था**

| **अ.नं.** | **तपशिल** | |
|---|---|---|
| १) | **कार्यक्रमासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जागा उपलब्ध करावी. (मैदान किंवा स्टेडीयम)** | |
| | १) पादुका दर्शन कार्यक्रमासाठी स्टेज | २) दर्शन रांगेसाठी रेलींग व रांगेतील भक्तांना प्रसाद वाटप |
| | ३) भजन संध्या कार्यक्रमासाठी स्टेज | ४) दर्शकांची बैठक व्यवस्था |
| | ५) महाप्रसाद त्याकरीता आवश्यक बैठक व्यवस्था | ६) दर्शनार्थी भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था |
| | ७) संस्थान प्रकाशनांसाठी स्टॉल | ८) भक्तांसाठी खाद्यपदार्थांचे स्टॉल |
| | ९) जागोजागी डस्टबिनची व्यवस्था | १०) स्टेजवर लाईट फॅन व्यवस्था |
| | ११) स्टेज डेकोरेशन | १२) आमंत्रीत मान्यवंराचा सत्कार व्यवस्था |
| २) | मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी, इतर वरीष्ठ अधिकारी व कर्मचारी वृंदांसाठी निवासव्यवस्था. | |
| ३) | श्रींच्या पादुकांसाठी सुरक्षित जागा. | |
| ४) | सुरक्षा रक्षकांची नेमणूक | |
| ५) | वाहन व्यवस्था | |
| | १. विमानतळापासून निवासव्यवस्थेपर्यंत मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त व मा. कार्यकारी अधिकारी यांचेकरीता वाहनव्यवस्था | |
| | २. रेल्वे स्टेशन ते निवासव्यवस्थेपर्यंत कर्मचारी वर्गासाठीवाहनव्यवस्था | |
| | ३. श्रींचे पादुकांसाठी सुरक्षारक्षकांसहीत तीन वाहने. मधल्या वाहनामध्ये श्रींच्या पादुका असतील व पुढे-मागे सुरक्षा | |

| | |
|---|---|
| | वाहन |
| | ४. श्रींच्या पादुका मिरवणूकसाठी चित्ररथ व्यवस्था तसेचदुचाकी-चारचाकी गाडया |
| ६) | पोलीस प्रशासन परवानगी व बंदोबस्त |
| ७) | स्थानिक आमदार, खासदार, मंत्री, नेतेमंडळी व ज्येष्ठ कलाकारांनानिमंत्रण |
| ८) | नगरपालिका किंवा तत्सम कार्यालयाची परवानगी |

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२३/०५/२०१७ रोजीच्या सभेत,"ज्या राज्यातील साईभक्त साईभजन संध्या व पादुका दर्शन कार्यक्रमाचा सर्व खर्च स्वतः करणार आहेत अशाच ठिकाणी सदर कार्यक्रमाचे आयोजन करावे, अशी चर्चा झालेली आहे. आता खालील नमूद साईभक्तांनी पादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रम घेणेबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. त्यातील ब-याचशा भक्तांनी कार्यक्रमाचा संपूर्ण स्वतः करणार असलेबाबत कळविले आहे त्याची माहिती खालीलप्रमाणे-

१) **अहमदाबाद (गुजरात) -** श्री गिरीष पटेल, मॅनेजिंग ट्रस्टी, श्री शिर्डी साईबाबा समाज सेवा संस्थान, यांचे दि.२५/०८/२०१६ रोजीचे पत्र.
२) **पॉन्डेचरी-** श्री मानिकनंदन, इंटरनॅशनल शिर्डी साई बाबा डिव्होटिज ट्रस्ट पॉन्डेचरी यांचे दि. ०९/०२/२०१७ रोजीचे पत्र.
३) **चैन्नई (तामिळनाडू)–**शिर्डी साईबाबा डिव्होटिज ट्रस्ट, चेन्नई यांचे दि. २३/०३/२०१७ रोजीचे पत्र.
४) **भोपाळ(मध्यप्रदेश)–** शिर्डी साई धाम धमार्थ संस्था, भोपाल यांचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे पत्र.
५) **कोईम्बतूर(तामिळनाडू)–** श्री निरुपा श्रीराम, शिर्डी साईबाबा डिव्होटिज, कोईम्बतूर यांचे दि.०८/०५/२०१७ रोजीचे पत्र.
६) **सुरत (गुजरात)-** श्री हिमांशू पाठक, साई विश्व आणि समस्त सुरत साईभक्त मंडळी यांचा दि ०८/०५/२०१७ रोजीचा ईमेल.
७) **पुणे –पिंपळे निलख(महाराष्ट्र)-** श्री तुषार ग. कामठे, नगरसेवक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, यांचे दि.१३/०५/२०१७ रोजीचे पत्र.
८) **कोतवडे रत्नागिरी(महाराष्ट्र) –**श्री आत्माराम सहस्त्रबुध्दे व श्री शदर वारेकर, श्रध्दा तथा सबुरी श्री साई मंदिर यांचे दिनांक नसलेले पत्र
९) **नवी दिल्ली-** श्री दिपक बांगा, श्री साई पालनहार ट्रस्ट नवी दिल्ली यांचे दि. १८/०६/२०१७ रोजीचे पत्र.
१०) **नेल्लोर (आंध्रप्रदेश)–** श्री साई मनी, श्री शिर्डी साई बाबा मंदिर, आकमपेट, नेल्लोर यांचे दि. १९/०६/२०१७ रोजीचे पत्र.
११) **गोवा-** गोवा प्रदेश श्री साईबाबा पादुका दर्शन सोहळा समिती, पणजी, गोवा यांचे दि.२१/०६/२०१७ रोजीचे पत्र.
१२) **सिल्व्हासा(दमण) -** श्रीमती तृप्ती हेमांशू पटेल, सेलवास, यांचे दि.१८/०६/२०१७ रोजीचे पत्र.
१३) **कोटा रायपूर (छत्तीसगढ)–** श्री एस सुर्यप्रकाश राव, कोटा रायपूर छत्तीसगड यांचा दि. २६/०६/२०१७ रोजीचा ई- मेल.
१४) **करूर (तामिळनाडू)–**शिर्डी साई चॅरिटेबल ट्रस्ट करुर, यांचा दि.२७/०६/२०१७ रोजीचा ई –मेल.
१५) **टिटागढ कलकत्ता (वेस्ट बंगाल) -** श्री साई बाबा सत्संगम, यांचा दि. २६/०६/२०१७ रोजीचा ई-मेल.
१६) **पूणे (महाराष्ट्र)** – श्री साईबाबा पालखी सोहळा समिती पूणे यांचे दि२८/०६/२०१७ रोजीचा ई-मेल.
१७) **जयपूर (राजस्थान) –**श्री शिर्डी साईनाथ सामाजिक विकास समिती, यांचे पत्र
१८) **इन्दौर (मध्यप्रदेश) –**श्री इन्दौर शहर साई भक्त सेवा समिती, इन्दौर, मध्यप्रदेश यांचे पत्र.
१९) **थिरुवन्नामलई (तामिळनाडू) -** साईबाबा फाऊंडेशन यांचे पत्र.
२०) **ओंगल (आंध्रप्रदेश)–** साईबाबा फाऊंडेशन यांचे पत्र.
२१) **थोटावाल्लरु मंडल (आंध्रप्रदेश)-** श्री साई नाथूनी ध्यानमंदिरम बोडापाडू यांचे दि२४/०६/२०१७ रोजीचे पत्र.
२२) **रतलाम (मध्यप्रदेश)-** श्री साईसेवा समिती ट्रस्ट, रतलाम यांचे दि.२९.०६.२०१७ रोजीचे पत्र.
२३) **करजण बडोदा (गुजरात)-** ओम साई नारेश्वर मंदिर करजण यांचा दि २९/०६/२०१७ रोजीचा ईमेल
२४) **सुरत (गुजरात) -** श्री गणेश सेवा ट्रस्ट लिंबायत, सुरत यांचे पत्र.
२५) **टम्पा (अमेरिका)-** सनातन मंदिर टम्पा एफ एल-३३६०२, अमेरीका, यांचे दि.०२/०६/२०१७ रोजीचे पत्र.
२६) **टुमकूर (कर्नाटक)** – श्री शिर्डी साईनाथा सेवा समिती यांचे पत्र.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेकामी दि.०३/०६/२०१७ रोजी प्रशासकीय अधिकारी व विभाग प्रमुख यांचे समवेत झालेल्या बैठकीत मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांनी पादुका दर्शन कार्यक्रमासाठी ज्यांचे प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झाले आहेत अशांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन संबंधितांना पत्र पाठविणेस तसेच येथून पुढे येणा-या प्रस्तावाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार कार्यवाही करणेस मान्यता असावी.

तत्पुर्वी मा.कार्यकारी महोदया यांचे निर्देशानुसार पुढील कार्यवाही करणेसाठी शताब्दीवर्ष सुरु होण्याचा कालावधी विचारात घेता उपरोक्त नमूद प्राप्त झालेल्या प्रस्तावातील जी संस्था किवां साईभक्त पादुका दर्शन कार्यक्रम घेण्यास आर्थिक व इतर दृष्टया सक्षम आहेत किंवा नाही हे पाहण्यासाठी मा. विश्वस्त यांची समिती किंवा मा. विश्वस्त व संस्थानचे संबंधीत अधिकारी यांची समिती यापैकी कोणत्याही एका समितीची तातडीने निवड करुन सदर समितीकडे हे काम सोपविता येईल.

तरी उपरोक्त नमूद बाबींवर निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.६२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीत भारतात व परदेशात श्री साई पादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमाचा पहिल्या ०३ (ऑक्टोबर ते डिसेंबर- २०१७) महिन्यांसाठीचे कार्यक्रम निश्चित करुन पुढील सभेसमोर सादर करणेत यावे. या प्रस्तावामध्ये श्रींच्या पादुका दर्शनासाठी ज्या ठिकाणी घेऊन जावयाच्या आहेत, तेथील संबंधीतांचे फोन नंबर्स व पुर्ण पत्त्याचा उल्लेख करणेत यावा. त्याप्रमाणे पादुका सोहळयासाठी सर्व ठिकाणी मुळ पादुका पाठवू नयेत. मागणी करणाऱ्या संस्थेची क्षमता पाहूनच पादुका दर्शनासाठी पाठविणेत याव्यात. सदरहू पादुका दर्शन सोहळयासाठी पाठविणेकामी महाराष्ट्रासाठी एक व महाराष्ट्राबाहेरील राज्यांसाठी एक अशी दोन वाहनांची व्यवस्था करणेत यावी. तसेच विदेशामधील पादुका दर्शन सोहळयासाठी, चांदीच्या पादुका पाठविणेत याव्यात.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.१०६** **श्री साईबाबा संस्थानमध्ये साईसेवक योजनेकरीता साईसेवक नियमावलीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीने श्री साईबाबा संस्थान मध्ये श्री क्षेत्र गजानन महाराज देवस्थान, शेगाव येथील सेवेक-याच्या धर्तीवर साई पालखी मंडळाचे पदयात्री सभासद यांचे करीता, मोफत साई सेवक उपक्रम राबविणेचा निर्णय घेतलेला आहे. तरी सदर "साई सेवक" योजनेमध्ये २० पालखी सभासद मिळून १ गट प्रमुख असे २१ साई सेवकांचा गट तयार करुन, त्यांना वर्षातुन ७ दिवस संस्थान परिसरामध्ये सदरचे योजने अंतर्गत विनामुल्य सेवा करण्याची संधी देण्यात येईल.

साई पालखींच्या सभासदांना स्वखुशीने श्री साईबाबा संस्थानमध्ये विना मुल्य सेवा दयावयाची असल्यास, त्यांना संस्थानमध्ये **"साई सेवक"** म्हणून विना मूल्य सेवा उपलब्ध करुन देता येईल. त्या कामी संबंधीत पालखी मंडळांनी त्यांचे वैयक्तीक माहिती सह कामगार विभागाकडे ५७० आता पर्यंत पालख्यांची साई सेवेसाठी रजिष्ट्रेशन केलेले आहे. त्यापैकी ५२० पालखी गटांना **"साई सेवक"** म्हणून विनामूल्य सेवा करणेची संधी देणेत येईल. उर्वरीत गटांना प्रतिक्षा यादीवर ठेवणेत येईल. व त्यांना आवश्यकतेप्रमाणे सेवेची संधी देणेत येईल.

**<u>* साई सेवक योजनेचे स्वरुप -</u>**

**"साई सेवक"** योजनेमध्ये विविध पालखी मंडळे, विविध साई मंदिरांच्या साई सेवकांचा २१ व्यक्तींचा ०१ गट तयार करण्यात आला असून रविवार ते शनिवार ०१ गट काम करेल असे एका आठवडयात सकाळी ६ ते दुपारी २ व दुपारी २ ते रात्री १० यावेळेत प्रत्येकी ५ याप्रमाणे १० गटातून २१० साई सेवक आठवडाभर सेवा देतील. तसेच एका पालखी मंडळाला एकापेक्षा अधिक गटांची नोंदणी करता येणार आहे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत अशा गटांना संस्थानच्याविविध ठिकाणी सेवेची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार असून काही गटांना वर्षातून एका पेक्षा जास्त वेळा सेवेची इच्छा असेल तर त्यांना वर्षातून एका पेक्षा जास्त वेळेस सलग ०७ दिवस सेवेची संधी देण्यात येणार आहे. ही योजना २९ जुलै २०१७ पासून सुरु करण्यात येईल. या गटांना प्रथम समाधी मंदिर, साई प्रसादालय, साईबाबा हॉस्पीटल, साईबाबा भक्त निवासस्थान व साई आश्रम भक्तनिवास याठिकाणी तसेच त्यानंतर कॅन्टीन, प्रकाशने, साईप्रसाद निवासस्थान, व्दारावती निवासस्थान, संरक्षण, साईनाथ रुग्णालय इत्यादी ठिकाणी वर्षातून सलग ७ दिवस साई सेवची संधी दिली जाईल.

साई सेवकांना सेवाभावी वृत्तीने भक्तांचा आदर करुन, सन्मान करुन **"ओम साई राम"** म्हणून साईभक्तांच्या आडचणी सोडविण्याचे काम तसेच संस्थान अधिकारी नेमूण देतील ती कामे साई सेवेकांनी करावयाची आहे

दि. १४/०७/२०१७ रोजी अॅड. जे. के. गोंदकर यांचा साईसेवक नियमावलीबाबत अभिप्राय घेवुन सदर साई सेवक नियमावली बरोबर असुन त्यांनी साई सेवक नियमावलीत ३१ ते ४१ नविन काही मुद्दे दिलेले आहे.

**अ) साई सेवकांच्या सेवेचे स्वरुप –**

**"साई सेवक"** योजने अंतर्गत नेमण्यात येणा-या साई सेवकांकडुन खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे साई सेवा करुन घेता यईल.

| **अ.नं** | **विभाग** | **साई सेवकांकडून करवुन घ्यावयाच्या सेवेचे / कामाचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | मंदिर विभाग | गंध लावणे, उदी वाटप, सत्य नारायण व्यवस्था, चावडी, व्दारकामाई नंदा दिप इ. |
| २ | प्रसादलय विभाग | बुफ/प्रसाद व्यवस्था, पाणी वाटणे, मीठ वाटणे इ. |
| ३ | साईबाबा हॉस्पीटल | रुग्ण व नातेवाईकांना मदत व मार्गदर्शन करणे. |
| ४ | साईबाबा भक्तनिवास (५०० रुम | मोफत बस सेवा, लॉन्ड्री, स्टोअर, क्लोक रुम इ. |
| ५ | साईआश्रम निवासस्थान १ | मोफत बस सेवा, माहिती केंद्र, फॉर्म देणेइ. |
| ६ | कॅन्टीन विभाग | मोफत बुंदी प्रसाद, चहा, कॉफी व दुध वाटप केंद्र इ. |
| ७ | प्रकाशने विभाग | बुक स्टॉल विक्री केंद्र, चौकशी काऊंटर व्यवस्था इ. |
| ८ | साईप्रसाद निवासस्थान | पाणी वाटप, चप्पल स्टॅंड इ. |
| ९ | व्दारावती निवासस्थान | माहिती केंद्र, फॉर्म देणे, लिफ्ट ऑपरेटर इ. |
| १० | संरक्षण विभाग | रांगा काढणे, मंदिर, व्दारकामाई,चावडी, शनिगेट, नंदी गेट, अपंग गेट, दर्शन रांगा, मंदिर परिसरइ. |
| ११ | साईनाथ रुग्णालय | रुग्ण व नातेवाईकांना मदत व मार्गदर्शन करणे. |

साई सेवकांना खालील प्रमाणे अटी व शर्तीस अनुसरुन साई सेवक नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी.**

**श्रींचे साई सेवकांकरीता नियमावली**

**साई सेवक नियुक्ती –**

१. साई सेवक यांनी साई सेवकाच्या सेवाभावी वृत्तीने संस्थानचे विभागात स्वतःचे इच्छेने सेवा देणेचे अथवा काम करण्याचे मान्य केले आहे.

२. प्रत्येक साई सेवकांने सेवेत हजर होणेपुर्वी त्यांचे नजिकचे पोलीस स्टेशन कडुन पोलीस स्टेशन कडुन पोलीस व्हेरीफीकेशन करुन घेवुन एक प्रत संस्थानचे कामगार विभागात सादर करणे आवश्यक आहे.

३. साई सेवकाने शासकीय किंवा श्री साईबाबा हॉस्पीटल ,साईनाथ रुग्णालय यापैकी एका हॉस्पीटलचे डॉक्टरांनी दिलेले मेडीकल सर्टीफिकेट सेवेत हजर होणेपुर्वी कामगार विभागाकडे देणे बंधनकारक राहील.

४. साई सेवकांना संस्थानचे कामकाजात हस्तक्षेप करता येणार नाही.

५. साई सेवक प्रमुख यांनी सेवेला आल्यांनतर दररोज सकाळी ६ ते दुपारी २ व दुपारी २ ते रात्री १०या वेळेत संबंधीत विभागाशी संपर्क साधावा. अथवा विभाग प्रमुख जी वेळ नेमुण देतील त्या वेळेत संबधीत विभागांशी संपर्क साधावा.

६. साई सेवकांना नेमुण दिलेल्या विभागात / ठिकाणी व नेमुण दिलेल्या वेळेत विना तक्रार सेवा करावी लागेल. ठरावीक ठिकाणीच सेवा मिळणे बाबतचा साई सेवकांना आग्रह धरता येणार नाही.

७. साई सेवकांना सेवा देतांना सेवेशी संबंधीत विभागाचे विभाग प्रमुख यांचे पर्यवेक्षण व नियंत्रणाखाली सेवा देणेचे काम करावे लागेल.

८. साई सेवेचे कालावधीत साई सेवकाकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन अथवा अनुचित प्रकार,घटना,बेशिस्त वर्तन घडल्यास किंवा साई सेवेचे दरम्यान भोंदुगिरी, अंधश्रधेला खतपाणी घालणे

सारखी कृती घडल्यास साई सेवका विरुध्द शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये रितसर गुन्हा अथवा (F.I.R.) दाखल करणेत येईल.

९. साई सेवकांना संस्थानचे कर्मचारी म्हणुन दर्जा प्राप्त होणार नाही. तसेच त्यांना कोणताही मोबदला मागता येणार नाही. अथवा संस्थानचे नोकरीसाठी हक्क सांगता येणार नाही.

१०. साई सेवकांनी श्री साईबाबा संस्थानला साई सेवकाची सेवा दिलेली आहे म्हणुन त्यांना संस्थान कडुन अग्र हक्काने कोणतेही लाभ/ फायदे घेता येणार नाही. तो इतर साई भक्तासारखाच राहील.

११. श्री साईबाबा संस्थान कोणतेही कारण न देता कोणत्याही साई सेवकास साई सेवक योजणेतुन काढुन टाकण्याचा निर्णय घेईल. तो निर्णय साई सेवकावर बंधनकारक राहील.

१२. सदर साई सेवक नियमावलीमध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार श्री साईबाबा संस्थानला असेल.

१३. साई सेवकास जी संधी प्रथम दिली जाईल, त्यावेळी त्याने ती संधी चुकविली तर पुन्हात्यास साई सेवक म्हणुन काम करण्याची भविष्यात कोणतीही संधी दिली जाणार नाही.

**<u>साई सेवक वर्तणुक-</u>**

१४. सकाळी आंघोळ केल्यावर अष्टगंध लावुनच साई सेवकांना सेवेला यावे लागेल

१५. साई सेवकांचे कपडे नेहमी स्वच्छ असावे तसेच त्यांनी दाढी व कंटीग केलेली व बोटांची नखे काढलेली असावीत.

१६. साई सेवकांनी सकाळी मंजन करतांना भिंतीवर थुंकु नये तसेच त्यांनी दाढी व कटींग केलेली व बोटांची नखे काढलेली असावीत.

१७. सेवेसाठी नेमलेल्या साई सेवकांना सेवेच्या ठिकाणी पान, तंबाखु, बिडी, सिगारेट, गुटखा पुडी मावा खाण्यासा सक्त मनाई आहे. तसेच त्यांनी संस्थान परीसरात मद्यपान, अंमली पदार्थाचे सेवन करु नये.

१८. सेवेस येतांना साई सेवकांनी मोबाईल व इतर मौल्यवान वस्तु सोबत आणु नये. मोबाईल दिसल्यास जमा करण्यात येईल.

१९. सेवेक-यांने नेमुण दिलेल्या सेवेच्या ठिकाणी व्यतिरीक्त सेवा सोडुन गेटच्या बाहेर जाऊ नये, जाणे जरुरी असल्यास संबधीत विभाग प्रमुख व गट प्रमुख यांना विचारुन तसेच ड्रेस व ओळखपत्र काढुनच बाहेर जावे.

२०. सेवा चालु असतांना साई सेवकांनी एकत्र बसुन गप्पामारु नये.

२१. साई सेवक प्रमुखाने सेवेच्या ठिकाणी स्वत: हजर राहुन साई सेवकांकडुन व्यवस्थीत सेवा करवुन घ्यावी.

२२. साई सेवक प्रमुखांनी सेवेच्या ठिकाणी दिलेल्या सुचनांचे व्यवस्थीत व काटेकोरपणे पालन करावे.

२३. साई सेवकांनीसेवेच्या ठिकाणी उत्तम स्वच्छता राखली जाईल याची दक्षता घ्यावी.

२४. साई सेवकांनी सेवेत नसतांनी ही व्यवस्थीत शिस्तीने वागावे, मोठ्याने चर्चा करु नये व गप्पा मारु नयेत.

२५. गावांतील राजकीय किंवा इतर कोणत्याही प्रकारचे वादात सेवेक-यांने सहभाग घेवु नये अथवा सेवेला आल्यांनतर कोठलाही वाद निर्माण करु नये.

२६. भक्तांची सेवा करतांना साई सेवकांनी त्यांना प्रेमाणे "ओम साई राम" म्हणुन त्यांचेशी चांगले व नम्रपणे आचरण ठेवावे, त्यांना मोठ्याने आवाज देवु नये व त्याना आवश्यक ती मदत करावी व त्यांना आवश्यक ती मदत करावी व त्यांनी काही विचारलयास त्यांना योग्य सल्ला द्यावा.

२७. साई सेवकांना नारंगी रंगाचा नेहरु शर्ट, पांढ-या रंगाचा कुर्ता तसेच पांढऱ्या रंगाची टोपी अशा प्रकाराचा गणवेष देणेत येईल, गणवेषावरच त्यांनी साई सेवक ओळखपत्र लावावे. इतरत्र कोणत्याही ड्रेसवर साई सेवक ओळखपत्र लावुनये. सेवा चालु नसतांना साई सेवकांनी ओळखपत्र गणवेषावरुन काढुन खिश्यामध्ये ठेवावे. साई सेवक ओळखपत्र लावुन कोठेही बसु नये, किंवा फिरु नये.

२८. साई सेवकांना संस्थानचे नियमांचे व शिस्तीचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

२९. साई सेवकाने कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास त्यास तात्काळ सेवेच्या ठिकाणावरुन हाटविले जाईल व त्यास भविष्यात कधीही साई सेवक म्हणुन सेवा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३०. तसेच सदर साई सेवक ख्वेजना कोणतेही कारण न देता अथवा पुर्व सूचना न देता बंद करण्याचा अधिकार श्री साईबाबा संस्थानला राहील.

३१. वरील नियमावलीचे पालन प्रत्येक साई सेवकांकडून होणे जरुरीचे आहे तसे न केल्यास संबधीत साई सेवकास श्रींचे सेवेस मुकावे लागेल व त्यांना पुन्हा, सेवा करण्याची संधी देण्यात येणार नाही.

३२. सेवेच्या कालावधीत घडलेल्या कोणत्याही कृतीसाठी, घटनेसाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई संस्थानकडे मागता येणार नाही.

३३. प्रत्येक आठवड्याचे शेवटी "साई सेवक" यांनी त्यांची सेवा संपल्या नंतर संस्थानमार्फत देणेत आलेले गणवेश, ओळखपत्र, सेवा कार्ड तात्काळ कामगार विभागात जमा करावयाचे आहे ते त्यांचेवर बंधनकारक राहील त्याबाबत दुरुपयोग होणार नाही याची दक्षता साई सवकांनी घ्यावयाची आहे.

३४. साई सेवक यांचेकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन झाल्यास त्यांची सेवा तात्काळ बंद करण्यात येईल. त्याबाबत त्यांची कोणतीही तक्रार व विनंती विचारात घेतली जाणार नाही.

३५. साई सेवकाने साई सेवक म्हणुन काम करतांना काही गैरप्रकार केले तर ती त्याची वैयक्तिक बाब समजुन त्याचेवर योग्य ती कारवाई श्री साईबाबा संस्थान करेल. याबाबत होणा-या परिणामांशी श्री साईबाबा संस्थानचा काहीही संबंध राहणार नाही.

३६. साई सेवक यांचे स्वतःचे कृतीने अथवा निष्काळजी पणाने काही अपघात , इजा अगर गंभीर दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी संस्थान घेणार नाही. सदर जबाबदारी सर्वस्वी साई सेवकाची राहील.

**साई सेवकांना दयावयाच्या सवलती–**

३७. साई सेवक योजनेमध्ये स्वच्छेने सहभागी होणा-या सेवकास सेवेच्या कालावधीमध्ये संस्थानमार्फत ओळखपत्र व गणवेष देण्यात येईल. सेवा समाप्त झालेनंतर सदर ओळखपत्र व गणवेष साई सेवकांनी तात्काळ कामगार विभागात जमा करावे.

३८. साई सेवकांना सेवेच्या कालावधीत निवासव्यवस्थाना पासुन ते सेवेच्या ठिकाणी जाणे-येणेसाठी वाहन विभागामार्फत मोफत वाहन व्यवस्था करणेत यावी.

३९. साई सेवकांची सेवेच्या कालावधीत निवासाची सोय साई धर्मशाळा इमारतीमध्ये, दोन वेळचे जेवणाची सोय श्री साई प्रसादालया मध्ये, दोनवेळ चहाची व्यवस्था कॅन्टीन विभागामार्फत तसेच दर्शन व आरतीची व्यवस्था जनसंपर्क कार्यालयामार्फत विनामुल्य केली जाईल्.

४०. साई सेवक यांना सेवेच्या कालावधीतच फक्त मोफत दर्शनाची सुविधा पुरविण्यात येईल. तसेच त्यांना फक्त सेवेच्या कालावधीतच एकाच वेळेस मोफत आरतीची सुविधा ही जनसंपर्क कार्यालयामार्फत देणेत येईल. (दर्शन/ आरती व्यवस्था ही जी व्यक्ती साई सेवक म्हणुन सेवा देईल, अशा व्यक्तीलाच स्वतःसाठी देणेत येईल. त्यांचेसमवेत असलेल्या इतर व्यक्तींना सदरची सुविधा देणेत येणार नाही.)

४१. सेवेच्या कालावधी मध्ये साई सेवक आजारी पडल्यास त्यास संस्थानचे रुग्णालय व आवश्यकता भासल्यास श्री साईबाबा हॉस्पिटलध्ये उपलब्ध असलेले वैद्यकीय उपचार सुविधा विनामुल्य दिली जाईल.

सदर नियमावली मान्य असलेबाबत स्वयं घोषणापत्र सेवा सुरु करणेपुर्वी स्वाक्षरी करुन कामगार विभागात जमा केले नंतरच साई सेवक म्हणुन नेमणूक करणेत येईल.

वरीलप्रमाणे "साई सेवक" योजनेसाठी साई सेवक नियमावली सादर केली आहे. तरी सदर प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमध्ये राबविणेत येणाऱ्या साईसेवक योजनेकरीता प्रस्तावित केलेल्या साईसेवक नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, सदरहू नियमावलीची अंमलबजावणी करणेस मान्यता देण्यात आली. परंतु सुरुवातीचे दोन महिन्यांमध्ये सेवेसाठी येणाऱ्या साईसेवकांची, अल्प कालावधीमुळे पोलिस व्हेरीफिकेशनची अट शिथील करणेत यावी, मात्र त्याचंकडून याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१०७** **साई पादुका दर्शन सोहळयाकरीता एक ए.सी. प्रवासी बस खरेदीकरणे.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-**

१) कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या

अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) - श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीत शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपुर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येणार आहे.

या निमित्ताने सदर कालावधीत प्रत्येक महिन्यात श्री साईबाबांच्या पादुका दर्शन कार्याक्रम आयोजित करणेबाबत जा.नं.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी/१४३१/२०१७ दि.२०/०६/२०१७ अन्वये निर्देश दिलेले आहे.

श्री साईबाबा पादुका दर्शन सोहळा ज्या ठिकाणी असेल तेथे 2X2 पुषबॅक किंवा हायबॅक सिट अंदाजे आसन क्षमता ३६ ते ४० पर्यंत असलेली, ए.सी. बस खरेदी करावी लागेल. या कामी भारत बेंज, SML, TATA व इतर नामांकित कंपनी यापैकी कोणत्या कंपनीची व किती आसन क्षमता असलेली बस खरेदी करावी यावर निर्णय होणे आवश्यक आहे. त्यानुसार खरेदी प्रक्रिया राबविता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकः-भांखस-२०१४/ प्र.क्र.८२ भाग III/ उद्योग-४ दिनांक १/१२/२०१६ सुधारित नियमपुस्तिके मध्ये ३.२.३. मध्ये, "कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS & D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे, मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/ वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी.

**मागणी:-** तरी साई पादुका दर्शन सोहळ्या करीता कोणत्या कंपनीची व किती आसन क्षमता असलेली ए.सी. प्रवासी बस खरेदी करावी हे निश्चित होणेस व त्यानुसार अधिकृत डिलरकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६२७** **साई पादुका दर्शन सोहळयाकरीता महाराष्ट्रातील पुर्ण जिल्हयांमध्ये श्रींच्या पादुका दर्शनासाठी घेऊन जाणेसाठी एक व बाहेरील राज्यांकरीता एक अशा ०२ अत्याधुनिक ए.सी. बस खरेदी करणेसाठी टाटा, अशोक लेलंण्ड व भारतबेंज या तीन कंपन्यांच्या बसेसबाबत तपशीलावर चर्चा करणेत येऊन, त्यामधील भारतबेंज या कंपनीची (917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod- 35+1+1 SPB) बस खरेदी करणेचे निश्चित करणेत आले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे भारतबेंज कंपनीच्या 917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod- 35+1+1 SPB या मॉडेलच्या ०२ अत्याधुनिक ए.सी. बस खरेदी करणेकामी भारतबेंज कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व सदरहू बसमध्ये श्रींच्या पादुका ठेवणेसाठी आवश्यक असलेली बॉडीबिल्डींग करणेस तसेच त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.१०८** **जुने साईलिला व नवीन साई अर्पण सेवा द्वैमासिक सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) 'ठ' मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक:-** संस्थानमार्फत प्रकाशित होत असलेले साईलीला मासिकाचा दर्जा भक्ताभिमुख असावा तसेच साईलीला अंकासोबत एक नवीन व्दैमासिक अंक साईभक्तांच्या सेवेसाठी सुरु करणेबाबत मा. अध्यक्ष महोदय यांचा मनोदय असल्याने, त्यास अनुसरुन मुख्य शहरी न्यायाधिश, मुंबई यांच्याकडे माहे एप्रिल २०१७

मध्ये नवीन अंक सुरु करणेबाबत ऑनलाईन अर्ज सादर करुन त्यात साईसेवा, श्रीसाईसेवा, साई सेवाव्रत, साई नित्य सेवा व साई अर्पण सेवा अशी नावे दाखल करण्यात आली होती.

त्यास अनुसरुन दि.११.०५.२०१७ ने भारत सरकारचे समाचारपत्र व पंजीकृत कार्यालय, नवी दिल्ली यांचेकडून **'साई अर्पण सेवा'** या नावास मान्यता मिळालेबाबच्या पत्राची प्रत इकडील कार्यालयास प्राप्त झाली आहे. आता दोनही व्दैमासिकांचे कामकाज करुन घेण्यासाठी संस्थान मंजूर आकृतीबंधात मुंबई कार्यालय आस्थापनेवर पदनिहाय आकृतीबंधास मान्यता आहे ती परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे.

परिशिष्ट 'अ'

| अं.नं. | पदनाम | स्थायी मंजुर पदसंख्य | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| ०१ | कार्यकारी संपादक | ०१ | ९३००-३४,८०० ग्रेड पे ४४०० |
| ०२ | सहा. संपादक | ०१ | ९३००-३४,८०० ग्रेड पे ४३०० |
| ०३ | डिटीपी ऑपरेटर | ०१ | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |

**प्रस्तावः-** श्री साईलीला मासिकाबरोबर श्री साई अर्पण मासिकाची मान्यता मिळाली असून ०१ ऑक्टोबर २०१७ रोजी पुण्यतिथी-दसरा वेळी प्रकाशित करण्याचे नियोजन आहे.

दि.३०.०६.२०१७ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांचे समवेत मुंबई येथे श्री साईलीला व श्री साई अर्पण सेवा कामकाजाबाबत चर्चा झाली असता, त्यावेळी संस्थानसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून प्राप्तझालेल्या आदेशीत सूचनाबाबत चर्चा झाली त्या खालील प्रमाणे.

१) दि.०७.०८.२००९ चे आदेशात 'आधिनियमच्या कलम १३(४) अन्वये समितीस तीची कर्तव्य व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची व कर्मचा-यांची नेमणूक करण्याचे अधिकार आहेत. परंतू तत्पुर्वी अशी पदे शासन मान्य आकृतीबंधानुसार असणे आवश्यक आहे. व शासन निर्णय ०६ नुसार समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाहीं

२) दि.२३.०१.२०१३ चे आदेशात श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर मंजूर करण्यात आलेल्या आकृतीबंधाबाहेर जाऊन कोणत्याही पदावर भरती करण्यात येऊ नये तसेच शासनाच्या प्रचलित नियामानुसार सेवेत मुदतवाढ, पुर्ननियुक्ती, सेवानिवृतीनंतर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येऊ नये.

३) दि.२३.०१.२०१७ चे आदेशात श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागांचे प्रस्ताव स्वतंत्ररित्या सादर न करता, सध्या कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या कामाचे मुल्यमापन करुन, सर्व विभागातील मंजूर व कार्यरत पदांचा एकत्रित आढावा घेण्यात यावा आणि वाढीव पदांची आवश्यकता भासल्यास तसे कार्यकारी अधिकारी यांनी प्रमाणित करुन सर्व विभागांचा एकत्रित प्रस्ताव सादर करण्यात यावा.

उपरोक्त बाबींचा विचार करता साईलीला व साई अर्पण सेवा कामकाजासाठी खालील पदांची आवश्यकता आहे, ती परिशिष्ट 'ब' मध्ये दर्शविलेप्रमाणे..

परिशिष्ट 'ब'

| अं.नं. | पदाचे नाव | कंत्राटी | शैक्षणिक अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|
| ०१ | कार्यकारी संपादक<br>९३००-३४,८०० ग्रेड पे ४४०० | ०१ | १) शासन मान्य विद्यापीठाची पदवी, पत्रकारीता पदवी / डिप्लोमा कोर्स, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>२) लेखन संपादन, मुद्रीत शोधन, मुद्रण प्रकाशनाचा १० वर्षाचा अनुभव<br>३) आध्यात्मिक क्षेत्रातील विशेषत: साईजीवन,शिकवण, तत्व ज्ञानावर अधारित नियतकालिकांच्या लेखन संपादकीय काम काजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| ०२ | सहा. संपादक<br>९३००-३४,८०० ग्रेड पे ४३०० | ०५ | १) शासन मान्य विद्यापीठाची पदवी, पत्रकारीता पदवी/ डिप्लोमा कोर्स, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक.<br>२) लेखन संपादन, मुद्रीत शोधन, मुद्रण प्रकाशनाचा ०५ वर्षाचा अनुभव.<br>३) आध्यात्मिक क्षेत्रातील विशेषत: साईजीवन,शिकवण, तत्वज्ञानावर अधारित नियतकालिकांच्या लेखन संपादकीय कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| ०३ | डिटीपी ऑपरेटर<br>५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | ०१ | १) पदवीधर<br>२) MSCIT व DTP ऑपरेटिंग कोर्स.<br>३) मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मि.<br>४) संबंधीत कामाचा०३ वर्षाचा अनुभव. |
| ०४ | कमर्शियल डिझायनर<br>५२००-२०२०० ग्रेड पे | ०२ | १) पदवीधर<br>२) MSCIT व DTP ऑपरेटिंग कोर्स. |

| | | | |
|---|---|---|---|
| | १९०० | | ३) मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मि.<br>४) पुस्तक मुखपृष्ट सजावट डायरी कॅलेंडर्स व ग्राफिक्स व सर्व प्रकारच्या कामाचा ०३ वर्षाचा अनुभव. |
| ०५ | मुद्रीत शोधक (प्रुफ रिडर) ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | ०२ | १) पदवीधर<br>२) MSCIT व DTP ऑपरेटिंग कोर्स.<br>३) मराठी ३० व इंग्रजी ४० श.प्र.मि.<br>४) मुद्रीत शोधक (प्रुफ रिडर) कामाचा ०३ वर्षाचा अनुभव. |
| ०६ | मदतनीस ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० | ०३ | १) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण |

**मागणी:-** परिशिष्ट 'ब' नुसार मान्यतेसाठी.

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई छाननी करुन अनुमान:-** आर्थिक/ धोरणात्मक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्त वस्तूस्थिती विचारात घेता मा. अध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार साईलीला व नवीन साई अर्पण सेवा व्दैमासिक चालू करणेकामी परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केले प्रमाणे अ.नं. ०१ ते ०६ पदांना मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे मंजूरीसाठी संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फत सादर करता येईल व शासनाकडील मान्यता प्राप्त झालेनंतर सदर पदावरील भरतीची कार्यवाही आस्थापना विभागाकडून करता येईल असे मत आहे. ती सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने साईलिला व नवीन साई अर्पण सेवा द्वैमासिक सुरु करणेसाठी प्रस्तावातील परिशिष्ट ब मध्ये नमुद केलेल्या पदांना मंजुरी मिळणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१०९** **शिर्डी बसस्थानकातील संस्थानचे रुम्स/ हॉलचे वापराबाबत.**

**प्रस्ताव-** **०१. अधिनियम २००४ मधील तरतूद-** २१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा पुरविण्यात येते.

**०२. प्रस्तावीक–** नव्याने बांधणेत आलेल्या शिर्डी बसस्थानक येथे संस्थानचे तळमजल्यावर ०३ गाळे असून पहिल्या व दुस-या मजल्यावर खालील प्रमाणे हॉल्स व रुम्स आहेत.

| अ.नं. | मजला | तपशील | बांधकाम क्षेत्र | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | पहिला मजला | निवासी मोठे हॉल्स (संडास-बाथरुम कॉमन) | ११९६ चौ.मी | ०५ |
| | | निवासी लहान हॉल (संडास-बाथरुम कॉमन) | | ०२ |
| | | निवास रुम (संडास-बाथरुम अटॅच) | | ०७ |
| २ | दुसरा मजला | निवासी मोठे हॉल्स (संडास-बाथरुम कॉमन) | ११९६ चौ.मी | ०५ |
| | | निवासी लहान हॉल (संडास-बाथरुम कॉमन) | | ०२ |
| | | निवासी रुम (संडास-बाथरुम अटॅच) | | ०७ |
| | **एकूण – मोठे हॉल्स १०, लहान हॉल्स ०४ व रुम्स १४** | | | |

जा.नं.एसएसएस/काअ/४७४४/२०१६ दि.१५/०३/२०१६ चे परिपत्रकान्वये संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.१३/०३/२०१६ रोजी संस्थान मालमत्तेची स्थळ पाहणी केली असून नवीन बसस्थानक येथील उपरोक्त हॉल्स व रुम्स करीता आवश्यक साहित्य खरेदीचा प्रस्ताव सादर करणे बाबत कळविले आहे.

त्यानुसार प्रस्ताव सादर केला असून त्यास दि.१९/०९/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.६३९ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्याप्रमाणे सध्या बांधकाम विभागामार्फत कॉट्स व खरेदी विभागामार्फत क्वॉयर फोम मेट्रेस, मेट्रेस प्रोटेक्टर, फायबर उशा व उशीकव्हर्स खरेदीची कार्यवाही सुरु आहे.

**०३. मागणी-** सदर रुम्स व हॉल्सच्या वापरा बाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी खालील प्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

**अ)** श्री साईबाबांच्या शताब्दी सोहळयास लवकरच सुरुवात होणार असून सदर सोहळयास साईभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. गर्दीचे काळात साईभक्तांची निवासाची गैरसोय होऊ नये याकरीता सदर रुम्स व हॉल्स साधारण एक वर्षभराकरीता साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करावेत.

वरील सुचनेनुसार सदर रुम्स व हॉल्स साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करावयाचे झाल्यास त्याचा खालील प्रमाणे सेवाआकार आकारता येईल.

| **अ.नं.** | **खोली/हॉलचा प्रकार** | **एकूण संख्या** | **प्रति रुम/हॉल्स कॉट संख्या** | **प्रति रुम / हॉल व्यक्तींची मर्यादा** | **प्रति रुम / हॉल २४ तासांसाठी सेवाआकार गरमपाण्यासह** | **प्रतिदिनी निवासव्यवस्था** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साधे मोठे हॉल्स, संडास-बाथरुम कॉमन | १० | १५ | १५+५ = २० | ८००/- | २०० |
| ०२ | साधे लहान हॉल, संडास-बाथरुम कॉमन | ०४ | ०९ | ०९+३ = १२ | ६००/- | ४८ |
| ०३ | साधी रुम, संडास बाथरुम ॲटयॅच | १२ | ०३ | ३+३ = ०६ | ३००/- | ७२ |
| ०४ | साधी सुट रुम, संडास बाथरुम ॲटयॅच | ०२ | ०६ | ६+४ = १० | ५००/- | २० |
| | | | | | **एकूण -** | **३४०** |

**ब)** श्री साईबाबांचा शताब्दी सोहळा संपल्यानंतर (एक वर्षानंतर) संस्थानच्या दोन्ही रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांच्या नातेवाईकांची निवासव्यवस्था साईधर्मशाळे ऐवजी सदर रुम्स व हॉल्स मध्ये करावी.

वरील सुचनेनुसार शताब्दी सोहळा संपल्यानंतर दोन्ही रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांच्या नातेवाईकांची निवासव्यवस्था साईधर्मशाळे ऐवजी सदर रुम्स व हॉल्स मध्ये करता येईल. म्हणजे रुग्णांचे नातेवाईकांना रुग्णालयात जाणे-येणे सोईस्कर होईल. त्याकरीता स्वतंत्र बसची आवश्यकता भासणार नाही.

**०४. <u>विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ स्पष्ट मत</u>–** शिर्डी बसस्थानकातील संस्थानच्या रुम्स व हॉल्स वापरा बाबत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे 'अ' व 'ब' प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.६२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानमधील संस्थान मालकीच्या मोठया हॉल्सचा लायब्ररी, कलादालन, आर्ट प्रदर्शन, क्लोकरुम व संस्थान प्रकाशित प्रकाशनांची विक्री करणे अशा कारणांसाठी वापर करायचा समितीचा मानस असून याबाबत यथावकाश निर्णय घेण्यात येईल व उर्वरित साध्या खोल्यांचा निवासी वापर करणेत यावा, असे ठरले.**

**याचबरोबर शिर्डी बसस्थानकाचे नाव साईसेवा बसस्थानक असे ठेवण्यात यावे, असे सर्व सदस्यांचे एकमताने ठरविले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.११०** **संस्थान निधीतून प्राधान्य गटातील रस्ता क्र.०५ (आ.क्र.३१ ते शिव नाला रोड ते नगर मनमाड रस्ता) चे उर्वरित विद्युत विषयक कामाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-२ अन्वये खालीलप्रमाणे खालीलप्रमाणे तरतूद आहे.

... पोटकलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाचा तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन ) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परीणामी संस्थानच्या सोईमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करणे.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** संस्थान निधीतून शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील सहा रस्ते विकसित करणेचे काम बांधकाम विभागामार्फत ठेकेदार मे.रोमन टारमॅट लि., मुंबई यांना देण्यात आलेले होते मे.रोमन टारमॅट लि., मुंबई

यांना देण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामासोबत या सर्व रस्त्यांवर प्रकाश योजनेकरीता स्ट्रीट लाईटचे पोल उभे करुन त्यांना सप्लायकरीता केबल टाकून कनेक्शन करणेचे तसेच फिडर पिलर, स्ट्रीट लाईटचे पोल आणि हायमास्ट इ.अर्थिंग करणेचे कामही देण्यात आलेले होते. त्युनसार ठेकेदार मे.रोमन टारमॅट लि., मुंबई यांना देण्यात आलेल्या त्यांना कार्यादेशातील एकुण सहा रस्त्यांपैकी पाच रस्त्यांची कामे पुर्ण केलेली असून उर्वरीत सहाव्या रस्त्याचे (रस्ता क्र.०५) एकुण १८४० मी.लांबीपैकी कनकुरी रस्ता ते नगर-मनमाड रस्ता या दक्षिणेकडील भागातील ९०० मीटर रस्त्याचे काम पुर्ण केलेले असून उर्वरीत ९४० मीटरचे काम हे लगतच्या मालमत्ता धारकांनी घेतलेल्या हरकतींचे शिर्डी नगर पंचायतीकडून निवारण न झाल्याने व न्यायालयीन बाबींमुळे ठेकेदार मे.रोमन टारमॅट लि., मुंबई यांना सदरचे काम पुर्ण करता आलेले नाही. तसेच बांधकाम विभागाकडून ठेकेदार मे.रोमन टारमॅट लि., मुंबई यांचे अंतीम बील अदा करणेचे बाकी होते.

त्यामुळे रस्ता क्र.०५ चे उर्वरीत काम ठेकेदार मे.रोमन टारमॅट लि., मुंबई यांचेकडून करुन घेणेस अथवा याकामी नव्याने निविदा मागविणे, रोमन टारमॅट लि.यांना दिनांक ३०-०८-२०१५ अखेर केलेल्या कामास मुदतवाढ देणे व अंतिम बील अदा करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेसाठी बांधकाम विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

बांधकाम विभागामार्फत सादर करण्यात प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२७-०३-२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२५७ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रथम प्राधान्य गटातील सहा रस्ते विकसित करणे कामाचे ठेकेदाराचे नावात मे.रोमन टारमॅट लि. ऐवजी टारमॅट लि.असा बदल झालेला असल्याने, त्यांचे विनंतीनुसार त्यांची देयके व अंतीम बीलाची रक्कम टारमॅट लिमि नावाने अदा करणेत यावी. तसेच सदरहू ठेकेदाराने कुंभमेळा-२०१५ चे कालावधीमध्ये वाहतुकीचे नियोजन व नियंत्रण करण्याच्या दृष्टीने रस्ता क्र.०५ चे काम केलेले असल्याने त्यांना सदर कामासाठी दिनांक ३१-०८-२०१५ अखेर मुदतवाढ देण्यात यावी व या रस्त्याचे (रस्ता क्र.०५) चे उर्वरीत काम समाधी शताब्दीच्या पार्श्वभुमीवर तातडीने करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने अल्प मुदतीच्या ई-निविदा मागविण्यात याव्यात.

त्यानुसार या कामासाठी बांधकाविषयक अंदाजपत्रक, आराखडे व निविदा कागदपत्रे बांधकाम विभागामार्फत तयार करुन ई-निविदाबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे बांधकाम विभागाने कळविले असून रस्ता क्र.०५ चे उर्वरीत काम लवकर सुरु करणेचे दृष्टीने या कामाचे अंदाजपत्रक, आराखडे तयार करुन विद्युत विषयक कामांसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता घेणे तसेच सदरहू निविदा मागविणेबाबत कार्यवाही सत्वर करणेबाबत कळविलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे बांधकाम विभाग यांनी कळविल्यानुसार संस्थान निधीतून शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्ता क्र.०५ (आरक्षण क्रमांक ३१ ते नाला रोड ते नगर-मनमाड रस्ता) चे उर्वरीत रस्त्यांवर प्रकाश योजनेकरीता स्ट्रीट लाईटचे पोल उभे करुन त्यांना सप्लायकरीता केबल टाकून कनेक्शन करणे, फिडर पिलर उभा करणे, फिडर पिलर, स्ट्रीट लाईट पोलकरीता अर्थिंग करणे तसेच सदरच्या स्ट्रीट लाईट पोलला महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून सप्लाय घेतल्यानंतर पिलरपासून स्ट्रीट लाईट पोलपर्यंत केबल टाकणे इत्यादी कामे करावी लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे कराव्या लागणाऱ्या स्ट्रीट लाईटच्या कामाचा तपशील **महाराष्ट्र शासनमान्य सी.एस.आर.सन २०१५-२०१६ नुसार** तयार केलेला असून त्याचा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01). | 8-3-15 | Supplying & erecting of 8 m high (clear height) galvanised OCTAGONAL pole with foundation bolts having bottom of 150 mm A/F, top 100 mm A/F made up of 3 mm thk HT Sheet along with base plate of size 250 X 250 X 16 mm, Smart Pack Junction Box with 4 poles 40 Amp. MCB & 3C x 2.5 aq.mm.copper flexible cable from fitting to MCB for connection & stud type terminal block suitable for 4C x 25 sq.mm cable on provided foundation as per specification No.OHPL/OPL. | 18 Nos. | 15866.55 | 2,85,597.90 |
| 02). | 2-8-14 | Supplying & erecting street light fitting suitable for 150W H. P. S. V.lamp complete with accessories on provided bracket as per specification no. FG-ODF/GSL | 36 Nos. | 2764.65 | 0,99,527.40 |
| 03) | 2-1-37 | Supplying & erecting HPSV lamp 3 pin BC / | 36 | 626.85 | 0,22,566.60 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Screwed cap head / pin type 230V,150 W SON type . | Nos. | | |
| 04) | 8-3-31 | Providing and erecting Galvanised 1000mm double arm sword type bracket with FRP dome and Ball as per specification No. OH-PL/PBKT | 18 Nos | 4176.90 | 0,75,184.20 |
| 05) | 16-3-8 | Providing & casting of M- 20 grade reinforced cement concrete (RCC) foundation suitable for 6m to 8m high octagonal /conical G.I. pole considering the safe soil bearing capacity at site as 10 T/sq m at 1.5 m depth including supply of steel, concrete, excavation and fixing provided nut bolts with the help of template as per design in an approved manner. | 18 Nos | 6415.50 | 1,15,479.00 |
| 06) | 7-1-16 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 4 core 16 sq mm aluminium conductor with continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 1200 Mtrs. | 207.90 | 2,49,480.00 |
| 07) | 16-1-2 | Making the trench in Hard murum/Tar road of suitable width and depth as per IS for laying provided L.T cable up to 25 sq.mm.complete. As per specification No. CW-EXN-CTR | 1000 Mtrs. | 175.35 | 1,75,350.00 |
| 08) | 9-1-2 | Providing earthing with Copper earth plate size 30 x 30 x 0.315 cm complete with all materials, testing & recording the results as per specification No. EA-EP | 01 No. | 7915.95 | 0,07,915.95 |
| 09) | 9-1-4 | Providing pipe type earthing with 40mm. dia. G.l. pipe or 20 mm dia. G.l. Rod complete with all materials as per specification No. EA-EP | 18 Nos | 1664.25 | 0,29,956.50 |
| 10) | Non CSR | Supplying and erecting Outdoor Stand Mounted Feeder Pillar for Street Light Panel with 63 Amp. TPN MCCB incomer and Four nos. of Copper Busbars,500V,100Amp for outgoing and suitable timer, contactor, transformer, micro processor based manager and provision for termination of Incoming minimum 25 sq.mm & outgoing minimum 25 & 16 sq.mm cables complete erected in min. 14 gauge CRCA sheet box with supporting angle, self lock, gasket ang slating top erected on CC foundation in an approved manner. | 01 No. | 30000 | 0,30,000.00 |
| | | | | Total Rs:- | **10,91,057.55** |
| | | | | Round Up Rs. | **10,91,058.00** |

**मागणी:-** उपरोक्तप्रमाणे संस्थान निधीतून शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्ता क्र.०५ (आरक्षण क्रमांक ३१ ते नाला रोड ते नगर-मनमाड रस्ता) चे उर्वरीत रस्त्यांवर प्रकाश योजनेकरीता स्ट्रीट लाईटचे पोल उभे करुन त्यांना सप्लायकरीता केबल टाकून कनेक्शन करणे, फिडर पिलर उभा करणे, फिडर पिलर, स्ट्रीट लाईट पोलकरीता अर्थिंग करणे तसेच सदरच्या स्ट्रीट लाईट पोलला महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून सप्लाय घेतल्यानंतर पिलरपासून स्ट्रीट लाईट पोलपर्यंत केबल टाकणे इत्यादी कामाकरीता अंदाजे रक्कम रुपये १०,९१,०५८/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्तप्रमाणे संस्थान निधीतून शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील रस्ता क्र.०५ (आरक्षण क्रमांक ३१ ते नाला रोड ते नगर-मनमाड रस्ता) चे उर्वरीत रस्त्यांवर प्रकाश योजनेकरीता स्ट्रीट लाईटचे पोल उभे करुन त्यांना सप्लायकरीता केबल टाकून कनेक्शन करणे, फिडर पिलर उभा करणे, फिडर पिलर, स्ट्रीट लाईट पोलकरीता अर्थिंग करणे तसेच सदरच्या स्ट्रीट लाईट पोलला महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून सप्लाय घेतल्यानंतर पिलरपासून स्ट्रीट लाईट पोलपर्यंत केबल टाकणे इत्यादी कामाकरीता अंदाजे रक्कम रुपये १०,९१,०५८/- इतका खर्च अपेक्षित असून सदरील खर्चास व बाहेरील ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतून प्राधान्य गटातील रस्ता क्र.०५ (आ.क्र.३१ ते शिव नाला रोड ते नगर मनमाड रस्ता) चे उर्वरित विद्युत विषयक कामे करुन घेणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१११** **साईसेवक योजना सुरु करणे व त्यांची निवास, भोजन, चहा-पाणी, गणवेश, दर्शन/ आरती इ. व्यवस्था विनामुल्य करणे व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीने श्री साईबाबा संस्थान मध्ये श्री क्षेत्र गजानन महाराज देवस्थान, शेगाव येथील सेवेक-याच्या धर्तीवर साई पालखी मंडळाचे पदयात्री सभासद यांचे करीता, मोफत साई सेवक उपक्रम राबविणेचा निर्णय घेतलेला आहे. तरी सदर **"साई सेवक"** योजनेमध्ये २० पालखी सभासद मिळून १ गट प्रमुख असे २१ साई सेवकांचा गट तयार करुन, त्यांना वर्षातुन ७ दिवस संस्थान परिसरामध्ये सदरचे योजने अंतर्गत विनामुल्य सेवा करण्याची संधी देण्यात येईल.

साई पालखींच्या सभासदांना स्वखुशीने श्री साईबाबा संस्थानमध्ये विना मुल्य सेवा दयावयाची असल्यास, त्यांना संस्थानमध्ये **"साई सेवक"** म्हणून विना मूल्य सेवा उपलब्ध करुन देता येईल. त्या कामी संबंधीत पालखी मंडळांनी त्यांचे वैयक्तीक माहिती सह कामगार विभागाकडे ५७० आता पर्यंत पालख्यांची साई सेवेसाठी रजिष्ट्रेशन केलेले आहे. त्यापैकी ५२० पालखी गटांना**"साई सेवक"** म्हणून विनामूल्य सेवा करणेची संधी देणेत येईल. उर्वरीत गटांना प्रतिक्षा यादीवर ठेवणेत येईल. व त्यांना आवश्यकतेप्रमाणे सेवेची संधी देणेत येईल.

**<u>*साई सेवक योजनेचे स्वरुप -</u>**

**"साई सेवक"** योजनेमध्ये विविध पालखी मंडळे, विविध साई मंदिरांच्या साई सेवकांचा २१ व्यक्तींचा ०१ गट तयार करण्यात आला असून रविवार ते शनिवार ०१ गट काम करेल असे एका आठवडयात सकाळी ६ ते दुपारी २ व दुपारी २ ते रात्री १० यावेळेतप्रत्येकी ५ याप्रमाणे १० गटातून २१० साई सेवक आठवडाभर सेवा देतील. तसेच एका पालखी मंडळाला एकापेक्षा अधिक गटांची नोंदणी करता येणार आहेश्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत अशा गटांना संस्थानच्याविविध ठिकाणी सेवेची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार असून काही गटांना वर्षातून एका पेक्षा जास्त वेळा सेवेची इच्छा असेल तर त्यांना वर्षातून एका पेक्षा जास्त वेळेस सलग ०७ दिवस सेवेची संधी देण्यात येणार आहे. ही योजना २९ जुलै २०१७ पासून सुरु करण्यात येईल. या गटांना प्रथम समाधी मंदिर, साई प्रसादालय, साईबाबा हॉस्पीटल, साईबाबा भक्त निवासस्थान, व्दारावती निवासस्थान, संरक्षण, साईनाथ रुग्णालय इत्यादी ठिकाणी वर्षातून सलग ७ दिवस साई सेवची संधी दिली जाईल. साई सेवकांना सेवाभावी वृत्तीने भक्तांचा आदर करुन, सन्मान करुन "ओम साई राम" म्हणून साईभक्तांच्या आडचणी सोडविण्याचे काम तसेच संस्थान अधिकारी नेमूण देतील ती कामे साई सेवेकांनी करावयाची आहे.

कामगार विभागाकडे आतापर्यंत एकुण ५७० पालख्यांनी रजिष्ट्रेशन केलेले आहे. त्यापैकी ५२० साई पालख्यांना सेवेची संधी देणेत येत असुन सेवा/कामे सोबत जोडलेल्या परिशिष्ट१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे साई सेवक योजनेचे तपशिलवार टाईम टेबलसह कामाचे नियोजन करण्यात आलेले आहेत.

**अ) साई सेवकांच्या सेवेचे स्वरुप –**

**"साई सेवक"** योजने अंतर्गत नेमण्यात येणा-या साई सेवकांकडुन खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे साई सेवा करुन घेता यईल.

| अ.नं | विभाग | साई सेवकांकडून करवुन घ्यवयाच्या सेवेचे / कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | मंदिर विभाग | गंध लावणे, उदी वाटप, सत्य नारायण व्यवस्था, चावडी, व्दारकामाई नंदा दिप इ. |
| २ | प्रसादलय विभाग | बुफ/प्रसाद व्यवस्था, पाणी वाटणे, मीठ वाटणे इ. |
| ३ | साईबाबा हॉस्पीटल | रुग्ण व नातेवाईकांना मदत व मार्गदर्शन करणे. |
| ४ | साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) | मोफत बस सेवा, लॉन्ड्री, स्टोअर, क्लोक रुम इ. |
| ५ | साईआश्रम निवासस्थान १ | मोफत बस सेवा, माहिती केंद्र, फॉर्म देणेइ. |
| ६ | कॅन्टीन विभाग | मोफत बुंदी प्रसाद, चहा, कॉफी व दुध वाटप केंद्र इ. |
| ७ | प्रकाशने विभाग | बुक स्टॉल विक्री केंद्र, चौकशी काऊंटर व्यवस्था इ. |
| ८ | साईप्रसाद निवासस्थान | पाणी वाटप, चप्पल स्टॅंड इ. |
| ९ | व्दारावती निवासस्थान | माहिती केंद्र, फॉर्म देणे, लिफ्ट ऑपरेटर इ. |

| | | |
|---|---|---|
| १० | संरक्षण विभाग | रांगा काढणे, मंदिर, व्दारकामाई,चावडी, शनिगेट, नंदी गेट, अपंग गेट, दर्शन रांगा , मंदिर परिसर |
| ११ | साईनाथ रुग्णालय | रुग्ण व नातेवाईकांना मदत व मार्गदर्शन करणे. |

साई सेवकांना खालील प्रमाणे अटी व शर्तीस अनुसरुन साई सुविधा देण्यात येतील.

**ब) साई सेवकांना दिल्या जाणा-या सोई-सुविधा –**

१. साई सेवकांना संस्थानमार्फतओळख पत्र देण्यात येईल.

२. साई सेवकांना एक सेवा कार्ड देण्यात येईल. त्यावर साई सेवकांचे सेवेचा दिनांक व त्या दिनांकास करण्यात येणारे सेवेचे ठिकाण व सेवेचे स्वरुप यांची नोंद ठेवता येईल. सदरचे कार्ड सेवा संपल्यानंतर कामगार विभागात जमा करावे लागेल.

३. साई सेवकांना नारंगी रंगाचानेहरु शर्ट पांढ-या रंगाचा कुर्ता तसेच टोपी अशा प्रकारचा गणवेष यप्रमाणे प्रत्येक ०२ गणवेष संस्थानचे वतीने दिले जातील.

४. साई सेवकांची सेवेच्या कालावधीत निवासाची सोय साई धर्मशाळा इमारतीमध्ये, दोन वेळेचे जेवणाची सोय श्री साई प्रसादालयामध्ये, दोन वेळ चहाची व्यवस्था कॅन्टीन विभागामार्फत तसेच दर्शन व आरतीची व्यवस्था जनसंपर्क कार्यालयामार्फत विनामुल्य केली जाईल.

५) सेवेच्या कालावधी मध्ये साई सेवक आजारी पडल्यास त्यास संस्थानचे साईनाथ रुग्णालयात व आवश्यकता भासल्यास श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये वैद्यकिय उपचार सुविधा विनामुल्य दिली जाईल.

६. साई सेवकांना संस्थानचे कामकाजात हस्तक्षेप करता येणार नाही.

७. त्यांना संस्थानचे नियमांचे व शिस्तीचे पालन करावे लागेल. .

८. साई सेवक यांचेकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन झाल्यास त्यांची सेवा तात्काळ बंद करण्यात येईल. त्याबाबत त्यांची कोठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९. साई सेवकांना नेमूण दिलेल्या विभागात / ठिकाणी विना तक्रार सेवा करावी लागेल. ठरावीक ठिकाणीच सेवा मिळणे बाबतचा साई सेवकांना आग्रह धरता येणार नाही.

१०. साई सेवकांना सेवा देतांना सेवेशी संबधित विभागाचे प्रमुख यांचे पर्यवेक्षण नियंत्रणा खाली सेवा देणेचे काम करावे लागेल.

११. प्रत्येक आठवडयाचे शेवटी **"साई सेवक"** यांनी त्यांची सेवा संपल्या नंतर संस्थानमार्फत देणेत आलेले गणवेष ओळखपत्र, सेवाकार्ड तात्काळ कामगार विभागात जमा करावयाचे आहे.

१२. साई सेवक अर्जाची पडताळणी, साई सेवकांची नेमणूक, साई सेवकांना दयावयाचे गणवेष, व ओळखपत्र, सेवाकार्ड, साई सेवकांचे संबधी इतर कार्यालयीन कामकाज करणेकरीता तात्काळ लिपीक संवर्गातील कर्मचा-याची नेमणूक आस्थापना विभागामार्फत करता येईल.

१३. **"**साई सेवक"यांना सेवेच्या कालावधीतच फक्त मोफत दर्शनाची सुविधा पुरविण्यात येईल. तसेच त्यांना फक्त सेवेच्या कालावधीतचमोफत आरतीची सुविधा ही जनसंपर्क कार्यालयामार्फत देणेत येईल. (दर्शन/ आरती व्यवस्था ही जी व्यक्ती साई सेवक म्हणुन सेवा देतील, अशा व्यक्तीलाच स्वतःसाठी देणेत येईल. त्यांचे समवेत असलेल्या इतर व्यक्तींना सदरची सुविधा देणेत येणार नाही.)

१४. साई सेवेचे कालावधीत आपणाकडून काही गैरवर्तन घडल्यास किंवा साई सेवेचे दरम्यान भोंदुगिरी, अंधश्रधेला खतपाणी घालणे इत्यादी पक्रार आपणाकडून झाल्यास गैरवर्तन म्हणुन शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये F.I.R.दाखल करणेत येईल.

**क) साई सेवक योजनेसाठी येणारा खर्च –**

संस्थानेच विविध विभागात सेवा देणेकामी दि.२९ जुलै २०१७ पासुन **"साई सेवक योजना"** सुरु करणेसाठी साई सेवकांना संस्थानचे मार्फत् ओळखपत्र, डयुटी कार्ड, गणवेष देवून त्यांची साई सेवक म्हणुन नेमणूक करण्यात येईल. त्याकामी संबंधीत विभागाकडून करावयांच्या कामांबाबत येणा-या अंदाजीत खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | विभाग | कामाचा तपशिल | अंदाजे खर्चाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कामगार विभाग | सेवा कार्ड (१५००० नग) | ६७६५/- |
| २ | ई.डी.पी.विभाग | आय कार्ड (१५००० नग) | ५०,२००/- |
| ३ | प्रशासन शाखा वशी-५ | गणवेष | ६,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | (पुरुष १००० नग)<br>(महिला– १०० नग ऑरेंज साडी) | |
| ४ | कामगार विभाग | साई सेवक नोंदणी प्रमाणपत्र<br>(१६००० नग) | ५०,०००/- |
| | | **एकुण अंदाजे खर्च** | **७,०६,९६५/-** |

तरी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे परिसरातील छपाईधारकांकडून तसेच पुरवठादारांकडून दरपत्रके मागविणेस व तसेच येणा-या अंदाजे रक्कम रु.७,०६,९६५/- (अक्षरी सात लाख सहा हजार नऊशे पासष्ट ) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

संस्थानचे विविध विभागात सेवा देणेकामी दि.२९ जुलै २०१७ पासुन "साई सेवक योजना" सुरु करणेसाठी साईसेवकांना संस्थानचे मार्फत् ओळखपत्र सेवा कार्ड गणवेश देवुन त्यांची संस्थानमधील सेवा कालावधी दरम्यान निवासाची सोय साईधर्मशाळा इमारतीमध्ये दोन वेळचे जेवणाची व्यवस्था श्री साई प्रसादालयामध्ये दोन वेळ चहाची व्यवस्था कॅन्टीन विभागा मार्फत तसेच दर्शन व आरतीची व्यवस्था जनसंपर्क कार्यालयाद्वारे विनामुल्य करणेस व त्याकामी येणा-या उपरोक्त प्रमाणे अंदाजे रुपये **७,०६,९६५/-**खर्चाच मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विंनती.

**निर्णय क्र.६३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित साईसेवक योजनेचे स्वरुप, साईसेवकांच्या सेवेचे स्वरुप व साईसेवकांना दिल्या जाणाऱ्या सोयी-सुविधा यांचे अवलोकन करणेत येऊन, त्यास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.११२** **मे.टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांचे बिल आदा करणे.**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतुदः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम.१७ नं ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

ठरावः- मा. व्यवस्थापन समिती दि.१६.०९.२०१६ रोजीची सभा निर्णय क्र. ६८५ अन्वये ई-निविदेतील व्यवसायिक बीड उघडले असता, निविदाकार मे. टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांचे डिलक्स कॅलेंडर्स-२०१७ छपाईकामाचे निम्नतम दरधारक होते.

प्रस्ताविकः- इकडील जा.नं. एसएसएस/वशी/३४६२/२०१६ दि. ०३.१०.२०१६ नुसार मे. टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांना ईनिविदेतील दर स्विकृतीनुसार डिलक्स ०३ प्रकारचे कॅलेंडर्स सन-२०१७ चा कार्यादेश देण्यात आलेला होता.

इकडील जा.नं. एसएसएस/वशी/५६६७/२०१७ दि. २२.०२.२०१७ नुसार डिलक्स कॅलेंडर्स शिल्लक साठा संपल्याने तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांच्या निर्देशानुसार वाढीव कार्यादेश देण्यात आलेला होता त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | आदेशीत छपाई संख्या | सर्व करांसह आपले दि.३०.०१.२०१७ चे सवलतीचे दर | एकूण खर्च रुपये. | संस्थान देणगी मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा डिल्क्स वॉल कॅलेंडर्स (०८ पेजेस) आकार २२"X३५" | ४००० | १९५/- | ७,८०,००० | २५०/- |
| ०२ | श्री साईबाबा मेटपेट कॅलेंडर्स (०७ पेजेस ) आकार १९.५"X२७.२५" | ३,००० | २३५/- | ७,०५,००० | ३००/- |
| ०३ | श्री साईबाबा थ्रीडी ०७ शिटर डेस्क कॅलेंडर्स ९.७५"X०७" | ३,००० | १७५/- | ५,२५,००० | २२०/- |
| | | | **एकूण रुपये.** | **२०,१०,०००/-** | |

**प्रस्तावः-** सदर कार्यादेशातील अटी/शर्तीनुसार दि.३१ मार्च २०१७ अखेर विक्री करणेबाबत नमूद होते.त्यानंतर इकडील कार्यालयाकडून विक्री थांबविली असता, तत्कालिन स्थानिक विश्वस्त श्री. सचिन तांबे सो. यांचे दुरध्वनी निर्देशानुसार उर्वरित कॅलेंडर्सची दि.२५.०५.२०१७ अखेर विक्री करण्यात आली आहे.

**मागणीः-** मे. टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांचे छपाई करुन पुरवठा करण्यात आलेली कॅलेंडर्स विक्री झालेने रक्कम रु. ४,४७,५००/- मात्रचे बिल आदायगी करणे आहे.

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई छाननी करुन अनुमानः-** धोरणात्मक/ आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** इकडील दि.१३.०४.२०१७ मे. टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांचे रक्कम रुपये. ९७,५००/- चे बिल अदायगीसाठी लेखाशाखेकडे सादर केले असता, मुख्यलेखाधिकारी यांनी मा. कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी घेऊन बिल आदायगीसाठी सादर करणेबाबत मौखिक निर्देश दिलेने, त्यानुसार दि.२४.०४.२०१७ रोजी मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचेकडे टिपणी सादर करण्यात आली होती. त्यावर मा. उपकार्यकारी अधिकारी सो. व कार्यकारी अधिकारी महोदया यांनी दिलेल्या निर्देशाबाबत दि.११.०५.२०१७ रोजी खुलासा सादर करण्यात आला असता, त्यावर कार्यकारी अधिकारी महोदया यांनी व्यवस्थापन समितीमध्ये ठेवा असे निर्देश दिले असल्याने, मे.टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांचे रक्कम रुपये. ९७,५००/- व रक्कम रु. ३,५०,०००/- मात्रचे अंतिम बिले मिळून एकूण रक्कम रु.४,४७,५००/- (अक्षरी रुपये. चार लाख सत्तेचाळीस हजार पाचशे मात्र.) देय आहे.

करिता सदर बिल देयक प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मे.टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांचे एकूण रु.४,४७,५००/- मात्र अंतीम बिल देयक त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच सध्या डायरी छपाईसाठी मागविणेत आलेल्या ई-निविदेमध्ये एक वर्षाच्या वार्षिक उत्पन्नाची अट शिथील करणेत येऊन, ती तीन वर्षाच्या सरासरीचे वार्षिक उत्पन्न अशी ठेवणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.११३** **श्री साईप्रसादालयात दैनंदिन तयार होणारे प्रसादभोजन विद्यार्थीनींना दैनिक शालेय पोषण आहार म्हणून देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद –**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी,शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रः –** मा. व्यवस्थापन समिती दि.२७/०३/२०१७ चे सभेतील निर्णय क्र. २६३

**प्रास्ताविक –**श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालाकडे इ.५ वी ते इ.१० वी पर्यंत चे शिक्षण घेणारे अंदाजे एकूण ७६४ विद्यार्थिनींना संस्थानचे वतीने मध्यान्ह भोजन देणेबाबत दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळेचा विषय ठेवण्यात आला होता. मध्यान्ह भोजनात विद्यार्थिनींना सोमवार- मसाले भात व शिरा, मंगळवार- डाळ खिचडी व बुंदी, बुधवार- उपमा व बुंदी लाडू, गुरुवार-मटकी उसळ व बुंदी, शुक्रवार-फळे व शिरा , शनिवार- पोहा व लापशी असे विविध पदार्थ देणेबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

निर्णय क्र.२६३ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी मधील शालेय विद्यार्थीनींना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

**मागणी-** दि.०९/०६/२०१७ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांनी पोषण आहार सुरु करणेकामी आढावा बैठक घेतली त्यात मा. उपकार्यकारी अधिकारी , सर्व प्रशासकीय अधिकारी, प्रसादालय विभागप्रमुख, सर्व प्राचार्य /मुख्याध्यापक (शैक्षणिक संकुल) यांचे उपस्थित झालेल्या चर्चेनुसार, प्राचार्य/मुख्याध्यापिका (शैक्षणिक संकुल) यांना श्री साईप्रसादालयात दररोज साईभक्तांना प्रसाद भोजनात दोन भाज्या , डाळ, भात, चपाती व गोड पदार्थ म्हणुन शिरा/बुंदी/बर्फी/ शेवई असे पदार्थ असतात. सदर गोड पदार्थ शिरा/बुंदी/बर्फी/ शेवई या सर्व गोड पदार्था ऐवजी एकच गोड पदार्थ बुंदी देण्यात यावा.

मा.व्यवस्थापन समितीने निश्चित केलेले पदार्थ हे नाष्टा सदृष्य असून यामध्ये चपातीचा समावेश नसल्याने, चपाती द्यावयाची झालेस भाजी द्यावी लागेल. विद्याथिर्नीं जेवणाचा डबा आणणार नसल्याने त्यांना भुक लागली तर भोजनाची मोठी अडचण निर्माण होईल. याकरीता विद्यार्थिनींना नाष्टयाऐवजी साईभक्तांसारखे परिपूर्ण भोजन दिले तर सदरची अडचण होणार नाही. तसेच विद्यार्थिनींची वैद्यकीय दृष्टया आवश्यक असलेला परिपुर्ण आहाराची पुर्तता होईल. तसेच प्रसादालयाकडे असलेले अपुरे मनुष्यबळ तसेच या विविध पदार्थांसाठी/ विविध फळांसाठी दैनंदिन येणारा वाढीवचा स्क्तंत्रखर्च विचारात घेता श्री साई प्रसादालयात दैनंदिन तयार होणारे प्रसाद भोजन विद्यार्थिनींना देण्यात आल्यास वाढीव कामगार, आचारी, तसेच जादाचा खर्च होणार नाही असे नम्र मत प्र. अधिक्षक, प्रसादालय विभाग व प्रशासकीय अधिकारी यांनीही व्यक्त केले आहे. सदर प्रसाद भोजनाची संस्थान वाहनातून ने-आण करणे व प्रत्येक माळयावर पोहच करणे , आवश्यकतेनुसार विद्यार्थिनींना भोजन वाढणे हे काम प्रसादालया विभागाकडील कर्मचा-यांवर सोपविण्यात यावे तसेच मदतीसाठी शाळेकडील कंत्राटी मदतनिस कर्मचारी घेण्यात यावेत.

तसेच आवश्यक असलेले प्रसादभोजन पदार्थ वाहतुक करणेकामी प्राचार्य /मुख्याध्यापिका (शैक्षणिक संकुल) यांनी वाहन विभाग यांना विद्यार्थिनींचे जेवणाच्या वेळा विचारात घेवून प्रसादालयाकडे वाहन पाठविणेबाबत सुचित करणेत यावे.विद्यार्थिनींचे डब्बे शाळेत आणणे ऐवजी प्रसादालय विभागामार्फत ७७० नग स्टे. स्टिल ताटे शाळेकडे ठेवणेत येऊन शाळेकडील स्त्री मदतनीस यांचेमार्फत ताटे धुण्याचे व साफ करण्याचे काम करणेत यावे अस चर्चे अंती ठरले आहे.

तरी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी या विभागातील विद्यार्थिनींना सोमवार ते शनिवार पुर्ण आठवडा श्री साईप्रसादालयात दररोज साईभक्तांना प्रसाद भोजनात दोन भाज्या, डाळ, भात, चपाती व गोड पदार्थ म्हणुन फक्त बुंदी याप्रमाणे जेवण देण्यास मान्यता असावी.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:-** शालेय प्रशासनाचा भाग म्हणून गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय-**दि.२७/०३/२०१७ रोजी मा. व्यव्स्थापन समितीचे निर्णय क्रं. २६३ मध्ये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी मधील शालेय विद्यार्थिनींना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या अन्न पदार्था ऐवजी प्रसादभोजन व्यवस्थेतील दररोजचे प्रसादभोजन देणेबाबत बदल करुन मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी मधील शालेय विद्यार्थीनींना संस्थानमार्फत मोफत मध्यान्ह भोजन देणेकामी यापुर्वी व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेमध्ये संमत झालेला निर्णय क्र.२६३ रद्द करणेत येऊन, यापुढे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी मधील शालेय विद्यार्थीनींना श्री साईप्रसादालयात दैनंदिन तयार होणारे प्रसादभोजन व त्याबरोबर मिष्टान्न, दैनिक शालेय पोषण आहार म्हणून देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.११४** **आर.पी.आय.प्रदेश मिटींगसाठी साईधर्मशाळा विभागातील हॉल मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमातील विनियम२१ (१) (ख) मध्ये भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव :- निरंक**

**प्रस्ताविक-** संदर्भीय पत्रानुसार दि.२९/०८/२०१७ रोजी सकाळी ८ वाजेपासुन ते संध्याकाळी ८ वाजेपर्यंत कार्यक्रम चालु रहाणार आहे. त्याकरिता संस्थानमार्फत त्यांची योग्य ती फी देऊन १ दिवशीय आर.पी.आय. प्रदेश मिटींगसाठी हॉल मिळावा असे पत्राव्दारे इकडील विभागास कळविले आहे.

**मागणी-** आर.पी.आय प्रदेश मिटींगसाठी साई धर्मशाळा विभागातील हॉल मिळणे बाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** श्री साईबाबा संस्थानचे निवास विभागांकडे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची प्रथम प्राधान्याने निवासव्यवस्था करण्यात येते. लग्नसमारंभ, शिबिरे, सभा, समेलन अथवा इतर धार्मिक/ सामाजिक कार्यक्रमांसाठी परवानगी दिली जात नाही.

तथापी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व मा.विश्वस्त यांचे निर्देशानुसार दि१४/१२/२०१६ ते १६/१२/२०१६ अनुगामी लोकराज्य महाअभियान (अनुलोम), मुंबई व दि.२५/०६/२०१७ ते दि.२६/०६/२०१७

स्वदेशी जागरण मंच,मुंबई या शासकीय कार्यक्रमासाठी नाममात्र रु.११००/- मात्र शुल्क आकारुन साई धर्मशाळा विभागामधील प्रसादालय हॉलमध्ये दोन दिवसासाठी कार्यक्रमास परवानगी देण्यात आली होती.

सदरचा हॉल हा भोजनाचा हॉल असुन भोजन गृह चालु नसल्याने सध्या वापरात नाही. व्दारावती विभागाकडुन दि. १८/११/२०१५ रोजी आलेल्या कापुस गादी ५०० नग व दि. २०/०५/२०१७ रोजी आलेल्या सुमारे २७५७ कापुस गाद्या असे एकुण ३२५७ कापुस गाद्या साई धर्मशाळेतील प्रसादालय हॉलमध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच साई धर्मशाळा विभागाकडील खराब झालेल्या वस्तु उदा. खुर्ची, टेबल, बादली, मग, खराब बेडशिट, खराब उशीकव्हर, इ. वस्तु ठेवण्यात आलेल्या आहे. सध्या त्याचा स्टोअर म्हणुन वापर होत आहे. गर्दीच्या वेळी रुग्ण नातेवाईकांची तसेच परिसरातील येणा-या साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येत असते.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, मु.पो.देर्डे-को-हाळे, ता. कोपरगांव यांनी दि२९/०८/२०१७ रोजी सकाळी ०८.०० वाजे पासुन ते सांयकाळी ०८.०० वाजे पर्यंत मिटींगसाठी हॉलची मागणी केली आहे. संबंधितांना मिटींगसाठी हॉल दिल्यास त्याठिकाणी असलेले सामान इतरत्र ठेवावे लागेल. परंतु त्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध नाही.

साई धर्मशाळा येथील प्रसादालयाच्या हॉल मध्ये कार्यक्रम करण्यास परवानगी दिल्यास इतरही जण सदर जागेची मागणी करतील व त्यांना नकारही देता येणार नाही. तरी लग्नसमारंभ, शिबीरे, अधिवेशन, मिटींग, धार्मीक/ सामाजिक कार्यक्रम तसेच स्पर्धा व इतर कोणत्याही कार्यक्रमास साई धर्मशाळा विभागाकडील प्रसादालय हॉलची मागणी केल्यास सदरचा हॉल देणेबाबतचा विषय धोरणात्मक असलेने त्यावर निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, राजकीय कार्यक्रमांसाठी साईधर्मशाळा येथील हॉल देणे योग्य होणार नाही, त्याचबरोबर एखाद्या राजकीय कार्यक्रमासाठी हॉल उपलब्ध करुन दिल्यास, इतरही त्याची मागणी करतील व तशी प्रथा सुरु होईल, या सर्व बाबींचा विचार करता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**विषय नं.११५** **"साई सेवक" शपथ पत्र.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत समाधी मंदिर, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईप्रसादालय,विविध भक्तनिवास,शैक्षणिक संकुल यांचे व्यवस्थापन केले जाते. श्री साईबाबांनी आपल्या हयातील श्रदधा,सेवा व सबुरीचा मंत्र सर्व जगाला दिला आहे. तिच शिकवण पुढे घेऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी काम करीत आहे. शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना विश्वस्तव्यवस्थेमार्फत जास्तीत जास्त दर्जेदारसेवा मिळुन देणे हा विश्वस्तव्यवस्थेचा प्रयत्न आहे. ही सेवा उपलब्ध करुन देतांना शिर्डी येथे येणारे साईभक्त, श्री साई पालखी मंडळाचे प्रतिनिधी, श्री साई मंदिराचे प्रतिनिधी यांनाही सेवेच्या या पवित्र कामामध्ये सहभागी करुन घेणे व येणा-या साई भक्तांना सेवा करणेची संधी उपलब्ध करुन देणे या उद्देशाने,श्री क्षेत्र शेगाव येथील गजानन महाराज संस्थानमार्फत राबविल्या जाणा-या सेवेकरी योजनेच्या धर्तीवर "साईसेवक योजना" राबविणेचा व्यवस्थापनाचा मानस आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव दि.१/१०/२०१७ ते १८/१०/२०१८ या कालावधीत जगभरात मोठया प्रमाणावर साजरा करण्यात येणार आहे. शिर्डी येथेही वर्षभरात जगभरातुन अतिशय मोठया प्रमाणावर साई भक्त येणार आहेत. या पार्श्वभुमीवर "साईसेवक" योजना चालु केली आहे.

साई सेवकांचा २१ व्यक्तींचा ०१ गट तयार करण्यात आला असुन रविवार ते शनिवार ०१ गट काम करेल असे एका साई सेवक योजनेमध्ये विविध पालखी मंडळे,विविध साई मंदिरांच्या साई सेवकांचा २१व्यक्तींचा ०१ गट तयार करण्यात आला असुन रविवार ते शनिवार ०१ गट काम करेल असे एका आठवडयातसकाळी ६ ते दुपारी २ व दुपारी २ ते रात्री १० यावेळेत प्रत्येकी ५ याप्रमाणे १० गटातून २१० साई सेवक आठवडाभर सेवा देतील. तसेच एका पालखी मंडळाला एकापेक्षा अधिक गटांची नोंदणी करता येणार आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत अशा गटांना संस्थानच्या विविध ठिकाणी सेवेची संधी उपलब्ध करुन देण्यात येणार असुन काही गटांना वर्षातून एका पेक्षा जास्त वेळा सेवेची इच्छा असेल तर त्यांना वर्षातून एका पेचा जास्त वेळेस सलग ०७ दिवस सेवेची संधी देण्यात येणार आहे. ही योजना २९ जुलै २०१७ पासुन प्रथम सुरु करण्यात येईल. या गटांना समाधी मंदिर, साई प्रसादालय, साईबाबा हॉस्पीटल,साईबाबा भक्त निवासस्थान व साई आश्रम भक्तनिवास याठिकाणी वर्षातून सलग ७ दिवस साई सेवेची संधी दिली जाईल.

साई सेवकांनी सेवाभावी वृत्तीने भक्तांचा आदर करुन, सन्मान करुन " ओम साई राम " म्हणुन साईभक्तांच्या अडचणी सोडविण्याचे काम साई सेवकांनी करावयाचे आहे. मा.अध्यक्ष महोदय यांनी, दि.१७/०७/२०१७ रोजी साई सेवकांनी घ्यावयाचे शपथेचा मसुदा पाठविलेला असून तो मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्याचे निर्देश दिलेले आहे.

श्री साईबाबांची सेवा करण्यास आलेल्या साई पालखी मंडळाचे सभासदांना व प्रतिनिधींना संस्थानतर्फे शपथ देणे गरजेचे आहे.साई सेवकांना दयावयाचे शपथेचा खालील प्रमाणे मसुदा सादर केला आहे.

**मी...................................... श्री साईबाबांना स्मरुन, "साईसेवक" म्हणुन अशी शपथ घेतो की, ------------------------ मी सदैव स्वच्छतेचे पालन करीन, मी सदैव निर्व्यसनी राहीन,मी कोणतेही गैरवर्तन करणार नाही, मी अंधश्रध्दा निर्मुलनासाठी सदैव प्रयत्नशील राहीन,मी श्री साईबाबांच्या श्रध्दा व सबुरी या मंत्राचे पालनकरीन, मी प्रत्येकाची भक्तीभावाने सेवा करीन, मी प्रत्येकाशी नम्रतेने आणि सौजन्याने वागीन.**

**// ओम साईराम //**

तरी सदर साईसेवक शपथेचा मसुदा मान्यतेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित साईसेवक शपथेच्या मसुद्याचे अवलोकन करणेत आले व त्यामध्ये "मी साई सेवक या पदाचा काया, वाचा व मनाने सदैव सन्मान राखीन", असा समावेश करणेत येऊन, सदरहू शपथपत्र अंतीम करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.११६** **रक्तपेढींनी मागणी केलेल्या आर्थिक मदतीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.डॉ.सुरेश हावरे सो.अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, यांचे अध्यक्षतेखाली रविवार दि. १२/०२/२०१७ रोजी रक्तदान चळवळ वाढीस लागणेसाठी चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे,अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे यासाठी पुढाकार घेऊन रक्तदान संकल्पना रुजविली जावी तसेच थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया यासारख्या रुग्णांना संस्थान मार्फत मदत व्हावी यासाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घ्यावा, याकरीता जसे तिरुपती बालाजी संस्थानमध्ये ज्या प्रमाणात केशदान ही संकल्पना रुजवलेली आहे त्याच धर्तीवर शिर्डीत रक्तदान ही संकल्पना रुजवावी असे मा.अध्यक्ष साहेब यांनी सुचविले आहे.

त्यावेळी नामांकित १२ रक्तपेढयांचे प्रत्येकी दोन प्रतिनिधी इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे,अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे यासाठी पुढाकार घेऊन रक्तदान संकल्पना रुजविली जावी तसेच थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया यासारख्या रुग्णांना संस्थान मार्फत मदत व्हावी यासाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घ्यावा, अशी मागणी सर्व रक्तपेढयांनी केली. या सर्व रक्तपेढया

थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया या दुर्धर आजारांनी पिडीत बालकांना मोफत रक्तपिशव्या देण्याचे सेवाभावी वृत्तीने काम करत असून संस्थान मार्फत निरंतर सहयोग/ आर्थिक सहकार्य मिळावे, असे खालील रक्तपेढींनी पत्रात म्हटले आहे.तसेच त्यांनी पत्रात नमूद केलेला मोफत देण्यात आलेल्या रक्तपिशव्या व त्यावरील खर्चाचा जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६ या कालावधीत तपशील खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

| अ.नं | रक्तपेढीचे नाव | थॅलेसिमियासाठी दिलेल्या रक्तपिशव्या | दर | शासकीय अनुदान सोडून झालेला खर्च | शासकीय अनुदान | अनुदान मागणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ.हेडगेवार रक्तपेढी, सोलापुर (ॲक्रिडिटेड रक्तपेढी) | ५८७ | १४५०/- | ६,४५,७००/- | ५८,७००/- | ६,४५,७००/- | |
| ०२ | डॉ.हेडगेवार रक्तपेढी, अकोला | ८१७ | ११००/- | ८,९८,७००/- | ----------- | ८,९८,७००/- | |
| ०३ | जनकल्याण रक्तपेढी, अ.नगर | ७९१ | १३५० | ९,८८,७५०/- | ७९१०० | ८,५५,०००/- | |
| ०४ | जनकल्याण रक्तपेढी,पुणे | ८९४ | १६००/- | ११,३९,१००/- | २९१३००/- | १३,४१,०००/- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | जनकल्याण ब्लड बॅंक, नंदुरबार | ०८ (रुग्ण संख्या) | १५००/- | ४५०००/- | १७००/- | ----------- | दरमहा येणारा खर्च |
| ०६ | जनकल्याण रक्तपेढी, जालना | ९६५ | १३००/- | ११,५८,०००/- | ९६५००/- | ----------- | |
| ०७ | कै.वामनराव ओक रक्तपेढी, ठाणे | ५३ | १४००/- | १,६८,०००/- | ----------- | २,००,०००/- | |
| ०८ | गोलवलकर गुरुजी रक्तपेढी बॅंक, नांदेड | १३३ | १२००/- | १,५९,६००/- | ----------- | ----------- | **ब्लड डोनेशन व्हॅन मागणी** |
| ०९ | माधवराव गोलवलकर स्वयंसेवी रक्तपेढी, जळगांव (केशवस्मृती प्रतिष्ठान) | २०२ | १३५०/- | २,७२,७००/- | ----------- | २,७२,७००/- | |
| १० | जनकल्याण रक्तपेढी, नाशिक | ५६२ | १४५०/- | ७,५९,०००/- | ५५९००/- | ----------- | फक्त खर्च सादर केला आहे. |
| ११ | जनकल्याण रक्तपेढी महाड | ४४ | १४५०/- | ६२,३००/- | १५००/ (जाने १६ ते १६मार्च) | ----------- | फक्त खर्च सादर केला आहे. |
| | एकूण | ५०४८ | | ६२,९६,८५०/- | ५,८४,७००/- | ४२,१३,१००/- | |
| | **रक्तपेढयांनी मागणी केलेली अनुदान रक्कम :- ४२,१३,१००/-** | | | | | | |

**<u>संस्थान मार्फत आर्थिक अनुदान देणेबाबत तरतुद</u>:-** अधिनियम तरतूद २१(२) (एक) राज्य शासनाचे पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय दवाखाना निराश्रित अथवा शारीरिकदृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करुन घेण्यासाठी अशी तरतूद आहे.

**<u>मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय</u>:-** यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, थॅलेसेमिया, हिमोफेलिया व सिकलेसल ॲनेमिया आजाराच्या रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दराने रक्तपुरवठा करणा-या रक्तपेढयांना आर्थिक अनुदान देता येईल. मात्र सदर आर्थिक अनुदान देणेसाठी अभ्यासपुर्वक सविस्तर नियमावली तयार करणेत येऊन शासनाच्या या संदर्भातील धोरणासहित सदर विषय समितीसमोर सादर करण्यात यावा. तसेच प्रस्तावित रक्तपेढया व इतर रक्तपेढयांकडूनही वैद्यकीय बाबींचा सविस्तर अहवालाची (जसे रक्तपिशव्यांचा खर्च, वाटप,दर, शासकीय अनुदान मिळते काय) मागणी करण्यात यावी. असे ठरले.

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-**

१) मा.व्यवस्थापन समितीचे ठरावात नमूद केलेप्रमाणे नियमावली साईनाथ रक्तपेढी यांचेमार्फत तयार करण्यात येत आहे.

२) श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ अन्वये एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून रुग्णालय दवाखाना यांना अनुदान देणेबाबत तरतुद आहे. रक्तपेढयांना अनुदान देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतूद नाही.

३) रक्तपेढयांकडून प्राप्त झालेल्या ब-याच प्रस्तावात फक्त खर्च नमूद केलेला आहे. संस्थानकडे अनुदान मागणी केलेली दिसून येत नाही. त्यामुळे संस्थानने मागणी नसतांना फक्त खर्चाचे तपशीलाचे आधारे अनुदान देणे योग्य वाटत नाही.

४) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग/२००१/प्र.क.२०६/ आरोग्य ६ दि. ५.१२.२००१ अन्वये शासकीय निमशासकीय धर्मादाय रक्तपेढयांना थॅलॅसेमिया, हिमोफेलिया या रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यासाठी शासन सबंधीत रक्तपेढयांना प्रतिपिशवी रु. १००/- मात्र अनुदान देण्यात देत आहे. त्यामुळे सबंधीत रक्तपेढयांना अनुदान दिल्यास महाराष्ट्रातील इतरही रक्तपेढया अशा प्रकारच्या अनुदानाची मागणी महाराष्ट्र शासन किंवा संस्थानकडे करतील.

५) सबंधीत रक्तपेढया विक्री करीत असलेल्या रक्तपिशव्यांचे दर हे १२०० ते १६०० च्या दरम्यान आहेत, ते साधारणपणे बाजारभावाप्रमाणे आहे. सर्व रक्तपेढयांचे रक्ताचे दर सारखे नाहीत. श्री साईनाथ रक्तपेढीत फक्त ८००/- रुपयांत रक्तपिशवी उपलब्ध करून दिली जाते. श्री साईनाथ रक्तपेढी व इतर रक्तपेढयांच्या दराबाबत फार मोठी तफावत दिसत आहे.

६) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साईशताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापनसमितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध विकास कामांकरिता रु.३१८६ कोटी रुपयांचा कृतीआराखडा शासनास सादर केलेला आहे. संस्थानचा स्वतःचा निधीही त्यासाठी खर्च होणार आहे.

७) श्री साईनाथ रक्तपेढीचा अभिप्राय:- मा. संचालक राज्य रक्त संक्रमण परिषद मुंबई यांनी शासन निर्णय क्र एमआयएस -१०९९/ १९३०/ साआर-२५६/९९ प्रशासन -२ वैद्यकीय अधिक्षक व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई दि. ०५ जानेवारी २००० मध्ये सर्व शासकीय, निमशासकीय, धर्मादाय संचलित रक्तपेढयांना राज्यातील थॅलेसेमिया आणि हिमोफेलिया रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार या कार्यालयाने राज्यातील सर्व वर उल्लेखित संस्थाना विषयांकित रक्तपुरवठा करणेबाबत बंधन घातले आहे. राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत या बाबत रु. १००/- प्रति पिशवी अनुदान देण्यात येते. या प्रमाणेच संस्थानचे श्री साईनाथ रक्तपेढीस अनुदान मिळत आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता सबंधीत रक्तपेढयांना अनुदान देणेयोग्य होणार नाही, असे वाटते. तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६३६** **यावर सविस्तर चर्चा झाली, चर्चेदरम्यान मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, अशा प्रकारे प्रस्ताव मागवून घेऊन ठराविक संस्थांना अनुदान देणे कायदेशीरदृष्टया वैध नाही. याबरोबर इतरही संस्था अशा प्रकारे अनुदान मागणी करुन शकतात. तसेच श्री साईबाबा संस्थानची रक्तपेढी असून तिलाही शासनातर्फे प्रस्तावित आजारांसाठी प्रति रक्त पिशवी रु.१००/- मात्र अनुदान मिळते. त्यामुळे आपण अनुदान घेत असताना, इतर संस्थांनात्या कारणासाठी अनुदान देणे योग्य होणार नाही.**

**तथापि, सर्व समिती सदस्यांचे असे मत झाले की, समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे, अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे तसेच थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया यासारख्या रुग्णांना संस्थानमार्फत मदत व्हावी यासाठी उपरोक्त प्रस्तावामधील रक्तपेढयांनी मागणी केलेल्या अनुदान रक्कम त्यांना छाननी समिती तसेच विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात येऊन, आदा करणेत यावी. तसेच उपरोक्तपैकी ज्या रक्तपेढयांनी अनुदानीत रक्कम कळविलेली नाही, त्यांचेकडून अनुदानाची रक्कम प्राप्त करुन घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ वैद्यकिय अधिक्षीका)

---

**विषय नं.११७** **मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रा.लि., फलटण यांचे VAT 6% ऐवजी जुलै,२०१७ पासून GST 12% झालेमुळे 6% रक्कम मिळणेबाबतचे पत्र.**

**प्रस्ताव-** मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांनी दि.१४.०७.२०१७ चे पत्राने खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

We would like to bring to your attention regarding increased in Sales tax on ghee from 6% to 12% eoyj effect from 01.07.2017. We have extended supply of ghee beyond contractual period of March 2017. We have mentioned earlier that we are incurring losses at athe cureent door delivery rate of Rs.354 per kg. Further increased in tax rate of ghee is an additional burden on us which has aggected our working capotal.

Hence, we request you to reimburse additional sales tax of 6% on the supply made in the month of july 2017. It will reduce our losses.

We request you to consider it and reimburse the amount at the earliest.

याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे- संस्थानने मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांना सन २०१६-१७ मध्ये माहे जुलै- २०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीसाठी गाईचे गावरान तूप प्रती क्विंटल रू.३५,४००/- प्रमाणे पुरवठा आदेश दिलेला होता. त्या दरामध्ये सर्व Taxes, वाहतुक खर्च, वाराई वगैरे खर्चाचा समावेश होता. त्याप्रमाणे त्यांनी पुरवठा केलेला आहे व सध्या करीत आहेत.

सन २०१७-१८ गाईचे शुध्द तूप खरेदीसाठीच्या ई-निविदा मा.उप समितीचे दि.०७.०७.२०१७ रोजीचे सभेत उघडून यामध्ये न्युनतम असणा-या निविदाधारकाशी वाटाघाटी होऊन संस्थानचे गाईचे शुध्द तूप खरेदीबाबतचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केलेला आहे.

संस्थानने मे.गोविंद मिल्क अ‍ॅण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांना पुरवठा आदेश देतांना VAT सह दर दिले होते. परंतु आता GST नव्यानेच लागू झाला आहे. त्यामूळे 6% VAT वरून 12% GST लागू झाला आहे. त्यामुळे मे.गोविंद मिल्क अ‍ॅण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांनी रक्कम 6% GST मिळणेबाबतची मागणी केली आहे. सदर 6% रक्कम एक क्विंटलसाठी रू.२,००३.७६ पैसे इतकी होईल.

VAT 6% ऐवजी जुलै-२०१७ पासूनच GST 12% झालेमुळे GST 6% ची रक्कम मे.गोविंद मिल्क अ‍ॅण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांना आदा करणेस हरकत नसावी, असे वाटते.

तरी मे.गोविंद मिल्क अ‍ॅण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांचे मागणीप्रमाणे VAT 6% ऐवजी जुलै-२०१७ पासून GST ची रक्कम 12% झालेमूळे GST ची 6% रक्कम मे.गोविंद मिल्क अ‍ॅण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि.,फलटण यांना आदा करणेबाबत निर्णय होणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, गाईच्या शुध्द तुपाचा पुरवठा करणारे पुरवठाधारक मे.गोविंद मिल्क अ‍ॅण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि., फलटण यांचे मागणीप्रमाणे जुलै-२०१७ पासून GST च्या रकमेमध्ये वाढ झालेली असल्यामुळे त्यामधील GST ची 6% वाढीव रक्कम मे.गोविंद मिल्क अ‍ॅण्ड मिल्क प्रॉ.प्रा.लि.,फलटण यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.११८** **शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी /प्रशिक्षणार्थी यांचेसाठी बेंचेस खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले विनिमय १७ (२ ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना क्लासरुमसाठी ३०० बेंचेस खरेदी करणेकामी प्रस्ताव तयार करणेस वरील संदर्भ क्र.१ चे टिपणीने मान्यता आहे.

संदर्भ क्र.२ अन्वये मा.प्रशासकीय अधिकारी (शैक्षणिक संकुल) यांचे कक्षामध्ये दि. ०६/१०/२०१६ रोजी त्यांचेकडील विभागाचे आढावा बेठकीमध्ये शैक्षणिक संकुलाची सर्व संस्थेमध्ये सध्या उपलब्ध असलेले बेंचची पडताळणी करुन प्रत्यक्षात खरेदी करावयाच्या बेंचेसचा एकत्रित प्रस्ताव औदयोगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे सादर करण्याचे निर्देश दिले.

याकामी संकलीत केलेल्या माहितीनुसार सध्या शैक्षणिक संकुलातील सर्व संस्थांमध्ये असलेल्या बेंचेसची संख्या खालीलप्रपमाणे आहे. यापैकी काही बेंचेस औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उत्पादीत केलेले आहेत.

| अ.क्र. | विभागाचे नाव | उत्पादन / खरेदी कालावधी | एकुण बेंच |
|---|---|---|---|
| १ | औदयोगिक प्रशिक्षण संस्था, | सन १९८४ ते २००२ | १६० |
| २ | कन्या विदया मंदिर | सन १९९३ ते २०११ | ४०१ |
| ३ | कनिष्ठ महाविदयालय | सन २००२ ते २०१४ | ५३० |
| ४ | इंग्लिश मेडीयम स्कुल | सन १९९६ ते २०११ | ९८९ |

संदर्भ क्र.२ मध्ये मा.प्रशासकीय अधिकारी,शैक्षणिक संकुल यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे नुसार शैक्षणिक संकुलातील इंग्लीश मिडीयम स्कुल,कन्या विद्यामंदीर व वरिष्ठ महाविद्यालय यांना आवश्यक असणा-या बेंचेसचा संदर्भ क्र३ चे टिपणीमध्ये समावेश करुन टिपणी तयार तयार केली. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी "उपकार्यकारी अधिकारी सदर किंमत वाजवी आहे काय ? त्यासाठी कोणते निकष वापरण्यात आले? यापुर्वी कधी खरेदी करण्यात आली आहे? या सर्व बाबी तपासाव्या" शेरा केला होता. तदनंतर संदर्भ क्र४ चे टिपणीमध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार टिपणीमध्ये आवश्यक त्या सर्व बाबींचा समावेश करुन टिपणी तयार करणेत आली. त्यावर मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी "Estimated Cost खरेदी नियमावली १/१२/१६ मधील तरतुदीनुसार फाईल सादर करावी."

सन २०१० – ११ मध्ये संस्थानमार्फत अहमदनगर जिल्हा परिषदेच्या शाळांना ३२५९५ बेंचेस खरेदी करुन देण्यात आले होते. त्या बेचेसचे डिझाईन त्यासाठी वापरावयाचे मटेरीयल त्याच्या उत्पादनाच्यावेळी करावयाची प्रक्रिया ,मानके व दर्जा

याबाबतचे संपुर्ण नियोजन आपले औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये तयार करुन बेंचेस मे.गोदरेज यांचेकडून उत्पादीत करुन घेऊन, त्याची तपासणी (औ.प्र.संस्थेव्दारा) करुन पुरविण्यात आले होते. ते दर्जेदार बेंचेस १ ली ते ४ थी व ५ वी ते ७ वयोगटासाठी बनविण्यात आले होते. त्या बेंचेसचे डिझाईन व दर्जा कायम

ठेऊन ८ ते १२ वी या वयोगटासाठी आता ५५० बेंचेस खरेदी करता येतील. बेंचचा दर्जा व आराखडा, अंदाजे खर्च वरील नमुद केल्याप्रमाणे असेल.

१) बेंचला टिकाऊपणासाठी MDF टॉप असावा.

२) बेंच फ्रेम करीता वापरण्यात येणारा Square pipe हा 14 Gauge x1" असावा.

३) बेंचला Leveller ची तरतुद केलेली असावी.

४) बेंच फ्रेमसाठी फुल वेल्डींग केलेली असावी.

५) बेंचला टॉप, सिट व बॅकरेस्ट बसवितांना Prefitted Insert सह ३३ नग Allen Screw वापरण्यात आलेले असावेत.

६) दोन्ही Base,Square Pipe मधोमध वाकू नये म्हणून प्रत्येक पाईपला Leveller सह सपोर्टची तरतुद केलेली असावी.

७) आपण ठरविलेल्या बेंचचे डिझाईन हे प्रत्यक्ष वापरणेसाठी आरामदायी होईल याचा विचार करण्यात आलेला आहे.

कनिष्ठ महाविदयालय यांनी सन मार्च २०१४ मध्ये खरेदी केलेल्या बेंचेसच्या दरामध्ये १५ % वाढ गृहीत धरुन प्रति नग रु.१००००/- नुसार ५५० नग बेंचेस करीता एकुण अंदाजे रक्कम रु.५५,००,०००/- इतका खर्च वरील संदर्भ क्र.४ चे टिपणीत नमुद केले होते. सध्याचा बाजारभावाचा अंदाज घेणेकामी संदर्भ क्र५ नुसार मे.गोदरेज ॲण्ड बॉईस मॅन्यू.कंपनी लि.,पुणे यांना पत्रक.७६१/६०५१ दि.२७/०२/२०१७ पाठवून व ई – मेल करुन आपण दिलेल्या साईज व साहित्या नुसार दर मागणी करण्यात आले. त्यानुसार संदर्भ क्र.६ अन्वये दर प्राप्त झालेले आहेत.तथापी मे.गोदरेज यांनी बेंचेसला प्रस्तावित केलेल्या Square Pipe साईजमध्ये कपात केल्याचे निर्दशनास आल्यामुळे त्यांना आपल्या दर्जानुसार दर पाठविण्यास कळविण्यात आले. त्यानुसार मे.गोदरेज ॲण्ड बॉईस मॅन्यू.कंपनी लि.,पुणे यांनी ई – मेलव्दारे दि.२६/०५/२०१७ रोजी पाठविलेले दर खालीलनप्रमाणे आहेत.

प्रति नग बेंच रु.७३५०/- + टॅक्स रु.११००/- = रु.८४५०/- आपले शैक्षणीक संकुलासाठी एकुण ५५० बेंचकरीता एकुण रक्कम रु.४०,४२,५००/- +टॅक्स रु.६,०६,३७५/- = रु.४६,४८,८७५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

कन्या विदया मंदिर व कनिष्ट महाविद्यालय , इंग्लिश मेडीयम स्कुल व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचेसाठी ८ वी ते १२ वी वयोगटासाठी आवश्यक ५५० बेंचेसचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क. | बेंचेसचा तपशिल | आवश्यक नग | स्पेसिफिकेशन | अंदाजे दर | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | औदयोगिक प्रशिक्षण संस्था | ३०० नग | 1050 mmX 915 mm H2 X744 mm | 7350/- + Tax | |
| २ | कनिष्ठ महाविदयालय | १०० नग | | | |
| ३ | इंग्लिश मेडीयम स्कुल | ५० नग | | | |
| ४ | कन्या विदया मंदिर | १०० नग | | | |
| | एकुण | ५५० नग | | | ४०,४२,५००.०० |
| | सर्व कर अंदाजे १५ % | | | | ६,०६,३७५.०० |
| | एकुण खर्च | | | | ४६,४८,८७५.०० |

**मागणी**:- विदयार्थी/ प्रशिक्षणार्थ्यांना क्लासरुममध्ये बसण्यासाठी आवश्यक असलेले बेंचेस खरेदी करणेकामी प्रति नग रु.८४५०/- प्रमाणे आपले शैक्षणीक संकुलासाठी एकुण ५५० बेंचकरीता एकुण रक्कम रु.४६,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच सदरचा विषय मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेमध्ये ठेवून मान्यता मिळालेनंतर बेंचेस खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत ई – निविदा प्रक्रिया राबवुन बेंच खरेदी करता येतील.

**अनुमान** :- वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत** :- शैक्षणिक संकुलातील विदयार्थी/प्रशिक्षणार्थ्यांना क्लासरुममध्ये बसणेसाठी बेंचेस खरेदी विभागामार्फत ई – निविदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणेस, खरेदीकामी अंदाजे खर्च रक्कम रु. ४६,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदरील बेंचेस खरेदी विभागामार्फत विहीत प्रचलित पध्दतीने खरेदीकामी निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सादर.

**निर्णय क्र.६३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी/ प्रशिक्षणार्थी यांचेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ५५० नग बेंचेस खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४६,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, आय.टी.आय.)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.११९** **श्री साईबाबा रुग्णालयातील पॅथोलॉजी विभागाकरीता कार्यालयीन फर्निचर मंजूर दराने खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील पॅथोलॉजी विभागात वेगवेगळ्या रक्ताच्या तपासण्या केल्या जातात. पॅथोलॉजी विभागाने कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No. | Description | Qty. |
|---|---|---|
| 1 | Revolving Chair half back rest with side arm with wheel | 5 |
| 2 | Revolving Chair full back rest with side arm with wheel | 2 |
| 3 | Office Table with Squre Tubular Frame 3 Drawer with in one Side & Box with one Shelf On Other. | 3 |

दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभा निर्णय क्र.५०५ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागांनी विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरविहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.५,५५,२००/- (अक्षरी रुपये पाच लाख पंचावन्न हजार दोनशे मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मान्यता मिळालेली होती. त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या त्यास अनुसरुन एकूण ०६ निविदा प्राप्त झाल्या होत्या. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त होणाऱ्या तांत्रिक निविदा (Technical Bid) दि.२०/०३/२०१७ रोजीचे मा. उपसमिती सभेत समक्ष उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. तर सदर कमर्शियल ई निविदा दि.०६/०५/२०१७ रोजीचे खरेदी समिती सभेत समक्ष उघडण्यात आलेले असून निम्नतम दरानूसार Revolving Chair half back rest with side arm with wheel करीता M/s. Shree Impex, Shrirampurयाना प्रती नग दर रक्कम रु. ४०००/- याप्रमाणे,Revolving Chair full back rest with side arm with wheel करीता M/s. Arihant Engineering Works, Aurangabad याना प्रती नग दर रक्कम रु. ६५००/- याप्रमाणे व Office Table with Squre Tubular Frame 3 Drawer with in one Side & Box with one Shelf On Other.Size – 60" X 30" करीता M/s. Arihant Engineering Works, Aurangabad याना प्रती नग दर रक्कम रु. ६५००/- याप्रमाणे पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळालेली आहे. सदर मंजूर दरानुसार उपरोक्त फर्निचर खरेदीचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Revolving Chair half back rest with side arm with wheel | 5 | 4000.00 | 20000.00 |
| 2 | Revolving Chair full back rest with side arm with wheel | 2 | 6500.00 | 13000.00 |
| 3 | Office Table with Squre Tubular Frame 3 Drawer with in one Side & Box with one Shelf On Other.<br>Size – 60" X 30" | 3 | 6500.00 | 19500.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **52500.00** |

उपरोक्त फर्निचर खरेदीकामी रक्कम रु.५२५००/- इतका खर्च येणार आहे.

**मागणी –**श्री साईबाबा रुग्णालयातील पॅथोलॉजी विभाग यांचे दि.१५/०४/२०१७ रोजीचे मागणी पत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि.२५/०४/२०१७)

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. 3.3.2 पुनर्प्रत्ययी आदेश – पूर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुनर्प्रत्ययी आदेश, सुरुवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महीन्याच्या कालावधीच्या पूर्वी देता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभा निर्णय क्र.५०५ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागांनी विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरविहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.५,५५,२००/- (अक्षरी रुपये पाच लाख पंचावन्न हजार दोनशे मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मान्यता मिळालेली होती. त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या त्यास अनुसरुन एकूण ०६ निविदा प्राप्त झाल्या होत्या. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त होणाऱ्या तांत्रिक निविदा (Technical Bid) दि.२०/०३/२०१७ रोजीचे मा. उपसमिती सभेत समक्ष उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. तर सदर कमर्शियल ई निविदा दि.०६/०५/२०१७ रोजीचे खरेदी समिती सभेत समक्ष उघडण्यात आलेले असून निम्नतम दरानूसार Revolving Chair half back rest with side arm with wheel करीता M/s. M/s. Shree Impex, Shrirampur याना प्रती नग दर रक्कम रु.४०००/- याप्रमाणे,Revolving Chair full back rest with side arm with wheel करीता M/s. Arihant Engineering Works, Aurangabad याना प्रती नग दर रक्कम रु. ६५००/- याप्रमाणे व Office Table with Squre Tubular Frame 3 Drawer with in one Side & Box with one Shelf On Other.Size – 60" X 30" करीता M/s. Arihant Engineering Works, Aurangabad याना प्रती नग दर रक्कम रु. ६५००/- याप्रमाणे पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळालेली आहे. सदर मंजूर दरानूसार उपरोक्त फर्निचर खरेदीकामी रक्कम रु.५२५००/- इतका खर्च येईल.

तरी उपरोक्त कार्यालयीन फर्निचर मंजूर दराने खरेदीसव याकामी येणा-या रक्कम रु.५२५००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील पॅथोलॉजी विभागाकरीता कार्यालयीन फर्निचर मागील मंजूर दराने खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१२०** **श्री साईबाबा रुग्णालय व साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता फर्निचर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाने विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. ब-याच वार्ड/ विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, तर काही विभाग हे नव्याने चालू झालेले आहेत. त्यामुळे वार्ड / विभागाने सोबतच्या तक्त्यापमाणे मागणी केलेली आहे.

उपरोक्त विभागांसाठी फर्निचरची खरेदीकामी अंदाजे रक्कमेसाठी M/s. Sai Enterprises, Shrirampur यांनी दिलेल्या कोटेशन नुसार विविध वार्ड/ विभागासाठी फर्निचर खरेदीकामी अंदाजे ७,३१,५४४/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी</u> –** सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे.

| Sr.No. | Description | Total Qty | Rate per in Rs. | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Revolving chair full back rest with side arm with wheel | 25 | 6500.00 | 162500.00 |
| 2 | Bed side Locker | 17 | 3000.00 | 51000.00 |
| 3 | Fowler bed (Hydrolic) | 5 | 8900.00 | 44500.00 |
| 4 | E.C.G. machine Trolley | 6 | 3500.00 | 21000.00 |
| 5 | 5 Seater chair | 10 | 8500.00 | 85000.00 |
| 6 | Trolly for Defibrillator Machine | 2 | 6500.00 | 13000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | Personal Locker (1*6) | 4 | 10000.00 | 40000.00 |
| 8 | Crash cort trolly with alkon box | 2 | 4500.00 | 9000.00 |
| 9 | Dressing drum (big) | 3 | 7000.00 | 21000.00 |
| 10 | Plastic chair | 17 | 750.00 | 12750.00 |
| 11 | Cardiac Table | 4 | 9000.00 | 36000.00 |
| 12 | Office Table with Drawer | 13 | 5000.00 | 65000.00 |
| 13 | Dressing Trolly | 6 | 3500.00 | 21000.00 |
| 14 | Cupboards | 6 | 20799.00 | 124794.00 |
| 15 | Wheel Chair | 1 | 5000.00 | 5000.00 |
| 16 | Plastic Stool | 50 | 400.00 | 20000.00 |
| | | | **Total Amt.in Rs.** | **731544.00** |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७– २ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाने विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. ब-याच वार्ड/ विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, तर काही विभाग हे नव्याने चालू झालेले आहेत. त्यामुळे वार्ड/ विभागाचे मागणीप्रमाणे नविन हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करुन देता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे मागणी केलेले हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.७,३१,५४४/-(अक्षरी रुपये सात लाख एकतीस हजार पाचशे चव्वेचाळीस मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालय व साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता प्रस्तावात नमुद केलेले फर्निचर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,३१,५४४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१२१** **सोने चांदी व इतर धातू शुध्दता तपासणी यंत्र (Gold-Silver Purity Analyzer/Tester Instrument) तसेच आटणी यंत्र (Melting Instrument) खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ) प्रास्ताविक-** श्री साईचे समाधी दर्शनासाठीश्री क्षेत्र शिर्डी येथे देश-विदेशातून हजारो साईभक्त दररोज येत असतात. शिर्डी येथे येणारे साईभक्त श्री साईचे चरणी रोख रक्कम तसेच सोने-चांदी व इतर मौल्यवान वस्तू देणगी स्वरुपात श्रध्देने अर्पण करीत असतात. देणगीदार भक्तांना देणगी देणे सोयीचे व्हावे म्हणून संस्थान व्यवस्थापनामार्फत मंदिर परिसरासह संस्थान परिसरात विविध ठिकाणी देणगी काऊंटर्ससह, सिलबंद दान / देणगी पेटयांची व्यवस्था करणेत आलेली आहे. दान / देणगी पेट्यांतून प्राप्त होणा-या दानाची मोजदाद प्रत्येक आठवडयास साधारणतः मंगळवार व शुक्रवार या दोन दिवशी करणेत येत असते. या दान / देणगी पेट्यांतून सोने-चांदी, तांबे-पितळ, स्टिलसह इतर धातूच्या स्वरुपात अलंकार/ वस्तू प्राप्त होत असतात. तसेच काही साईभक्त समक्ष लेखाशाखेत येऊन सोने-चांदी वस्तू/ अलंकार देणगी स्वरुपात देत असतात.

सध्या अशा देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने-चांदी वस्तूंचा कस लावून मुल्यांकन करणेसाठी संस्थान व्यवस्थापनामार्फत स्थानिक स्तरावरील तीन (०३) मुल्यांकनकारांची (सोनारांची / सराफांची) नाममात्र मानधन तत्वावर नेमणूक करणेत आलेली आहे. सदरचे मुल्यांकनकार संस्थानचे निरोपानुसार देणगी पेटी मोजणीचे वेळेस समक्ष हजर राहून, मानवी पध्दतीने सोने-चांदी वस्तूंचा/ अलंकारांचा कस लावून, तपासणी करुन बाजारभावानुसार मुल्यांकन करुन देत असतात. अशा मुल्यांकन केलेल्या सोने-चांदीच्या वस्तूंची देणगी पावती झालेनंतर सिलबंद करुन लेखाशाखेकडील सुरक्षागृहात जमा करुन ठेवणेत येत आहेत.

मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांनी देणगी / दानपेटी मोजणी कामकाजाची पहाणी केली असतां, सोने-चांदी वस्तूंचे मुल्यांकनासाठी मानवी पध्दतीसह यांत्रिक तंत्रज्ञान पध्दतीने मुल्यांकन करणेची पध्दत सुरु करणेबाबत सुचित केलेले आहे.

मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांनी सुचित केलेनुसार, संकेतस्थळावरुन सोने-चांदी धातू तपासणी यंत्राबाबत माहिती घेतली असतां, विविध उत्पादक कंपन्यांचे, विविध क्षमतेचे / स्वरुपातील सोने-चांदी धातू तपासणी यंत्रे/ उपकरणे (Gold-Silver Purity Analyzer / Tester Machines)उपलब्ध असल्याचे लक्षात आले. अशा उत्पादक कंपन्यांपैकी दोन-तीन कंपन्यांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून सोने-चांदी धातू तपासणी यंत्राविषयी माहिती घेणेत आली. तसेच या कंपन्यांपैकी एका मुंबईस्थित कंपनीने दिनांक१७ मार्च, २०१७ रोजीचे देणगी मोजणीचे वेळेस शिर्डी येथे विषयांकित तपासणी यंत्रासह समक्ष उपस्थित राहून त्याचे प्रात्यक्षिक मा. प्रशासकीय अधिकारी, मा. मुख्य लेखाधिकारी व इतर अधिकारी-कर्मचारी यांना दिलेले आहे. त्याबाबत थोडक्यात माहिती-वजा-तपशील खालील परिच्छेदात स्वतंत्रपणे दिला आहे.

**(ब )** सध्या बाजारपेठेत विविध कंपन्यांचीठराविक वैशिष्टयांची सोनेचांदी धातू तपासणी उपकरणे उपलब्ध आहेत. या उपकरणांची सर्वसाधारण व सर्वसामान्य माहिती (ई-मेलव्दारे प्राप्त झालेल्या तांत्रिक माहिती पत्रकांवरुन) खालीलप्रमाणे –

DetectableElements - Titanium to Uranium.
Measurement Results - Gold, Silver, Copper, Iron, Cadmium, Nickel, Tin, Cobalt etc.
Sensor - Silicon – Pin Diode Detectors, Collimator
Test Point Area - 0.5 mm
Testing Time - 10 seconds to 200 seconds
Accuracy - +/- 0.5% to +/- 0.15% variant as per elements
Dimensions of Testing Chamber – as per various models Length / Height approx. (L) 210/230mm (H) 80-90mm
Power Supply - 210-230V
Weight - Variant approx. 8 to 12 kg
Interface Computer- Inbuilt
Software - User friendly Operating system
Printer/Keyboard/Mouse- External / Optional
Price Range - Approx. Rs. 12 to 16 lakhs as per available various modelsin markets.

उपरोक्त वैशिष्टयांमध्ये कंपनीनिहाय / उपकरण क्षमतेनिहाय बदल होऊ शकतो.

सोने-चांदी धातूंचे मुल्यांकनासाठी वर नमुद केलेप्रमाणे तपासणी यंत्र/ उपकरणे वापरावयाची ठरल्यास त्याचे फायदे-तोटे पहाणे आवश्यक आहे.

**०१.** संस्थानला देणगी रुपाने मोठया स्वरुपाच्या देणगी सोने-चांदी वस्तू (उदा. मुकूट, छत्र, पेला, लोटा, सिंहासन, घंगाळ, ताट, परात इत्यादी ) प्राप्त होत असतात, अशा वस्तुंचे शुध्दतेची तपासणी करावयाची ठरल्यास त्यासाठी मानवी पध्दतच वापरावी लागेल.

**०२.** संस्थानलादेणगी रुपाने दान पेटीत अत्यंत लहान वस्तू जसे सोने-चांदीची पाऊले, हात, नाणी, डोळे, पाळणे, पैंजण ईत्यादी अथवा भक्तांचे श्रध्देनुसार तयार केलेल्या वस्तू मोठ्या प्रमाणात प्राप्त होत असतात. अशा वस्तूंचे मुल्यांकन उपकरणांव्दारे करणे अत्यंत वेळकाढूपणाचे होऊ शकते. त्यासाठी अशा लहान स्वरुपातील वस्तू प्राथमिक स्तरावर मेल्टींग (आटणी करुन / वितळवून) करुन त्यांचे कांडया / बिस्किट स्वरुपात रुपांतर करुन त्यांचे शुध्दतेची तपासणी करावी लागेल. यासाठी बाजारपेठेमध्ये स्वतंत्ररित्या उपलब्ध असलेले विद्युत / गॅसवरील मेल्टींग उपकरण उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील.

**०३.** सोने-चांदी शुध्दता तपासणी यंत्र कोणत्याही धातूच्या फक्त ५ मिमी पर्यन्त X-ray /Laserकरुन त्याचे शुध्दतेविषयी अहवाल देत असल्याने,मोठया वस्तूंच्या विविध भागाची तपासणी करणे शक्य होणार नाही. मानवी पध्दतीमध्ये मोठ्या वस्तूंच्या बाबतीत विविध भागाची तपासणी करता येणे शक्य होते. त्यामुळे मोठ्या वस्तूंचे बाबतीत जोखीम पत्करावी लागेल अथवा मानवी तपासणीवर अवलंबून राहून अशा वस्तुंची शुध्दता तपासून मुल्यांकन करावे लागेल.

**०४.** सोने-चांदी धातू शुध्दता तपासणी यंत्र हे अत्यंत संवेदनशील आहे त्याकरीता देणगी मोजणी कक्षात अथवा उचित ठिकाणी स्वतंत्ररित्या वातानुकूलित व धूळविरहीत कक्षाची व्यवस्था करणे गरजेचे राहिल. तसेच सोने-चांदी वस्तू आटणी यंत्राकरीता स्वतंत्र व्यवस्था करावी लागेल

**०५.** सध्या छोट्या व मध्यम स्वरुपाच्या सोने-चांदी वस्तू / अलंकार सांभाळणे व त्यांचे जतन करणे, लेखाशाखेस उपलब्ध असणा-या जागेच्या विनियोगाच्या तसेच सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत जोखमीचे झाले आहे. दान पेटीव्दारे प्राप्त होणा-या छोट्या व मध्यम स्वरुपाच्या सोने-चांदी वस्तू प्राथमिक स्तरावर वितळवून / आटणी करुन (मेल्टींग करुन), त्याची तपासणी यंत्राव्दारे शुध्दता तपासणी करुन मुल्यांकन जरी सोयीचे होणार असलेतरी याकामी लागणारा वेळ व मनुष्यबळ यांचा विचार करतां सदरची यंत्रणा खरेदी करणे उचित होईल किंवा कसे याचा सर्वांगीण विचार होणे आवश्यक आहे.

तसेच संस्थान व्यवस्थापनामार्फत ठराविक कालावधीनंतर अशा देणगी व्दारेप्राप्त होणारे सोने-चांदी वस्तूंचे एकत्रितरित्या आटणी (मेल्टींग) शासकीय रिफायनरीत केले जाते. त्यामुळे संस्थानमार्फत प्राथमिक स्तरावर मेल्टींग करुन, त्याचे पुन्हा रिफायनरीत मेल्टींग व रिफायनिंग करणे, त्याचा लेखा-जोखा ठेवणे इत्यादी कामांची पुनरावृत्ती होणार आहे.

**(क)** **प्रस्ताव–** उपरोक्त **परिच्छेद अ** व **ब** मध्ये नमुद केलेल्या बाबी विचारात घेतां,दान / देणगी पेटीव्दारे उपलब्ध होणारे सोने-चांदीचे वस्तुंची / अलंकारांची शुध्दता तपासणी करुन, मुल्यांकन करणेकामी सोने-चांदी धातू शुध्दता तपासणी यंत्र / उपकरण तसेच छोट्या-मोठ्या वस्तू प्राथमिक स्तरावर वितळवून / आटणी करुन (मेल्टींग) करणेसाठी आटणी यंत्र (मेल्टींग इन्स्ट्रूमेंट) एकत्रितरित्या उपलब्ध करुन घ्यावयाचे ठरल्यास, याकामी अंदाजे रुपये १२ ते १३ लाख मात्र खर्च येण्याची शक्यता आहे. तसेच याकामी करावी लागणारी जागेची स्वतंत्र व्यवस्था व सुविधा यासाठीही अतिरिक्त खर्च येणार आहे. सदरहू साहित्य खरेदीस मान्यता मिळालेस,विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करावी लागेल.

तरी उपरोक्त प्रमाणे सोने-चांदी शुध्दता तपासणी उपकरण व आटणी यंत्र खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजित खर्च रक्कम रुपये १३ लाख मात्र पर्यन्तचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.६४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सोने चांदी व इतर धातूंची शुध्दता तपासणी करणेकामी यंत्र (Gold-Silver Purity Analyzer/ Tester Instrument) तसेच आटणी यंत्र (Melting Instrument) विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१२२** **माहे मार्च २०१७ जमा-खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे मार्च २०१७ या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून माहे मार्च २०१७ या महिन्याचा जमा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे –

| महिना | जमा | खर्च |
|---|---|---|
| मार्च २०१७ | ५७,९७,०६,३९५/- | ३०,९४,२१,९९२/- |

लेखाविषयक (Accounting) नोंदी घेण्याकरिता कॉग्नीझंट मार्फत ईआरपी संगणक प्रणाली विकासीकरण चालु असल्याने त्यामधून अदयाप जमा खर्च तक्ते/विवरणे मिळत नाही. त्यामुळे टॅली या संगणक प्रणालीध्ये लेखाविषयक नोंदी घेऊन जमा-खर्च तक्ते तयार करावे लागल्याने काहीसा विलंब होत आहे.

लेखापुस्तकांचे अंतिमिकरण होऊन लेखापरिक्षण होणे आहे. तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे मार्च २०१७ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.६४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे मार्च- २०१७ मधील जमा-खर्च तक्त्याची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१२३** **माहे एप्रिल व मे २०१७ जमा-खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे एप्रिल व मे २०१७ या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून माहे एप्रिल व मे २०१७ या महिन्याचा जमा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे -

| महिना | जमा | खर्च |
|---|---|---|
| एप्रिल २०१७ | ४२,८८,४३,९६१/- | १,०६,३९,१०४/- |
| मे २०१७ | ४९,४७,४८,००६/- | १३,३९,५२,९३३/- |

लेखाविषयक (Accounting) नोंदी घेण्याकरिता कॉग्नीझंट मार्फत ईआरपी संगणक प्रणाली विकासीकरण चालु असल्याने त्यामधून अदयाप जमा खर्च तक्ते/विवरणे मिळत नाही. त्यामुळे टॅली या संगणक प्रणालीध्ये लेखाविषयक नोंदी घेऊन जमा-खर्च तक्ते तयार करावे लागल्याने काहीसा विलंब होत आहे.

लेखापुस्तकांचे अंतिमिकरण होऊन लेखापरिक्षण होणे आहे. तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे एप्रिल व मे २०१७ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.६४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल व मे २०१७ मधील जमा-खर्च तक्त्याची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१२४** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो मेडीकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडीकल स्टोअरच्या व्यवहारात माहे एप्रिल २०१६ ते मे २०१७ कालावधीतील उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** जा.क्रं.एसएसएस/ एसएसबीएच-स्टोअर/ ४८९०/ दि.१८.०३.२०१० अन्वये दि.०१.०४.२०१० पासुन पाच वर्षाकरीता श्री साईबाबा हॉस्पिटल मध्ये अपोलो फार्मासी एन्टरप्राईझेस लि. चेन्नई या कंपनीस ना नफा ना तोटा तत्वावर मेडीकल स्टोअर चालविण्यासाठी देण्यात आले आहे. मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्रं.१२९/ १६.०४.२०१५ अन्वये पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मेडीकल स्टोअरच्या व्यवहारांमध्ये झालेल्या उत्पन्नातुन प्रत्यक्ष खर्च व मा.व्य.स.चे निर्णयास अनुसरुन काही निवडक औषधांवर मंजुर करण्यात आलेली सवलत वजा जाता मिळालेले उत्पन्न मे.अपोलो फार्मसी एन्टरप्राईझेस लि.चैन्नई हे संस्थानला देणगी स्वरुपात देत आहे. निर्णय क्रं. ५६४/दि.२६.०६.२०१४ अन्वये, देणगी रकमेचा प्रस्ताव प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करणेत येऊन, आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा. व्यवस्थापन समितीसमोर नोंद घेणेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. **माहे एप्रिल २०१६ ते मे २०१७** या कालावधीत श्री साईबाबा हॉस्पिटल मधील अपोलो मेडिकल स्टोअर पासुन मिळालेल्या देणगीचा अहवाल खालीलप्रमाणे-

| Month | Sales of Medicine | Gross Profit after VAT | Operating Charges | Charity/ Discount in Medicine | Net Profit as Donation | Approx % of sale |
|---|---|---|---|---|---|---|
| Apr.-16 | 29,92,145 | 9,16,639 | 3,66,106 | 2,23,113 | 5,50,533 | 18 |
| May-16 | 36,28,406 | 10,63,930 | 3,56,699 | 2,86,810 | 7,07,231 | 19 |
| Jun-16 | 34,88,151 | 9,25,182 | 3,52,079 | 2,04,139 | 5,73,103 | 16 |
| July-16 | 32,88,869 | 9,48,136 | 3,45,480 | 2,63,379 | 6,02,657 | 18 |
| Aug.-16 | 37,25,576 | 11,55,167 | 3,33,985 | 3,29,846 | 8,21,183 | 22 |
| Sep.-16 | 37,11,997 | 10,84,292 | 3,73,837 | 3,08,689 | 7,10,455 | 19 |
| Oct.-16 | 31,64,192 | 9,10,140 | 3,58,692 | 2,60,601 | 5,51,448 | 17 |
| Nov.-16 | 37,04,157 | 10,80,152 | 3,29,010 | 3,30,119 | 7,51,143 | 20 |
| Dec.-16 | 34,46,044 | 8,91,530 | 3,70,413 | 2,73,843 | 5,21,117 | 15 |
| Jan.-17 | 35,69,714 | 10,80,119 | 3,52,482 | 2,61,297 | 7,27,638 | 20 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Feb.-17 | 34,00,066 | 10,45,482 | 3,84,874 | 2,65,537 | 6,60,608 | 19 |
| Mar.-17 | 34,71,067 | 11,31,205 | 3,71,001 | 3,22,024 | 7,60,203 | 22 |
| Apr.-17 | 30,06,829 | 9,24,365 | 3,57,667 | 2,84,532 | 5,66,698 | 19 |
| May-17 | 33,10,548 | 9,66,581 | 3,39,911 | 3,17,672 | 6,26,670 | 19 |
| **Total** | **4,79,07,761** | **1,41,22,920** | **49,92,236** | **39,31,601** | **91,30,687** | **19** |

उपरोक्तप्रमाणे प्रत्यक्ष खर्च व दिलेली सवलत वजा जाता मिळालेल्या देणगी रकमेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे नोंद घेणेसाठी सादर.

**निर्णय क्र.६४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अपोलो मेडीकल्स यांना श्री साईबाबा रुग्णालयामध्ये चालविण्यास दिलेल्या मेडीकल स्टोअरच्या संपुर्ण कालावधीचे विशेष लेखापरिक्षण तातडीने करुन घेण्यात यावे. तोपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१२५** **श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अपोलो मेडीकल्स यांना चालविण्यास दिलेल्या मेडीकल स्टोअरच्या व्यवहारात माहे एप्रिल २०१६ ते मे २०१७ कालावधीतील उत्पन्नाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** जा.क्रं.एसएसएस/ एसएसबीएच-स्टोअर/ ५६८६/ दि.२३.१२.२०१० अन्वये दि.०१.०१.२०११ पासुन पाच वर्षाकरीता श्री साईनाथ हॉस्पिटल मध्ये अपोलो फार्मासी एन्टरप्राईझेस लि. चेन्नई या कंपनीस ना नफा ना तोटा तत्वावर मेडीकल स्टोअर चालविण्यासाठी देण्यात आले आहे. मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय क्रं.१२९/ १६.०४.२०१५ अन्वये पुढील आदेश होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मेडीकल स्टोअरच्या व्यवहारांमध्ये झालेल्या उत्पन्नातुन प्रत्यक्ष खर्च वजा जाता मिळालेले उत्पन्न मे. अपोलो फार्मसी एन्टरप्राईझेस लि.चैन्नई हे संस्थानला देणगी स्वरुपात देत आहे. निर्णय क्रं. ५६४/दि.२६.०६.२०१४ अन्वये, देणगी रकमेचा प्रस्ताव प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करणेत येऊन, आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा. व्यवस्थापन समितीसमोर नोंद घेणेसाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे एप्रिल २०१६ ते मे २०१७ या कालावधीत श्री साईनाथ हॉस्पिटल मधील अपोलो मेडिकल स्टोअर पासुन मिळालेल्या देणगीचा अहवाल खालीलप्रमाणे.

| Month | Sales of Medicine | Gross Profit after VAT | Operating Charges | Net Profit as Donation | Approx % of sale |
|---|---|---|---|---|---|
| Apr.-16 | 5,87,164 | 1,52,838 | 1,41,712 | 11,126 | 2 |
| May-16 | 6,42,679 | 1,50,101 | 1,35,244 | 14,857 | 2 |
| Jun-16 | 6,15,165 | 1,53,112 | 1,25,217 | 27,895 | 5 |
| July-16 | 6,25,814 | 1,43,368 | 1,21,514 | 21,854 | 3 |
| Aug.-16 | 7,53,371 | 2,39,746 | 1,09,079 | 1,30,667 | 17 |
| Sep.-16 | 6,49,933 | 1,72,601 | 86,927 | 85,674 | 13 |
| Oct.-16 | 4,88,835 | 1,29,640 | 88,767 | 40,873 | 8 |
| Nov.-16 | 6,51,965 | 1,66,203 | 86,794 | 79,409 | 12 |
| Dec.-16 | 5,01,799 | 1,17,377 | 1,03,397 | 13,980 | 3 |
| Jan.-17 | 5,23,057 | 1,25,117 | 94,766 | 30,351 | 6 |
| Feb.-17 | 5,03,105 | 1,24,076 | 94,155 | 29,921 | 6 |
| Mar.-17 | 6,08,641 | 1,55,703 | 97,005 | 58,698 | 10 |
| Apr.-17 | 5,97,089 | 1,52,658 | 89,973 | 62,684 | 10 |
| May-17 | 4,30,287 | 1,03,941 | 85,072 | 18,869 | 4 |
| **Total** | **81,78,904** | **20,86,481** | **14,59,622** | **6,26,858** | **7** |

उपरोक्तप्रमाणे प्रत्यक्ष खर्च व दिलेली सवलत वजा जाता मिळालेल्या देणगी रकमेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे नोंद घेणेसाठी सादर.

**निर्णय क्र.६४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अपोलो मेडीकल्स यांना श्री साईनाथ रुग्णालयामध्ये चालविण्यास दिलेल्या मेडीकल स्टोअरच्या संपुर्ण कालावधीचे विशेष लेखापरिक्षण तातडीने करुन घेण्यात यावे. तोपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१२६ माहे डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीतील प्रयोगशाळांचे तपासणी अहवाल.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०० नुसार **"**यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्या गावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस, नासिक या NABL मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी**"**, असे ठरलेले आहे.

त्यानुसार भांडार विभागास प्राप्त होणा-या प्रत्येक नविन बॅचचे गावरान तुपाचे नमुन्यांची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करणेत येत आहे. याशिवाय संस्थानची श्री साई प्रसादालयातील प्रयोगशाळा कार्यान्वीत झालेपासुन किराणा माल, गावरान तुप व खाद्यतेलाचे प्रत्येक बॅचचे नमुन्यांची तपासणी त्यांचेकडुनही केली जात आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे. त्यानुसार माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर २०१६ व माहे डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीतील तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर केले आहेत.

आता माहे मार्च २०१७ते मे २०१७ या कालावधीतील तपासणी अहवालाचे परिशिष्ठ यासोबत अवलोकनार्थ सादर केले आहे. गावरान तुपाचे प्रत्येक तपासणी अहवालात "The analysed food sample complies with Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulations,2011 (for which limits have been mentioned) with respect to the parameters tested." असे नमुद आहे. उपरोक्त तपासणी अहवालाचे आधारे सदरचे गावरानतुपाचा पुरवठा वेळोवेळी संस्थानचे विविध विभागांना करणेत आलेला आहे.

तरी सोबतचे परिशिष्ठ (पा.नं.१ ते २) प्रमाणे प्रयोगशाळा तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढेअवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.६४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीतील प्रयोगशाळांचे तपासणी अहवालांचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**विषय नं.१२७ माहे मार्च २०१७ ते मे २०१७ या कालावधीतील प्रयोगशाळांचे तपासणी अहवाल.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०० नुसार **"**यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्यागावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी**"**, असे ठरलेले आहे.

त्यानुसार भांडार विभागास प्राप्त होणा-या प्रत्येक नविन बॅचचे गावरान तुपाचे नमुन्यांची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडुन करणेत येत आहे. याशिवाय संस्थानची श्री साई प्रसादालयातील प्रयोगशाळा कार्यान्वीत झालेपासुन किराणा माल, गावरान तुप व खाद्यतेलाचे प्रत्येक बॅचचे नमुन्यांची तपासणी त्यांचेकडुनही केली जात आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे. त्यानुसार माहे सप्टेंबर ते नोव्हेंबर २०१६ व माहे डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीतील तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर केले आहेत.

आता माहे मार्च २०१७ते मे २०१७ या कालावधीतील तपासणी अहवालाचे परिशिष्ठ यासोबत अवलोकनार्थ सादर केले आहे. गावरान तुपाचे प्रत्येक तपासणी अहवालात "The analysed food sample complies with Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulations,2011 (for which limits have been mentioned) with respect to the parameters tested." असे नमुद आहे. उपरोक्त तपासणी अहवालाचे आधारे सदरचे गावरानतुपाचा पुरवठा वेळोवेळी संस्थानचे विविध विभागांना करणेत आलेला आहे.

तरी सोबतचे परिशिष्ठ (पा.नं.१ ते २) प्रमाणे प्रयोगशाळा तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढेअवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.६४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीतील प्रयोगशाळांचे तपासणी अहवालांचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **शिर्डी सर्व्हे नं.२/४, ३/१, ३/७ मधील साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारती पाडणेकामी प्राप्त झालेल्या निविदांमधील उघडण्यात आलेल्या वाणिज्यीक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद :**

| **अ.नं.** | **कलम** | **कलम तरतुदीचे शीर्षक** | **पोटकलम/ उपकलम क्रमांक** | **तरतुदीचा तपशिल** |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (ग) | **भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी** व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी **सोयी व सुविधा पूरविणे.** |

**मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय:** दि.२७/०३/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.२४१:

*"…. यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोयीसाठी दि.१२/१२/२०१६ पासून बायोमेट्रीक बेस टाईम स्लॉट दर्शनव्यवस्था सुरु करण्यात आलेली आहे. या प्रणालीमध्ये साईभक्तांना श्रींचे दर्शनासाठी दर्शनरांगेमध्ये जाणेसाठीची वेळ मिळते. यामुळे पुर्वी प्रस्तावीत करण्यात आलेल्या ३०,००० साईभक्तांच्या क्षमतेच्या व रु.३४०.२० कोटी मात्र खर्चाच्या मोठ्या स्वरुपाच्या प्रकल्पाची आता आवश्यकता नाही. त्याकरीता साईनिवास अतिथीगृह व सुलभ शौचालय या इमारती आहे तशाच ठेवून फक्त जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या जुन्या इमारती काढून त्या ठिकाणी नवीन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणेस मान्यता देण्यात आली.*

*तसेच याकामी आर्किटेक्ट माथुर अॅण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेकडून नियोजित इमारतींचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. तसेच जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या इमारतींमध्ये साईभक्तांसाठी चालविण्यात येणारे विविध सेवा-सुविधांचे काऊंटर्स योग्य जागेची निश्चिती करणेत येऊन, इतरत्र स्थलांतरीत करण्यात यावे व या जुन्या इमारती पाडणेसाठी (Demolition) प्रथमत: स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्या. याचबरोबर यापुर्वी रु.३४०.२० कोटी मात्र खर्चाच्या प्रकल्पाबाबत शासनाकडे सादर करण्यात आलेल्या दि.२३.०४.२०१६ रोजीचा प्रस्ताव रद्द करणेत येऊन, वरीलप्रमाणे सुधारीत प्रकल्पास राज्य शासनाची मान्यता घेणेसाठी नव्याने प्रस्ताव सादर करणेत यावा,असे ठरले."*

**प्रस्तावना:** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार दि.१६/०६/२०१७ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर तृतीय मागणीची (Third call) जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. ई-निविदांचा कालावधी दि.२२/०६/२०१७ ते २९/०६/२०१७ असा ठेवण्यात आला होता. याकालावधीत ०७ ठेकेदार यांनी ऑनलाईन ई-निविदा सादर केल्या होत्या

| Sr.No | Name of Contractor |
|---|---|
| 01 | A One Enterprises, Mumbai |
| 02 | Classsic Timber, Chennai |
| 03 | M/s. Genesis Engineering, Mumbai |
| 04 | Matte & Associates, Mumbai |
| 05 | New Sani Enterprises, Aurangabad |
| 06 | Shri Ganesh Construction, Mumbai |
| 07 | M/s Star Construction, Mumbai |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक निविदा मा खरेदी समितीचे दि.१२/०७/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार उपरोक्त पैकी खालील ०४ ठेकेदार पात्र झाले आहेत.

| **Sr.No** | **Name of Contractor** |
|---|---|
| 01 | A One Enterprises, Mumbai |
| 02 | Classsic Timber, Chennai |
| 03 | M/s. Genesis Engineering, Mumbai |
| 04 | Shri Ganesh Construction, Mumbai |

उपरोक्त ०४ पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेल्या ई-निविदां मधिल लिफाफा क्र. ०२ (वाणिज्यिक निविदा) दि.१३/०७/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघणेत आला असून, त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| **Sr. No** | **Name of Contracter** | **Amount** | **Remarks** |
|---|---|---|---|
| 01 | **M/s. Genesis Engineering, Mumbai** | **53,89,890/-** | **Highest** |
| 02 | Classsic Timber, Chennai | 32,32,323/- | -- |
| 03 | A One Enterprises, Mumbai | 43,11,000/- | -- |
| 04 | Shri Ganesh Construction, Mumbai | 33,30,000/- | -- |

**प्रस्ताव:** उपरोक्त तपशिलानुसार चार निविदाधारकांपैकी M/s. Genesis Engineering, Mumbai यांचे संस्थानला देऊ केलेली रक्कम सर्वाधिक आहे. त्यांचे उपस्थीत प्रतीनिधी श्री. फिरोज अहमद यांना समितीने विनंती केली असता त्यांनी रु.५४,५१,०००/- मात्र इतकी सुधारीत रक्कम देऊ केली त्यानुसार M/s. Genesis Engineering, Mumbai यांनी दि.१७/०७/२०१७ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे. सदर नियोजीत दर्शनरांग प्रकल्पाकरीता भुखंडावरील सध्याचे अस्तित्वातील इमारती पाडून त्या ठिकाणी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणेसाठी राज्य शासनाचे मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणेत येत आहे. तरी याकामी सर्वाधिक दराचे ठेकेदार M/s. Genesis Engineering, Mumbai यांनी देऊ केलेल्या रु.५४,५१,०००/- इतक्या सुधारीत रकमेनुसार त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र. ६४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शिर्डी सर्व्हे नं.२/४,३/१,३/७ मधील साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारती पाडणेकामी M/s. Genesis Engineering, Mumbai यांनी चर्चेअंती देऊ केलेले अंतीम रु.५४,५१,०००/- मात्र उच्चतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **मंदिर परिसरातील समाधी मंदिर व लगतच्या इमारती साईउद्यान, मंगल कार्यालय, साईनिवास अतिथीगृह, भांडार, सेवाधाम व शांतीनिकेतन इमारतीचे आतील रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** समाधी मंदिर व मंदिर परिसरातील इमारती तसेच साईउदयान, साईनाथ मंगल कार्यालय, साईनिवास अतिथीगृह, मंध्यवर्ती भांडार, सेवाधाम व शांतीनिकेतन या इमारतीचे रंगकाम सन २००८-२००९ या वर्षी झालेले आहे. सदर रंगकामास ०९ वर्ष झालेले आहे. सततच्या वापराने रंगकाम खराब झालेले आहे. संस्थानमार्फत ०१ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ या कालवधीत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करणेत येणार आहे. या कालावधीत देश-विदेशातुन लाखो साईभक्त दर्शनासाठी शिर्डी येथे येणार आहे. संस्थानमार्फत साईभक्तांना मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत संस्थान प्रयत्न करीत आहे. शिर्डी येथे साईचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांना प्रसन्न वाटावे यासाठी समाधी मंदिर व परिसरातील इमारतींचे रंगकाम करणे आवश्यक आहे. रंगकामाकरीता आतील बाजुने लस्टर पेंट व बाहेरील बाजुने अॅपेक्स पेंटचे रंगकाम करुन घेता येईल.

समाधी मंदिर व परिसरातील इमारतीचे आतील रंगकाम करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे

| अ.नं. | कामाचे नाव | खर्च |
|---|---|---|
| १. | **समाधी मंदिर व परिसरातील इमारती** | |
| | अ) आतिल रंगकाम | ३२,८७,३११/- |
| | ब) बाहेरील रंगकाम | ११,६३,६१०/- |
| २. | **साईउद्यान इमारत** | |
| | अ) आतिल रंगकाम | २५,९८,९५१/- |
| | ब) बाहेरील रंगकाम | १२,५२,५२८/- |
| ३. | **साईनाथ मंगल कार्यालय** | |
| | अ) आतिल रंगकाम | १,५३,६७८/- |
| | ब) बाहेरील रंगकाम | २,०४,५४०/- |
| ४. | **साईनिवास अतिथीगृह** | |
| | अ) आतिल रंगकाम | १४,२९,१४८/- |
| | ब) बाहेरील रंगकाम | ७,५७,९४७/- |
| ५. | **मध्यवर्ती भांडार** | ७,५५,४७५/- |
| | एकुण रुपये | **८६,६०,६१८/-** |

उपरोक्तप्रमाणे समाधी मंदिर व परिसरातील इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणेसाठी अहमदनगर जिल्हा दरसुची २०१६-२०१७ मधील दरानुसार रक्कम रु.८६,६०,६१८/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरहु इमारतीचे रंगकाम करणेकामी येणारे रक्कम रु.८६,६०,६१८/- मात्रचे खर्चास व सदरचे काम ई-निविदा मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६४९** **सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी, कार्यकारी अभियंता- बांधकाम विभाग यांनी, वरील कामाचा एकूण अपेक्षित खर्च रु.१,१६,०३,१८८/- मात्र असून प्रस्तावातील तक्त्यामधील साईनिवास अतिथीगृह व मध्यवर्ती भांडार या इमारतींच्या रंगकामाचा अपेक्षित खर्च नजरचुकीने एकूण खर्चात समाविष्ट झालेला नाही, असे सभेच्या निदर्शनास आणून दिले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पहिल्या टप्प्यामध्ये समाधी मंदिर तसेच मंदिर परिसरातील इमारती, साईउद्यान व मंगल कार्यालय या इमारतींचे आतील तसेच बाहेरील भागाचे रंगकाम करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी अंदाजे रु.८६,६०,६१८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**त्याचप्रमाणे यामधील उर्वरित साईनिवास अतिथीगृह व मध्यवर्ती भांडार या इमारतींच्या आतील व बाहेरील भागाचे रंगकाम दुसऱ्या टप्प्यामध्ये करुन घेण्यात यावे, असे ठरले. दुसऱ्या टप्प्यातील इमारतींच्या रंगकामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२९,४२,५७०/- मात्रचे खर्चासही मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **साईसेवक यांचे निवासाकरीता वापर करणेसाठी सेवाधाम इमारतीचे नूतनीकरण करणे अथवा शिर्डी बसस्थानक भक्तनिवास किंवा साई धर्मशाळा इमारतीमध्ये साईसेवक यांची निवासव्यवस्था करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम– २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेत सेवाधाम इमारतीचे नूतनीकरण करुन साईभक्तांच्या निवासाकरीता वापर सुरु करणेबाबत येणारे खर्चास व ई- निविदा मागविणेस मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर सदरहू सभेत निर्णय क्र. ५४ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

" *यावर सविस्तर चर्चा होऊन, असे ठरले की, ठिकठिकाणाहुन पालखी सोबत येणा-या पदयात्रींना साईसेवक म्हणुन संस्थममध्ये सेवा करणेस देणेचे प्रस्तावित असुन या सेवेक-यांच्या निवासासाठी सेवाधाम या इमारतीचा वापर होऊ शकतो, या दृष्टीने सेवाधाम इमारतीचे नुतनीकरण व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव समिती समोर सादर करणेत यावा* "

**प्रस्तावना**: संस्थानचे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं. ११९ मध्ये साईभक्तांचे निवासासाठी सेवाधाम इमारतीचे आर.सी.सी. मध्ये तळमजला, पहीला व दुस-या मजल्याचे बांधकाम सन १९५६ मध्ये पूर्ण करणेत आलेले आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम क्षेत्र १५१२.६४ चौ. मी. आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम होवून ६० वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असून इमारत जुनी झालेली आहे

संस्थानचे मा.अध्यक्ष, त्रिसदस्य समिती तथा जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांनी रविवार दि.१३/०३/२०१६ रोजी संस्थानच्या संपूर्ण मालमत्तेची तसेच आस्थापनेवर कार्यरत असणा-या सर्व विभागांची समक्ष स्थळपहाणी केली आहे. सदरहू स्थळपाहणीचे वेळेस सेवाधाम इमारतीचे बांधकामास ५० वर्षापेक्षा जास्त वर्षे झालेली असल्यामुळे त्या इमारतीचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यात यावे. या ठिकाणी नवीन इमारत बांधकामाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा अशी सूचना केलेली असल्याचे दि.१५/०३/२०१६ रोजीचे परिपत्रकाअन्वये कळविणेत आले होते. याबाबत नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर, यांचेकडून कोटेशन्स मागविणेत येवून, निम्नतम दरात स्ट्रक्चरल इंजिनिअर बर्वे कन्स्टल्टंट, मुंबई यांचेकडून सेवाधाम इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेणेत आलेले आहे.

त्यानुसार बर्वे कन्स्टल्टंट, मुंबई यांनी दि२७/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात नमूद केलेल्या बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चर** : - इमारतीचे कॉलम, बीम, स्लॅब, व स्टील चांगल्या स्थीतीत असून, काही ठिकाणी कॉक्रीटला क्रॅक गेलेले असून, ते दुरुस्त करणे आवश्यक आहे.

**वीट बांधकाम** :- इमारतीचे वीट बांधकाम सुस्थीतीत आहे.

**बाहेरील प्लास्टर** :- बाहेरील प्लास्टर चांगल्या स्थीतीत आहे. लिकेजच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार प्लास्टर करुन घेणेत यावे.

**टेरेस वॉटर प्रुफींग** :- टेरेस स्लॅबचे काही ठिकाणी लिकेज असून, चायना मोझ्याक वॉटर प्रुफींग करणेबाबत सुचविले आहे.

**इमारतीचे अंतर्गत बाबींबाबत:-** आर.सी.सी. कॉलम, बीम, स्लॅबला असलेले किरकोळ क्रेक दुरुस्ती करणेबाबत सुचविले आहे.

**ड्रेनेज लाईन व पिण्याचे पाण्याची पाईप लाईन:-** ड्रेनेजसाठी व पिण्याचे पाण्यासाठी वापरणेत आलेले पाईप खराब झालेले असून, बदलणे आवश्यक आहे.

स्ट्रक्चरल इंजिनिअर, बर्वे कन्सल्टंटस्, मुंबई यांनी सेवाधाम इमारतीचे उपरोक्त नमुद केलेल्या कामांसाठी रक्कम रु.४६ लक्ष मात्रचा खर्च कळविला आहे. बर्वे कंन्सलटंट, स्ट्रक्चरल ऑडीटर, मुंबई यांनी दिलेल्या अहवालानुसार सेवाधाम इमारतीची दुरुस्ती करुन इमारत निवास व्यवस्थेसाठी वापणेस योग्य असलेबाबत कळविले आहे. सदर कामासाठी त्यांनी मुंबई येथील दर विचारात घेऊन ढोबळ मानाने अंदाजपत्रक दिलेले आहेत. इकडील विभागामार्फत याकामासाठी सन- २०१६-१७ चे दरसुचीमधील दरानुसार अंदाजपत्रक तयार केले असुन याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description of Item | Estimated Amount |
|---|---|---|
| A) | Structural repairs | 9,57,209/- |
| B) | Water proofing of Terraces | 2,68,450/- |
| C) | Plumbing Works | 4,36,668/- |
| D) | External and Internal Painting Work | 9,41,265/- |
| E) | Flooring | 8,87,513/- |
| F) | Renovation of Toilet Block | 5,38,387/- |
| | **Total ( A+B+C+D+E+F)** | **40,29,492/-** |

उपरोक्त प्रमाणे सेवाधाम इमारतीचे दुरुस्तीकामी बर्वे कन्सल्टंटस्, मुंबई यांनी वर नमूद केलेल्याकामासाठी तसेच याव्यतिरिक्त सेवाधाम इमारतीचे तळमजला व पहिल्या मजल्यावरील टॉयलेटच्या फ्लोरींग व डॅडोच्या टाईल्स बदलणे, संडास भांडे व दरवाजे बदलणे, तसेच इमारतीचे दुस-या मजल्यावर पुर्वेकडील भागात नवीन ६ संडासचे बांधकाम करणे. इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम, तसेच रुममधील व पॅसेज मधील शहाबाद फरशी काढून सदर ठिकाणी व्हेट्रीफाईड टाईल्स बसविणे इ. किरकोळ कामे करणे आवश्यक आहे. याकामी एकूण रक्कम रु.४०,२९,४९२/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तथापी सेवाधाम इमारतीचे बांधकामास ६० वर्षे पूर्ण झालेली असून इमारत जुनी झालेली आहे. सदर इमारतीमधील खोल्याची साईज लहान असून इमारतीमध्ये तळमजला व पहिल्या मजल्यावर एकूण ११ प्रसाधन गृहाची व्यवस्था असून सदरची व्यवस्था खुपच कमी आहे. दुस-या मजल्यावर प्रसाधन गृहाची व्यवस्था करावी लागेल. याबाबत खालिल पर्यायांचाही विचार करता येईल.

**पर्याय क्र. १-** शिर्डी बसस्थानक वरील संस्थानचे वापराकरीता असलेल्या भक्तनिवास इमारतीमध्ये पहिल्या व दुस-या मजल्यावर प्रत्येकी ५ मोठे,३ लहान हॉल्स असून, ७ अटॅच्ड रुमस् असे एकूण १६ हॉल्स व १४ अटॅच्ड रुमस् आहे. पैकी पहिल्या मजल्यावरील २ हॉल्स कला दालन व लायब्ररीसाठी वापरता येईल. उर्वरीत १४ हॉल्सचा वापर साई सेवक यांचे निवासाकरीता करता येईल. सदर १४ हॉल्समध्ये १६८ साई सेवकांची निवासव्यवस्था होईल.

**पर्याय क्र. २-** साई धर्मशाळा येथे एकूण ६ इमारती असून प्रत्येक इमारतीमध्ये ३२ हॉल्स असे एकूण १९२ हॉल्स आहेत. पैकी एक इमारत ज्युनिअर कॉलेजकरीता देणेत आलेली आहे. उर्वरीत ५ इमारतीचा वापर साईभक्तांचे निवासाकरीता करणेत येतो. सदरहू पाच इमारतीमधील १६० हॉल्सपैकी ३ हॉल मंदिर सुरक्षा विभागाचे पोलीस कर्मचा-यांसाठी देणेत आलेले आहे. तसेच साईनाथ व साईबाबा हॉस्पीटल मधील रुग्णांचे नातेवाईकांसाठी आवश्यकतेनुसार ३ हॉल्स देणेत येतात. साई धर्मशाळा येथील एका इमारतीचा वापर श्री साईसेवकांसाठी करता येईल. सदर एका इमारतीमध्ये एकूण ५७६ साई सेवकांची निवासव्यवस्था होऊ शकेल. त्यापैकी आवश्यकतेनुसार त्यांना हॉल्स उपलब्ध करता येतिल.

**प्रस्तावः-** तरी वरीलपैकी सेवाधाम इमारतीचे नूतनीकरण करणेसाठी येणारे रु.४०,२९,४९२/- मात्र खर्चास व इतर कामासाठी ई– निविदा मागविणेत मान्यता मिळावी.

अथवा

वर नमूद पर्याय क्र. १ व पर्याय क्र.२ यापैकी एका पर्यायाची निवड होऊन त्यानुसार पुढील कार्यवाहीस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमध्ये राबविणेत येणाऱ्या साईसेवक योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या साईसेवकांची निवासव्यवस्था साईधर्मशाळा इमारतीमध्ये विनामुल्य करण्यात यावी.**

**याचवेळी अशीही चर्चा झाली की, मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष संस्थान कामकाजासाठी शिर्डी येथे वेळोवेळी भेट देत असतात, त्यावेळी त्यांना तात्काळ निवासस्थान उपलब्ध व्हावे, याकरीता साईनिवास अतिथीगृहामधील दोन कक्ष मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांचे निवासव्यवस्थेसाठी विनामोबदला राखीव ठेवण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ कामगार अधिकारी/ प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **मौजे निमगाव- कोऱ्हाळे गट नं.८७, ८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकरीता आर्किटेक्ट सुशिल देशमुख यांनी तयार केलेल्या आराखडा व अंदाजपत्रकाचे सादरीकरण पाहून निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.३२२ (३०) अन्वये मौजे निमगांव- को-हाळे गट नं.८७,८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकरीता आर्किटेक्ट सुशिल देशमुख ॲण्ड असोसिएटस्, औरंगाबाद यांना दि०२/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये नेमणूक पत्र देणेत आले आहे.

आर्किटेक्ट यांनी सदर कामाचे अंदाजपत्रक व आराखडा तयार केलेला आहे. तसेच सदर जमिनीचे रेखांकन मंजुरीसाठी प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत मा. सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. आर्किटेक्ट यांनी सदरहू प्रकल्पाचे खालीलप्रमाणे दोन पर्यायी आराखडे व अंदाजपत्रक तयार केलेले आहेत.

| Sr.No. | Option Type | Discription | Built up Area in Sqm. | Cost of Block Estimate in Cr. |
|---|---|---|---|---|
| 01 | Option - I | R.C.C. Building ( Only GF) | 3275.075 | Rs.14.41 Cr. |
| 02 | Option - II | Compositee– PEB + RCC Building (only GF) | 4102.91 | Rs.12.15 Cr. |

**प्रस्तावः-** तरी विषयांकीत कामासाठी आर्किटेक्ट सुशिल देशमुख ॲण्ड असो., औरंगाबाद यांनी तयार केलेल्या दोन पर्यायी आराखंडयांचे सादरीकरण पाहून त्यापैकी एक पर्याय निश्चीत होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५१** **प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकामीचा आराखडा व अंदाजपत्रकाचे सादरीकरण करणेसाठी आर्किटेक्ट सुशिल देशमुख हे सभेसमोर उपस्थित राहून शकले नाही. यामुळे सदरहू सादरीकरण सादर करणेकरीता त्यांना पुढील सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **साईआश्रम- २ धर्मशाळा येथील इमारती फक्त साईभक्तांचे निवासासाठी वापरणेकामी देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमनी, मॅनेजिंग ट्रस्टी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे दि.२७.०६.२०१७ रोजीचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:** देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमनी, मॅनेजिंग ट्रस्टी, शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई यांनी देणगीदाखल साई आश्रम या भक्तनिवास प्रकल्पाचे बांधकाम करून दिलेले आहे. त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे दरम्यान दि.०४/०२/२००६ रोजी Memorandum of Understanding होवुन त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम या भक्तनिवास प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होऊन सदर प्रकल्प दि.११/०४/२०१३ पासून साई भक्तांकरीता खुला करण्यात आलेला आहे.

सदर इमारतींपैकी साईआश्रम-२ धर्मशाळा येथील ४ इमारती संस्थानमार्फत करावयाचे प्रस्तावीत कॅन्सर हॉस्पीटलसाठी वापरणेबाबत श्री. के. व्ही. रमनी, मॅनेजिंग ट्रस्टी, शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई यांना दि.१४/०६/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे कळविण्यात आले आहे.

याबाबत देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमनी, मॅनेजिंग ट्रस्टी, शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई यांनी दि.२७/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

"… 1. Kindly follow in letter and spirit, the MOU signed between us.

2. Use the Sai Ashram 1 & Sai Ashram 2 buildings only for devotees visiting Shirdi.

3. Provide this accommodation to the devotees at a concessional and subsidized cost, without Profit.

4. Kindly arrange to open all the closed building of Sai Ashram2 for devotees immediately.
5. Kindly make alternate arrangement for the junior college within one year and use this building also only for devotees…. "

या पत्राचे अनुषंगाने देणगीदार साईभक्त श्री. के. व्ही. रमनी यांना दि.३०/०६/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे.

"… we discussed about your mail, and change our proposal. Now we are planning to go for open plot for construction of new cancer hospital. We will always follow MOU…"

**प्रस्ताव:** उपरोक्त बाबी विचारात घेता साईआश्रम-२ धर्मशाळा येथील ४ इमारती संस्थानमार्फत करावयाचे प्रस्तावीत कॅन्सर हॉस्पीटलसाठी तसेच महाविद्यालासाठी वापरणेस देणगीदार साईभक्त श्री. के. व्ही. रमनी यांची सहमती दिसून येत नाही. मा.व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ व माहितीस्तव सदरचे पत्र मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमनी, मॅनेजिंग ट्रस्टी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे दि.२७.०६.२०१७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमीत्त महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा.व्यवस्थापन समिती ठराव–** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरुप ठरविणेकामी साईभक्त, शिर्डी ग्रामस्थ तसेच जागतिक साई मंदिर विश्वस्त/पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्राय यावर चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय होणेकामी धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रक मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आले होते. त्यात श्रीरामनवमी उत्सव २०१८ चे कालावधीत कुस्ती स्पर्धांचा समावेश करण्यात आला आहे. सदरहू वेळापत्रकाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"...समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमांची रुपरेषा ठरविणेत येऊन, झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली आहे."

**प्रस्तावना**: श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषित केलेल्या दि.१६/०७/२०१७ रोजीचे पत्रात "पै.वैभव विलास लांडगे, अहमदनगर जिल्हा कुस्ती संघटना, अ.नगर यांनी दि.१६/०७/२०१७ रोजीचे पत्रात कळविलेप्रमाणे श्री साईबाबांचे समाधी शताब्दी निमित्त संस्थान परिसरात दर रामनवमी उत्सवात घेण्यात येणा-या कुस्ती स्पर्धा प्रमाणे कुस्ती स्पर्धा आयोजित करावी. याकरीता अंदाजे रु.८० लाख मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत मांडण्यात येऊन नियमानुसार मंजुरी देण्यात येऊन तसे संबंधीतास कळविण्यात यावे ही, विनंती असे नमूद केले आहे.

पै. वैभव विलास लांडगे यांनी मा अध्यक्ष सो. यांना अग्रेषित केलेल्या दि.१६/०७/२०१७ रोजीचे पत्रात संस्थानतर्फे शताब्दी निमित्त महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे या कुस्ती स्पर्धेचा खर्च

७० ते ८० लाख रुपये एवढा आहे. या कुस्ती स्पर्धेमध्ये १५०० पैलवान सहभागी होणार असून ही स्पर्धा ०५ दिवस चालणार आहे, असे कळविलेले आहे.

**प्रस्ताव:** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच वेळोवेळी मा. व्यवस्थापन झालेल्या बैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते. सदर वेळापत्रकात शताब्दी वर्षात श्रीरामनवमी उत्सवाचे कालावधीत कुस्ती स्पर्धांचे आयोजनाचा समावेश करणेत आलेला आहे. सदरहू वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त निर्णयानुसार श्रीसाईबाबांच्या १०० व्या पुण्यतिथीनिमित्त श्री क्षेत्र शिर्डी येथे कुस्ती स्पर्धा आयोजित करणेबाबत मा.श्री.बाळासाहेब लांडगे, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद, पुणे यांना दि. १६/०५/२०१७ रोजी मा.अध्यक्ष सो. यांचे स्वाक्षरीने पत्र दिले आहे.

तरी आता मा. विश्वस्त श्री. भाऊसाहेब वाकचौरे सो. यांचे दि.१६/०७/२०१७ रोजीचे पत्रास अनुसरुन, पै.वैभव विलास लांडगे अहमदनगर जिल्हा कुस्ती संघटना यांचे प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करावे किंवा कसे ? याबाबत सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करणेसाठी शासनाकडून मदत मिळते काय व यासाठी आयोजकाची भुमिका काय राहील व संस्थानकडून त्यांना कोण-कोणत्या सुविधा अपेक्षीत आहेत, याची माहिती घेऊन सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा व त्यावेळेस सरचिटनीस, महाराष्ट्र राज्य जिल्हा कुस्तीगीर परिषद यांना सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात अखंड हरीनाम सप्ताह घेणेबाबत.**
**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कमल २१ मधील पोटकलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव–** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरुप ठरविणेकामी साईभक्त, शिर्डी ग्रामस्थ तसेच जागतिक साई मंदिर विश्वस्त/पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्राय यावर चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय होणेकामी धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रक मा.व्यवस्थापन समितीचे

सभेत सादर करणेत आले होते. त्यात महंत काशिकानंद महाराज, श्री.कैलासबापू कोते आणि इतर शिर्डी ग्रामस्थ यांचे विनंतीप्रमाणे व मा.विश्वस्त श्री.सचिन तांबे यांचे शिफारसीवरुन ऑगस्ट २०१८ मध्ये हरिनाम सप्ताहाचा समावेश करण्यात आला होता. सदरहू वेळापत्रकाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"...समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमांची रुपरेषा ठरविणेत येऊन, झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली आहे."

**प्रस्तावना-**

१) श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषित केलेल्या दि.१५/०७/२०१७ रोजीचे पत्रात "महंत स्वामी काशीकानंदजी महाराज परमहंस, अध्यक्ष, श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर, श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, निमगांव यांनी दि०१/०४/२०१७ व दि.०१/०७/२०१७ रोजीचे पत्रात कळविलेप्रमाणे श्री साईबाबांचे समाधी शताब्दी निमित्त अखंड हरीनाम सप्ताह हा संस्थान परिसरात करण्यात यावा आणि याकरीता प्रवचनकार यांचेसह मृदूंग वादक, हार्मोनियम वादक यांची बिदागीसह नमूद एकूण खर्च रु.२,६५,७१३/- मात्रचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत मांडण्यात येऊन नियमानुसार सदर कार्यक्रमास परवानगी व बिदागीची रक्कम मंजूर करुन घेऊन संबंधीतास कळविण्यात यावे ही, विनंती असे नमूद केले आहे.

२) श्री. विजय तुळशीराम कोते व इतर शिर्डी ग्रामस्थ यांनी मा. अध्यक्ष सो. यांना अग्रेषित केलेल्या दि.२१/०७/२०१७ रोजीचे पत्रात "शिर्डी ग्रामस्थांच्या ग्रामसभेमध्ये होणा-या साई शताब्दी महोत्सवामध्ये श्री सदगुरु गंगागिरीजी महाराज अखंड हरिनाम सप्ताह व्हावा असे सर्वानुमते ठरले त्याचप्रमाणे त्यासंदर्भात मा. चेअरमन साहेब व सर्व विश्वस्त मंडळ यांच्याशी ग्रामस्थांची चर्चा होऊन समाधी शताब्दी सोहळयामध्ये सप्ताह व्हावा असे ठरले आहे. तरी वरील विषयी साईबाबा संस्थानने प. पूज्य ह.भ.प. रामगिरीजी महाराज (मठाधिपती सरला बेट) यांना पत्रव्यवहार करणेस विनंती, असे कळविलेले आहे.

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. तसेच शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे. सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच वेळोवेळी मा.व्यवस्थापन झालेल्या बैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते.

शताब्दी वर्षात आयोजित विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजनामध्ये महंत काशिकानंद महाराज, श्री.कैलासबापू कोते आणि इतर शिर्डी ग्रामस्थ यांचे विनंतीप्रमाणे व मा.विश्वस्त श्री.सचिन तांबे यांचे शिफारसीवरुन ऑगस्ट २०१८ मध्ये हरीनाम सप्ताह कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमास आता मा.विश्वस्त श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनीही दि.१५/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये शिफारस केली आहे.

तथापि आता पुर्वीच्याच शिर्डी ग्रामस्थांनी दि.२१/०७/२०१७ रोजी दिलेल्या पत्रात प.पू. गंगागिरीजी महाराज अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करावे व श्री साईबाबा संस्थानने प. पूज्य ह.भ.प. रामगिरीजी महाराज (मठाधिपती, सरला बेट) यांना पत्रव्यवहार करणेबाबत कळविले आहे. सदरहू पत्रात कार्यक्रमाचा अंदाजीत खर्च (अन्नदान, इतर आवश्यक साधन सामुग्री व मनुष्यबळ) या बाबी नमूद केलेल्या नाहीत.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करावयाचा झाल्यास खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१) शताब्दी कालावधीत महंत काशिकानंद महाराज, श्री.कैलासबापू कोते आणि इतर शिर्डी ग्रामस्थ यांचे विनंतीप्रमाणे तसेच मा.विश्वस्त श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.विश्वस्त श्री.सचिन तांबे यांचे

शिफारसीनुसार अध्यक्ष, श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर, श्रीसाईबाबा वारकरी शिक्षण संस्था, निमगांव यांचा पुर्वी निर्णय झाल्याप्रमाणे अखंड हरीनाम सप्ताह आयोजित करावा.

**किंवा**

शताब्दी कालावधीत आता श्री.विजय तुळशीराम कोते व इतर शिर्डी ग्रामस्थ यांनी दि.२१/०७/२०१७ रोजीचे पत्राने कळविलेनुसार प.पू.गंगागिरीजी महाराज अखंड हरीनाम सप्ताह आयोजित करावा.

**किंवा**

२) शताब्दी कालावधीत उपरोक्त नमूद केलेले दोन्ही अखंड हरिनाम सप्ताह वेगवेगळया वेळी (सन २०१८ मधील अधिक मास व श्रावण मास) आयोजित करावेत.

तरी उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामधील धार्मिक कार्यक्रमांमध्ये प.पू.गंगागिरीजी महाराज अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करणेत यावे व या सप्ताहासाठी देहू, आळंदी, पंढरपुर अशा ठिकाणच्या वारकरी सांप्रदायांनाही बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **शिर्डी बसस्थानकामधील संस्थानच्या हिश्शयाच्या इमारतीमध्ये वापरासाठी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा जोडून घेणेकामी सिक्युरीटी डिपॉझीट चार्जेस भरणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माध्यमातून सर्व्हे नं.१७१/ १२ मध्ये अद्यावत सेवा सुविधायुक्त असे बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास बांधण्यात आलेले आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माध्यमातून बांधण्यात आलेल्या बसस्थानक इमारतीमध्ये संस्थानकरीता राखीव असलेला, पहिला मजला, दुसरा मजला व दोन लिफ्ट याकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून ४४ केडब्ल्यु क्षमतेचा थ्री फेज वीजपुरवठा जोडून घेणेबाबत कार्यवाही चालू आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने शिर्डी बसस्थानकाकरीता विद्युतपुरवठा सुरु करणेसाठी सिक्युरिटी डिपॉझिट भरणेबाबत संस्थानला कोटेशन पाठविले आहे. ही कोटेशनची रक्कम भरल्यानंतर व महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने मीटर जोडल्यानंतर वीजपुरवठा सुरु होईल. त्यानंतर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीज वापराची बीले संस्थानला प्राप्त होतील. तळमजला व तिसरा मजला शिर्डी बसस्थानकाकरीता आहे. बसस्थानकाकरीता विद्युतपुरवठा करावयाच्या केबल्स व कंट्रोल पॅनेल हे स्वतंत्र आहेत. व त्याचे एनर्जी मीटर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचे नांवे स्वतंत्र आहेत्याचे बील महाराष्ट्र राज्य महामंडळ आदा करते.

**मागणी:-** संस्थानच्या हिश्शाच्या इमारतीमधून वापरासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून स्वतंत्र एनर्जी मीटर जोडून विद्युतपुरवठा चालू करुन घ्यावयाचा आहे. एनर्जी मीटर जोडणी करुन घेणेकामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे भराव्या लागणा-या चार्जेसचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Cost Description | Amount |
|---|---|---|
| 1 | First Security Deposit | Rs. 44,000/- |
| 2 | Service Connection Charges | Rs. 00,104/- |
| 3 | Processing Fee | Rs. 00,100/- |
| | **Total Amount :-** | **Rs. 44,204/-** |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** शिर्डी बसस्थानकामधील संस्थानच्या हिश्शाच्या इमारतीच्या वापरासाठी विद्युतपुरवठा जोडून घेणेकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे उपरोक्तप्रमाणे सिक्युरिटी डिपॉझिट, सर्व्हीस कनेक्शन चार्जेस व प्रोसेसिंग फी च्या चार्जेसची रक्कम रुपये ४४,२०४/- इतकी भरावी

लागणार आहे. सदरील रक्कमेस व वीजपुरवठा चालू झाल्यानंतर येणारी वीज वापराची बीले महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानकामधील संस्थानच्या हिश्याच्या इमारतीमध्ये वापरासाठी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा जोडून घेणेकामी सिक्युरिटी डिपॉझिट, सर्व्हीस कनेक्शन चार्जेस व प्रोसेसिंग फी च्या चार्जेसची रु.४४,२०४/- मात्र रक्कम महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे भरणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **बस क्र.MH- 17, T-7109 व MH- 17, T-7110 या दोन प्रवासी बसेसचा पुढील सहा महिने दि.०१.०९.२०१७ ते दि.२८.०२.२०१८ या कालावधीचा टॅक्स भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुद:-**

१) कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व व कामाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील" असे नमुद केलेले आहे.

२) कलम २१ (१) (ज)मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून,त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करण्यात येईल, नमुद केलेले आहे.

**प्रस्तावना:-** वाहन विभागाकडील प्रवासी बस क्र.MH-17-T-7109 व MH-17-T-7110 या दोन प्रवासी बसचा वापर साईभक्तांना नगरसुल रेल्वेस्टेशन येथून ने-आण करणे कामी करण्यात येत आहे. सदर प्रवासी बसची टॅक्सची मुदत दि.३१/०८/२०१७ रोजी संपुष्टात येत असुन आर.टी.ओ. कार्यालयाचे नियमानुसार पुढील कालावधीचा टॅक्स भरणे आवश्यक आहे.

दि.१९/०९/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतीलविषय नं.११,निर्णय नं.६४८ अन्वये, संस्थानचे वाहन विभागाकडे उपलब्ध असलेली कार्यालयीन-६, रुग्णवाहीका-५,मालवाहतुक-३, प्रवासीबस-४, स्कुलबस-१ व दुचाकी-५ अशी एकुण २४ वाहने बरीच जुनी असल्यामुळे सदर वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेस मान्यता देण्यात आलेली असुन त्यानुसार, सदरचा प्रस्ताव विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यत मिळणे करीता सादर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांचेकडील पत्र क्र.सासवि-१०१७/२५/प्रक-२८/कासोळा-दि.१३/०४/२०१७ अन्वये, १ शवाहिका, १ स्कुलबस व २ प्रवासी बसेस अशा एकुण ४ वाहनांना लिलावास मान्यता मिळालेली आहे. उर्वरित १९ वाहनांची जाहिर लिलावाने विक्री करणेस मान्यता मिळणे बाकी आहे. सदर मान्यता मिळालेनंतर सर्व वाहनांची एकत्रित जाहिर लिलावाने विक्री करतायेईल.

उपरोक्त दोन्ही प्रवासी बसेसचा वार्षिक टॅक्स प्रत्येकी रु.१,०२,६००/- असून दोन्ही बसेस करीता एकुण रु.२,०५,२००/- खर्च येईल. सदरचे दोन्ही बसेस लिलावात प्रस्तावीत असलेने पुढील सहा महिने दि.०१/०९/२०१७ ते दि.२८/०२/२०१८ या कालावधीचा टॅक्स भरणे योग्य राहील. या कालावधीत सदर वाहनांचा लिलाव न झाल्यास पुढील कालावधीचा टॅक्स त्यावेळी भरणेत येईल. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून AT फॉर्मनुसार पुढील सहा महिने कालावधीचा खालील तपशिलाप्रमाणे टॅक्स रक्कम भरणे बाबत कळविलेले आहे.

| अ.नं. | बस क्रमांक | वाहन प्रकार | आसन क्षमता | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७-टी-७१०९ | प्रवासी बस | ५४+१ | ५६,४३०.०० |
| ०२ | एमएच-१७-टी-७११० | प्रवासी बस | ५४+१ | ५६,४३०.०० |
| | | | **एकुण रक्कम(रु.)** | **१,१२,८६०.००** |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** उपरोक्त तपशिलाप्रमाणे दोन्ही प्रवासी बसेसचा पुढील सहा महिने कालावधीचा टॅक्स उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरणे कामी रु.१,१२,८६०/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख बारा हजार आठशे साठ मात्र) खर्च येणार आहे. सदर टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात

ॲडव्हान्स डी.डी.द्वारे अदा करावी लागणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी / शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** महाराष्ट्र शासनाचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे नियमानुसार टॅक्स भरणे आवश्यक असुन सदर बाब आर्थिक आहे.

**मागणीः-** तरी बस क्र.MH-17-T-7109 व MH-17-T-7110 या दोन प्रवासी बसेसचा पुढील सहा महिने दि.०१/०९/२०१७ ते दि.२८/०२/२०१८ या कालावधीचा उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे टॅक्सची रक्कम भरणेस व याकामी येणा-या एकुण रु.१,१२,८६०/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख बारा हजार आठशे साठ) मात्रचे खर्चास मान्यता मिळणे बाबतचा निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे क्र.MH-17-T-7109 व MH-17-T-7110 या दोन प्रवासी बसेसचा पुढील सहा महिने दि.०१/०९/२०१७ ते दि.२८/०२/२०१८ या कालावधीच्या टॅक्सची रु.१,१२,८६०/- मात्र रक्कम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांचेकडे भरणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य (Part-A) तसेच On Consignment Basis (Part-B) वरील साहित्य तसेच रुग्णालयासाठी लागणारे गॅस पुरवठा करणारे पुरवठाधारकांनाGST नुसार बीले आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०१५–१६ या वर्षाकरिता लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य खरेदीकामी दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा. त्रि सदस्य समिती सभा निर्णय क्र.२६ अन्वये एकूण रुक्कम रु.५५७३३६३९२/- इतक्या रक्कमेस मान्यता मिळालेली होती तसेच सदर प्रस्तावास मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची सिव्हिल ॲप्लीकेशन नंबर ३४९५ दि.१३/०३/२०१५ अन्वये ई निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली होती. त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येऊन विहीत पध्दतीने (Part– A) करीता पहिल्या टप्प्यात एकूण 1238 आयटमकरिता एकूण रक्कम रु.१६७५७२९४७.४४ च्या व (Part– B) On Consignment Basis करिता प्राप्त दरानुसार अंदाजे रु.४०५१४२८७/- इतका खर्च अपेक्षित धरुन दि.२८/०७/२०१५ रोजी एकूण रु. २०८०८७२३४.४४ इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. त्यांनतर प्रायोगक तत्वाचा वापर करण्यात येऊन व DMER चे कार्यपध्दतीनुसार दुस-या टप्प्यात एकूण Part A ८२० आयटमसाठी करिता एकूण रक्कम रु.१६३६५५५०८.२७ तसेच Part B करिता १ आयटमकरीता प्राप्त दराने अंदाजे रु.३,२८,८६०/- इतका खर्च अपेक्षित धरुन दि.१३/११/२०१५ रोजी एकूण रु.१६६६८४३६८.२७ इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

सदर पुरवठा आदेशाचा कालावधी हा एक वर्षाकरीता होता परंतू पुरवठाधारक अद्यापपर्यंत संस्थान रुग्णालयाला त्याच मंजूर दराने विविध औषधे, सर्जिकल साहित्याचा पुरवठा करत आहेत. तसेच संस्थानचे दोन्ही रुगणालयात लागणारे विविध गॅसचे (लिक्वीड गॅस, ऑक्सीजन, नायट्रस व $CO_2$) दर देखील वाढलेले आहेत.

**मागणी–** सध्या अनेक पुरवठाधारकांनी त्यांचे पत्रान्वये मंजूर दराने औषधे, सर्जिकल साहित्य पुरवठा करण्याच असमर्थता दर्शविलेली असून नविन GST कर रचनेनुसार औषधे, सर्जिकल साहित्याचे नविन दर लागू करणे बाबत कळविलेले आहे.

भारत सरकारने प्रत्येक औषधे/ सर्जिकल साहित्यांसाठी Harmonised System Nomenclature (HSN Code) पारीत केलेला आहे. हया HSN Code नुसार भारत सरकारने GST दर निश्चित केलेले आहे. त्यानुसार प्रत्येक पुरवठा धारकास GST दरानुसारच कर लावून पुरवठा करणे बंधनकारक आहे. सदरचे GST दर हे १ जुलै २०१७ पासून लागु करण्यात आलेले आहे.

सध्या सन २०१७ -१८ या वर्षाकरीता औषधे, सर्जिकल साहित्य (Part “A” व “B”) खरेदीची प्रक्रीया अंतीम टप्यात असून याकामी ७५३ औषधे, सर्जिकल साहित्याकरीता पुरवठा आदेश देण्यात येत असून २२८३ इतक्या औषधे, सर्जिकल साहित्याकरीता फेर ई निविदा मागविण्याची कार्यवाही देखील चालू आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सन २०१७-१८ या वर्षातील औषधे, सर्जिकल साहित्य खरेदीची कार्यवाही चालू असल्यामुळे आपणास औषधे, सर्जिकल साहित्य शासनाच्या नविन GST कर रचनेनुसार खरेदी करावी लागणार आहे, सन २०१५-१६ मध्ये व्हॅट नुसार दर आकारण्यात येत होते, परंतु, सध्या GST लागू झाल्यामुळे HSN Code नुसार दर लावण्यात येत आहे. त्यामुळे पुरवठा धारक आपणास मागील मंजूर दराने पुरवठा करण्यास तयार नसून GST नुसार ठरविण्यात आलेल्या HSN Code बाबतही संधिग्नता असल्यामुळे पुरवठाधारकही आपणास नवीन GST दर देण्यास विलंब लावत आहे, त्यामुळे आपणास GST नुसार कमी अथवा वाढीव दराचा प्रस्ताव ठेवणे शक्य होत नाही व सध्याची परिस्थीती पाहता मटेरियल अभावी वैद्यकीय सेवा देणे फारच गंभीर बाब वाटत आहे. दि.०९/०७/२०१७ व दि.१७/०७/२०१७ रोजी कार्यकारी अधिकारी मॅडम यांनी मा. व्यवस्थापन समिती सदस्यांची चर्चा केलीअसता त्यांनी ०१/०७/२०१७ पासून GST नुसार बीले अदा करण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यामुळे सन २०१५-१६ मधील औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामी व्हॅट नुसार असलेले दर कमी करुन नवीन GST दराने पुरवठा धारकांकडून मटेरियल खरेदीस तसेच त्यांचे बील GST नुसार अदा केल्यास रुग्णालयास दैनंदिन लागणारे औषधे/ सर्जिकल साहित्य/ गॅस (लिक्वीड गॅस, ऑक्सीजन, नायट्रस व $CO_2$) उपलब्ध होण्यास मदत होईल, असे नम्र मत आहे.

तरी सन २०१७ -१८ या वर्षातील औषधे/ सर्जिकल साहित्य/ गॅस (लिक्वीड गॅस, ऑक्सीजन, नायट्रस व $CO_2$) खरेदीची कार्यवाही होईपर्यंत सन २०१५-१६ मधील औषधे/ सर्जिकल साहित्य/ गॅस (लिक्वीड गॅस, ऑक्सीजन, नायट्रस व $CO_2$) GST (Basis Price + GST) चे कर रचनेनुसार खरेदीस व त्याप्रमाणे पुरवठा धारकाची बिले अदा करणेत येऊन नोंद घेणेकामी सदर प्रस्ताव सविनय सादर.

**निर्णय क्र.६५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७ -१८ या वर्षामध्ये आवश्यक असणारी औषधे/ सर्जिकल साहित्य/ गॅस (लिक्वीड गॅस, ऑक्सीजन, नायट्रस व CO2) खरेदीची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत सन २०१५-१६ मधील औषधे/ सर्जिकल साहित्य/ गॅस (लिक्वीड गॅस, ऑक्सीजन, नायट्रस व CO2), GST (Basis Price + GST) चे कर रचनेनुसार खरेदी करणेस व त्याप्रमाणे पुरवठाधारकांची बिले आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **रेडीओलॉजी विभागातील Extra Dicom Viewer चे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतुद :-1) पृ. क्र. 355, समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये 14(2) ख
2) पृ. क्र. 356, समितीची कर्तव्ये व अधिकार 17 (2) झ
3) पृ. क्र. 359, विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग 21(1) क,21 (2) ग

**प्रस्ताविक:** श्री साईबाबा हॉस्पीटलमधील रेडीओलॉजी विभागाकरीता संदर्भ क्र.01 अन्वये M/s. Acton Engineering, Thane यांचेकडुन Extra Dicom Viewer, यु.पी.एस.सह एकुण रू.1,90,000/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर Extra Dicom Viewer दि. 29/07/2014 रोजी कार्यन्वीत करण्यात आले आहे.

सदर Extra Dicom Viewer चा एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.28/07/2015 रोजी संपला आहे. वॉरंटी कालावधीनतंर कंपनीने दोन वर्षासाठी मोफत सेवा पुरवठा आदेशानुसार दिलेली आहे सदर दोन वर्षाचा कालावधी दि.28/07/2017 रोजी संपत आहे. त्यामुळे दि. 29/07/2017 ते दि.28/07/2018 या कालावधीसाठी कंपनीकडे Extra Dicom Viewer चेवार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक आहे.

**मागणी:-** त्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र क्र.2016-17/085RO, दि.24/05/2017 अन्वये Extra Dicom Viewer चे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr. No. | Equipment | CMC Period | CMC Charges | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Comprehensive Maintenance Contract for Apple Based | 29/07/17 to 28/07/18 | 37,000.00 | 37,000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Workstation | | | |
| | | | SGST @ 9% | 3,330.00 |
| | | | CGST@ 9 % | 3,330.00 |
| | **Total Amount (Incl. of all Taxes) in Rs.** | | | **43,660.00** |

वरीलप्रमाणे Extra Dicom Viewer चे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता सर्वकरांसहीत एकुण रू.43,660/- (एकुण रू. त्रेचाळीस हजार सहाशे साठ मात्र) इतका खर्च येणार आहे. सदर रकमेची कंपनीने अगाउ मागणी केलेली आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये मशिनचे यु.पी.एस. बॅटरी इ. कन्झ्युमेबल्स पार्टसचा समावेश नाही.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरील संस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल. सदर Extra Dicom Viewer चे स्पेअर पार्ट M/s. Acton Engineering, Thane यंचेकडेच सदर उपलब्ध असतात. सदर Extra Dicom Viewer चे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळेमा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेणे आवश्यकआहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदर Extra Dicom Viewer चे स्पेअर पार्ट हे विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात त्यामुळे इतरकोणत्याही पुरवठधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाही. सदर Extra Dicom Viewer हे रेडीओलॉजी विभागात नियमीत वापरात असलेमुळे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सव्हिर्स कॉन्ट्रॅक्ट M/s. Acton Engineering, Thane यांचेकडे करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी M/s. Acton Engineering, Thane यांचेकडे Extra Dicom Viewer चे कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉक्ट्रॅक्ट दि.29/07/2017 ते दि.28/07/2018 या कालावधीसाठी करणेस व त्यासाठी येणाऱ्या रू.43,660/- च्या खर्चास व सदर रक्कम कंपनीस अगाउ अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रेडीओलॉजी विभागातील Extra Dicom Viewer चे दि.29/07/2017 ते दि.28/07/2018 या कालावधीसाठी M/s. Acton Engineering, Thane यांचेबरोबर वार्षिक सर्व्हिस कॉक्ट्रॅक्ट करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४३,६६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता निळवंडे धरण उध्दव घेऊन प्रस्तावित पाणी पुरवठा योजना राबविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:-** संस्थानचा WTP हा १९९२ साली तयार करणेत आलेला असून तो ६.६० MLD क्षमतेचा आहे. प्रस्तावित WTP हा २३ MLD क्षमतेचा आहे व संस्थानचे ०४ साठवण तलावांची एकुण क्षमता ही ३११ ML इतकी आहे. सदरहू साठवण तलावातील पाणीसाठा हा आता साधारणत ५५ ते ६० दिवस पुरतो. सदरची पाणी पुरवठा योजना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी अशी संयुक्त पाणी पुरवठा योजना आहे. सदर योजनेतून श्री साईबाबा संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी या गावांसाठीही पाणी पुरवठा करण्यात येतो. सदरहू योजना १९९२ साली कार्यान्वित झालेली असल्याने, सदरचा ६.६० MLD क्षमतेचा प्लान्ट सध्या २४ तास कार्यान्वित ठेवावा लागतो. तसेच सदर योजनेची सध्याची पाईपलाईन जीर्ण झालेली आहे व ती ब-याच वेळी लिकेज होते. त्यामुळे सदर नविन योजना हाती घेणे गरजेचे आहे.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डीकरीता पाणी पुरवठा करणेसाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन प्रस्तावित योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे इ. कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

सदरहू योजनेचा उद्भव निळवंडे धरण (ता.अकोले) असून निळवंडे धरण ते शिर्डी पाईपलाईन एकुण लांबी अंदाजे ८० कि.मी. आहे. जलशुध्दीकरण क्षमता- २३ द.ल.लिटर असून सदरहू योजनेत मुख्य जलवाहिनी, वितरण व्यवस्था इ. कामांचा समावेश आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दि.१३/०१/२०१४ रोजी शासनाकडे सादर केलेल्या सदरहू योजनेत शिर्डी संस्थान तसेच सभोवतालची २ गांवे कनकुरी व पिंपळवाडी यांचा समावेश आहे या योजनेची एकुण किंमत रु.२१५.९७ कोटी असून, त्यापैकी योजनेतील २ गावांसाठी किंमत रु.१९.०४ कोटी इतकी येते. त्यामुळे एकुण योजनेच्या किमतीपैकी शिर्डी संस्थानसाठी रु.२१५.९७ - रु.१९.०४ = **रु.१९६.९३ कोटी** इतकी किंमत येते. सदर योजनेत संस्थानसाठी रु.१९६.९३ कोटी इतका हिस्सा येतो.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण योजना मंडळ, अहमदनगर यांचे मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण नागरी व ग्रामीण, ठाणे यांना अग्रषित दि.०७/०२/२०१३ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार, या योजनेचे सर्वेक्षणाचे वेळी खात्रीशीर उदभव म्हणून प्रामुख्याने १) निळवंडे धरण. २) मुळा धरण. ३) गोदावरी उजवा तट कालवा यांचा विचार करण्यात आलेला असून, निळवंडे धरणाचे अंतर जरी जास्त असले तरी पाणी हे गुरुत्ववाहिनीने येत असल्याने योजना तयार करणे किफायतशीर होणार आहे हे गृहीत धरुन निळवंडे धरणात पाणी आरक्षण प्रस्ताव पाटबंधारे खात्याकडे पाठविण्यात आलेला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेल्या सदर योजनेसाठी निळवंडे धरण हा उद्भव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. निळवंडे धरणांतून पाणी आरक्षणास पाटबंधारे खात्याची तत्वत: मान्यता आहे. पाटबंधारे खात्याच्या दि.१०/०४/२०१३ च्या पत्रान्वये सदरहू प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेसाठी १४.६५ दलघमी (५१७.२९ दलघफु) आरक्षणाचा प्रस्ताव असून, रु.१८३.९३ कोटी हिस्सा शिर्डी संस्थानने उचलावा, असे कळविण्यात आलेले आहे. वरीलप्रमाणे योजनेची किंमत रु.१९६.९३ कोटी व पाणी आरक्षणासाठी प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु.३८०.८६ कोटी मात्र इतकी रक्कम होते.

सदरहू प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे **दि.१७/०७/२०१४** रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

*"श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीकरीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणांतून थेट पाईपलाईन आणणेच्या योजनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजुच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे संस्थान आणि शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायसवरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याचे पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरीकांबरोबरच साईभक्तांनाही याचा लाभ होणार आहे. तसेच श्री साईबाबा शताब्दी महोत्सवापुर्वी याबाबत कार्यवाही होणे गरजेचे असल्याने सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घेवून स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक व आवश्यक लोकवर्गणी उपलब्ध करुन देणे समितीला आवश्यक वाटते.*

*यावर सविस्तर चर्चा होवून, प्रस्तावित बाब धोरणात्मक व मेजर फायनान्शीयल असल्यामुळे समिती त्यावर निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी, सदरहू योजना का आवश्यक आहे, याबाबतची सर्व कारणे नमूद करुन प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा काय? अशा मार्गदर्शनपर सुचना व आदेश मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत यावा व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे ठरले."*

वाढीव शिर्डी संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी संयुक्तीक प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेविषयी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०७/२०१४ रोजीचे आदेशास अनुसरुन ॲड. आर.एन.धोर्डे यांचेमार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. १२३४६/२०१४ दाखल करण्यात आलेले होते.

प्रस्तुत सिव्हील ॲप्लिकेशनमध्ये मे.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी व दि.२१/०४/२०१६ रोजी तारीख नेमलेली होती. उपरोक्त सिव्हील अर्जामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दि.२२/१२/२०१४ व दि.२१/०४/२०१६ रोजीचे आदेशान्वये सदर प्रकरणी शासनास त्यांचे म्हणणे त्वरीत सादर करणेबाबत आदेश दिलेले होते.

मा.कोर्टाने दि.२२/१२/२०१४ रोजी सदर योजनेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत दिलेल्या आदेशान्वये मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे जा.क्रं.एसएसएस/ वशी/ पाणीपुरवठा/४०२६/२०१५, दि.१९/१०/२०१५ व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे जाक्रं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/ १३९०/२०१६, दि.२२/०६/२०१६ अन्वये प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.१५/०७/२०१६ रोजी दिलेले आदेशात सरकारी वकील यांनी सादर केलेल्या म्हणण्यानुसार या प्रकरणी या तारखेपासून पुढील चार आठवडयात पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांची तांत्रिक मान्यता घेवून पुढील दोन आठवडयात प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येईल असे आदेशात नमुद आहे.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रंसासंवि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७/का.१६ दि.१९/०७/२०१६ रोजीचे प्राप्त पत्रानुसार प्रस्तुत प्रकरणी प्राप्त निर्देशास अनुसरुन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने सुचित केल्याप्रमाणे या योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थानमार्फत मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे सादर करावा तसेच या संदर्भात व्यक्तिशः पाठपुरावा करुन अधिकाधिक तीन आठवडयाच्या कालावधीत तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेवून मान्यता प्राप्त प्रस्ताव पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी या विभागास सादर करण्यात यावा असे कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी प्राप्त निर्देशास अनुसरुन जा.नं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/२०१६, दि.२७/०७/२०१६ अन्वये या योजनेस तांत्रिक मान्यता देण्याचा प्रस्ताव मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग नाशिक यांचेकडे सादर करणेत आलेला होता.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत जा.क्रं/मुअ/नाशिक/तांशा-२/१५२७/२०१६, दि.१२/०८/२०१६ रोजीचे पत्रान्वये प्राप्त झालेले आहे. त्यानुसार रु.१६३४२.९६ लक्ष निव्वळ व रु.१९१९१.४० लक्ष ढोबळ (९% ETP Charges सह) किमतीचे सविस्तर अंदाजपत्रक व आराखडयांना बाब क्रं.३० माहे ऑगस्ट २०१६ पत्र क्रं.मजीप्रा/तांमा/१५३२, दि.१२/०८/२०१६ नुसार तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये लाखो साईभक्त श्री साईंचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील. त्यावेळी साईभक्तांची गैरसोय होवू नये यासाठी सदरहू योजना तातडीने पूर्ण होवून कार्यान्वित होणे गरजेचे असलेने महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रं.सासंवि-२०१५/ १००७/प्र.क्र.१७७/का.१६, दि.१९/०७/२०१६ रोजीचे पत्रात नमुद केलेनुसार, तांत्रिक मान्यता घेवून योजना तांत्रिक मान्यतेसह विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावी असे निर्देश दिलेले असलेने, इकडिल जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणीपुरवठा/ २५७३/२०१६, दि.२३/०८/२०१६ अन्वये प्रस्ताव मान्यतेसाठी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत आलेला होता.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७/ का.१६, दि.३१ ऑगस्ट, २०१६ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान, पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेवून) या योजनेच्या रु.१६३,४२,९५,५५५/- निव्वळ व रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ (९% ETP Charges सह तसेच रु.१८३९३/- लक्ष निळवंडे धरण हिस्सा

वगळून) किमतीच्या अंदाजपत्रकासह अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदरहू शासन निर्णयाची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडलेली आहे.

विषयांकित योजनेबाबत वर नमूद शासन निर्णयास अनुसरुन पुढील कार्यवाही करणेसाठी सर्वप्रथम सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करणे, सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत करणे व श्री साईबाबा समाधी महोत्सव कालावधीत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना पाण्याची कमतरता भासू नये याकरीता योजनेतील WTP, RCC MBR Pure Water Gravity Mains, Pure water Rising Main, Automation, Pumping Machinery, ESR, Distribution Network या उपांगांची कामे पहिल्या टप्यात हाती घेणेकामी कार्यवाही करणे या बाबींविषयी निर्णय होणेकरीता प्रस्ताव दि.०९/१०/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत आला होता.

त्यावर निर्णय क्रं. ७३९ पुढीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*" ... यावर सवितस्तर चर्चा होऊन , श्री साईबाबा संस्थान शिर्डीकरीता निळवंडे उद्धव घेऊन, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेचे काम संसथानमार्फत करावे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेमार्फत करावे याबाबतचा तौलानिक प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणोत यावा असे ठरले. "*

उपरोक्त निर्णयास अनुसरुन, संस्थानकडे पुरेशे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नसलेने संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी महोत्सव कालावधीत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना पाण्याची कमतरता भासू नये याकरीता पहिल्या टप्प्यात सदर योजनेतील WTP, RCC MBR, Pure Water Gravity Mains, Pure water Rising Main, Automation, Pumping Machinery, ESR, Distribution Network या उपांगांची कामे संस्थानमार्फत हाती घेणेकामी कार्यवाही करणे व या प्रकल्पातील निळवंडे ते शिर्डी पाईपलाईनचे उर्वरित काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आला.

त्यावर निर्णय क्रं. ३१ पुढीलप्रमाणे संमत झालेला आहे.

**"...**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, निळवंडे धरण उद्धव घेवून, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेपैकी शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP,ESR,Distribution Network व पाईपलाईनची कामे समाधी शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर तातडीने पुर्ण करुन घ्यावीत व सदर संपूर्ण योजना संस्थानमार्फत राबविण्यात यावी. याकामी तज्ञप्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणेत येऊन, त्यांना शासकिय दराने सल्लागार फी देण्यात यावी. तसेच याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी फेर प्रस्ताव सादर करणेत यावा.**"**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३१ अनुसरुन, निळवंडे धरण उद्धव घेवून, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेपैकी,

१) शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP,ESR,Distribution Network व पाईपलाईनची कामे समाधी शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर तातडीने पुर्ण करणे.
२) टप्पा क्रं.२ मध्ये निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद या अंदाजे ८० कि.मी.पाईपलाईन टाकणे.
३) याकामी तज्ञप्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणे.
४) सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत न करता संपुर्ण संस्थानमार्फत राबविणे.

वरीलप्रमाणे कार्यवाही करणेसाठी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी जा.क्रं.एसएसएस/ वशी/ पाणी पुरवठा/२८/२०१७, दि.०३/०४/२०१७ अन्वये फेर प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. याविषयी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, क्रं.सासंवि-२०१५/१००७/प्र.क्रं.१७७/का.१६, दि.०५/०५/२०१७ रोजीचे पत्र संस्थान कार्यालयास प्राप्त झाले. सदरचे पत्रानुसार वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर या योजनेसाठी ३% इतके व्यवस्थापन शुल्क आकारुन योजनेच्या अंमलबजावणीकरीता तज्ञ प्रकल्प सल्लागार म्हणून कामकाज पाहण्यास तयार असल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे सहमती पत्र तात्काळ विधी व न्याय विभागास उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आलेले होते. याबाबत इकडील विभागाकडुन कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग संगमनेर यांना जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/६६३/२०१७,दि.०६/०५/२०१७ अन्वये

व जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/८३०/ २०१७, दि.१७/०५/२०१७ अन्वये पत्र देवून याबाबतचा अभिप्राय तात्काळ उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आलेले होते.

महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे जा.क्रं.मुअ/नाशिक/तांशा-२/१२७१/ २०१७, दि.१५/०७/२०१७ रोजीचे पत्र प्राप्त झालेले असून, सदरचे पत्रात नमुद केलेप्रमाणे त्यांनी प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयास विचारणा केली असता, मध्यवर्ती कार्यालयाने या कामासाठी मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन सेवा शुल्क ३% अशी ५% आकारणी करुन सदर काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मान्यता दिली आहे. असे कळविलेले आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष कालावधीमध्ये श्री साईचे महासमाधीचे दर्शनार्थ मोठया प्रमाणावर साईभक्त शिर्डी येथे भेट देतील. या कालावधीमध्ये साईभक्तांची गैरसोय होवू नये यासाठी सदरहू योजनेचे काम तातडीने सुरु होणे गरजेचे आहे.

विषयांकित योजनेचे काम तातडीने सुरु करणेसाठी खालीलपैकी निर्णय होणे आवश्यक आहे.

**अ)** **१)** शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे.

**२)** टप्पा क्रं.२ मध्ये निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद या अंदाजे ८० कि.मी.पाईपलाईन टाकणे.

**३)** सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यामार्फत पुर्ण ठेव पध्दतीने ठेऊन सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करणे.

**ब)** **१)** शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP,ESR,Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे.

**२)** टप्पा क्रं.२ मध्ये निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद या अंदाजे ८० कि.मी.पाईपलाईन टाकणे.

**३)** सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन संपुर्ण योजना संस्थानमार्फत राबविण्यात येवून याकामी तज्ञ प्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करुन त्यांना मागणी केलेप्रमाणे या कामासाठी मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन सेवा शुल्क ३% अशी ५% फी देणे.

तरी साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता निळवंडे धरण उद्भव घेऊन प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेबाबत वरील नमुद केलेपैकी योग्य तो निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता निळवंडे धरण उध्दव घेऊन प्रस्तावित पाणी पुरवठा योजना राबविणेकामी प्रस्तावातील ब मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदर योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकारणामधील सेवानिवृत्त उपकार्यकारी अभियंत्याची कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात यावी व यासाठी द्यावयाचे मानधन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, त्यांचेबरोबर चर्चा करुन अंतीम करावे, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **श्री साईबाबा मंदिर परीसरातील फ्लोअरींगचे नूतनीकरण (दुसरा टप्पा) करणेसाठी प्राप्त ई-निविदांमधिल लिफाफा क्र.०२ (Commercial Bids) उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :**

०१. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०५.

०२. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३-२४/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६१.

**प्रस्तावना :** श्री साईबाबा मंदिर परीसराचे नुतनीकरण सन-१९९९ मध्ये करण्यात आले आहे. त्यावेळी मंदिर परीसरात रफ शहाबाद फरशी बसविण्यात आलेली आहे. सदर फ्लोअरींगचे नूतनीकरण होवून १७ वर्षे झालेली आहेत, सततचे वापराणे सदर रफ शहाबाद फ्लोअरींग ब-याच ठिकाणी खराब झालेले असल्याने समाधी मंदिराचे उत्तरेकडील व पश्चिमेकडील काही भागात ग्रेनाईट + व्हाईट इंजि. आर्टिफिशियल टाईल्स फ्लोअरींग बसविणे प्रस्तावित करणेत आले होते. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ चे निर्णय क्र.९०५ अन्वये याकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

याकामी प्राप्त ०३ ई-निविदांचे वाणिज्यीक देकार दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत येवून त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ चे सभेत निर्णय क्र.३६१ खालीलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

*"....यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, श्री समाधी मंदिर परिसरात २९७५ चौ. मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रीयेमधील निम्नतम दरधारक आर. के. सावंत, नाशिक यांचे एकत्रित रु.७४,८२,०००/- मात्र दर स्किारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. असे ठरले. तसेच मंदिर परिसरामधील उर्वरीत ६,९७० चौ. मी. जागेतही ग्रनाईट फ्लोअरींग बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.*

*तसेच यावेळी अशीही चर्चा झाली की, मंदिर परिसराचे शेजारी बरेचसे अतिक्रमण झालेले असल्यामुळे मंदिराचा आकर्षकपणा दिसत नाही. याकरीता अतिक्रमण करणांवर कडक कारवाई करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीस कळविण्यात यावे."*

उपरोक्त ठरावानुसार ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना इकडील जा.क्रं.एसएसएसटी/ बांधकाम/ ११०४/ २०१७, दि.०२/०६/२०१७ रोजी श्री समाधी मंदिर परिसरात २९७५ चौ. मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी रु.७४,८२,०००/- मात्र इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे. व त्यानुसार कामास सुरुवात करणेत आलेली आहे.

सदर निर्णयानुसार उर्वरीत ६९७० चौ. मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी इकडील विभागामार्फत रु.२.४० कोटी रकमेचे अंदाजपत्रक तयार करणेत येऊन, ग्रेनाईट + व्हाईट इंजि. आर्टिफिशियल टाईल्सचे फ्लोअरींग करणेकामी दि.०५/०६/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये वृत्तपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.१७/०७/२०१७ अखेर ई-निविदा मागविणेत आल्या आहे. सदरचे मुदतीत खालील ०३ ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या आहेत.

01. Amruta Constructions, Sinnar, Nashik.
02. Gajanan Constructions, Nashik
03. M/s. R K Sawant, Nashik.

प्राप्त ई-निविदेचा तांत्रिक माहितीचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.१९/०७/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आला असून, त्यामध्ये उपरोक्त तिनही ठेकेदार पात्र होत आहेत.

**प्रस्ताव:** तरी श्री साईबाबा मंदिर परीसरातील (दुसरा टप्पा) उर्वरीत ६९७० चौ. मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी पात्र ०३ ई-निविदा धारकांचे निविदेचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

**श्री साईबाबा मंदिर परीसरातील (दुसरा टप्पा) उर्वरीत ६९७० चौ. मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी पात्र ०३ ई-निविदाधारकांचे निविदेचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) आजचे व्यवस्थापन समितीसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | Gajanan Constructions, Nashik | ३,७०,२४,८३५/- |
| २ | Amruta Constructions, Sinnar, Nashik | ३,४४,७२,८००/- |
| ३ | M/s. R K Sawant, Nashik | **२,९९,५६,३४५/-** |

**प्रस्तावितकामीचे निम्नतम दरधारक M/s. R K Sawant, Nashik यांचे प्रतिनिधी आजचे सभेसमोर उपस्थित होते, समितीने त्यांचेबरोबर दरांबाबत चर्चा केली असता, चर्चेअंती त्यांनी एकत्रित रु.२, ७५,००,०००/- मात्र अंतीम निम्नतम दर देऊ केले.**

**निर्णय क्र.६६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परीसरातील (दुसरा टप्पा) उर्वरीत ६९७० चौ. मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी M/s. R K Sawant, Nashik यांचे चर्चेअंतीचे एकत्रित रु.२,७५,००,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने शिर्डी शहरामधून जाणाऱ्या अहमदनगर– मनमाड (NH160) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर व दक्षिण बाजूस स्वागत कमानी उभारणेसाठी जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांना संस्थमतर्फे निधी उपलब्ध करुन देणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मीक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव:-** मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५१६ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"श्रींचे समाधी शताब्दी वर्षाचे निमित्ताने शिर्डीकडे येणारे सर्व रस्ते /महामार्गांवर आकर्षक महाव्दारांची उभारणी करणेत यावी. यासाठी शासनाचे सार्वजनिक बांधकाम खात्यास विचारणा करणेत यावी. ते महाव्दार उभारणी करुन देण्यास तयार असतील तर त्यासाठीचा खर्च सार्वजनिक बांधकाम खात्यास देण्यात यावा अथवा त्यांचेकडून NOC घेवुन, संस्थानमार्फत महाव्दारांची उभारणी करणेत यावी, असे ठरले."*

**प्रस्तावना:-** श्री साईबाबांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. सदर कृती आराखड्यात संस्थानमार्फत प्रथम प्राधान्य क्रमाने उपलब्ध करावयाच्या सोयीसुविधांमध्ये शिर्डी शहरामधून जाणा-या अहमदनगर– मनमाड (NH-160) या राष्ट्रीय महामार्गावर शिर्डी शहराच्या उत्तरेस शासकिय विश्रामगृहाजवळ अथवा नवीन बायपास रोडजवळ तसेच शिर्डी शहराच्या दक्षिणेस शिर्डी शिवाजवळ स्वागत कमानी उभारणे प्रस्तावित आहे.

तथापी नगर-मनमाड रस्ता हा जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांचे अखत्यारीत असल्याने त्यांचे कार्यालयाशी संपर्क करुन आकर्षक महाव्दारांची उभारणी करणेबाबत त्यांना विचारणा करणेत आली. त्यावेळी निधी उपलब्ध करुन दिल्यास त्यांचे मार्फत महाव्दारांची उभारणी करणेत येईल, असे त्यांनी समक्ष चर्चेत सांगितले आहे. तसेच सदर कामासाठी मंदिर परिसराचे महाव्दारांवर आधारीत व साईटवरील परिस्थितीस अनुरुप होईल असे डिझाईन करणेबाबात चर्चा झाली. त्यानुसार कार्यकारी अभियंता जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांनी याकामी रू.९९,८६,२५२/- मात्र रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केले असून सदरहु काम करणेसाठी निधी वर्ग करणेबाबत कळविले आहे.

**प्रस्ताव**:- तरी जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांचेमार्फत अहमदनगर– मनमाड राष्ट्रीय महामार्गावर (NH-160) स्वागत कमानी उभारणीकरीता येणा-या रक्कम रु.९९,८६,२५२/- मात्रचे खर्चास व सदरहू निधी संस्थानमार्फत कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांना उपलब्ध करुन देणेबाबत तसेच त्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल तरतुदी अन्वये राज्य शासनाचे पूर्वमान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांचेमार्फत अहमदनगर– मनमाड राष्ट्रीय महामार्गावर (NH-160) उत्तर बाजूस शिर्डी बायपासजवळ व दक्षिण बाजूस शिर्डी शिवेलगत कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांचेमार्फत स्वागत कमानींची उभारणी करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या खर्चाची रु.९९,८६,२५२/- मात्र रक्कम कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर याचेकडे जमा करणेस व त्यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पूर्वमान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेस माहिती दिली की, शिर्डी ग्रामस्थांनी आणखी दोन जादा स्वागत कमानीं उभारणेची विनंती केलेली आहे. यावर चर्चा होऊन, त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेमध्ये सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **शिर्डी सर्व्हे नं.२/४,३/१,३/७ मधील साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारती पाडणेकामी प्राप्त झालेल्या निविदांमधिल उघडण्यात आलेल्या वाणिज्यिक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद–**

१) अधिनियमाचे कलम १७(१) नुसार, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मीक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

२) अधिनियमाचे कलम २१(१)मधील खंड (ग) अन्वये, "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे."

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय-**

१) मारोजीचे सभेत निर्णय क्रं २०१७/०३/२७. दिपन समितीच्यावस्थाव्य .. २४१ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*"....यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोयीसाठी दि.१२.१२.२०१६ पासून बायोमेट्रीक बेस टाईम स्लॉट दर्शनव्यवस्था सुरु करण्यात आलेली आहे. या प्रणालीमध्ये साईभक्तांना श्रींचे दर्शनासाठी दर्शनरांगेमध्ये जाणेसाठीची वेळ मिळते. यामुळे पुर्वी प्रस्तावित करण्यात आलेल्या ३०,००० साईभक्तांच्या क्षमतेच्या व रु.३४०.२० कोटी मात्र खर्चाच्या मोठया स्वरुपाच्या प्रकल्पाची आता आवश्यकता नाही. त्याकरीता साईनिवास अतिथीगृह व सुलभ शौचालय या इमारती आहे तशाच ठेवून फक्त जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या जुन्या इमारती काढून त्या ठिकाणी नवीन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणेस मान्यता देण्यात आली.*

*तसेच याकामी आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असो., नवी दिल्ली यांचेकडून नियोजित इमारतींचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. तसेच जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या इमारतींमध्ये साईभक्तांसाठी चालविण्यात येणारे विविध सेवा-सुविधांचे काऊंटर्स योग्य जागेची निश्चिती करणेत येऊन, इतरत्र स्थलांतरीत करण्यात यावे व या जुन्या इमारती पाडणेसाठी (Demolition) प्रथमत: स्वतंत्र निविदा मागवण्यात याव्या. याच बरोबर यापुर्वी रु.३४०.२० कोटी मात्र खर्चाच्या प्रकल्पाबाबत शासनाकडे सादर करण्यात आलेल्या दि.२३.०४.२०१६ रोजीचा प्रस्ताव रद्द करणेत येऊन, वरीलप्रमाणे सुधारीत प्रकल्पास राज्यशासनाची मान्यता घेणेसाठी नव्याने प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले."*

२) मा.व्यवस्थापन समितीच्या व दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.३६७ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी श्रीमती सोनिया काप्रे यांनी आजचे सभेसमोर दर्शनरांग प्रकल्पाचे सादरीकरण दाखविले.*

*"....यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, बेसमेंट तयार करणेसाठी पैसा व वेळ दोन्हीही जास्त लागतो. या प्रकल्पातील बेसमेंट रद्द करावे व ग्राऊंड + २ अशी इमारत तयार करावी. तथापी आर .सी. सी.*

*डिझाईन ग्राऊंड + ३ मजल्यांकरीता सक्षम असावे. या इमारतीमधील मजल्यांची उंची ६ मी. इतकी दर्शविण्यात आलेली आहे. ती एनबीसी चे विहीत मानकांप्रमाणे तसेच बांधकाम नियंत्रण आणि प्रोत्सहन नियमावलीनुसार ठेवणेत यावी. या इमारतीतील वेटींग हॉल्समध्ये सेंट्रलाईज / फुल ए. सी. करु नये. त्याऐवजी डक्टेबल स्प्लीट ए.सी. करणेत यावा. ५०% टॉयलेटस् वेस्टर्न व ५०% इंडीयन पध्दतीचे असावेत. नकाशात दर्शविलेले एस्कलेटर्स रद्द करुन हॉलची साईज वाढविणेत यावी. दर्शन रांग इमारत मंदिर परिसरास जोडणारा स्कायवॉक एकेरी म्हणजेच फक्त जाण्यासाठी असावा. त्याचबरोबर याठिकाणच्या लिफ्टची क्षमता कमी करणे शकय आहे का, याबाबत आर्किटेक्ट यांनी सखोल अभ्यास करुन कळवावे, याप्रमाणे नकाशात सुधारणा करुन सुधारीत अंदाजपत्रक तयार करावे व त्यानुसार सदर कामासाठी ई-निविदा मागविणेत याव्यात.*

*तसेच आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवी दिल्ली यांना सादर प्रकल्पासाठी कामाच्या किंमतीचे ३.५% + सर्व्हीस टॅक्स याप्रमाणे फी अदा करणेस मान्यता देणेत आली. त्यानुसार आर्किटेक्ट यांचेशी करारनामा करणेत यावा. परंतु त्यापुर्वी प्रस्तावितकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."*

**मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे मान्यतेबाबतचा आदेश-**

Civil Application No.12347/2014 in Public Interest Litigation No.18/2011 वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०५/०४/२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्टची नेमणूक करणे व रु.३४०.२० कोटी मात्र खर्चास राज्य शासनाची प्रशासकिय मान्यता घेण्याचे अटीवर मान्यता प्रदान केलेली आहे.

**प्रस्तावना-** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. उत्सव काळात तसेच सलग सुट्यांचे दिवशी मंदिर परिसर व लगतचे भागात मोठ्या प्रमाणावर साईभक्तांची गर्दी होते. त्यावेळी दर्शन रांगेचे हॉल व जुन्या पिंपळवाडी रस्त्याचा दक्षिणेकडील मंदिर परिसराचा भाग पूर्ण क्षमतेने भरतो. काही प्रसंगी दर्शन रांग त्याबाहेर जाते. त्याअनुषंगाने साईभक्तांना वेळेत व सुलभ दर्शन व्हावे यासाठी दि.१२/१२/२०१६ पासून टाईम दर्शन पास व्यवस्था सुरु करणेत आली आहे. सदर टाईम दर्शन प्रणालीत भक्तांना श्रींच्या दर्शनाकरीता ठराविक वेळ निश्चित केली आहे. सदर प्रणालीचा परिणाम अभ्यासून निश्चित अशी दिशा ठरविणेसाठी सद्यस्थितीत दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्प स्थगित ठेवणेत आलेला होता.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने गठीत कृती आराखडा समितीचे वेळोवेळी झालेल्या बैठकांचे निर्णयानुसार शासकिय व निमशासकिय विभागांनी आपापले विभागाचे प्रस्तावांसंदर्भात केलेल्या कार्यवाहीचे अनुषंगाने संबंधीत शासकिय व निमशासकिय विभागांची मा कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे अध्यक्षतेखाली गुरुवार, दि.१६/०३/२०१७ रोजी संस्थानचे साईनिवास अतिथीगृह शिर्डी येथे बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकी दरम्यान प्रारुप कृती आराखडयाची पाहणी करताना मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांनी शताब्दी वर्षात होणा-या गर्दीचे अनुषंगाने जुने प्रसादालय परिसरातील साईनिवास अतिथीगृह व सुलभ शौचालय या इमारती वगळून उर्वरीत जागेत नविन दर्शनरांग इमारतीचे बांधकाम करता येईल, असे सुचविले. त्यानुसार साईनिवास अतिथीगृह, सुलभ शौचालय या इमारती तसेच सध्या मंदिर परिसरातील इमारती आहे तशाच ठेवून त्या ठिकाणी नविन दर्शनरांग हॉल इमारतीचे बांधकामासाठी आर्किटेक्ट यांचेकडून सुधारीत नकाशे तयार करून घेण्यात आले.

आर्किटेक्ट यांनी सुधारीत नकाशांचे मा. अध्यक्ष सो., मा. व्यवस्थापन समिती व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेपुढे सादरीकरण केले. त्यावेळी झालेल्या चर्चेनुसार नकाशांमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली आहे. दि.१७/०७/२०१७ रोजी आर्किटेक्ट यांनी सविस्तर अंदाजपत्रक, नकाशे व ई-निविदा मसुदा सादर केलेला आहे. त्यावर मा. श्री मनोज घोडेपाटील, उप जिल्हाधिकारी यांचेकडे या प्रकल्पाशी संबंधीत विभागांची (पाणीपूरवठा, विद्युत, फायर ॲण्ड सेफ्टी, मेकॅनिकल, ध्वनिक्षेपण, सीसीटिव्ही) बैठक दि.१९/०७/२०१७ रोजी आयोजित केली होती. सदर बैठकीस आर्किटेक्ट श्री. उदय काप्रे देखील उपस्थित होते. त्यावेळी अंदाजपत्रकातील त्रुटीं, सुधारणा व त्यांचे पूर्ततेबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी खालील विषयांवर चर्चा करणेत आली.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १. | आर्किटेक्ट यांनी रू.९८ कोटीचे अंदाजपत्रक सादर केले. |
| २. | ऑडीटोरीयम, इटेरीयर, लिफ्ट चे स्वतंत्र रू.५.५० कोटीचे अंदाजपत्रक आहे. त्याकरीता स्वतंत्र ई-निविदेची कार्यवाही याबरोबरच सरु ठेवण्यात यावी. |

| | |
|---|---|
| ३. | निविदेमध्ये ७५० के. व्हि. चे ०३ जनसेट घेण्यात आलेले आहेत. त्याऐवजी १५०० के. व्हि. चे ०३ जनसेट भविष्यातील लोड विचारात घेता गृहीत धरणेत यावे. |
| ४. | ३३ के. व्हि. जनसेट सबस्टेशन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे. |
| ५. | विद्युत व बांधकाम विभाग यांच्या निविदा स्वतंत्र काढाव्यात किंवा एकत्रित काढाव्या याबाबत शासन जी. आर. व मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार अभ्यास करुन कार्यवाही करणे. |
| ६. | फायर ॲण्ड सेफ्टी करीता सदर इमारतीवर २ ते २.५ लक्ष लिटर क्षमतेची स्वतंत्र ओव्हरहेड टॅंक उभारणेत यावेत. |
| ७. | टेलिफोन केबलचा या प्रकल्पात समावेश करणे. |
| ८. | सी. सी. टि. व्हि. कॅमेरा सिस्टीम करीता आवश्यक सर्व बाबींचा या प्रकल्पात समावेश करणे. |
| ९. | शू-रॅक एम. एस. ऐवजी एस. एस. च्या घेण्यात यावेत. |

त्यानुसार आर्किटेक्ट यांनी अंदाजपत्रकात दुरुस्त्या केल्या आहेत. सुधारीत अंदाजपत्रकानुसार या प्रकल्पासाठी येणारे खर्चाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

**A) Civil, Water Supply, Fire Fighting & allied works -**

| Sr.No. | Description | Estimated Amount |
|---|---|---|
| 1 | Civil Works | 48,99,57,358/- |
| 2 | Internal PHE Works | 80,39,296/- |
| 3 | Internal Fire Fighting Works | 89,26,871/- |
| 4 | Internal Signage Works | 1,04,33,399/- |
| 5 | AV Equipment Works | 69,36,450/- |
| 6 | UG Tank & STP Civil Woks | 2,60,58,695/- |
| 7 | Pumps & Water Treatment Plant | 46,33,370/- |
| 8 | STP Equipment | 1,53,30,000/- |
| 9 | External Development Works (PHE) | 83,61,032/- |
| 10 | Roads & Landscaping Works | 2,76,87,112/- |
| 11 | Auditorium/ VIP Interior Works | 17,08,83,650/- |
| | **(A) Total Amount (Rs.):** | **77,72,47,233/-** |

**B) Electrical, Lifts & HVAC Works -**

| Sr.No | Description | Estimated Amount |
|---|---|---|
| 1 | Internal Electrical Works | 8,15,19,505/- |
| 2 | Street Lighting Works | 63,12,375/- |
| 3 | ESS & DG Sets | 10,92,21,560/- |
| 4 | Lift Installation Works | 2,20,75,000/- |
| 5 | HVAC Works | 7,87,16,640/- |
| | **(B) Total Amount (Rs):** | **29,78,45,080/-** |
| | **Grand Total Amount (A+B) Rs.:** | **107,50,92,313/-** |

सदर प्रकल्पाकरीता उपरोक्तप्रमाणे A व B मिळून एकूण रक्कम रु.१०७.५१ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव-** शिर्डी सर्व्हे नं.२/४, ३/१ व ३/७ मधिल क्षेत्रावर नियोजित दर्शनरांग प्रकल्प बांधकाम करणेसाठी वरीलप्रमाणे A व B मिळून एकूण रक्कम रु.१०७.५१ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी याबाबत खालील बाबीं विषयी निर्णय होणे आवश्यक आहे.

१) सदर प्रकल्पासाठी येणारे रु.१०७.५१ कोटी इतक्या खर्चास मान्यता देणे.

२) सदर प्रकल्पासाठी Civil Application No.12347/2014 in Public Interest Litigation No.18/2011 वर मा. उच्च न्यायालय यांनी दि. ०५/०४/२१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य शासनाचे प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे.

३) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील Writ Petition No.3196 /2013 मधिल दि.१०/०४/२०१४ रोजीचे निवाडयानुसार सदर प्रकल्पातील स्थापत्य व विद्युत (वर नमूद (A) व (B) ) कामांच्या ई-निविदा स्वतंत्ररित्या मागविणेबाबत अभ्यास करुन कार्यवाही करावी.

तरी वर नमूद बाबींविषयी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६६२** **मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.३१.०३.२०१७ रोजी झालेल्या कृती आराखडा समितीचे बैठकीत सदरहू प्रकल्प प्रथम प्राधान्याने हाती घेण्यास मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुषंगाने श्री.प्रविण परदेशी, मा.मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.०३.०५.२०१७ रोजी मंत्रालय, मुंबई येथे आढावा बैठक पार पडली. सदर बैठकीत संस्थानच्या व्यवस्थापन समितीने जुना दर्शनरांग प्रकल्प रद्द करुन जुन्या साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारती काढून त्या ठिकाणी प्रकल्प लवकर होईल या दृष्टीने कार्यवाही करावी. तसेच तत्पुर्वी त्याठिकाणी आवश्यक बदल करुन आहे त्याच इमारतीत दर्शनरांग करता येईल का? याबाबत विचार करावा. तथापी व्यवस्थापन समिती व कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत उचित निर्णय घ्यावा, असे सुचित करण्यात आले आहे.**

**साईभक्तांच्या सोयीकरीता रु.३४० कोटी अपेक्षित खर्चाचा दर्शन रांग प्रकल्प यापुर्वी मंजूर करणेत आला होता, परंतू आता बायोमेट्रीक बेस टाईम स्लॉट दर्शनव्यवस्था सुरु करण्यात आलेली असल्याने सदरहू प्रकल्पाच्या आराखड्यामध्ये दि.२७.०३.२०१७ व दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार सुधारित आराखडा व अंदाजपत्रकासह सविस्तर प्रस्ताव आजचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.**

**अंदाजपत्रकात समाविष्ट १५०० KVA क्षमतेच्या जनसेट ऐवजी सदर प्रकल्पासाठी आवश्यक असलेले ७५० KVA क्षमतेचे ०३ जनसेटचा समावेश करणेत यावा.**

**सदर प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी ०९ महिने इतकी मूदत देण्यात यावी. सदर विहित मूदतीपूर्वी काम पूर्ण केल्यास संबंधीत ठेकेदार यांना प्रती महिना Initial Contract Price च्या १% प्रमाणे जास्तीत जास्त दोन महिन्यांपर्यंत बोनस अदा करणे व काम पूर्ण करणेस विहित मूदतीपेक्षा विलंब झाल्यास प्रती दिवस रू.५ लक्ष या प्रमाणे (Initial Contract Price च्या जास्तीत जास्त १०% पर्यंत) दंड आकारणी करणे याप्रमाणे तरतुदीचा निविदेत समावेश करावा.**

**सदरहू प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून साईभक्तांचे सुविधेकरीता उपलब्ध करणे गरजेचे आहे. त्यासाठी सिव्हील, विदयुत, HVAC इत्यादी कामांच्या प्रत्येकी स्वतंत्र निविदा काढणे ऐवजी परस्पर समन्वय राखण्याचे दृष्टीने सदर सर्व कामांची एकत्रित निविदा काढण्यात यावी.**

**वर नमूद जनसेट व इतर काही बाबींचा अपेक्षित खर्च कमी होत असल्याने त्यानुसार आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस् यांनी सादर केलेल्या सुधारित अंदाजपत्रकानुसार सदर प्रकल्पासाठी खालिलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.**

| | | |
|---|---|---|
| **अ)** | Civil, Electrical, HVAC, Auditorium/ VIP Interior and Allied Works. | Rs.98,88,92,656/- |
| **ब)** | Auditorium Interior Work and AV Equipment Work. | Rs.4,99,28,030/- |
| | Total: | Rs.103,88,20,686/- |

**वरीलप्रमाणे एकूण रु.१०३,८८,२०,६८६/- इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली. सदर प्रकल्प संस्थानतर्फे हाती घेणेसाठी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेकरीता, तसेच शिर्डी नगरपंचायत यांचे बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा दरम्यान प्रकल्प लवकर पुर्ण होण्याचे दृष्टीने वरीलपैकी (अ) मधील कामे प्राधान्याने हाती घेणे आवश्यक असल्याने त्यासाठी प्रथम ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. त्याचप्रमाणे वरील (ब) मधिल कामे ही सिव्हील वर्कचे प्रगतीनुसार पुढील टप्प्यावर हाती घेता येणार असल्याने त्यासाठी स्वतंत्ररीत्या ई-निविदा मागविणेची प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **नियोजीत श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्पाचे जागेवर Geo Technical Investigation करणेकामी प्राप्त झालेले ई-निविदांचे उघडण्यात आलेल्या वाणिज्यिक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद :**

| अ.नं. | कलम | कलम तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतुदीचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभव उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववायाचा आहे. ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (ग) | **भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी** व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी **सोयी व सुविधा पुरविणे.** |

**मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय:** १) दि.१५/०६/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.४९९:

"... यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजीत श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्पाचे बांधकामाकरीता GeoTechnical Investigation करणेकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्ताव:** मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार दि.१६/०६/२०१७ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेतआल्या होत्या. ई-निविदांचा कालावधी दि.२३/०६/२०१७ ते ३०/०६/२०१७ असा ठेवण्यात आला होता. याकालावधीत ०३ ठेकेदार यांनी ऑनलाईन ई-निविदा सादर केल्या होत्या

| Sr.No | Name of Contractor |
|---|---|
| 01 | DBM Geotechnics & Constructions Pvt.Ltd., Mumbai |
| 02 | Geo Profiles & Enginnering Services Pvt. Ltd., Mumbai |
| 03 | Jay Gajanan Geotechnics,Thane |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक निविदा मा खरेदी समितीचे दि.१२/०७/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार सर्व ०३ ठेकेदार पात्र झाले आहेत.

उपरोक्त ०3 पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई-निविदांचा लिफाफा क्र. ०२ (वाणिज्यिक निविदा) दि.१३/०७/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघणेत आला असून, त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| Sr. no | Name of Contractor | Amount | Remarks |
|---|---|---|---|
| 01 | DBM Geotechnics & Constructions Pvt.Ltd. Mumbai | **1,98,900/-** | **Lowest** |
| 02 | Geo Profiles & Engineering Services Pvt., Ltd., Mumbai | 2,74,400/- | -- |
| 03 | Jay Gajanan Geotechnics. Thane | 2,71,000/- | -- |

उपरोक्त तपशिलानूसार तिन निविदाधारकांपैकी DBM Geotechnics & Constructions Pvt.Ltd., Mumbai यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजीत श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्पाचे जागेवर Geo Technical Investigation करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेले DBM Geotechnics & Constructions Pvt.Ltd., Mumbai यांचे एकत्रित रु.१,९८,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, सदरहूकामी त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१७** **आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**निर्णय क्र.६६४** व्यवस्थापन समितीचे इतिवृत्त पुढील सभेमध्ये वाचून कायम होईपर्यंत त्यामधील निर्णयांच्या प्रती पुढील कार्यवाहीसाठी शासनास अथवा संस्थानव्यतिरिक्त बाहेरील कामांसाठी देण्यात येऊ नये, अशी मागणी समिती सदस्यांनी केली. तथापि, असे केल्यास सभेमध्ये झालेल्या निर्णयांवर अंमलबजावणी करणेस विलंब होईल, असे मा.अध्यक्ष महोदय यांनी नमूद केले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

---

**निर्णय क्र.६६५** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ यात आणखी सुधारणा करण्यासाठीचा विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचा दि.१३ जुलै, २०१७ रोजी प्रकाशित झालेल्या अध्यादेशावर आजचे सभेमध्ये विस्तृत चर्चा करणेत आली.

या अध्यादेशामधील सुधारणा खालीलप्रमाणे नमुद केलेली आहे.

"कलम १४ (दोन) खंड (क) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल-

(क) (एक) आवश्यकता भासेल तेव्हा, कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची बदली करण्याचे;

(दोन) समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुध्द किंवा कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे;

(तीन) समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे त्या समितीकडे निलंबन प्रस्तावित करण्याचे;"

**सदर सुधारणेवर सर्व समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. या सुधारणेवर चर्चेअंती कलम १४ (दोन) खंड (क) मधील उपरोक्त (एक) व (दोन) मधील सुधारणांनुसार अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असून (तीन) नुसार समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे निलंबनाचे प्रस्ताव समितीसमोर सादर करावेत, असे मा.अध्यक्ष महोदय यांनी सांगितले.**

अधिनियमात १४क. हे नवीन कलम समाविष्ट करणेत आले आहे. त्यानुसार शासन निर्णय, विधी व न्याय विभाग, क्रमांक सासंवि- २०१३/ प्र.क्र.१/ का.१६, दिनांक २२ ऑक्टोबर २०१३, अन्वये घटित केलेल्या कृति योजना समितीने यथोचितरित्या मंजूर केलेल्या श्री साईबाबा महासमाधी शतक महोत्सवी सोहळयाच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट **असलेल्या** प्रस्तावांच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनासाठी,-

(क) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, पंचवीस लाख रुपयांपर्यंतच्या खर्चास मंजुरी देण्याचा अधिकार असेल;

(ख) समितीला, एक कोटी रुपयांपर्यंतच्या खर्चास मंजुरी देण्याचा अधिकार असेल; आणि

(ग) एक कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च अंतर्भूत असलेल्या प्रस्तावांना राज्य शासनाकडून मंजुरी देण्यात येईल."

यामध्ये "शासन निर्णय, विधी व न्याय विभाग, क्रमांक सासंवि- २०१३/ प्र.क्र.१/ का.१६, दिनांक २२ ऑक्टोबर २०१३, अन्वये घटित केलेल्या कृति योजना समितीने यथोचितरित्या मंजूर केलेल्या श्री साईबाबा महासमाधी शतक महोत्सवी सोहळयाच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट **नसलेल्या** प्रस्तावांच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनासाठी,-

(क) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, पंचवीस लाख रुपयांपर्यंतच्या खर्चास मंजुरी देण्याचा अधिकार असेल;

(ख) समितीला, एक कोटी रुपयांपर्यंतच्या खर्चास मंजुरी देण्याचा अधिकार असेल; आणि

(ग) एक कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च अंतर्भूत असलेल्या प्रस्तावांना राज्य शासनाकडून मंजुरी देण्यात येईल."

**असा बदल करणेत यावा, अशी शिफारस शासनास करावी, असे ठरले**

तसेच मुख्य अधिनियमाच्या कलम २८ मध्ये-

(ख) पोट कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात आलेले आहे.

"परंतु, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, जे ठराव शासनाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे, असे त्याला वाटत असेल, असे समितीचे ठराव शासनाकडे पाठविता येतील."

**कलम २८ (ख) पोटकलम १ मध्ये केलेली सदरहू सुधारणा रद्द करणेत यावी, यासाठी शासनास कळवावे, असे ठरले.**

**उपरोक्तप्रमाणे ठराव मंजूर करणेत आला व हा ठराव शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे त्वरीत पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**निर्णय क्र.६६६** समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाचा व या वर्षामध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या विविध धार्मिक/ सांस्कृतिक कार्यक्रमांचा प्रचार, प्रसार करणेसाठी ब्रॅण्ड ॲम्बेसिटरची नेमणूक करणेबाबत निर्णय घेण्यात आला होता. परंतु ब्रॅण्ड ॲम्बेसिटर नेमणेसाठी विविध स्तरांमधून होत असलेला विरोध पहाता, ब्रॅण्ड ॲम्बेसिटर नेमणूकीबाबतचा निर्णय रद्द करणेत यावा. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**निर्णय क्र.६६७** दि.१५.०६.२०१७ रोजीचे सभेमधील निर्णय क्र.५१७ नुसार साईबाबा पालखी सोहळा, शिर्डी आयोजित शिर्डी ते पंढरपुर पायी दिंडी सोहळयास एक विशेष बाब म्हणून अंदाजे १००० वारकऱ्यांना पाच दिवसाच्या अन्नदानासाठी कोरडा शिधा देण्यास मंजुरी मिळालेली होती. परंतु सदरहू वारकऱ्यांना कोरडा शिधा देण्यात आला नाही. समितीने घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही झाली नाही, याबद्दल समितीने नाराजी व्यक्त केली व यापुढे सामुदायिक सप्ताह वगळता शिर्डी परिसरातील वारकऱ्यांची मागणी आल्यास शासन मान्यतेने त्यांना अन्नदानासाठी कोरडा शिधा देण्यात यावा. (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**निर्णय क्र.६६८** एकाच प्रकारच्या वस्तू/ साहित्य खरेदी करावयाच्या असल्यास संबंधीत विभागांच्या समन्वयाने एकत्रित ई-निविदा प्रक्रिया राबवाव्यात. तसेच बांधकाम व विद्युत अशा स्वरुपाचे कामांसाठी एकच ई-निविदा प्रकिया राबवावी.

तसेच दि.०१ जुलै, २०१७ पासुन संपुर्ण देशामध्ये वस्तु व सेवा कायदा लागू झालेला असून त्यामध्ये बऱ्याचशा वस्तू व सेवा करांच्या दरामध्ये मोठया प्रमाणात बदल झालेला आहे. सेवा/ पुरवठाधारक यांना आदा करावयाचा कर सदरहू पुरवठाधारकांना शासनास भरावा लागतो. त्यामुळे तो कर पुरवठाधारकांच्या नफ्याचा/ उत्पन्नाचा भाग येत नाही. त्यामुळे वस्तु व सेवा करामध्ये, अगोदरच्या कराच्या तुलनेने जी वाढ/ घट झालेली असेल ती वाढ, संबंधीत पुरवठाधारकांनी मागणी केल्यास प्रकरण परत्वे खात्री करुन, त्यांना आदा करण्यात यावी/ कमी करण्यात यावी. तथापि, अशी वाढ देताना पुर्वीची करप्रणाली व नवीन करप्रकाणालीचा पुर्ण अभ्यास संबंधीत विभागांने करुन, नंतरच अशी वाढ द्यावी. तसेच जर वस्तू व सेवा कायद्यानुसार वस्तूंचे दर कमी झाले असतील तर त्याचाही आढावा सर्व विभागांनी घ्यावा व त्यानमुसार दर कमी करणेबाबत कार्यवाही करावी, असे ठरले. (कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.६६९** दि.०६.०७.२०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या समाधी शताब्दी कृती आराखडा आढावा समितीचे बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व शिर्डी शहरासाठी सीसीटीव्ही प्रकल्प एकत्रितरित्या महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत राबविणेत यावा असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान) हे शिर्डी येथे वरील विषयांसदर्भात आढावा बैठक घेणार असून, त्यावेळी सीसीटीव्ही प्रकल्पाबरोबरच साऊंड ॲण्ड ऑडीओ, सिक्युरिटी सर्व्हेलन्स, साईटेक टप्पा-२, हॉस्पिटल सॉफ्टवेअर व HMIS या प्रकल्पांबाबत संस्थानमार्फत त्यांचेशी चर्चा करणे उचित होईल. त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान/ सीसीटीव्ही/ ध्वनिक्षेपण व टेलिफोन विभागप्रमुख/ वैद्यकिय संचालक)

---

**निर्णय क्र.६७०** श्री साईबाबा संस्थानचे जुने प्रसादालय व साईप्रसाद नं.०१, ०२ या इमारती काढून त्याठिकाणी नवीन दर्शनरांग प्रकल्प राबविणेस या समितीने मान्यता दिलेली आहे. जुने प्रसादालयाच्या ठिकाणी असणारे टाईम दर्शन काऊंटर्स हे स्थलांतरीत करुन सर्व्हे नं. ४/१, बगीचा या प्रयोजनासाठी राखीव असलेल्या जागेत सुरु करणेत यावे. त्यासाठी २ ते ९ एकर जागेचे ११ महिने अथवा नवीन दर्शन रांगेचे काम पुर्ण होईपर्यंतचे कालावधीसाठी, शासन नियमाप्रमाणे अधिग्रहण करणेत यावे. तसेच शासन नियमाप्रमाणे मोबदला देणे, टाईम दर्शन काऊंटर स्थलांतरीत करणे व इतर आवश्यक कामे करणेस मान्यता देणेत आली. ही सर्व कामे तातडीने पुर्ण करणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ बांधकाम विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.६७१** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ चा उद्घाटन समारंभ कार्यक्रम दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी गेट नं.०३ समोरील १६ गुंठे जागेमध्ये करणेस व त्यानुषंगाने निमंत्रण पत्रिका, मंडप-स्टेज व इतर अनुषंगीक बाबी करणेस, तसेच त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. या उद्घाटन कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रसिध्दीसाठी Video Clip, Audio Clip, Flex तयार करुन घेण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चासही मान्यता देण्यात आली. तसेच या कामांसाठी येणारा खर्च देणगीदार साईभक्त देण्यास इच्छुक असतील तर त्यांनाही आवाहन करणेत यावे, असे ठरले.

याचबरोबर, या उद्घाटन कार्यक्रमाच्या दिवशी शोभायात्रा, ग्रंथदिंडी, साईरथ मिरवणूक आयोजित करणेस व त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- समाधी शताब्दी विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.६७२** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ निमित्ताने श्री साईबाबा यांची प्रतिमा असलेली १० लाख टपाल तिकीटे छपाई करणेचा यापुर्वी निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याऐवजी रु.१० लाख मात्र पर्यंत खर्चाची टपाल तिकीटे छापण्यात यावीत. त्यापैकी रु.८ लाख मात्र रकमेची रु.५/- ची, रु.१ लाख मात्र रकमेची रु.१०/- ची व रु.१ लाख मात्र रकमेचे प्रेझेंटेशन पॅड, ब्राऊचर व इतर आवश्यक छपाई पोष्ट विभागाकडून करुन घेण्यात यावी, असे ठरले. तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने रु.१००/- मात्रचे विशेष नाणे तयार करणेत यावे, त्यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचेशी आवश्यक कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकत्रित खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- समाधी शताब्दी विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.६७३** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ मधील गर्दी व उत्सवांच्या कालावधीमध्ये साईभक्तांना निवासव्यवस्था, पार्किंग इ. सुविधा पुरविणेसाठी मंडप, तात्पुरते स्वच्छतागृह, बॅरेकेटिंग, ध्वनिक्षेपण, विद्युत, पाणी व इतर आवश्यक/ अनुषंगीक बाबींसाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे वार्षिक दर निश्चित करुन ठेवावेत, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.६७४** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ साठी इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीची नेमणूक करणे, कार्यक्रमाची प्रसिध्दी देणेसाठी एजन्सीची नेमणूक करणे, वर्षभरातील कार्यक्रमांचे डॉक्युमेंटेशन करणेसाठी एजन्सीची नेमणूक करणे या सर्व कामांसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.६७५** समाधी शताब्दी निमित्ताने विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे, येणाऱ्या साईभक्तांसाठी तात्पुरत्या निवासी सोयी-सुविधा तयार करणे, वाहन पार्किंग व इतर सोयी-सुविधांसाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन शासन नियमाप्रमाणे अधिग्रहीत करणेत यावी व त्यासाठी आवश्यक मोबदला शासन नियमाप्रमाणे देणेत यावा. या प्रयोजनांसाठी किती जमिन आवश्यक आहे, याचा निर्णय वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी याचे स्तरावर घेणेत यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

वरील निर्णय क्र.५२२ ते ६७५ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्रौ १०.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी